
म. ग्रं. सं. ठाणें.
विषय भू-प्रवास
सं. क्र. ६८०


REFBK-0025062

# युवर अटेन्शन प्लीज


UNCHES







# सुंदर,
# अॅ[illegible]रान प्लेज

**बाबा कदम**


REFBK-0025062
REFBK-0025062

अजब पुस्तकालय, कोल्हापूर.

प्रकाशक :
अनिल मेहता
अजब पुस्तकालय
भाऊसिंगजी रोड, कोल्हापूर.

मुद्रण स्थळ :
समाज मुद्रणालय, कोल्हापूर.

मुद्रण व्यवस्था :
आर्. व्ही. खेर
खेर-ठक्कर मॅनेजमेंट कन्सल्टन्सी
मणेर बिल्डिंग, शनिवार पेठ,
काळाइमाम तालमीजवळ,
कोल्हापूर.



१९८२


© सौ. कुमुदिनी वीरसेन कदम

मुखपृष्ठ : जयंत ताडफळे

रेखाचित्रे : मधुकर ओतारी


मूल्य ५० रुपये





ज्यांच्यामुळे हा परदेश-दौरा
करू शकलो
त्या माझ्या असंख्य
ज्ञात व अज्ञात वाचकांना

बाबा कदम



# चार शब्द

परदेश-प्रवासाला जाऊन परत आल्यानंतर माझे अनेक मित्र मला भेटायला आले. प्रत्येकाला परदेश प्रवासात मी काय पाह्यलं अन् अनुभवलं हे माझ्या तोंडून ऐकायची इच्छा होती. पण मी प्रवासात जे पाह्यलं, ते तास-अर्ध्या तासात सांगून संपण्यासारख नव्हतं. मी त्या सर्वांना सांगितलं, 'लवकरच एक प्रदीर्घ असं प्रवासवर्णन लिहिणार आहे. त्यावरून तुम्हा सर्वांना मी परदेश कोणत्या दृष्टीने पाहिला याची कल्पना येईल.'

आजपर्यंत अनेक मातब्बर अशा साहित्यिकांनी अशी प्रवासवर्णनं लिहिलेली आहेत. दोन लेखकांनी लिहिलेलं एकाच देशाचं प्रवासवर्णन कधीच एकसारखं नसतं, कारण प्रत्येकाची अनुभूती आणि अभिव्यक्ती भिन्न असते.

माझे हे प्रवासवर्णन वाचताना कदाचित् आपल्याला वाटेल की, 'भारतीय समाज आणि समाजव्यवस्था' याबद्दल एक पूर्वग्रहदूषित दृष्टीने मी हे प्रवासवर्णन लिहिलेलं आहे. पण युरोप आणि अमेरिका इथलं जीवन अवलोकन करताना माझ्या मनात भारताबद्दल जे विचार डोकावले ते स्पष्ट आणि निःसंकोच अशा प्रामाणिकपणाने व्यक्त केले आहेत. यात पाश्चिमात्य देशांचे अवास्तव गुणगान करण्याचा हेतू नाही किंवा भारतवासियांची अकारण निर्भर्त्सना करण्याचा उद्देशही नाही.

पाश्चात्त्यांशी बरोबरी करणे आपणाला बिलकूल अशक्य नाही. पण त्यासाठी एक फार मोठं पथ्य पाळावं लागणार आहे. अनावश्यक वाढलेली ही लोकसंख्या तात्काळ मर्यादित करायला हवी. या प्रवासवर्णनातून ठायी ठायी आपणाला माझ्या या जाणिवेची कल्पना येईल.

लोकसंख्या-वाढ रोखणे हे अत्यावश्यक असे राष्ट्रकार्य आहे. ते मुळीच न केल्यास राष्ट्राची अपरिमित अशी हानी होणार आहे. कुटुंबनियोजनाकडं दुर्लक्ष करणारे देशद्रोही मानावे लागतील. भारताच्या सर्व समस्या सोडवायचा तेच एकमेव मार्ग आहे.

काही ठिकाणी लिखाणाच्या ओघात थोडंसं विषयांतर घडलेलं आहे याची मला जाणीव आहे. पण त्यातून माझ्या आवडी-निवडी, छंद यांची आपणा सर्वांना कल्पना येईल. जे मला जवळून ओळखतात त्यांना माझ्या स्वभावाची पूर्ण कल्पना आहेच; पण हे प्रवासवर्णन वाचताना माझ्या उभ्या महाराष्ट्रभर पसरलेल्या वाचकांनाही माझी आणखीन जवळून ओळख होईल.

हे प्रवासवर्णन कुटुंबनियोजन खात्याच्या प्रोत्साहनानं लिहिलेलं नाही, याची जाणीव असो द्यावी.

**बाबा कदम**

(library stamp with handwritten accession numbers)

# युवर अटेन्शन प्लीज !

'ट्रिंग ऽ ट्रिंग ऽऽ, ट्रिंग ऽऽ' प्रथम स्पीकरमधून असा आवाज आणि लगेच त्यानंतर 'युवर अटेन्शन प्लीज !' हे मंजूळ आवाजात उच्चारलेले हवाईसुंदरीचे शब्द कानांवर आले. ती आणखीन काय सांगते, ते ऐकण्यासाठी एकाग्र होऊन ऐकत असता, पुन्हा ती अदृश्य सुंदरी म्हणाली, 'वेलकम् टू 'समुद्रगुप्त' ए. आय. ऑन बीहाफ ऑफ कॅ. सिंग. वुई आर नाऊ रेडी टू टेक ऑफ फॉर लंडन व्हाया डेहली अँड फ्रँकफूर्ट. प्लीज फासन युवर बेल्टस् अँड प्लीज एक्स्टींग्विश युवर सिगारेटस् !'

सहार विमानतळापासून निघालेले तीनशे पंचाहत्तर प्रवाशांना हवेत तरंगत नेण्याची क्षमता असलेले ते प्रचंड जेट विमान 'रनवे' कडे निघाले. दोन्ही बाजूंच्या पंखांतून लाल आणि प्रखर पांढऱ्या दिव्यांचा प्रकाशझोत आलटून-पालटून सोडणारे ते हवाई जहाज दोन्ही बाजूला लागलेल्या निळ्या दिव्यांच्या रेषेमधून जाताना हळूहळू गती वाढवू लागले. बघता बघता 'टरबाईन्स'चा आवाज वाढला आणि विमान गतिमान होऊन धावपट्टीवरून धावू लागलं विमानतळावरचे दिवे मागे धावू लागले. काही सेकंदात विमानाचा कॉकपिटचा भाग किंचित उचलल्यासारखा झाला विमानाने

हवेत झेप घेतली होती. मुंबापुरीचे दिवे आता खाली अंधारात काजव्यासारखे क्षीण होऊन लुकलुकत होते काही क्षणानंतर तेही दिसेनासे झाले

पाच जून १९८१ मध्यरात्रीचे अडीच वाजले होते आणि आमची, म्हणजे सौ. माई, चि. उमेश व मी, अशा तिघांची युरोप-अमेरिकेची यात्रा सुरू झाली होती.

विमानात बसण्याचा हा काही आमचा पहिलाच प्रसंग नव्हता. या अगोदर मोनो मशिनच्या प्लेनमधून मी व सौ. माईंनी १९६० साली मुंबई शहरावरून चकरा मारल्या होत्या. त्यानंतर १९६३ साली काश्मिरची सफर केली होती. त्यावेळी श्रीनगरवरून दिल्लीला विमानानेच आलो होतो. पुन्हा १९७७ साली काश्मीरवरून परत येताना 'पिरपंजाल' पर्वत हवेतूनच ओलांडला होता त्यामुळं विमानात पहिल्यांदा बसणाऱ्यांच्या चेहऱ्यावर उमटणारी भीती किंवा उत्सुकता आम्हा तिघांपैकी एकाच्याही चेहऱ्यावर नव्हती. पण एक जाणीव मात्र सतत होत होती, आज आपण मायभूमी सोडून हजारो मैल दूर असलेल्या युरोप आणि अमेरिकेच्या दौऱ्यावर चाललो आहोत. परत नक्कीच यायचे होते, पण तात्पुरता का होईना मातृभूमीचा विरह जाणवणार होता. आप्तस्वकीय, मित्रमंडळी पुन्हा दोन महिने दिसणार नव्हती. सव्वा तासानंतर ' ट्रिंग ऽ ट्रिंग ऽ ऽ ऽ युवर अटेन्शन प्लीज !' पुन्हा तोच गोड आवाज स्पीकरमधून उमटला, 'वुई आर नाऊ ट्वेंटीफाईव्ह थाऊजंडस् फीट अबव्ह सी लेव्हल अँड द टेंपरेचर इज फिफ्टी एट डिग्रीज सेंटीग्रेड. वुई आर नाऊ ओन्ली हंड्रेड माईल्स अवे फ्रॉम डेहली.'

सौ. माईंनी माझ्याकडं पाहात विचारलं,

'म्हणजे, दिल्ली फक्त शंभर मैल राहिली ?'

'हो ऽ ऽ ऽ ताशी सहाशे मैल वेगानं आपलं विमान उड्डाण करत आहे. आजपर्यंत आपण बसलेल्या सर्व विमानांपेक्षा याची गती जास्त आहे. ते पहा समोर दिसतात ते दिल्लीचेच दिवे.'

बाजूच्या काचेतून बोट दाखवून मी म्हणालो चि. उमेशराव डोळे मिटून बसले होते. त्यांना विमान-प्रवासाचं बिलकुल कौतुक वाटत नव्हतं. आमच्यापेक्षा त्यांच्या हवाई वाऱ्या अधिक झालेल्या होत्या नुकतेच ते नैनितालला जाऊन आले होते जाता–येता मुंबई–दिल्ली एअरबसने प्रवास

केलेल्या त्यामुळं त्यांनी माझ्याकडं अर्धोन्मीलित नजरेनं फक्त पाहिलं. मला त्या पाहण्याचा अर्थ उमगला. त्यांना जणू म्हणायचं होतं, ' काय आवा हे ? इतक्या वेळा विमान–प्रवास करूनही किती अधिरता ही ?'

काय करता ? जमानाच बदलला आहे. तरुण पिढी अधिक जाणकार आणि समजूतदार झालीय खरी ! ज्या गोष्टी पंचवीस वर्षांपूर्वी बाप मुलाला सांगत असे त्याच गोष्टी आज मुलगा बापाला सांगतो ! कालाय तस्मै नमः !

' ट्रिंग, ट्रिंग ऽऽ ट्रिंग ऽऽऽ युवर अटेन्शन प्लीज ! अब हम देहल्ली हवाई अड्डेपर उतरनेवाले हैं । अपनी खुर्सीकी पेटी बांध लीजिए !'

पुन्हा ती इंग्रजीतून म्हणाली, ' वुई आर नाऊ अबाऊट टू लँड ऑन डेहली एअरपोर्ट. प्लीज फासन युवर बेल्टस् अँड प्लीज एक्स्टीग्विश युवर सिगारेटस् !'

विमान हवेत असताना धुम्रपान करायला परवानगी असते, पण ती सुद्धा ठरावीक जागेवर बसून ! टॉयलेटमध्ये किंवा ठरावीक जागा सोडल्यास धुम्रपानास बंदी असते. विमानास आग लागू नये म्हणून अशी खबरदारी घेण्यात येते. मी धुम्रपानाचा फारसा चाहता नसल्यानं मला त्या सूचनेनं ' बॉदरेशन ' होणार नव्हतं. पण काही महाभाग मात्र ' सिगरेट विझवा ' चा आदेश आल्यावर कपाळावर आठ्या चढवून सीटच्या हँडेलमधल्या अॅशबॉक्समध्ये सिगारेटी विझवीत – ते सुद्धा अगदी नाखुषीनं ! जणू काही धुम्रपानाचा आपला हक्क हिरावून घेतला जात आहे अशा आविर्भावात !

विमान दिल्ली तळावर उतरले तेव्हा पूर्वदिशा उजळली होती. त्या अंधुक प्रकाशात खिडकीतून एक प्रचंड ब्रिटिश एअरवेजचे जेट विमान मला उभे असलेले दिसले. त्या विमानाला उद्देशून मी मनातल्या मनात म्हटले, ' तुझ्या देशालाच चाललो आहोत आम्ही !'

जवळ जवळ दीड–पावणे दोन तास आमचे विमान दिल्लीच्या तळावर थांबले होते. विमान उतरल्या उतरल्या तंत्रज्ञ आणि कर्मचारी यांनी विमानाची यांत्रिक तपासणी सुरू केली. जितक्या वेळा मी विमान–प्रवास केला, तितक्या वेळा नेहमी अनेकांच्या मनात एक शंका डोकावते तीच शंका

माझ्याही मनात डोकावत असे : विमान हवेत असताना विमानात अचानक बिघाड झाला तर काय करायचे ? काय करणार ? आपण काहीच करू शकत नाही. रस्त्यावरून धावणारी बस किंवा मोटार नादुरुस्त झाली तर ती रस्त्याच्या कडेला उभी करून तिच्यातला दोष काढता येईल. पण हे तीनशे पंचाहत्तर प्रवासी आणि त्यांचे शेकडो किलोग्रॅम वजन असलेले सामान घेऊन उड्डाण करणारे हवाई जहाज हवेत बिघडले तर परदेश प्रवासाऐवजी परलोक प्रवास घडायला फारशी यातायात घडणार नाही ! नाहीतरी या आयुष्यात केव्हा ना केव्हा हा भयप्रद वाटणारा परलोक प्रवास प्रत्येकाला घडणारच आहे याची जाणीव असल्यामुळं मनाची समजूत घालून मी सीटचा पट्टा कमरेभोवती घट्ट आवळून टाकला. कारण हवाई सुंदरीने पुन्हा एकदा दिल्लीवरून उड्डाण होत असल्याची सूचना दिली होती.

मुंबई सोडल्यानंतर जे वाटले नव्हते ते दिल्ली सोडल्यावर वाटू लागले आजपर्यंत एखादी अशक्यप्राय गोष्ट किती अप्राप्य आहे हे सांगताना 'दिल्ली. तो बहोत दूर है ।' असं सहजासहजी मी म्हणून जात असे. पण आज प्रत्यक्षात मी याच दिल्लीपासून शेकडो मैल दूर चालले होतो. परदेश प्रवासाची इतक्या वर्षांची इच्छा तृप्त होत होती पण त्याचबरोबर भारतमातेचा निरोप घेताना घसा दाटून आल्यासारखं वाटत होतं.

जिथे सूर्य मावळतो, त्या देशाबद्दल बरंचसं ऐकलं होतं. लहानपणी इतिहास, भूगोल यांचा अभ्यास करताना कधी काळी फरान्स, जर्मनी. बेल्जियम, हॉलंड. स्वित्झर्लंड. इंग्लंड आणि अमेरिका हे देश प्रत्यक्षात पहायला मिळतील असं वाटलं नव्हतं आता ते प्रत्यक्षच पहायला निघालो होतो. उजव्या हाताच्या चंद्रपर्वतावर म्हणे एक रेषा असते आणि तीवरून तो माणूस परदेश–प्रवास करणार आहे की नाही हे म्हणे समजतं ! कॉलेजात असताना 'चेरो' चं एक पामिस्ट्रीवरचं पुस्तक 'स्वखर्चानं' घेतलं होतं. त्यातही परदेश–प्रवास घडणाऱ्याच्या हातावरच्या रेषा कशा असतात हे बारकाईनं पाहिलं होतं माझा हात मी दिवसातून एक-दोन वेळा तरी बघत होतो, पण तशी निश्चित रेषा कुठं दिसत नव्हती. म्हणून जे जे माझे डॉक्टर मित्र परदेशाला जाऊन आले होते त्यांच्या हातांचे तळवेही तपासून पाहिले, पण अमुक एक हीच रेषा परदेश–प्रवास घडवून आणते असे छातीठोकपणे

सांगता येणं शक्य नव्हतं. वयाची पन्नाशी उलटली तरी, परदेश प्रवासाच्या दृष्टीनं काही हालचाल होत नाही असं पाहून मी हात बघणे बंद करून टाकले आणि मनाशी म्हणालो, ' असेल हरीच्या मनात, तर बसवेल नेऊन विमानात !'

पण परदेश–प्रवासाला निघण्यापूर्वी आणि या समुद्रगुप्त विमानात बसण्यापूर्वी काय घडलं ते इतकं गमतीशीर आहे की, ते सांगितल्याविना राहवत नाही.

गेली बावीस वर्षे मी सरकारी वकील म्हणून नोकरी करतो आहे आणि नोकरी करता करता अधून–मधून लिखाण करतो आहे. सुदैवाने मी जे जे लिहितो ते ते वाचक आवडीने वाचतात आणि वाचक आवडीने वाचतात म्हणूनच प्रकाशक माझ्यामागे सतत ' क्यू ' लावून उभे असतात. कृपा करून गैरसमज करून घेऊ नका ही आत्मश्लाघा नव्हे, वस्तुस्थिती आहे. प्रकाशक लेखकाचा गैरफायदा घेतात अशी बरीच ओरड कानांवर येते, पण माझा अनुभव भिन्न आहे. बहुसंख्य प्रकाशकांनी माझ्या चांगुलपणाचा ( माफ करा. तो मजपाशी भरपूर आहे असा माझा समज आहे. ) कधीही गैरफायदा घेतलेला नाही अन् त्यामुळेच प्रसिद्धी आणि थोडंफार धन मी कमवू शकलो. आणि ते कमवलं म्हणूनच परदेश–प्रवासाची ही ' झेप ' घेऊ शकलो. ती सुद्धा एकट्याने नव्हे, तर सहकुटुंब !

तसं आमचं कुटुंब मर्यादितच आहे. माई, उमेश अन् मी ! खरं म्हणजे मला कुटुंबनियोजनाचं एखादं पारितोषिक यापूर्वीच मिळायला हवं होतं. पण आज-काल पारितोषिकं आणि पदव्या ज्यांची लायकी नाही त्यांनाच बहाल करण्याची प्रथा असल्याने मला कोणतीही शासकीय पदवी किंवा प्रशस्तिपत्र नजिकच्या भविष्यकाळात मिळेल अशी आशा नाही.

सरकारी नोकरी करीत असताना फावल्या वेळात मी लिखाण करतो ही गोष्टसुद्धा अनेकांना डाचते, हे सांगितलं तर खरंसुद्धा वाटणार नाही. मी सरकारी नोकर असल्यामुळं लेखन करू नये. माझ्या लिखाणावर बंदी

घालावी असे निनावी अर्ज सरकार आणि पोलीसखात्याकडे केले गेले होते. चौकशी झाली. पण मी कायद्याचा पदवीधर असल्यामुळं डगमगलो नाही. शासन व खात्यातर्फे झालेल्या चौकशीत मी स्पष्टपणे सांगून टाकलं की, ' लेखन हा माझा आवडीचा छंद आहे. तो मी बंद करणार नाही हवे तर तुम्ही मला लेखी आदेश द्या, मी न्यायालयात ' चॅलेंज ' करतो. '

भित्यापाठी ब्रह्मराक्षस ! पण जो खमक्या आहे त्याच्या वाटेला मात्र कोणी लागत नाही. त्या लोकांनी माझा नाद सोडला. पण जाता जाता मला एक सूचना केली : ' तुम्हाला कथा-कादंबऱ्या लिहायच्या असल्या तर जरूर लिहा, पण प्रत्येक कथा किंवा कादंबरी लिहिण्यापूर्वी खात्याकडून परवानगी घ्या ! '

मी पुन्हा ठणकावून सांगितलं, ' अहो, समजा, मला एखादी कथा सुचली अन् ती लिहावीशी वाटली अन् मी खात्याकडे ती लिहायला परवानगी मागितली, तर ती परवानगी मिळायला कमीत कमी वर्ष–दोन वर्ष लागतात तोपर्यंत त्या कथेची बीजं कोमेजून जातील ! मी असला आंगळ आदेश मुळीसुद्धा मानणार नाही. ज्यावेळी लिहावं असं वाटेल तेव्हा मी लिहिणार. तुम्हाला जी काय कारवाई करायची असेल ती बेशक करा ! झालं ! तेव्हापासून त्या लोकांनी माझा नादच सोडला उलट कालांतराने बदललेल्या शासनसंस्थेने माझ्या साहित्यप्रेमाची दखल घेऊन मला रंगभूमी प्रयोग–परिनिरीक्षण मंडळाचे सन्माननीय सदस्यत्व बहाल करून टाकले. तर हे असं आहे. पण इतकं होऊनही काही अतिविद्वान अधिकाऱ्यांच्या विचारसरणीचा प्रताप अद्यापही अनुभवायला मिळतो तो असा :

मी पासपोर्ट मिळावा म्हणून अर्ज भरणार होतो; पण तसा अर्ज करण्यापूर्वी मी ज्या पोलीस खात्यात काम करतो, त्या खात्याच्या वरिष्ठांची, म्हणजे इन्स्पेक्टर जनरलसाहेबांची तसा अर्ज करण्यास परवानगी लागते

परवानगी मिळावी म्हणून डी एस्. पी ऑफिसतर्फे अर्ज पाठवला परवानगी मिळेल म्हणून रोज टपालाची वाट पाहात होतो होता होता महिना गेला तरी परवानगी नाही, म्हणून चौकशीसाठी डी एस् पी. ऑफिसमध्ये गेलो, तर माझा अर्ज एल्. आय. बी. इन्स्पेक्टरकडे तसाच पडून होता. इन्स्पेक्टरनी शेरा मारला होता, हा अर्ज प्रॉपर चॅनेलमधून

पाठवला गेलेला नाही !'

मी इन्स्पेक्टर महाशयांना विचारलं,

'प्रॉपर चॅनेल म्हणजे काय ?'

प्रॉपर चॅनेल म्हणजे तुमच्यावर जे सीनियर पोलीस प्रॉसिक्यूटर आहेत, त्यांच्यामार्फत हा अर्ज डी. एस्. पी साहेबांचे ऑफिसकडे येणे जरुरीचे होते !'

मी खवळलो आणि म्हणालो, 'हे पहा इन्स्पेक्टरसाहेब, माझे वरिष्ठ डी. एस् पी आहेत, सीनियर पोलीस प्रासेक्यूटर नव्हेत. मी युरोप अमेरिकेला जावं की नाही हे फार तर डी. एस् पी ठरवू शकतील, पण सीनियर पोलीस प्रॉसिक्यूटरना तो अधिकार मुळीच नाही इतके दिवस तुम्ही हा अर्ज इथेच दडपून टाकल्याबद्दल मला तुमच्याविरुद्ध तक्रार करावी लागेल !'

ही मात्रा लागलीच लागू पडली. एल्. आय. बी. इन्स्पेक्टरनी माझा अर्ज डी एस्. पीं ची शिफारस घेऊन मुबईला पाठवला मी सुटकेचा निःश्वास सोडला पण अर्ज मुंबईला जाऊन पुन्हा महिना झाला तरी काहीच हालचाल नाही. म्हटलं. आणि काय कुस्पट काढतात की काय ? अन् हीसुद्धा माझी शंका खरी ठरली. वरून क्वेरी ' करण्यात आली ' तुमचा परदेश-प्रवासाचा खर्च कोण करणार आहे याचा प्रथम खुलासा करा !'

झालं ! मी वैतागून म्हणालो इंग्लंडमध्ये पंतप्रधान मार्गरेट थॅचर माझा खर्च करणार आहेत आणि अमेरिकेत रोनाल्ड रिगनकडे व्हाईट हौसमध्ये मी उतरणार आहे !' कम्माल झाली या लोकांची ! अहो, परदेश-प्रवास करण्यासाठी लागणाऱ्या खर्चाची तजवीज केल्याशिवाय का मी पासपोर्टसाठी अर्ज करणार होतो ? पण असं असतं. अडला नारायण .. !

( पुढचं वाक्य मी लिहीत नाही. कारण अजून थोडे दिवस का होईना नोकरी करायची आहे ना ! )

त्या ' क्वेरी ' ला उत्तर धाडलं : आजपर्यंत मी बेचाळीस कादंबऱ्या लिहिल्या असून त्या माझ्या पत्नीने निरनिराळ्या प्रकाशनसंस्थेद्वारा प्रकाशित केलेल्या आहेत. त्यातून जी आर्थिक प्राप्ती झाली तो पैसा स्वच्छ पांढरा आहे. त्या प्राप्तीवर गेल्या दहा वर्षांचा इन्कमटॅक्स भरलेला आहे. चिरंजीव

ॲडव्होकेट असून लॉ—कॉलेजात लेक्चरर आहेत. आमची स्वतःची आर्थिक स्थिती आम्हाला परदेशात नेऊन परत आणण्याइतपत 'साऊंड' आहे. आपण आमच्या पुनरागमनाची मुळीसुद्धा चिंता करू नये !'

सुटलो बुवा, एकदाची इन्पेक्टर जनरल ऑफिसकडून परवानगी आली आणि अस्मादिकांनी पासपोर्ट मिळण्यासाठी एकदाचा अर्ज भरला एव्हाना माईचा आणि उमेशरावांचा पासपोर्ट मुंबईवरून आलासुद्धा होता. बरोबर आहे, ते दोघे सरकारी नोकर नव्हते. नाहीतर त्यांनासुद्धा अशा 'क्वेऱ्यां'ना तोंड द्यावं लागलं असतं

शेवटी एकदाचा पासपोर्ट आला आणि जीव भांड्यात पडला. पण पासपोर्ट मिळाला की परदेश-प्रवास निश्चित झाला असं म्हणता येत नाही. आपण ज्या ज्या देशांना भेटी देणार आहोत त्या त्या देशांची परवानगी म्हणजे 'व्हिसा' मिळावा लागतो. हा व्हिसा मिळवण्यासाठी परदेशी अर्ज पाठवावा लागत नाही, तर त्या देशांचे 'कॉन्सुलेटस्' मुंबई, मद्रास, कलकत्ता अशा शहरी असतात, त्यांच्यामार्फत 'व्हिसा' दिला जातो.

मुंबईच्या अमेरिकन कॉन्सुलेटनं आम्हा तिघांना 'व्हिसा' अडवून ठेवला व आम्हाला 'इंटरव्ह्यू' साठी तातडीनं मुंबईला बोलावलं.

इकडे आम्ही परदेशी जाणार म्हणून मित्रांच्या अन् नातेवाईकांच्या पार्ट्या सुरू होत्या. चार—सहा झाल्या होत्या आणि चार—सहांच्या तारखा दिल्या होत्या पाच जूनच्या मध्यरात्री सुटणाऱ्या एअर इंडियाच्या विमानाची तिकीटंही काढली होती आणि आता हा 'अंकल सॅम' इंटरव्ह्यूसाठी आम्हाला बोलावत होता ! त्याने आमचा व्हिसा का मंजूर केला नाही हे प्रत्यक्ष मुंबईला गेल्याशिवाय अन् त्याला 'इंटरव्ह्यू' दिल्याशिवाय समजणार नव्हते.

कॉलरा, टायफॉईड आणि स्मॉलपॉक्स यांची इंजेक्शन घेऊन सुजलेला दंड सांभाळीत मी कोल्हापूरच्या रेल्वे स्टेशनवर गेलो. अमेरिकन वकिलातीत दोन जूनला दुपारी दोन वाजता बोलावले होते. तेव्हा निदान एक जूनला तरी मुंबईत दाखल होणे जरूरीचे होते. पण रेल्वे स्टेशनवर रिझर्व्हेशन क्लार्कनी स्थितप्रज्ञासारखा चेहरा करून मला सांगितलं, 'चौदा तारीकतक सब फुल्ल है।' फर्स्टक्लास, सेकंडक्लास थ्री टायर, टू टायर सब फुल्ल

है। पंदरा तारीक का दुं क्या ?'

कपाळावर हात मारून म्हटलं,' पाच तारखेला मध्यरात्री विमान सुटणार आणि पंधरा तारखेचं रिझर्व्हेशन घेऊन काय चाटायचंय ?

' मास्तरसाहेब, व्ही. आय. पी. वगैरेपैकी कोठ्यातली तरी तीन तिकिटं शिल्लक आहेत का ?' मी.

' नहीं जी. कल तीन मिनिप्टर कोल्हापूरमें आ रहे हैं । व्ही. आय्. पी. कोटा किसीकोभी नहीं दे सकते ! वेरी वेरी सॉरी !'

झालं. स्टेशनवरून परत घरी येण्याआधी एस्. टी. स्टँडवर गेलो, तर मुंबईला जाणाऱ्या सर्व गाड्यांचे रिझर्व्हेशन भरलेले. मनात म्हटलं, 'आमची ' युरोप-अमेरिका यात्रा ' इथंच थंडावते वाटतं ' अठ्ठावीस मे उलटला होता.

तिकडं घरात बॅगा भरून तयार होत्या प्रवासात खाण्यासाठी चिवडा, चकली, लाडू फराळाचे पदार्थ तयार होत होते. इंजेक्शन घेतलेला दंड मुंबईला जाण्याचं कुठलंच तिकीट मिळालं नाही म्हणून अधिकच ठणकत होता. प्रत्येक क्षण माझ्या सहनशीलतेची कसोटी बघत होता. शेवटी मनाशी ठरवलं, कोणतंही सार्वजनिक वहान मिळालं नाही तरी ' पेशल टॅक्शी ' करून मुंबई गाठू ! पण इतक्यात एस. टी. ऑफिसकडून फोन आला : समर व्हेकेशनसाठी एस्. टी. नं ३० मे रोजी सकाळी आठ वाजता एक एक्सप्रेस गाडी मुंबईला सोडायची ठरवलेलं आहे आणि त्या गाडीत तुमच्यासाठी तीन तिकिटं राखून ठेवण्यात आली आहेत.

मी हुश्श केलं आणि तळण चाललेल्या खोलीत जाऊन खुसखुशीत बाकरवडी तोंडात घालत माईना म्हणालो, ' गॉड इज ग्रेट. आपल्याला ३० तारखेची एस्. टी. ची तीन तिकिटं मिळताहेत '

' अहो, पण तो अमेरिकन कॉन्सुलेट व्हिसा देणार का ?' माईनी विचारलं.

' हे पहा. प्रथम मुंबईत पोहचायची अडचण होती ती दूर झाली अगोदर तिथं पोहचू आणि मग एंबसीची काय अडचण आहे, अन् ती कशी दूर करायची ते बघू. आज इथं बसून मी तरी काय सांगणार ?'

आपण परदेशी जाणार हे कोणाला सांगायलाच नको होतं उद्या 'व्हिसा' मिळाला नाही तर, उगाच फजिती होणार झालं आपल्या त्या ह्यांचं झालं

तसं !' माई म्हणाल्या.

'हो ऽऽ !'

आमचे एक मित्र परदेशी जाणार होते, त्यांना तिथं भल्यामोठ्या पगाराची नोकरी लागणार होती. पत्रव्यवहार झाला होता. पासपोर्ट व्हिसा सर्व काही विनासायास त्यांना मिळालं होतं. कॉलरा, टॉयफॉईड, स्मॉलपॉक्सची इंजेक्शन घेऊन ते निघण्याच्या तयारीत होते आणि कशात माशी शिंकली कुणास ठाऊक ! त्यांचे परदेशगमन रद्दीत झाले. पण ते जाणार जाणार म्हणून इतकी जाहिरात झाली होती, की पुढे त्यांना सहा महिने बाहेर तोंड दाखवता येणे अशक्य झाले. लोकांना टिंगल करायला कसलंही क्षुल्लक कारण पुरेसे होते; मग एखादा 'फॉरेन'ला जाणार म्हणून जय्यत तयारी करून बसला आणि काही अपरिहार्य कारणाने त्याचे परदेशगमन रद्दीत झाले की लोकांना भंग्रेरी उडवायला अगदी भरपूर वाव मिळालाच म्हणून समजा !

मी ते उदाहरण डोळ्यासमोर ठेवून होतो. आणि माझ्या खात्यामार्फत ज्या तऱ्हेनं मला 'प्रोत्साहन' दिलं जात होतं, त्यावरून मी भारतभूमीचं सीमोल्लंघन करीन की नाही याबाबत शेवटपर्यंत साशंक होत होतो.

मुंबईत भुलाभाई देसाई रोडवरच्या कॉन्सुलेटच्या ऑफिसात आम्ही तिघांनी प्रवेश केला तेव्हा एखाद्या नाटकाच्या थिएटरात प्रेक्षक पडदा वर जाण्याची वाट पहात बसतात तसे दोन अडीचशे लोक बसून होते आमच्याप्रमाणं त्यांनाही वकिलातीत इंटरव्ह्यूसाठी पाचारण केलं गेलं होतं त्यांत बहुसंख्य गुजराथी होते काही मुस्लिम होते. महाराष्ट्रीय फक्त आम्ही तिघे ! परदेश-दौरा करणाऱ्या महाराष्ट्रीय लोकांचं प्रमाण जवळ जवळ नगण्य होतं.

आम्ही सर्व ज्या दिशेकडे तोंड करून बसलो होतो त्या दिशेला एक दार होतं. अधून-मधून त्या दारातून एक अमेरिकन, सुमारे ३५-४० वर्षांचा हातात कागद घेऊन दार उघडून बाहेर यायचा आणि नाव पुकारायचा

'मनेशाबेन पटेल, रमाबेन जैन, दादूभाय नानूभाय, शेख महंमद फक्रुद्दीन .'

नाव पुकारलेल्या व्यक्तीसमवेत तोही आत परत जाई आणि ते बाहेरचं

दार इतक्या जोरानं बंद व्हायचं, की मला वाटलं आज संध्याकाळपर्यंत हे दार चौकटीतून उचकटून निघणार.

शेवटी ' बॅबॅ कॅडॅम ' हे नाव उच्चारताच मी उठलो. आणि दाराशी आलो तेव्हा त्यानं मला विचारलं, ' यू आर थ्री नो ?'

' या ऽ ऽ '

' ऑल ऑफ यू प्लीज कम ॲलाँग !'

मी माई व उमेशना खूण केली. आम्ही तिघेही त्या धडकणाऱ्या दारातून आत प्रवेश केला. प्रथम मला वाटलं होतं की, आमची नावं पुकारून आम्हाला आत बोलावणारा तो गृहस्थ वकिलातील पट्टेवाला असावा. आत कोणीतरी लालबुंद असा टक्कल पडलेला, निळया डोळयांचा तोंडात चिरूट धरलेला साहेब बसलेला असेल आणि तोच आमचा ' इंटरव्ह्यू ' घेईल. पण माझा अंदाज साफ चुकला. आम्हाला बाहेरून बोलावून आणणारा तोच स्वत: कॉन्सुलेटचा अधिकारी होता.

इकडे आम्हाला मामलेदार किंवा प्रांतांच्या ऑफिसात प्रवेश करण्यापूर्वी लाल पट्टेवाल्या जमादारला अदबीनं विचारावं लागतं,

' साहेबांची भेट होईल का ?'

मग तो तटस्थपणे उद्गारतो, ' काय काम आहे ?'

' मग आम्ही आमच्या कामाचं स्वरूप सांगितल्यावर त्यानं म्हणायचं, ' साहेब आज मिटींगमध्ये आहेत. '

' मिटींग केव्हा संपेल ?'

' ते मी कसं सांगणार ?'

' पण बाहेर भेटीची वेळ दुपारी दोन ते पाच लिहिली आहे आत्ता तीन वाजलेत. साहेबांची भेट व्हायला हवी !'

इतकं बोलल्यावर तो मिशीवरून पाल्थी मूठ फिरवीत उद्गारतो, 'तुम्ही कोण वकील हाय काय ?'

' हो ऽ ऽ !'

' मग थांबा पाच वाजेपतोर !'

अशी माणसं आणि संभाषणं ऐकण्याची सवय असल्यामुळं दोन अडीचशे माणसांना स्वत: बाहेरून बोलावून त्यांचा इंटरव्ह्यू एकटा घेणारा तो

कॉन्सुलेटचा अधिकारी पाहून अमेरिकन लोकांच्या कार्यपद्धतीचा पहिला नमुना पाहायला मिळाला.

आम्ही ज्या प्रवासी कंपनीतर्फे व्हिसासाठी फॉर्मस् भरले होते त्या कंपनीतल्या लोकांनी फॉर्म्सवर आमच्या फक्त सह्या घेतल्या होत्या. आतला मजकूर हवा तसा ठोकून दिला होता. आमचे चिरंजीव उमेशराव हे अविवाहित असताना चक्क विवाहित म्हणून फॉर्म भरणाऱ्यानं लिहून टाकलं होतं. तेव्हा त्या अधिकाऱ्यानं उमेशरावांना विचारलं,

'आर यू मॅरीड ?'

'नो सर !'

'मी ऽऽऽ वॉट द् फॉर्म सेज ?'

उमेशरावांनी खुलासा केला, 'ॲज वुई वुड नॉट कम टू बॉम्बे, वुई हॅड ओन्ली साईन्ड ॲंड सेंट द फॉर्मस् टू अवर ट्रॅव्हल एजंटस् !'

त्या अधिकाऱ्याने ओठ दुमडले अन् लगेच दुसरा प्रश्न केला, 'यू आर अन्मॅरीड. डू यू वाँट टू मॅरी इन द स्टेटस् ?'

'नो सर !' पुन्हा उमेशरावांनी अदबीनं उत्तर दिलं.

त्यानंतर त्यानं आमच्याकडं पाह्यलं आणि विचारलं, 'धीस इज युवर ओन्ली सन, नो ?'

'या ऽऽऽ ह !' मी होकारार्थी मान हलवली.

'ऑल ऑफ यू हॅव डिसायडेड टू सेटल इन स्टेट्स ?'

'नॉट ॲट ऑल ! आय एम अ गव्हमेंट सर्व्हंट ॲंड गोईंग टू स्टेटस् फॉर साईट-सीईंग !'

'इज डॅट सो ?'

'या ऽऽ ह ! ' आम्ही तिघांनीही मान डोलावली. आणि त्या दयाळू महाभागानं आमच्या पासपोर्टवर सहा महिने अमेरिकेत वास्तव्य करण्यास परवानगी देणारा 'व्हिसा ' चा शिक्का उमटवला. आम्ही तिघांनी सुटकेचा निःश्वास सोडला. जोरानं धडकणाऱ्या त्या दारातून प्रफुल्लित मुद्रेनं बाहेर पडलो

विमानाने दिल्ली सोडल्यानंतर ते कोणकोणत्या प्रदेशांवरून उड्डाण करीत फ्रँकफूर्टला जाणार आहे हे जाणण्याची तीव्र इच्छा माझ्या मनात निर्माण झाली 'ज्यूस' घेऊन त्या आलेल्या हवाई-सुंदरीला ( हो, खरोखरच ती दिसायला सुंदर होती. नाहीतर परत येताना ज्या एअर होस्टेसेस् होत्या त्यांना हवाई-सुंदरी म्हणणे म्हणजे 'सुंदर' या शब्दाचा घोर अपमान ठरला असता ! पण 'समुद्रगुप्ता'वरच्या सर्वच पोरी दिसायला सुस्वरूप होत्या. ) मी विचारलं, 'कॅन आय मीट द फ्लाईट सुपरवायझर ?'

'प्लीज वेट फॉर सम टाईम. आय वुईल आस्क हिम्.'

ग्रेप फ्रूटचा रस सर्व प्रवाशांना वाटून झाल्यानंतर ती हवाई-सुंदरी कॉकपीटकडे गेली आणि दहा मिनिटांनी माझ्याजवळ परत येऊन म्हणाली, 'प्लिज फॉलो मी. द फ्लाईट सुपरवायझर हॅज कन्सेंटेड टू मीट यू !'

असा थोडासा चोकसपणा दाखवल्याशिवाय माझी कोणतीही यात्रा पूर्ण होत नसते. हवं तर याला 'अगाऊ'पणा म्हटलं तरी चालेल. पण या असल्या अगाऊपणामुळेच इतरांना जी माहिती होत नाही ती मला होत असते. माझ्या मनातली प्रवासवर्णन लिहिण्याची सुप्त इच्छा मला गप्प बसू देत नव्हती.

हो, सांगायचं म्हणजे रेल्वेप्रमाणे विमानातही दोन क्लास असतात. एक फर्स्टक्लास आणि दुसरा इकॉनॉमी क्लास. विमान तेच, जाण्याचं ठिकाण तेच, पण मोठेमोठे उद्योगपती, व्ही. आय. पी ज यांना फर्स्टक्लासचा 'कंफर्ट' हवा असतो. फर्स्ट क्लासमध्ये खुर्चीचा आकार थोडासा मोठा, झोपायचं झालं तर डोळ्याला झडप लावायला देतात आणि हवी असेल तर इंपोर्टेड व्हिस्कीची कुपी फुकट प्यायला मिळते, एवढाच फरक. हा फर्स्टक्लास ओलांडून एक लहानशा चक्री जिन्यातून मी त्या हवाई सुंदरीच्या मागोमाग वर चढून गेलो. तर तिथं एक प्रशस्त दालनच होतं. मोठे मोठे कोच, काचेचं भलं मोठं टीपॉय, त्यावर चार-दोन इंग्रजी मासिकं ठेवली होती. पन्नाशीच्या सुमाराचे, पांढरा शर्ट आणि गडद निळी पँट असा एअर इंडिआचा गणवेष परिधान केलेले, फ्लाईट सुपरवायझर मी तिथे जाताच उठून उभे राहिले आणि माझ्याशी हस्तांदोलन करून म्हणाले, 'माय नेम इज जॉर्ज कोस्का.'

मी माझं नाव सांगितलं तेव्हा ते म्हणाले, 'सुजा हॅज ऑलरेडी टोल्ड

मी अबाऊट यू !' मला तिथं पोहचवून खाली जाणाऱ्या हवाईसुंदरीकडं मी आश्चर्यचकित होऊन पाहचलं. मी कधीही न बघितलेल्या या हवाईसुंदरीला माझं नाव आणि माहिती समजली कशी ?

गोल जिन्यावरून खाली उतरण्यापूर्वी ती किंचित् थांबली अन् स्वच्छ मराठीत म्हणाली, ' मी तुमची वाचक आहे. विमानात आल्याआल्याच मी तुम्हाला ओळखलं होतं. '

' पण तुम्ही तर दिल्ली विमानतळावर चढलात ?'

हो ऽऽ पण मी मुळची मुंबईची आहे.

एस्. टी. तून जाताना मी जागेअभावी उभा आहे असे पाहून माझ्या अनेक वाचकांनी अनेक वेळा मला ओळखून स्वत: उभं राहून मला आपल्या जागी बसायला जागा करून दिली होती. रेल्वेतही मला ओळखणारे असंख्य वाचक भेटले होते. पण आज दिल्ली विमानतळावर चढलेली हवाईसुंदरी सुजाता माझी वाचक असेल याची मला यत्किंचितही कल्पना नव्हती. कळत मी थोडामा सुखावलो

मला बाजूच्या कोचावर बसायची विनंती करून जॉर्ज कोस्का इंग्रजीत म्हणाले, ' मग या प्रवासाचं वर्णन लिहिणार तर !'

हसत हसत मी उद्गारलो, ' हो, इच्छा तर आहे. पण केव्हा आणि कसं जमतं ते पहायचं !'

' वेल मिस्टर कदम, आपल्याला काय माहिती हवी ते सांगा. '

' आपण आता दिल्ली सोडल्यानंतर कोणकोणत्यां प्रदेशांवरून जाणार आहोत ? सध्या आपण कोठे आहोत !'

त्यांनी खिडकीच्या काचेतून खाली पाहचलं आणि ते म्हणाले, ' आपण आता ' रहिमयारखान ' या पाकिस्तान हद्दीवरून चाललो आहोत. आपण कोणकोणत्या गावांवरून जाणार आहोत ते प्रत्यक्ष कॅप्टनलाच विचारू चला ! तुम्ही यापूर्वी कॉकपिट बघितलं नसेल !

त्यांच्या मागोमाग चालता चालता मी म्हणालो, ' मागे तेवसस्ट साली काश्मीरवरून येताना दुरून कॉकपिट पाहचलं होतं, पण आत जाण्याचा योग घडला नव्हता. आत जायला बंदी असते ना ?

' हो, अलीकडं हवाई चाचेगिरीचे प्रकार वाढल्यापासून कॉकपिटकडं

कोणालाही जाता येत नाही. पण आम्हाला माणसं ओळखता येतात ना?'

समुद्रगुप्त या ७४७ बोईंग विमानाचे कॉकपिट बघताना चक्रावून गेलो. शेकडो लहान-मोठी मीटर्स, त्या बाजूला उघडझाप करणारे इंडिकेटर्स! छे, छे! सगळंच काही अतर्क्य! पण तीनशे पंच्याहत्तर प्रवासी, वीस–पंचवीस कर्मचारी, प्रवाशांचं शेकडो किलोग्राम असलेलं सामानसुमान घेऊन उड्डाण करणाऱ्या त्या विमानाचं नियंत्रण करणारे कॅप्टन एम. एस. सिंग सुपरवाइजरना पाहून म्हणाले ' गुड मॉर्निंग जॉर्ज.'

' मॉर्निंग कॅप्टन सिंग! वेल, आय वॉन्ट टू ट्रबल यू अ बिट्. धिस् इज मिस्टर कदम. ही वॉन्टस् टू नो द् टेरीटोरीज बुईच वुई आर गोईंग टू फ्लाय!'

समोर पसरलेल्या अभ्रांच्या समूहातून लीलया विमानाचे नियंत्रण करणारे कॅप्टन सिंग बाजूचा चार्ट हातात घेऊन म्हणाले,

' आता आपण पाकिस्तान ओलांडला. यानंतर आपण फोर्ट रुंदमान आणि गझनी या अफगाणिस्थानच्या प्रदेशावरून जाऊ. त्यानंतर रशियाच्या तार्मेझ, समरकंद, आणि ॲक्यूबिन्स्क या भागावरून उड्डाण करीत पोलंडच्या वॉर्सा शहराजवळून जाऊ. त्यानंतर झेकोस्लोव्हाकियाचे प्राग शहर येईल. प्राग ओलांडल्यानंतर पश्चिम जर्मनीची हद्द लागेल आणि आपण आपल्या प्रवासाचा पहिला टप्पा तिथंच पूर्ण करू. फ्रँकफूर्ट एअरपोर्टवर आपण दोन तास थांबून नंतर पॅरिसला पोहचू!'

मी डोळे विस्फारून हे सर्व ऐकत होतो. भारत ते जर्मनी या दोन देशांच्या प्रवासात इतक्या देशांवरून हवाई भ्रमण करीत जायला मिळणार होते.

जॉर्ज कोस्का कॅ. सिंगना म्हणाले,' वॉट इज द हाईट ॲट प्रेझेंट? अँड वॉट इज द स्पीड?'

' थर्टी सेवन थाऊजंड फीट अबाव्ह ग्राऊंड लेव्हल! ॲन्ड द स्पीड इज सिक्स हंड्रेड एम. पी.'

' माय गॉड! सदतीस हजार फूट उंचीवरून आमचं प्लेन चाललं होतं आणि त्याची गती होती सहाशे मैल!

कॉकपिटमधून समोर पाह्यलं. काहीच दिसत नव्हतं. खाली अभ्रांचा समुद्र पसरला होता. क्षितिज कुठं संपलं आणि पृथ्वीचा भाग कुठं आहे याचा

काहीच पत्ता लागत नव्हता.

कॅप्टन सिंग मात्र कानाला लावलेल्या मायक्रोफोनमधून खाली असणाऱ्या निरनिराळ्या हवाई तळांशी संपर्क साधत होते.

दिलेल्या माहितीबद्दल मी वैमानिक कॅप्टन सिंग यांचे आभार मानून जॉर्ज कोस्का यांच्यासमवेत परत महाराजा लाऊंजमध्ये आलो, तेव्हा जॉर्जसाहेबांनी मला विचारलं,

' वुड यू लाईक टू हॅव कॉफी ?'

' नो, थँक्स. ' मी पुढं म्हणालो, ' मि. जॉर्ज, मेनी मेनी थँक्स फॉर द इन्फर्मेशन ! हाऊ डू यू स्पेल युवर सरनेम ?'

त्यावर ते म्हणाले, ' माझ्या आडनावाचा उच्चार ' कोस्का ' असा असला तरी, स्पेलींग '**KOSTKA**' असं आहे. यांत T सायलेंट राहते.'

मी पुन्हा एकदा त्यांचे आभार मानले आणि जाण्यासाठी उठलो, तेव्हा ते माझा हात धरून म्हणाले, ' तुम्ही लिहिलेलं प्रवासवर्णन प्रसिद्ध झाल्यावर मला एक प्रत पाठवायला विसरू नका !'

तेव्हा मी म्हणालो, ' पण माझं प्रवासवर्णन मराठीत असणार; आपणाला ते कसं समजणार ?'

' ओ ऽ ऽ ह, सुजा वुईल ट्रान्स्लेट इट फॉर मी ! हॅव अ नाईस टूर मि कदम !'

या जन्मी पुन्हा हे जॉर्ज कोस्का आणि कॅप्टन सिंग भेटतील की नाही कुणास ठाऊक ! पण माझ्यासारख्या पूर्व–परिचय नसलेल्या एका प्रवाशाला इतक्या आपुलकीने जरूर ती सर्व माहिती पुरवणाऱ्या एअर इंडियाच्या त्या कर्मचाऱ्यांच्या सौजन्याने मी भारावून गेलो होतो खरा !

परत मी माझ्या सीटवर येऊन बसलो माईना आणि उमेशना आपल्या हवाईमार्गाची लिहून आणलेली माहिती दिली.

' ट्रिंग ऽ ट्रिंग ऽ ऽ ट्रिंग ऽऽ ट्रिंग. युवर अटेन्शन प्लीज ! आंतरराष्ट्रीय नियमोंके अनुसार प्रवासियोंको मद्यपान करनेकी सुविधा है। थोडीही देरमें आपके

पास एअर–होस्टेसेस् आ जायेंगी।' तेवढं ऐकायचाच अवकाश ! मी माझ्या सीटसमोरचं टीपॉय उघडून तयार ठेवलं. तसं मला मद्याबद्दल फारसं आकर्षण नाही; पण सदतीस हजार फूट उंचीवरून अस्मानातून तरळत जातानाचा आनंद थोडयाशा मद्यापानाने द्विगुणित करण्याचा मोह मी कसा आवरू शकणार ! जवळ ऑर्डर घेण्यासाठी आलेल्या ' एअर–होस्टेसला मी ब्लॅक लेबल स्कॉचची ऑर्डर सोडली. मुंबईतल्या फाईव्ह स्टार हॉटेलमध्ये ज्या स्कॉचच्या पेगला चाळीस रुपये घेतात, तोच पेग फक्त दहा रुपयांत एअर इंडिया देत असल्याचे पाहून मी भलताच खूष झालो होतो

सोडा, ब्लॅक लेबलची छोटी मिनिएचर बाटली आणि बर्फ असा सारा सरंजाम माझ्या समोरच्या टिपॉयवर आणून ठेवताच मी उमेशना म्हणालो, ' आता मला थोडा वेळ खिडकीजवळची जागा हवी बरं का !'

आम्ही तिघेही आलटून-पालटून खिडकीजवळ बसत होतो. आकर्षण इतकंच, जर कुठं ढगांचा थवा विरळ झाला, तर खालचा भूप्रदेश दिसेल.

माझा भरलेला ग्लास घेऊन मी खिडकीजवळ ' शिफ्ट ' झालो स्कॉचचे घोट घेत मी काचेतून खाली पाहात होतो अभ्रांच्या घनदाट समूहातून कधी कधी खालचा प्रदेश झाकला जायचा, अन् मग नजर दूर क्षितिजावर स्थिर व्हायची. काही वेळा क्षितिजावर गडद हिरवा, तर कधी पोपटी रंगाचा पट्टा दिसायचा. मधेच ढग विरल झाले की, खालची भूमी नजरेत यायची. चटया अंथरल्यासारख्या जमिनीच्या अगणित पट्ट्या, मध्येच काचेच्या तुकडयासारखा चकाकणारा एखादा तलाव दिसायचा तर कधी दूर अंतरापर्यंत पसरलेलं वाळवंट आणि वादळानं त्यावर निर्माण झालेल्या लाटा नजरेत भरायच्या !

पुन्हा तोच विचार मनात डोकावला. विमानात मधेच बिघाड झाला तर काय होईल ? त्यात सुरुवातीला उड्डाण करताना एअरमेननी जर विमान समुद्रात उतरवणं भाग पडलं तर सीटखालचं लाईफ जॅकेट कसं गळ्यात अडकवून घ्यायचं आणि संकटकाळच्या दारातून समुद्रात कसं उतरायचं याचं प्रात्यक्षिक करून सूचना दिल्या होत्या त्यावेळी आठवला तो एअरपोर्ट 77 हा सिनेमा ! समुद्रात विमान उतरवण्याचा दुर्दैवी प्रसंग जर आमच्या वैमानिकावर ओढवला तर विमानातले हे ३७५ प्रवासी अगदी स्थितप्रज्ञ

वृत्ती ठेवून अगदी शांत चित्तानं गळयात ते पिवळं लाईफ जॅकेट अडकवून एकामागोमाग एक उतरतील हे अशक्य होतं. स्टॉपवर बस येऊन थांबताच आपल्याला बस मिळावी म्हणून गर्दी करून आत घुसणारे आम्ही भारतीय. आपलं जीवन धोक्यात आहे म्हटल्यावर शांत चित्तानं विमानातून बाहेर पडू, हे माझ्या बुद्धीला काही पटणारं नव्हतं !

तशात विमानाचं नाव 'समुद्रगुप्त' ! म्हणजे तसं काही घडलंच तर, ते चक्क 'समुद्रात गुप्त' होऊन जाईल की काय ही शंका त्याच्या नावावरून मनात डोकावली.

डोक्यातले विचार घालवण्यासाठी 'ब्लॅक लेबल'ची आणखीन एक ऑर्डर रिपीट केली. एव्हाना भारतापासून हजारो मैल दूर आलो होतो

दुसऱ्या पेगच्या पाठोपाठ जेवण आले. एअर इंडिया जेवणाच्या बाबतीत कधीही कद्रूपणा करीत नाही हे प्रवासात अनेक वेळा अनुभवाला आले. इंडियन फूडमध्ये चिकन्, राईस, सलाड, चीज, स्वीट डीश आणि वर कॉफी किंवा चहा अधूनमधून फळांचे रस, कोकाकोला, पेप्सीकोला, जिंजर एल, इत्यादी पेयं विनामूल्य पुरविली जात होती

जेवणानंतर प्रवाशांच्या करमणुकीसाठी एक इंग्रजी सिनेमा पेश केला गेला. त्यांचं नाव होतं, 'The Final Countdown.' कर्क डग्लसची प्रमुख भूमिका असलेला हा सिनेमा युद्धपटासारखा होता आणि दोन प्रतिपक्षी विमानांनी एकमेकांवर केलेले हल्ले आणि प्रतिहल्ले मोठ्या कौशल्याने चित्रित केले होते. शेवटी त्यातले एक विमान हवेतल्या हवेत पेट घेते आणि खाली कोसळते असे दृश्य होते. झालं, म्हणजे या हवाई यात्रेत मनात कुविचार न यावेत म्हणून चांगले दोन स्कॉचचे बडे पेग घेऊनही पुन्हा तेच विचार यावेत असा हा सिनेमा ! खरं म्हणजे असले सिनेमे निदान विमानात तरी दाखवू नयेत असं मला वाटलं सिनेमा संपताच मी थोडे पाय मोकळे करण्यासाठी निघालो. तसे या कडेपासून त्या कडेपर्यंत एक पाच फेऱ्या मारल्या तरी बरं वाटतं फर्स्टक्लासच्या एका सीटवर एक कृष्णवर्णीय गृहस्थ होडका पीत बसले होते. मी जाण्यापूर्वी त्यांनी चार–पाच पेग तरी टिकवले असावेत. कारण मी सहज त्यांच्याकडे बघताच कित्येक वर्षांचा जुना परिचय असल्याप्रमाणे ते माझ्याकडे पाहून

हसले आणि त्यांनी मला आपल्या शेजारी बसायची सूचना केली. त्यांनी इअरफोन घेतला होता. हा अडीच डॉलरला एअर इंडिया भाड्याने देते, पण तो विमानाच्या बाहेर नेण्याम परवानगी नसते. आपल्या बसायच्या सीटला जे सॉकेट असतं त्यात त्याची पिन अडकवली की तुम्हाला हवं तर इंग्रजी, हवं तर दक्षिणात्य आणि कधीकधी मराठी गीतंही ऐकता येतात.

'आर यू फ्रॉम बॉम्बे ?' त्या गृहस्थांनी मला विचारलं,

'या ऽऽह, युवरसेल्फ ?' मी प्रतिप्रश्न केला.

'आयम् फ्रॉम मद्रास, गोईंग ऑन ए बिझिनेस टूर.'

न बोलणाऱ्या माणसाला बोलका करण्यात माझा हातखंडा. मग आपणहून या. बसा, मुंबईचे काय तुम्ही ? इतकं विचारून आपण कोणत्या कामासाठी परदेशाला चाललो आहोत हे सहज सांगणाऱ्या त्या मद्रासी सहप्रवाशाची मैत्री जोडायला मला फारसा विलंब लागला नाही. त्यान आपली माहिती सांगायला सुरुवात केली. तो 'मेटॅडोर' मोटार कंपनीत बडा अधिकारी होता वर्षातून चार वेळा युरोप-अमेरिकेच्या वाऱ्या करत होता. कोल्हापूरहून सांगलीला जाणाऱ्या माणसाच्या चेहऱ्यावर जे भाव असतात तेच त्याच्या चेहऱ्यावर होते. समोरच्या ग्लासातला व्होडका पिता-पिता त्याला एकदम काय वाटले कुणास ठाऊक ! त्यानं मला विचारल, 'वुड यू लाईक टू हॅव होडका ?'

'नो, थँक्स्स.' मी हात जोडून म्हणालो. मग त्यानं मला 'रशियन होडका' हे सर्व मद्यातलं उत्तम मद्य का हे समजावून सांगितलं.

'मे आय हॅव धिस इअरफोन फॉर सम टाईम्स ?' होडक्याची माहिती ऐकतच मी त्यांना विचारलं.

'ओ ऽऽ ह, सर्टनली !' हसत हसत त्यानं समोरच्या बॅगेत कोंबलेला इअरफोन काढून माझ्या हातात दिला. तिथं बसल्या बसल्याच मी तो चालू केला आणि काय आश्चर्य ! चक्क भीमसेनांचं 'इंद्रायणी काठी' हे गाणं सुरू होतं. मी डोळे मिटून घेतले.

आकाशातून चाललेली ती भरारी, स्कॉचची मादक नशा आणि भीमसेनांचे स्वर ! आणि काय हवं ? मी कितीही घाईगर्दीत रस्त्य असलो आणि रेडिओवर भीमसेन गात असले की माझे पाय जड

असतानाच
चक् करीत
र जाईपर्यंत
नी ब

गाणं संपल्याशिवाय पुढं जाऊ नयेसं वाटतं. शास्त्रीय संगीतातील मला फारसं कळतं अशातला प्रकार नाही. पण भीमसेन, कुमार किंवा दिदींचे स्वर कानावर आले, की क्षणभर का होईना, मी कोण याची जाणीव हरपते.

अर्धाएक तास 'कृष्णस्वामीं' च्याजवळ बसून मी परत माझ्या जागेवर आलो, तेव्हा नेहमीच्या सुरात माई म्हणाल्या, 'काय हे लहान मुलामारखं इकडं-तिकडं भटकता ? एके ठिकाणी बसता नाही येत ?'

माझ्या जागेवर बसता बसता मी म्हणालो, 'एके ठिकाणी बसणाऱ्या माणसाला माझ्याइतके विविध अनुभव येणं शक्य नाही. आता मी एवढ्यात मद्रासला गेलो, रशियन होडका कसा असतो हे ऐकलं आणि त्याचबरोबर भीमसेनांचं गाणं ऐकून आलो.' एखादा माणूस नेमकं काय अनुभवून आलेला आहे हे दुसऱ्याला ठाऊक नसताना जर तो बोलू लागला, तर त्या दुसऱ्याला याच्या डोक्यावर परिणाम तर झालेला नाही ना, अशी शंका यायची शक्यता असते पण माझ्या चमत्कारिक स्वभावाची गेली पंचवीस वर्षे जाणीव असलेल्या माई निमूटपणानं बसून राहिल्या. अमूक एक गोष्ट करू नका असं मला सांगायची सोय नसते.

'ट्रिंग ऽ ट्रिंग ऽऽ ट्रिंग ऽऽऽ ट्रिंग ऽऽऽ युवर अटेंन्शन प्लीज ! थोडीही देरमें हम फ्रँकफूर्ट हवाई अड्डेपर उतरनेवाले हैं। अपने खुर्सीकी पेटी बाँध लीजिए। धुम्रपान न कीजिए।'

म्हणजे फ्रँकफूर्ट आलं सुद्धा ? मी खिडकीतून खाली पाहिलं. पश्चिम जर्मनीची भूमी स्पष्ट दिसत होती दुसऱ्या महायुद्धात जगाला धडकी भरवणारा हर हिटलर ज्या भूमीत जन्मला, भारताला स्वातंत्र्य मिळवून देण्यासाठी नेताजी सुभाषचंद्र बोस इंग्रजांच्या कडेकोट पहाऱ्यातून निसटून ज्या जर्मनीत आले, त्या भूमीला आज आम्ही स्पर्श करणार होतो. बघता बघता विमानानं खाली झेप घेतली विमानाची गती मंदावल्याची जाणीव होत होती दिल्ली सोडल्यापासून अखंड साडेसहा ते सात तास प्रवास सुरू त्या कैऱ्मिला पोहोचण्यापूर्वी थोडा वेळ फ्रँकफूर्टला थांबावं लागणार होतं सीटवर एकेल्या विमानातून प्रचंड असे ते फ्रँकफूर्टचे विमानतळ दिसत त्यांनी चार-जागी उभी राहिलेली रंगीबेरंगी विमानं दिसत होती. बघताच भिंगावतो दोन घिरट्या घालून आमचे प्रचंड जेट विमान फ्रँकफूर्टच्या

धावपट्टीवर अलगद उतरले.

विमान तिथं तास दोन थांबणार असल्यानं ट्रान्झीट पास घेऊन एअरपोर्टवर फेरफटका मारण्यासाठी आम्हाला जाता येत होतं. माई, उमेश व मी तिघेही बाहेर पडलो.

फँकफूर्टचा इंटरनॅशनल एअरपोर्ट अतिभव्य होता. देशोदेशींची विमानं येऊन थांबली होती. त्यांत अलितालिया, ट्रान्सवर्ल्ड अटलांटिक, जापान एअर लाईन्स, पॅन अमेरिकन कंपनीची अतिप्रचंड अशी जेट विमानं होती.

अडीच वर्षांपूर्वी मी ' उनाड मैना ' या चित्रपटाची कथा लिहिण्यासाठी मुंबईला गेलो होतो. बांद्रयाला ' मंजू महाल ' या निर्मातीच्या घरी पूर्वेला तोंड करून उभं राहिलं की, सांताक्रूझ एअरपोर्ट दिसायचा. दहा-दहा मिनिटाला तेथून उड्डाण करीत अरबी समुद्रावरून जाणारी विमानं मी न्याहाळत असे.

विमान आकाशात झेप घेताना किंवा हवेतून अलगद धावपट्टीवर उतरताना पाहण्यात आजही मला गंमत वाटते. फँकफूर्टच्या एअरपोर्टवर उतरल्यानंतर सुद्धा मी त्या भव्य विमानतळावर उतरणारी विमानं पाहात राहिलो

इतक्यात उमेश म्हणाले, ' चला, वेळ होत आली. परत विमानात जायला हवं ! ' आत जाऊन विमानात बसलो. एअरपोर्टच्या बाजूची प्रचंड हिरवळ नजरेला मोहक वाटत होती. सतत आठ तास ढगांच्या समुद्रातून प्रवास केलेल्या नजरेला झाडं, झुडपं, जमिनीवरची हिरवळ सुखवीत होती. आमच्यासमोर गवताच्या बिया टिपण्यासाठी ' स्टारलिंग ' नावाच्या पक्ष्यांचा कळप उतरला.

लहानपणापासून अनेक छंदांपैकी शिकार हा एक छंद असल्यानं पशुपक्षी न्याहाळणं हे माझ्या रक्तातच आहे. आपल्या इकडं ज्वारीच्या सुगीत जे भोरड्यांचे कळप येतात त्याच भोरडीची स्टारलिंग ही सख्खी चुलत बहीण असावी स्टारलिंगचा कळप गवताच्या बिया टिपण्यात गर्क असतानाच अचानक वरून एका बहिरी ससाण्यानं झडप घातली. कळप चक्चक् करीत उडाला बहिरी ससाणा त्यांचा पाठलाग करीत गेला. मी खूप दूर जाईपर्यंत त्यांची ती पाठशिवणी पाहात होतो; पण त्या स्टारलिंगनी ब

ससाण्याला शेवटी चकवलं होतं.

' युवर अटेन्शन प्लीज ! वुई आर नाऊ रेडी टू टेक ऑफ फॉर पॅरिस प्लीज फासन् युवर सीट बेल्टस् ! ' अनाउन्सरनं सूचना केली.

आम्ही पोटावरचे पट्टे बांधले आणि आजपर्यंत ज्या पॅरिसची महती ऐकली होती, जिथल्या रसिल्या आणि रंगिल्या रात्रींची वर्णनं ऐकली होती, त्या फ्रान्सच्या राजधानीत उतरायला आतुरलो होतो.

युरोप आणि अमेरिकेचा पूर्व-किनारा आम्ही ' ट्रायव्हल कार्पोरेशन ऑफ इंडिया ' या प्रवासी कंपनीतर्फे पाहणार होतो. पाच जूनला सुरू झालेली ती टी. सी. आय. ची टूर दोन जुलैला अमेरिकेत समाप्त होणार होती आणि त्यानंतर आम्ही तिघे स्वतंत्ररित्या पूर्व-किनाऱ्यावरची काही प्रेक्षणीय स्थळं पाहून पुन्हा पश्चिम अमेरिकेला जाणार होतो. टी. सी आय ने मेहेरनोश पटेल नावाचा एक कर्मचारी प्रवाशांची देखभाल करण्यासाठी दिलेला होता मुंबई सोडल्यापासून ते फँकफूर्टला येईपर्यंत आमच्या समवेत आलेल्या इतर प्रवाशांची जवळून जानपहचान होण्याचा योग अद्याप आलेला नव्हता

प्रवासाला निघण्यापूर्वी हे चाळीस प्रवासी 'गेट टुगेदर' साठी मुंबईत जमले होते. त्यावेळीही कोणाची फारशी ओळख झाली नव्हती. पण त्यावेळी समजलं की, सोलापूरचे डेंटिस्ट डॉ. होशिंग, त्यांच्या पत्नी व दुसरे सोलापूरचेच डॉ. चव्हाण हेही त्या यात्रेसोबत येणार आहेत. टी.सी.आयचा अधिकारी दहा-पंधरा मिनिटे उशीराच आला. आल्या आल्या त्यानं विलंबाबाबत दिलगिरी व्यक्त केली, आणि त्याने प्रवाशांना काही महत्त्वाच्या अशा सूचना दिल्या तो म्हणाला,

' मित्रहो, आपण युरोप आणि अमेरिकेच्या दौऱ्यावर जात आहात तेव्हा आपली यात्रा निर्विघ्नपणे पार पडो व प्रवास सुखाचा घडो ही मदिच्छा प्रथम व्यक्त करतो. आज तुम्हा सर्वांना इथं बोलावण्याचा हेतू एवढाच आहे की, या पश्चिम देशांचा प्रवास करताना आपणाला आवश्यक अशा काही सूचना द्याव्या लागणार आहेत. आपण सर्वजण सूज्ञ आहातच, तरी पण

ही आपला इतक्या दूरचा प्रवास करण्याची पहिलीच वेळ असल्याने काही अत्यावश्यक अशा सूचना माझ्या कंपनीतर्फे करणे प्राप्त आहे.

मित्रहो, आपण युरोपमधल्या सहा राष्ट्रांना भेट देणार आहोत. तो क्रम असा : फ्रान्स, स्वित्झर्लंड, जर्मनी, बेल्जियम, हॉलंड आणि इंग्लंड. यांपैकी पहिल्या पाच राष्ट्रांचा प्रवास लक्झरी कोचने होईल. या प्रवासाची सांगता ' झीबुर्ग ' या बंदरावर होईल. आणि इथून बोटीने आपण इंग्लंडला जाल. लंडनला तीन दिवसांचं वास्तव्य केल्यानंतर तुम्ही पुन्हा एअर इंडियाच्या विमानाने न्यूयॉर्कला जाल. न्यूयॉर्क येथून पुन्हा अमेरिकेच्या पूर्व–किनाऱ्याचा प्रवास लक्झरी बसने सुरू होईल. न्यूयॉर्क नायगारा, शिकागो, न्यू ऑर्लिन्स असा दौरा करीत दक्षिणेला मियामीला जाल तेथून वॉशिंग्टन डी सी. पाहून परत न्यूयॉर्कला परत याल दिनांक १६ जूनला सुरू होणारा हा तुमचा अमेरिकेचा दौरा, दिनांक २ जुलैला न्यूयॉर्कला समाप्त होईल. तुमच्यापैकी कोणाला मागे राहून आणखीन-अमेरिकेचा काही भाग स्वखर्चाने पाहावयाचा असल्यास तुम्ही पाहू शकता. तुमचे विमानाचे तिकीट ९० दिवस चालू शकते.

आता या प्रवासात तुमची राहण्याची सोय सर्वसाधारणपणे फाईव्ह स्टार हॉटेलात केली जाईल जर फाईव्ह स्टार हॉटेल उपलब्ध झाले नाही, तर निदान ' थ्री स्टार ' हॉटेलमध्ये नक्कीच केली जाईल. हॉटेलमध्ये आपण वेटर्स किंवा इतर कर्मचाऱ्यांशी वागताना थोडे सौजन्याने वागावे. कारण अमेरिकेत युनिव्हर्सिटीत उच्च शिक्षण घेणारे काही विद्यार्थीसुद्धा हॉटेलमध्ये पार्ट टाईम वेटर्सचे काम करतात. त्यांना बोलवावयाचे झाल्यास टाळी वाजवून किंवा शुक शुक करून कृपया बोलावू नये. त्यांना अपमान वाटेल अशा तऱ्हेने वागू नये. दुसरी महत्त्वाची सूचना अशी की, युरोपमध्ये तुम्हा सर्वांना ब्रेकफास्ट व डिनर टी सी आय. तर्फे देण्यात येतील. ब्रेकफास्टच्यावेळी टेबलावर खूप खाद्यपदार्थ ठेवलेले असतात ब्रेड, जॅम, लोणी, चीज वगैरे. काही हॉटेलमध्ये ' स्क्रँबल्ड एग्ज आणि ' फ्राईड हॅम ' सुद्धा असते. बहुतेक ठिकाणी सेल्फ सर्व्हिस असते अशा वेळी आपण आधाशीपणा करणार नाही याची मला खात्री आहे. आणखीन एक महत्त्वाची सूचना अशी की. ' आपल्याला सराव नसलेल्या खाद्यपदार्थांचे प्रमाणाबाहेर सेवन

झाल्यास पोट बिघडण्याची शक्यता असते. सुदैवाने तुमच्या प्रवासात दोन डॉक्टर्स आहेत आणि त्यांनी अत्यावश्यक अशी काही औषधं सोबत घेतली असल्याचं मला आत्ताच सांगण्यात आलेलं आहे. पण होता होईल तो डॉक्टरांच्यापर्यंत जाण्याची पाळी येऊ न देणे बरे. नाही का ?'

प्रवासात जेव्हा साईट–सीईंगला जाल, तेव्हा एकटयाने दूर भटकत जाणे टाळावे. यामुळें ठरलेल्या वेळेत सर्व कार्यक्रम उरकणे कठीण होते. आपल्या एकटयामुळे इतरांचा खोळंबा होऊ देऊ नये याचीसुद्धा दक्षता घ्यावी.

युरोप आणि अमेरिकेत प्रचंड अशी डिपार्टमेंटल स्टोअर्स आहेत. तिथं विक्रेते नसतात हव्या त्या वस्तू तुम्ही ट्रॉलीमध्ये घ्यावयाच्या व कौंटरवर येऊन बिल करायचे असते. काहीजणांना लहान–सहान वस्तू ढापण्याचा मोह होईल पण तो टाळावा. कारण तुम्ही काय करता आहात ते डिपार्टमेंटल स्टोअर्सच्या कंट्रोलरूममध्यें क्लोज्ड सर्किट-टेलिव्हिजनवर सेक्युरिटी ऑफिसरला स्पष्ट दिसत असते, आणि मोहाला बळी पडलेला असा आपल्यापैकी एकजण जरी सापडला, तरी सर्वांनाच लज्जेनं मान खाली घालावी लागेल. तसेच पोलीस केसचं लफडं मागे लागेल ते निराळेच ! आपल्या देशाचे नाव बद्दू होईल असे कोणतेही कृत्य आपल्या हातून घडू नये अशी प्रार्थना आहे '

शेवटी त्या अधिकाऱ्यानं चाळीस प्रवाशांना पिवळ्या रंगाच्या हँडबॅगा देऊन म्हटलं 'या बॅग्ज तुमचे पासपोर्टस्, विमानाची तिकिटं ठेवण्यासाठी ! पासपोर्ट आणि विमानाची तिकिटं सदैव जवळ बाळगणे हिताचे आहे. कारण ही दोन महत्त्वाची कागदपत्रे गहाळ झाल्यास पुढील प्रवास करणे तुम्हाला अशक्य होईल '

सर्वांनी त्यावेळी माना डोलावल्या. पण त्या अधिकाऱ्यानं दिलेल्या सूचना काही प्रवाशांनी पुढे प्रवासात साफ झुगारून दिल्या. आपलं 'भारतीयत्व' त्यांनी युरोप–अमेरिकेत काटेकोरपणे जोपासलं आणि सर्वांना इतका मन:स्ताप दिला, की पुन्हा आयुष्यात कळपानं प्रवास करणे टाळायचे असे आम्हाला ठरवून टाकावे लागले !

आमच्या विमानाने फ्रॅंकफूर्ट सोडल्यानंतर पंचेचाळीस मिनिटांतच आम्ही पॅरिसच्या ऑर्ली विमानतळावर येऊन पोहोचलो. 'इमिग्रेशन क्लिअरन्स' झाल्यानंतर आम्ही बाहेर आलो तेव्हा, एक नीनशे पौंडांची झिपऱ्या केसांची,

जांभळे जर्कीन चढवलेली छत्रीधारी बाई हर्षोन्माद झाल्यासारखी आमच्या समूहाजवळ आली आणि म्हणाली,

'वेलकम तू पॅरिस, जंतलमेन, आय एम् एन अपोएंतेद गाईद बाय ती.सी.आय. फॉर युवर तूर ऑफ पॅरिस ! हाऊ वाज द् जर्नी ? ए बित बोअर्द ? ई ही ही SSS !' लगेच गंभीर चेहरा करून ती म्हणाली,

'रियल्ली इत इज ए लाँग लाँग दिस्तन्स फ्राम देली ! इजन्त इत ?'

आमच्यापैकी कोणाला बोलायची संधी न देताच ती प्रश्नही विचारत होती आणि स्वत:च उत्तरंही देत होती.

टी सी.आय.चे लेबल्स लावलेल्या पिवळ्या बॅगा ओळखून तिने आम्हाला बरोबर शोधून काढले होते पटेलनं पुढं येऊन आपण टूर रिप्रेझेंटेटीव्ह असल्याचं तिला सांगताच पटेलशी मोठ्या प्रेमानं हस्तांदोलन करीत ती आमच्याकडे पाहात म्हणाली, 'दे मस्त बी बोअर्द. लेत अस् गो तू होतेल फॉर दिनर !'

दिल्ली सोडल्यापासून आम्ही सूर्याचा पाठलाग करीत चाललो होतो. त्यामुळं आमच्या घड्याळातल्या वेळा जिथं जाईल तिथं बदलाव्या लागत होत्या फ्रँकफूर्टला गेलो तेव्हा वेळेत चार तासांचा फरक पडला होता. पॅरिसला पोहोचलो तेव्हाही वेळ बदलावी लागली. तिथं रात्रीचे आठ वाजले तरी सूर्यास्त झालेला नव्हता हा अनुभव आयुष्यात प्रथमच घेत होतो.

मुक्कामाच्या हॉटेलात जाऊन मग नंतर 'डिनर' साठी बाहेर पडण्यास विलंब होणार होता, म्हणून 'फातिमा'ने ( आमच्या पॅरिसच्या गाईड बाईचे नाव) पटेलला सांगून गाडी सरळ जेवणासाठी 'महाराजा हॉटेल'कडं वळवली.

एअरपोर्टवरून आम्हाला ज्या लक्झरी बसने पॅरिस शहरात नेण्यात आले, त्या बसचा ड्रायव्हर होता डॅनी. गाजरासारखा लालबुंद, निळे डोळे. अबोल पण सौजन्यशील. फातिमा ड्रायव्हरशेजारी आमच्याकडं तोंड करून बसली आणि तिनं पॅरिस शहराची माहिती सांगायला सुरुवात केली. पण तिचे काही इंग्रजी उच्चार फ्रेंचाळलेले होते. शिवाय बोलता बोलता ती काही विनोद केला असं समजून स्वत:च चित्कारायची. पण ती काय बोलली आणि का हसली हे न कळूनही मी अज्ञान प्रगट होऊ नये म्हणून उगीचच हसत

केल्याचा बहाणा करीत राहिलो.

पॅरिस अतिशय सुंदर वाटले. रस्ते स्वच्छ नि मोठे. जागोजागी हॉटेल्सच्या बाहेर खुर्च्या-टेबलं मांडलेली होती अन त्यावर आरामात बसून तरुण-तरुणी मनसोक्तपणे मद्य आणि धुम्रपान करीत होती.

डॅनीनं आमचा कोच ' महाराजा हॉटेल 'समोर आणून उभा केला. या हॉटेलला महाराजा हॉटेल हे नाव मुळीसुद्धा शोभत नव्हतं. हॉटेलचा मालक कधीच ' इंडिया 'ला आलेला नसावा. तो उर्दू आणि फ्रेंच बोलत होता. बोलता बोलता स्वत:ची दाढी कुरवाळत होता. फातिमा त्याच्याशी फ्रेंचमध्ये बोलत होती. आपल्याकडे पंढरपूरला बडव्यांच्या घरी घेऊन जाण्यासाठी काही धंदेवाईक हेडे कमिशन बेसिसवर काम करतात, तसलाच फातिमानं आमच्याबाबतीत प्रकार केला होता. ' इंडियन फूड ' म्हणून आम्हाला दिला गेला तो हळदीसारखा पिवळा रंग घातलेला भात आणि एक कोंबडीची टांग ! बस्स ! त्या बेचव जेवणाला जर फातिमा इंडियन फूड म्हणत असेल तर तिनं जन्मात इंडियन फूड चाखलेलं नसेल. फातिमा आमच्यासमवेत जेवायला बसली नाही. ती बाजूला उंच जागी जाऊन बसली. मेहेरनोश पटेल तिच्याशी दुसऱ्या दिवशीच्या कार्यक्रमाबाबत चर्चा करीत होता आणि मालकानं पाठविलेल्या बिअरचा मग ओठाला लावून फातिमा पटेलशी बातचित करीत होती. बिअरचे एक दोन घोट घेतल्यावर तिनं मालकाकडं खूण करून सिगारेट मागवली. त्यानं तत्परतेनं आपल्या खिशातलं पाकीट व लायटर वेटरकडून तिच्याकडं पाठवलं. तोंडात तिरकी सिगारेट धरून ती लायटरने प्रज्वलित करता करता ती पटेलशी बोलत होती. नाकातोंडातून मनसोक्तपणे धूर सोडत ती बसलेल्या उच्च स्थानावरून आमच्याकडं पाहात होती मधेच काहीतरी आम्हाला न समजणारे वाक्य बोलून हसत होती मी अंदाजाने तिच्या अगम्य वक्तव्याचा अर्थ लावण्याचा प्रयत्न करीत होतो. ' शांत चित्तानं जेवणाचा आस्वाद घ्या. आता काही गडबड करण्याचं कारण नाही. इथून सरळ हॉटेलवर विश्रांतीसाठीच जायचं आहे !' तिच्या बोलण्यातले ' होतेल ' आणि ' रेस्त ' हे दोन शब्द मला समजले होते आणि त्यावरून मी तो अंदाज केला होता.

आमच्या निवासाची सोय ' बेर्थीयर लातूर ' या मध्यवस्तीतल्या एअर

कंडिशन्ड हॉटेलमध्ये करण्यात आली होती. याच हॉटेलला संलग्न असे जेवणाचेही हॉटेल होते. त्याचं नाव होतं ' ब्रॉचंट लातूर. ' लातूर या शब्दाचा अर्थ नीट समजला नाही. ' तूर ' म्हणणे टूर-प्रवाशांच्या सुखसोयींनी युक्त असा काहीतरी अर्थ असावा. बार्शीला पाच-सहा वर्षे राहिल्यामुळे लातूरच्या बराच नजीक होतो. तेव्हा हॉटेलचे नावापुढचा ' लातूर ' हा शब्द पाहून मला त्या हॉटेलाविषयी तात्काळ आपुलकी वाटायला लागली.

दुसऱ्या दिवशी सकाळी आमच्यासोबत आलेले भारतीय प्रवासी ब्रेकफास्टसाठी खाली आले आणि मग एकमेकाची ओळख जवळून पटायला लागली.

चोप्रा नावाचे दोघे पितापुत्र त्यांत होते. हा सिनीयर चोप्रा दुष्काळातून आल्यासारखा ब्रेकफास्टवर तुटून पडत होता. सात-आठ टोस्ट, स्क्रॅंबल्ड एग्ज, जामच्या चार पळ्या, तीनवड्या चीज, लोणी हे सारं त्या राक्षसानं बकाबका फस्त केलं. त्यावर दोन कप चहा त्यानं ढोसला. त्याला कोणीतरी सांगितलं की, बाजूला ऑरेंज ज्यूस आहे. चहा ढोसून एक-दोन मिनिटंसुद्धा झाली नसतील तर लगेच तो ग्लासभर ज्यूसही चेऊन आला. आमच्यासारखे बरेच परदेशचे प्रवासी त्या हॉटेलात उतरले होते. एकाच वेळी ' हेल्प युवर सेल्फ ' पद्धतीच्या हॉटेलमध्ये ब्रेकफास्टला दीड-दोनशे लोक बसायचे. त्यांचं संपलं की, दुसरे यायचे. असं चाललेल्या त्या हॉटेलमध्ये हा चोप्रा किती खातो आणि काय काय पितो याकडं कोणाचं सहजासहजी लक्ष जाणं शक्य नव्हतं. मी मात्र प्रवाशांचं जवळून निरीक्षण करीत होतो. आणि त्याचा कोणाला पत्ताच नव्हता.

या चोप्राचा चोवीस-पंचवीस वर्षांचा मुलगा एकसारखा हिंदी गाणं गुणगुणत तरळत इकडं-तिकडं फिरायचा. स्वप्नात असल्यासारखा भासायचा. ब्रेकफास्टला खाली येताना खाकी रंगाची घट्ट पॅंट घालून आला होता आणि त्याची पॅंट नको त्या ठिकाणी मागे उसवली होती. आत अंडरवेअर होती म्हणून बरं. मी आणि उमेशनं ते पाहिलं, पण त्याला ' तुमची पॅंट ढुंगणावर उसवली आहे ' हे सांगायचं कसं ? पण शेवटी त्या हीरोला प्रत्येकजण आपण जवळून गेलो की का खुसखुसतो याची शंका आल्यानं त्यानं टॉयलेटमध्ये जाऊन पाहिलं. आणि मग मात्र पाडगावकरांच्या ' सलाम '

कवितेतल्या प्रकारासारखा लोकांनी ते पाहू नये या भयाने एक हात मागे धरून तो पँट बदलण्यासाठी आपल्या खोलीकडं धावत गेला.

नऊच्या सुमारास डॅनी आपली लखलखीत लक्झरी बस घेऊन आला. पॅरिसची ती सकाळ स्वच्छ होती. हवेत किंचित गारवा होता. दूर क्षितिजावर थोडे काळसर ढग होते, पण पाऊस पडण्याची लक्षणं त्यावेळी मुळीच नव्हती.

सारीजण येऊन बसली, पण अद्याप आमच्यासमवेत आलेल्या तुळसी पतिपत्नींचा पत्ता नव्हता. ते दोघे सर्वांत शेवटी आले. हे नवविवाहित जोडपं दिल्लीला आमच्या सहलीत सामील झालं होतं, पण हे साईट-सीईंगपेक्षा चालू बसमध्ये एकमेकांना मिठ्या मारीत प्रवासी चाळे करीत होते काल एअरपोर्टवरून येतानाच त्या दोघांनी आपली 'झलक' दाखवली होती. तो तरुण ताडामाडासारखा उंच, बटबटीत डोळ्यांचा, जाड ओठांचा आणि फेंदारलेल्या नाकाचा होता. अन् ती गिड्डी, पांढरी फटफटीत पालीसारखी होती. पण स्वत: सौंदर्यसम्राज्ञी असल्याच्या आविर्भावात ती वावरत होती. आणि तो दिलीपकुमारसारखा केसाचा फुगा पाडून तिला अगदी फुलासारखं जपत होता. गाडीत चढता-उतरताना एखाद्या कुक्कुल्या बाळाला उचलून घ्यावं तसा तो तिला घेत होता. ते शहर पॅरिस होतं. प्रणयी जोडपी ठिकठिकाणी एकमेकांना मिठ्या मारून उभी असलेली दिसत होती. पण आमच्यासमवेत आलेल्या भारतीयांनी असं फाजील प्रणयाचं नाटक भर चव्हाटयावर करावं हे सर्वांनाच खटकत होतं. तशी कोल्हापुराहून पुण्याला किंवा मुंबईला बसमधून किंवा रेल्वेतून जाताना एकमेकांच्या 'अंगचटीला' येणारी अनेक जोडपी आजपर्यंत मी बघितली होती. ती एकप्रकारची विकृतीच असते. हा आमच्यासमवेत आलेला नमुना त्याच प्रकारातला होता. पॅरिसमध्ये युगुलांनी पाहण्याचे काही लाईफ शो होते. तिथं वीस-तीस डॉलर्स खर्चून पाहायला जायचे, ते काय ? तर प्रत्यक्ष संभोग ! हे सर्व कायदेशीररीत्या अन् राजरोसपणे तिथं चाललेलं असतं, पण संभोगाची क्रिया चव्हाटयावर किंवा भररस्त्यात करतात ते फक्त गर्दभ किंवा श्वानच अशी समजूत असलेल्या आम्हा भारतीयांना तो तसला लाईफ शो पाहावासा वाटणार नव्हतं. पण आमच्यापैकी काहीजण तोही

पाहून आल्याचं मला नंतर समजलं. जे गृहस्थ त पाहायला गेले ते त्या क्षेत्रात अनभिज्ञ तरी असावेत किंवा थकल्यामुळे आता तसले प्रकार बघण्याशिवाय आम्ही काही करूच शकत नाही अशाही अवस्थेतले असू शकतील. 'ब्ल्यू फिल्म्स' हा प्रकार काय आहे हे मला इतकी वर्षं ठाऊक नव्हतं. पण ती पुढे न्यू ऑर्लीन्सला बघितली अन् तेही औत्सुक्य नंतर ओसरले.

दहाच्या सुमारास आमची बस प्रथम आली ती 'इनव्हॅलीडेस चर्च'च्या आवारात. इथं मला थक्क करून सोडणारी कोणती गोष्ट दिसली असेल तर ती आर्टिस्ट गॅलरी. पाच–पन्नास आर्टिस्ट इझेलवर पॅडस् लावून पेंटींग करत होते लँडस्केप पेंटींग हा माझा आणखीन एक आवडीचा छंद! माझी स्वत:ची हजारएक लँडस्केप्स असतील पण अजूनही मी एखाद्या बीटवर माझी रंगपेटी आणि कागदाचे पॅड घेऊन गेलो की, स्वत:ला संपूर्णत: विसरून जातो. चित्र काढताना मला स्थलकालाचे भान रहात नाही. चित्र पूर्ण होईपर्यंत मी कोण आहे, कुठं आलो आहे याचीसुद्धा विस्मृती होते. त्यामुळं तिथं एकाग्र चित्तानं पोर्ट्रेटस्, लँडस्केपस् आणि मॉडेल्स करणारी पाच–पन्नास आर्टिस्ट मंडळी पाहून मी भलताच खूष झालो. ज्या चर्चच्या आवारात ही चित्रकार मंडळी तल्लीन होऊन पेंटींग करीत होती. त्या चर्चची माहिती 'फातिमा' आपल्या चिरक्या आवाजात सांगत होती. पण मी नाईफ पेंटींग करणाऱ्या एका अतिकुशल चित्रकाराची जन्माला येणारी कलाकृती पाहण्यात दंग होऊन गेलो होतो.

'जंटलमेन ऑफ सी.सी.आय.' असं म्हणून फातिमा जेव्हा जोरजोरानं चिल्कारू लागली, तेव्हा तिकडं मोठ्या नाईलाजानं जावं लागलं. ती त्या भागाचं पौराणिक महत्त्व सांगत होती. पण जगातल्या कुठल्याही पौराणिक भाकडकथांवर विश्वास न ठेवणारा मी बाजूला चाललेला जादुगाराचा खेळ बघण्यात दंग होतो. सुमारे पन्नास–बावन्न वर्षांचा, किडकिडीत, गालफडाची हाडं वर आलेला, तांबड्या केसांचा जादूगार फ्रेंच भाषेत बोलत होता ते काही समजत नव्हतं. पण त्याची कृतीच इतकी बोलकी होती की, तो काय म्हणतो याचा अंदाज करणं कठीण नव्हतं. लोकांच्याकडून तो सिगारेट मागून घ्यायचा त्या सिगारेटचे एक-दोन झुरके घ्यायचा व नंतर चक्क नी

जळकी सिगारेट चावून खायचा.

आमच्या महाराष्ट्रात चंचीतली डबी काढून चिमूटभर तंबाखू घेऊन, त्यात चुना घालून तो अगदी मन लावून मळून दाढेत तासन्तास ठेवणारे महाभाग मी पाहिले होते. तेव्हा सिगारेट खाणाऱ्या त्या जादुगाराचं मला काही अप्रूप वाटलं नाही. पण एक जळकी सिगारेट खाल्ल्यावर लगेच एक ब्लेडही तो गिळंकृत करीत होता. दहा–वीस सिगारेटस् आणि तितकीच ब्लेडस्ही त्यानं खाल्ली. तोंडात काहीही नसल्याचं त्यानं 'आ' वासून सर्वांना फिरून दाखवलं आणि फ्रेंच भाषेत तो काहीतरी बोलला. त्याबरोबर तो प्रेक्षणीय प्रकार बघणाऱ्या मुलांनी जोराने टाळ्या वाजवल्या, तेव्हा मी समजलो की बहुतेक तो फ्रेंच भाषेत म्हणाला असावा, 'बच्चे लोग, अब जोरसे ताली बजाव !'

आणि आश्चर्य असं की, वीस-पंचवीस ब्लेडस् आणि तितक्याच सिगारेटस् खाल्लेल्या त्या अजब जादुगाराने तोंडातून सगळीच्या सगळी ब्लेडस् आणि सिगारेटची थोटकं जशीच्या तशी नंतर बाहेर काढली. जमलेल्या लोकांनी त्याच्यावर नाण्यांचा पाऊस पाडला.

त्यानंतर फातिमा आम्हाला व्हिक्टरी ग्रेट, कॉकॉर्डेशन स्क्वेअर, नॉटरडॅम कॅथिड्रल या ठिकाणी घेऊन गेली. लहानपणी 'पॅरिसचा कुबडा' हा जगत्विख्यात असा जो चित्रपट आम्ही बघितला होता, त्या चित्रपटाचं चित्रीकरण नॉटरडॅम कॅथिड्रलमध्येच झालं होतं. कुबड्याची अविस्मरणीय भूमिका करणारा नट होता चार्लस लाफ्टन. नॉटरडॅम कॅथिड्रलच्या रंगीत काचांसंबंधी फातिमा बरंच काही सांगत होती. सुरुवातीला ज्यांनी या रंगीबेरंगी काचा तयार केल्या, त्यांनी त्या कशाप्रकारे बनवल्या हे पुढच्या पिढीला न सांगितल्याने, कॅथिड्रलला पूर्ण होताना ज्या काचांचा वापर केला गेला त्यांत आणि पूर्वीच्या काचांमध्ये तफावत असल्याचं फातिमा सांगत होती. कॅथिड्रल अतिशय भव्य होते आणि त्याचा गाभारा अत्यंत प्रसन्न अन् पवित्र वाटला. एका बाजूला बिशप हार्मोनियमवर काही विद्यार्थ्यांना प्रार्थना शिकवत होता. दुसऱ्या बाजूला जिझस्च्या पुतळ्यासमोर मेणबत्त्या प्रज्वलित केलेल्या होत्या. जन्माने हिंदू असून मला चर्चमधलं वातावरण नेहमीच पवित्र वाटतं. देव, मग तो कोणताही मानावा, पण तो जिथं आहे असं

म्हणता तिथं धांदल, धावपळ, गर्दी, गोंगाट असू नये असं माझं प्रामाणिक मत आहे. चर्चमध्ये गेल्यानंतर न कळत जिजसच्या मूर्तीला मी नेहमीच भक्तिभावाने हात जोडतो.

माई, उमेश आणि मी असेच एकदा गोव्यातले एक चर्च पाहायला गेलो. आत बरेचसे लोक होते. ते गुडघे टेकून प्रार्थना करीत होते. चर्चच्या व्यवस्थापकाचं आमच्याकडं लक्ष जाताच तो आमच्याकडं येऊ लागला. बहुधा तो आम्हाला बाहेर घालवून देणार अशी शंका आल्यानं आम्ही तिघांनीही गुडघे टेकून तोंडाने प्रार्थना म्हटल्याचा अभिनय केला. तो व्यवस्थापक आम्हाला बाहेर घालवू शकला नाही. आमच्याजवळ येऊन तो नाईलाजाने निघून गेला काही चर्चेस् किंवा मंदिरांमध्ये अन्य धर्मांच्या लोकांना प्रवेश नाकारला जातो मद्रासला कपिलेश्वर मंदिरात जाण्यासाठी एका युरोपियन युगुलानं आपले बूट बाहेर काढून ठेवले आणि ते मंदिरात जाऊ लागले तेव्हा तिथल्या मुंडण केलेल्या मद्रासी पुजाऱ्याने त्यांना अडवलं ते दोघे अतिशय नाराज झाले. युरोपियन झाली तरी, तीही माणसंच होती. त्यांना मंदिर-प्रवेश नाकारल्याचं पाहून वाटलं, हिंदू धर्माला ओहोटी लागते ती अशा मूर्खपणाच्या विचारसरणीनं ! तुम्ही परकियांना तुमच्या मंदिरातसुद्धा येऊ देत नाही. तुमच्या धर्माची तत्त्वं कितीही उच्च असली तरीही निरर्थक ! माणसाकडं माणूस म्हणून ज्यांना बघता येत नाही त्यांना धर्म कधीही समजणार नाही !

नॉटरडॅम कँथिड्रलची बांधणी, त्याच्या प्रवेशद्वारावरची कलाकुसर, त्यावर कोरलेले बायबलमधील काही प्रसंग कलापूर्ण वाटले. फातिमा म्हणाली, ' जंटलमेन नाऊ यू कॅन पर्चेस सम सेविनीर्स ऑफ पॅरिस !' यावेळी मात्र ती समजेल अशा शब्दात बोलली आणि आम्हा सर्वांना बाजूच्या एका दुकानात घेऊन गेली. दुकानदार दाढीवाला होता. त्याच्याशी ती फ्रेंचमध्ये बोलली कौंटरमागे उर्दू वचनं असलेल्या फ्रेम्स होत्या. दुकानात बड्याळं, आंगठ्या, कॅथिड्रलची लहान प्रतिकृती असलेली मॉडेल्स होती आमच्या सोबत आलेल्या लोकांनी किंमती विचारण्याशिवाय काहीच खरेदी केली नाही फातिमा नाराज झाली. काही खरेदी झाली असती तर, तिचे कमिशन सुटले असते एकदा महाराजा हॉटेलमध्ये आणि दुसऱ्यांदा इथे या दुकानात

फातिमा का घेऊन आली हे समजल्यावर वाटलं, हा युरोप जरी असला तरी 'Blood is thicker than water'

व्हिक्टरी गेटकडे जाताना जो शहराचा भाग लागला, तो अत्यंत सधन अशा लोकांचा होता. फातिमा माहिती सांगता सांगता एका आलिशान फ्लॅटकडं बोट दाखवून म्हणाली,

'जेकेलीन लीव्हज् इन धिस फ्लॅट !'

आमच्या टूरमध्ये अतिचाणाक्षपणा करणारे काही प्रवासी होते. आपल्याला बरंचसं ज्ञान आहे असं भासवायचा त्यांचा अट्टाहास असे. अशांपैकी एकाने फातिमाला विचारले,

'यू मीन जॅकलीन केनेडी ?'

'ओ ऽ ऽ ऽ नो नो, नाऊ शी इज जेकेलीन ऑनॅसिस, लेडी ऑनॅसिस ! फातिमा उद्‌गारली.

त्यावर तिसऱ्या गृहस्थांनी विचारलं,

'इट इज सेड दॅट आफ्टर द डेथ ऑफ ओनॅसिस, शी हॅज मॅरीड अगेन अ वेल्दी मॅन फ्रॉम युरोप ?'

फातिमा टाळी वाजवून हसली आणि म्हणाली, 'आय यम् सो सॉरी. आय हॅव नो आयदिया !'

कोणाच्याही खासगी बाबतीत आपलं घाणेरडं नाक खुपसण्याची ही वृत्ती 'सातसमुद्र' ओलांडून सुद्धा सुटत नव्हती, याचं आश्चर्य वाटत होतं. जेकेलीननं दोन लग्नं केली काय, किंवा चार केली काय, तो तिचा वैयक्तिक प्रश्न होता. ज्या क्षणी तिनं केनेडी घराण्याशी असलेले आपले नाव सोडले होते, त्या क्षणी तिचे महत्त्वही संपले होते.

पॅरिस मला अतिशय आवडले होते. प्रचंड राजरस्ते, भव्य इमारती, ऐतिहासिक वास्तुशिल्प आणि काटेकोररीत्या स्वच्छता पालन करण्याची फ्रेंचांची वृत्ती मला खूप आवडली. नंतर पॅरिसचे जगप्रसिद्ध म्युझियम पाहायला गेलो. आम्हांला वेळ दिला दोन तासांचा. खरं तर हे म्युझियम अगदी व्यवस्थितरीत्या पाहायला दोन महिनेसुद्धा अपुरे पडतात. पण इलाज नव्हता. कळपातून आलो होतो. टी.सी.आयचा पटेल हातात छप्पी घेतलेल्या मेंढपाळासारखा आमच्या पाठीवर होता. तो तरी बिचारा काय

करणारं ? जगात बघण्यासारख्या असंख्य गोष्टी आहेत पण ते सर्व आपलं पूर्ण समाधान होईपर्यंत वेळेअभावी पाहणं अशक्यप्राय आहे

व्हीनसचा पुतळा आणि मोनालिसाचं पोर्ट्रेट या ठिकाणी प्रवाशांची तुफान गर्दी जमली होती खरं सांगतो, मला मोनालिसाच्या त्या फोटोचं वैशिष्ट्य काय आहे हे अद्याप समजलेलं नाही तेव्हा त्यावर इतक्यात काही भाष्य करण्याचा मला मुळीच अधिकार नाही. पण एक विनोद पुढे न्यूयॉर्कला गेल्यानंतर माझ्या वाचनात आला तो या मोनालिसाच्या पेंटींगबद्दल होता. तो असा होता " When the portrait of Monalisa was stolen from Paris Museum, the number of people went to see the blank wall was ten times more, than the people who saw the painting when it was there

मोनोलिसाचे हे पेंटींग पॅरिसच्या म्युझियममधून चोरीला गेले होते. आणि ते चोरीला गेल्यानंतर आजपर्यंत जितक्या लोकांनी ते पेंटींग पाहिलं होतं. त्याच्या दसपट लोक म्युझियममधील ती मोकळी जागा पाहून गेले एखाद्या गोष्टीचं माहात्म्य वाढलं की ते कोणत्या स्तराला जाते याचं ते बोलकं उदाहरण होतं.

आम्हीही मोनालिसाचं एक कार्ड विकत घेतलं म्हटलं, उभं जग या पेंटींगचं कौतुक करतं. तेंव्हा आपणही घरी गेल्यानंतर निवांतपणे त्यातलं वैशिष्ट्य शोधण्याचा प्रयत्न करावा. म्युझियममधले पुतळे अतिशय सुरेख वाटले. बहुसंख्य पुतळे नग्न असल्यानं माई मला विचारत होत्या 'ही शिल्पकला इतकी प्रगत असताना त्या काळी वस्त्रं कशी विणतात हे या लोकांना समजत नव्हतं असं दिसतं !'

मी हसून म्हणालो. अहो, ही कला आहे या पुतळ्यांकडं पाहताना तमला विचारसुद्धा मनात येता कामा नये ' एक जुनी कथा तिथं मला आठवली एका जगत्‌विख्यात चित्रकाराने एका नग्न युवतीचे तैलचित्र तयार केले आणि तो ते एका राजाकडं घेऊन गेला राजालाही ते चित्र खूपच आवडलं त्यानं ते चित्रकाराकडून विकत घेतलं अन् त्यानं प्रधानाला विचारलं 'हे चित्र आम्हाला आमच्या शयनगृहात लावावं असं वाटतं तुमचं काय मत आहे ?'

प्रधान म्हणाला ' या चित्रात थोडा बदल करून मगच ते आपण

शयनगृहात लावावं !

प्रधानानं आपल्या नगरातला एक चित्रकार बोलावला आणि त्या चित्राचा कमरेजवळचा आणि उरोजाचा भाग द्राक्षाच्या पानांनी झाकून टाकण्याची सूचना केली. नंतर राजाला शयनगृहात ते चित्र लावायला दिलं. राजानं ते चित्र शयनगृहात लावून टाकलं. पुढं काही दिवसांनी तो चित्रकार राजाकडं आला आणि म्हणाला, ' मला ते माझं चित्र जरा पाहायचं आहे ' राजानं त्याला शयनगृहात नेऊन ते चित्र दाखवलं. त्यावर केलेला बदल पाहून चित्रकार संतापला आणि म्हणाला, ' कोणी मूर्खानं हा बदल केला ?'

त्यावर राजा शांतपणे म्हणाला, ' मूर्खानं नव्हे, आमच्या प्रधानजींनी तो बदल करवून घेतला आहे !'

चित्रकार म्हणाला ' तुमचा प्रधान पापी आहे. त्याला कलेचा आस्वाद घेण्याची अक्कल नाही. या चित्राकडं पाहताना आपण एक निखळ कलाकृती पाहतो आहोत ही दृष्टीच तुमच्या प्रधानाला नाही. तो एक स्त्री म्हणून या चित्राकडं पाहत होता आणि तुम्हालाही त्यानं तसचं पाहायला शिकवलं आहे ! मला या चित्राकडं आता पाहवत नाही !'

असं म्हणून व्यथित अंत:करणानं तो प्रासादातून निघून गेला. राजाला चूक उमगली. त्यानं पुन्हा आपल्या नगरीतल्या चित्रकाराला बोलावून घेतलं आणि चित्राचा अनावृत्त भाग पुन्हा होता तसा करण्याचा आदेश दिला. तो राजाचा चित्रकार म्हणाला, ' हुजूर, आपण मला अभय देत असाल तर तुमच्यापुढे मला एक गुन्हा कबूल करावयाचा आहे. '

' बोल, तुला अभय दिलं आहे !'

' हुजूर, ते मूळ चित्र मी जसंच्या तसं माझ्या घरी नेऊन ठेवलं आहे. त्या चित्राची नक्कल करून मी ही द्राक्षाची पानं वर काढली आहेत. ते मूळ चित्र मी तुम्हाला परत आणून देतो. ती थोर कलाकृती बिघडून टाकण्याचं पाप मला करावंसं वाटलं नाही.

राजाने त्या चित्रकाराचा सन्मान केला आणि प्रधानाच्या मूर्खपणाची कीव केली. थोडक्यात काय, तर ' न्यूड ' पाहताना ती एक शुद्ध कलाकृती आहे या नजरेनं पाहावं लागतं. सर्वसामान्यांच्या नजरेनं पाहायची नसते. मी असे स्त्रियांचे ' न्यूड ' पेंटींग पाहताना बाकीच्यांना वाटायचे, ' काय हे ?' पण

माझी नजर त्या नगरीतल्या चित्रकारासारखी आहे मी त्यातल्या कलेचा आस्वाद घेत असतो.

दुपारी तीन वाजता आम्हाला पॅरिसचं खास वैशिष्ट्य अशा आयफेल टॉवरजवळ आणून सोडलं आणि सांगण्यात आलं की, तुम्हाला हवा तितका वेळ आयफेल टॉवर पाहा आणि तुमचे तुम्ही हॉटेलवर दिवसा उजेडी परत या. काहीजणांनी दुरूनच टॉवर बघितला, कारण परत जाताना आपल्याला आपले हॉटेल सापडेल की नाही याची त्यांना शंका वाटत होती. ते तसेच कोचमधून हॉटेलकडे गेले. त्या कोचमधून माई, उमेश व मी उतरलो आणि सरळ आयफेल टॉवरच्या रोखाने चालू लागलो

लोखंडी गर्डर्सच्या साहाय्याने उभा केलेला ;तो आयफेल टॉवर म्हणजे जगातलं आणखीन एक आश्चर्य ! या आयफेल टॉवर प्रचंड उंच आहे त्यावर चढून जाण्यासाठी मोठे लिफ्ट आहे. एका वेळी सुमारे पन्नास माणसांना वर ओढून नेण्याची क्षमता त्या लिफ्टमध्ये आहे. या टॉवरला तीन गॅलरीज आहेत. सध्या दुसऱ्या गॅलरीपर्यंत प्रवाशांना जाता येतं पण या दुसऱ्या गॅलरीवर गेल्यानंतर उभ्या पॅरिस शहरांचं दर्शन घडतं. अफाट पसरलेल्या पॅरिस शहरातील ऐतिहासिक ठिकाणं इथून दिसतात. या दुसऱ्या गॅलरीवर मोठे हॉटेल आहे फक्त दुसऱ्या टप्प्यावर गेल्यानंतर इतके उंचावर आल्यासारखे वाटते, तर शेवटच्या टप्प्यावर गेल्यावर काय वाटेल ही कल्पनाच करता येत नाही जवळ जवळ अडीच–तीन तास आम्ही त्या मनोऱ्याच्या सर्व बाजूंनी पॅरिस पाहात होतो. दूर क्षितिजावर जिथपर्यंत नजर पोहोचत होती तिथपर्यंत ते अफाट शहर पसरलं होतं. सेन नदीवरचे पूल, नॉटरडॅम कॅथिड्रल, इनव्हैलीडेस चर्च, व्हिक्टरी गेट ही ठिकाणं तिथं बसवलेल्या दुर्बिणीत नाणं टाकून पाहिली.

उंचावर जाऊन आजूबाजूचा भूप्रदेश न्याहाळणं हा माझा अतिशय आवडता छंद आहे. इस्लामपूरला नोकरीनिमित्त वास्तव्य असताना 'खडी ' टेकडीवरून सूर्योदय आणि सूर्यास्त कितीतरी वेळा मी बघितला आहे. तसंच पन्हाळ्यावर गेल्यानंतर सज्जाकोठीच्या गेस्ट हौसच्या गॅलरीत तासन् तास बसून राहिलो तरी मला तेथून उठावंस वाटत नाही एवढंच कशाला, मल्कापूरच्या महादेव मंदिराची टेकडी चढून कडवी नदीच्या काठाचा

लाल मातीचा प्रदेश, पश्चिमेच्या सह्याद्रीच्या निळसर रांगा, पूर्वेला नागमोडी वळसे घालत गेलेली डांबरी सडक इतक्या वेळा पाहूनही माझे मन अजूनही अतृप्तच आहे. श्रीनगरची शंकराचार्य टेकडी चढून गेल्यानंतर जे विलोभनीय दृश्य दिसले, ते या जन्मात विसरणं अशक्य आहे. उभं श्रीनगर शहर त्या ठिकाणावरून दिसतं असं नव्हे, तर उत्तर आणि पश्चिमेस आकाशात घुसलेली बर्फाळ पर्वतांची शिखरंसुद्धा तिथून दिसतात. ज्याला कोणाला स्वर्ग कसा असावा याचा अंदाज करायचा असेल, त्यानं तास-दोन तास श्रीशंकराचार्य टेकडीवर चढून जावं अन मंदिराच्या पायरीवर बसून आसमंतात नजर फिरवीत बसावं.

आयफेल टॉवरवरून खाली आल्यानंतर पुन्हा एकदा त्या प्रचंड मनोऱ्याकडे बघितलं अन् मनात म्हणालो, ' आजपर्यंत वरळीचा टी. व्ही. चा मनोरा बघताना मला नेहमी तुझी आठवण यायची. पण आज तुझा प्रत्यक्षच स्पर्श घडला. तुझ्या उत्तुंगत्वाची कल्पना आली.'

आमच्याकडे पूर्वजांनी एकदा अजंठा, वेरूळ, इथं लेणी कोरून ठेवली आहेत त्यानंतर शहाजहाननं ताजमहाल बांधला. त्यानंतर नाव घेण्यासारखं असं काम निर्माण झालेलं नाही, पुढे होईल याची आशा नाही. भरमसाठ लोकसंख्या वाढीने दैन्य आणि दारिद्र्य निर्माण झालेल्या देशात उच्च अभिरुचीसंपन्न कलात्मक निर्मिती होईल ही आशा करण्यात अर्थ नाही. ज्या देशांत आपल्या साधनसामग्रीचा नागरिकांना विचार नाही, डुकरावर स्पर्धा करावी तशी लोकसंख्या वाढवण्याशिवाय दुसरी अक्कल नाही, त्या देशांत विदेशी पर्यटकांना आकर्षण वाटेल अशी निर्मिती होणं केवळ दुर्मिळच नव्हे, तर अशक्य आहे.

युरोपमध्ये आणि अमेरिकेत तीन मुलं असलेलं कुटुंब पाहण्यात आलं नाही. आमच्याकडं साधा एस. टी. चा हमाल जरी असला अन् त्याला तीन-चार मुली असल्या तरी तो ' राजपुत्रा ' च्या प्राप्तीसाठी आणखीन दोन-तीन वेळा नशिबाची परीक्षा बघणारच ! सक्तीचे कुटुंबनियोजन करणाऱ्यांना खुर्चीवरून खाली खेचलं जातं इतका मूर्खांचा हा देश वाटतं की, या देशात एखादा प्रिन्स बिस्मार्क किंवा आतातुर्कसारखा एखादा बेनेव्होलंट डिक्टेटर निर्माण व्हावा हात जोडूनही जेव्हा समाज सुधारत नाही, तेव्हा

हातात सोटाच घ्यावा लागतो पण आमचं खरं दुःख आहे ते या देशाचं भलं व्हावं असं वाटणारा एकही नेता आज आमच्या देशात नाही !

जाऊ द्या, भारतातली केविलवाणी राजकीय परिस्थिती काही काळ विसरावी म्हटलं तरी विसरली जात नाही पाश्चात्त्य राष्ट्रांनी केलेल्या प्रगतीकडं पाहिलं की वाटतं, हे असं कधी आमच्या वाट्याला येईल का ? उत्तर सापडत नाही मन मात्र विषण्ण होऊन जातं

आयफेल टॉवरच्या समोर प्रचंड असा चौक होता. चौकात अनेक मुलं व्हीलस्केटींग करीत होती. एका ओळीनं प्लॅस्टिकचे कोन उभे केले होते आणि वरून वेगानं आलेली मुलं मोठ्या कौशल्यानं ते कोन न पाडता नागमोडी वळसे घालीत पार करून जात होती. काहीजण कागदी तबकड्या उडवून झेलत होती धट्टीकट्टी अन् निरोगी मुलं अतिशय गोजिरवाणी दिसत होती

तिथल्या बगिच्यांत प्रचंड अशा धवल रंगाच्या शिलाखंडावर मानवी आकाराचे अनेक पुतळे कोरलेले होते दुरून आयफेल टॉवर फारच विलोभनीय दिसतो. आकाश हळूहळू भरून येऊ लागलं. पाऊस पडण्याची लक्षणं दिसू लागली म्हणून आम्ही हॉटेलकडं जाण्यासाठी अंडरग्राऊंड ट्रेन (मॉन्ट्रीयल) पकडण्यासाठी उठलो

पॅरिस आणि लंडनइथल्या जमिनीखालच्या रेल्वे अतिशय आकर्षक आहेत स्टेशनवरची स्वच्छता वाखाणण्यासारखी वाटली गाडी थांबल्यानंतर आपोआप उघडणारी व प्रवासी चढल्यानंतर आपोआप बंद होणारी झडपेची दारं. आत सुरेख कोचिंग केलेल्या खुर्च्या, प्रत्येक डबा एअरकंडीशन्ड असा. त्यामुळं पॅरिस किंवा लंडन या शहरात त्या भुयारी रेल्वेतून दिवस दिवसभर जरी प्रवास करीत राहिलं तरी शीण येणार नाही. याही वेळेस मला मुंबईची लोकल आठवली. सकाळी सात वाजल्यापासून चर्चगेट आणि बोरीबंदरकडं लोंबकळणारे प्रवासी घेऊन जाणाऱ्या लोकल्स. आतल्या प्रवाशांच्या गर्दीने जीव घुसमटणारे ते डबे, घामट दर्पाने घ्राणेंद्रिये बधिर झालेले प्रवासी ओढणाऱ्या लोकल्स आठवल्या प्रत्येक वेळी ही तुलना करणाऱ्या माझ्या मनाला मी बजावत होतो, तू या प्रवासाचं सुख अनुभवायचं सोडून मुर्खासारखा आपल्या देशाशी इथल्या वातावरणाची तुलना का करतो

आहेस ? पण झडप लावल्यासारखे जीवन आजपर्यंत मी जगलो नाही, यापुढे जगणे जमणार नाही.

आमचे अनेक नेते, विद्वान पुढारी वारंवार परदेशाचे दौरे करतात. त्यांच्यापैकी कोणाला असं नाही का वाटत, की आपलाही देश सुधारावा, नागरिकांचे जीवनमान सुधारावं, पाश्चात्त्यांची भौतिक प्रगती आपणही अनुसरावी ?

हॉटेलवर परत येण्यापूर्वी 'बार्बेक्यू' खायचे असे सर्वानुमते–म्हणजे आमच्या तिघांत–ठरले. नेहमी 'Majority carries the point' असे तत्त्व आहे. तिघांपैकी दोघांनी एखादी गोष्ट करायची असे ठरवले की तिला इच्छा नसलेल्यानेही सम्मत्ती दर्शवायची असा संकेत आहे. त्यामुळे मतभिन्नतेचे प्रकार फारसे घडत नाहीत. पण नेहमी माझे आणि माईचे मत भिन्न असते, त्यावेळी उमेशना 'Casting Vote' असते. त्यावेळी ते मोठ्या कौशल्याने आपला हक्क बजावतात. शेवटी जीवनात तडजोड केल्याशिवाय समाधान नाही हेच खरं ! 'मी म्हणेन तेच खरं' अशा वृत्तीनं वागणाऱ्यांच्या घरी सदैव धुसफूस चालते आणि धुमसणारा प्रक्षोभ केव्हा पेट घेईल याचा नेम नसतो !

'बार्बेक्यू' खायचा तर चला. 'बार्बेक्यू ! शेगडीवर आपल्यासमोर भाजल्या गेलेल्या कोंबडीच्या टांगा अतिशय रुचकर लागत होत्या.

आमचं हॉटेल समोरच होतं त्यामुळं बार्बेक्यू खाताना गडबड करायचं कारण नव्हतं, इतक्यात बारीक अशा पावसाला सुरुवात झाली. फ्रान्समध्ये मोसम फारच उत्तम होता पण मध्येच केव्हातरी आकाश भरून यायचं आणि पावसाची एखादी हलकोशी सर पडून जायची. पुन्हा चकचकीत ऊन पडलं की, मुळात चकचकीत आणि स्वच्छ असलेले रस्ते अधिकच स्वच्छ दिसू लागत विशेषत: अशी सर रात्रीच्यावेळी जर पडून गेली, तर रस्त्यावरून धावणाऱ्या मोटारींचा उजेड ओल्या रस्त्यावर पडला की, सारा रस्ताच उजेडाची नदी वहात असल्यासारखा भासे.

पॅरिसमध्ये नाईट-शोज प्रेक्षणीय असतात. शिवाय 'पॅरिस बाय नाईट' अशी एक सैर नदीतून दूर असते. आम्ही हॉटेलवर आलो तेव्हा फातिमा अगोदरच येऊन बसली होती नी आमच्यासोबत आलेल्या सर्व प्रवाशांना

नाईट-शो आणि पॅरिस बाय नाईट बघायला येण्याबद्दल उद्युक्त करीत होती.

'नाईट शो'चे पंचावन डॉलर्स आणि पॅरिस बाय नाईटचे पंधरा डॉलर्स. भारतीय रुपयात बोलायचे झाल्यास सातशे रुपये ते दोन्ही प्रकार बघायला पडणार होते पण पॅरिसमध्ये आलो म्हटल्यावर नाईट-शो हा पहायलाच हवा. उमेश मला म्हणाले, 'आबा, तुम्ही एकटे जा, आम्हाला तो नाईट-शो बघायची इच्छा नाही'

मग मी म्हणालो, 'मग मी एकटा नाही जाणार! कारण तो शो रात्री ११॥ च्या सुमाराला चालू होणार आणि दोन वाजता संपणार. तेथून हॉटेलवर परत यायला अडीच-तीन वाजणार मला इतके जागरण करणे शक्य नाही.'

'आपण हाच शो जेव्हा अमेरिकेत लास वेगासला जाऊ तेव्हा पाहू!' उमेशनी सूचना केली

तिसऱ्या दिवशी सकाळी पॅरिस सोडले. आयफेल टॉवर, म्युझियम, आर्टिस्ट गॅलरी, इनव्हॅलीडेस चर्च, व्हिक्टरी गेट अशा अतिभव्य आणि अविस्मरणीय वास्तु असलेल्या रसिल्या आणि रंगिल्या शहराचा निरोप घेताना अंतःकरण भरून आले होते.

डॅनीची बस पॅरिस शहराची हद्द ओलांडून स्वित्झर्लंडच्या दिशेनं धावत होती. सकाळी-सकाळीच आकाशात ढगांनी गर्दी केली. हवेत गारठा होता. डॅनीनं गाडीतल्या टेपरेकॉर्डवर पाश्चात्त्य संगीत लावले होते. पहिल्यांदा ती एक-दोन टेप्स् ऐकताना बरे वाटले. पण त्यातले फारसे काही न समजल्याने ते टेप्स वाजवणे थांबावे तरी किंवा दुसऱ्यातरी टेप्स लावाव्यात अशी मी सूचना केली पण आमच्यांत असे काही महाभाग होते की त्यांना पाश्चात्त्य संगीतातले बरंचसं ज्ञान आहे अशी शेखी मिरवण्याची फाजिल खोड होती. टेप वाजू लागली की पायांनी आणि हातानी ते ठेका धरीत शेवटी डॅनीनं 'हरेराम हरेकृष्ण'ची इंग्रजी टेप लावली. त्यानं विचार केला असेल की, युरोपात हे 'हरेराम हरेकृष्ण'चं खूळ भारतातूनच आलेलं आहे, तेव्हा ती, टेप वाजवली तर ही मंडळी खूष होतील. पण हरेराम हरेकृष्ण म्हणत गोव्यात डिचोलीम बीचवर, किंवा कोरेगाव पार्कच्या परिसरात गांजा-चरस ओढत भररस्त्यात बीभत्स चाळे करणाऱ्या या तथाकथित हरेराम

हरेकृष्णवाल्यांविषयी आमच्यातील बहुसंख्य मंडळींना आपुलकी वाटणं शक्य नव्हतं. शेवटी आमच्यातल्या डॉ. चव्हाणांनी लंडन येथे त्यांच्या मित्राला देण्यासाठी आणलेली भीमसेनांची टेप दिली 'सावळे सुंदर रूप मनोहर' या भजनापूर्वीची भीमसेनांची ती तान अंगावर काटा फुलवून गेली. आकाश ढगाळलेलं. रस्त्याच्या दुतर्फाची गर्द झाडी, झाडी संपली की समोर दूरपर्यंत पसरलेले गव्हाचे वाफे, मधून-मधून दिसणारी तिथल्या शेतकऱ्यांची सुबक आणि डौलदार घरं, कुरणात चरणाऱ्या पुष्ठ अशा जर्सी गाई हे पाहताना पृथ्वीचं रूप देखील खरोखरच भीमसेनांच्या शब्दांप्रमाणं 'सावळे सुंदर मनोहर' वाटत होते.

सकाळी ब्रेकफास्टच्या वेळी कप-दोन कप चहा पोटात गेलेला असायचा तेव्हा तास-दीड तास प्रवास झाल्यावर प्रत्येकाला डॅनीनं आता गाडी कुठंतरी उभी करावी असं वाटायचं पण युरोपात काय किंवा अमेरिकेत काय. वाहनं अशी रस्त्यात कुठेही उभी करता येत नाहीत ज्या ठिकाणी 'रेस्ट एरिया' अशी अक्षरं लिहिलेली असतात, तिथंच फक्त वाहनं उभी करायची असतात. रस्त्याच्या कडेला अँबॅसिडर गाड्या उभ्या करून ऐसपैस मांड्या ठोकून पोळीवर बेसन घेऊन एकमेकाना आग्रह करीत नोबरे भरणारी, बाजूलाच लहान मुलांना निर्लज्जपणे नैसर्गिक विधी करायला लावणारी अशी कुटुंबं तिथं दिसत नाहीत

डॅनीनं एका लहानशा खेड्यात गाडी उभी केली तेव्हा टेकडीवर वसलेलं ते अनोखं खेडं अतिशय आकर्षक असं दिसलं हिरव्यागार अशा टेकडीवर लाल, निळ्या जांभळ्या रंगांची छपरं असलेली घरं चित्रातल्या घरांसारखी दिसत होती प्रत्येक घरासमोर गुलाब फुललेले होते लाल, गुलाबी ऑरेंज कलरचे

फ्रान्सची हद्द संपली आणि स्वित्झर्लंडची हद्द सुरू झाली, त्या ठिकाणी चेकपोष्टवर स्वीस पोलिसांनी आमचे पासपोर्ट तपासून पाहिले आणि तो आम्हाला उद्देशून 'वाँ ऽऽ व्हां ऽऽ' असं काहीतरी उद्गारला उमेशनी मला विचारलं

'आबा, तो पोलीस काय म्हणाला समजलं काय ?'

नाही बुवा !'

'अहो, तो बॉन व्हाएज म्हणाला.' मी हसून मान डोलावली अन् उमेशच्या चाणाक्षपणाचं कौतुक केलं

प्रचंड सरोवरं. त्याभोवतालचे उत्तुंग असे पर्वत आणि पर्वताला वेढून टाकणारी पाईनची दाट झाडी, या प्रदेशातून नागमोडी प्रवास करीत पुन्हा डॅनीची बस चालू लागली. काही ठिकाणी रस्ता तलावाजवळूनच चालला होता. ऐन उन्हाळयाचे दिवस असूनही गिरीकंदरातून धो धो असे ओहोळ वहात होते. खाली दरीत असलेल्या सरोवराला जाऊन मिळत होते. काही सरोवरांत होड्यांत बसून गळानं मासे पकडणारे स्वीस पेन्शनर दिसत होते. म्हातारी माणसं बऱ्याच खेड्यांतून दिसली. पण कानाला मफलर गुंडाळून हवेत काठ्या फिरवीत प्रचलित राजकारणावर जोरजोरानं वादंग घालणारी, माणसं मात्र कुठं दिसली नाहीत.

दुपारचे दोन वाजले होते. अद्याप जिनेव्हात पोहोचायला थोडा अवधी होता. आमची बस एका मोठ्या घाटातून चालली होती त्यावेळी मला गाडी थोडा वेळ कुठंतरी थांबावी आणि घाटमाथ्यावरून दिसणारे सृष्टिसौंदर्य न्याहाळावं असं वाटलं. माझी सूचना मी इतर प्रवाशांना सांगितली आणि शेवटी मेहेरनाश पटेलनं डॅनीला घाटमाथ्यावर गाडी उभी करण्याची सूचना केली.

प्रवासात पाण्याचा गेळा मी अगदी न विसरता घेत असतो– माझा नेहमीचा मलकापूर–पन्हाळ्याला घेऊन जायचा गेळा मी मुंबईला घेऊन आलो होतो, पण परदेश प्रवासात तो जुनाट गेळा सोबत घ्यायचा नाही अशी माझ्यावर बंदी घातली गेली. माई म्हणाल्या, 'फॉरिनला जाताना हा गेळा न्यायचा ?'

'का ? तिथं तहान लागत नाही ?'

लागली तरी आपण तिथं नवीन घेऊ. हा जुनाट गेळा घेऊन जायचं नाही !'

चिरंजीवांनीही मातोश्रींची 'री' ओढल्यामुळं मला माझा गेळा सोबत घेता आला नाही. युरोप आणि अमेरिकेत इतक्या डिपार्टमेंटल स्टोअर्समध्ये मी फिरलो, पण मला हवा तसा गेळा मिळालाच नाही. मग मी व्हिस्कीच्या मोकळ्या बाटलीत पाणी भरून घेऊ लागलो. पण या प्रवासात तेही

पाणी संपलं. दुपारी लंचला 'हॅम्बर्गर' खाल्ला होता आणि त्यामुळं कमालीची तहान लागली होती. घाटातून जाताना डोंगरातून खळखळत येणारे शुभ्र पाण्याचे प्रवाह आणि प्रचंड सरोवर पाहून वाटलं की, डॅनीनं एखाद्या ओघळाजवळ किंवा सरोवराच्या काठी बस उभी करावी आणि आम्ही शिकारीत जसं ओंजळीनं पोटभर पाणी पितो तसं पिऊन घ्यावं. पण हायवेला वाटेत कुठंही वाहन उभं करता येत नाही. रेस्ट एरिया जवळ नव्हती. मला आठवल्या त्या एका इंग्रजी कवितेतल्या ओळी : एक दर्यावर्दी एकटाच शिडाच्या जहाजातून दूरच्या पर्यटनाला चाललेला असतो. पण वाटेत त्याच्याजवळचे गोडे पाणी संपते. त्याला भयंकर तहान लागलेली असते. तेव्हा त्याच्या अवतीभोवती पसरलेल्या अफाट दर्याकडं पाहात तो म्हणतो, ' Water, Water every where, but not a little drop to drink.' डॅनीनं गाडी थांबवली ती एका हॉटेलजवळ. मी घाईगर्दीनं उतरलो आणि हॉटेलकडं गेलो. तांबड्या भुऱ्या केसांची, गालांवर नैसर्गिकरीत्या लाली आलेली एक षोडशा कौंटरजवळ उभी होती. मी तिला म्हणालो, 'कॅन आय गेट ए ग्लास ऑफ वॉटर ?'

त्या पोरीला इंग्रजी ओ की ठो समजत नव्हतं. शेवटी ' वॉटर, वॉटर ' म्हणून मोठ्यानं ओरडलो. तेव्हा तिनं मला काय हवं ते ओळखलं आणि प्लॅस्टिकचा एक ग्लास भरून पाणी मला दिलं. मी ते गटागटा पिऊन टाकलं. माझ्या मागोमाग गाडीतले तृषार्त असे दहाबारा प्रवासी तिथं येऊन पाणी मागू लागले, तेव्हा ती पोरगी स्वीस भाषेत काहीतरी बरळली. आणि तिनं कोणालाही पाणी दिलं नाही. उलट तिनं कोकाकोला, पेप्सीकोला, बिअर यांच्या टीनकडे बोट दाखवलं आणि काहीतरी बोलली. बहुधा ती म्हणाली असेल, 'तुम्हा सर्वांना मी इथं फुकट पाणी देत राहिले तर मला दिवाळं काढावं लागेल ! आता एखाद्याला दिलं ती गोष्ट निराळी !' माझ्याकडं पाहातच ती उद्गारली होती.

माझ्या मागोमाग आलेल्या प्रवाशांपैकी एकजण म्हणाला, 'आपको कैसा दिया ? और हमको क्यूं नहीं देती ?'

मी हसत हसत म्हणालो, 'मेरी उसकी बहोत पुरानी पहचान है !' असं म्हणून बाजूच्या 'सोव्हनीर स्टॉल' जवळ आलो. युरोपात आणि

अमेरिकेत मी अनेक सुंदर पोरी बघितल्या. पण त्या सोव्हनीर स्टॉलमध्ये बसलेल्या पोरीचं सौंदर्य अफलातून होतं. तिनं निळा फ्रॉक घातला होता. नितळ गोरा रंग आणि चक्क काळे केस. ते रंगवलेले मुळीच नव्हते. तिथं स्वित्झर्लंडच्या परिसरात फोटो कार्डस् होते. त्या परिसरातील आढळणाऱ्या जंगली एडक्यांच्या शिंगांपासून बनवलेल्या तुताऱ्या होत्या. मॅटरहॉर्न पर्वताचे चित्र असलेल्या किचेनस् होत्या. त्या तिच्या स्टॉलसमोर उभं राहून मी त्या वस्तू न्याहाळण्याचा बहाणा करून त्या सौंदर्यवतीचं लावण्य अवलोकन करीत होतो. पण इतक्यात पटेलनं सर्वांना गाडीकडं बोलावलं. सर्वजण आले, पण आमच्यातले ते नवविवाहित जोडपे–'तुलसी' पती–पत्नी–कुठं बेपत्ता झालं होतं. पटेलला नेहमी एखाद–दुसरा प्रवासी असा वैताग आणायचा. पटेलनं त्यांना हाका मारायला सुरुवात केली. हॉटेलच्या बाजूला असलेल्या खडकाजवळ उभं राहून त्यांचा प्रणय चालला होता. पटेलची हाक ऐकल्यावर हळूहळू ते विलग होऊन बसकडे आले. आपल्या बेछूट आणि उच्छृंखल वागण्यानं आता ते युगुल सर्व प्रवाशांच्या परिचयाचं झालं होतं. गाडीत सर्वांत मागे ते बसायचे. कारण त्यांना तिथं एकमेकांना जवळ बसताना कोणतीही ' पोज ' घेणं सोपं पडायचं.

जिनेव्हात पोहोचलो तेव्हा संध्याकाळ झाली होती आमच्या निवास–स्थानासमोरच जेवणाचं हॉटेल होतं. आमच्यासाठी त्याही हॉटेलात इंडियन फूड तयार ठेवण्याची सूचना केली होती. पण त्या लोकांना इंडियन फूड म्हणजे काय याचे यत्किंचितही ज्ञान नसताना टी.सी.आय.नं आम्हाला इंडियन फूड देण्याचा अट्टाहास का करावा , हे मला समजत नव्हतं. उलट मला वाटे, ज्या देशात आपण जातो त्या देशातले वैशिष्ट्यपूर्ण असे खाद्यपदार्थ चाखायला मिळावेत. मी मात्र अमेरिकेत गेल्यानंतर हॅम बर्गर्स, हॉट डॉग्ज, पिझ्झा अगदी मनसोक्त खाऊन घेतले.

जिनेव्हातील त्या हॉटेलात एक नाचरी पोरगी चालताना सर्व अवयव हलवीत, गिऱ्हाईकांची ऑर्डर घेत होती ती इंग्रजी चांगलं बोलत होती. हॉटेलात गेल्यावर मी पटेलला म्हणालो ' आम्ही इंडियन फूड न घेता इथलंच जेवण घेतलं तर नाही का चालणार ?'

तो म्हणाला, ' चालेल. ' मग आम्ही तिघांनी डिनर आणायची त्या

पोरीला ऑर्डर दिली. दहा मिनिटं झाली, पंधरा मिनिटं झाली, सर्व प्रवाशांना तिनं इंडियन फूड आणून दिलं आणि शेवटी मी जेव्हा तिला आमच्या जेवणाबद्दल विचारलं, तेव्हा ती खांदे उडवून ती म्हणाली, ' यू नेव्हर प्लेस्ड ऑर्डर फॉर इंग्लिश फूड ! इंग्लिश फूड इज फिनिश्ड !'

मी म्हणालो, ' इंग्लिश नाही तर नाही, इंडियन फूड तरी दे !' तर त्यावर ती बनेल पोरगी हातवारे करीत म्हणाली, ' इंडियन फूड इज आल्सो फिनिश्ड !' मग मात्र माझी खोबडी गरम झाली उठलो आणि त्या मॅनेजरला जाऊन भेटलो जॉन केनेडीसारखं व्यक्तिमत्व असलेल्या मॅनेजरनं माझं म्हणणं शांतचित्तानं ऐकून घेतलं आणि तो म्हणाला, ' टेक इट इझी, आय वुईल सर्व्ह यू इंग्लिश फूड !'

तेथून येता येता मी म्हणालो, ' अशा बेजबाबदार आणि खोटारड्या पोरी तुमच्या हॉटेलात राहिल्या तर तुमच्या हॉटेलचे नाव बद्‌दू झाल्याशिवाय राहणार नाही !'

आमच्या ग्रूपमधल्या सर्वांचे जेवण संपत आले होते आणि गरम गरम वाफा येत असलेल्या सूपच्या प्लेटस् आमच्या टेबलावर आणून ठेवल्या गेल्या ती कजाग पोरगी मात्र दुरून माझ्याकडं रागानं पाहात होती. मी तिला शाप दिला . तुझं लग्न होईल अन् तुला मारका नवरा मिळेल !.'

पॅरिस सोडल्यापासून हवेत थोडा थोडा बदल घडत होता जिनेव्हात तो चांगलाच जाणवला जिनेव्हा शहर हे चोहोबाजूंनी सरोवरांनी वेढलेलं असल्यामुळं हवेत गारवा होता. रात्री हवाही ढगाळ झाली अधून–मधून पावसाची बुरबूर सुरू होती

दुसऱ्या दिवशीची सकाळ मात्र प्रसन्न होती. पूर्वेचे आकाश मोकळे दिसत होते. स्नान उरकून ब्रेकफास्टसाठी खाली आलो. आमचे सहप्रवासी अगोदरच येऊन स्थानापन्न झाले होते.

ब्रेकफास्ट म्हणजे चहा किंवा कॉफी घेण्यापूर्वी थोडे काहीतरी खायचं असतं. पण आमच्यासोबत आलेली मंडळी दुष्काळातून आल्यासारखी बकाबका खात होती एकदा चोप्रा पितापुत्रांनी पॅरिसमध्ये आपल्या खाऊखादाड वृत्तीची झलक दाखवलेली होतीच. इथं जिनेव्हामध्ये आमच्यासोबत आलेल्या दोन ' बेन 'नी जाम पावाला लावून न खाता नुसताच खाल्ला.

एका माणसानं एखादीच जामची कुपी घेऊन ती पावाला लावून खायची असते. पण या ' वेन ' नी तोंडाला गोड लागनं म्हणून चार-चार कुप्या फस्त केल्या दुसरे एक व्यापारी गृहस्थ आमच्यासोबत होते ते दिवसभराचं एकदाच खाऊन घेत. कारण ब्रेकफास्ट टी.सी.आय. देत होते. व रात्री डिनरही टी.सी.आय कडेच होतं. त्यामुळं ते व्यापारी गृहस्थ उंटामारखं एकदा भरपूर खाऊन घ्यायचे आणि ' अब्बा ऽऽऽऽ ' अशी तृप्तीची ढेकर देऊन बाहेर गाडीत पुढची जागा धरण्यासाठी सर्वांच्या अगोदर जायचे !

आमच्या टूरमध्ये असलेले डॉक्टर होशिंग, त्यांच्या पत्नी लीलाबाई आणि डॉक्टर चव्हाण या सोलापूरच्या मंडळींशी आमची हळूहळू मैत्री जडत चालली होती. एक तर आम्ही महाराष्ट्रीयन होतो आणि दुसरं म्हणजे मी नोकरीनिमित्त ४-५ वर्ष सोलापुरात असल्यानं मला सोलापूरबद्दल आत्मीयता वाटत होती. मेढी नावाचे पुण्याचे एक गृहस्थ टूरमध्ये होते पण ते बऱ्याच वेळा एकटेच वावरत असायचे प्रवासात त्यांचा इंटरेस्ट निराळाच होता

जिनेव्हा शहरातली प्रमुख ठिकाणं दाखवायला जी गाईडबाई आली होती, ती फिक्कट निळा फ्रॉक घातलेली, निळया डोळ्यांची, तांबूस केसांची वेणी घातलेली चाळीस-त्रेचाळीस वर्षांची बाई होती हसत हसत तिनं आमचं सर्वांचं स्वागत केलं.

' वेलकम् टू जिनेव्हा. माय नेम इज ' मीनाक्षी ' आम्हा सर्वांच्या तोंडून आश्चर्योद्गार बाहेर पडताच ती हसत म्हणाली. ' आय न्यू, यू आर गोइंग टू बी सर्प्राईज्ड. बट् रियल्ली माय नेम इज मीनाक्षी अँड आय वॉज इन् इंडिया फॉर टेन इयर्स !'

चव्हाण डॉक्टरनी तिला विचारलं, ' वुईच पार्ट ऑफ इंडिया यू लाईक्ड मोअर ?'

' वेल, आय वॉज इन बॉंबे, कॅलकटा. मॅड्रस अँड बँग्लोर, आय लाईक्ड बँग्लोर, इट इज ए ब्युटीफुल सिटी ! वेल जंटलमेन, नाऊ वुई आर गोइंग टू व्हिजिट द् युनायटेड नेशन्स बिल्डिंग, द आय. एल्. ओ. लेक, जिनेव्हा अँड बायरन मेमोरियल. अफ्टरनून इज फ्री फॉर शॉपिंग !

आमच्यासोबत प्रवासाला आलेल्या चाळीस व्यक्तींत प्रत्येकाचा स्वभाव भिन्न होता त्यांत जे ' नॉर्मल ' स्वभावाचे होते, त्यांच्याबद्दल मला फारसं

काही मागायचं नाही. पण जे अगदी अॅब्नॉर्मल होते त्यांच्याबद्दल मात्र खूप सांगण्यासारखं आहे. या अॅब्नॉर्मल लोकांच्या लिस्टमध्ये सर्वांत प्रथम 'गर्ग' यांना सर्वांत वरचा क्रमांक द्यावा लागेल. हे गृहस्थ पाच–सव्वापाच फूट उंच, गोरे, गोल तोंडाचे आणि या सर्व प्रवासी मंडळींचा 'पुढारी' होण्यास मी एकटाच लायक आहे अशी त्यांची प्रामाणिक समजूत होती. म्हणून ज्या ज्या वेळी गाईड एखादी महत्त्वाची माहिती सांगत असे, त्यावेळी गर्गमहाशय तिला मध्येच अगाऊपणानं काही प्रश्न विचारून तिची बोलण्याची लिंक तोडत बसत.

'वॉट इज द् आऊटलूक ऑफ द् पिपल ऑफ स्वित्झर्लंड टूर्डस् इंडिया?' अशासारखा एकदम प्रसंगाला न शोभणारा प्रश्न विचारून किंवा 'दूरवर दिसणाऱ्या एखाद्या उंच इमारतीकडं बोट दाखवून 'वाट इज डॅट टॉल बिल्डिंग?' अशासारखे प्रश्न विचारत. पटेल कपाळाला हात लावून म्हणे, 'काय करावं या गर्गला समजत नाही! ही टूर त्यांच्या एकट्यासाठी नसून या चाळीस लोकांसाठी आहे हे केव्हा समजणार यांना? गर्ग हा दिल्लीकडचा अगरबत्तीचा व्यापारी होता. या प्रवासात म्हणे भारतीय अगरबत्तीला युरोपियन किंवा अमेरिकन बाजारपेठ मिळते की काय हे त्यांना अवलोकन करायचे होते! पण आमच्यासोबत ते गृहस्थ सतत एक महिना होते, पण एकदाही त्यांनी तसा प्रयत्न केल्याचे मला आढळून आले नाही.

चालू गाडीत ड्रायव्हरशी बोलू नये हा नियम अगदी सर्वसामान्य माणूस–देखील जाणू शकतो. पण गर्गमहाशय डॅनीच्या कानाजवळ तोंड नेऊन एकसारखे त्याला विचारत, 'नाऊ हाऊ फार वुई आर फ्रॉम आवर हॉटेल? वॉट इज द् नंबर ऑफ धिस हाय वे?'

मला त्या गृहस्थाच्या अगाऊपणाची इतकी चीड यायची, पण माई मला गप्प बसवत. मी म्हणायचो, 'या अगाऊ माणसाला पुढची सीट कधी मिळता कामा नये. ड्रायव्हरचं कॉन्सेंट्रेशन बिघडवून केव्हातरी अपघात घडेल!'

समोरून मोटार–कॅरियर्स जायच्या. एकावेळी आठ–दहा मोटारी नेणारं वहान बघितलं की आमच्यासोबत आलेला 'छाबडा' नावाचा एक फौंटनपेन

कंपनीचा सेल्समन होता, तो गर्गचा ' चुलतभाऊ ' शोभून दिसत होता, तो गर्गला म्हणायचा, ' देखो गर्गसाहब, कितनी गाडीयाँ जा रही हैं, उसमेंसे एक उठावो और इंडिया लेके जाव. '

त्यावर गर्ग म्हणाला, ' हम इधरसे गाडी नहीं ले जा सकते ! '

' क्यूं नहीं ?'

इंडिया गवर्मेंट परमिशन नहीं देती. वो हमारी गवर्मेंट क्या गवर्मेंट है ? नई इंडस्ट्री शुरू करें तो भी टैक्स लगाती है. इतनी जादा टैक्स लगाती है, अरे भाई, वो इंडस्ट्री टॅक्स भर भरके डूब जाती है ! '

मी अंदाज केला, की बहुतेक श्रीमान गर्ग हे गेल्या सार्वत्रिक निवडणुकीत आपटी खाल्लेल्या कोणत्यातरी पक्षाचे कार्यकर्ते असावेत. कुटुंब नियोजन निरर्थक आहे असं त्यांनी एक विधान केले आणि आपल्या विधानाच्या पुष्टयर्थ ते वाद घालू लागले. कुटुंबनियोजनाला विरोध करणाऱ्यांना वाटतं की, भारत हा इतका प्रचंड देश आहे की, त्याच्या लोकसंख्येत आणखीन काही कोटींची भर पडली तर फारसं बिघडणार नाही. अशा लोकांच्या बुद्धीची कीव करण्यापलीकडं काय करता येणार आहे ?

दीडशे वर्षे भारत पारतंत्र्यात खितपत होता. जाताना कुटिल नीतीच्या ब्रिटिश राज्यकर्त्यांनी देशाची शकलं करून भारताला कधीही स्वास्थ्य न लाभावं या हेतूनं पाकिस्तानची निर्मिती केली. त्यात उत्तरेकडून चीननं आक्रमण केलं. देशात दरवर्षी कुठे दुष्काळ, तर कुठं पुराचं थैमान होतं आणि इतक्या नैसर्गिक आपत्ती येत असतानासुद्धा सक्तीचं कुटुंबनियोजन करायला काही राजकीय पक्षांचा कडवा विरोध का असावा ? कितीही उत्पादन वाढलं तरी, वाढती लोकसंख्या जोपर्यंत मर्यादित राहात नाही, तोपर्यंत कोणत्याही राजकीय पक्षाचं सरकार सत्तेवर आलं तरी त्याला या देशाचे प्रश्न कधीच सोडवता येणार नाहीत. पण इतक्या खोलवर जाऊन विचार करतोच कोण ? ' इंडिया गवर्मेंट क्या गवर्मेंट है ? परिवारको क्यूं रोखती है ? अशी गर्गसारखी विधानं करणारी माणसं बघितली की मला त्यांच्या बुद्धीची कीव करावीशी वाटते.

यूनोच्या इमारतीला जगातल्या सर्व राष्ट्रांनी उत्तमोत्तम साहित्य पुरवल्यामुळे ती इमारत अत्यंत आकर्षक अशी झालेली आहे. दुसऱ्या

महायुद्धानंतर अस्तित्वात आलेली ही संघटना जगातल्या सर्व राष्ट्रांत सामंजस्य निर्माण व्हावे समजुतीने एकमेकांच्या समस्यांची सोडवणूक व्हावी. शस्त्रबळाचा वापर टाळला जावा या उदात्त हेतूनं अस्तित्वात आलेली आहे. ही जागतिक संघटना आजपर्यंत तरी तिसरं महायुद्ध टाळायला यशस्वी ठरली आहे यात शंका नाही. पण नुकताच रिगन साहेबानं न्यूट्रॉन बॉम्ब बनवण्याचा निर्णय घेतला आहे. अर्थात हा बॉम्ब अमेरिका शांततेसाठी खासच निर्माण करीत नाही. उद्या रशियाही तोडीस तोड म्हणून तसलेच विध्वंसक अस्त्र तयार करील, न जाणो जगात तिसऱ्या महायुद्धाचा भडका उडेल.

व्हिएतनाम, इराण, इराक, अफगाणिस्तान अशा देशांत आपली ताकत अजमावण्याचा ही बडी राष्ट्रं एकसारखा उपद्व्याप करीत असतात. तेव्हा युनोची निर्मिती झाली म्हणून जगात शांतता प्रस्थापित झाली असं म्हणताच येणार नाही

वर्ल्ड हेल्थ ऑर्गनायझेशन, इंटरनॅशनल लेबर ऑर्गनायझेशन इत्यादी इमारतीही प्रचंड होत्या. जिनेव्हाच्या पश्चिमेस असलेल्या तलावात प्रचंड कारंजा होता. दोनशे फूट उंच पाणी उडवणारा तो कारंजा एका मिनिटाला सात टन वजनाचं पाणी आकाशात फेकत होता निळ्याभोर आकाशाच्या पार्श्वभूमीवर फेसाळत उंच उडणारा तो कारंजा मोहक वाटत होता. त्यानंतर कवी बायरन ज्या वास्तूत राहात होता ती वास्तू बघितली तिथं बायरनच्या स्मृत्यर्थ उभा केलेला शिलाखंड आहे. हे ठिकाण उंचावर असल्यामुळं इथून जिनेव्हा शहर आणि तलाव दोन्ही एकाचवेळी दिसत होते आंतरराष्ट्रीय महत्त्व प्राप्त झालेल्या त्या शहरात हवाई वाहतूक मोठ्या प्रमाणात होती. पूर्वेच्या विमानतळावरून आकाशात झेपावणारी विमानं त्या उंचवट्यावरून एकसारखी दिसत.

'मीनाक्षी' नं आमचा निरोप घेतल्यानंतर माई, उमेश, व मी तिघे पायी भटकत निघालो. वाटेत घड्याळाची खूप दुकाने दिसली पण घड्याळ खरेदी करायचे नसल्याने विंडो-शॉपिंग करत भटकत निघालो जिनेव्हा रेल्वे-स्टेशनवर आलो कोणाला वेळ घालवायला उत्तम ठिकाण हवं असेल तर ते भारतीय रेल्वेस्टेशन! गाडी गाठायच्या उत्सुकतेने हातातल्या बॅगा सांभाळत फलाटावरून

घाईघाईने जाणारी माणसं, व्हान पोरांना सावरत निघालेल्या त्यांच्या आया, हमालीबद्दल हुज्जत घालणारे लाल डगलेवाले हमाल, जगाच्या गोंगाटाकडे स्थितप्रज्ञ वृत्तीनं बघणारे टी. सी. रेल्वेच्या भाषेत संभाषण करणारे पोर्टर्स. ' तीनशे चार अडीच तास लेट ' आणि या सर्वांच्याकडं दुर्लक्ष करून ए ऽ ऽ च्याए गर ऽ ऽ म च्या ऽ ऽ ए ' करीत अंगापेक्षा ढगळ मळका खाकी कोट घालून हातात केटली आणि कपबशांची वादली घेऊन हिंडणारे चहावाले, ' पानपट्टी – विडीकाडीची ' ची ललकारी ठोकणारे फेरीवाले, बऱ्याच कालावधीनंतर माहेरला निघालेली पिवळ्या रसरशीत कांतीची एखादी तरुणी, तर त्याच वेळी सासरला जाताना रडून डोळे सुजलेली कन्या, तिला सोडवायला स्टेशनवर आलेली व मुलीची समजूत घालता घालता हुंदके देत असलेली आई ! किती म्हणून प्रकार सांगावेत ? तर रेल्वे स्टेशन हे खऱ्या अर्थानं कॉस्मोपॉलिटीनसुद्धा असतं अनेक जातींची, धर्मांची अन् पंथांची माणसं एकाच जाणिवेनं इथं जमतात– आपल्याला कुठंतरी दुसरीकडं जायचं आहे !

जिनेव्हा स्टेशन मात्र शांत होतं हातांत हात घालून स्टेशनवर फिरणारी काही जोडपी दिसली, तर प्रेयसी कुठं लांब जाणार होती म्हणून बाजूला उभं राहून तिचं प्रदीर्घ चुंबन घेणारा एक प्रेमवीर दिसला. भारतीय रेल्वे–फलाटावरचा आरडाओरडा, गोंधळ, धावपळ कुठेही दिसली नाही.

जिनेव्हात तीन दिवस मुक्काम होता. दुसऱ्या दिवशी दुपारी अडीच–तीन मैल पायी रपेट मारण्याच्या हेतूनं मी एकटाच बाहेर पडलो. फूटपाथवरून थेट हॉटेलसमोरचा रस्ता धरून चालत निघालो. अर्धा एक मैल चालून गेल्यानंतर रस्त्याच्या पलीकडे सरोवराचा किनारा दिसला. काही लोक गळानं मासे पकडायला आले होते. मला शिकार करणे जसे आवडते तसे मासे पकडणेसुद्धा खूप आवडते. गळाला बेट लावून तो गळ पाण्यात सोडल्यानंतर सारे लक्ष वरच्या तरंगत्या काडीकडे किंवा पंखाकडे असते, त्यावेळी माणूस इतका एकाग्र होऊन जातो की, त्याला संपूर्ण जगाचं विस्मरण झालेलं असतं त्या काडीची किंवा पंखाची हालचाल झाली की लगेच दोर खेचायचा. किती आकाराचा मासा येऊन बेट कुरतडतो आहे याची कल्पनाच नसते. मग एकदम दोर खेचल्यानंतर कधी मासा फक्त

' बेट ' खाऊन गेल्याचे दिसते, तर कधी बोटाएवढी लहान चिंगळी गळाला लटकत असते, तर कधी चमचम करणारा किलो, दोन किलो वजनाचा चांदीच्या रंगाचा मासा वर येतो. गळानं मासे पकडण्यातली ही अनिश्चितता इतकी मजेशीर असते की माणूस तासन्‌तास बसून राहिला तरी त्याला कंटाळा असा येतच नाही. काही लोक या प्रकारच्या छंदाला रिकामटेकडे-पणाचा छंद म्हणतात पण मला वाटतं, उगाच गावात जाऊन चकाट्या पिटणे किंवा कोणाची निंदानालस्ती करीत आयुष्याचा वेळ खर्ची घालण्यापेक्षा गळानं मासे धरण्यात रिकामा वेळ घालवणे निश्चितच चांगलं

सांगण्याचा हेतू एवढाच की, रस्ता ओलांडून मला पलीकडे लोक गळानं मासे धरत होते ते पाहायला जायची तीव्र इच्छा झाली. पण रस्ता ओलाडणं अशक्यप्राय होतं इतकी वाहनं त्या रस्त्यावरून धावत होती आणि तीसुद्धा तासी साठ सत्तर मैल वेगानं. मला रस्ता ओलांडण्याचा धीर काही केल्या झाला नाही. मनाशी विचार केला, पळत जाऊन रस्ता क्रॉस करण्याचे धाडस केलेच आणि दुर्दैवानं वाटेत पाय घसरून पडलो, तर या परक्या ठिकाणी काय हाल होतील माझे ? अजून निम्मा युरोप पाहायचा होता. पूर्व-पश्चिम अमेरिका बघायची होती तेव्हा गळानं मासे धरण्यापेक्षा आयुष्यात कधीही न पाहिलेला प्रदेश धड अवयवांनीपाहणं महत्त्वाचं होतं. रस्ता न ओलांडताच मी हॉटेलकडं परतलो येताना समोरून जाणारी माणसं ओळख-पाळख नसतानासुद्धा स्मित करून ' विश् ' करत. पुढे अमेरिकेत न्यूजर्सीला मला कुत्रं फिरायला घेऊन चाललेली एक तरुणी अशीच विश् करून हसली होती ती इतकी मोहक हसली, की पुढे तीन-चार दिवस तिची ती सुहास्यवदन मुद्रा डोळ्यासमोरून हलली नाही. दुसऱ्या दिवशीही ती भेटेल म्हणून त्याच रस्त्याने गेलो, पण ती भेटली नाही. पुन्हा या जन्मात देखील ती भेटणार नाही पण मी मात्र ते स्मित कधीच विसरणार नाही

जिनेव्हाचा निरोप घेऊन आमची बस ल्यूसर्नच्या दिशेनं चालली होती.

ल्युसर्न हे सुद्धा स्वित्झर्लंडमधील अतिशय आकर्षक असे शहर आहे. ल्युसर्नचा उच्चार ल्यूझर्न असाही करतात. ल्युसर्नला आम्ही पोहोचलो तेव्हा दुपारचे बारा वाजले होते फक्त एकच रात्र तिथं मुक्काम करावयाचा असल्यानं

पटेलनं गावच्या मध्यभागी बस उभी केली आणि सर्वांना सांगितलं, 'तुमच्यापैकी कोणाला मार्केटिंग करायचे असले तर करून घ्या. आणि बरोबर तीन वाजता सर्वांनी इथंच जमा व्हायचं. तीन म्हणजे बरोबर तीन. तीन वाजता इथूनच बस तुम्हाला हॉटेलवर घेऊन जाईल. तुमच्यापैकी कोणी जर वेळेत इथं आले नाही तर मी जबाबदार नाही.'

पुन:पुन्हा बजावून सांगितलं तेव्हा मला वाटलं इतकं सांगितल्यानंतर कोणीही अशा ठिकाणी भरकटत जाणार नाही. ज्या ठिकाणी आम्हाला सोडलं होतं, त्या ठिकाणी बस पार्किंग करता येत नव्हती. डॅनी दुसरीकडे जाऊन बस पार्किंग करणार होता. बरोबर तीन वाजता तो आम्हाला घ्यायला येणार होता.

ज्या ठिकाणी आम्हाला सोडलं, त्या ठिकाणी सर्वत्र घड्याळांची दुकानं होती. त्यांत कॉक वॉचेस बरीचशी होती. 'कॉक वॉच' म्हणजे घड्याळावर एक कोंबडा आणि एक कोंबडी दाणे टिपत असल्याचे दृश्य होते. आपल्याकडे घड्याळाचा लंबक हलतो आणि टकटक् सुरू होते, तसेच ते कुक्कुटयुगुल एका छोट्या घरावर बसून दाणे टिपल्याची ॲक्शन करी. त्या घड्याळाची किंमत फक्त चार डॉलर्स म्हणजे जवळ जवळ छत्तीस-सदतीस रुपये इतकी होती 'शिवाय काचेच्या डोमखाली वर्तुळाकार फिरणारी चकचकीत अशीही खूप घड्याळं होती. मनगटी घड्याळांचे अनेक प्रकार होते, पण आम्हा तिघांनाही घड्याळ घ्यायचेच नसल्याने पुन्हा विंडो-शॉपिंग करीत आम्ही एका गल्लीत शिरलो. जिनेव्हात सकाळी ब्रेकफास्ट केला होता. तेव्हा ल्युसर्नला उतरल्यावर भूक लागली होती त्या गल्लीत गरम गरम हॉट डॉगचा एक छोटा स्टॉल होता.

आपल्याकडं रस्त्यावर उभं राहून खाणं किंवा चालता चालता खाणं शिष्टाचाराला सम्मत नाही. पण युरोप आणि अमेरिकेत असला खोटा शिष्टाचार पाळत नाहीत. घरीसुद्धा मला एके ठिकाणी बसून जेवताच येत नाही. हातात प्लेट घेऊन मागे चौकात जाणे किंवा माडीवर गच्चीत उभं राहून जेवणे मला फार आवडते. माझ्या वागण्यावर माई नेहमी रागावतात : 'असं काय हे लहान पोरासारखं वागता ?

लोकांनी बघितलं तर काय म्हणतील ?'

मी त्यांना म्हणे 'मी कोणालाही उपद्रव न देता जेव्हा एखादी गोष्ट करतो तेव्हा लोकांना काय वाटेल याचा मुळीसुद्धा विचार करत नसतो' त्याचप्रमाणं घरात पापड किंवा कांद्याची भजी तळली जात असताना पटकन एखादा पापड किंवा भजी उचलून त्यांना म्हटलं तरी त्या माझ्या अशा खाण्याच्या सवयीवर नापसंती व्यक्त करायच्या पण इथं सगळेजण रस्त्यानं खात-खात जात असलेले पाहून मला भारी संतोष झाला.

त्या स्टॉलवरच्या पोरीनं लंबूडक्या पावाला चाकूनं कापून त्यावर टॉमेटो केचअप पसरले आणि उकळत्या पाण्यातला गरम्याचा क्युबासा त्यामध्ये घालून माझ्या हातात दिला. तो गरम गरम हॉट डॉग खात खात आम्ही त्या गल्लीतून जात असताना मी म्हणालो, 'माई, चालता-चालता खाण्यात काय मजा असते बघा! आता परत कोल्हापूरला गेल्यावर मी फिरत फिरत जेवू लागलो तर रागावत जाऊ नका!'

त्यावर माई चटकन् उद्गारल्या, 'हे युरोप आहे. हॉट डॉगसारखं खाद्य चालता चालता खाल्लं तर बिघडत नाही. पण हिंदुस्थानात आमटी, पातळ भाजी, भाकरी असले पदार्थ हिंडत फिरत खाणं योग्य नाही! इथं जे शोभतं ते तिथं शोभेलच असं नाही. 'रोममध्ये गेल्यानंतर रोमन लोकांसारखं वागायला हवं' ही म्हण विसरलात वाटत ?'

मी आपला निमूटपणानं हॉट डॉगचा शेवटचा घास गिळून टाकला-ओठावर आलेलं टॉमेटो केचअप जेवण झाल्यावर लोणचं चाखतात तसं चाखलं आणि बाजूला असलेल्या पाण्याच्या नळाकडं गेलो. लाखंडी हरणाच्या तोंडातून पाण्याची धार पडत होती. फिल्टर केलेलं ते पाणी अतिशय गोड होतं त्यावेळी मला आपल्या काश्मिरमधल्या चश्मशाही उद्यानातल्या पाण्याची चव आठवली. चश्मशाही उद्यानातलं पाणी फक्त गोडच आहे असं नाही, तर त्यात खूप औषधी असे गुण आहेत. स्व. पंडित जवाहरलाल नेहरू यांच्यासाठी म्हणे रोज विमानानं दिल्लीला दोन घागरी पाणी जायचं! खरं खोटं कुणास ठाऊक, पण वयाची पाऊणशे वर्षे अत्यंत 'ॲक्टिव्ह' असे जीवन जगलेल्या जवाहरलालजींची गुलाबी कांती आणि

अदम्य उत्साह यांचं गूढ अनेकांना उकललेलं नाही. कोणी म्हणतात ते रोज पहाटे योगासनं करीत. ते नित्यनियमानं पोहत हे मात्र मला समजलं होतं एकदा जवाहरलाल सोलापूर जिल्ह्यात एका कार्यक्रमासाठी आले होते. तेव्हा त्यांच्या संरक्षणासाठी असलेल्या पोलीस इन्स्पेक्टरनी—श्री. केदारी यांनीच — मला ती हकीगत सांगितलेली होती जवाहरलालजींनी त्यांना विचारलं,

'इधर तैरने के लिए तालाब नहीं तो अच्छी बावडी है ?'

'जी, तलाश करता हूँ !' केदारींनी उत्तर दिलं,

जीप घेऊन केदारी इन्स्पेक्टर तलाव किंवा संरक्षित अशी विहीर शोधायला बाहेर पडले. तलाव खूपच दूर होता. पानगावच्या हद्दीत एक विहीर मात्र आढळली दगडी, बांधीव आणि शेवटपर्यंत पायऱ्या असलेली विहीर सुरक्षित आहे की नाही याची केदारींनी कसून पाहणी केली. कारण लाख नव्हे, तर कोटी मोलाचा जीव त्यात पोहण्यासाठी उतरणार होता

जवाहरलालजींनी पोहण्याचे कपडे सोबत घेतले. केदारी इन्स्पेक्टर ड्रेसमध्ये होते. विहिरीच्या काठावर त्यांनी फक्त आपल्या पायातले बूट काढले आणि नेहरूंच्या पुढे हळूहळू एकएक पायरी उतरून आले. नेहरूंनी पोहण्याचा ड्रेस चढवला आणि केदारींना विचारलं,

'आपको तैरने को आता नहीं ?'

'जी, आता है । लेकीन मै यहाँपर ठहरूंगा !'

'अच्छी बात है !' असं म्हणून नेहरू त्यांच्याजवळ आले आणि त्यांनी केदारींना चक्क पाण्यात ढकलून दिले—ड्रेसासकट ! केदारी पोहत काठावर येत असता नेहरू पोट धरून हसत होते. नंतर नेहरूंनी पाण्यात सूर मारला. खूप मनसोक्त पोहले भारताच्या या चिरतरुण पंतप्रधानांची ती आठवण सांगताना केदारी इन्स्पेक्टरांचे डोळे ओलावले होते तर हे सारं मला आठवलं ल्यूसर्नच्या चविष्ठ अशा पाण्यावरून ! ही आठवण तिथं येण्याचं दुसरं कारण म्हणजे नेहरूंना स्वित्झर्लंड फार आवडायचं काश्मिरशी त्या देशाचं असलेलं साधर्म्य हेही एक कारण आहे.

ल्यूसर्नच्या मध्यभागी जिनेव्हाप्रमाणंच प्रचंड सरोवर आहे. या सरोवरात राजहंसांचे थवेच्या थवे आहेत रानटी बदकंदेखील खूप आहेत प्रवासी लोक

खाद्यपदार्थ देतात म्हणून माणसाळलेले राजहंस आणि बदकं तुमच्या इतक्या जवळ येतात, की चक्क तुमच्या तळहातातले पॉपकॉर्न आपल्या पोवळ्याच्या रंगाच्या चोचीनं अलगद उचलतात. उमेशनी खांद्याचा कॅमेरा काढून ल्यूसर्नच्या तलावाचे दोन तीन फोटो टिपले. तलावाच्या पूर्वेला प्रचंड असा पहाड होता. पहाडावरून ढगांचा समूह वहात चालला. तो वाहून गेल्यानंतर पर्वताच्या माथ्यावरचा हिमथर स्पष्ट दिसू लागला. तलावात लाँचेस, मोटर बोटस् आणि 'फेरी' होत्या. एक जंगली बदकीण आपली पिलावळ घेऊन काठाकाठानं ' क्वॅक् क्वॅक् ' करीत पिलांना भक्ष टिपण्याचे शिक्षण देत होती.

अडीच वाजता आम्ही डॅनीची बस येणार होती त्या ठिकाणी पोहोचलो. रस्त्यावरून एकसारखी वाहतूक सुरू होती. रस्ता ओलांडायच्या ठरावीक ठिकाणी आम्ही पोहोचलो. आणि एक पंधरा–सोळा वर्षाचे पोर जोरजोराने ओरडून आक्रोश करू लागले. आमच्या नजरा त्या दिशेला वळल्या. तो मुलगा रस्त्यावरच्या लाल दिव्यांच्या इशाऱ्यामुळे सायकलवरून जाताना थांबला होता. मागून येणाऱ्या एका फोर्ड गाडीनं त्याला जोराची धडक दिली होती. त्या ड्रायव्हरने ब्रेक दाबला होता, पण त्याच्या अंदाजापेक्षा त्याची गाडी थोडी अधिक पुढे गेली होती. त्या मुलाच्या थांबलेल्या सायकलला गाडीने उडवले होते. त्या धक्क्याने मुलगा खाली कोमळला आणि ती सायकल त्याच्या छातीवर पडली.

ही घटना घडताच तेथे कोठूनतरी एक पोलीस वायुवेगानं धावत आला, मुलाच्या अंगावरची सायकल दूर करता करताच पोलीस हातातल्या वॉकीटॉकीवर बोलत होता. जमलेल्या लोकांपैकी एका दोघांनी पोलिसाला सायकलखाली सापडलेल्या मुलाला बाजूला करायला मदतही केली. तीन मिनिटांच्या आत तिथं पोलिसांची एक व्हॅन सायरन वाजवत आली. व्हॅनमधून उतरलेल्या पोलिसांनी भराभर अंगात भगवे कोट चढवले. आणि त्यांनी मुलगा पडल्याचे ठिकाण, गाडीचे ब्रेकमार्कस् यांची पटापट मापे घेतली. इतके होते न होते तोच पाठोपाठ अँम्ब्युलन्सही त्या जागेवर येऊन थांबली. स्ट्रेचर घेऊन दोन लोक तात्काळ घटनास्थळी आले. त्या मुलाच्या छातीला बराच मार लागला होता त्याला अगदी फुलासारखे उचलून

स्ट्रेचरवर घातले. स्ट्रेचर गाडीत ठेवला. आणि ती ॲम्ब्युलन्स परत सायरन वाजवत हॉस्पिटलकडे निघून गेली. तिथं थांबलेल्या पोलिसानं अपघातास जबाबदार असलेल्या ड्रायव्हरला गाडी बाजूला घ्यायला सांगितली. बरोबर साडेचार मिनिटं थांबलेली वाहतूक पुन्हा पूर्ववत सुरू झाली. हा प्रकार आम्हा भारतीयांना अगदीच अनोखा होता. मुंबईत बसचा किंवा टॅक्सीचा धक्का लागून गतप्राण झालेल्या प्रेताला ते कुत्र्याचे शव आहे इतक्या निर्दयतेने बाजूला करून सारे व्यवहार सुरळीत चालू असतात. जो किंवा जी मेली त्याला जबाबदार कोण होता, याची चौकशी करायला पोलीस आलाच तर, साधारण तीन–चार तासानं येतो. मग तो साक्षीदार बोलावतो, पण त्यावेळी ती घटना पाहणारा एकहीजण हजर नसतो. मग पोलीस 'टेपनं मापं घेतो, पंचनामा करतो, पण त्या अनोळखी व्यक्तीच्या मृत्यूला जबाबदार असणारा आरोपी एव्हाना वांद्रा किंवा माहीमला सुरक्षित जागी पोहोचलेला असतो हे असं का व्हावं ? उत्तर अगदी साधं आणि सोपं आहे. ल्यूसर्नमधल्या शासनसंस्थेला नागरिकांच्या जीविताचं मोल वाटतं भारतात पशूंशी स्पर्धा करून वाढवलेल्या लोकसंख्येनं मानवी जीवनाचं मोल शून्य केलेलं आहे. इथं माणूस जगला काय किंवा मेला काय, इतर नागरिकांना किंवा सरकारला कोणालाच त्याचं सोयरसुतक वाटत नाही. धक्का लागून गतप्राण होणारा माणूस. एखादा हमाल असो किंवा मुंबई हायकोर्टातले चीफ जस्टिस असोत. न्यायमूर्ती चैनानी मरिन ड्राईव्हवरून रस्त्याकडेने फिरायला जात असताना भरधाव जाणाऱ्या टॅक्सीवाल्याने त्यांना ठोकरले. न थांबताच तो ड्रायव्हर निघून गेला. न्यायमूर्ती चैनानी यांना बेशुद्धावस्थेत हॉस्पिटलकडे नेण्यात आले. त्यांच्यावर इलाज करण्यात आले. पण काहीही उपयोग झाला नाही. मृत्यूने त्यांच्यावर अखेर झडप घातली. मी जयसिंगपूरला पोलीस प्रॉसिक्यूट असताना न्यायमूर्ती चैनानी कोल्हापूर जिल्ह्याच्या इन्स्पेक्शन–साठी आले होते आणि त्यांनी जयसिंगपूर कोर्टाला भेट दिली होती माझा त्यांचा त्यावेळी परिचय करून देण्यात आला होता पुढे त्यांच्या या अपघाती निधनाची वार्ता समजताच मी फार हळहळलो. रोज जगात असंख्य माणसं मरतात पण नुकतेच परिचय झालेले न्यायमूर्ती चैनानी यांच्या निधनाने मन विषण्ण झाले होते तर हे सर्व सांगण्याचं प्रयोजन एवढंच की या देशात

जन्माला येणाऱ्या व्यक्तीच्या जीविताचं बिलकूल मोल उरलेलं नाही

डॅनीनं ठरावीक जागी गाडी आणून उभी केली. चाळीसपैकी एकोण-चाळीस लोक गाडीत चढले एकजण बेपत्ता होते. ते गृहस्थ होते मेढी ! पुण्याचे कॉन्ट्रॅक्टर.

मेढी हे डॉक्टर होशिंग व डॉक्टर चव्हाण यांच्या समवेत राहात असत तेव्हा साहजिकच डॉक्टर होशिंग यांच्या पत्नी चिंताग्रस्त होऊन उद्गारल्या, ' अगं बाई, काय करायचं ? मेढी हरवले. ' डॉक्टर होशिंग मेढींना शोधण्यासाठी जागेवरून उठू लागले तेव्हा लीलावहिनी त्यांच्या बुशकोटची बाही पकडून म्हणाल्या, ' तुम्ही कुठं चाललात ? इथली काय तुम्हास माहिती आहे ? गप्प बसून राहा !'

चव्हाण डॉक्टर म्हणाले, ' मी पाहतो मेढी कुठं दिसतात का ?' त्यावर मात्र लीलावहिनी म्हणाल्या, ' हो पहा हो डॉक्टर, काय करायचं बाई ? अशा अनोळख्या ठिकाणी भरकटत जाऊ नका असं बजावूनसुद्धा मेढी गेले आणि हरवले '

मी हा सारा प्रकार अगदी बारकाईनं न्याहाळत होतो नंतर प्रवासात मी लीलावहिनींना सारखा चिडवत होतो. 'आपले पतिराज शोधायला निघाले तेव्हा जाऊ दिले नाहीत डॉक्टर चव्हाण निघाले तेव्हा मात्र गप्प बसलात. मेढींच्या मागोमाग चव्हाण हरवले असते तरी चाललं असतं ना ?'

या प्रवासात जसे काही खत्रूड, बडबड करून इतरांचं डोकं उठवणारे प्रवासी भेटले तसच डॉ. होशिंग, डॉ चव्हाण यांच्यासारखे गप्पा-विनोदानं प्रवासाचा शीण जाणवू न देणारे सुहृद असे मित्रही भेटले. पुढे अमेरिकेत मी लीलाताईंनी आपल्यांत एक सुप्त असा पैलू दाखवला त्या उत्तम अशा शास्त्रोक्त गायच्या डोळे बंद करून त्या गझल गायच्या त्यावेळी त्यांनी मारलेली तान गझलसम्राज्ञी बेगम अख्तर यांची आठवण करून द्यायची. लीलावैनींचं बालपण ग्वाल्हेरमधे गेलं होतं आणि त्यामुळंच ग्वानदानी अशी गायकी त्यांच्या रक्तात भिनलेली होती सोलापूरसारख्या कापडगिरण्यांचं केंद्र असलेल्या शुष्क औद्योगिक शहरात अनेक वर्ष वास्तव्य करूनही लीलावैनींनी आपली शास्त्रोक्त गायकी जोपासली होती हे विशेष होतं

ल्यूसर्न शहर हे डोंगराच्या कुशीत वसलेलं अतिशय टुमदार व स्वच्छ

शहर होतं. आमच्या हॉटेलजवळून नदी वाहत होती ती गावच्या मध्यभागी असलेल्या सरोवराला जाऊन मिळाली होती. हॉटेलच्या खिडकीतून दक्षिणेला डोंगरावर एक सफेद रंगवलेली प्रचंड इमारत दिसत होती इमारतीवर स्वित्झर्लंडचा ध्वज फडफडत होता. त्या खिडकीजवळ उभं राहून खळखळ वाहणारा नदीचा तो स्वच्छ असा प्रवाह अवलोकन करताना सहज विचार आला– गावच्या मध्यभागातून वाहणाऱ्या या नदीचं पाणी इतकं स्वच्छ कसं ? कोल्हापूरला कळंब्यातून उगम पावलेला जितीचा नालाही असाच नेहमी वाहतो पण त्या नाल्याला प्रचंड ' गटार ' हेच नाव अधिक शोभून दिसेल. आमच्याकडे आमचे स्थानिक पुढारी, महापौर किंवा उपमहापौर म्हणून निवडून आले की आपलं शहर सुंदर बनवण्याची जाहीर प्रतिज्ञा घेतात. पण प्रत्यक्षात काय करतात ते तुम्ही पाहात असताच ! रस्त्याच्या. इमारतींच्या कंत्राटामधे किती ' गाळा ' काढता येईल याशिवाय दुसरा कोणताच विचार त्यांच्या डोक्यात नसतो. जोपर्यंत या देशात सत्ता स्वार्थासाठीच राबवायची या हेतूनं माणसं राजकारणात पडतात तोपर्यंत आमच्या देशाचा उत्कर्ष होईल हे स्वप्न उराशी बाळगण्यात काही अर्थ नाही

संध्याकाळी ल्यूनर्सला गारठा जाणवू लागला मग कॉनॅक ( Cognack ) ब्रँडीचा एक छोटा पेग भरून मी पुन्हा खिडकीजवळ येऊन सिगारेट शिलगावली. संध्याकाळपर्यंत ढगाळ असलेले आकाश निवळत चालले बघता बघता ते स्वच्छ झाले. सूर्यास्तानंतर अर्ध्या-पाऊण तासातच तारे लुकलुकू लागले ' कॉनॅक ' नं चांगलीच भूक लागली होती. अंगात उलनचं स्वेटर चढवून आम्ही डिनरसाठी हॉटेलमधल्या डायनिंग हॉलकडं चाललो

दुसऱ्या दिवशी ल्यूसर्न सोडताना वाईट वाटलं ल्यूसर्नचं श्रीनगरशी फारच साधर्म्य आहे. ल्यूसर्न लेकनं मला दल सरोवराची आठवण करून दिली अन् तिथल्या छोट्या छोट्या लॉंचेस मला ' शिकाऱ्यांची (शिकारा ही काश्मिरमधली छोटे छप्पर असलेली होडी) याद करून देत होत्या दल सरोवराभोवती चश्मेशाही, निषाद, शालिमार अशी प्रचंड उद्याने होती आणि इथं ल्यूसर्नलासुद्धा तलावाभोवताली अनेक रंगांचे गुलाब उमललेली उद्यानं होती. तलावाभोवतालचे प्रचंड हिमपर्वत कपाळाला भस्म लावून

ध्यानस्थ बसलेल्या ऋषि-मुनींची आठवण करून देत होते. स्वित्झर्लंडला येताना घाटमाथ्यावर निळ्या फ्राकमधली ती लावण्यवती जशी दीर्घकाल विसरता येणार नाही, तद्वत्‌च, ल्यूसर्नची स्मृतीही सहजासहजी पुसली जाणार नाही.

ल्यूसर्न सोडल्यानंतर आमची बस पश्चिम जर्मनीच्या दिशेनं धावू लागली. पुन्हा तीच वाऱ्याच्या झोतावर डोलणारी हिरवीगार गव्हाची शेतं, शेतं संपली की हिरवी मखमल घट्ट ताणून बसवल्यासारख्या दिसणाऱ्या टेकड्या, टेकड्या संपतात न संपतात तोच पाईनची दाट झाडी सुरू व्हायची. झाडी बघितली की माझ्यातला ' शिकारी ' जागृत व्हायचा. भारतातली जंगलं आठवायची.

मित्रहो, आपल्यापैकी बऱ्याचजणांना कदाचित् कल्पना नसेल, लेखन, चित्रकला, प्रवास या छंदांसारखाच आणखीन एक छंद मी अगदी लहान–पणापासून जोपासलेला आहे आणि तो म्हणजे मृगया ! शिकार !

एखादं लँडस्केप काढताना, किंवा कादंबरीतलं गुंतागुंतीचं प्रकरण लिहिताना जसा माझ्यातला ' मी ' मी विसरून जातो. तद्वत्‌च विशाळगड, आंबा, गगनबावडा, राधानगरी या कोल्हापूर जिल्ह्यातल्या जंगल परिसरांत हातात रायफल घेऊन भटकताना मी स्वत:ला विसरून जात असतो. पण आपल्याकडे ' शिकार ' या छंदाविषयी फार गैरसमज आहेत. शिकार म्हणजे हिंसा, शिकार म्हणजे निष्पाप आणि निरपराध प्राण्यांची हत्या शिकार म्हणजे विध्वंसक वृत्ती वगैरे वगैरे दूषणं या छंदाला लावली जातात पण शिकार हा खरा मर्दानी शौक आहे शिकारी माणूस हा खरोखरच ' स्पोर्टसमन् ' असतो. बसलेलं जनावर मारणं अगर बेसावध प्राण्याला टिपणं हे निष्णात शिकारी वर्ज्य मानतो. जिम् कार्बेट हा जगप्रसिद्ध शिकारी होता. त्यानं शिकारीवर अप्रतिम असं साहित्य लिहून ठेवलं आहे. नरभक्षक वाघांचा तो कर्दनकाळ होता. त्यानं टिपलेले नरभक्षक बिबटे आणि ढाणे वाघ यांची वर्णनं वाचताना अंगावर शहारे उभे राहतात एखादा वाघ निरपराध आणि निष्पाप अशा लोकांचे प्राण घेऊ लागला तर, तो प्रार्थना म्हटल्याने दूर निघून जात नसतो त्याला कात्रेबाजपणाने मस्तकावर गोळी झाडून टिपावे लागते आमच्या देशात एक काळ अहिंसेचे इतके स्तोम

माजवले गेले की त्यामुळं देश नेभळट आणि दुबळा होऊन गेला आहे दुबळ्यांच्या अहिंसेला काडीची किंमत नसते. चीनने उत्तरेकडचा हजारो मैलांचा प्रदेश व्यापला किंवा पाकिस्तानने कच्छच्या भागात अतिक्रमण केले, की आपण जोरदार निषेध-खलिते पाठवतो. या कागदी ' सुरळ्या ' कुरापत काढणाऱ्यांचे ' बालही ' वाकडे करू शकत नाहीत. पाकिस्तान, चीन किंवा रशियाच्या हद्दीत का अतिक्रमण करत नाही ? उत्तर सरळ आणि सोपं आहे बलवान आणि शक्तिशाली माणसाच्या वाटेला कोणी जात नसते.

शिकार हा माणसातलं पौरुषत्व सतत जागृत ठेवणारा छंद आहे. उसाच्या फडांची नासाडी करणारा एक्कूल (डुक्कर) टिपायलाच हवा, गरीब धनगरानं आपल्या बिघाभर रानात पेरलेल्या नाचण्याची कणसं चघळणाऱ्या गऊरेड्याला ठोकायलाच हवा. त्याचप्रमाणं काही पक्ष्यांच्या बाबतीतही शिकार समर्थनीय ठरते स्टारलिंग्ज म्हणजे भोरड्या. हे पक्षी अक्षरशः लाखोंच्या संख्येनं ज्वारीच्या कोवळ्या कणसांवर तुटून पडतात. कुरकुंजे नावाचे बगळ्यासारखे पक्षी मध्यरात्र गाठून करडीच्या पिकात शेकडोंच्या संख्येनं उतरतात आणि त्या शेतात करडीचं पीक उभं होतं की नव्हतं असं करून टाकतात. शिवाय या पक्षाचं मांस अतिशय चविष्ट असतं

उस्मानाबाद जिल्ह्यात परंड्याजवळ ' चांदणी ' तलाव आहे. या तलावाकाठी फेब्रुवारी–मार्चच्या सुमारास ' कुरकुंजे ' हे पक्षी शेकडोंच्या थव्याने उतरतात. तिथं ' वाकडी ' नावाचं एक गाव आहे त्या वाकडीचा दशरथ पाटील मी कुरकुंजे मारायला गेलो तेव्हा मला सांगत होता, ' काय सांगू ऽऽ सायेब, तीन एकरांत मी करडी केली हुती. करडी कापाया आली म्हनून मी कापनीसाठी बायामानसं सांगितली. दुसऱ्या दिशी तांबडं फुटायला रानाकडं गेलो, तर रानात करडीचं एकबी रोपाट हुवं नव्हतं. रातच्याला कुरकुंज्या उतरल्या हुत्या आनि माजं सारं सारं रान सप्पा करून टाकलं ! '

' मग तुम्ही रानात वस्ती करायची होती ? ' मी विचारलं

' आवो, वस्ती करत हुतो म्हनून तर ते राह्यलं. पर कापनी करायची म्हनून जोडनी करायला एकच रात गावात गेलो, तर का ह्यो घोळ करून

ठिवला वगा ! ठोकाच्या बायलो मी ! दूर नदीच्या बेटावर बसलेल्या कुरकुंज्यांच्या थव्याकडे बोट दाखवून दशरथ पाटील म्हणाला.

त्या दिवशी मी पाच कुरकुंजे उडवले. त्यातला एक दशरथ पाटलाला न्यायला दिला. कुरकुंजीचं मटण अतिशय चविष्ट असतं कुरकुंजी बनवताना चमचाभरसुद्धा तेल घालावं लागत नाही, इतकी कुरकुंजीला चरबी असते

या ' कुरकुंज्या ' अतिशय चाणाक्ष असतात. पाण्यात जिथं बेटासारखी टेकडी असेल, तिथंच उतरतात. सगळे कुरकुंजे आराम करतात तेव्हा एखादा कुरकुंजा ' वॉचमन 'सारखा सगळीकडे मान फिरवून धोक्याची चाहूल घेत असतो. त्याला थोडी जरी शंका आली तरी ' कॉर कॉर ' करून तो आपल्या आराम करणाऱ्या इतर जातभाईंना जागरूक करतो. माणसाचा वारादेखील ही जात पाहून घेत नसते. कोवळा हुरडा आणि करडी याचं कुरकुंजे दर वर्षी अतोनात नुकसान करतात तेव्हा शिकारीच्या बाबतीत मी एक तत्त्व ठरवलेलं आहे. उपयोगी आणि उपद्रवी पशुपक्ष्यांना टिपणं हे समर्थनीय आहे काही असे लोक मला भेटले की, त्यांना ' नॉनव्हेजिटेरियन फूड ' फार आवडतं, पण शिकार करणं आवडत नाही त्यांच्या मते कोंबडी किंवा बोकड कापणाऱ्या खाटकाला म्हणे पाप लागतं, खाणाऱ्याला नव्हे ! असल्या भोंगळ अहिंसावाद्यांची मला दया येते. श्वासोच्छ्वासाद्वारे जीवजंतूंची हत्या होते म्हणून नाकाला फडके बांधणारे काही अट्टल सावकार देणेकऱ्यांच्या बायकामुलांना कोर्टाची जप्ती नेऊन भर पावसात घराबाहेर खेचतात. त्यापेक्षा आपल्याला उपद्रव देणाऱ्या आणि उपयोगी असणाऱ्या पशुपक्ष्यांची शिकार करून खाणं हे निश्चितच समर्थनीय ठरेल.

जेव्हा आमची बस स्वित्झर्लंडचा जंगलमय प्रदेश ओलांडीत होती, तेव्हा आजूबाजूला कोणकोणते पक्षी दिसतात हे माझी नजर न्याहाळत होती. ' स्टारलिंग्ज ' विपुल दिसत होत्या. ' व्हाईट पिजन 'ची एखादी जोडी आमच्या मोटारीच्या बाजूने फडफडत, उडत जाताना दिसायची. आकाशात तरळणारे फाल्कन्स ' ( बहिरी ससाणे ) दिसायचे. अधून–मधून जेट विमानासारखा लांब मान करून उंचावरून उडत जाणारा जंगली बदकांचा थवाही दिसायचा. मला बदकांवरून आठवलं, व्हिसा किंवा पासपोर्ट न घेता सतत जगभर प्रवास करणारी ही जंगली बदकं म्हणजे एक आश्चर्य आहे.

सैबेरियातून किंवा रशियातून जशी बदकं भारतात येतात, तशीच ती युरोपमधून आशिया खंडातल्या अनेक देशांत येतात. आणि ही काही ऐकीव बातमी नव्हे. तर बदकं जगभर कुठेकुठे प्रवास करतात याचा अभ्यास करण्यासाठी तज्ज्ञांनी वेगवेगळ्या ठिकाणी फासे लावून ही जंगली बदकं पकडली व त्यांच्या पायात लहान पितळी बिल्ले लावले. त्या बिल्ल्यांवर ती ज्या देशांत पकडली त्या देशाचे नाव आणि तारीख उठवली होती जगभर सीझनला बदकांची शिकार करणाऱ्यांना आवाहन करण्यात आले की, अशी पायांत पितळी बिल्ले असलेली बदकं टिपली गेली तर, ते बिल्ले आपल्याकडं पाठवण्यात यावेत. सैबेरियात बिल्ला अडकवलेली बदक भरतपूरला टिपली गेली होती. भरतपूर म्हणजे बदकांचं आगर ! जगात बदकांच्या जवळ जवळ अडीचशे ते तीनशे जाती आहेत. आणि बदक हा पक्षी ताशी तीनशे मैल वेगानं उडत असतो. जंगली बदकांची शिकार करणं हा ' येरागबाळ्याचा ' छंद नोहे !

स्वित्झर्लंडच्या परिसरात असलेल्या प्रचंड सरोवरात बदकं अंडी घालतात आणि तिथंच ती उबवली जातात. दुसरं बदकांचं आणखीन् एक वैशिष्ट्य म्हणजे, ही बदकं नेहमी जगातल्या ज्या विभागात जातात, त्याच विभागात प्रत्येक सीझनला जातात. आपली पिलावळ मोठी झाली की त्यांनाही त्याच विभागात घेऊन जातात

आता बदक या पक्ष्याची ज्याला ' टेस्ट ' आहे तो बदकाच्या मटणाचे अनेक पदार्थ बनवत असतो आमच्याकडे ' रोस्टेड डक ' किंवा ' डक् पिकल ' मी नेहमी बनवत होतो. अलीकडं उमेश बदकांची चायनीज डीश बनवतात —' चाऊमेन डक ! ' असो

बस स्वित्झर्लंडचा तो स्वर्गीय परिसर ओलांडून जर्मन सरहद्दीवर येऊन ठेपली. बॉर्डरवरच्या जर्मन पोलिसांनी आमचे पासपोर्ट पडताळून पाहिले. आणि आम्हाला ' वाँ व्हाँ ' केले. ( बॉन व्हाएज )

जर्मनी ! पॅरिसला पोहोचण्यापूर्वी काही काळ आमचे विमान फ्रँकफूर्टच्या विमानतळावर थांबले होते. जर्मनीच्या भूमीचा स्पर्श घडला होता पण आता प्रत्यक्ष जर्मन भूमीतून प्रवास करताना अनेक गोष्टी आठवल्या

सर्वांत प्रथम आठवला तो हर हिटलर ! दुसऱ्या महायुद्धात दोस्त

राष्ट्रांची झोप उडवणारा तो रणझुझार जर्मन सेनानी सारं जग एकीकडं झालं असताना इंग्लंड आणि अमेरिकेच्या साम्राज्यशाहीला सुरुंग लावणारा तो आर्यांचा अभिमानी मुत्सद्दी मला लहानपणी अतिशय आवडायचा त्याची दोन कारणं आहेत. पहिलं असं की, आमच्यावर राज्य करणाऱ्या ब्रिटिश सरकारचा तो कट्टर शत्रू होता. आणि दुसरं कारण म्हणजे, आमच्या सुभाषचंद्रांना त्यानं आश्रय देऊन आझाद हिंद फौज स्थापन करायला मदत केली. भारतीय स्वातंत्र्यसंग्रामाला पाठिंबा देऊन सुभाषचंद्रांना सुखरूपपणे पाणबुडीतून टोकिओला पाठवायला हा हर हिटलरच कारणीभूत ठरला होता

या हिटलरबद्दल त्यावेळी आम्हा शाळकरी मुलांच्या मनात नितांत आदर होता. माझ्या प्रत्येक वहीवर आणि पुस्तकावर मी हिटलरचे स्केच काढलेले होते. पुढं पुढं ते स्केच काढण्यात माझा इतका हात बसला की, मी डोळे बंद करूनसुद्धा हिटलरचे स्केच काढत असे. हिटलरचे स्केच आणि स्वस्तिकचं चिन्ह नाही अशी माझी एकही वही अगर पुस्तक सापडलं नसतं.

हिरोशिमावर अमेरिकेनं अणुबॉम्ब टाकला आणि दुसरं महायुद्ध संपलं. जर्मनीचा पराभव झाला, पण फ्रान्सच्या किनाऱ्यावरून थेट इंग्लंडवर तोफा आणि बॉम्बचा वर्षाव करणारा, आम्हा भारतीयांच्या पूर्वजांचं-आर्यांचं-रक्त स्वतःच्या नसानसातून वहात आहे असं म्हणणाऱ्या त्या जर्मन नेत्याबद्दल अजूनही माझ्या मनात नितांत आदर आहे. इंग्रजांनी आणि अमेरिकनांनी त्यानं केलेल्या ज्यूंच्या कत्तलीविषयी अनेक रक्तरंजित आख्यायिका प्रसृत केल्या. सत्तेचा समतोल ( Balance of Power ) राखण्याच्या नावाखाली जगातल्या सर्व देशांत हस्तक्षेप करणाऱ्या इंग्रज–अमेरिकन कुटिल नीतीचा, दंभाचा बुरखा फाडणाऱ्या हर हिटलरला त्रिवार अभिवादन ! जगातले अद्वितीय असे लढवय्ये सेनापती मला नेहमीच ' वंद्य ' वाटतात. अलेक्झांडर द ग्रेट, नेपोलियन बोनापार्ट, प्रिन्स बिस्मार्क, हर हिटलर, छत्रपती शिवाजी महाराज, सुभाषचंद्र बोस........

ज्या फ्रँकफूर्ट विमानतळावर आम्ही काही काळ थांबलो होतो, त्याच फ्रँकफूर्ट विमानतळाजवळून आमची बस फ्रँकफूर्ट शहरात गेली. त्यावेळी सायंकाळचे चार वाजले होते. डॅनीनं बस फ्रँकफूर्ट शहराच्या मध्यभागी

' इंडिया हॉटेल ' समोर उभी केली पटेलनं आपल्या नेहमीच्या स्टाईलमधे उभं राहून सांगितलं ' शामको ठीक आठ बजे बस फिर इधर आ जायेगी। आप लोग इधर थोडी देर साईट–सीईंग कर सकते हैं। लेकिन साडेसात बजे डिनरके लिए यही इंडिया होटलमें आना ! '

फ्रँकफूर्ट शहर मोठे असूनही आकर्षक असे दिसले. आम्हाला पटेलनं दोन–तीन तासांचा अवधी भटकायला दिला होता. समोरच ट्रॅमचं टर्मिनस होतं आम्ही तिघांनी विचार केला की, दोन तीन तास इथं हॉटेलभोवताली फिरत राहण्यापेक्षा ट्रॅमनं गावात फेरफटका मारून येऊ. पण ती ट्रॅम जाते कोणत्या दिशेनं आणि तिकडून परत सात वाजेपर्यंत इंडिया हॉटेलजवळ पोहोचायला दुसरी ट्रॅम मिळेल की नाही, याची चौकशी करण्यासाठी आम्ही टर्मिनसजवळ तोंडात पाईप धरून उभ्या असलेल्या साहेबाला इंग्रजीत विचारलं,

' सर, व्हेअर धिस ट्राम गोज ?'

त्यानं आमच्याकडं केविलवाण्या नजरेनं बघितलं. त्या सद्गृहस्थाला इंग्रजी समजत नव्हतं आम्ही अशा समजुतीत वावरत होतो की गोरा माणूस दिसला की, तो फाड फाड् इंग्रजीत बोलणारच. पण तो अस्सल जर्मन होता. तो हिटलरचा जवळचाच कोणीतरी नातेवाईक असावा असं मला वाटलं. कारण त्याच्या चेहऱ्यावर इंग्रजीबद्दलचा उमटलेला द्वेष दिसला. आम्ही म्हटलं, हा थोडचा जुन्या मताचा दिसतो दुसरं महायुद्ध सपून पस्तीस-छत्तीस वर्षं लोटली आहेत, आता इंग्रजी शिकणारी नवी पिढी निर्माण झाली असेल. म्हणून उंच टाचेचे बूट घालून ' टॉक टॉक ' करीत रुबाबात चालत येत असलेल्या एका तरुणीला ' एक्सक्यूज मी मॅडम ' करत थोपवलं आणि त्या रूटवरची ट्राम कोठे जाते हे विचारलं तिनंही आमच्याकडं चमत्कारिक नजरेनं बघितलं आणि जर्मन भाषेत काहीतरी पुटपुटली. बहुधा ' मला इंग्रजी येंत नाही ' असंच ती म्हणाली असावी.

जर्मन तरुण पिढी काय, किंवा जुनी काय, दोहोंनाही इंग्रज आणि इंग्रजां-बद्दल अतोनात द्वेष आहे. नंतर समजले, ते लोक चुकूनही इंग्रजी बोलत नाहीत. मला आपल्याकडं रेल्वेत चालणारी संभाषणं आठवली :

' त्याचं काय आहे मिस्टर रानडे आमच्या ब्रदर-इन लॉचा व्हिजिटेबलचा

बिझिनेस अगदी टॉप आहे. तो मला म्हणतो, सर्वीसमध्ये तू काय ढेकळं मिळवतोस ? माझ्या बिझिनेसमध्ये पार्टनर हो, एका वर्षात तू फियाट घेशील, वँड्र्याला फ्लॅट घेशील, टू बेडरूम, हॉल, किचन ....' तर कधी कधी हातात टाईम्स ऑफ इंडिया घेतलेले चष्मावाले मोठमोठ्यानं शेजाऱ्याला सांगत असत, 'आय टेल यूऽऽऽ धिस जनता गवर्मेंट इज आवळ्याभोपळ्याची मोट, धिस गवर्मेंट वुईल नॉट लास्ट लाँगर !'

त्यावर शेजारी म्हणे, 'वॉट धिस, युवर मोरारजी इज फॅडीस्ट व्हेरी मच, युवर जगजीवनराम इज इन्कमटॅक्स डिफॉल्टर अँड युवर बाजपेयी इज फॉरीन मिनिस्टर बिकॉज ही ऑल्वेज स्टेज इन फॉरीन् !'

मराठीत बोलताना आपण 'तुमचा तो हा' जसं म्हणतो, तसा तो दुसरा सद्‌गृहस्थ 'युवर' उपपद लावत होता.

इंग्रजी भाषा ही 'इंटरनॅशनल लँग्वेज' आहे यात वाद नाही. त्या भाषेतील काही शब्द मराठीत रुळलेले आहेत. ते काढून टाकण्याचा अट्टाहास करणेही चुकीचे आहे. पण म्हणून काही धेडगुजरी इंग्रजी बोलणं समर्थनीय ठरत नाही. दुसऱ्यावर इंप्रेशन मारण्यासाठी जी मंडळी इंग्रजीचा वापर करतात ती अर्धवट तरी असतात किंवा चक्क मूर्ख तरी असतात या देशातून इंग्रज निघून गेल्यानंतर हळूहळू इंग्रजीचा वापर कमी झाला, प्रादेशिक भाषांना उत्तेजन मिळालं. अनेक प्रांतांत 'जी.आर्स'ही झाले आहेत. पण हायकोर्टात, किंवा सेक्रेटरीएटमध्ये अद्याप सारा कारभार इंग्रजीतच चालतो. त्यामुळं इंग्रजी न येणारा माणूस वरपर्यंत चढू शकत नाही आय. ए एस्. किंवा आय. पी. एस् सारख्या मुलाखती आणि परीक्षा इंग्रजी माध्यमातूनच घेतल्या जातात. एकीकडं इंग्रजी हटाव मोहिमेचा पुरस्कार करायचा आणि आपल्या पोरांना Convent शिवाय इतरत्र शिक्षण द्यायचं नाही हे पुढारी लोकांचं धोरण ! असो.

सांगण्याचा मुद्दा हा की, एकही जर्मन माणूस इंग्रजी बोलत नव्हता उलट ते लोक इंग्रजी बोलणाऱ्याकडं तिरस्कारानं पाहतात असा जाज्वल्य भाषाभिमान युरोपात इतरत्र कुठेही पाहायला मिळाला नाही.

फ्रान्स सोडल्यापासून युरोपात भिकारी भेटलेला नव्हता. तो भेटला एका डिपार्टमेंटल स्टोअरच्या दारात. हातात काठी आणि प्लॅस्टिकचा कटोरा

घेऊन स्टोअर्सच्या दाराशी बसला होता. त्यांच्या डोळ्यांची होणारी ती उघडझाप स्पष्ट दर्शवीत होती की तो आंधळा आहे. आम्ही त्या डिपार्टमेंटल स्टोअरमध्ये फिरत फिरत वरच्या मजल्यावर गेलो तिथं जिने चढावेच लागत नाहीत. जिनेच आपोआप वर जात असतात आणि आपण फक्त त्यावर जाऊन उभं रहायचं, बाजूचं रेलींगसुद्धा जिन्यासारखं वर जातं. अशा चढत्या जिन्यावरून (एस्केलेटर्स) कितीही वेळा वर गेलो किंवा खाली आलो तरी दमायला होत नाही. असे जिने युरोपात आणि अमेरिकेत सर्वत्र आहेत याशिवाय विमानतळावर लांबच्या लांब चालते रस्ते आहेत. त्यावर फक्त जाऊन उभं रहायचं रस्ताच तुम्हाला पुढं घेऊन जातो. अमेरिकेत आणि युरोपमध्ये मी काही जाड माणसं आणि बायका बघितल्या उत्तम क्रीमयुक्त आईस्क्रीम, उत्तम प्रोटीनयुक्त हॅम्बर्गर्स किंवा हॉट डॉग्ज असं खाणं आणि व्यायाम हा असा, चालत्या रस्त्यावर किंवा चढत्या जिन्यावर 'टुनूकन' जाऊन उभं रहायचं ! मग 'फॅट' वाढेना तर काय होईल ? पण असा जाड 'बाबा' किंवा 'बाई' शेकड्यांत एक असे. बहुसंख्य युरोपियन किंवा अमेरिकन बायका प्रमाणबद्ध शरीराच्या असतात.

त्या डिपार्टमेंटल स्टोअर्समधून फिरता-फिरता मी मद्यविभागाजवळ येऊन थांबलो. खरं सांगू, मला विदेशी मद्यांच्या त्या निरनिराळ्या आकाराच्या आणि रंगांच्या बाटल्या न्याहाळणं फार आवडतं. व्हिस्की, जीन, रम्, व्होडका, वाईन्स या बाटल्यांवरची लेबलंसुद्धा फार आकर्षक असतात. काही मद्यविभागांत तुम्हाला फुकट वाईनसुद्धा दिली जाते त्याही दुकानात मी उपलब्ध संधीचा फायदा घेतला प्लॅस्टिकच्या छोट्या कुपीतून त्या जर्मन सद्गृहस्थानं मला वाईन दिली त्यावेळी मला आठवलं ते आमच्या कोल्हापुरातलं कपिलतीर्थ मार्केट ! या कपिलतीर्थात दही विकायला येणाऱ्या बायका दह्याची मडकी घेऊन ओळीनं बसलेल्या असतात चिकित्सक गिऱ्हाईक दही आंबट की गोड हे अजमावण्यासाठी आपला तळहात पुढं करते आणि दही विकण्यासाठी आलेली पोरगी किंवा बाई त्या गिऱ्हाइकाच्या हातावर चमचाभर दही घालते सत्यनारायणाचं पंचामृत घ्यावं अशा आविर्भावात गिऱ्हाईक 'सॅंपल' दही गिळंकृत करते पसंत पडले तर घेते नाहीतर पुढं चालू लागते पण असेही काही महाभाग असतात की,

त्यांना दही घ्यायचेच नसते. हातात अल्युमिनियमचा कडीचा डबा अडकवून फुकट दहा–वीस ठिकाणचं चमचा–चमचाभर दही स्वाहा करून ही मंडळी निघून जातात. तोच प्रकार अंब्याच्या सीझनला. नमुन्यासाठी ठेवलेल्या अंब्यातला रस तळहातावर पिळून घ्यायचा. आंबट असला की तोंड वाकडं करून पुढं निघून जायचे जरा बरा असला की सौद्याची भाषा सुरू करायची. युरोप आणि अमेरिकेत असली सौदेबाजी आणि वेळेचा अपव्यय कुठंही बघायला मिळत नाही. डिपार्टमेंटल स्टोअर्समध्ये प्रत्येक मालावर दर चिकटवलेली चिठ्ठी असते. हव्या त्या वस्तू ट्रॉलीमध्ये घालायच्या आणि कौंटरवर येऊन बिल करायचे. बिल झाले की, त्या वस्तू बाहेर पार्क केलेल्या गाडीत भरायच्या आणि चालू लागायचे. खरेदीच्यावेळी वाचाळता करण्यात आपला किती वेळ वाया जातो याची आम्हाला कुणालाच जाणीव नसते.

त्या 'सँपल' वाईनचा आस्वाद घेऊन मी रॅकवरच्या आकर्षक बाटल्या न्याहाळत असता उमेशनी माझ्या दंडाला स्पर्श करून म्हटलं, 'आबा, तो बिअर घ्यायला आलेला मुलगा पाहा. तुम्ही ओळखलंत का याला ?'

मी बिअरचा कॅन हातात घेऊन उभ्या असलेल्या मुलाकडं पाहात म्हणालो, 'आत्ता दारात आंधळा बसला होता तो तर हा नाही ना ?'

'होऽऽय, तोच आहे हा. मघाशी चक्क आंधळा असल्याचं सोंग करत होता. जमलेल्या पैशाची बिअर घ्यायला आला आहे !'

मी म्हणालो, 'जगातले सगळे भिकारी इथून–तिथून सारखेच ! कोल्हापूरच्या स्टँडवर काखेत कुबडी घेऊन एक पाय चक्क मोडल्याचे सोंग करणारा एक भिकारी अर्ध्या तासानंतर चक्क सायकलवरून गेलेला मी बघितला होता. त्याची मला त्यावेळी आठवण झाली. लोकांना फसवून. त्यांच्या भूतदयेला आवाहन करून पैसे उकळण्याच्या कलेत भारतीय भिकाऱ्यांना अग्रक्रम द्यावा लागेल. नुकतेच जन्मलेलं मूल वेळूच्या पाटीत घालून डोक्याला घट्ट कापड बांधून भिक्षा मागणारी एक गोसावी जमातीची स्त्री कित्येक दिवस मी बघितली होती. मला आश्चर्य वाटायचं, तिचं ते नुकतंच जन्मलेलं मूल मोठं कसं होत नाही ? चोकशीअंती समजलं की, झोपडपट्टीतली नुकतीच जन्मलेली आपल्या जातभाईंची मुलं ती भाड्यानं

आणते. मिळालेल्या भिक्षेतली काही रक्कम त्या मुलाच्या आईला देते. गोसावी जमातीचा मला फार जवळून परिचय आहे. मी वकिली सुरू केली तेव्हा, माझे बरेच गोसावी पक्षकार होते. खोट्या फिर्यादी करून आपल्या परगावच्या जातभाईंना कोर्टात खेचणे, नंतर खटला आपसात करून पैसे उकळणे हा त्यांचा आवडीचा छंद.

या गोसावी जमातीत नुकतंच जन्मलेलं मूल थंड पाण्यानं धुण्याची प्रथा आहे. बाळंतिणीला रोज खेकड्याचा शेरवा घातला, की म्हणे मुलाला थंडी बाधत नाही. आईच्या दुधातून त्याच्यात सर्दी–प्रतिबंधक शक्ती निर्माण होते. ती भिकारीण अशी नवजात अर्भकं घेऊन बरेच दिवस पैसे कमवत होती. देवादिकांच्या मूर्ती वेळूच्या टोपल्यात ठेवून ग्रामीण प्रवाशांची इच्छा असो वा नसो त्यांच्या कपाळाला भंडारा लावला की, त्यांचा हात आपोआप बदामाच्या (खेडुताच्या शिवलेल्या बनियनला बदाम म्हणतात) खिशात जातो हे त्या धूर्त बायकांना ठाऊक असतं

फ्रँकफूर्टच्या इंडिया हॉटेलसमोरच्या हिरवळीवर बसलो असताना जवळच एक निग्रो तरुण आणि गौरवर्णीय युवती येऊन बसली तो गवतावर आडवा पडला. अन् त्याचं डोकं आपल्या मांडीवर घेऊन ती गौरांगना त्याच्या मेंढीसारच्या डोक्याच्या केसांतून प्रेमानं बोटं फिरवत होती. त्याचा रंग डांबरासारखा ‘ फास्ट ’ होता. ओठ जाड आणि ओठांवरच्या मिशा उंदरानं कुरतडल्यासारख्या होत्या. तसे युरोप आणि अमेरिकेत निग्रो प्रियकराच्या हातात हात घालून फिरणाऱ्या अनेक युवती मी बघितल्या. पण फँकफूर्टला कृष्ण–धवल तरुण–तरुणीचा हा चव्हाट्यावर चाललेला प्रणय पहिल्यांदाच पाहात होतो. अमेरिकेत लग्न झालेली काही जोडपीही दिसली. निग्रोपासून गोऱ्या बायकोला झालेली संतती साधारण आपल्या भारतीयांप्रमाणे दिसते केस मात्र तसेच पिंजारलेले आणि काश्मिरी मेंढीसारखे दाट आणि कुरळे असतात.

आपल्याजवळ नाही ते अट्टाहासानं मिळवण्याचा मानवी स्वभावधर्म रंगाच्या बाबतीत युरोप–अमेरिकेत प्रकर्षाने जाणवला. सुट्टीच्या दिवशी अगदी बारा–तेरा वर्षांच्या पोरींपासून साठ वर्षांच्या ‘ ग्रँड मा ’ पर्यंत सर्व बायका अंगाला ‘ ऑलिव्ह ऑईल ’ लावून उन्हाला पाठ करून बीचवर

तासन्तास पडून रहात. हेतू एवढाच की, आपली गौरकाया काहीशी सावळी व्हावी. सॅनडिएगोला ( पश्चिम अमेरिका ) इथं असताना श्री. सराफ यांनी मला या बायकांच्या रंगाच्या बाबतीत सांगितलेली हकीगत याहूनही विलक्षण आहे. अमेरिकेत आताशी म्हणे कातडी काळी करण्याच्या टॅबलेटस् निघालेल्या आहेत. टी. व्ही. वर अशा टॅबलेटस्च्या ' ॲड ' दाखवल्या जातात आणि ' एक महिन्याच्या आत तुमचा रंग पालटला नाही तर पैसे परत, ' अशी ग्वाहीही दिली जाते. आपल्याकडे वृत्तपत्रांत कोडांवर ' अक्सीर इलाज ' म्हणून अशाच जाहिराती येतात. पण चांगल्या वस्तूंची जाहिरात करण्याची गरज नसते. बाजारी, फसव्या वस्तूंना मात्र जाहिरातीशिवाय उठाव होत नसतो. अलीकडं हिंदुस्थानातल्या सिनेमागृहात साबणाच्या जाहिरातींनी इतकं डोकं उठवलं आहे की, सांगता सोय नाही. अर्धा अर्धा तास त्या साबणाच्या जाहिराती पाहून अक्षरशः वीट येतो. एखादी गोंडस चेहऱ्याची ' मॉडेल ' जवळजवळ अर्धनग्न अशा अवस्थेत टबात बसून तो साबण ' इस्तमाल ' करते. बघता बघता संपूर्ण टब फेसानं भरून जातो. ' कितना मुलायम ' ' कितनी अच्छी खुशबू ' हे शब्द ती अगदी मोरपीस अंगावरून फिरावं अशा मृदु शब्दात उच्चारते आणि सिनेमा बघायला आलेल्या कपाळावरच्या बटा कापून घेतलेल्या, फॅशन म्हणून नाक टोचून घेतलेल्या षोडषा तो जाहिरातीतला साबण आपण यापुढं वापरायचा असं ठरवून टाकतात पण गोळ्या खाऊन आणि उन्हात बसून गोऱ्या पोरींची कांती जशी फारशी बदलत नाही, तशीच आमच्याकडच्या सावळ्या पोरींची कायाही बदलत नाही. सौंदर्य हे जन्मजात असावं लागतं. ओढूनताणून आपण सुंदर दिसावं असा अट्टाहास करणाऱ्या काही पोरी सुंदर तरी दिसत नाहीतच नाहीत. उलट विचित्रफॅशनमुळे भयानक दिसतात.

संध्याकाळचे सात वाजले आणि इंडिया हॉटेलसमोर पिवळ्या बॅगा खांद्याला लटकावलेले टी.सी.आय. तर्फे आलेले प्रवासी हॉटेलसमोरच्या खुर्च्यांवर येऊन बसू लागले. आम्ही तिघे रस्ता क्रॉस करून हॉटेलकडं गेलो. हॉटेलात साड्या नेसलेल्या भारतीय पोरी बघून डोळ्यांना जरा बरं वाटलं

इथंही कोंबडीची टांग आणि मसाल्याचा भात ! मी आश्चर्यचकित

होऊन म्हणालो, ' इंडियन फूड म्हणजे कोंबडीची टांग आणि भात हे कोणी लेकाच्यानं यांना सांगितलंय ?' खरं म्हणजे चपाती किंवा तंदूर रोटी आणि ' चिक्कन ग्रेव्ही ' दिली असती तर ते इंडियन फूड म्हणून आम्हांला आवडलं असतं पण आम्ही हॉटेलातल्या मेनूकडं फारसं लक्ष देत नव्हतो. बाहेर फिरता फिरता चेरी, ॲपल, पॅरी, द्राक्ष, लिच्ची अशी फळं खात होतो आणि फारच भूक लागली तरी चालता चालता एखादा हॉट डॉग ' किंवा ' हॅम्बुर्गर संपवत होतो. त्यामुळं एखादं अमलं ' टांग–भात ' डिनर ' स्कीप ' करायची सुद्धा मनाची तयारी असे. फ्रँकफूर्ट शहरात रिझर्व्हेशन मिळाले नाही म्हणून पटेलनं फ्रँकफूर्टपासून वीस मैलावर रसेलशेम या गावी ' सिटी हॉटल ' रिझर्व्ह केलं होतं. युरोपात आणि अमेरिकेत रात्रीचे नऊ वाजले तरी अंधार पडत नाही. त्यामुळं जेवण करून ' रसेलशेम ' ला जाताना दुतर्फाचा निसर्ग स्वच्छ दिसत होता

दुसऱ्या महायुद्धात जर्मनीचा पराभव झाला. रशिया प्रथम जर्मनांच्या बाजूला होता. पण विजयाचं पारडं इंग्रज-अमेरिकेच्या बाजूला झुकतं आहे असं पाहून, रशियानं जर्मनीशी दगाबाजी केली. रशिया निदान तटस्थ राहिला असता तरी चाललं असतं, पण रशियानं इंग्रज दोस्त–राष्ट्रांशी हातमिळवणी केली एकटा जपान मात्र जर्मनांशी एकनिष्ट होता, पण हिरोशिमावर अमेरिकेने अणुबॉम्ब टाकून जो प्रचंड विध्वंस केला, त्यामुळं जपाननं ' हॅण्डस् अप् ' केले. जपान शरण आले. आणि दुसऱ्या महायुद्धात जर्मनी एकाकी पडला. त्यालाही पुढे शरणागती पत्करावी लागली रशियानं आणि अमेरिकेनं जिंकलेल्या जर्मनीची फाळणी केली. पूर्व जर्मनी रशियाच्या ताब्यात गेला आणि पश्चिम जर्मनी दोस्त राष्ट्रांनी, म्हणजे इंग्रज आणि अमेरिकेनं आपल्या अधिपत्याखाली घेतला. पण आता आतून दोन्ही विभाग एकत्र होऊ इच्छित असले तरी, रशिया आणि अमेरिका या दोघांनाही ते नको आहे आपले लष्करी तळ उभे करायला आशियात येऊन लुडबूड करणारी ही दोन प्रचंड राष्ट्रे सहजासहजी परस्परांत विभागून घेतलेल्या जर्मनीवरचा कब्जा सोडतील ही सुतरामही शक्यता नाही.

रसेलशेम फ्रँकफूर्टपासून सुमारे वीस मैलांवर आहे युरोपात आम्ही जिथं जिथं उतरलो ती हॉटेल्स स्वच्छ आणि प्रशस्त होती. रसेलशेमचं ' सिटी

हॉटेल ' गावच्या मध्यभागी होते. खोलीत गेल्यावर मी लाईटचं बटण दाबलं आणि मला युरोपात कुठंही दिसला नव्हता ' तो ' आमच्या खोलीत दिसला.

तो एक भला मोठा डास होता. डासाचा आणि माझा छत्तीसाचा आकडा. डास, माशी, झुरळं हे कीटक आणि प्राण्यांमध्ये ' मांजर ' यांचं अन् माझं अगदी हाडवैर ! मांजराबद्दल मला बऱ्याच वर्षांपासून तिटकारा आहे. जगात सर्व प्राण्यांत चोरटी आणि लबाड कोणती जात असेल, तर ती मांजराची ! काही घरांत या मांजराचं भलतंच वेड असतं जेवताना मांडीवर काय घेऊन बसतात, काहीजणांना झोपताना अंथरुणात मांजर हवं असतं. मला किळस येते ती मांजरांच्या केसांची. केसाळ कुत्री आणि मांजरं पाळणाऱ्यांच्या घरात ते केस सर्वत्र विखुरलेले असतात. ' हायजीन ' च्या दृष्टीनं ते वाईट आहेच, पण तरीसुद्धा पाळीव प्राण्यांचे किती लाड करावेत यालासुद्धा एक मर्यादा असावी. माझ्या एक ओळखीच्या ठिकाणी कुत्र्याचा पापा घेण्याचा किळसवाणा प्रकार मी बघितला. जे कुत्रं आपलं सर्व अवयव तोंडाने साफ करतं त्याच कुत्र्याच्या तोंडाला आपलं तोंड लावणाऱ्यांची मला कीव करावीशी वाटते.

तर मी पाठलाग करून त्या जर्मन डासाचा संहार केला. उजेडाजवळ आणून त्याला जरा बारकाईने बघितलं; म्हटलं, युरोपियन लोकांसारखा तो गोरा किंवा भुरा आहे की काय ! पण नाही, तो अगदी आपल्यासारखाच होता.

हॉटेलला पूर्व बाजूस काचेची खिडकी होती. खिडकीतून आकाशात एक ' ग्लोव्ह ' ( जमिनीवरचा आकाशात उंच दिसणारा प्रकाश ) दिसत होता. हा ग्लोव्ह बहुतेक फ्रँकफूर्टच्या मायन विमानतळावरचा होता. प्रत्येक पाच-दहा मिनिटाला लाल दिव्याची उघडझाप करणारी विमानं आकाशात झेपावताना दिसत होती. रात्री खोलीत अंथरुणावर पडल्यानंतर काचेतून बाहेर बघितलं. आकाशातले एक एक ग्रह आणि तारे ढगांनी झाकायला सुरुवात केली. बघता बघता बारीक पाऊस पडू लागला. युरोपात, विशेषत: हॉलंडमध्ये हवामान इतके लहरी असते की, निष्णात हवामानतज्ज्ञसुद्धा त्यासमोर हात टेकतात. सकाळी चक्क ढगाळ हवा असेल तर, दुपारी कडकडीत ऊन

पडेल, तर संध्याकाळी इतकी थंड हवा सुटेल की, गळ्यापर्यंत उलनची स्वेटर्स चढवावी लागतील, आणि हात आपोआप ब्रँडीच्या बाटलीकडं जाईल.

माझ्या दौऱ्यात हवामान खात्याचे अचूक असे अंदाज पाहायला मिळाले ते अमेरिकेत ! रंगीत टी व्ही.वर प्रत्येक पंधरा-वीस मिनिटाला हवामानतज्ज्ञ नकाशासहीत हवामानाचा अंदाज सांगतात आणि कोणत्या भागावर किती्च्या सुमारास पाऊस पडेल हेसुद्धा ते निश्चित सांगायचे. प्रत्येक बाबतीत आपल्या देशाची तुलना करून आपल्या देशातील तज्ज्ञांना गौण लेखू नये हे मला पटतं. पण भारतीय हवामानतज्ज्ञांचे अंदाज नेमके उलटे कसे काय ठरतात याचं राहून राहून आश्चर्य वाटतं. कुलाबा वेध-शाळेनं आज हवा ढगाळ राहील आणि अमुक एका भागात पावसाच्या सरी कोसळतील असा अंदाज केला की, त्या भागात चक्क स्वच्छ हवा राहील आणि चकचकीत ऊन पडेल असं समजायला हरकत नाही. पण हे नेमका उलटा अंदाज कसा काय करतात हे कोडं काही केल्या सुटत नाही. दोन वर्षांपूर्वी ' अलिबाग 'ला व्याख्यानासाठी गेलो होतो. तेव्हा समुद्रकाठाने फिरत जाताना माझ्यासोबत फिरायला आलेल्या गृहस्थाने मला कुलाबा वेधशाळेची इमारत दाखवली मनात आले की, परवानगी घेऊन आत जावे आणि वर्षानुवर्ष हवामानाचा नेमका उलटा अंदाज करणाऱ्या त्या महाभागांना एकदा जवळून पाहावे. पण माझ्या व्याख्यानाची वेळ होत आली होती. सभास्थानी लोक जमले होते. मला लवकरात लवकर ठरलेल्या वेळेपूर्वी सभास्थानी जाणं अवश्य होतं.

मध्यरात्रीच्या सुमारास ढग गर्जना करू लागले जोरदार अशा काही पावसाच्या सरी कोसळल्या. वाटले, उद्या आपल्याला सूर्यदर्शन घडण्याची शक्यता नाही पण सात वाजता उठलो आणि पूर्वेकडून उगवत्या सूर्याचा सोनेरी झोत काचेतून आत आला. आमची खोली त्या प्रकाशझोताने उजळून गेली आकाश निरभ्र होतं क्षणभर वाटलं, रात्री मेघांचा झालेला तो गडगडाट आणि कोसळलेल्या पावसाच्या सरी स्वप्नात तरी बघितल्या नव्हत्या ना ?'

ब्रेकफास्ट उरकून खाली आलो. गाडीजवळ पुढची जागा पकडण्यासाठी पिवळ्या बॅगा खांद्याला लटकावून काही लोक हजर होते. पण उमेशनी

काय मसलतशी केली कुणास ठाऊक, पुढच्या सीटवर आमचे स्वेटर्स ठेवून त्यांनी जागा पकडून ठेवली होती. आमच्या ग्रूपमध्ये अहमदाबादची तीन जोडपी होती त्यांपैकी दोन बायका सख्ख्या वहिणी–वहिणी होत्या आणि तिसरी त्यांची जवळची नातलग होती. ही तिसरी बाई भारतातून येताना साडी–ब्लाऊज नेसून आली होती. पण युरोपात आणि नंतर अमेरिकेत ती बाई चक्क पँट, मिनीस्कर्ट, स्लॅक्स आणि झगा वापरू लागली होती. सकाळी गाडीत चढल्याचढल्या ती ' गुड मॉर्निंग एव्हरीबडी ' म्हणून जवळ जवळ किंचाळतच असे. आपण मूळच्या इकडच्याच, पण चुकून तिकडं भारतात जन्मले, असे भाव तिच्या चेहऱ्यावर दिसायचे. सगळ्यात गम्मत म्हणजे, ती जेव्हा स्कर्ट घालून यायची, तेव्हा तिच्या पोटरीवरचे इंचइंचभर लांब केस पाहून कसेतरीच वाटायचे पुढे पुढे तिने ते झाकण्यासाठी स्किनकलरचे स्टॉकींग्ज खरेदी केले पण त्या पारदर्शक पायमोजांतूनही ते दाट केस दिसायचे आमच्यातल्या काही वात्रट पोरांनी तिचं नाव ' गावठी लेडी ' असं ठेवून टाकलं

आमच्या ग्रूपमध्ये ' छाबडा ' नावाचा एक फौंटनपेन कंपनीतला सेल्समन होता. तो गाडीत ड्रायव्हरजवळ अधून-मधून बसून गाडीतल्या लोकांना उद्देशून काहीतरी सांगत असे. तेव्हा तो आपल्याकडे साप आणि मुंगूस यांचा सार्वजनिक ठिकाणी खेळ करणाऱ्या गारुड्यासारखा मला भासे. स्वतःला फार विनोदबुद्धी आहे अशा भ्रामक समजुतीत तो नेहमी वावरत असे. त्याचे तोंड एकसारखे सुरू असे लंडनवरून आम्ही हिथ्रो ' विमानतळाकडं जात असताना तो बाजूच्या एका बाकावर एकटाच बसला होता. त्याची वटवट ऐकून त्याला मारेजण कटवीत पण त्या दिवशी विमानतळाकडं जाताना तो एकटाच बडबडत होता ' ए देखो लंडन एम्पायर हॉटल, कितनी बडी इमारत है। वो देखो दरवाजेमें खडा हुआ सरदारजी झाडू मार रहा है ! उधर इंडियामें आनेके बाद बोलते है ब्रिटनमे बडा बिझिनेस है ! ये देखो इधर झाडू मारनेका बिझिनेस कर रहा है। '

समोर विमानतळावरून उड्डाण केलेले प्रचंड जेट दिसताच छाबडा म्हणाला, ' ये देखो पॅन अॅम का हवाई जहाज आफ्रीका जा रहा है। हमारे एअर इंडिया का हवाई जहाज बहोत आस्ते आस्ते उडता है। लेकीन ये देखो

कितना तेज उडता है।'

एकटाच माणूस सतत किती वेळ बोलू शकतो याचं ते एक रेकॉर्ड होतं. गाडीत जाता जाता काही लोक पॉपकॉर्न, बटाटा वेफर्स असे सुके कोरडे खाद्यपदार्थ घेत. त्यावेळी छाबडा आपण सर्व एकाच कुटुंबातले आहोत अशा आविर्भावात कोणाच्याही पुढ्यात हात घालत असे.

रसेलशेमला रात्री मेघगर्जनेसह पावसाच्या सरी कोसळत होत्या. पण दिवस उजाडला तेव्हा आकाश निरभ्र होतं हवेत सुखद गारवा होता. ब्रेकफास्ट झाल्यानंतर खोलीची किल्ली परत करण्यासाठी कौंटरवर गेलो तेव्हा तिथं काचेच्या कटोऱ्यात प्रवाशांसाठी लेमन ड्रॉपच्या गोळ्या ठेवल्या होत्या, त्यातली एक गोळी तोंडात टाकून मी आणि माई बाजूच्या एका बंद दुकानाच्या काचेतून आतील वस्तू न्याहाळत होतो. चांदीची कलाकुसर केलेल्या सुरया, पेले, टी-सेटस् आणि चमचे इत्यादी वस्तू अत्यंत कलापूर्ण दिसत होत्या.

युरोपात लोकांना जी सौंदर्यदृष्टी दिसली, ती अमेरिकेत काहीशा अभावानेच आढळली कोणत्याही दुकानात गेलात तर, तुम्हाला मोहात पाडतील अशा वस्तू दिसायच्या.

रसेलशेम सोडल्यानंतर आमची बस ऱ्हाईन नदीच्या काठानं ॲमस्टरडॅमच्या रोखानं निघाली होती भूगोलाचा अभ्यास करताना ऱ्हाईनचे खोरे आढळले होते. पण भविष्यात पुढे केव्हातरी याच ऱ्हाईनच्या खोऱ्यातून प्रवास करण्याचा योग येईल असे मात्र वाटले नव्हते.

रसेलशेम सोडल्यानंतर ऱ्हाईन नदीच्या पश्चिमेच्या रस्त्याबरून आमची बस चालली होती. रस्त्याशी समांतर अशी उजव्या बाजूला निळ्याभोर रंगाची ऱ्हाईन नदी वाहत होती, तर डाव्या बाजूने रेल्वे धावत होत्या नदीच्या पलीकडेही असाच प्रकार. नदीलगत रस्ता, अन् रस्त्याच्या लगत रेल्वेचे रूळ रेल्वेच्या रूळांपासून दोन्ही बाजूला उंचच्या उंच टेकड्या. गर्द हिरव्या रंगाची मखमाली चादर पांघरल्यासारख्या आकाश कमालीचं स्वच्छ होतं बसच्या बाजूनं वाहणारं पाणी, त्यातून इकडे-तिकडे फिरणाऱ्या 'फेरी'ज बघितल्यावर वाटलं की, थोडा प्रवास फेरीतून करायला हवा होता. बहुसंख्य प्रवाशांना असं ज्यावेळी वाटलं, नेमकं त्याचवेळी पटेल

हातात माईक धरून म्हणाला, ' लेडिज अॅंड जंटलमेन, नाऊ वुई आर गोईंग टू हॉल्ट फॉर सम टाईम अँड वुई वुईल कंटिन्यू अवर जर्नी टुवर्डस अॅमस्टरडॅम थ्रु ए फेरी ! वुई वुईल ट्रॅव्हल फॉर ट्वेंटी माईल्स अॅन्ड अगेन रिझ्यूम अवर जर्नी बाय रोड ! डॅनी वुईल गो अहेड ऑफ अस !'

शाळकरी मुलं जसा जल्लोष करतात तसेच गाडीतले सर्व प्रवासी आनंदाने ओरडले, ' ओ SSS बहोत अच्छा किया पटेल !' आमच्या प्रवासात पुण्याच्या कोरेगव व पार्कला राहणाऱ्या नारंग कुटुंबातली पाच माणसं होती. त्यांत नारंगांच्या पंचाहत्तर वर्षांच्या मातोश्री होत्या. या बाईंचा उत्साह तरुणाला लाजवेल असा होता. पांढरे केस, पांढरा कोपराएवढा ब्लाऊज आणि पांढरी शुभ्र साडी या वेषात त्या एखाद्या राजमातेसारख्या दिसायच्या नंतर त्यांच्या बंधूने आम्हांला जी हकीगत सांगितली त्यावरून आमचा अंदाज किती तंतोतंत होता याची तुम्हाला कल्पना येईल.

पाकिस्तानची फाळणी होण्यापूर्वी कराचीत जी काही सधन हिंदू कुटुंबं होती, त्या घराण्यातल्याच या माताजी होत्या. हिंदुस्थानला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर पाकिस्तानातल्या हिंदूंना जबरदस्तीनं बाहेर हाकलण्यात आलं. त्यावेळी हे नारंग कुटुंबही भारतात आले. पण माताजींच्या पतींना हे राजकीय स्थलांतर घडणार याचा अंदाज बराच अगोदर लागला होता. त्यांनी सोने, नाणे, जडजवाहीर असा आपला ऐवज अगोदरच भारतात आणला होता तो विकून त्यांनी पुणे आणि मुंबई या शहरांत मोठमोठ्या इमारती खरीदल्या. आणि काळाची पावलं अशी अचूक ओळखलेल्या या नारंग कुटुंबाची सुस्थिती देशांतर घडूनही फारशी बदलली नाही. या माताजी जेव्हा तरुण होत्या तेव्हा त्यांच्या मालकीचं स्वतःचं विमान होतं, तेव्हा त्या कराची–दिल्ली, कराची–कलकत्ता, कराची–मुंबई असा प्रवास स्वतःच्या विमानातून करायच्या

ऱ्हाईनच्या खोऱ्यात फेरीतून प्रवास करताना माताजीच फेरीत सर्वप्रथम चढल्या.

या नदीच्या काठी टेकड्यांवरून लहान–लहान किल्ल्यासारख्या इमारती होत्या. रस्त्याच्या बाजूला छोटी, पांढरी रंगवलेली घरं होती अन् प्रत्येक घरासमोर विविध रंगांचे गुलाब बहरलेले होते. इथं आणि युरोपभर मी

घरासमोर इतके बगिचे बघितले, पण बागेतलं फूल तोडणारा एकही माणूस बघितला नाही. वाकड्या मुठीच्या काठ्या घेऊन फिरायला जाणारे वृद्धही बघितले. पण प्रभात रोडच्या आडव्या रस्त्याने जाता जाता दुसऱ्याच्या कंपौंडमधली फुलं तोडणारी वृद्ध मंडळी कुठं दिसली नाहीत.

खरं म्हणजे, फेरीत (फेरी म्हणजे लहान बोट) बसलो तेव्हा हवेत कमालीचा गारवा होता. पण आमच्यासोबत आलेल्या एका प्रवाशाला फेरीच्या डेकवर बसल्यानंतर बिअर प्यायची लहर आली. आता ती सकाळची वेळ, त्यात गारठा. बिअर प्यायला तो योग्य असा 'मोसम' मुळीच नव्हता. पण आपण भारतीय फार अनुकरणप्रिय ! सगळ्यांनाच बिअर प्यायची लहर आली. नाइलाजास्तव मलाही बिअरचा टीन उघडावा लागला. (युरोप आणि अमेरिकेत बिअर हवाबंद डब्यातूनही विकली जाते.) खरं म्हणजे ती वेळ एखादा जीनचा पेग घ्यायला योग्य अशी होती. पण जीन फेरीवर मिळत नव्हती. म्हणून गप्प बसावं लागलं.

फेरीनं किनारा सोडला आणि आमचा पश्चिमाभिमुख असा जलप्रवास सुरू झाला नदीच्या दोन्ही बाजूंनी रेल्वेची अफाट वाहतूक सुरू होती. पिवळ्याधमक रंगवलेल्या प्रवासी गाड्या आणि लांबलचक अशा मालगाड्या किती येत होत्या आणि जात होत्या याची गणतीच करता येत नव्हती. युरोपात 'युरोरेल' नावाचं एक रेल्वेचं तिकीट घेता येतं साधारण अडीच हजार रुपये (भारतीय) इतक्या मुल्याच्या या तिकिटानं युरोपभर तीन महिन्यांच्या कालावधीत प्रवास करता येतो. एखादा देश अगदी जवळून पाहायचा असला की, मोटार किंवा रेल्वे हीच उत्तम वाहनं विमानाचा प्रवास जलदगतीनं करता येतो हे जरी खरं असलं, तरी थांबून प्रत्येक गावातली प्रेक्षणीय स्थळ पाहून पुढं जायला विमान उपयोगी नसतं बोट त्यापेक्षा थोडी बरी, पण ती कमालीची मंदगतीनं जाणारी, शिवाय बोटीचा मार्ग मर्यादित असल्यानं हवं त्या ठिकाणी जाता येणं शक्य होत नाही

युरोपातल्या रस्त्यांबद्दल कितीही गौरवोद्गार काढले, तरी अपुरे पडतील. मैलच्या मैल जाणारे आणि येणारे रस्ते निरनिराळे, त्यामुळे समोरून येणार वाहन गाडीवर येऊन आदळणे हा प्रकार नाही. शिवाय 'क्रॉसरोड' नावाचा प्रकार नाही. रस्ता ओलांडून एखाद्या वाहनाला जायचं असेल तर, उजव्या

बाजूच्या फाट्याने बाहेर पडायचं, आणि मुख्य रस्त्याच्या खालून किंवा डोक्यावरून जाणाऱ्या रस्त्याने निघून जायचं, उत्तम रस्ते, आकर्षक आणि भव्य पूल, यामुळं द्रुतगतीनं चाललेली ही वाहतूक कधीही कंटाळवाणी होत नाही. कोल्हापूरहून पुण्याला जाताना मोटारीला कमीतकमी चार ते पाच वेळा अडवणाऱ्या त्या म्हशी, तोंडातला घास चघळत चघळत, नेमकं वाहन जवळ आल्यावर रस्ता ओलांडायची त्यांची इंन्स्टिक्ट जागृत होते. एकूण काय तर, वाहनांनी फार भरधाव जाऊन स्वतःच्या आणि पादचाऱ्यांच्या जीविताला धोका करू नये या सदिच्छेनं त्या बापड्या वाहनांची वेगमर्यादा अधूनमधून कमी करीत असतीलही ! कुणी सांगावं ?

कुठेही म्हैस, म्हशी युरोपात नाहीतच, पण कुठलाही चतुष्पाद प्राणी रस्त्याच्या आडवा गेला नाही. अमेरिकेत मात्र असा रस्ता ओलांडण्याचा प्रयत्न करणाऱ्या एका सांबराला (Stag) देहदंडाची शिक्षा झाल्याचे मी वाचितले

युरोप आणि अमेरिकेत जंगलांची तोड आपल्याप्रमाणं करण्याची सवय नाही मैलच्या मैल दाट अशी पसरलेली पाईन, ओक, सेडार यांची जंगलं आहेत. जंगल विभाग जिथं सुरू होतो, तिथं पाटीवर धावणाऱ्या हरणाचं चित्र काढलेलं असतं. हेतू एवढाच की, ‘ कदाचित् तुमच्या आडवं एखादं भेकर किंवा सांबर जाईल, थोडे आस्ते चला ’ पण युरोप आणि अमेरिकेत ताशी साठ मैलांपेक्षा कमी वेगानं वाहनं हाकली जातच नाहीत. तेव्हा इतक्या वेगात धावणाऱ्या वाहनाच्या आडवं येणारं सांबर किंवा भेकर बचावण्याची शक्यता कमीच.

ऱ्हाईन नदीतून तो केलेला प्रवास अगदी चिरस्मरणीय असा झाला. आमची फेरी मंदगतीनं चालली होती, मागे फेसाळलेल्या लाटा उसळत होत्या वर निळ्याभोर आकाशात धुराचा पांढरा पट्टा हवेत सोडणाऱ्या दोन जेट विमानांची कसरत सुरू होती. एका पायलटच्या प्रेयसीचं नाव बहुतेक रोझी असावं. कारण तो आकाशात उलटा–तिलटा होऊन ROSIE ही अक्षरं काढण्याचा प्रयत्न करीत होता पण वाऱ्याची एखादी हलकीशी लाट तो E काढेपर्यंत R पुसून टाकत होती. बहुधा ती प्रेयसी त्याच्या हाताला लागत नसावी. पण जर का तिनं आपल्या या प्रियकर वैमानिकाची हवाई

कसरत बघितली असती, तर तिने त्याच्यावर जीव टाकला असता. जट विमानांच्या धुरांच्या साहाय्याने एकाच वेळी सहा विमानं आकाशात बिअरची जाहिरात करत असलेली बघितली होती ती अमेरिकेत लॉस एंजल्सवरून सॅनडिएगोला जाताना. निरभ्र आकाशात भली मोठी पांढरी अक्षरं तरंगू लागली की, ती असंख्य लोकांचं लक्ष खेचून घेतात.

ऱ्हाईनच्या खोऱ्यातला तो जवळ जवळ वीस-बावीस मैलांचा प्रवास संपला आणि फेरी किनाऱ्याला येऊन उभी राहिली. डॅनीनं बस कुठं उभी केली होती हे पटेलला ठाऊक नव्हतं. पार्किंगसाठी जवळ जागा नव्हती म्हणून त्यानं बस खूपच पुढे उभी केली होती. नदीकाठच्या अरुंद रस्त्याने जात असता अनेक सत्तरी ओलांडलेले 'तरुण आणि तरुणी' हातात हात घालून गुलूगुलू बोलत निघालेले बघितले. आमच्याकडे पन्नाशी उलटली की एकमेकावर खेकसण्याचे प्रकार चालू असतात. मग त्या खेकसण्याला कसलेही क्षुल्लक कारण पुरे असते !

या जन्मी भारत सोडून दुसऱ्या कुठल्याही देशात जाऊन स्थाईक व्हावं असं वाटत नाही. आणि यदाकदाचित् पुनर्जन्म असलाच आणि ब्रह्मदेवानं तुला कुठं जन्मायचंय असं विचारलंच तर मी 'स्वित्झर्लंड' असं उत्तर देईन. तो जर म्हणाला, स्वित्झर्लंडच्या सीटस् फुल्ल आहेत, दुसरा चॉईस सांग, तर मग मी या 'ऱ्हाईनच्या खोऱ्यात' असं निश्चित सांगेन

जर्मनीची हद्द ओलांडून डॅनीची बस हॉलंडच्या प्रदेशातून धावू लागली. लहानपणी वडील माझ्यासाठी इंपोर्टेड बिस्किटांचे डबे घरी आणत त्यावेळी 'इंपोर्टेड' या वस्तूबद्दल फारसं कुतूहल कोणाला वाटत नव्हतं. कारण भारतावर इंग्रजांचं अधिपत्य होतं बिस्किटं चॉकलेटस् इत्यादी परदेशी वस्तू बाजारात देखील मिळत होत्या. त्यांत विंडमिलचं म्हणजे पवनचक्कीचं चित्र असलेला एक मोठा बिस्किटाचा पत्र्याचा डबा मी बरीच वर्षं बाळगला होता. यात रंगीत पेन्सिली, खडू मी ठेवीत असे. त्यावर 'मेड इन हॉलंड' अशी अक्षरं होती. इंग्रजी अक्षरांची ओळख फारच लवकर करून देण्यात आल्या-मुळं हा बिस्किटाचा डबा हॉलंड या देशात निर्माण झालेला आहे हे समजत होतं. चित्रात त्या विंडमिलसमोरच्या हिरवळीवर दोन पुष्ट अशा गाई एकमेकींकडं तोंड करून उभ्या होत्या आणि त्यांच्या मागे एक गव्हाचे शेत

होते. व दुसरे ऊसाचे. त्यावरून वाटायचं की, या देशात गहू, दूध आणि साखर यापासून बिस्किटं बनवण्याचे कारखाने विपुल असावेत. पण प्रत्यक्षात जेव्हा हॉलंडमधे गेलो, तेव्हा एकही बिस्किटाचा कारखाना दिसला नाही. माझा आणखीन एका बावतीत नेहमीच असां अंदाज चुकतो. कधीही न गेलेल्या गावी जेव्हा जाण्याचा. तिथं कोणाकडं तरी उतरण्याचा प्रसंग येतो, तेव्हा जाताना त्या गृहस्थांचे घर कसे असेल, गाव कसे असेल, याचा मी अंदाज करीत राहतो. पण प्रत्यक्षात मात्र गेल्यावर सगळंच काही निराळं असतं. एखादाच अंदाज बरोबर येतो. हॉलंडच्या बावतीतही थोड्याफार फरकानं तसंच घडलं. माझे बरेचसे अंदाज चुकले.

ॲमस्टरडॅम हे हॉलंडच्या राजधानीचे शहर. शहरातली वाहतूक रस्त्याप्रमाणं गावभर पसरलेल्या कालव्यांतून छोट्या छोट्या होड्यांतून होत होती. ॲमस्टरडॅमला पोहोचलो तेव्हा निसर्गानं निराळंच रूप धारण केलं. रसेलशेम सोडल्यापासून सतत दिसणारा सूर्य ढगांच्या आड गेला होता. आणि आपल्याकडं पडतो तसला म्हातारा पाऊस बुरबुरू पडू लागला.

पटेलनं हातात माईक घेतला आणि तो म्हणाला, ' लेडीज अँड जंटलमेन, वुई आर गोईंग टू हॅव डिनर इन 'तंदूर हॉटेल.' इट इज ॲन इंडियन हॉटेल. देन वुई आर प्रोसीडिंग टुवर्ड्स ' हॉटेल इबीस ' वन ऑफ द फायनेस्ट हॉटेल्स इन द् वर्ल्ड !

' तंदूर हॉटेल ' अर्थात भारतीयानं चालवलेलं होतं. आणि तेही सरदारजी मालक होते. मी म्हणालो, 'आता इथेही टांग-भात मेनू असणार !' पण सरदारजींनी चक्क पंजाबी मुर्गी आणि पराठे आणून आमच्यासमोर ठेवले.

आमच्या ट्रिपमध्ये चोपडा नावाचे पितापुत्र होते. बापाला माई विनोदानं ' डेमन ' म्हणत होत्या. तो होताही तसाच, राक्षसासारखा काळा, सहा फूट उंच आणि थोराड चौकोनी जबड्याचा. पॅरिस, जिनेव्हा, ल्यूसर्न इथल्या हॉटेलसमध्ये सकाळी ब्रेकफास्ट करताना त्यानं आपल्या खाऊखादाड स्वभावाची चुणूक दाखवली होती. चार लोकांचं ब्रेकफास्ट एकटाच फस्त करायचा. तेव्हा जेवताना तो जवळपास येऊ नये यासाठी आमच्या बाजूच्या मोकळ्या खुर्च्यांवर इतरांनी येऊन बसावं म्हणून आम्ही

त्यांना सूचवत असू. आमच्यांत बरेचसे शाकाहारी होते, ते आम्हाला टाळत होते. कारण आम्ही ' टांग–भात ' खाणाऱ्या लिस्टमधले होतो. या 'डेमन'–प्रमाणं आणखी एक गृहस्थ जवळ बसू नये याची आम्ही दक्षता घेत होतो आणि तो गृहस्थ होता लखनौचा म्हातारा नंदी. हा गृहस्थ साठीला पोहोचला होता, आणि त्याला थंडी अजिबात सहन होत नव्हती.

मघा ॲमस्टरडॅमला पोहोचल्यावर एक पावसाची सर पडून गेली होती, तीत तो थोडासा भिजला होता. ते सुद्धा किती ? गाडीपासून हॉटेलच्या पोर्चपर्यंत म्हणजे फक्त वीस–पंचवीस पावलंच. पण तेवढ्यानं तो एकसारखा शिंकत होता आणि खिशातल्या रुमालात नाक शिंकरत होता. या अगोदरही हॉटेलात दूर बसलेला असताना देखील तो जेवताना एकसारखा नाक शिंकरतो हे मी पाहिलं होतं. तेव्हा तो आपल्याजवळ बिलकूल येऊ नये म्हणून आम्ही इतर प्रवाशांना आमच्याजवळ येऊन बसण्याची विनंती करीत होतो आमच्या समोरच्या मोकळ्या खुर्चीवर हिंदुजा येऊन बसले. पण आम्ही ' टांग–भात ' मेनूवाले आहोत हे लक्षात येताच ते दुसरीकडं गेले. आणि पुन्हा ती खुर्ची रिकामी झाली. खांद्याला टी.सी.आय. ची पिवळी बॅग सदैव बाळगणाऱ्या, किंचित तिरका चालणाऱ्या नंदीचे रिकाम्या खुर्चीकडे लक्ष जाताच तो सरळ आला आणि आमच्याच समोर बसला. झालं, नेमकी नको होती ती दोन माणसं आमच्यासमोर येऊन बसल्यामुळं मी, माई आणि उमेश एकमेकांकडे या दैवदुर्विलासाला काय म्हणावे या अर्थाची नेत्रपल्लवी करीत राहिलो.

जेवण आल्यानंतर ' डेमन ' आधाशासारखे पराठे वरच्यावर उचलत होता. वेटरने आणून ठेवलेली तळलेल्या पापडाची प्लेट त्यानं चक्क आपल्या ताटात उलटी केली समोरच्या लोकांना आपल्या या वागण्यानं काय वाटेल याचा तो बिलकूल विचार करत नव्हता. जवळ जवळ सात–आठ मोठाले पराठे, भात, दोन वेळा चिक्कन करी, पापडाची एक अख्खी प्लेट, सॅलेडची एक मोठाली बशी इतकं रिचवून तो अर्धपोटी असल्यासारखा चेहरा करून वेटरला विचारता झाला, ' क्यूं भाई, स्वीट डिश क्या हैं ?'

डेमनचा हा असा बकासुरासारखा आहार चालू असता अधून–मधून नंदीमहाशय फटाफट शिंकत होते आणि डाव्या हातातल्या रुमालात नाक

शिकरत होते. जेवताना म्हणे माणसाचं मन प्रसन्न असावं. त्यामुळं खाल्लेलं अन्न अंगाला लागतं. पण असे दोन अजब प्राणी समोर असताना भोजनाचा आस्वाद मिळण्याचं दूरच राहो, पण केव्हा एकदा तेथून उठून बाहेर पडतो असं मला झालं होतं.

पण पुढे या सर्दीवाल्या नंदीवरचा माझा राग चक्क नाहीसा झाला. हे गृहस्थ एकदा ' मॅकडॉनल्डस् ' हॉटेलबाहेर उभं राहून मेघमल्हार रागाचे सूर गुणगुणत होता. मी ते ऐकलं आणि मोटारीच्या प्रवासात कंटाळा आला म्हणून डॉक्टर होशिंगना म्हणालो,

' डॉक्टरसाहेब, नंदीचाचांना शास्त्रोक्त गाण्याचं अंग आहे. त्यांना एखादं शास्त्रोक्त गाणं म्हणायचा आग्रह करा. '

माझी ही विनंती ऐकून डॉक्टरांच्या शेजारी बसलेल्या त्यांच्या पत्नी लीलावहिनी डोळे बंद करून ' गझल ' गाऊ लागल्या. ग्वाल्हेरी गायकीतले यांचे खानदानी सूर जेव्हा नंदीचाचांच्या कानावर पडले, तेव्हा त्यांनी विनंती करायच्या आतच वहिनींच्या सुरात नंदीने आपला सूर मिळवला.

' अरे ऽऽऽ पिया बिन ऽऽऽ नहीं आवत चैन ' चैन या शब्दाबरोबर जी सम साधली जात होती नि त्या समेबरोबर गाडीतली जाणकार माणसं ' हो ऽऽऽ ' म्हणून दाद देऊ लागली. नंदीचाचाची सर्दी आणि त्याचं एकसारखं नाक शिकरणं आम्ही पार विसरून गेलो. तंबोरा आणि तबला यांची साथ मिळाली असती, तर नंदीचाचानं नक्कीच प्रवासातल्या मुक्कामात मैफल रंगवली असती या त्यांच्या सुप्त गुणाची ओळख होताच मी त्यांची दोस्ती जमवण्याचा प्रयत्न केला. त्यांचा थोडासा पूर्वेतिहासही त्यांनी सांगितला. ते म्हणाले,

' मी नुकताच दोन वर्षांपूर्वी एल. आय. सी तून रिटायर झालो. पन्नास–साठ हजार रुपये फंड मिळाला. दोन मुलं आहेत, त्यांची लग्न झालीत. त्यांचे संसार सुरळीत चालू आहेत. दहा वर्षांमागं माझी पत्नी निवर्तली. मन विषण्ण झालं वाटलं, या क्षणभंगुर आयुष्याचा शेवट करून घ्यावा. पण पुन्हा विचार केला – मी तरी या पृथ्वीतलावर काय कायम राहणार आहे ? आज ना उद्या हे माझं जीर्ण शरीर चेतनाहीन होऊन जाईल ज्या मार्गानं माझीपत्नी गेली, त्याच मार्गानं मीही निघून जाईन. मन रमवण्यासाठी एका

संगीत विद्यालयात जाऊन बसू लागलो हळूहळू शास्त्रोक्त संगीताची गोडी लागली हळूहळू गायलाही शिकलो. एल. आय. सी. त माझे पाच–सहा कार्यक्रमही झाले आकाशवाणीवर बोलावण्यात आले, पण मी गेलो नाही.'

'का गेला नाहीत ?' मी विचारलं

'मन कशात तरी गुंतवण्यासाठी मी शास्त्रोक्त गाणं गायला लागलो. आकाशवाणीवर गाण्याइतकी माझी तयारी आहे असं मला वाटेना. वाढत्या वयामुळं आत्मविश्वासाचा अभाव माझ्यात निर्माण झाला होता '

'पण चाचाजी, तुम्ही गायला हवं होतं, तुमच्या आवाजात एकप्रकारचा गोडवा आहे.' मी म्हणालो.

'हो, बरेचजण तसं म्हणतात खरं, पण का कुणास ठाऊक, मी गेलो नाही खरा आकाशवाणीकडं !'

चाचाजी मद्यप्राशन करीत, पण प्रमाणात. मांसाहार त्यांना प्रिय होता. आणि त्यातल्या त्यात चिकन् लेग ! 'मॅकडॉनल्ड' या युरोप आणि अमेरिकेतल्या रस्त्यावरच्या हॉटेलात थोडा वेळ थांबल्यावर प्रवासी अधून–मधून खाद्यपदार्थ घेत. त्यावेळी चाचाजी फक्त चिकन खात. मी एकदा म्हणालो, 'आपण हॅम्बर्गर का नाही ट्राय करीत ?'

त्यावर ते म्हणाले 'मला बीफ चालत नाही. आम्ही सजातीय प्राणी ना ? माझं आडनाव 'नंदी' आहे हे विसरलात की काय ?'

मी त्यांच्या विनोदबुद्धीचं कौतुक करून बराच वेळ हसत राहिलो.

नंतर हॉटेलमधल्या भोजनानंतर आम्हाला हॉटेल 'इबिस' या जगप्रसिद्ध हॉटेलकडं नेण्यात आले. प्रचंड तारकेचा आकार दिलेल्या या इमारतीत नऊशे खोल्या होत्या खोली कसली. छोटासा महालच तो. पायात उलनचा गालीचा, निळसर रंगाच्या वॉलपेपरनं सुशोभित केलेल्या भिंती, आकर्षक लॅंप शेडस्, भिंतीत बसवलेल्या एअर कंडिशनरमधून हवी तेव्हा उबदार हवा किंवा थंड हवा घेण्याची सुविधा, फोमची गादी असलेला डब्बल बेड, बेडच्या उशाला टेलीफोन, बेडवर पडल्या पडल्या समोर टी. व्ही. सेट–तोही रिमोट कंट्रोलने चालवता येत होता 'रिमोट' कंट्रोल म्हणजे, समजा, तुम्हाला टी व्ही. वरचा एखादा प्रोग्राम नको असेल आणि दुसरं चॅनेल लावायचं असेल, तर कॉटवरून उठून टी. व्ही. चं बटन

फिरवायची गरज नाही उशाजवळ टेबलला ती बटनं जोडलेली असतात. पडल्या पडल्याच चॅनेल बदलता येतं. दृश्य गडद अगर फिक्कट रंगाचं करता येतं, आवाज कमी–जास्ती करता येतो. अमेरिकेत श्री केदळे यांच्या घरी बरीच उपकरणं रिमोट कंट्रोलवर चालणारी बघितली. मी आणि श्री. केदळे मार्केटिंगसाठी निघालो त्यांनी गॅरेजमधून गाडी बाहेर काढली अन् गाडीतली एक कळ दाबली, त्यासरशी गॅरेजचा दरवाजा आपोआप बंद झाला गॅरेजमध्ये गाडी ठेवण्याच्या वेळीसुद्धा, दुसरी एक कळ दाबली की, दरवाजा आपोआप उघडत असे. मला त्यावेळी ' तिळा उघड, तिळा बंद हो ' या अल्लाउद्दीनच्या कथेची आठवण झाली होती.

हॉटेल ' इबिस ' मध्ये आमची खोली तळमजल्यावर होती. पूर्वेला अखंड काच होती. या काचेतून बाहेर बघितलं तर शे–पाचशे मोटारी व्यवस्थित पार्क केलेल्या दिसल्या. त्याही पलीकडे मैलभर अंतरावर ॲमस्टरडॅमचा शिफोल विमानतळ होता विमानांची ये–जा दिसत होती, पण आवाज मात्र येत नव्हता, कारण खोली एअर कंडिशन्ड असल्यानं काच उघडता येत नव्हती.

या हॉटेल ' इबिस ' मध्ये ' कॅबेरे होता. अद्ययावत बार–रूम होती जगातल्या अनेक देशांतून आलेले पर्यटक त्या हॉटेलमध्ये उतरले होते. त्यात बरेच जपानी होते, काही इटालियन, फ्रेंच, स्पॅनिश आणि ऑस्ट्रेलियनही होते. ही मंडळी दिसायला जवळ जवळ एकसारखीच असतात, पण त्यांची हॅंडबॅग जरा जवळून न्याहाळली की, त्यांच्या देशाचं नाव वाचता येत असे.

हॉटेल ' इबिस 'च्या बाथरूममध्ये सुद्धा उलनचा गालीचा होता.. मला प्रथम हे लोक बाथरूममध्ये गालीचा का पसरतात हे कोडं उलगडले नाही. नंतर ते उलगडले. युरोपात जवळजवळ चार महिने हिवाळा असतो. बेसुमार बर्फ पडतं त्यावेळी पायाला ऊब असणं अत्यावश्यक असतं. शिवाय ते लोक आंघोळ करताना आपल्यासारखे बादल्या भरून घेऊन नंतर तांब्या डोक्यावर ओतून घेत ' हरगंगे ऽऽऽ ' पद्धतीनं आंघोळ करत नाहीत. त्यांची आंघोळ ही टबात असते. पण एखाद्याला टबात डुंबायचं नसेल, अन् शॉवर–बाथ घ्यायचा असेल तर टबात उभे राहून शॉवर-बाथ घेता येतो. त्यावेळी मात्र प्लॅस्टिकचा पडदा, किंवा काही ठिकाणी काचेचं सरकत्याचं

दार असतं, ते ओढून घ्यायचं असतं. पाणी थंड किंवा गरम शॉवरमधून घेता येतं. कोमट हवं असेल तर किती कोमट हवं तेसुद्धा थंड व गरम याचं आतल्या आत मिश्रण करून घेता येतं. ' इबिस ' हॉटेलात भट्टीचे टॉवेल्स, नॅपकिन्स घड्या करून ठेवलेल्या होत्या. आणि साबणाच्या दोन नव्या करकरीत वड्या होत्या. त्यावर नाव होतं. ' काश्मीर बुके. ' काश्मीरवरून एक जुनी आठवण झाली. युरोप आणि अमेरिकेला गेलेली माणसं ' सोव्हनीर ' म्हणजे आठवणीदाखल अनेक वस्तू घेऊन येतात. मी अशा आठवणीदाखल ठिकठिकाणची दगडं गोळा केलीत. तो माझा फार आवडीचा छंद आहे. मागे श्रीनगरला गेलो होतो तेव्हाही झेलमच्या काठावरची निरनिराळ्या आकाराची दगडं मी गोळा केली होती. माझ्या बॅगेत जागा नव्हती, म्हणून ती दगडं माईंच्या पर्समध्ये ठेवायला दिली होती. येताना विमानतळावर ' चेकअप् ' च्या वेळेला विमानतळावरच्या अधिकारी बाईनं माईंच्या पर्समधली ती दगडं बघून विचारलं,

' ये पत्थर किस लिए ले जा रहे हैं आप ? ' माईंना काय उत्तर द्यावं हे समजेना. क्षणभर विचार करून त्या म्हणाल्या, ' यह मेरे पतीकी हॉबी है । '

' पत्थरोंका संग्रह करनेकी हॉबी ?' असं म्हणून त्या बाईनं कपाळाला हात लावला आणि हा दगडं गोळा करणारा महाभाग कोण आहे हे पाहायला लाऊंजवर मी बसलो होतो तिथं ती आली. माईंनी माझ्याकडं बोट दाखवलं

मला काय प्रकार आहे तो समजेना. नंतर समजलं तेव्हा खूप हसलो. ती बाई म्हणे नंतर माईंना म्हणाली, ' इधर आनेवाले लोग कॅश्मिरकी शाल लेते हैं, वुडन कार्व्हिंग्ज लेते हैं, कोई इधरका केशर ले जाते हैं, लेकीन पत्थर ले जानेवाला ' टूरिस्ट ' अभीतक नहीं देखा था । '

पण दगडसुद्धा किती मोलाचा असतो ते त्या बाईला कसे समजणार ? अमेरिकेत केनेडी स्पेस सेंटर पाहायला गेलो होतो तेव्हा अंतराळवीरांनी आणलेले चंद्रावरचे दगड पाहताना काय वाटलं म्हणून सांगू ? पृथ्वीवरच्या अगदी मौल्यवान हिऱ्यापेक्षा ते चंद्रावरचे दगड अधिक मोलाचे आहेत. लक्षावधी मैल दूर अंतराळात पृथ्वीभोवती परिभ्रमण करणाऱ्या चंद्रावर

अलगद उतरून, तिथल्या स्थितीचा अभ्यास करून तेथून येताना आणलेले ते ' दगड ' हे दगड आहेत असं कसं म्हणता येईल ? हजारो मैलांचं उड्डाण करून फ्रान्स, जर्मनी, स्वित्झर्लंड, हॉलंड, बेल्जियम, इंग्लंड आणि अमेरिका इथं ठिकठिकाणी मी गोळा केलेले ' दगड ' हेसुद्धा मला चंद्रावरच्या खडकाइतकेच मोलाचे वाटतात.

सकाळी आंघोळी आटोपून ब्रेकफास्टसाठी माडीवर आलो. हॉटेल इबिसमध्ये ब्रेकफास्टसुद्धा ' शाही ' होता. गरम गरम वाफा येत असलेले हॅम, स्क्रॅबल्ड एग्ज, ब्रेड, बटर, जाम, चीज ! काय खाऊ न् काय नको असं व्हावं ! पण या प्रवासात खाण्यापिण्याचा मोह मी कटाक्षानं आवरला होता. म्हणून दोन महिन्यांत एकदाही आजारी पडलो नाही. आमच्यासोबत असलेले काही प्रवासी पोट बिघडून घेत आणि मग डॉक्टर चव्हाणांच्याकडे येऊन गोळ्या मागत !

इबिस हॉटेलच्या बाहेर डॅनीनं गाडी उभी केली होती. हॉटेलसमोर पाण्याचा भलामोठा हौद होता. त्यात दाट पाणगवत उगवलं होतं. आणि ' चिर्रर्रर्र ' करणारी ' ' कूट ' पक्षांची पिलं तरंगताना दिसली. युरोप आणि अमेरिकेत असताना मी तो प्रदेश जसा एका लेखक आणि चित्रकाराच्या नजरेनं पाहात होतो, तसाच शिकाऱ्याच्याही नजरेनं आजूबाजूचं अवलोकन करीत होतो.

हॉटेल इबिसवरून आमची बस ॲमस्टरडॅममधली प्रेक्षणीय स्थळं पाहण्यासाठी निघालो. इबिसवर आम्हाला प्रेक्षणीय स्थळं दाखवण्यासाठी गाईडबाई आली होती. ती गाईड ' इलिना ' उत्कृष्ट इंग्रजी बोलत होती. जिनेव्हातल्या गाईड मीनाक्षीसारखी ही गाईडसुद्धा प्रेमळ होती. तिने ॲमस्टरडॅमची भौगोलिक स्थिती माईकवर सांगितली. ती म्हणाली, ' ॲमस्टरडॅम हे शहर नदींच्या पातळीपेक्षा सखलात आहे, त्यामुळे सागरावर कधी वादळ झाले आणि प्रचंड लाटा उसळल्या तर त्यांचे पाणी नद्यांत शिरते आणि शहराचा बराचसा भाग पाण्याखाली येतो. त्यामुळं शहरातल्या इमारती आणि आजूबाजूच्या जमिनीतील पिकांचं अतोनात नुकसान होतं १९५३ साली असाच समुद्र तुफान खवळला. नद्यांत पाणी शिरलं त्यामुळं हॉलंडचा सखल भाग जलमय झाला. उभ्या पिकांचं आणि

इमारतींचं अतोनात नुकसान झालं. जीवितहानीही प्रचंड झाली. अगणित गाईगुरं, कोंबड्या, पाळीव डुकरं प्राणाला मुकली. निमर्गाच्या कोपापुढं आमचं काहीच चाललं नाही. परंतु १९५३ नंतर आमच्या लोकांनी पुन्हा दुप्पट जोमाने झालेले नुकसान भरून काढले. सखल भागात येणारे समुद्राचं पाणी उपसून टाकण्यासाठी प्रचंड ' सक्शन पंप ' बसवले.

इलिना बोलत होती आणि कालव्यांचं जाळं पसरलेल्या हॉलंडच्या त्या राजधानीच्या शहरामधून आमची बस धावत होती. ' टॉवर ऑफ टिअर्स ' रॉयल पॅलेस या ऐतिहासिक महत्त्वाच्या वास्तु दाखवून झाल्यानंतर ॲमस्टरडॅमचा मशहूर असा लाकडी बूट जिथं तयार होतो ती फॅक्टरी दाखवण्यासाठी आम्हाला इलिना घेऊन गेली. एका विशिष्ट अशा ओकच्या झाडाचे ठोकळे यंत्राच्या साहाय्याने कोरून त्याचे बूट तयार केले जात होते.

त्याच फॅक्टरीत लाकडाची अनेक प्रकारची खेळणीही तयार केलेली होती. ॲमस्टरडॅमला तयार होणारे बूट हॉलंडमधले बहुसंख्य शेतकरी वापरतात. दलदलीच्या प्रदेशात पाय कोरडे ठेवण्याला हे बूट फारच उपयोगी पडतात. चामड्याचे बूट दलदलीत ओले होतात आणि ते फार काळ टिकत नाहीत. पण हे तिथं तयार होणारे लाकडी बूट मात्र दोन-दोन वर्षे टिकतात. भौगोलिक स्थितीला योग्य अशी ही हॉलंडची लाकडी बूट वापरण्याची पद्धत जगातल्या कुठल्याही प्रदेशात पाहायला मिळत नाही.

ॲमस्टरडॅमचे खास वैशिष्ट्य अशी ती हिऱ्याची फॅक्टरी बघण्यासाठी नंतर आम्ही निघालो.

मागे बऱ्याच वर्षांपूर्वी मी पुण्यात लॅंडस्केपचे एक पुस्तक खरेदी केले आहे. त्यात ॲमस्टरडॅम शहरातली जुन्या चित्रकारांनी काढलेली आकर्षक अशी अनेक पेंटींग्ज आहेत. मी त्यावरून बरीच चित्रं केली होती. पण प्रत्यक्षातलं ॲमस्टरडॅम हे त्याहूनही आकर्षक असं वाटलं. लाल विटांच्या पुलांचं निळ्याभोर पाण्यात पडलेलं प्रतिबिंब, ते कंपित करणारी ' क्वॅकऽऽ क्वॅकऽऽ ' करीत त्यातून तरंगत जाणारी बदकं, शहरात दळणवळणासाठी रस्त्याइतकाच कालव्यांचाही उपयोग केला जात होता. कालव्यांतून छोट्या-छोट्या होड्यांची अव्याहत अशी ये-जा सुरू होती. असे बरेच कालवे असलेले पूल ओलांडून आमची बस डायमंड फॅक्टरीजवळ

येऊन उभी राहिली.

फॅक्टरी फारशी मोठी नव्हती पण फॅक्टरीत प्रवेश करण्यापूर्वी अभ्यागतांसाठी जो स्वागतकक्ष होता, तो अतिशय प्रशस्त होता. याच हॉलच्या बाजूला चहा–कॉफी आणि कोल्ड्रिंक्स मोफत देण्याची व्यवस्था होती. कोणतीही गोष्ट फुकट मिळते म्हटल्यावर मोठ्या उत्साहानं आमचे सह–प्रवासी लगेच चहा–कॉफी घेण्यासाठी तिकडं धावले. छावडा, चोपडा या प्रभृतींनी दोन–दोन कप चहा घेऊनही ते तृप्त झाले नाहीत, तर त्यांनी पुन्हा ऑरेंज ज्यूसचे दोन–दोन ग्लास रिचवले. एकाच दमात उष्ण व शीतपेये पिणाऱ्यांच्या अधाशीपणाची कीव करावीशी वाटे, पण त्याचबरोबर विरोधी गुणधर्म असलेली पेये पचवण्याची त्यांची क्षमता पाहून आश्चर्य वाटे.

चहापानाचा कार्यक्रम उरकल्यानंतर एका अरुंद अशा जिन्याने आम्ही वरच्या मजल्यावर आलो. गाईड इलिनाने तिथल्या महिला व्यवस्थापिकेला अभिवादन करून म्हटलं, ' आय हॅव ब्रॉट इंडियन टूरिस्ट अलाँग वुईथ मी वुईल यू प्लीज काईंडली शो देम द् फॅक्टरी ?'

' ओ ऽऽओ ऽऽऽ! इटस् माय प्लेजर !' असं म्हणून तिनं आम्हा सर्वांचं स्वागत केलं आणि हिऱ्यांसंबंधी माहिती द्यायला सुरुवात केली ती म्हणाली, ' हिरे जगातल्या बऱ्याच देशांत सापडतात. तुमच्या भारतातसुद्धा हिरे सापडतात. तुमचा कोहिनूर हिरा जगप्रसिद्ध आहेच. खाणीत सापडलेल्या हिऱ्याला मोल असते, पण ते वृद्धिंगत होते ते त्याला पैलू पाडल्यामुळे ! आणि असे पैलू पाडण्याचे काम आमच्या ॲमस्टरडॅममध्येच होते. या विद्येत पारंगत अशी मंडळी इथंच आहेत. हिऱ्याला जितके जास्त पैलू तितके त्याचे मोल अधिक. मोहरीइतक्या लहान हिऱ्यास आमचे कुशल कारागीर छत्तीस पैलू पाडू शकतात. हिऱ्यामधे किंचित पिवळसर छटा असलेले हिरे काहीसे स्वस्त असतात तर अगदी स्वच्छ आणि शुभ्र हिऱ्यांच्या किंमती जास्त असतात. आता मी आपणाला या दोन प्रकारच्या हिऱ्यांमधे कसा फरक असू शकतो, हे प्रत्यक्ष तुलनेनेच दाखवते. कृपया आपण माझ्याबरोबर यावे. '

आम्ही सर्वजण त्या किंचित् कृश दिसणाऱ्या हातात हिऱ्याची अंगठी. कानांत हिरेजडित इअरिंग्ज घातलेल्या बाईच्या मागोमाग तिच्या ऑफिसात गेलो. तिने बटन दाबताच एका गृहस्थानं एक पेटी आणून तिच्यासमोर ठेवली-

तिने त्यातून निरनिराळ्या आकाराचे लहानमोठे हिरे असलेल्या पुड्या आमच्यासमोर सोडल्या. किंचित् पिवळी छटा असलेले हिरे, स्फटिकासारखे लखलख करणारे शुभ्र हिरे. भारतातल्या मानानं खूपच स्वस्त होते असं माईंनी मला सांगितलं. पण मी जाईल त्या ठिकाणची निरनिराळ्या आकाराची दगडं गोळा करणारा, मला त्या इवल्या इवल्या चमकणाऱ्या खड्यांत काहीच रस नव्हता. सुवर्ण आणि मृत्तिका समान मानण्याची माझी वृत्ती माईंना ठाऊक होती पण मला कौतुक वाटलं ते त्या इतक्या लहान–लहान हिऱ्यांना पैलू पाडणाऱ्या कलावंतांच्या कारागिरीचं !

थोड्या वेळानंतर ती बाई आम्हांला जिथं हिऱ्यांना पैलू पाडले जात होते त्या विभागाकडं घेऊन आली. पन्नाशीला पोहोचलेले तीन–चार लोक चोहोबाजूला काचेचे पडदे असलेल्या टेबलावर मधेच ग्राईंडर होता. हिऱ्यांना पैलू पाडणारा तो ग्राईंडर मी मोठ्या बारकाईनं पाहात होतो डोळ्याला मॅग्नीफाईंग ग्लास लावून इवले–इवले हिरे एका विशिष्ट प्रकारच्या पकडीत धरून हिऱ्यांना पैलू पाडण्यात गर्क झाले होते. त्या बाईनं सांगितलं, ' हे हिऱ्यांना पैलू पाडण्याचं काम काही विशिष्ट घराण्यातलेच लोक करतात. इथं ही माणसं आहेत, तर पलीकडच्या बाजूला त्यांची मुलं आहेत. हा धंदा पिढीजात आहे. मागें माऊंट अबूवर गेलो होतो तेव्हा तिथं 'देलवारा टेंपल' जवळ संगमरवरी कलाकुसर खोदणारी कुटुंबेच्या कुटुंबे मी बघितली होती. ' देलवारा टेंपल ' संपूर्ण संगमरवरी असून त्यातला कुठला भाग तुटला मोडला तर, तिथं राहणारी कुटुंब तसलाच नवीन भाग तयार करून जुन्या भागी बसवतात. मी गेलो होतो तेव्हा छतातल्या कमळाची एक पाकळी मोडली होती आणि छतातलं ते अख्खं कमळ खोदून काढून त्या जागी नवीन कोरलेलं संगमरवरी कमळ बसवण्याचं काम चालू होतं अशा बऱ्याच दुरुस्त्या केलेल्या मला दाखवण्यात आल्या होत्या. पण सांगितलं तेव्हाच ते समजत होतं त्या ठिकाणी ज्यांना नीट चड्डीसुद्धा घालता येत नव्हती अशी शेंबडी पोरं हातात छिन्न्या अन् हातोडा घेऊन तुटलेल्या संगमरवरी दगडांतून निरनिराळ्या आकृत्या कोरत होती सुरुवातीला ओबडधोबड मूर्त्या कोरणारी ती मुलं भविष्यात अतिकुशल असे शिल्पकार बनणार होती. गवयाचं पोर रडतानासुद्धा म्हणे सुरातच रडतं. पिढ्यान् पिढ्या

एकच व्यवसाय करणाऱ्या कलावंतांच्या हाती अनन्यसाधारण असं एक कसब येतं आणि अशाच प्रकारचं कसब मी ॲमस्टरडॅमच्या त्या डायमंड फॅक्टरीतल्या लोकांच्या हातात पाहात होतो.

त्यामानानं तिथं विक्रीला असलेले हिरे खूपच स्वस्त होते पण आमच्यापैकी कोणीच खरेदी केली नाही. उरलेल्या प्रवासात जवळ असलेले ' डॉलर्स ' पुरवून पुरवून सर्वांना खर्च करावे लागणार होते.

फॅक्टरी पाहून आम्ही खाली आलो. सर्वजण गाडीत बसले. डॅनीनं गाडी सुरू केली आणि इतक्यात फॅक्टरीचा शिपाई धावत गाडीजवळ आला आणि त्यानं डॅनीला गाडी उभी करायला सांगितलं. पुढं बसलेल्या मेहेरनोश पटेलला बाहेर बोलावून त्यानं काहीतरी सांगितलं.

तो शिपाई बाहेर उभा राहिला, अन् पटेल परत गाडीत चढला. त्यानं हातात माईक धरला आणि तो गंभीर आवाजात म्हणाला, ' फॅक्टरीतली आपणाला दाखवली गेलेली हिरे असलेली एक पुडी चोरीला गेलेली आहे आणि ती आपल्यापैकीच कोणीतरी उचललेली आहे, असा मॅनेजरनं आरोप घेतलेला आहे. तेव्हा आपणांपैकी ज्या कोणी ती पुडी घेतलेली आहे ती कृपा करून माझ्याकडे द्या. मी ती मॅनेजरची माफी मागून परत मॅनेजरला नेऊन देतो ! '

आम्हा सर्वांच्या तोंडचे पाणी पळाले. असलं धाडस आमच्यापैकी कोणी केलं असेल याची आम्हाला कल्पनाच करता येईना. माझ्या पाठीच्या मणक्यातून विजेचा प्रवाह गेल्यासारखे झाले. आजपर्यंत भारतीयांनी डिपार्टमेंटल स्टोअर्समध्ये गेल्यानंतर तेथील पायमोजे, नेकटाईज अशा सहजासहजी ढापण्यासारख्या वस्तू चोरलेल्या हकीगती मी ऐकलेल्या होत्या. पण हिऱ्यासारख्या मौल्यवान वस्तू कोणी उचलल्याचं ऐकिवात नव्हतं. प्रत्येकजण दुसऱ्याकडं संशयानं पाहू लागला. मला संशय आला तो चोपडा आणि छाबडा या दोघांचा. कारण कोणतंही खाद्यपेय फुकट मिळतं म्हटल्यावर तुटून पडणारे हे दोघे गृहस्थ पुडी उचलायला मागेपुढे पाहणार नाहीत असे वाटले. परंतु जोपर्यंत पुराव्याने सिद्ध होत नाही तोपर्यंत कोणालाही दोष लावता येणार नव्हता. जो तो आपल्या चेहऱ्यावर निष्पाप भाव आणून शेजाऱ्याला म्हणत होता, ' काय बुवा करावं लोकांना ! कुठं कसं वागावं

हे बिल्कुल समजत नाही. आता हे प्रकरण आपणाला भोवणार यात शंका नाही !'

आपआपसातल्या कुजबुजीशिवाय कोणीच काही हालचाल करीत नाही असे पाहून अगोदरच गंभीर चेहरा असलेला पटेल आणखीन थोडा गंभीर चेहरा करून म्हणाला,

' तुमच्यापैकी ज्या कोणी ती पुडी उचलली असेल त्यानं सरळपणानं ती पुडी काढून दिली नाही, तर बस सरळ पोलीस स्टेशनला जाईल. तिथं प्रत्येकाची कसून तपासणी घेतली जाईल ज्याच्याजवळ ती पुडी मिळेल त्याच्यावर खटला भरला जाईल. त्याला इथे जामिनावर देखील सोडणार नाहीत. कायद्याप्रमाणे गुन्हेगाराला कडक शासन केले जाईल. आणि हे सर्व वाचवायचे असेल तर, ज्याने कोणी क्षणिक मोहाला बळी पडून ती पुडी उचलली असेल, ती माझ्याकडे परत द्यावी. फॅक्टरीचा हा शिपाई पुडी मिळाल्याशिवाय इथून जाऊ देणार नाही !'

मी बसल्या जागेवरून पुन्हा एकदा बसमधल्या प्रवाशांच्या चेहऱ्यावरचे भाव न्याहाळत होतो. प्रत्येकजण आपण ' इनोसंट ' असल्याची ग्वाही देत होता. आमच्या सहप्रवासी स्त्रियांचे चेहरेही मी बारकाईनं न्याहाळले. भारतात परत गेल्यावर कानात हिऱ्याच्या कुडचा किंवा हिरेजडीत अंगठी बनवण्याच्या मोहाला बळी पडून एखाद्या महिलेला सुद्धा असा मोह होणं अगदीच काही असंभवनीय नव्हतं.

पाच मिनिटं झाली, दहा मिनिटं झाली, कोणीच काही हालचाल करत नव्हतं तेव्हा नारंगाच्या माताजी काहीशा सात्विक संतापानं पटेलला म्हणाल्या, ' तुम जावो और मॅनेजरको बतावो अगर वो चाहता है तो हमारी तलाशी लेवे ! हर इंडियन आदमी क्या चोर होता है ? वो हिरेकी पुडियाँ बतानेवाली फॅक्टरीके मॅनेजरने कुछ गडबडी की होगी !'

मग मात्र सर्वांना जरा हायसे वाटले. शेवटी भारतीयांचं निरपराधित्व मोठ्या विश्वासानं प्रतिपादन करणारी एक स्त्री निघाली याचं मला आश्चर्य वाटत होतं.

पटेल त्या शिपायासमवेत फॅक्टरीकडं गेला आणि त्यानं बसमधल्या सर्व प्रवाशांची झडती घेण्यास हरकत नाही असे मॅनेजरला सांगितले. आम्ही

आता ही सर्व लांबड लागणार असं गृहीतच धरून चाललो होतो. एकदा सोलापूरला असताना असाच प्रकार घडला होता. एका प्रवाशानं एस्. टी. त बसल्यावर तिकिट घेतलं आणि त्यानं ते पँटच्या मागच्या खिशात ठेवलं पुढे एस् टी काही अंतर गेल्यानंतर त्यानं कोणाचा पत्ता हवा होता म्हणून पँटमधलं पाकीट काढून घेण्याचा प्रयत्न केला. पण पाकीट हाताला लागण्याऐवजी मागच्या खिशातून त्याची दोन बोटं मात्र बाहेर आली. त्याचा पाकीट ठेवलेला तो खिसा सफाईदारपणे कापला गेला होता. त्यानं कंडक्टरला बोलावून वस्तुस्थिती दाखवली आणि त्याच्या मागं बसलेल्या दोन तरुणांचा संशय व्यक्त केला. त्यात त्याचीही काही चूक नव्हती. त्याच्या मागच्या सीटवर बसलेले दोघेजण मवाल्यासारखेच दिसत होते. पिंजारलेले केस, लाल चौकड्याचा भडक शर्ट, पान खाऊन दात रंगलेले, कानात घाणेरड्या वासाचा अत्तराचा फाया

बस मोहोळच्या पोलीस स्टेशनला नेण्यात आली. तिथं सर्वांची झडती घेतली. ज्याची चोरी झाली त्याच्या मागच्या सीटवर बसलेल्यांचीही पोलिसांनी झडती घेतली पण ते पाकीट काही मिळालं नाही मिळेलच कसं? गुन्हेगार हे काही कमी तयारीचे असतात? चोरीचा मुद्देमाल जवळ ठेवल्यावर काय होते याची त्यांना पूर्ण जाणीव असते पाकिटातले पैसे काढून घेतल्यानंतर त्या पाकिटात असलेल्या हेमामालिनीचा किंवा देवआनंदचा किंवा अमिताब बच्चनचा फोटो घेऊन त्यांना काय करायचं असतं? किंवा आतल्या चिठ्या–चपाट्यांशी त्यांना काय कर्तव्य असतं? पैसे काढून घेतले की चालत्या बसमधून पाकीट फेकून द्यायला कितीसा वेळ लागतो? शिवाय शेजारी त्याचा जोडीदारच होता. ते पाकीट मिळालंच नव्हतं. आमच्यापैकी कोणी ती हिऱ्यांची पुडी उचललीच असेल तर, त्याला पुरावा नष्ट करण्यासाठी ती हिऱ्यांची पुडी डॅनीच्या बसमधून फेकून देणं शक्य होणार नव्हतं कारण डॅनीच्या बसच्या काचा 'फिक्स' होत्या युरोप आणि अमेरिकेत क्वचितच बसच्या काचा वर–खाली करता येत. संपूर्ण बस 'एअर कंडीशन्ड' असल्यामुळं काचा वर–खाली करण्याचा प्रश्न उद्भवत नव्हता.

फॅक्टरीकडं गेलेला पटेल खाली मान घालून एकटाच परत आला आणि

डॅनीला म्हणाला,

' लेट अस् प्रोसीड !'

' क्या ? क्या क्या हो गया ? ' सर्वांनी पटेलला विचारायला सुरुवात केली.

' कुछ नहीं, वो हिरे गुम हो गये और मॅनेजरने हमारे उप्पर शक लिया था । '

नारंगांच्या माताजी क्रोधानं म्हणाल्या, ' उसको पूछनेका था, किसी आधारपर हमारे उप्पर शक लिया ? मैं बोलती हूँ यह युरोपियन लोग हमेशा हम इंडियन लोगोंको नीचें खेचते हैं । हम लोगोंको इस बारेमें इंडियन हायकमिशन में ' प्रोटेस्ट ' करना मंगता हैं ।

माताजी खरोखरच इंडियन स्पिरिटेड ' होत्या. त्यांनी खूप भलीबुरी दुनिया बघितली होती. आमच्या गाडीत बऱ्याच बायका होत्या त्यात ज्या दोन वृद्ध गुजराती स्त्रिया होत्या, त्यांनी घाबरून महावीर स्तोत्र वाचायला सुरुवात केली होती. पण नारंगाच्या माताजी मात्र आम्ही सर्वजण निरपराध आहोत असं पटेलला ठणकावून सांगत राहिल्या होत्या !

तो अर्धा तास कधीही विसरला जाणार नाही नंतर आम्हाला ॲमस्टरडॅमच्या परिसरात असलेल्या काही पवनचक्क्या दाखविण्यासाठी नेण्यात आलं. पूर्वी अशा शेकडो पवनचक्क्या ॲमस्टरडॅमच्या परिसरात होत्या. त्या फिरू लागल्या की दळप, कांडप, पाणी उपसणे इत्यादी कामं फिरत्या चक्राकडून करून घेतली जात. पण प्रचंड शक्तीची विजेची जनित्रं बनवल्यापासून अशा विंडमिल्कडं साहजिकच लोकांचं दुर्लक्ष झालंय. तरीपण जुनी आठवण म्हणून ॲमस्टरडॅम आणि परिसरात अशा सहा मोठ्या विंडमिल्स ' जतन करून ठेवण्यात आल्या आहेत.

ॲमस्टरडॅमच्या परिसरात भयंकर दलदल असल्यामुळं तिथं अनेक प्रकारचे ॲक्वीयन बर्ड्स् ( पाणपक्षी ) पाहायला मिळाले सकाळी उठल्या उठल्या इविससमोर ' कूट ' पक्ष्यांची विण बघितली होती. नंतर 'विंडमिल' पाहायला आलो तेव्हा, पिनेटल, रेडपोपर्ड, व्हाईट ब्रेस्टेड अशा जातीची बदकं पाहायला मिळाली ' क र्र र्र ऽ ऽ ' असा आवाज काढून वाकडे-तिकडे उडत जाणारे ' स्नाईप्स् ' ही दिसले.

अॅमस्टरडॅम सोडल्यानंतर आमची बस 'ब्रूसेल्स' या बेल्जिमयच्या राजधानीच्या रोखानं चालली होती. ब्रुसेल्सला आम्ही मुक्काम करणार नव्हतो. फक्त संध्याकाळचे 'साईट–सीईंग' करून भोजनानंतर 'झीब्रुग' या बंदराकडे जाणार होतो. 'झीब्रुग' वरून बोटीनं इंग्लंडला जायचे होते.

बेल्जिमय या देशाचे नाव वारंवार माझ्या 'हातात' असते एखादे नाव तोंडात आहे असे म्हणण्याची प्रथा आहे पण बेल्जियमचे नाव मी सतत माझ्या हातात असते असं म्हणतो याचं कारण असं, माझी डबल बॅरल ट्वेल्व्ह बोअर' बंदूक' मेड इन बेल्जिमय' आहे. ज्या ठिकाणी बंदुकीवर ही अक्षरं कोरून उठवलेली आहेत तो भाग, बंदूक चालवताना माझ्या डाव्या तळव्याखाली येतो. उन्हाळ्यात उडते तितर. धावते ससे यांच्या शिकारीला जाताना अगर हिवाळ्यात 'डक शूट' च्या वेळी मी ही बारा नंबरची बेल्जियममध्ये तयार झालेली बंदूकच वापरत असतो. माझी बंदूक ज्या या बेल्जियम देशात तयार झाली, तिथं बंदुकीची अनेक दुकानं आम्ही पाहिली. एक एक हत्यार असं देखणं की, काही विचारू नका. पॉइंट टू टू पासून ते अगदी मौजर, मॅग्नमपर्यंतच्या बंदुका त्या दुकानांतून पाहायला मिळाल्या. बेल्जियमचं हत्यार हे काही जगप्रसिद्ध नव्हे; तरीपण, भारतीय हत्याऱ्यांच्या मानाने कितीतरी पटीने ती हत्यारे उजवी असतात. आपल्याकडे इंडियन ऑर्डिनन्स फॅक्टरीनं बारा बोअरच्या दुनाळ (डबल बॅरल) बंदुका तयार केल्या आहेत. पण माझ्या ज्या परिचितांनी त्या बंदुका खरीदल्या आहेत, त्यांची घोर निराशाच झाली. बंदुकीचं एक खास वैशिष्ट्य असतं की, गोळी झाडल्यावर ती सट्कन् निघून जायला हवी. भारतीय बनावटीच्या बंदुकीतून गोळ्या निघून जातात, पण बंदूक उडवल्याबरोबर ती छातीला झाडते. कुठलेही स्फोटक हत्यार उडवले की, ते थोडे 'रिकॉईल' होतेच. पण भारतीय हत्यार इतक्या जोराने झाडते की, जशी काही एखाद्या नाठाळ गाढवाने छातीवर लाथच हाणलीय असा भास व्हावा. एका कोकणी माणसाने या इंडियन मेड बंदुकीने गोळी वापरून रानडुक्कर मारला. पण ज्यावेळी त्यानं ती मस्तकाचा वेध घेणारी गोळी उडवली होती, तेव्हा पुढे डुक्कर पडले, आणि इकडे गोळी मारणारा छातीला

हलका असल्याने जमिनीवर आडवा झाला होता !

उत्तम प्रकारच्या बंदुकी निर्माण कराव्यात व उत्तम दर्जाचा दारुगोळा ( Ammunition ) देशात निर्माण व्हावा असं आपल्या देशात फारच थोड्या लोकांना वाटतं युद्धसाहित्याविषयी आणि लढाऊ विमानांविषयी सुद्धा अजूनही आम्हाला कमालीची अनास्था आहे. अशा साहित्याबद्दल अजून आपणाला पाश्चिमात्य देशांकडे हात पसरावे लागतात क्षात्रतेजाची या देशाला बिलकूल गरज नाही. भजन, पूजन, पुढच्या जन्माची चिंता असले भोंगळ तत्त्वज्ञान शिकवणारे महाभाग अजूनही या देशात निर्माण होतात हेच आमचं दुर्भाग्य !

ब्रुसेल्सच्या मध्यवर्ती असलेल्या चौकात बराच वेळ 'विंडो–शॉपिंग' केल्यावर जेवणासाठी हॉटेलकडं जायची वेळ होत आली. हवेत कमालीचा गारवा दाटला होता. अंगात बंद गळ्याचं स्वेटर चढवूनही थंडी दाद देत नव्हती. मग बॅगेतली 'कोनॅक' ब्रँडीची बाटली काढून, बगिच्याच्या कट्ट्यावर बसून एक 'स्ट्रेट बडा टिकविला आणि डनहीलचे झुरके घेत गाडीत बसलो. या युरोप आणि अमेरिकेच्या वास्तव्यात मी अनेक प्रकारचं उत्तम मद्य चाखलं, अगदी मनसोक्त ! रॉयल सॅल्यूट, शिवाज रिगल, ब्लॅक आणि रेड लेबल, जॉनी वॉकर, 'बकार्डी रम, फ्रेंच कोनॅक ब्रँडी, रशियन व्होडका, लंडन ड्राय जीन, (या नावाची एक इंडियन जीन आहे, ती नव्हे) शॅंपेन, रेड आणि 'व्हाईट' वाईन, शेरी असे किती म्हणून प्रकार सांगावेत ? युरोपात उत्तम तऱ्हेची बिअर मिळते, पण बिअरची सर्वात मोठी अडचण म्हणजे, कुठेही फारसे सार्वजनिक टॉयलेट्स् नाहीत. त्यामुळं बिअर अनेकवेळा बाधक करायची म्हणून मी फारसा बिअरच्या वाटेला जात नसे. तशी फारच तहान लागली तेव्हा, एखादा टीन उघडून तोंडाला लावत होतो ती गोष्ट वेगळी !

ब्रुसेल्सला जेवणासाठी आलो तेव्हा, अंधार पडला होता. तिथेही 'टांग–भात' मेनू आहे की काय, अशी पुसट शंका आली पण माडीवर चढून जाताच, कोंबडीच्या रश्शाचा खमंग असा वास आला. सुके मटण, मसाल्याची कोंबडी पराठे असा अस्सल भारतीय मेनू पाहून तबियत खूष झाली. इथंही 'हेल्प युवरसेल्फ सर्व्हिस' होती मला ही जेवणाची पद्धत फार आवडते. आमच्या कोल्हापूरला असाच प्रकारच्या 'बफे' पार्टीज होतात

सर्व प्रकारचे खाद्यपदार्थ टेबलावर काचेच्या प्लेटस्मध्ये ठेवलेले असतात. ज्याला जे हवं ते त्यानं घ्यायचं अशा पद्धतीत जेवण टाकणे हा प्रकार घडत नाही. पण काही ठिकाणी आतून ताट वाढून आणतात, अन् त्यात आपल्याला आवडत नसलेले पदार्थसुद्धा इतके वाढलेले असतात की, ते टाकण्याशिवाय गत्यंतर नसते. मी काही ठिकाणी, केवळ स्वतःच्या मोठेपणा दाखविण्यासाठी, जेवल्यानंतर ताटात अन्न टाकणाऱ्या काही व्यक्ती बघितल्या आहेत. अशा व्यक्तींची मला मनस्वी चीड येते. या देशात लोकांना खायला अन्न मिळत नाही. तुमच्या नशिबानं सुग्रास अन्न पुढं येतं आणि तुम्ही ते ताटांत टाकून स्वतःचा मोठेपणा दाखविण्याचा प्रयत्न करता ? हा मोठेपणा नव्हे, ही मस्ती आहे ! पुरुषांपेक्षा स्त्रियांत ही ' व्हॅनिटी ' ( पोकळ मोठेपणा मिरवण्याची सवय) मोठ्या प्रमाणात आढळते. मी जर यदाकदाचित पार्लमेंटमध्ये किंवा विधानसभेत निवडून गेलो, तर ताटात अन्न टाकणे हा कॉग्निझेबल गुन्ह्याचा प्रकार समजावा असे विधेयक मांडल्याशिवाय राहणार नाही !

ब्रुसेल्सच्या हॉटेलमधले जेवण खरोखरच चविष्ट होते. ' कोनॅक 'चे अपिटायझर पोटात गेले होते. मसालेदार मुर्गी आणि पराठा यांचा अगदी मनसोक्त आस्वाद घेत होतो. हे हॉटेल हॉटेलसारखं वाटलं नाही. एखाद्या जहागीरदाराचा जुनाट वाडा असल्यासारखा त्या वास्तूचा चेहरामोहरा होता. या हॉटेलात एका बाजूला बार होता. या बारवर चक्क ' श्रीकृष्ण बार ' अशी अक्षरं होती. श्रीकृष्णाचा आणि मद्याचा काय संबंध हेच मला समजेना ! यमुनातटी गवळणी आणि गोपींसमवेत हातात टिपऱ्या घेऊन नृत्य करणाऱ्या श्रीकृष्णाचे नाव एखाद्या डान्सिंग स्कूलला किंवा डेअरीला दिले असते तर उचित ठरले असते. दह्यादुधाची चोरी करणारा कान्हा आम्हाला परिचित आहे. पण इथं मद्यालयाला आमच्या ब्रिजलालाचे नाव दिल्याचे पाहून मला त्या मालकाचा थोडासा राग आला.

भोजनोत्तर प्रवासाला पुन्हा सुरुवात झाली स्थितप्रज्ञासारखा दिसणारा डॅनी बस समुद्रकिनाऱ्याच्या रोखाने घेऊन निघाला होता. खुष्कीच्या मार्गाने सतत आठवडाभर प्रवास केला होता. त्या रात्री मात्र जलप्रवास घडणार होता आम्ही सर्वजण त्या जलप्रवासाला उत्सुक होतो.

झीब्रुगला पोहोचलो तेव्हा अंधार पडला होता. झीब्रुग हे बेल्जियमच्या उत्तर किनाऱ्यावरचं बंदर. बंदरावर मोठमोठाले मर्क्युरीचे दिवे होते एखादी जत्रा भरावी अशी त्या बंदरावर गर्दी झालेली होती आम्हाला इंग्लंडला घेऊन जाणारी बोट रात्री एक वाजता सुटणार होती.

पॅरिसपासून सतत आम्हाला स्वित्झर्लंड, जर्मनी, हॉलंड, बेल्जियम या युरोपियन देशांचं दर्शन घडवणारा फ्रेंच ड्रायव्हर डॅनी याला निरोप देण्याचा प्रसंग आला आम्ही चाळीस प्रवाशांनी पाच–पाच डॉलर्स वर्गणी जमवून त्याला दोनशे डॉलर्सची बक्षिसी दिली. कृतज्ञतेने आमचा सर्वांचा हस्तांदोलन करून त्याने निरोप घेतला, तेव्हा तो आणि आम्ही सर्वजण काहीसे भावनाविवश झालो. डॅनीनं इतकं सुरेख ड्रायव्हिंग केलं होतं की, कुठेही भीती वाटली नव्हती. अनपेक्षितरीत्या भरधाव गाडीला ब्रेक मारून प्रवाशांची डोकी समोरच्या बाकड्यावर आपटण्याची किमया करणारे बरेच स्वकीय चालक माझ्या माहितीचे होते. पण डॅनीचं ड्रायव्हिंग खरोखरच अफलातून होतं. या जन्मी पुन्हा डॅनी भेटेल की नाही कुणास ठाऊक ! पण स्थितप्रज्ञासारखा दिसणारा, चाळीस लोकांचे प्राण आपल्या हातात आहेत याची सदैव जाणीव ठेवणारा ' डॅनी ' या जन्मी विसरला जाणार नाही

सकाळी ॲमस्टरडॅम सोडल्यापासून सतत बसमध्ये बसून गुडघे आखडले होते म्हणून मी आपला बंदरावर फेऱ्या काढू लागलो. माई व उमेश स्वेटर घालून आत वेटिंग हॉलमध्ये बाकावर बसले होते. हवेत भलताच गारवा होता

वेटिंग हॉलच्या बाहेर एक फेरी मारून यावी म्हणून गेलो, तर निरभ्र आकाशात चंद्र तरळत होता. वेटिंग हॉलला लागून एक चबुतरा होता. त्या चबुतऱ्यावर पाय ताणून, हात उशाला घेऊन आकाशाकडं पाहात बराच वेळ पडून राहिलो. बेफाम मद्यपान केलेलं एक जोडपं माझ्याजवळ आलं. बेल्जियम भाषेत तरुणानं मला काहीतरी विचारलं. मला तो काय म्हणतो हे अंदाजानंच ताडावं लागलं. बहुधा त्याला वाटलं असावं की, मला जास्त झालीय म्हणून मी पडून राहिलो आहे. त्याची जोडीदारीण त्याला तोल सावरायला मदत करीत होती. आणि तीही माझ्याबद्दल सहानुभूतिपूर्ण

असे शब्द उच्चारत असावी. मी चक्क इंग्रजीत म्हणालो, ' आय एम नॉट टू मच ड्रंक, बट सिम्प्ली रिलॅक्सिंग '

माझ्या वाक्यातला ' रिलॅक्सिंग ' हा एकच शब्द त्याला समजला असावा. ' हॉ ऽ ऽ ऽ ! ' असा उद्‌गार काढून ते दांपत्य निघून गेलं. युरोपात अतिमद्यपान करणारी माणसं क्वचितच पाहायला मिळतात. जरी थोडी जास्त झाली तरी ' व्हायोलंट ' मुळीच होत नाहीत.

त्या गार वाऱ्यानं डोळे जड होऊ लागले बंदराकडे येणाऱ्या बोटींचे भोंगे वाजत होते. एका उंच पोलवर लावलेले लाल दिवे बोटींना मार्गदर्शन करीत होते दूर कोठेतरी असलेला द्वीपकल्पावरचा सर्चलाईट एकसारखा गोल फिरत होता समुद्रावरून वाहणारा ' ओझोन ' भलताच थंड वाटत होता. मुंबईला समुद्र–किनाऱ्याजवळ कित्येक रात्री मी राहिलो आहे. पण तिथं समुद्रावरचा वारा कधीही शीतल वाटला नव्हता मुंबईत बाहेर पाऊस पडत असला तरी, आत उकडत असतं मद्रासला तर काही विचारूच नका. बाहेर पाऊस पडत असला तरी, आत फॅन लावल्याशिवाय झोप येत नाही त्यावरून मला वाटायचं, प्रत्येक समुद्रकिनाऱ्यावर हीच अवस्था असावी. पण मी एक गोष्ट विसरत होतो की, विषुववृत्तापासून मी उत्तरेला कितीतरी दूरच्या प्रदेशात होतो

बाराच्या सुमारास चंद्र किंचित मावळतीकडं झुकला अन् मी त्या चबुतऱ्यावरून उठून आत वेटिंग हॉलकडं आलो तेव्हा ' पासपोर्ट– व्हिसा तपासण्यासाठी एका रांकेत उभे रहा ' अशी पटेलनं सूचना केली. सामान-सुमानाच्या बॅगा अगोदरच ' डॉक ' अधिकाऱ्याच्या ताब्यात दिल्या होत्या.

पावणाएकच्या सुमारास आमचे चेकिंग पूर्ण झाले आणि आम्ही किनाऱ्याच्या गॅलरीतून सरळ बोटीत चढलो. बोट फारशी मोठी नव्हती, पण हजार एक माणसं आणि चाळीस लहानमोठ्या मोटारी पोटात घेतल्यावर बोटीनं भोंगा वाजवला

बेल्जियमचा किनारा सोडल्यानंतर डुलत निघालेली बोट अंधारात लाटा कापत निघाली होती मला रेल्वेत आणि बोटीत इतकी छान झोप लागते, की काही विचारू नका. आमच्या हिंदुस्थानात मशहूर अशी जी बार्शी-लाईट रेल्वे, त्या रेल्वेतसुद्धा मला मला अगदी गाढ झोप लागते. धडक, धडक

चालणाऱ्या या मंदगती अग्निरथात झोपल्यावर फार बरं वाटतं एक तर गाडीच्या धक्क्याने अंगाला कोणीतरी ममाज करीत आहे आणि हळूहळू पाठीवर बुक्क्या मारत आहे असा भास होतो. काही क्षणातच निद्राधीन होता येतं !

मी एका बाकड्यावर आडवा झालो. माझ्या डोक्याशी सोनेरी केस पिंजारलेला एक प्रवासी झोपला होता. बाकी इतर प्रवासी बसल्या जागेवरच डुलक्या घेत होते बोटीच्या खिडकीतून थंड वारा येत होत्या. अंगात बंद गळ्याचे जाड उलनचं स्वेटर आणि उलनची पँट असूनही हुडहुडी भरण्याइतका गारठा जाणवत होता त्यामुळं एरव्ही प्रवासात गाढ झोपणारा मी, सारखा या कुशीवरुन त्या कुशीवर होत होतो. झोप येईना म्हणून बोटीवर फेरफटका मारुन आलो. प्रवासात जी विदेशी जोडपी होती, ती एकमेकांना आलिंगन देऊन थंडीपासून थोडा बचाव करण्याचा प्रयत्न करीत होती.

मी पुन्हा बाकड्यावर पडून राहिलो. पण त्या रात्री कडाक्याच्या थंडीमुळं मला बिलकूल झोप लागली नाही. शिवाय अधूनमधून बोट भोंगा वाजवत होती व त्या आवाजानं सारी बोट कंपायमान होत होती. मी हातातल्या घड्याळात पाहिले पहाटेचे चार वाजून गेले होते इंग्लंडचा किनारा केव्हा एकदा येतो असं मला झालं होतं.

युरोपमध्ये फ्रान्स, स्वित्झर्लंड, जर्मनी, हॉलंड आणि बेल्जियम हे देश बघितले होते. त्या देशांची प्रगती, स्वच्छता, टापटीप, त्यांचं राष्ट्रप्रेम हे सुद्धा पाहायला मिळालं होतं, पण तरीही इंग्लंड बघण्यासाठी अतिशय आतुर झालो होतो.

इंग्लंड ! या देशाबद्दल लहान असताना मला मनस्वी तिरस्कार होता. कारण तो पारतंत्र्याचा काळ होता. आमच्या देशावर हुकुमत गाजवणारा, स्वातंत्र्यप्राप्तीसाठी आवाज उठवणाऱ्या आमच्या नेत्यांना तुरुंगात डांबणारा, फोडा आणि झोडा या कुटिल नीतीचा अवलंब करुन जातीजातीत वैमनस्य फैलावणारा ब्रिटन, जालियनवाला बागेत शेकडो निरपराध भारतीयांना गोळ्या घालणारा ब्रिटन, शहीद भगतसिंगांना फासावर लटकवणारा ब्रिटन, स्वराज्य हा माझा जन्मसिद्ध हक्क आहे असे म्हणणाऱ्या लो. टिळकांना

अंदमानात पाठवणारा ब्रिटन, अशा अनेक कारणांमुळं त्या शाळकरी वयात मला इंग्रजांबद्दल मनस्वी तिरस्कार वाटत असे.

पण पुढे याच साहेबानं शेवटी १९४२ च्या उग्र आंदोलनाची दखल घेतली. दुसऱ्या महायुद्धाने खिळखिळ्या झालेल्या ब्रिटिश सरकारला आमचा प्रचंड देश आपल्या अधिपत्याखाली ठेवणं कठीण झालं. शेवटी क्लेमंट ॲटली-साहेबांनं Indian Independence Act ब्रिटिश पार्लमेंटमध्ये पास करून घेतला अन् आम्हाला स्वातंत्र्य मिळालं. दीडशे वर्षांची गुलामगिरी संपुष्टात आली !

कालांतराने ब्रिटिशांच्याविषयीची कटुतासुद्धा कमी होऊ लागली स्वातंत्र्यप्राप्तीनंतरसुद्धा आम्ही ब्रिटिश कॉमनवेल्थमधे राहण्याचा निर्णय घेतला आता त्या गोष्टीला चौतीस वर्षं उलटली. इंग्रजांबद्दलचा तिरस्कारही आता संपला.

पण इतकं होऊनही आमच्यावर 'साहेबानं' उठवलेला ठसा इतका भक्कम आहे की आमच्या सुशिक्षित आणि सधन वर्गात 'साहेबी' थाटानं वागणं हे प्रतिष्ठेचं लक्षण मानल जातं. आमच्या मानेवरचं 'जू' उचलून घेऊन साहेब निघून गेला तरीही, मानेवर 'जू' असल्याप्रमाणं आम्हांला वागायला लावणारा हा 'साहेब', त्याचा तो देश बघण्याची उत्सुकता मला काही केल्या दडपून टाकता येत नव्हती.

त्या अंधारात बोट नेमकी कोणत्या दिशेला चालली आहे. हे समजत नव्हतं. पण हळूहळू एका दिशेला फटफटायला लागलं आणि त्याच्या विरुद्ध दिशेला बंदर दिसू लागलं.

बोटीतल्या स्पीकरवर शब्द उमटले : युवर अटेन्शन प्लीज ! वुई आर नाऊ टचिंग द् इंग्लिश हार्बर ऑफ डोव्हर !'

डोव्हरच्या किनाऱ्याला बोट लागली. खांद्याच्या बॅगा सावरीत आम्ही बोटीला जोडलेल्या गॅलरीवरून बंदरावर आलो. त्यावेळी तिथं बरीचशी गर्दी जमली होती. दुसऱ्या ठिकाणावरून आलेले बरेच परदेशी प्रवासी तिथं जमले होते. इमिग्रेशन क्लिअरन्स करण्यासाठी आम्ही सारेजण आमचे पासपोर्ट हातात घेऊन ओळीनं उभे राहिलो

आमच्याप्रमाणंच प्रवाशांच्या इमिग्रेशन क्लिअरन्ससाठी रांगा लागलेल्या

होत्या. त्यांत बरेचशे गांजेखस हिप्पी तरुण–तरुणी होते. सर्वांना अंगात निळया जीन्स आणि चौकड्याचे जर्कीन्स घातले होते. एकजण भल्या रामप्रहरी गांजा भडकल्यासारखा वरळत काहीतरी विनोद करीत हिप्पींच्या मेळाव्यात फिरत होता त्या सर्वांनी गेल्या दोन महिन्यांत आंघोळ केलेली नसावी आणि कपडेही बदललेले नसावेत. युरोपात अतिभौतिक प्रगतीमुळे काही प्रमाणात वैफल्यावस्था निर्माण झाली आहे. फस्ट्रेट झालेल्या त्या तरुणांची झुंड पाहून किळस येत होती. तिथं कोणीसं सांगितलं की, ही मंडळी कुठंही राहतात, काहीही खातात. त्यांना कसलाच विधिनिषेध नसतो. पॅरिसमधे कॉंकॉर्डेशन स्क्वेअरमधे आणि ब्रुसेल्सला चौकामध्ये अशी 'फस्ट्रेट' झालेली अनेक तरुण मंडळी मी बघितली होती.

इमिग्रेशन ऑफिसरनं मला विचारलं, 'हाऊ लॉंग यू आर गोईंड टू स्टे इन लंडन ?'

'ओन्ली फॉर थ्री डेज सर !'

'ओऽऽह डॅटस् फाईन !' माझ्या पासपोर्टवर शिक्का उठवत तो म्हणाला 'हॅव ए नाईस टाईम इन लंडन !'

'थँक्यू ऽऽ सर.' पासपोर्ट परत बॅगेत ठेवीत मी त्याचे आभार मानले. माईंना व उमेशनाही तेच प्रश्न विचारले गेले. माईंनीही माझ्याप्रमाणंच उत्तर दिलं पण उमेशना इंग्लंडला पुन्हा एकदा यायचं होतं. त्यांना नेदर्लंडस्‌ला जाण्यासाठी आमची अमेरिकेची सफर संपल्यावर लंडनला उतरून हॉलंडला जावे लागणार होते त्यांनी 'मल्टीपल एंट्रीसाठी' विनंती केली आणि त्या अधिकाऱ्यानं ती मान्य केली.

डोव्हर ते लंडन अंतर जवळ जवळ तीस–चाळीस मैल आहे. आम्ही सर्वजण लंडनला जाण्यासाठी आतुरलो होतो. बाहेर आम्हाला लंडनला घेऊन जाण्यासाठी बस थांबली होती

प्रवासी म्हणून ब्रिटनमध्ये यायचं आणि तिथेच स्थाईक व्हायचं अशा मार्गानं अनेक भारतीय इंग्लंडमध्ये येऊन ठाण मांडून राहिले आहेत प्रवासी म्हणून येणाऱ्या भारतीय प्रवाशांची कसून तपासणी केल्याशिवाय त्यांना इंग्लंडच्या भूमीवर प्रवेश करू द्यायचा नाही, अशा सूचना संबंधित अधिकाऱ्यांना ब्रिटिश सरकारतर्फे देण्यात आलेल्या आहेत. विशेषतः तरुण आणि अविवाहित

प्रवाशांच्या बाबतीत त्यांच्या हेतूची सखोल अशी चौकशी केली जाते. आमच्या सफरीत तीन चमत्कारिक तरुण होते. 'डेमन' चोपडाचा मुलगा एक, दुसरा बाजपेयी आणि तिसरा भट्टाचार्य !

वीस ते पंचवीस वयोमर्यादेमधले हे तिघे तरुण जेव्हा इमिग्रेशन ऑफिसरसमोर उभे राहिले, तेव्हा त्यांच्यावर त्या अधिकाऱ्याने प्रश्नांचा भडिमार सुरू केला. त्यात बाजपाई हा थोडासा अर्धवट आणि उर्मटपणानं बोलला. भट्टाचार्य अबोल होता. पण तो बंगालचा. लाल डोळे आणि डोक्याचे केस पिंजारलेले, त्यामुळं तो नक्षलवाद्यासारखा दिसायचा. काही माणसं स्वभावानं अत्यंत सालस असतात, पण दिसतात मात्र भयंकर! भट्टाचार्यच्या बाबतीतही नेमकं तेच घडलं होतं. चोपडा हा दिसायला जरासा वेडपटच होता. तो एकसारखा हिंदी सिनेमातल्या गाण्याच्या ओळी गुणगुणायचा आणि हवेत तरळल्यासारखा चालायचा. परिस्थितीचं गांभीर्य त्याच्या चेहऱ्यावर बिल्कुल दिसत नसे.

अर्थात या तिघांना इमिग्रेशन अधिकाऱ्यानं 'तुम्हाला इंग्लंडच्या हद्दीत प्रवेश देता येत नाही' असं सांगून टाकलं. आता भारत सोडल्यापासून आमच्यासमवेत असलेल्या त्या तिघांना इंग्लंडमध्ये प्रवेश नाकारला म्हटल्यावर आम्हा सर्वांनाच वाईट वाटलं. पटेलनं त्या अधिकाऱ्याला विनंती केली. तो म्हणाला, 'या तिघांनीही टी. सी. आय. कडे प्रत्येकी बावीस हजार रुपये भरले आहेत. ते तिघे आमच्यासमवेत अमेरिकेला येणार आहेत. त्यांचा अमेरिकन व्हिसा देखील मंजूर करण्यात आलेला आहे. तेव्हा कृपया त्यांना आमच्यासोबत येऊ द्या.'

'यू प्लीज वेट फॉर सम टाईम. वुई वुईल डिस्कस द् मॅटर वुईथ हायर ॲथॉरिटीज.'

तोवर बाकीचे प्रवासी बाहेर थांबून होते. पण आमच्यातले तथाकथित पुढारी श्रीमान् गर्ग (अगरबत्तीवाले) यांना आपली अक्कलहुशारी दाखविण्याची खुमखुमी आली. पटेलनं त्यांना गप्प बसण्याची विनंती केली, ती झुगारून ते इमिग्रेशन अधिकाऱ्याला आपल्या धेडगुजरी इंग्रजीत म्हणाले,

'वॉट यू पीपल थिंक अबाऊट वुई इंडियन्स ? आँ ऽऽऽ ? वॉट इज धिस ?'

त्या अधिकाऱ्याने डोळ्यावरचा चष्मा कपाळावर ढकलून गर्गकडे पाहात म्हटलं,

' हू आर यू ?'

' आय यम् इंडियन, अँड आय वॉज ए क्लार्क इन डेहल्ली सेक्रेटरीएट ! यू वुईल हॅव टू रिलीज अवर थ्री पॅसेंजर्स ! '

तो अधिकारी डोळे बारीक करून म्हणाला. ' आय हॅड ए माईंड टू अलाऊ देम टू गो, बट नाऊ आय वुईल नॉट, प्लीज गेट लॉस्ट ! ' असं म्हणून त्यानं बाजूला उभ्या असलल्या ' बॉबी'ला (इंग्लंडमधल्या पोलिसाला 'बॉबी' म्हणतात. राजकपूरचा बॉबी नव्हे ! ) हाताच्या बोटानं खूण केली. तेव्हा मात्र गर्गसाहेब सटपटले. ज्या गोष्टी सामोपचारानं घडणं शक्य होतं, त्यात या गृहस्थानं अतिशहाणपणा करून घोटाळा निर्माण करून ठेवला होता. डोव्हरच्या किनाऱ्यावर आम्ही उतरलो होतो तेव्हा साडेपाच वाजले होते. आता आठ वाजून गेले तरी आम्ही त्या तिघांसाठी ताटकळत उभे होतो गर्गसाहेबानं आमच्या कोल्हापुरी भाषेत बोलायचं म्हणजे, ' बाबचा ' करून ठेवला होता. त्यामुळं ते जेव्हा बाहेर आले तेव्हा सर्वांनी त्यांना ' तुम्हाला कोणी अगाऊपणा करायला सांगितला होता ?' अशी प्रश्नांची सरबत्ती करून त्यांना बेजार करून सोडले. ज्यावेळी गर्ग त्या तिघांची बाजू मांडायला इमिग्रेशन अधिकाऱ्याकडं निघाले होते, तेव्हा त्यांच्या पत्नी मोठ्या अभिमानानं म्हणाल्या होत्या, ' देखो तो सही, हमारे साहाब उन तीनोंको रिहा कर लायेंगे. '

इमिग्रेशन ऑफिसमधला सगळा प्रकार मी बघितला होता. ते जेव्हा ' बॉबी 'ला बघून जवळजवळ धापावत बाहेर आले. तेव्हा मी मनाशी म्हटलं, ' उन तिन्होंको छोडो, ये साहाब खुद ' अंदर ' जाते थे !' ' अंदर ' या शब्दाचा अर्थ ' पोलीस कोठडी !'

थंडी काही कमी होत नव्हती समुद्रावरून तरळणारं धुकं किनाऱ्याला वेढून राहिलं होतं. चहा पिण्याची तल्लफ इतका वेळ दडपून टाकली होती. लंडनला हॉटेलवर गेल्यानंतर दाढी. आंघोळ उरकून झक्कपैकी ब्रेकफास्ट घ्यायचा अन् मगच त्यावर गरम गरम चहाचे घुटके घ्यायचे असं ठरवलं होतं पण आता ' डोव्हर ' बंदरावरच आम्ही अडकून पडलो होतो. माई,

उमेश आणि मी बाजूच्या कॅफेमध्ये गेलो. चहा आणि रोल्स मागवले. आमच्यामागोमाग इतरही सहप्रवासी आले. जो तो गर्गना शिव्या घालत होता. एकजण म्हणाला, ' ये गर्ग कौन ऐसा बडा अँबॅसॅडर लगा है ? ये तो देहल्ली सेक्रेटिरीएटमें खाली बाबू (क्लार्क) था !'

ती चर्चा ऐकत आम्ही चहा संपवला आणि परत गाडीकडं आलो. गाडीचा ड्रायव्हर रिचर्ड आठव्या एडवर्डसारखा दिसत होता. अगदी टिपिकल इंग्रज होता सरळ नाक, निळे डोळे, निमुळती हनुवटी आणि अतिशय हळू बोलल्याची पद्धत. साडेनऊच्या सुमारास तोही काहीसा अस्वस्थ होऊन म्हणाला, ' देअर इज ए प्रोसेशन टुडे इन लंडन. दी नेशन इज सेलेब्रेटिंग टुडे हर मॅजिस्टी द् क्विन्स् फॉर्टीनाइन्थ बर्थ डे ! हर मॅजिस्टी गोज वुईथ द् प्रोसेशन. वुई शुड रीच लंडन बाय टेन थर्टी !'

(आज आमच्या राणीचा एकोणपन्नासावा वाढदिवस देश साजरा करीत आहे. आज राणीसाहेब समारंभानं मिरवणुकीत सामील होणार आहेत. आपण साडेदहापर्यंत लंडनला पोहोचायला हवं !')

इंग्रजांचं सर्वांत आश्चर्य करण्यासारखं वैशिष्ट्य म्हणजे त्यांची राजघराण्यावरची निष्ठा ! जगातल्या जवळ जवळ सर्वच राष्ट्रांतले 'राजे लोक आज इतिहासजमा झाले आहेत. पण इंग्लंडमधली राजेशाही ही मात्र अद्यापही अस्तित्वात आहे.

इंग्लंडमध्ये राजाला किंवा राणीला तसे काहीच अधिकार राज्यघटनेने दिलेले नाहीत. इंग्लंडची पार्लमेंटच सार्वभौम आहे. राज्यशकट हाकण्याची सर्व जोखीम आणि सत्ता पंतप्रधानाच्या हाती असते. पण तरीही याच इंग्लंडनं आपली परंपरागत राजेशाही आणि तिच्याभोवतालचे अद्‌भूत वलय जतन करून ठेवले आहे. ब्रिटनच्या आर्मी, नेव्ही आणि एअरफोर्सची राणी ही ' सुप्रीम कमांडर ' आहे. तशीच ती शासनयंत्रणेतील एक महत्त्वाचा घटक आहे. पार्लमेंटच्या दोन्ही सभागृहांत सम्मत झालेल्या विधेयकावर जोपर्यंत राणी आपले शिक्कामोर्तब उठवत नाही तोपर्यंत त्या विधेयकाचे कायद्यात रूपांतर होत नाही. ' The king can do no wrong ' म्हणणाऱ्या इंग्लंडच्या जनतेचं वैशिष्ट्य हे की, त्याच निष्क्रिय अशा राणीला ते परमेश्वराइतकंच पवित्र मानतात !

अशा या राणीच्या एकोणपन्नासाव्या वाढदिवसाची मिरवणूक पाहायला मिळणार नाही म्हणून आमच्या बसचा ड्रायव्हर–रिचर्ड-नाराज झाला होता.

शेवटी मी पटेलला विचारलं, ' समजा, त्या तिघांना सोडलंच नाही, तर पुढं काय ?'

' पुढं त्यांना इथूनच इंडियाला परत जावं लागेल. पण पाहू. मी पुन्हा एकदा इमिग्रेशन ऑफिसरला विनंती करून पाहातो. मिस्टर गर्गनी तो तमाशा केला नसता तर, एव्हाना ती पोरं सुटलीसुद्धा असती. '

' आता झालं ते कशाला पुन्हा काढायचं ? तुम्हीच जरा मवाळ भाषेत सांगून पाहा. म्हणावं, सदतीस लोक त्या तिघांसाठी अडकून पडले आहेत !'

' हो, मी जाऊन येतोच !'

मेहेरनोश पटेलच्या प्रयत्नांना यश आले. इमिग्रेशन अधिकाऱ्यानं त्या तिघांनाही सोडून दिलं. पण त्यांना सोडून दिलं या घटनेचा आनंद आम्हाला उपभोगता आला नाही कारण तिघांपैकी दोघांच्या सूटकेसेस कुणीतरी लंपास केल्या होत्या त्यात भट्टाचार्यच्या बॅगेत त्याचे शे–दोडशे डॉलर्स होते, शिवाय त्यात त्याचे कपडेही होते. बाजपेयीची बॅग चोरीला गेली होती. बोटीतून सर्वांचं सामान बाहेर आणून ठेवलं जातं त्यावेळी ते ज्याचं त्यानं आपल्या ताब्यात घ्यायचं असतं. पण त्या तिघांच्या सूटकेसेसवर नजर ठेवावी. त्या चोरीला जातील याची आम्हांपैकी कोणालाही कल्पना नव्हती. युरोपमधले लोक अतिशय प्रामाणिक आहेत. पेपरस्टॉलवर किंवा पेट्रोल पंपावर विक्रेते नसतात, आपण स्वत:च पेपरची किंमत जवळच्या डब्यात टाकायची असत, पेट्रोल घेतलं की पेट्रोलची किंमतही जवळच्या कॅशबॉक्समध्ये टाकायची असते. असे प्रकार ऐकले होते. तेव्हा ' रामराज्य ' नावाचा इतिहासकालीन भारतात वारंवार उच्चारला जाणारा प्रकार निदान युरोपात पाहायला मिळेल असं वाटलं होतं पण इंग्लंडच्या किनाऱ्यावर उतरल्या उतरल्या आमच्या त्या सहप्रवाशांच्या बॅगा चोरीला गेल्याचं पाहून फार वाईट वाटलं

प्रकरण पोलिसांत गुदरलं गेलं. आम्हांला शंका होती ती त्या हिप्पी जथ्थ्याची. उठल्या उठल्या मादक पदार्थ सेवन करून एकसारखे धुम्रपान करणारी पोरं आणि पोरी यांचंच हे काम असावं अशी शंका मी व्यक्त

केली. पटेलनं बाजपायी आणि भट्टाचार्य यांना सोबत नेऊन डॉकयार्डच्या पोलीस स्टेशनमध्ये फिर्याद नोंदवली.

मी मनाशी म्हटलं, 'जगात उत्कृष्ट 'डिटेक्शन' (गुन्हे शोधून काढणारी यंत्रणा) आहे ती लंडनमध्ये असं आजपर्यंत आम्ही ऐकत होतो. शिवाय त्या हिप्पींना घेऊन जाणारी बस इतक्यात लंडनमध्ये पोहोचणं शक्य नव्हतं. डोव्हर डॉकयार्डच्या पोलिसांनी जर तात्काळ वायरलेस मेसेज पाठवले, तर डोव्हरवरून जाणाऱ्या बसेस उभ्या करून तपासल्या जाऊन त्या बिचाऱ्या पोरांच्या बॅगा परत मिळाल्या असत्या पण अनुभव मात्र फारच निराळा आला. लंडन-पोलिसांनी कसलीच तत्परता दाखवली नाही. चोरी झाली ते 'गोऱ्या कातडीचे' असते तर कदाचित् हालचाल झटपट झाली असती.

फिर्याद नोंदवल्यानंतर आम्हाला पुन्हा पाऊण तास तिथं थांबून ठेवलं गेलं या पाऊण तासात आमच्यातले अनेक 'शहाणे' पोलीस स्टेशनकडे जाऊन अफवा घेऊन यायचे छावडा – फौंटनपेन विकणारा सेल्समन – गाडीत आला आणि सर्वांना हातानं शांत राहण्याचा इशारा करीत म्हणाला,

'अभी मैं पुलिस स्टेशनमें जाके आया। बाजपेयी और भट्टाचार्यकी सूटकेसें मिल गई। यहाँसे पच्चीस मीलपर हिप्पी लोगोंकी बस ठहरायी गई और तलाशमें दोनों सूटकेसें मिल गई। देखो भाई, हमारे बंबईमें ऐसा हो जाता, तो कुछ पता नहीं लग जाता। लेकिन यह स्कॉटलंड यार्ड के पुलीसवाले है! इन लोगोंको बधाई देना जरूरी है!'

आम्ही सर्व खरोखरच आश्चर्यचकित झालो. पटेल धावतच पोलीस स्टेशनकडे गेला. तो पाच मिनिटांतच परतला, आणि काहीसा वैतागून उद्गारला, 'सब गलत बात है! सूटकेसेंस नहीं मिली!'

पण सूटकेसेस चक्क मिळाल्या आहेत असं खोटं सांगणारा छावडा गाडीच्या खाली उतरून तीस छाप बिडी ओढत शांतपणे उभा होता. काही जणांनी त्याला दरडावून विचारलंसुद्धा,

'भाई, ऐसी झूट बात क्यूँ बोले?'

'इसमें झूट कहाँ है? उन लोगोंके सूटकेसें नहीं मिले तो भी मिल जाएंगे!'

बोलून–चालून जातिवंत सेल्समनच तो. त्याला सत्याची चाड अशी मुळीच नव्हती. त्याचा दोस्त तो दुकानदार, त्याची बाजू सांभाळत म्हणाला, ' बॅगा कुठंच जाणार नाहीत. निदान लंडन शहराच्या म्युन्सिपाल्टीच्या नाक्यावर का होईना त्या बॅगा सापडणारच ! '

अगोदर लंडनला म्युनिसिपालिटीचा नाका आहे की नाही याची कल्पनासुद्धा नसताना, तो दुकानदार तळेगाव किंवा लोणावळा म्युनिसिपालिटी नाक्याजवळ जशी वाहने उभी करतात तशीच लंडन म्युनिसिपालिटीच्या नाक्यावर वाहने उभी करीत असावीत अशा थाटात बोलत होता.

शेवटी गेलेल्या बॅगा मिळाल्या तरी नाहीतच. पण सव्वा अकरा वाजता लंडन शहरात निघणारी राणीच्या वाढदिवसाची शाही मिरवणूक बघण्याचा योगही हुकला. वाजपाई आणि भट्टाचार्य या दोघांनी जरा डोकं ताळ्यावर ठेवून उत्तरं दिलीं असती, तर सारं सुरळीत घडलं असतं. पण नको तिथं शहाणपणा आणि अक्कलहुशारी दाखवण्यात आम्हा भारतीयांचा हात कोण धरणार ?

ज्यावेळी बसने डोव्हर बंदराचा निरोप घेतला, तेव्हा पावणे–बारा वाजले होते. सुमारे तासभर प्रवास सुरू होता. डोव्हर सोडल्यानंतर हिरवळ दिसू लागली. इथंही जर्मनी आणि स्वित्झर्लंडसारखी मोठी गव्हाची शेतं दिसत होती. काही ठिकाणी प्रचंड अशी गवती कुरणं दिसली. लाकडी कंपाऊंडमध्ये फिरणारी रेसची घोडीही दिसली. भारतात इंग्लिश पेडीग्रीच्या रेसच्या घोड्याला फारच भाव असतो. ज्याच्या आई–बापाने एकदा डर्बी रेस जिंकली आहे अशा घोड्याला भारतात एका मालकानं दहा लाख रुपये मोजल्याचं मला ठाऊक आहे.

लंडन शहराची हद्द सुरू होईपर्यंत लहान–मोठे असे बरेच ' स्टड फार्मस् ' दिसले.

इंग्लंडमध्ये वर्षातले दहा महिने धुकं असतं असं आम्ही आपलं ऐकत होतो, पण ज्यावेळी लंडनच्या ' औटस्कर्ट ' मध्ये आम्ही प्रवेश केला तेव्हा हवा इतकी सुरेख होती की, ' दूर क्षितिजावर असलेल्या हिथ्रो विमानतळावरून उड्डाण करणारी आणि ' लँडींग गीअर ' (चाकं बाहेर काढण्याची क्रिया) टाकून उतरण्यास सज्ज झालेली अशी विमानंसुद्धा दिसत होती.

बहुसंख्य घरं विटांची होती. घरांना मातीची कौलं क्वचितच दिसली. झाडाच्या सालीसारखे डांबर आणि सिमेंट यांचं मिश्रण करून तयार केलेल्या शीटस् होत्या.

बराच काळपर्यन्त दारं–खिडक्या बंद असलेल्या शहरातल्या भागातून आमची बस चालली होती हळूहळू रस्त्यावरची रहदारी वाढू लागली. उंच आधुनिक इमारती दिसू लागल्या.

बसनं लंडनच्या मध्यवस्तीत प्रवेश केला होता. इतिहास, भूगोलांत अभ्यासलेली एखादी ओळखीची वास्तू दिसते का हे गाडीच्या काचेतून पाहात होतो, त्यावेळी बिग बेन टॉवर दिसला. आपल्या मुंबईच्या राजाभाई टॉवरसारखाच वाटला तो मला थेम्स् नदीनं लंडन शहर दुभंगलं गेलं आहे. शहराच्या दोन्ही भागांना जोडणारे अनेक पूल दिसले. त्यातच ' टॉवर ब्रिज ' दिसला. थेम्सच्या पात्रात एखादी मोठी बोट यायची असली की टॉवर ब्रिज खुलतो आणि त्यातून बोट आत प्रवेश करते. पुन्हा तो ब्रिज बंद होतो.

' मेरीलीबॉन ' या रेल्वे स्टेशनजवळच्या ' हॉटेल हेरवूड ' मध्ये आमची व्यवस्था करण्यात आली होती दिवसाला तीस पौंड म्हणजे साधारण सहाशे रुपये भाडं असणारं ते हॉटेल जरी जुन्या इमारतीत असलं तरी, अत्याधुनिक होतं

दुपारचे दीड वाजता आंघोळी उरकल्या आणि जेवणासाठी बाहेर पडलो. युरोपमध्ये हॉटेलात फक्त ब्रेकफास्ट दिला जातो, तो सुद्धा सकाळी सात ते साडेआठपर्यंतच. तुम्ही उशीरा गेलात तर चहासुद्धा मिळत नाही म्हणून बाहेर बाजूलाच एक लहानसं हॉटेल होतं, तिथं जाऊन हॅम्बर्गर आणि हॉट डॉग्ज् घेतले वर एक चहा मारला आणि परत हॉटेलकडं आलो. कारण हॉटेलातल्या टी व्ही. वर राणीची सकाळी झालेली मिरवणूक दाखवणार होते. आणि हो, सांगायचंच राहून गेलं त्या दिवशी म्हणे राणी घोड्यावरून समारंभाने चालली असताना कुणी वात्रट पोराने खोट्या पिस्तुलातून राणीवर तीन बायबार काढले. त्यामुळं सारं लंडन शहर हादरून गेले. राणी म्हणजे जीव की प्राण. आणि अशा राणीवर कोणी बायबार जरी केला तरी, ती घटना इंग्लंडच्या राजप्रेमी जनतेला चीड असणारी होती सकाळी ' बॅग ' प्रकरणामुळं डोव्हरमधे अडकून पडल्यामुळं जी मिरवणूक प्रत्यक्ष

पाहायला मिळाली नाही ती निदान रंगीत टी. व्ही. वर तरी पाहावी म्हणून आम्ही आमचं लंच हॅम्बुर्गर आणि हॉट डॉग्ज्वर उरकून खोलीवर आलो. फोमच्या गादीवर पडून रंगीत टी. व्ही. पाहायला फारच बरं वाटत होतं. बरोबर दोन वाजता लंडन न्यूज सांगण्यात आली. या न्यूजमध्ये सकाळी मिरवणुकीत घडलेला प्रकार निवेदन करण्यात आला आणि 'सार्जन्ट' नावाचा कोणी वीस–एकवीस वर्षांचा पोऱ्या पकडण्यात आल्याचं सांगितलं. त्यानंतर टी. व्ही. वर ती मिरवणूक दाखवण्यात आली.

लाल फ्लॅनेलचे बंद गळ्याचे कोट, काळ्या पॅन्टस्, डोक्याला केसाळ भल्यामोठ्या टोप्या घातलेले ब्रिटिश पोलीस एका ओळीत चालले होते. त्यांच्यापुढे त्याच वेषातलं बँडचं पथक होतं. मागे ड्यूक ऑफ एडिंबरो आणि प्रिन्स चार्लस यांच्यामागोमाग राणी इलिझाबेथ द् सेकंड. घोड्यावर एका बाजूला पाय सोडून बसली होती. ज्या ठिकाणी बायबार झाले त्या ठिकाणी राणीचं घोडं येताच 'ठोऽठोऽऽठोऽऽऽ' असे तीन आवाज झाले. गर्दी हटविण्यासाठी रस्त्याकडेला उभ्या असलेल्या बॉबीनं पटकन् चित्यासारखी झेप घेऊन त्या 'सार्जंट' ला पकडले आणि त्याच्या हातातले ते पिस्तूल हिसकावून घेतले डोळ्याचं पातं लवतं न् लवतं इतक्या वेळात तो सारा प्रकार घडला. पण त्या पिस्तुलाच्या आवाजानं राणीचं घोडं थोडं बुजलं आणि दुडक्या चालीनं दौडू लागलं. एकाच बाजूला दोन्ही पाय घेऊन बसलेली राणी अश्वारोहणात निष्णात आहे. उधळलेल्या घोड्याला तिनं अल्पावधीतच शांत केलं त्याच्या मानेवर थोपटून ती त्याच्या कानाशी काहीतरी पुटपुटली इतकं झालं तरी, राणी घोड्यावरून खाली पडली नाही, तिला दुखापत झाली नाही, म्हणून 'कॉमेंटेटर' राणीचं वारेमाप कौतुक करत होता 'It is only because Her Majesty the Queen is the world's best horse rider.' पण मी राणी इलिझाबेथपेक्षा अधिक निष्णात अशी घौडदौड करणारी एक राणी जवळून बघितली होती. आमच्या कोल्हापूरच्या श्रीमंत अक्कासाहेब महाराज केवळ घौडदौड करण्यातच पटाईत नव्हत्या, तर त्या एका हातानं दौडणाऱ्या घोड्याचे लगाम सावरीत दुसऱ्या हातात भाला घेऊन धावणाऱ्या रानडुकराची शिकार करीत. त्यांनी रायडिंग केलं नाही असा एकही दिवस मला आठवत नाही.

घोड्याचे लगाम खेचून खेचून त्यांची मनगटं पोलादासारखी मजबूत झाली होती. त्यांचं अप्रतिम असं अश्वारोहणातलं कौशल्य मी अनेक वेळा बघितल्यामुळं वायबार झाल्यानंतर इलिझाबेथ राणीचं घोडं थोडंसं बावचळल्यासारखं झालं आणि राणीनं त्याला सावरून धरलं, या घटनेनं मला स्वतःला काहीच आश्चर्य वाटलं नाही.

दुसऱ्या दिवशीच्या सर्व वृत्तपत्रांनी ती बातमी ठळक मथळ्याखाली छापली होती. लंडन टाईम्सचा मथळा होता :

'The moment that held the breath of the world.'

इंग्रजांची राजनिष्ठा मी समजू शकतो, पण त्या घटनेमुळं अगदी अखिल जगानं श्वास रोखून धरले होते असं म्हणणं मला थोडं अतिशयोक्त वाटलं.

त्या दिवशी संध्याकाळी मार्केटिंगसाठी बाहेर पडलो. इंग्लंड अतिमहागडं शहर आहे याची मला बऱ्याच मित्रांनी कल्पना दिलेली होती. परंतु आम्हाला दोन गोष्टींची आवश्यकता होती एक इस्त्री आणि दुसरं पेंटींग मटेरियल ! जवळजवळ दोन महिने प्रवास करावा लागणार होता आणि वेळोवेळी हॉटेलमध्ये धुऊन वाळवलेल्या कपड्यांना इस्त्री करणे जरुरीचे होते. बरं, कपडे इस्त्रीला द्यावे म्हटले, तर त्याला जितका खर्च होणार होता त्यात अमेरिकेत गेल्यावर नवीन कपडे विकत घेता येणं शक्य होणार होतं दुसरी अत्यावश्यक खरेदी करायची होती, आणि ती म्हणजे, वॉटर कलर रंगाच्या ट्यूबज् आणि पेंटींगचे कागद !

बऱ्याच वर्षांपासून मला पेंटींगचा छंद आहे. पूर्वी भारतात ' विंडसर आणि न्यूटन ' कंपनीच्या इंग्लंडमध्ये तयार झालेल्या ट्यूब्ज मिळायच्या आणि ' वॉटमन ' कंपनीचा पेंटींगचा कागदही मिळायचा. त्या रंगाने काढलेली चित्रं वीस-वीस वर्षे झाली तरी अगदी कालपरवा काढल्यासारखी वाटतात. आपल्या देशातल्या रंगांना नावं ठेवण्याचा माझा हेतू नाही, पण आपल्याकडे तयार केले जाणारे जलरंग आणि तैलरंग इतक्या कनिष्ठ दर्जाचे असतात की, त्यांचा वापर करून चित्र काढायलाच नको वाटतं. चित्रकाराला समोरचं दृश्य बघितल्याक्षणी आपल्या चित्रात ठरावीक एक परिणाम साधायचा असतो. रंगसंगती जमवायची असते. चित्र रंगवताना आपल्याला तो परिणाम साधता येत नाही असं जर चित्रकाराला वाटलं

तर त्याची एकाग्रता आणि तन्मयता तात्काळ ढळते.

' विंडमर आणि न्यूटन ' कंपनीच्या रंगांशी स्पर्धा करणारे रंग आजपर्यंत जगातल्या कुठल्याही देशात निर्माण झालेले नाहीत.

मी त्या दिवशी सहाशे रुपये किंमतीचे डॉलर्स देऊन रंग आणि कागद खरेदी केले. छोटया इस्त्रीला अडीचशे रुपये किंमतीचे डॉलर्स द्यावे लागले. पण पुढे अमेरिकेच्या प्रवासात त्या इस्त्रीचा फारच उपयोग झाला.

रात्री साडेनऊच्या सुमारास चिरंजीवानी डिनरसाठी उठवले. हेरवूड हॉटेलमध्ये डिनरसाठी टेबल रिझर्व्ह करून ठेवले होते. त्या रात्रीचे सहा कोर्सेसचे इंग्लिश डिनर दीर्घकाल स्मरणात राहील.

दुसऱ्या दिवशी सकाळी हॉटेलच्या दारात 'साईट–सीईंगल' ला जाण्यासाठी बस येऊन थांबली होती. गडद निळया सर्जच्या सुटातला गाईड अॅटकिन्सन अतिशय ' हॅंडसम ' दिसत होता. आपल्या मरहूम अलियावर जंग याच्या व्यक्तिमत्त्वाशी साम्य असलेले मिस्टर अॅटकिन्सन वागण्यात, बोलण्यात अगदी ' टिपिकल ' इंग्रज होते. त्यांनी बोलायला सुरुवात केली,

' लेडीज अँड जंटलमेन, वेलकम् टू द सिटी ऑफ लंडन. धिस हिस्टॉरिकल सिटी ....... '

अशी सुरुवात करून त्यांनी थेट ' नॉर्मन ' आणि ' सॅक्सन ' वसाहतीपासून ते आजतागायतच्या लंडन शहराची माहिती दिली. या माहितीत त्यांनी इंग्लंडच्या अलिखित पण रूढी अन् परंपराप्रिय राज्यघटनेचा उल्लेख केला. राजघराण्याबाबत आजही जनतेत जो तीव्र आदर आहे त्याबद्दल सांगताना अॅटकिन्सन म्हणाले, ' वुई आर नाऊ इन मॅरेज मूड, आवर प्रिन्स चार्लस् व्हील बी वेडींग वुईथ लेडी डायना ऑन ट्वेंटीनाईथ ऑफ जुलाय .. ! '

खरोखरंच उभं लंडन शहर त्या आगामी शाही विवाहाच्या वातावरणानं भारून गेलं होतं दुकानांतून काचेच्या प्लेटस्, हातरुमाल, कफलिंक्स, खिडक्यांचे पडदे, अशा गृहोपयोगी वस्तूंवर चार्लस आणि डायना यांचे रंगीत फोटो उठवलेले होते. चार्लस आणि डायना यांच्याशिवाय इंग्लंडमध्ये त्या वेळेला दुसरा विषयच चर्चिला जात नव्हता. लेडी डायनाच्या स्पेन्सरच्या चार पिढ्यांचा इतिहास वृत्तपत्रांतून येत होता. काहींनी छापलं होतं– डायनाला नखं दातानं कुरतडण्याची सवय असून राजपुत्र चार्लसनेही आपल्या प्रेयसीप्रमाणेच नखं

कुरतडायला सुरुवात केली आहे. दुसऱ्या एका वृत्तपत्रानं प्रिन्स चार्लसने यापूर्वी एकोणचाळीस ' पोरी ' फिरवल्याचा उल्लेख केला होता लेडी डायनाच्या थोरल्या बहिणीशी बरेच दिवस त्याचे ' गुफ्तगु ' असल्याचा गौप्यस्फोटही केला होता. ते सर्व वाचल्यानंतर मला बिचाऱ्या पद्मिनी कोल्हापुरेची कीव करावीशी वाटली. तुम्हाला आठवत असेल, याच पद्मिनी कोल्हापुरेनं राजकमल स्टुडिओ पाहायला चार्लस् आला असताना त्याचं आगंतुकपणे चुंबन घेतलं होतं. पद्मिनीला वाटलं असावं, त्या एकोणचाळीस पोरींच्या यादीत आपलंही एक नाव दाखल होईल. पण चार्लसनं आपल्या खिशातून रुमाल काढून आपला गाल पुसून टाकला आणि हसत हसत तो म्हणाला, ' हिंदुस्थानातल्या चित्रपटातसुद्धा चुंबनाला बंदी असते असं मी ऐकलं होतं, पण पोरी, तू तर भयंकरच धाडशी दिसतेस ! '

पद्मिनीनं चार्लसचं चुंबन घेतल्यामुळं तिला कोणतं समाधान लाभलं हे काही समजत नाही. पण सेन्सॉर बोर्डानं आजवर दडपलेली तिची इच्छा उफाळून आली असावी, याशिवाय दुसरा काही खुलासा असू शकत नाही.

गाईड ॲटकिन्सन लंडन शहराची माहिती सांगत असताना छाबडा, हिंदुजा पतीपत्नी आणि तुलसी नवदांपत्य आपआपसात इतक्या मोठ्यानं बोलत होते की, त्यांच्या त्या बोलण्याच्या आवाजामुळे गाईड ॲटकिन्सन काही क्षण माईक हातात धरून गप्प उभे राहिले. इंग्रजांचा देश पाहायला आलेल्या आमच्या सहप्रवाशांना इंग्रजी भाषेचा गंध नव्हता, पण निदान गप्प तरी राहावं की नाही ? पण जाईल तिथं घाण करून ठेवण्याची प्रवृत्ती भारतीयांसारखी इतर कोणत्याही देशांच्या नागरिकांत आढळणार नाही. एअर इंडियाचा एक अधिकारी मला म्हणाला, ' ज्यावेळी विमानात भारतीयांचा भरणा अधिक असतो, तेव्हा टॉयलेटस्‌मधल्या साबणाच्या वड्या, ॲन्टीसेप्टीक लोशन्स, आफ्टर शेव्ह लोशन अशा वस्तू सर्रास गायब होतात. ' तो म्हणाला, ' घालू देत खिशात, त्यानं फारसं बिघडत नाही. पण आपण टॉयलेट वापरल्यानंतर फ्लश करण्याचं साधं सौजन्यदेखील ते दाखवत नाहीत. मुंबईतल्या चाळीतल्या सार्वजनिक संडासचं रूप विमानातल्या टॉयलेटला आणतात. परदेशी प्रवाशापुढं आम्हांला लाजेनं मान खाली घालावी लागते ! '

अॅटकिन्सन गाईड का गप्प उभा आहे हे त्या छावडाला समजलं आणि त्यानं बाकीच्या बडबड करणाऱ्यांना गप्प बसवलं

आमची बस लंडन शहरातून मधून चालली होती त्यात लंडनमधलं सर्वांत जुनं चर्च सेंट पॉल कॅथॅड्रल बघितलं. प्रिन्स चार्लस् आणि डायना त्याच चर्चमध्ये विवाहबद्ध होणार होते. त्यानंतर लंडन शहराच्या अत्यंत गजबजलेला असा पिकॅडीली सर्कस हा विभाग फिरून बघितला. झगमगीत दुकानांच्या ओळी दिमत होत्या. डबल डेकर बसेस, टॅक्सीज आणि गाड्या यांची गर्दी होती, पण कुठेही आमच्या मुंबईला घडतो तसला ट्रॅफीक जामचा प्रकार घडत नव्हता

पुन्हा एकदा आम्ही पार्लमेंट स्क्वेअर ( चौकात ) गेलो. तिथं सर विन्स्टन चर्चिल यांचा सुरेख उभा पुतळा होता, पुतळ्याच्या एका हातात चिरूट होता हे सांगणे नलगे.

ब्रिटिश पार्लमेंट पाहताना मला कॉलेजचे दिवस आठवत होते

बी. ए ला मी इतिहास हा ऐच्छिक विषय घेतला होता आणि त्यावेळी इंग्लंडचा इतिहास अथपासून इतिपर्यंत अभ्यासलेला. नंतर लॉ कॉलेजमध्ये ब्रिटिश कॉन्स्टिटट्युशनल हिस्टरी हा कंपलसरी विषय होता. त्यावेळी इंग्लंडची राजेशाही, तिथली राज्यघटना, पार्लमेंटचे अधिकार, हाऊस ऑफ लॉर्डस् आणि हाऊस ऑफ कॉमन्स यांच्यात १९११ साली निर्माण झालेला पेचप्रसंग, हाऊस ऑफ लॉर्डस् बरखास्त करण्याची हाऊस ऑफ कॉमन्सने दिलेली धमकी, हे सारं आठवत होतं ' The parliament can do and undo anything, except a man a women and a women a man.' पार्लमेंटचे अधिकार इतके शक्तिशाली आहेत की पार्लमेंट स्त्रीचा पुरुष आणि पुरुषाची स्त्री सोडून कोणतीही गोष्ट करू शकते, हे पार्लमेंटच्या सार्वभौम सत्तेबद्दलचं वक्तव्य आठवलं राजाबद्दल नितांत आदर असणाऱ्या इंग्लंडनं राजाला हळूहळू कसा सत्ताहीन बनवला याचाही इतिहास मोठा रंजक होता जेन्कीनसनच्या कानाचं युद्ध, गायफॉक्सनं पार्लमेंट उडवून देण्याचा केलेला कट, आणि तो उघडकीला आल्यानंतर आजही त्या ठरावीक दिवशी दिवा घेऊन पार्लमेंटचे तळघर कसे तपासले जाते या गोष्टी इंग्लंडची रूढीप्रिय परंपरा जतन करण्याची साक्ष पटवते. मला सर्वांत इंग्रजांचं काय

आवडलं असेल तर, त्यांचा स्थावर संपत्तीविषयक कायदा ! इंग्लंडमध्ये सर्वांत मोठा मुलगा बापाच्या संपत्तीचा वारस बनतो. दुसऱ्या मुलांना स्थावर संपत्तीत हिस्सा मागता येत नाही. यामुळं इंग्लंडची स्थावर मालमत्ता वर्षानुवर्ष दुभंगली नाही याउलट आपला हिंदू कायदा. या कायद्यानुसार हिंदू बाप मेल्यानंतर त्याच्या सर्व मुलांना ( आता मुलींनाही ) स्थावर मिळकत वाटून घेण्याचा हक्क मिळतो त्यामुळं शंभर-दोनशे वर्षांत हिंदू कुटुंबाच्या मालकीच्या जमिनीची शेकडो शकलं होतात. यातून हद्दीचा वाद, या वादातून मारामाऱ्या, खून, दिवाणी दावे, चॅप्टर केसेस यांना ऊत येतो. हिंदू धर्माची बाकीची तत्त्वं अक्कलहुषारीनं केली असतील, पण जमिनीचं विभाजन करण्याची कल्पना ज्यांना सुचली त्यांच्याजवळ दूरदृष्टीचा अभाव होता यात मुळीच शंका नाही. ज्येष्ठ मुलाला ( मग ही मुलगी असली तरी तिलाच तो हक्क जातो ) वारसा देण्याच्या पद्धतीमुळं पहिलं मूल झाल्यानंतर त्यानंतर फारशी प्रजा वाढणार नाही याची दक्षता इंग्रज नागरिक घेतात. आमच्याकडं लेंढार लागलं तरी आईबाप म्हणतात, ‘आमची बक्कळ जिमिन हाय, वाटून खात ऱ्हातील !’ आजचा सर्वसामान्य हिंदू माणूस कोणतं आयुष्य कंठतो आहे ते आपण पाहतो आहोतच.’ तेव्हा मला ब्रिटिशांच्या वडील मुलास किंवा मुलीलाच सर्व स्थावर मालमत्ता देण्याचा कायदा फार विचारानं निर्माण केला आहे असं वाटतं त्यामुळं प्रजोत्पादना-वर आपोआपच मर्यादा येते भारतात तसा कायदा लागू करून पाहण्यास हरकत नाही. पण देशाची समृद्धी वाढावी, लोकसंख्या मर्यादित राहावी असं मनापासून वाटणारा एकही नेता डोळ्यासमोर नाही ही तर आमची खंत आहे!

पॅरिस शहराचे जसे सीन नदीनं दोन भाग केले आहेत तसेच थेम्स् इंग्लंडला दुभंगून राहिली आहे. या दुभंगलेल्या शहराला जोडणारे अनेक पूल थेम्स्वर उभारलेले आहेत त्यातला अत्यंत देखणा असा पूल वाटला तो टॉवर ब्रीज ! मोठ्या बोटी किंवा फेरीजना आत घेताना तो प्रचंड लोखंडी पूल आपोआप वर जातो. फ्रान्समध्ये आणि इंग्लंडमध्ये गावच्या मध्यातून या नद्या वहात होत्या पण कुठे घाण आढळली नाही. तुम्ही अलीकडं आपल्या पुण्याची मुळामुठा नदी बघितलीत का ? पुण्यभूमीतून वाहणारी

र्ता नदी राहिली नसून ते प्रचंड गटार झालेले आहे. नदीच्या काठावर उठलेल्या झोपडपट्टीतले रहिवासी निवांतपणे आपला नैसर्गिक विधी उरकत असतात. पुणे आणि आसपासच्या परिसरातील कारखान्यांनी सोडलेलं सांडपाणी त्यात मिसळलेलं आहे. पाण्याचा रंग कधी गडद हिरवा दिसतो किंवा त्यावर हिरवी तरंगणारी वनस्पती दाट अशी वाढलेली दिसते. मुंबईला जाताना लहानपणी आई मला त्या पुलावरून जाताना नदीला हात जोडायला सांगत असत. आई गेल्यानंतर मी काही वर्ष मुंबईला जाताना नदीला हात जोडत असे पण आता मला त्या प्रचंड गटाराला हात जोडावा असं बिल्कूल वाटत नाही. मी औद्योगिक प्रगतीच्या विरुद्ध आहे अशी कदाचित् तुम्हाला शंका येईल पण तसं नाही औद्योगिक प्रगतीशिवाय कोणत्याही देशाची भरभराट होऊच शकणार नाही. पण अशी प्रगती होत असताना समाजाचं स्वास्थ्य बिघडवणारं प्रदूषण होणार नाही याची सरकारनं काटेकोररीतीने पाहणी करावी लागते. साखर कारखान्यांनी पंचगंगा आणि कृष्णा या नद्यांत सोडलेल्या मळीमुळं लाखो मासे मेलेले मी डोळ्यानं बघितले आहेत. ते पाणी प्यायल्यानं नागरिकांत कावीळीसारखे रोग फैलावतात हे ढळढळीत दिसतं, पण साखर कारखान्यांना असं करू नका असं कसं सांगायचं ? साखर कारखाने हीच आज सत्ताधाऱ्यांची अधिकार-गंगोत्री झाली आहे सामान्य माणूस काविळीनं किंवा विषारी पाणी पिऊन मेला तरी चालेल, पण साखर कारखाने चालले पाहिजेत !

गाईड ॲटकिन्सन नंतर आम्हाला ट्राफलगार स्क्वेअरमध्ये घेऊन आले. नेल्सननं नेपोलियनचा पराभव केला तो ट्राफलगारच्या लढाईत त्या ऐतिहासिक विजयाची आठवण म्हणून या चौकाला ट्राफलगार स्क्वेअर असे नामाभिदान करण्यात आले आहे आणि त्या ठिकाणी एक अति उंच असा स्तंभ उभा करून त्याबर विजयी सेनानी नेल्सन याचा पुतळा उभा करण्यात आलेला आहे.

ट्राफलगार स्क्वेअरनंतर आम्ही हाईड पार्ककडे गेलो हाईड पार्क म्हणजे भलं मोठं हिरवळीनं भरलेलं मैदान आहे. जागोजागी प्रचंड वृक्ष आहेत. हाईड पार्कच्या निरनिराळ्या भागांत सतत राजकीय नेत्यांच्या सभा चाललेल्या असतात दिवसातल्या कुठल्याही वेळी तिथं जा एखादा पुढारी

हातात माईक घेऊन समोर जमलेल्या शे-दोनशे श्रोत्यांना अगदी आटापिटा करून आपली बाजू समजावून सांगत असतो.

हाईड पार्कच्या पश्चिम बाजूला आलिशान अशा घरांची गल्ली लागली. तिकडं बोट करून गाईड ॲटकिन्सन् म्हणाले, ' पूर्वी या टोलेजंग इमारती इंग्लंडच्या राजदरबारातील जहागीरदार आणि सरंजामदार यांच्या मालकीच्या होत्या. पण कालांतराने राजाचे अधिकार मर्यादित झाले आणि हे जहागीरदार आणि सरंजामदार निष्प्रभ झाले. ही घरं मोकळी ठेवून त्यांचा टॅक्स भरणं त्यांना शक्य होईना, म्हणून बहुतेक लोकांनी आताशी या वाड्या-सारख्या प्रचंड घरांत लॉजिग–बोर्डिंग्ज सुरू केली आहेत. काहीजण स्वत: देखरेख करतात, तर काहीजण नोकरांकरवी तो व्यवसाय करतात.

मला खरंच त्या जहागीरदार आणि सरंजामदार लोकांचं कौतुक करावंस वाटलं. आमच्याकडं असे काही जहागीरदार आहेत की, त्यांना घराचा मोडलेला वेळूचा वासा बदलायला देखील पैसा नाही. पण बाहेर पडतात ते चुडीदार पायजमा, छत्तीस बटणांचा बंद गळ्याचा कोट आणि ' आर ' दिलेला लेहरी पटका बांधून. मिशीला पीळ भरत बापजाद्यांच्या कर्तबगारीचे पोवाडे तासन् तास गात बसणे, देणेकऱ्यांची तोंडं चुकवत गल्लीबोळातून फिरणारे अनेक सरकार लोक मी जवळून बघितलेत. या सरकार लोकांची अगी विशिष्ट जात आहे. आपली मुलगी लग्नात देताना हे दुसरं घराणं आपल्यासारखंच ' सरकार ' पंथातलंच आहे हे अगदी कटाक्षानं बघतील. आणि असे करताना त्यांची सांपत्तिक स्थिती किती डबघाईला आलेली आहे, याची त्यांना फिकीर नसते. असे लोक ' जातीसाठी माती खातात.' हे लोक ओळखण्याची एक साधी रीत आहे. जेव्हा असे दोन सरकार आमोरासमोर येतात तेव्हा हे वाकून एकमेकांना तीन वेळा मुजरा करतात.

परंतु इथं इंग्लंडमध्ये कालमानानुसार बदललेल्या जहागीरदार आणि सरंजामदार मंडळींचं मला खरोखरच कौतुक करावंसं वाटलं. श्रम करून पोट भरणं यात कमीपणा कसला आला आहे ? खोट्या प्रतिष्ठेसाठी लहान-सहान कामं करण्याची ज्यांना लाज वाटते, ती माणसं प्रगत जगात सुखानं जगूच शकणार नाहीत.

हाईड पार्कनंतर आम्ही आल्बर्ट मेमोरियल पाहायला गेलो इथंच

आल्बर्ट मेमोरियल हॉल आहे.

आल्बर्ट मेमोरियल हॉल पाहताक्षणीच मला आठवल्या त्या आमच्या दीदी—लता मंगेशकर! दीदींनी हा आल्बर्ट मेमोरियल हॉल आपल्या स्वर्गीय सुरांनी मंत्रमुग्ध करून सोडला होता. त्या प्रसंगाच्या टेप्स आम्ही भारतात अनेकवेळा ऐकल्या होत्या. दिलीपकुमारची भारदस्त आणि आदबशीर उर्दू 'कॉमेंट्री' आणि त्यानंतर दीदींचे गाणे टेपवर ऐकताना तिकडं भारतात आमच्या अंगावर रोमांच उभे रहात होते. पण प्रत्यक्ष त्या स्वरसम्राज्ञीचे सुरेल सूर ज्यांना या आल्बर्ट मेमोरियल हॉलमध्ये ऐकण्याची संधी लाभली ते किती धन्य!

व्हिक्टोरिया राणीच्या वेळी ब्रिटिश साम्राज्यावरचा सूर्य कधीच मावळत नाही असं म्हटलं जात होतं आशिया, अमेरिका आणि युरोप इथल्या ब्रिटिश वसाहतींवर कुठं ना कुठं सूर्य उगवलेला असे. आम्ही व्हिक्टोरिया राणी फक्त रुपयावर बघितली होती. पण जिचा स्वर जगातल्या कुठल्या ना कुठल्या राष्ट्रात सदैव तरळत असतो अशी एक सम्राज्ञी आम्ही प्रत्यक्ष बघितली अन् ती म्हणजे आमची दीदी! हिंदुस्थानात आज इतकी नेते मंडळी आहेत, विद्वान आहेत, कलावंत आहेत, पण युरोप आणि अमेरिकेत भारतातल्या दोनच व्यक्तींना लोक ओळखतात. एक इंदिरा गांधी आणि दुसऱ्या लता मंगेशकर! युरोप आणि अमेरिकेतली वृत्तपत्रं मी अनेक वेळा चाळून पाहिली, पण त्यांत इतर कुठल्याही भारतीय नेत्याचा उल्लेख मला आढळला नाही.

आम्ही दौऱ्यावर जाण्यापूर्वी श्री. यशवंतराव चव्हाण आय कॉंग्रेसमध्ये जाणार असल्याची वदंता होती. ते गेले की नाही हे जाणून घेण्यासाठी, मी खूप प्रयत्न केला. पण काहीच समजू शकलं नाही. युरोप आणि अमेरिका यांना भारतीय राजकारणात फारसा रस नाही. इथल्या कसल्याही उलाढालीची ते लोक साधी दखलसुद्धा घेत नाहीत.

लंडन शहराच्या दुसऱ्या भागात जेव्हा आम्ही गेलो तेव्हा तिथं प्रवाशांची एकच गर्दी झालेली दिसली. त्या ठिकाणावरून नदीच्या पलीकडे असलेले 'वेस्ट मिन्स्टर ॲबे' दिसत होते. लहानपणी वडील चॉकलेटस्चे डबे आणायचे त्या डब्यावर वेस्ट मिन्स्टर ॲबेचे चित्र असायचे. अगदी तेच

दृश्य थेम्स नदीच्या पैलतीरावरून दिसत होते. तिथं लंडन शहराच्या ' सोव्हनीर्स ' विकणाऱ्यांनी गर्दी केली होती. 'लंडनचा पोलीस' ही बाहुली बऱ्याचजणांनी खरेदी केली. आम्हाला साडेअकरा वाजेपर्यंत ही सर्व ठिकाणं पाहून बरोबर अकरा पस्तीसला बकिंगहॅम पॅलेससमोर जायचे होते. ' चेंजींग ऑफ द् गार्डस ' हा सोहळा पहायचा होता. खरं म्हणजे हा काही सोहळा नव्हे, पण त्याला इंग्रजांनी सोहळ्याचं रूप मात्र दिलं आहे.

बकिंगहॅम राजवाड्यावरच राणीचं निवासस्थान आहे या वाड्या-भोवताली पन्नास-शंभर पोलीस अहोरात्र पहारा करीत असतात. दुपारी बरोबर अकरा पस्तीसला आधल्या रात्री नेमणुकीला असलेले गार्डस् बदलतात आणि त्यांच्या जागी दुसरे गार्डस् येतात. पण हे गार्डस् बदलतात तेव्हा त्या प्रकाराला सोहळ्याचं स्वरूप दिलं गेलं आहे. डोक्याला उंच केसाळ टोपी, वर अंगात लाल डगला, खाली काळी सर्जची पँट, हातात चकचकणाऱ्या तलवारी घेतलेले हे गार्डस बँडच्या तालाबरोबर मार्चिंग करत राजवाड्यातून बाहेर पडतात आणि त्याचबरोबर दुसरे गार्डचे पथक पुन्हा राजप्रासादावर पहारा करण्यासाठी बँडच्या तालावर आत जाते. हा सोहळा अर्ध्या-एक तासात आवरतो, पण तो पाहायला जगातले हजारो पर्यटक तासन् तास खोळंबून राहतात. इंग्रजांच्या रूढीप्रिय परंपरेची अशी अनेक जिवंत उदाहरणे आहेत. त्या दिवशी लख्ख ऊन होतं. त्यामुळं बँडच्या तालात लेफ्टराईट करीत येणारे ते लाल बंद गळ्याचे कोट, काळ्या पँटी आणि डोक्यावर केसाळ टोप्या घालून नाकासमोर लखलखत्या तलवारी धरलेले गार्डस् फारच आकर्षक असे दिसले. आमच्या कोल्हापुरात जुन्या राजवाड्यातून अंबाबाईच्या पालखीपुढे दर शुक्रवारी सबीना निघे कोणी याला ' छबीना ' असंही म्हणतात. या सबीन्यात ' लष्कर फट ' म्हणून संस्थानाकडील नोकर असत. त्यांच्याही अंगात लाल डगले असत, पण एकही डगला कोणाच्या अंगाचा नसे. तो घालणाऱ्याला तो ढगळ तरी व्हायचा, किंवा तंग तरी असायचा. डगल्याखाली चुडीदार पायजमा घालण्याचा रिवाज होता, पण बऱ्याच जणांना चुडीदार पायजमा मिळत नसे. म्हणून ते चक्क खाली घोट्याएवढ्या उंचीच्या विजारी घालीत. पूर्वी कधी काळी हे लष्करफड हातातून तलवारी घेऊन गेले असतील पण आता तलवारी

गेल्या. पण ‘ लष्कर फड ’ म्हटल्यावर हातात काहीतरी हत्यार हवं ना ? मग द्या त्यांच्या हातात काठ्या. पण अशा खांद्यावरून मोकळ्या काठ्या नेणं वाईट दिसतं म्हणून त्या काठ्यांना सैल अशा लंबट पिशव्या करून घेतल्या होत्या. पिशवीत काठी घालायची अन् ती या लष्कर फड्यातल्या लोकांनी खांद्यावर घ्यायची. या लष्करफडाची मिरवणूकही सवाद्य असायची. पण यात बँड मात्र नसे. पिप्पाणी आणि ताशा वाजवणारी चार-दोन पगड्याधारी मंडळी पुढं असायची. या लष्कर-फडाचं एक वैशिष्ट्य म्हणजे सतरा-अठरा वर्षापासून ते साठीपर्यंत सर्व वयोमानातली मंडळी या ‘ दलात ’ असत. पिढ्यान्‌पिढ्या चालत आलेल्या या संस्थानी सनदी नोकरीत बापानंतर घरातला मोठा मुलगा समावेशला जाई. शिस्त हा प्रकार लष्करफडाला ठाऊक नव्हता. संस्थानं विलीन झाल्यानंतर बऱ्याच संस्थानी नोकरांना सरकारी नोकरीत समावेशून घेण्यात आलं. अशा काही लोकांनी बेशिस्त वर्तन केलं तर वरिष्ठ त्यांना चक्क विचारत, ‘ पूर्वी तुम्ही लष्करफडात होता की काय ? ’ कधी काळी संस्थानिक जेव्हा सत्ताधारी होते तेव्हा, या दलाला काहीतरी शिस्त असेल, वेष धारण करण्याचे नियम असतील. पण संस्थानिकच कालाच्या उदरात गडप झाले तिथं बाकीच्यांची काय कथा ?

मी लहानपणी कधी चुडीदार पायजमा तर कधी ब्रिचेस घालून शाळेत जाई, तेव्हा शाळेतली टवाळखोर पोरं मला चिडवत, ‘आज सवारी निघणार आहे वाटतं ? ’

‘ चेंजीस ऑफ द गार्डस् ’ हा सोहळा खरोखरच आकर्षक वाटला तेथून जाताना बाजूलाच एका भागात बँड शिकणाऱ्या लहान मुलामुलींचे ताफे दिसले. ती मुलं पाच वर्षापासून ते दहा वर्षापर्यंतची होती. मुलींचे कपडे इतके आकर्षक होते की खाली उतरून त्यांचे रंगीत फोटो घ्यावेसे वाटले. पण बराच उशीर झाला होता. लंचची वेळ होऊन गेली होती त्या लहान मुलामुलींना लहान वयातच संगीताची गोडी लावण्याचा इंग्रजांचा प्रयत्न स्तुत्य वाटला. संगीताची ज्यांना लहानपणापासून गोडी लागते अशी मुलं पुढील आयुष्यात सुसंस्कृत निपजतात असं बऱ्याच तज्ज्ञांचं म्हणणं आहे. संगीताचं वावडं असणारी माणसं हेकेखोर किंवा मूर्ख असतात असं म्हणतात.

आमच्या वारणानगरला वाद्यवृंदात लहान मुलं आताशी शिकून फारच छान तयार झाली आहेत. नुकताच त्यांनी परदेश–दौरा करून आपलं कौशल्य दाखवलं. वारणेचं खोरं एकेकाळी गुंड आणि दरोडेखोरांचं आश्रयस्थान होतं. पण आताशी या भागाचं स्वरूप पालटू लागलं आहे.

दुपारी लंचनंतर एका महत्त्वाच्या स्थळाला भेट द्यायची होती. आणि हे स्थळ म्हणजे 'मादाम टुसॅडस् वॅक्स म्युझियम.'

मादाम टुसॅडम् नावाच्या बाईंनी हे म्युझियम सुरू केले प्रचंड दालनं असलेल्या या म्युझियममध्ये इंग्लंडमध्ये होऊन गेलेल्या राजकीय नेत्यांच्या, मुत्सद्द्यांच्या, राजेरजवाड्यांच्या अनेक मेणाच्या प्रतिकृती आहेत. त्याच– प्रमाणे जगातील मान्यवर व्यक्तींचेही मेणाचे पुतळे आहेत. हे पुतळे इतके हुबेहूब आहेत की, समोरचा पुतळा आहे की प्रत्यक्ष माणूस आहे हे समजेनासं होतं या म्युझियममध्ये जवाहरलाल नेहरू आहेत, इंदिराजी आहेत, स्टॅलीन आहे, रुझवेल्ट आहे, रॉबर्ट केनेडी आहे, चर्चिल आहे. राणी इलिझाबेथ आणि ड्यूक ऑफ एडिंबरो हे सुद्धा आहेत. शेकडो पुतळे असलेल्या या म्युझियममध्ये इंग्लंडच्या इतिहासात होऊन गेलेल्या काही कुप्रसिद्ध गुन्हेगारांचेसुद्धा पुतळे करून ठेवण्यात आले आहेत. त्या गुन्हेगारांचा संक्षिप्त इतिहास थोडक्यात लिहून ठेवलेल्या पाट्या आहेत. काही ठिकाणी पुतळे सजीव वाटण्यासाठी त्यांच्या डोळ्यांची उघडझाप होते. तर डॉक्टर एका मुलीला तपासत असलेल्या एका दृश्यात त्या मुलीच्या हृदयाचं स्पंदन चालू असल्याचा आभासही निर्माण केलेला आहे.

शिल्पकला हाही माझ्या आवडीचा विषय. कुठल्याही गावी गेलो की, मी तिथले पुतळे अगदी बारकाईनं न्याहाळत असतो. आता अगदी उदाहरणानंच बोलायचं झालं तर मुंबईला सचिवालयाकडून गेटवेकडं जाताना डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांचा जो प्रचंड ब्राँझचा पुतळा उभा आहे, त्या पुतळ्याचं डोकं प्रमाणापेक्षा फारच लहान आहे. भारताची राज्यघटना लिहिणाऱ्या बुद्धिमान अशा बाबासाहेबांच्या पुतळ्याचं डोकं लहान करणाऱ्या त्या शिल्पकाराला तो पुतळा मुळीच जमलेला नाही. नाशिकरोडलासुद्धा बाबासाहेब आंबेडकरांचा एक पुतळा आहे, तो क्षणभर आमच्या कोल्हापुरातील सर्जन डॉक्टर भद्रे यांच्यासारखा वाटला. दुसरे सांगलीच्या जुन्या स्टेशन

चौकातले नेहरू आणि गांधी यांचे अमोरासमोर उभे केलेले पुतळे ! त्या वृद्धाने पंचा नेसला आहे म्हणून गांधी म्हणायचे, आणि कडक परीटघडीचा लांब कोट आणि डोक्यावर नेहरू टोपी आहे म्हणूनच नेहरू म्हणायचे ! शिवाजी महाराजांचे महाराष्ट्रात असंख्य पुतळे आहेत कोल्हापूरच्या टाऊनहॉलमध्ये शिवाजी महाराजांचा एक असाच संगमरवरी पुतळा आहे. त्यात शिवाजी महाराज सत्तरी ओलांडलेले दिसतात. पण महाराजांचं एकूण आयुष्यच पन्नास वर्षांचं महाराज सत्तर वर्षांचे दिसणारा पुतळा तयार करणारा शिल्पकारही डोळ्याने थोडासा अधू किंवा अतिवृद्ध असावा !

अलीकडच्या काळात एखादा नेता किंवा पुढारी आटोपला रे आटोपला, की लागलीच त्याचा पुतळा बनवण्याची मोहीम हाती घेतली जाते, समिती स्थापन होते, फंडस् गोळा केले जातात. गावातली एखादी मोक्याची जागा मुक्रर केली जाते, आणि जो पैसा खरोखरीच समाजाच्या गरजेसाठी खर्च केला जावा तो दगडधोंड्यात किंवा लोखंडात ओतला जातो. या देशात यापुढं कोणाचाही पुतळा उभारू नये असं विधेयक सम्मत होणं अतिशय जरुरीचं आहे. शिल्पकारांनी आपली कला ब्राँझचे पुतळे बनवण्यापेक्षा मादाम टुसॅडस् वॅक्स म्युझियमसारखे एखादे जगप्रसिद्ध म्युझियम बनवण्याच्या कामी राबवावी.

त्या म्युझियममध्ये आम्ही तीन तास सतत ते मेणाचे पुतळे पाहात फिरत होतो. माणसाच्या केसापासून ते पायाच्या बोटापर्यंत शिल्पकारांनी आपलं कौशल्य पणाला लावलेलं होतं हॅटस् ऑफ टू द् स्कल्प्टर्स ' असा कौतुक व्यक्त करणारा उद्गार काढून आम्ही बाहेर निघालो असताना कोणीतरी माहिती पुरवली की, २९ जुलैला चार्लस आणि लेडी डायना यांचेही मेणाचे पुतळे इथं उभे केले जाणार आहेत. त्या पुतळ्यांच्या प्रतिकृती जवळ जवळ पूर्ण होत आलेल्या आहेत.

भारताला जावे आणि ताजमहाल पाहावा म्हणतात याच धर्तीवर मी म्हणेन, ज्यांना जमेल त्यांनी आयुष्यात एकदा तरी लंडनला जावे आणि मादाम टुसॅडस वॅक्स म्युझियम पाहावे !

पंतप्रधान मार्गारेट थॅचर आणि त्यांच्या मंत्रिमंडळाच्या पुतळ्यांसमवेत आमच्या माईचा एक फोटो उमेशनी घेतला. आमचा आल्बम बघताना

लोक आश्चर्यचकित होऊन विचारतात, ' आँ ऽऽऽ प्राईम मिनिस्टर आणि माई एकत्र कशा ? तुम्ही लोकांनी भेट घेतलीत की काय त्यांची ?'

सांगण्याचं तात्पर्य एवढंच की, फोटोतल्या मार्गारेट थॅचर या खऱ्या नसून तो त्यांचा मेणाचा पुतळा आहे हे लोकांना सांगावं लागतं, इतकं साम्य जिवंत मार्गारेट थॅचर आणि त्यांच्या पुतळ्यात आहे. इंग्रजांच्या मुत्सद्देगिरीचे अनेक प्रसंग इतिहासात पाहायला मिळाले होते, पण इंग्रजांचं हस्तकौशल्य पाहण्याचा तो पहिलाच प्रसंग होता. पॅरिसला आर्टिस्ट गॅलरी बघितल्यानंतर जे समाधान वाटलं, तेच मादाम टुसॅडस् वॅक्स म्युझियम बघताना वाटलं

म्युझियममधून बाहेर पडलो तेव्हा संध्याकाळ होत आली होती दुसऱ्या दिवशी युरोपचा निरोप घेऊन अमेरिकेला प्रयाण करायचे होते हॉटेल हेरवूडमध्ये आल्यानंतर कपडे धुऊन खोलीतच वाळत घातले होते नवीन इस्त्रीचं उद्घाटन करून कपडे इस्त्री करायचे होते

भारतातून येताना सूट आणि बरेच गरम कपडे घेऊन आलो होतो. पण स्वित्झर्लंडखेरीज इतर कुठेही अंगात गरम कपडे घालावेसे वाटले नव्हते. सुटाची घडी लंडनमध्ये मोडायची असं ठरवलं होतं. पण हवेत बिलकुल थंडी नसताना लंडनमध्ये आहोत म्हणून सुटात फिरायचं हे काही मला पटण्यासारखं नव्हतं पण आमच्या ट्रिपमध्ये असलेले दोन–चार महाभाग एकदम ' टाईट ' सुटात वावरत होते पण त्यांनी बांधलेल्या टायच्या गाठीवरून ते भारतीय आहेत असं कोणीही ओळखू शकलं असतं. तुम्ही म्हणाल, रंगावरून नाही का ओळखता येत ? मुळीच नाही काही स्पॅनिश लोक थेट भारतीयांसारखे दिसतात. तिकडे अमेरिकेत जेव्हा न्यू ऑर्लीन्सला गेलो होतो, तेव्हा तर चक्क भारतीय प्रदेशात आल्यासारखं वाटलं होतं. नारळीची आणि आंब्याची झाडं घराभोवती होती नी माणसं जोपर्यंत तोंडातून शब्द काढीत नव्हती. तोवर भारतीयच वाटायची. कपड्यांच्या बाबतीत एक विचार मला इथं व्यक्त करावासा वाटतो मी व्यवसायानं सरकारी वकील आहे, म्हणजे मुळात वकीलच. ' सरकारी ' ही उपाधी नंतर लागलेली वकील लोकांना भारतात काळ्या कोटाची जी सक्ती केली जाते ती मला थोडीशी अन्यायकारक वाटते. ऑक्टोबर किंवा एप्रिल महिन्यात

मुंबईला मरणाचा उकाडा असतो आणि काळ्या कोटाची सक्ती असल्यामुळं वकील लोक टाय लावून काळा कोट घालतात. या कोर्टातून त्या कोर्टात जाताना काळ्या कोटावरचा गाऊन सावरत चाललेले, घामेघूम झालेले ते केविलवाणे जीव पाहून खरोखरच त्यांची दया येते. टाय आणि काळा कोट हा इंग्रजांना ठीक आहे. एखादा महिना सोडला तर एरव्ही त्यांच्याकडं हवा थंडच. पण साहेबानं भारत सोडून इतकी वर्षं झाली तरी, या ऊष्ण कटिबंधाच्या देशात काळ्या कोटाची सक्ती असावी ही बाब थोडी फेर–विचार करण्यासारखी आहे असं मला अगदी प्रामाणिकपणे वाटतं. भारतातल्या न्यायालयांनी काळा रंग, जो उष्णता शोषून घेतो त्याची निदान उन्हाळ्यापुरती तरी सक्ती करू नये, असा संघटित प्रयत्न होण्यास हरकत नाही. सुटानं माणसाचं व्यक्तिमत्त्व थोडं भारदस्त दिसतं हे खरं. पण ऐन उन्हाळ्यात उलनचा सूट आणि टाय घालणं म्हणजे साहेबाचे अंधानुकरण करण्यासारखं आहे खुद्द इंग्लंडमध्ये सुटात वावरणारी फारच थोडी माणसं दिसली. बहुसंख्य जनता, तरुणापासून ते अगदी वृद्धापर्यंत, निळ्या जीन्स, आणि वर साधं बनियन किंवा टी शर्ट असा वेषच वापरते !

लंडनमध्ये आमच्या सोबत आलेल्या वासंतीबेन यांची पर्स चोरीला गेली. त्या आणि त्यांच्या मैत्रिण कुसुमबेन खरेदीसाठी गेल्या होत्या. या दोन मैत्रिणी म्हणजे एक विचित्र जोडगोळी होती या दोघींची मुलं मुंबईत व्यापार करीत होती. त्यांची मुलं एकमेकांचे मित्र, म्हणून या म्हाताऱ्याही एकमेकींच्या मैत्रिणी. दोघी शुद्ध शाकाहारी. त्यामुळे ब्रेकफास्टच्या वेळी किंवा डिनरच्या वेळी यांची फार पंचाईत व्हायची. पासष्ठी ओलांडलेल्या या दोन्ही म्हाताऱ्या, बहुतेक, घरात कटकट करीत असाव्यात म्हणून त्यांच्या पोरांनी टी.सी.आय कडे बावीस बावीस हजार रुपये भरून निदान महिनाभर तरी घर शांत राहील म्हणून यांना परदेश–प्रवासाला धाडलं असावं वासंतीबेनचे काही नातलग अमेरिकेत होते वासंतीबेन येताना डॉलर्सचं बंडलच्या बंडल घेऊन आली होती दुकानात काही किरकोळ खरेदी केली की बिल भागवताना सगळे पैसे बाहेर काढायची. एकतर तिला लंडनमध्ये घेतलेल्या वस्तूची किंमत पौंड, शिलींग, पेन्स मध्ये करण्याचा सराव नव्हता. मग ती कौंटरवरच्या बाईला विचारत असे डॉलरचं पौंडात

रूपांतर करणं थोडं गुंतागुंतीचं होतंच. पण म्हणून प्रत्येक ठिकाणी पर्समधलं डॉलरचं बंडल बाहेर काढायचं काही कारण नव्हतं.

लंडनमधल्या कुणी सज्जन भामट्याने एका दुकानात तिची पर्स लंपास केली. मी भामट्याला 'सज्जन' का म्हणालो हे नंतर तुमच्या लक्षात येईल.

वासंतीबेनची पर्स गेली त्यात तिचे सहाशे डॉलर्स होते असं ती म्हणत होती. पण प्रत्यक्षात जास्त असावेत असा माझा अंदाज होता. वासंतीबेनचे डॉलर्स चोरीला गेल्यानं आम्हांपैकी कोणाला फारसं वाईट वाटलं नाही; कारण अमेरिकेत गेल्यानंतर नातलगांकडून तिला आणखीन डॉलर्स मिळू शकले असते. पण त्या बाईनं आपला पासपोर्टसुद्धा त्याच बॅगेत ठेवलेला होता. म्हणजे उद्या अमेरिकेला जायच्यावेळी हिच्याकडं पासपोर्ट नसल्यामुळं ती आमच्यासोबत येऊ शकणार नव्हती आमच्यासोबत आलेले दिल्लीचे अगरबत्तीवाले गर्ग हे सामाजिक कार्य करण्यासाठी अगदी टपलेले! वासंतीबेनचा पासपोर्ट चोरीला गेला म्हटल्याबरोबर गर्गसाहेब वासंतीबेनला म्हणाले,

'बेहेनजी, कुछ फिकर मत करना। अभीके अभी हम लोग इंडियन एंबसीमे जायेंगे और डुप्लीकेट पासपोर्ट लाएंगे।'

वासंतीबेनबरोबर आलेल्या कुसुमबेननं टॅक्सीसाठी पैसे दिले. गर्गसाहेबानं इंडियन एंबसीत जाऊन गयावया करून डुप्लीकेट पास मिळवण्याचा प्रयत्न केला. सोबत मेहेरनोश पटेल होता. त्यानं आपणच या टूरचा रिप्रेझेंटेटीव्ह असल्याचा निर्वाळा दिला. म्हणून वासंतीबेनला डुप्लीकेट पासपोर्ट मिळाला त्यावेळी एंबसीत सांगण्यात आलं की जर मूळ पासपोर्ट मिळाला, तर हा डुप्लीकेट पासपोर्ट अमेरिकेत गेल्यानतर तिथल्या इंडियन एंबसीत परत करावा पण लंडनमध्ये चोरीला गेलेला पासपोर्ट मिळेलच कसा? पण आमच्या या ट्रिपमध्ये अनेक आश्चर्यकारक घटना घडत होत्या वासंतीबेनचा पासपोर्ट मिळाला ज्या भामट्याने तिची पर्स मारली होती त्यानं तो पासपोर्ट उघडून बघितला असावा. त्यात ही बुढ्ढी पुढं अमेरिकेला जाणार असल्याचं व्हिसावरून त्यानं ताडलं. त्याच्यातली माणुसकी जागी झाली अन् त्यानं ज्या दुकानातून वासंतीबेनची पर्स उचलली होती, त्याच दुकानात

एका स्वच्छ लिफाफ्यात तो पासपोर्ट घालून हळूच तो त्या दुकानात नेऊन टाकला होता. वासंतीबेनची पर्स चोरीला गेल्यानंतर तिनं दुकानच्या मॅनेजरला आपला लंडनमधला पत्ता सांगितला होताच. तो लिफाफा उघडून पाहताच मॅनेजरनं हॉटेल हेरवूडला अगदी सकाळी सकाळी फोन करून पासपोर्ट मिळाल्याचं कळवलं आणि तो घेऊन जाण्याचीही विनंती केली होती.

आम्ही साडे-अकराच्या सुमारास लंडन सोडणार होतो आणि वासंतीबेनचा मूळ पासपोर्ट दहा वाजता परत मिळाला. अगरबत्तीवाल्या गर्गनी त्या भामट्यास खूप भारतीय शिव्या घातल्या. त्यांनी इतका आटापिटा करून वासंतीबेनला पासपोर्ट मिळवून दिला होता, त्यावर पाणी पडलं होतं.

म्हणून मला मात्र तो भामटा सज्जन वाटला. डॉलर्स, पौंड उचलणे हा आपला धंदा असं तो अगदी प्रामाणिकपणे मानत असला पाहिजे. जेव्हा तो पासपोर्ट त्यानं उघडून बघितला असेल, तेव्हा आपल्याला त्याचा काहीएक उपयोग नाही हे त्याच्या लक्षात आलेलं असावं. शिवाय जिचे शेकडो डॉलर्स आपण उचललेत तिच्यावर थोडी दया करावी असंही त्याला वाटलं असण्याचा संभव आहे. पण काही का असेना, वासंतीबेनचा पासपोर्ट परत मिळाल्यानं गर्ग सोडून आम्हा सर्वांना समाधान मिळालं.

पुन्हा हिथ्रो विमानतळावर वेटींग हॉलमध्ये बसलो तेव्हा, बरेच दुसरे भारतीय प्रवासी दिसले. त्यांत एक धैर्यवान नावाचे महाराष्ट्रीयन गृहस्थ होते ते आपल्या दीड वर्षांच्या बेबीला अन् पत्नीला सोबत घेऊन अमेरिकेला चालले होते. माझी त्यांची ओळख झाली त्यांचे डोळे अतिशय लाल दिसले म्हणून मी म्हणालो, ' मुंबईत अजून डोळ्याची साथ आहे वाटतं ?'

' छे ! होऽऽऽ डोळ्याची साथ केव्हाच आटोक्यात आलीय. काल दिल्ली सोडल्यापासून आमच्या बायकोनं मला क्षणभर विमानात झोपू दिलं नाही. '

' ते का ?'

' अहो, काय सांगायचं, असे डोळे मिटले की ती दंडाला चिमटा काढून मला म्हणायची – ' अहो, झोपता कसले ? विमानाला काहीतरी झालं तर सुरक्षिततेचा उपाय म्हणून काही हालचाल करायला नको का ? झोपू नका

अगू तुम्ही !'

मी तिला म्हणालो, ' विमानात काही बिघाड झाला तर आपले पायलटस् आपल्याला कुठंही सुरक्षित उतरवण्याची पराकाष्ठा करतील आणि समज, विमानात अचानक स्फोटच झाला अन् विमान कोसळलं, तर मी जागा असून तरी काय करणार आहे? उगाच चिंता नको करू ! मला शांत चित्तानं थोडी झोप येऊ दे !'

मी हसून म्हणालो, ' म्हणजे वहिनींची विमानात बसण्याची पहिलीच वेळ दिसते !'

' हो. ती म्हणत होती बोटीनंच जाऊ, त्यात धोका कमी असतो, पण महिनाभर समुद्रावर तरंगत जायला वेळ आहे कोणा लेकाच्याला ! या आपल्या इंडियन बायका म्हणजे अद्वितीय !'

बाजूला त्यांच्या पत्नी बेबीला खांद्यावर घेऊन उभ्या होत्या आणि त्या आपल्या पतिराजांवर दातओठ खात होत्या. शेवटी न राहवल्यानं त्या म्हणाल्या, ' काहीतरी वाटतं का असं बोलायला ? मी तुम्हाला कधी असं म्हटलं ?'

' कधी म्हटलं ? अगं, नवऱ्याचं आडनाव ' धैर्यवान ' आहे, आणि लग्नापासून ते तुझ्याही नावापुढं चिकटलं आहे आपल्या आडनावाची बूज राख असं किती वेळा तुला सांगितलं तरी, तू ऐकत नाहीस. मग मी रात्री सरळ ' ब्लॅक लेबल ' ची अर्धी बाटली हळूहळू संपवली झालं. त्या धुंदीत उरलेला प्रवास झाला !'

' मी भीत होते हा बहुदा त्या व्हिस्कीच्या नशेतच तुम्हाला भास झाला असावा !' सौ. धैर्यवानांनी शेवटी टोमणा मारला.

त्या पतिपत्नींमधला संवाद कानावर पडल्यानंतर वाटलं, भारतीय स्त्री जगाच्या कुठल्याही प्रदेशात गेली तरी, ती नवऱ्यावरचं आपलं अधिपत्य सोडणार नाही. धैर्यवानांच्या हातात ' टाईम्स ऑफ इंडिया ' होता. तो मी आधाशासारखा वाचला.

लंडनवरून आम्हाला अमेरिकेला घेऊन जाणाऱ्या विमानाचं नाव होतं हर्षवर्धन !' मुंबईवरून पॅरिसला आणलं होतं ' समुद्रगुप्ता'नं, आता आमच्या सेवेला ' हर्षवर्धन ' आले होते. बाकी ऐतिहासिक नावं

विमानाला द्यायची ही एअर इंडियाची पद्धत मला फार आवडते. ' हर्षवर्धन ' सुद्धा ' 747 Boeing ' होते. यातही तीनशे पंच्याऐंशी प्रवासी बसण्याची क्षमता होती. विमानात बहुसंख्य भारतीय प्रवासी चढले. त्यामुळे कल्कलाट वाढला. शेजारच्या प्रवाशाला आपल्या मोठ्या बोलण्याचा उपद्रव होईल याची तमा न बाळगता घरगुती गप्पासप्पांना ऊत आला.

युवर अटेन्शन प्लीज ! वुई वेलकम् ऑल ऑफ यू ऑन बोर्ड द् हर्षवर्धन. ऑन बिहाफ ऑफ कॅप्टन परेरा, वुई वुईल नाऊ टेक ऑफ फॉर न्यूयॉर्क. द् डिस्टन्स बिट्वीन् लंडन अ‍ॅन्ड न्यूयॉर्क इज फाय थाऊजंड सेवन हंड्रेड अ‍ॅन्ड फॉर्टी थ्री किलोमीटर्स. वुई वुईल कव्हर धिस डिस्टन्स इन सेव्हन अवर्स अँन्ड ट्वेंटी मिनिटम्. प्लीज फासन युवर बेल्टम् अ‍ॅन्ड एक्स्टींग्विश युवर सिगारेट्स !'

हिथ्रो विमानतळाच्या धावपट्टीवर वेगानं धावणाऱ्या ' हर्षवर्धन 'नं आकाशात झेप घेतली. जवळ जवळ भारताइतकंच हवाई अंतर तोडून आम्ही ' अंकल मॅम 'च्या भेटीला निघालो होतो. जगातले प्रचंड लोकशाहीवादी राष्ट्र म्हणून ज्याचा उदोउदो होतो त्या अमेरिकेच्या दर्शनासाठी मी आतुरलो होतो.

विमानानं हवेत झेप घेतल्यावर एक गोष्ट लक्षात आली दिल्ली सोडल्यापासून ते जर्मनीत फ्रँकफूर्टला उत्तरेपर्यंत वाटेत पाकिस्तान, अफगाणिस्तान, रशिया, पोलंड, जर्मनी या देशांची भूमी ओलांडली होती. विमानाच्या यंत्रात काही घोळ झाला तर, खाली कुठल्या ना कुठल्या विमानतळावर उतरण्याची शक्यता होती. पण आता पावणेसहा हजार किलोमीटर्स खाली भूमीचं दर्शनसुद्धा घडणार नव्हतं. लंडन सोडल्यापासून ते न्यूयॉर्कला पोहोचेपर्यंत खाली पसरलेला निळाभोर आणि अथांग असा अटलांटिक महासागर दिसणार होता

मनात हे विचार येतात न येतात तोच जर विमान समुद्रावर उतरवण्याची वेळ आली तर गळ्यात लाईफ जॅकेट घालून कोणत्या दाराने बाहेर समुद्रात स्वतःला झोकून द्यायचे याचे प्रात्यक्षिक सुरू झाले. सदा धैर्यवान वहिनींना मी मनातल्या मनात हसलो होतो पण आता हा अटलांटिक पार होईपर्यंत विमानाला काही अपघात घडू नये म्हणून मी ' व्यंकटेश स्तोत्र '

म्हणायला सुरुवात केली होती.

इतक्यात माई म्हणाल्या, ' साहेब, जमीन बघून घ्या. पुन्हा सात तास खाली जमीन दिसणार नाही ! '

आता मात्र मी मनातून खरोखरच खचलो. तात्पुरतं का होईना पण मनोधैर्य देण्याची किमया असलेलं औषध विमानात मिळत होतं – ' स्कॉच व्हिस्की. ' मी तात्काळ एक डबल पेग स्कॉच मागवली. तसा हवाई प्रवासात मी स्कॉचची ऑर्डर देण्यासाठी कारणंच शोधत असे.

विमान अटलांटिक महासागरावरून उडत होते. पण ते निश्चितच पश्चिमेला चाललेले होते. पण हवेत आपणाला दिशा ओळखता येते ती फक्त सूर्याच्या स्थानावरून. जर आकाशात मेघांची दाटी असली तर सूर्य नेमका कुठं आहे हेच कळेनासं होतं. लंडन सोडल्यानंतर थोडा वेळ खाली जमीन आणि सागर दिसले; पण जसजसे विमान अधिक उंच चढले तसे खालचे काहीच दिसेनासे झाले. बघेल त्या दिशेला ढगांचा थर पसरलेला. हर्षवर्धनसुद्धा त्या ढगात शिरले होते. मी कल्पना केली, समोरून येणारं विमान आमच्या विमानाला दिसलं नाही, आणि हवेतल्या हवेत दोन विमानांची टक्कर झाली तर ?

माझी ही भीती खरंच तुम्हाला हास्यास्पद वाटेल. पण आजपर्यंत युरोपात आणि अमेरिकेत असे एकूण चौदा लहानमोठे अपघात झालेले आहेत. आम्ही सॅनडिएगो इथं पश्चिम अमेरिकेत श्री. सराफ यांच्याकडं उतरलो होतो. तेव्हा तिथं आम्ही जाण्याच्या काही दिवसांपूर्वी झालेल्या विमानांच्या टक्करीची कमिशन नेमून चौकशी सुरू होती. आणि गम्मत अशी की, त्या अपघातात ' Three planes crashed ' असा पुरावा पुढे येत होता. म्हणजे समोरा–समोरून येणाऱ्या फक्त दोनच विमानांची थडकाथडक झाली नसून त्यावेळी आडवं जाणारं तिसरं एक विमान त्या प्रकारात सापडल्याचं निष्पन्न झालं होतं. आपल्याला वाटतं, हे आकाश एवढं प्रचंड. त्या आकाशाच्या मानाने विमान कितीही मोठं असलं तरी ते एका लहान कणाइतकंच आणि नेमके असे दोन कण कसे काय एकमेकांना भिडतात ?

हवाई प्रवासामुळं अवकाशातून असंख्य विमानांची ये–जा सुरू असते. ज्याचं ' भरून आलेलं ' आहे असे दुर्दैवी प्रवासी असणारं विमान नेमकं

दुसऱ्या विमानाला धडक तरी देतं किंवा काहीतरी यांत्रिक बिघाड होऊन जमिनीवर कोसळतं तरी ! मी आज हे प्रवासवर्णन लिहीत आहे याचा अर्थ हाच की, हवेमधून परलोकगमन करण्याचा योग माझ्या कुंडलीत नव्हता. आता भविष्यात असेल तर मात्र मला त्याची कल्पना नाही.

विमानात काय किंवा मोटारीत काय, तीन तासांपेक्षा अधिक काळ बसलं की, माझं अंग कटमटायला लागतं. मग उगाच उठून टॉयलेटकडं जा, एअर होस्टेलला जिंजर लेमनचा टीन आहे का जाऊन विचार, कुणीतरी प्रवाशानं उगाच आपल्याकडं पाहून स्मित केलं की लगेच त्याच्याशी वातचित करायला सुरुवात कर. ' आपण कुठले ? कुठे चालला ? किती मुक्काम आहे ? वगैरे वगैरे ! हे सर्व करून कंटाळा आला की, इयरफोन कानात अडकवून भारतीय संगीत ऐकायचं ! तोवर लंच किंवा ब्रेकफास्ट येतो. त्यातल्या मेनूवर माईशी चर्चा करायची ! हे काय हे, या मेनूत काडीइतका बदल नसतो ! ब्रेड, बटर, चीज, लँब किंवा चिकन् नि शेवटी एक स्वीट डीश ! पहिल्या पहिल्यांदा त्या पारदर्शक कागदाच्या वेष्टनातल्या कागदी ट्रेमधून दिलं जाणारं ब्रेकफास्ट किंवा लंच खाताना बरं वाटायचं. पण नंतर नंतर त्या अन्नपदार्थांचा वास नाकात बसला होता, त्यामुळे ते खाणं नको वाटायचं झणझणीत काळ्या तिखटाचा मटणाचा रस्सा आणि ज्वारीची भाकरी, बुक्की मारून फोडलेला कांदा तोंडी लावायला याची लज्जत आठवायची ! ते अन्न पुन्हा केव्हा खायला मिळेल असं एकसारखं वाटायचं !

इंग्रज म्हणे मसाल्याच्या शोधात भारतात आले. बरं, त्याच कारणास्तव ते भारतात आले होते असं आपण क्षणभर गृहीत धरू. मग अजूनही युरोप आणि अमेरिकेत आमच्या अस्सल भारतीय जेवणाच्या ' रिसीपीज ' का लोकप्रिय झालेल्या नाहीत हे काही केल्या मला उलगडत नव्हतं. ते लोक मिरची खात नाहीत हे एक मला मान्य. पण मिरचीचा वापर न करताही आमच्याकडं जे अस्सल पंजाबी, राजस्थानी, मोंगली आणि मराठमोळे मटणाचे पदार्थ बनवले जातात त्याची बरोबरी करणारा एकही पदार्थ मला आढळला नाही. पुढं पुढं त्या हॅम्बुर्गरचा अन् हॉट डॉगचा वीट येऊ लागला. पण भूक लागल्यानंतर ती शमवण्यासाठी ते खाण्याशिवाय दुसरा काहीएक

उपायच नव्हता

मसाल्यासाठी साहेब हिंदुस्थानात मुळीच आला नव्हता. मसाल्याचं कारण पुढं करून त्याला आमची भूमी बळकवायची होती. दीडशे वर्षे अव्याहत त्यांनी आमच्यावर अधिपत्य गाजवले. एका अर्थी ते बरेच झाले म्हणा ! मला असं वाटतं, साहेबानं कांही काळ आपल्यावर राज्य केलं तेच योग्य झालं. नाहीतर आम्ही अजूनही मागासलेले राहिलो असतो. एका गावावरून दुसऱ्या गावाला बैलगाडीतून किंवा घोड्यावरून, नाहीतर गाढवावरून प्रवास करीत राहिलो असतो राज्ययंत्रणा चालवण्याचं ज्ञान, दळणवळणाची साधनं, रस्ते, बाह्य जगाचं ज्ञान, विज्ञान प्रगतीचे ज्ञान हे सर्व आपण साहेबाकडूनच घेतलं. अजूनही महाराष्ट्रात असा काही भाग आहे की तिथल्या जनतेला अंधश्रद्धेनं पार भारावून टाकलेलं आहे. प्रवासाला निघण्याच्या अगोदर एक महिना मी मलकापूरच्या कोर्टातलं काम संपवून पोलीस चौकीसमोर सहज खुर्चीवर बसलो होतो. शुक्रवार होता. मलकापूरचा तो बाजारचा दिवस ! येळवण जुगाई या डोंगराळ भागातून कोकणी स्त्रिया अन् पुरुष मलकापूरला बाजारला येतात अन् संध्याकाळी एकत्र मिळून आपआपल्या डोंगरी वस्त्यांवर परत जातात. एखाद्याचा बाजार लवकर आटोपला तर, त्यानं इतरांच्यासाठी वाट पाहात बसायच्या जागा ठरलेल्या असतात विशेषत: चौकीसमोरचा कठडा धनगर समाजातल्या बायकांनी भरतो. त्यांची आपसातली चर्चा, त्यांचे आचार–विचार अगदी जवळून न्याहाळता येतात. त्या दिवशी एक गलितगात्र झालेली धनगरीण काळ्या रंगाचं कोंबडीचं एक पिल्लू घेऊन आली. तिच्या ओळखीच्या दुसऱ्या वस्तीवरच्या बाईनं विचारलं,

‘ किती पैकं दिलं ?’

‘ च्यार रुपय !’

‘ म्हाग पडलं !’

‘ काय करू बाई ? तापच हटंना झालाय. म्हसोबावरनं उतरून टाकल्याबिगार ताप नाय हाटनार म्हनला नानुबाबा !’

म्हणजे ‘ नानुबाबा ’ नावाच्या कोणी मांत्रिकानं सतत ताप येतो म्हणून

या बाईला काळ्या रंगाचं कोंबडीचं पिल्लू देवावरून उतरून सोडायचा सल्ला दिला होता. तापाचा आणि त्या काळ्या रंगाच्या कोंबडीच्या पिल्लाचा अर्थाअर्थी काहीतरी संबंध लावता येईल का ? मलकापुरात दहा-पाच डॉक्टर्स आहेत. एकाही डॉक्टरला आपली प्रकृती न दाखवता त्या नानूबाबाच्या सल्ल्यानुसार वागणाऱ्या अशा शेकडो स्त्रिया अन् पुरुष मी नेहमीच पाहात असतो.

इंग्रज आले नि गेले, पण ही माणसं मात्र अजून आहेत तिथंच आहेत. आणखीन अनंत काळ गेला तरी, ते लोक तिथंच राहणार आहेत. घोर अज्ञान घालवायचं असेल तर सक्तीचं शिक्षण हाच एकमेव उपाय ! पण काही राज्यकर्त्यांना अशी अज्ञानी अन् अडाणीच जनता हवी असते. दीर्घकाळ सत्तेवर राहायचं असेल तर, मतदाता शहाणा होऊन कसा चालेल ?'

अटलांटिक महासागरावरचे ते सात तास तसे फारसे कंटाळवाणे वाटले नाहीत, याचं बरंचसं श्रेय विमानातल्या भारतीय प्रवाशांनाच द्यायला हवे. आपल्या घरातले तंटे-बखेडे, व्यापारी लोकांच्या आपसातल्या चर्चा, केवळ मुलांना जन्म देण्यासाठीच म्हणून भारतात पाठवलेल्या लेकुरवाळ्या स्त्रिया, त्यांच्या बाळांचे रडणे असे विविध प्रकार पाहात ते सात तास सरले होते.

'युवर अटेन्शन प्लीज !' हे शब्द कानावर पडताच मी खिडकीच्या काचेतून डोकावून बाहेर बघितलं. प्रचंड पसरलेलं न्यूयॉर्क शहर, तिथल्या उत्तुंग इमारती नजरेच्या टप्प्यात आलेल्या होत्या. सूचनेनुसार पोटावर पट्टे बांधले गेले. धूम्रपान करणाऱ्यांनी सिगारेटी, बिड्या विझवल्या. बिड्या म्हटल्यावर तुम्हाला कदाचित विचित्र वाटेल; पण जे बहुसंख्य धूम्रपानप्रेमी युरोप-अमेरिकेत आहेत, त्यांनी आपली बिडी सोडलेली नाही. विशेषत: शेठजी, बनिये, पटेल लोक बिड्याच ओढत होते त्या सर्वांनी आपलं धूम्रपान थांबवलं.

विमान हळूहळू खाली येत होतं, जे एफ. के एअरपोर्टवरची विमानं आणि इमारती स्पष्ट दिसू लागल्या. हे जे. एफ. के. एअरपोर्ट म्हणजेच जगप्रसिद्ध जॉन एफ. केनेडी एअरपोर्ट. या आंतरराष्ट्रीय विमानतळावरून प्रत्येक मिनिटाला एक विमान आकाशात झेपावते व प्रत्येक मिनिटाला

कुठले ना कुठले विमान धावपट्टीवर उतरत असते.

त्या प्रचंड विमानतळाच्या इमारतीत प्रवेश करताना थोडं थ्रिल वाटलं. जगातलं लोकशाहीवादी प्रचंड राष्ट्र, अवकाशात यानं सोडून वैज्ञानिक प्रगतीत रशियाशी काकणभर वरचढ सिद्ध झालेलं राष्ट्र, जगातल्या भुकेकंगाल देशांना गव्हाचं भिक्षादान करणारं राष्ट्र, पृथ्वीतलावर व्यक्तिस्वातंत्र्य अबाधित राहावं म्हणून इंडोचायना, कोरिया यांसारख्या राष्ट्रांना शस्त्रं पुरवणारा देश, अशा अनेक कारणांनी अमेरिकेचा अप्रत्यक्ष असा परिचय झालेला होता. पण आज प्रत्यक्ष त्या अंकल सॅमच्या भूमीवर पाय ठेवण्याची संधी मिळत होती

आमचे पासपोर्ट हातात घेऊन इमिग्रेशन क्लिअरन्ससाठी आम्ही ओळीनं उभे होतो. लंडनला उतरलो तेव्हा जादा अक्कल चालवल्यामुळे तिघांना काही काळ अडकून राहावं लागलं होतं म्हणून, ' इमिग्रेशन अधिकाऱ्याला अत्यंत आदबीनं उत्तर द्या, असं यावेळी मेहेरनोश पटेलनं सर्वांना सांगून ठेवलं होतं. पण या विमानतळावरचे अधिकारी अतिशय ' लिबरल ' होते त्यांनी पासपोर्टवरचा व्हिसा बघितला आणि एक स्लिप जोडली.

तेथून बाहेर पडलो तर, ' ही ' जत्रा जमलेली. आमच्या फ्लाईटमधून उतरलेल्या भारतीयांना घेऊन जायला त्यांची नातेवाईक मंडळी आली होती. त्यांचे हास्यविनोद, भारतातल्या नातेवाईकांचं कुशल विचारणं चालू होतं. त्या भाऊगर्दीत एकही माणूस आमच्या परिचयाचं असणं शक्य नव्हतं, पण अचानक त्या गर्दीत एक व्यक्ती ओळखीची भेटली.

पुण्याचे प्रा. चंद्रकुमार डांगे ! प्राध्यापक महाशय आणि मी बार्शीला चार वर्षे एकत्र होतो. अध्यापन या क्षेत्राशी माझा फारसा संबंध नसला तरी, जी काही साहित्यप्रेमी अध्यापक मंडळी होती त्यांच्याशी नकळत नाते जडत असे.

लुकडे, डोक्यावरचे केस पिकून शुभ्र झालेले परिचित व्यक्ती भेटल्यावर अंगावर अचानक बर्फाचं पाणी पडल्यासारखे काही क्षण थिजून गेल्यासारखा अभिनय करणारे, चंद्रकुमार डांगे यांची अन् माझी बार्शीत दोस्ती जमली होती. तसे ते वयानं माझ्यापेक्षा कितीतरी ज्येष्ठ, पण आपली ज्येष्ठता ते माझ्याकडे येताना घरीच ठेवून येत. माझ्या साहित्यनिर्मितीबद्दल त्यांनी

नेहमीच एक खंत वाटे. ते म्हणत, ' तुम्ही आजपर्यंत मनोरंजनात्मक लिहिलेत; यापुढे थोडे कलात्मक लिहा '

मी त्यांना हसून म्हणे, ' म्हणजे मला आज जी लोकप्रियता आणि धनप्राप्ती होते आहे ती सर्व सोडून द्या ! खरं सांगू, मलाही आताशी तुमच्यासारखंच वाटायला लागलंय; पण मला आणखीन काही काळ माझ्या लिखाणाचा घाट बदलण्याची इच्छा नाही !'

' पण का ? तुम्ही केवळ लिखाणावरच उदरनिर्वाह करता असं नाही.'

' ते बरोबर आहे. पण थोडं थांबा !'

बार्शीतून मी कोल्हापुरी आलो. डांगे सर पुण्यनगरीला स्थायिक झाले. अधून-मधून भेट होते. ते मला न विसरता विचारतात, ' अजून किती काळ थांबायचं ? बार्शीत असताना फक्त पाच कादंबऱ्या तुमच्या नावावर चढलेल्या होत्या आता तो आकडा त्रेचाळीसवर गेला आहे. ' डीप ' जाणारं तुमचं लिखाण तुमच्या हातून घडणार केव्हा ?'

मी आताशी त्यांना उत्तर देतो, ' सर, मी ज्या वाटेनं आजपर्यंत आलो ती बदलावी असं मला वाटत नाही. कलात्मक, विश्लेषणात्मक, अक्षर वाङ्मय लिहिणारी बरीच मातब्बर मंडळी साहित्य-शारदेच्या दरबारात विराजमान झालेली आहेत. त्यांच्या ओळीला बसायची भीती वाटते मी हा या दरबाराच्या दाराबाहेर उभा आहे तेच ठीक आहे. मला इथून निळ्याभोर आकाशातून कलकलाट करीत जाणारा हिरवागार पोपटांचा थवा दिसतो क्वचित् प्रसंगी काही रंगीबेरंगी अनोखे पक्षी माझ्यासमोर झाडावर उतरतात. इथून मला दूर अंतरावरचे डोंगर, टेकड्या दिसतात. तिथलं वन्य जीवन आठवतं धनगर, पारधी, कुंचेकोरवी, या लोकांचा मृगयेपायी घडलेला सहवास आठवतो. गुन्हेगारी जगताचा संपर्क सरकारी वकील या नात्याने गेली बावीस वर्षे घडतोच आहे. असंख्य प्रकारची माणसं जवळून पाहायला मिळतात. हे सर्व मी बाहेर असल्यामुळं दिसतं, जाणवतं. माझ्या अल्पशा कुवतीनुसार मी लिहितो आहे. प्रकाशक एकमेकांशी स्पर्धा करून माझं हस्तलिखित मिळवतात. लायब्ऱ्यांमधून गेली दहा-वीस वर्षे माझ्या लिखाणाला प्रचंड दाद मिळाल्याचे दाखले मिळतात. हे सर्व सोडून बहुसंख्य लोकांना जे कळत नाही ते लिहावंसं वाटत नाही. किंबहुना

माझ्या बुद्धीला तेवढी झेप घेण्याची क्षमता नसेल. चाललंय तसंच चालू द्या ना !'

इतकं बोलल्यावर डांगे सर पाठीवर थाप मारतात आणि म्हणतात, 'तुम्ही फार पक्के अन् लबाड आहात !'

तर असे ज्यांच्या वयोमानामुळे नावापुढे असलेली ' कुमार ' ही उपाधी शोभत नसलेले, पण कुमाराचा अदम्य उत्साह घेऊन सतत हास्यवदनाने वावरणारे डांगे सर, आपल्या कन्येला भेटायला अमेरिकेला आले होते. एकमेकांचे कुशल विचारून आम्ही परस्परांचा निरोप घेतला.

विमान जमिनीवर उतरले तेव्हा माझ्या हातातल्या घड्याळात आठ वाजले होते पण आठ ही ' लंडन ' ची वेळ होती. न्यूयॉर्कच्या घड्याळात दुपारचे चार वाजले होते. म्हणजे चार तास पुन्हा मागे जाणे आले. भारत सोडल्यापासूनच असा वेळेचा लपंडाव सुरू होता. कधी घड्याळ पुढे न्यावे लागे, तर कधी मागे लहानपणी भूगोल शिकवताना जगातल्या भिन्न भिन्न देशांत वेळ बदलत असते हे इतकी डोकेफोड करून शिकवले तरी, टाळक्यात शिरले नव्हते. पण आज प्रत्यक्षात जगातल्या निरनिराळ्या भागांत वेळा बदलत असतात हे मी अनुभवत होतो. त्यावेळी भूगोलाची पुस्तकं लिहिणारी विद्वान मंडळी काहीतरी थापा ठोकतात असं वाटत असे. पण आता मात्र त्यांचं ज्ञान बरोबर होतं असं भूगोल शिकवणाऱ्या गबाले मास्तरांना भेटून सांगावं व अजाणतेपणी त्यांच्या ज्ञानाबद्दल अनुद्गार काढल्याबद्दल त्यांची क्षमा मागावी म्हटलं तरी, ते शक्य नाही. गबाले सर हा ' भूलोक ' सोडून केव्हाच गेले !

न्यूयॉर्कच्या एअरपोर्टवर आम्हाला घेऊन जाण्यासाठी बस येऊन थांबलेली होती. हवेत उष्णता होती. ती हवा अगदी मुंबईच्या हवेसारखी वाटली. आम्हाला घेऊन बस न्यूयॉर्क शहराकडं निघाली तेव्हा मी आजूबाजूचा निसर्ग न्याहाळत होतो. फ्रान्स, जर्मनी, स्वित्झर्लंड इथं पाहिलेली वनश्री न्यूयॉर्कच्या परिसरात दिसत नव्हती मात्र रस्ते अतिशय रुंद होते एकाच वेळी चार वाहनं जाऊ शकणारे अन् चार वाहनं येऊ शकणारे प्रचंड रस्ते हे न्यूयॉर्क शहराचं उत्तुंग इमारतींसारखंच दुसरं वैशिष्ट्य !'

हॉटेल जॉर्ज वॉशिंग्टन इथं आम्ही उतरलो. हे हॉटेल काहीसं जुनं होतं.

पण प्रचंड होतं बसमधलं सामान उतरून घेण्यासाठी निळा वेषधारी निग्रो नोकर आले. काळे कुळकुळीत डोक्याचे केस मेंढराच्या लोकरीसारखे दाट अन् कुरळे, चपटी नाकं आणि थोराड हाडांचे निग्रो जी अमेरिकन भाषा बोलत होते त्यातला एखादा शब्दसुद्धा मला समजत नव्हता. भारतीयांकडे ते थोड्या सहानुभूतीने पाहात. क्वचित प्रसंगी ते स्मितही करीत.

आठव्या मजल्यावर आमची खोली होती. खोलीत गेल्या गेल्या प्रथम एअर कुलर लावला. त्या कुलरचा पंखा इतका मोठा आवाज करीत होता की, अक्षरशः पिठाच्या गिरणीत बसल्यासारखं वाटू लागलं. खोलीत फोन होता. चिरंजीवांनी हॉटेल मॅनेजरकडं पंख्याबद्दल तक्रार नोंदविली. पंधरा मिनिटाच्या आतच हॉटेलचा टेक्नीशियन येऊन एअर कुलरचा पंखा दुरुस्त करून गेला.

लंडन सोडल्यापासून सतत सात-साडेसात तास विमानात बसून इतका कंटाळा आला होता की, अमेरिकेच्या या प्रख्यात शहरात फेरफटका मारायचे त्राण उरलेले नव्हते.

रात्रीचे नऊ वाजले तरी पश्चिम क्षितिजावर उजेड दिसत होता. टेलिव्हिजनवर बातम्या लागून गेल्या. नंतर हवामानवृत्त लागलं. अधून-मधून टूथपेस्ट, टॉनिक्स, कुत्र्या-मांजराचे खाद्य, आईस्क्रिम, चॉकोलेटस्, सॉसेस, टीन्ड फूड, कपडे, मोटारी, केस न गळण्याचे औषध इत्यादींच्या जाहिराती लागून गेल्या. डिनर घेऊन केव्हा एकदा आडवं होतो असं होऊन गेलं होतं

दुसऱ्या दिवशी सकाळी नऊ वाजता ब्रेकफास्ट घेऊन न्यूयॉर्क शहरातील प्रेक्षणीय आणि महत्त्वाची अशी स्थळं पाहायला बसने निघालो. यावेळी आमचा गाईड होता चेस्टरटन. निळा बुशशर्ट, तसलीच पँट घातलेला हा गाईड पक्का अमेरिकन व्यापारी वृत्तीचा होता. त्यानं गाडीत बसल्यानंतर न्यूयॉर्क शहरातील प्रेक्षणीय स्थळांचे फोटोकार्डस् लोकांना पाहायला दिले आणि सांगितलं, ‘ ज्यांना कोणाला हे कार्डस् नको असतील त्यांनी नंतर ते मला परत करावेत. ’

जॉर्ज वॉशिंग्टन हॉटेलजवळच युनायटेड नेशन्सची इमारत होती. इमारत टोलेजंग होती अन् इमारतीसमोर जगातल्या सभासद राष्ट्रांचे ध्वज

फडफडत होते. अशा वेळी माझी नजर नेमका ' तिरंगा ' शोधत राही तो दिसला की मनाला थोडं बरं वाटे

न्यूयॉर्क शहराचं खास वैशिष्ट्य म्हणजे, तिथल्या ' स्काय स्क्रॅपर्स ' –गगनचुंबी इमारती ! वर्ल्ड ट्रेड सेंटरच्या दोन जुळ्या इमारती उल्लेखनीय आहेत. या वर्ल्ड ट्रेड सेंटर विभागात जेव्हा आम्ही गेलो, तेव्हा तिथल्या ऑफिसेसमध्ये लंचची वेळ झाली होती. माणसांचे प्रचंड लोंढे रेस्टॉरंटस्कडं चालले होते मुंबईला फोर्ट विभागात संध्याकाळी चार–पाचच्या सुमारास जसं माणसांचं ' पेव ' फुटतं तसंच ते दृश्य दिसत होतं या वर्ल्ड ट्रेड सेंटरमध्ये व वॉल स्ट्रीटवर कोटयवधी डॉलर्सची उलाढाल होत असते. अमेरिका हे सर्व जगात सधन राष्ट्र त्यात लोकशाही, म्हणजे व्यक्तीचा संपत्ती बाळगण्याचा हक्क मान्य केला गेला असल्याने, इथं काही श्रीमंतांना कुबेर होण्याची इच्छा निर्माण होणं साहजिकच होतं. त्यामुळं ' स्टॉक एक्सचेंज ' तेजी–मंदी हे व्यवहार फार प्रचंड प्रमाणात या वॉल स्ट्रीटवर चालतात. अति धनसंचय करणाऱ्या माणसांबद्दल माझ्या मनात एकप्रकारची घृणा आहे. अशी माणसं समाजाच्या दृष्टीनं निरुपयोगी असतात. अशा बऱ्याच लोकांचं गृहसौख्यसुद्धा बिघडलेलं असतं. घरी कोणावर अशा माणसांचा विश्वास नसतो. अर्थहीन दीर्घायुष्य जसं निरर्थक असतं. त्याचप्रमाणं गरज नसताना जमवलेलं धनसुद्धा मातीमोल ठरतं; पण या सर्वच अमेरिकन लोकांच्या बाबतीत असं म्हणता येत नाही इथले बहुसंख्य नागरिक क्रेडिट कार्ड 'धारक आहेत. क्रेडिट कार्ड म्हणजे ते कार्ड धारण करणाऱ्याला कोणत्याही दुकानात डॉलर्स न देता माल खरेदी करता येतो त्या कार्डावर नोंद केलेली रक्कम दुकानदाराला कार्डधारकाच्या मालकाकडून किंवा ऑफिसकडून वसूल करता येते. आठवडाभर मनापासून काम करणारा अमेरिकन नागरिक ' वीक एंडला ' आपली आठवडयाची सर्व कमाई खर्च करून टाकतो, आणि पैसे संपले की, क्रेडिट कार्डचा वापर करतो हे अमेरिकन लोक आपल्या कमाईची उधळपट्टी करताना मागचा–पुढचा विचार कधीच करीत नाहीत; कारण त्यांना ठाऊक असतं की. आज जरी आपल्याजवळचे सर्व पैसे संपले तरी पुढील आठवडयात आपण भरपूर कमाई करणार आहोत. भविष्यात निर्वाहाची शाश्वती आहे ही खात्रीच

त्यांना सढळ हाताने खर्च करण्याची प्रेरणा देते. तसे अमेरिकेत नाटेबाज फारच कमी. एका आठवड्यापेक्षा अधिक गरजेच्या वस्तूदेखील ते खरेदी करीत नाहीत.

वर्ल्ड ट्रेड सेंटरजवळच हडसन नदी आहे. या हडसन नदीने न्यूयॉर्क शहराचे दोन भाग केलेले आहेत. हडसन नदीवर न्यूयॉर्क शहरात अडुसष्ट प्रचंड पूल आहेत त्यांपैकी एका पुलावरून जात असताना अमेरिकन पोलिसांची प्रचंड गर्दी दिसली. वाहतूक नियंत्रण करणाऱ्या दिव्याजवळ एक वरिष्ठ पोलिस अधिकारी उभा होता. आमच्या गाईडनं लगेच आम्हाला सांगायला सुरुवात केली. 'आज अमेरिकन नौदलाचा महायुद्धातील विजयोत्सव दिन साजरा होत आहे आणि या प्रसंगाचे आजचे सन्माननीय पाहुणे आहेत प्रिन्स चार्लस् ! हर मॅजेस्टी द् क्वीन यांच्या वाढदिवसादिवशी लंडनमध्ये जो अनुचित प्रकार घडला, त्याची पुनरावृत्ती होऊ नये म्हणून आज न्यूयॉर्कमध्ये कडक पोलिस बंदोबस्त ठेवण्यात आलेला आहे

आयर्लंडमध्ये असंतोष खदखदत होता. बेलफास्टच्या तुरुंगात कैद्यांनी पाळीपाळीनं आमरण उपोषण सुरू केलं होतं. त्या कैद्यांचं म्हणणं होतं की, आम्हाला तुरुंगात डाबलं आहे ते राजकीय गुन्ह्यांबाबत. तेव्हा आम्हांला इथं तुरुंगात राजकीय कैद्यांचा दर्जा देण्यात यावा. पण थॅचरबाई भलत्याच ताठ ! त्यांनी ती मागणी साफ धुडकावून लावली उपोषण करणारी सात माणसं मृत्यूमुखी पडली होती, तरीही आपल्या ध्येयप्राप्तीसाठी चाललेलं साखळी उपोषण चालूच होतं डी व्हॅलेरा या आयरीश देशभक्ताची उज्ज्वल परंपरा आमरण उपोषणानं प्रज्वलित ठेवणाऱ्या त्या आयरीश देशभक्तांना त्रिवार वंदन !

नाहीतर आमच्या महाराष्ट्रात कुठल्या ना कुठल्या जिल्ह्याच्या ठिकाणी 'आमरण उपोषण' असा बोर्ड लावून मंडळी बसलेली असतात त्यांच्या 'मागण्यांत' फारसं तथ्य तर असत नाहीच नाही, पण काहीतरी 'स्टंट' करायचं म्हणून ही मंडळी आमरण उपोषणाचं हे नाटक करीत असतात. दुसऱ्या किंवा तिसऱ्या दिवशी, कोणाच्यातरी हातून लिंबाचा किंवा मोसंबीचा रस घेऊन उपोषण सोडण्याची ते वाटच पाहात असतात. आमरण उपोषणाची नाटकं भारताइतकी दुसऱ्या कोठल्या देशात क्वचितच

पाहायला मिळतील. आमच्याकडे एक असेच जुने नेते होते ते उपोषणाला बसण्याऐवजी चक्क डोक्यावर चादर घेऊन झोपून टाकत. मी सहज चौकशी केली की, हे डोक्यावर पांघरूण घेऊन झोपतात का ? तेव्हा तिथल्या एका माझ्या ओळखीच्या स्वयंसेवकानं मला बाजूला नेऊन सांगितलं, ' आम्ही त्यांना गरम गरम भजी आणि बटाटेवडे नेऊन देतो. डोक्यावर पांघरूण घेतल्यामुळं त्यांना ते खाणं शक्य होतं. '

वैद्यकीय शास्त्रानुसार कोणीही माणूस दहा किंवा अकरा दिवसांपेक्षा अधिक काळ जिवंत राहणं शक्य नाही. मानवी शरिरातील ' युरिया ' जर बाहेर फेकला गेला नाही, तर उपोषण करणारी व्यक्ती ' युरिया ' रक्तात भिनून लगेच ' कोमात ' जाईल व गतप्राण होईल. पण आमच्याइकडचे पुढारी, नेते साधुसंत हे वीस–वीस दिवस उपोषण कसे काय करतात याचं एक गूढच आहे. परवा एका साधूने म्हणे गोवध-बंदीसाठी शंभर दिवसांचं उपोषण पूर्ण केलं बहुदा ते रात्रीच्या वेळी ' गोमुत्र ' प्राशन करीत असावेत.

तर त्या दिवशी चार्लस्‌ला काही दगाफटका होऊ नये म्हणून ' रिगन ' साहेबांनी असा कडेकोट बंदोबस्त ठेवला होता. मी चौकशी केली, ' डायनाही सोबत आलीय काय ?' पण अधिकृत लग्न झाल्याशिवाय तिला सोबत नेता येत नाही असं समजलं.

गाईड आम्हाला ' कॅथिड्रल ऑफ सेंट जॉन ' पाहायला घेऊन गेला. पॅरिसमध्ये नॉटरडॅम कॅथिड्रल बघितलं होतं त्याची भव्यता या कॅथिड्रलमध्ये नव्हती मग आम्हाला इथं घेऊन येण्याचा प्रपंच कशासाठी ? तर तो गाईड पक्का होता. त्याला तेथून जवळ असलेल्या चायना टाऊनकडं आम्हाला घेऊन जायचं होतं. आणि चायना टाऊनकडं नेण्यात त्याचा एक हेतूही होता

' चायना टाऊन ' या न्यूयॉर्कच्या विभागात जिकडं पाहाल तिकडं चिनीच दिसतात बहुसंख्य चिनी हॉटेलं चालवतात. अमेरिकन लोकांना ' चायनीज फूड ' फार आवडतं. १९४० च्या सुमारास चायना टाऊनमध्ये जेमतेम आठशे-नऊशे चिनी होते. आज त्यांची संख्या सत्तर हजार आहे.

गाईड आम्हाला चायना टाऊनमधल्या एका बुद्ध मंदिरात घेऊन गेला

आम्ही तिथं जाताच टेपरेकॉर्डवर बुद्ध धर्माची माहिती सांगणारं भाषण लागलं. मला स्वत:ला जगातल्या सर्व धर्मांविषयी नितांत आदर आहे. मी ती प्रार्थना मनापासून ऐकली. मंदिरातून बाहेर पडण्याचा मार्ग भिन्न होता. त्या मार्गाने आम्हाला एका चिन्यानं चालवलेल्या' सोव्हनीर 'च्या दुकानात नेण्यात आलं तिथं चिनी हस्तकलेचे अनेक नमुने होते कपबशा, फ्लॉवर पॉटस्, हातरुमाल, फौंटनपेन्स, किचेन्स, टेबल मॅटस्, अशा अनेक प्रकारच्या वस्तू अत्यंत आकर्षक पद्धतीनं विक्रीस ठेवण्यात आल्या होत्या. आमचा गाईड आम्ही त्या विकत घ्याव्यात म्हणून शिफारस करीत होता. त्यावेळी मला आठवली ती पॅरिसमधली गाईड फातिमा ! या गाईड लोकांनी निरनिराळ्या ठिकाणी दुकानदारांशी करारमदार करून ठेवलेले असतात. टूरिस्ट लोकांकडून काही खरेदी झाली की, या लोकांना बिनबोभाट कमिशन मिळते. त्यासाठी आडवी वाट करून हे कुठेही घेऊन जात असतात. खरं म्हणजे, न्यूयॉर्कला गेल्यानंतर ' स्टॅच्यू ऑफ लिबर्टी 'कडे गाईडने आम्हाला घेऊन जाणे जरुरीचे होते पण तिकडे जायला वेळ लागणार म्हणून तो वेळकाढूपणा करून आम्हाला ' पटवत ' होता

दुपारी चारच्या सुमारास आम्ही परत हॉटेल जॉर्ज वॉशिंग्टनकडे परतलो. त्या रात्री आम्ही तिघांनी चायना टाऊनकडे जाऊन चायनीज जेवण घ्यायचे ठरवले. मुंबईला तीन दिवसांचा मुक्काम पडला तर, एकतरी वेळ चायनीज जेवण घेण्याचा आमचा प्रोग्रॅम असतोच ! चायनीज जेवण हे खायला अत्यंत रुचकर व पचायला अतिशय हलके असते. विशेषत: चिकन चाऊमेन, चिकन वुईथ गार्लीक सॉस, लंग फंग सूप, वॉन्टोन सूप, चिकन कॉर्न सूप, फ्राईड राईस इत्यादी प्रकार फारच चविष्ट असतात. दुसरं म्हणजे, इंग्लिश जेवणाच्या मानानं ते खूपच स्वस्त असते. आमच्या घरी अधून मधून हे प्रकार बनवलेसुद्धा जातात. त्यामुळे चायनीज जेवणाची टेस्ट आम्हा तिघांनाही डेव्हलप झालेली आहे.

त्या रात्री आम्ही हॉटेलवर परत आल्यानंतर परत चायना टाऊनकडं गेलो. त्या भागात एकजात सगळे चिनी पाहून आपण हाँगकाँग किंवा शांघायच्या एखाद्या गजबजलेल्या रस्त्यावरून चालल्याचा भास होऊ लागला. चांगलं हॉटेल शोधण्यासाठी बरीच पायपीट करावी लागली. शेवटी

' वू चॉंग ' हे हॉटेल उमेशनी पसंत केलं. हॉटेल माडीवर होतं. मालकानं मान झुकवून आमचं स्वागत केलं. लाल फ्लॅनेलचा बंद गळ्याचा कोट आणि गडद निळी पँट घातलेले चिनी वेटर्स आपआपसात ' चांग चूंग चांग चूंग ' करीत होते. त्यातला एक वेटर मेनू-कार्ड घेऊन आमच्याकडे आला. मी हॉटेलात बसलेल्या गिऱ्हाईकांना न्याहाळू लागलो. आमच्या उजव्या बाजूला एक अमेरिकन आपली पत्नी आणि दोन मुलं घेऊन आला होता. मुलांनी आणि त्या गृहस्थानं फक्त सूप घेतले. त्याची पत्नी समोरच्या शिपल्याच्या डीशवर अक्षरश: तुटून पडली होती. अगदी रम घेऊन ती जेवत होती. लॉबस्टर इन गार्लीक सॉसची दुसरी एक डीश तिच्या बाजूला होती. शिपल्यातले कालव काढून खाताना तिनं चक्क भारतीय पद्धत अवलंबिली होती मध्येच लॉबस्टरचा पांढराशुभ्र तुकडा उचलून तोंडात टाकायची. तो गृहस्थ शांतपणानं सिगरेटचे झुरके घेत बायकोकडं पाहात ' तुला आणखी काय हवंय का ?' विचारत होता. पण ती शिपले खाण्यात इतकी दंग झाली होती की, तिला दुसरं काहीच नको होतं त्याचं जेवण झालं. वेटरनं तिच्यासमोर गरम पाण्याचे बाऊल आणून ठेवले. तिनं गरम पाण्यात हात बुडवले आणि नॅपकीनन पुसत पुसत ती उठू लागली उठताना तिला सायास पडले ती गरोदर होती

मग मी मनाशी विचार केला बहुदा हिला सीफूडचे डोहाळे लागले असावेत. 'सीफूड ' चे चिनी लोक जितके प्रकार बनवतात तितके दुसरे क्वचितच बनवत असतील. तृप्त झालेली ती स्त्री, तिचा नवरा दोन मुलं हॉटेलातून बाहेर पडताना मी मनाशी म्हणालो,

' आता तिसरं होणारं मूल हे बहुदा दर्यावर्दी निपजणार !

चायना टाऊनपासून जार्ज वॉशिंग्टन हॉटेल दीड मैल अंतरावर होतं. येताना आम्ही चालतच आलो होतो, पण जाताना ब्रॉडवे गल्लोगल्ली निग्रो आणि गोरे यांचा मादक पदार्थाचे सेवन करून नंगानाच सुरू असलेला बघितलं होतं रात्रीच्यावेळी त्या भागातून चालत जाणं धोक्याचं होतं.

न्यूयॉर्क हे शहर मॅनहॅटन, ब्रुकलीन व क्वीन्स या तीन विभागांचे मिळून बनले आहे. न्यूयॉर्क शहरात सुमारे चाळीस टक्के निग्रो राहतात त्यांतले काही लोक, प्राध्यापक, पोलीस, बस ड्रायव्हर, व्यापारी, सेलसमन असे उद्योग

करतात पण बरेच ' निग्रो ' केवळ गुन्हेगारीवरच गुजराण करतात. प्रचंड वेश्यागृहे, ब्ल्यू फिलमस् चालवणे, मादक पदार्थांची विक्री व व्यापार करणे, घरफोड्या करणे असे लहानमोठे गुन्हे करणाऱ्यांत निग्रोंचं प्रमाण अधिक आहे.

मी सरकारी वकील असल्यामुळे प्रथमत: न्यूयॉर्क शहरातील गुन्हेविषयक माहिती गोळा केली. प्रत्येक मिनिटाला एक ' कॉग्नीझेबल ' गुन्हा न्यूयॉर्क शहरात घडत असतो. त्या रात्री जवळ जवळ मध्यरात्रीपर्यंत सायरन वाजवत जाणारी पोलिसांची गाडी कितीतरी वेळा हॉटेलसमोरून गेली.

शहरे प्रचंड झाली की काही अनिष्ट गोष्टी नकळत येत असतात. त्यातल्या प्रमुख म्हणजे, गुन्हेगारी आणि गलिच्छपणा !

अमेरिकेतील गुन्हेगारीसुद्धा इतकी भीषण असते की, घरफोडी करणाऱ्याला घरमालकाचा प्रतिकार होईल अशी ओझरती जरी शंका आली, तरी गुन्हेगार घरमालकाला गोळी घालून ठार करतो. टी.व्ही. वर बातम्यांमध्ये अशा भीषण हत्याकांडाचे सचित्र वृत्त प्रसारित केले जात असे यांत लहान मुलांना पळवून नेवून, ओलिस ठेवून हजारो डॉलर्सची मागणीही केली जात असे. राष्ट्र जितके प्रगत, तितकी गुन्हे करण्याची पद्धतही प्रगत. गुन्हा करण्या-पूर्वी केलेला गुन्हा पोलिसांना शोधता येणार नाही याची काटेकोरपणे दक्षता घेतली जाते. गुन्हेगार आणि पोलीस ही एक पृथ्वीतलावर कधीही न संपणारी शर्यत आहे. या शर्यतीत कधी गुन्हेगार हरतात, तर कधी पोलीस !

अमेरिकेत गुन्हेगारांचं आगर आहे ते शिकागोत ! शिकागोनंतर दुसरा नंबर लागतो तो न्यूयॉर्कचा. न्यूयॉर्कनंतर नंबर लागतो वॉशिंग्टनचा हे अमेरिकेच्या राजधानीचे शहर ! लवकरच आम्ही नायगाराला अन् नंतर शिकागोला जाणार होतो. पण तत्पूर्वीच तिथल्या गुन्हेगारीची माहिती मिळाली होती.

स्वामी विवेकानंदांनी सर्वधर्म परिषदेत भारताची उज्ज्वल परंपरा सांगून ती परिषद गाजवलेले शिकागो शहर. हे गुन्हेगारांत सर्वांत उच्च क्रमांकाला असेल याची मला यत्किंचितही कल्पना नव्हती

दुसऱ्या दिवशी न्यूयॉर्क शहराचा निरोप घेऊन आम्ही जगातल्या

अतिप्रचंड अशा जलप्रपाताकडे– नायगाऱ्याकडे रवाना झालो. न्यूयॉर्कमध्ये जाऊन ' स्टॅच्यू ऑफ लिबर्टी ' जवळून पाहायला मिळाली नाही याची रुखरुख मनाला लागून राहिली होती. पण पुन्हा याच न्यूयॉर्कला येणे घडणार आहे आणि अमेरिकन स्वातंत्र्यदेवतेचा पुतळा जवळून पाहायला मिळणार आहे याची थोडीसुद्धा त्यावेळी कल्पना नव्हती.

न्यूयॉर्कचा काही भाग विशेषतः पश्चिम भाग, अत्यंत गलिच्छ वाटला. अगदी ' धारावी ' चा वास जरी नसला, तरी आणखीन काही वर्षांनी तिथं ' सवाई धारावी ' उठेल अशी लक्षणं मात्र दिसत होती. तोही भाग बहुसंख्य निग्रोंच्या वस्तीचाच होता.

काळा–गोरा वाद हा माणुसकीला कलंक आहे. रंगामुळे माणसामाणसांत भेद मानणे हे सुसंस्कृत राष्ट्राचे लक्षण नव्हे, हे सर्व कबूल करूनही म्हणावेसे वाटते की, अमेरिकेला निग्रोंचा प्रश्न भेडसावतो आहे. निग्रोंना वाटते की, आजपर्यंत आपल्याला या गोऱ्यांनी गुलामासारखे वागवले. त्यांचे वर्चस्व का म्हणून मानायचे ? एकीकडे हे दृश्य तर दुसरीकडे काही अमेरिकन तरुणी निग्रो प्रियकरासमवेत उजळ माथ्याने प्रणयचेष्टा करताना दिसत होत्या. काही पोक्त स्त्रिया आपल्या निग्रो पतीबरोबर आपल्या ' संकरित ' मुलांना सोबत घेऊन जाताना दिसत होत्या. काळे–गोरे यांचा संपूर्ण मिलाफ होणार नाही असे नाही, पण त्यासाठी अजून दीड-दोनशे वर्षे तरी जावी लागतील. काही जणांच्या मते अमेरिकेचा प्रेसिडेंट जेव्हा निग्रो होईल, तेव्हाच काळा–गोरा भेद संपुष्टात आला आहे असं म्हणता येईल. ते केव्हा व्हायचे तेव्हा होवो. पण मला मात्र काही निग्रो अत्यंत उद्दाम आणि उर्मट असे वाटले उद्दामपणा, आकस्ताळेपणा हा काही आजवर झालेल्या अन्यायांचा निषेध करण्याचा मार्ग नव्हे.

बस न्यूयॉर्क शहरापासून नायगाऱ्याच्या दिशेनं चालली होती. प्रचंड रस्ते, अत्यंत शिस्तबद्ध अशी वाहतूक व्यवस्था अमेरिकेसारखी जगातल्या कुठल्याही देशात नसेल वाहनांची गती रोखणारा एकही रस्ता आडवा नव्हता. वाटेत नदी किंवा खाडी आली तर, प्रचंड पुलांवरून रस्ते निघाले होते; तर कधी चक्क नदीखालूनच वाट तयार केलेली असे. न्यूजर्सीवरून न्यूयॉर्कला एक महिन्यानंतर जेव्हा आलो तेव्हा चक्क हडसन नदीखालच्या एक मैल

लांबीच्या लिंकन टनेलमधून प्रवास घडला. भूगर्भातून तयार केलेले बोगदेसुद्धा स्वच्छ आणि विस्तीर्ण होते.

न्यूयॉर्कच्या गगनचुंबी इमारती धूसर अशा वायूच्या स्तरात बुडाल्या. काही क्षणानंतर संपूर्ण शहरच नजरेआड झालं. न्यूयॉर्क सोडण्यापूर्वी दोन ठिकाणी फोन जोडले.– एक सुरेश खानविलकर यांना – 'सक्कामन्ना' या न्यूजर्सी स्टेटमधल्या मित्राला अन् दुसरा सौ. सराफबाईंना, सॅनडिएगो इथं, कॅलिफोर्निया स्टेटमध्ये यांपैकी सुरेश खानविलकर हे गेली सात–आठ वर्षे अमेरिकेत ट्रॅव्हल एजन्सी चालवतात व सौ. सराफ या माझ्या वाचिका! यांनी माझी 'कांचन' ही कादंबरी अमेरिकेत वाचली आणि मला अमेरिकेला येण्याचे निमंत्रण दिले. निमंत्रण देताना त्यांनाही कदाचित् वाटले असेल की आपण निमंत्रणानं फक्त आपल्या सदिच्छा व्यक्त करीत आहोत. सोळा–सतरा हजार किलोमीटर अंतर पार करून सहकुटुंब हे लेखकमहाशय आपलं आतिथ्य स्वीकारायला कसचे येतात! त्यांना आम्ही अमेरिकेत आलो आहोत आणि टी.सी.आय. ची टूर संपताच तुमच्याकडे कॅलिफोर्नियात येत आहोत असं सांगताच आश्चर्याचा धक्का बसला. सुरेश खानविलकरना मात्र साधारण कल्पना होती. आपल्या वहिणीच्या लग्नाला ते जेव्हा कोल्हापुरी आले होते, तेव्हा आम्ही त्यांना आमच्या परदेश–प्रवासाची पुसटशी कल्पना दिली होती. आम्ही आल्याचे कळताच त्यांना खूप आनंद झाला. टी.सी.आय. ची टूर केव्हा संपणार आणि सुरेशरावांनी आम्हाला कुठे न्यायला यायचं याबाबत फोन नंतर करू असं आम्ही त्यांना सांगितलं.

न्यूयॉर्क ते नायगारा हे अंतर तोडायला सहा–सात तास लागले. वाटेत 'मॅकडॉनल्ड' हॉटेल्समध्ये दुपारचे लंच उरकले. त्या दिवशी वाटेतल्या हॉटेलमध्ये कुणीतरी मोठी पार्टी अ‍ॅरेंज केली होती. कोंबड्या शिजवलेल्या होत्या. त्या पार्टीला आलेले लोक हवे ते पदार्थ घेत होते. आमच्या सहप्रवाशांपैकी एक दोघेजण सरळ त्या पार्टीत सामील झाले आणि त्यांनी चक्क कोंबडीवर ताव मारला. ज्यांनी पार्टी अ‍ॅरेंज केली होती त्यांच्या ते लक्षात आले, पण त्यांनी हसून त्याकडं दुर्लक्ष केलं. न बोलवता भोजनाला जाण्याचा 'मुर्दाडपणा' आमच्या लोकांसारखा कोणाला जमणार? दुसऱ्या

बाजूला पार्टीच्या लोकांसाठी निरनिराळ्या प्रकारचे आईस्क्रीम ठेवले होते. फौंटनपेन विकणारा सेल्समन छाबडा आणि त्याचा मित्र किराणा मालाचा दुकानदार तिथं जाऊन आईस्क्रीम चापून आले. माझ्याजवळ येऊन छाबडा म्हणाला, ' जाव ना कदमसाब, उधर बढीया आईस्क्रीम रख्खा है । कोई भी नहीं पूछता, दिल चाहे उतना ले सकते हो ! '

पण माझ्या स्वभावात असला निर्लज्जपणा कधीही येणार नाही. मी त्याला त्याच्या सूचनेबद्दल थँक्स म्हटलं. चिरंजीवानी पैसे देऊन हॅम्बुर्गर, सँडविचेस व डॅनिश आणले नं आम्ही बाहेर हिरवळीवर बसून मजेत खाल्ले. या प्रवासात एक गोष्ट प्रकर्षानं जाणवली अन् ती म्हणजे, युरोप, अमेरिका पाहायला येणाऱ्यांत जर संपूर्ण शाकाहारी लोक असतील, तर त्यांचे फार हाल होतात. फ्रेंच फ्राईज, ब्रेड बटर किती खाणार ? पण ' नॉन व्हेज ' वाल्यांचं तसं नव्हतं. हरतऱ्हेचे उत्तम मांसाहारी खाद्यपदार्थ तिथल्या मानानं खूपच स्वस्त दरात मिळतात

दुपारी साडेतीनच्या सुमारास एक प्रचंड पूल पार करून आम्ही पलीकडं गेलो आणि गाडीचा ड्रायव्हर जवळच्या माईकमध्ये बोलला, 'वुई आर नाऊ ओन्ली फोर्टीन माईल्स अवे फ्रॉम नायगारा ! '

हे चौदा मैलांचं अंतर बघता बघता पार झाले. वाटेत विजेच्या तारांचे प्रचंड डांब दिमत होते. नायगारा विद्युतकेंद्रापासून निघालेले होते ते. प्रथम आलो तेव्हा अमेरिकन भूमी होती. पण नायगाऱ्याला जिथं आम्ही राहणार होतो ते ' रामडा इन् ' हे हॉटेल कॅनडाच्या हद्दीत होते. या हद्दी ओलांडताना प्रत्येक वेळी ' व्हिसा ' दाखवावा लागे. नायगारा इथं दोन दिवसांचं वास्तव्य होतं, पण या दोन दिवसांत साईट–सीईंग करताना प्रत्येक वेळी चेकपोस्टवर व्हिसा दाखवावा लागला होता. प्रत्येक वेळी त्यावर ' इमिग्रेशन ' अधिकारी शिक्का उठवत होता. आमच्यासोबत असलेल्या नारंग माताजींना वारंवार गाडीतून चढउतार करणे जमत नव्हते. त्या वैतागून म्हणायच्या, ' बार बार ये लोग क्यूं तकलीफ दे रहे है ? इधर जावे तो ठप्पा, उधर जावे तो ठप्पा ! '

अमेरिकन आणि कॅनेडियन् पोलीस आणि अधिकारी प्रामाणिक आणि कार्यक्षम होते. परप्रांतीय नागरिक आपल्या देशांत परवानगीविना प्रवेश करणार नाही याची दक्षता ते घेतात. भारताच्या उत्तरेला असलेले

कितीतरी पाकिस्तानी आणि बांगला देशचे नागरिक आमच्या देशात खोटे पासपोर्ट आणि व्हिसा दाखवून दरवर्षी येतात. प्रत्येक पोलीस गॅझेटमध्ये अशा लोकांची एक प्रचंड जंत्री असते. त्यांचे फोटोसुद्धा त्यात छापलेले असतात भारत–प्रवेशाची मुदत संपल्यानंतर किती टक्के लोक पाकिस्तानला आणि बांगला देशाला परत जातात हा संशोधनाचाच विषय ठरेल. पण ही गोष्ट जोवर दोन्ही देशांत शांतता आहे तोवर ठीक आहे. सरहद्दीच्या देशांशी संबंध बिघडले, तर घुसखोरी करून आलेले लोक विध्वंसक कृत्य करायला मागेपुढे पाहात नसतात.

भारतासारख्या खंडप्राय देशात अनाधिकाराने येणाऱ्यांची संख्या इतकी प्रचंड झाली आहे की, आज आसामचे स्वास्थ्यच डळमळीत झाले आहे. राष्ट्राची सीमा जर सुरक्षित नसेल, तर नागरिकांच्या जीविताला अन् वित्ताला केव्हाही उपद्रव होऊ शकतो कच्छला जोडून असलेल्या पाकिस्तानी प्रदेशातून अनेक वेळा भारतीयांची दुभती जनावरं पळवून नेल्याचे प्रकार घडले, काही मोठ्या घरफोड्याही झाल्या. भारतीय सीमा सुरक्षा दलांच्या जवानांवर अधून–मधून गोळीबार होतो. या बाबतीत कडक निषेध–खलिते नोंदवण्यापलीकडे आपण काहीही केलेले नाही. मला इंग्लंडचं या बाबतीत कौतुक वाटतं. जेन्कीन्सन 'हा इंग्रज जेव्हा अमेरिकेत गेला, तेव्हा तिथल्या इंग्रजविरोधी लोकांनी त्याला पकडून त्याचा कान कापला. जेन्कीन्सनने कापलेला कान काचेच्या बाटलीत घालून इंग्लंडला परत आणला आणि तो कान पार्लमेंटमध्ये हजर करून तो म्हणाला, ' ही बघा आपल्या देशाची प्रतिष्ठा !' पार्लमेंट संतप्त झाले. ज्या अमेरिकनांनी जेन्कीन्सनचा कान कापला होता, त्या अमेरिकेविरुद्ध इंग्लंडने युद्ध घोषित केले. ' जेन्कीन्सनच्या कानाचे युद्ध ' म्हणून ते इतिहासात प्रसिद्ध आहे.

पण आम्ही भलतेच सहिष्णु, संयमी ! गुजराथचे मुख्यमंत्री विमानातून प्रवास करत होते ते विमानच पाकिस्तानने उडवले. आम्ही फक्त जोरदार निषेध–खलिता धाडला. इंग्रजांच्या चालीरीती, त्यांचा पेहराव आम्ही फक्त स्वीकारला. त्यांचा राष्ट्राभिमान तेवढा सोयीस्कररीत्या स्वीकारायचं टाळलं.

' रामडा इन् ' हे हॉटेल काही प्रचंड नव्हते. पण हॉटेलसमोरची हिरवळ

चौफेर पसरली होती. काही फर्लांग अंतरावर असलेल्या धबधब्याचा 'धों ऽ धों ऽ' असा आवाज येत होता. कुठल्याही नवख्या ठिकाणी गेल्या गेल्या प्रथम ताब्यात घ्यायच्या त्या आपल्या खोलीच्या किल्ल्या. आपल्याला कोणत्या ठिकाणी खोली मिळते यावर बरंचसं मुक्कामातलं स्वास्थ्य अवलंबून असे. खोली माडीवर, एका बाजूला असेल अन् तेथून सृष्टिसौंदर्य दिसत असेल, तर प्रवासाचा अधिकाधिक शीण नाहीसा व्हायचा. बहुतेक हॉटेलमध्ये 'स्वीमिंग टँक्स्' असत. फिक्कट अशा निळसर टाईल्सनी बांधलेला स्वीमिंग टँक बघितला की, मी अन् उमेश लगेच पोहायची तयारी सुरू करीत असू. पोहण्यानं प्रवासात आळसावलेलं अंग तात्काळ मोकळं होत असे. असं मनमोक्त पोहल्यावर एखाद-दुसरा स्कॉचचा पेग टिकवायचा अन् मग डिनरला जायचं हा माझा दोन महिन्यांचा कार्यक्रमच झाला होता

नायगाऱ्याला 'रामडा इन्' मध्ये आम्हाला जी खोली मिळाली होती ती फारच सुरेख होती. मागे स्वच्छ स्फटिकासारख्या पाण्याचा स्वीमिंग टँक दिसत होता. त्यापलीकडे विस्तीर्ण अशी मखमली हिरवळ पसरली होती. या हिरवळीवर चिनारसारखी झाडं होती त्या पलीकडे 'नायगारा' नदीचं विस्तृत असं पात्र होतं इतकं विस्तृत की, नजर पोहोचते तिथंपर्यंत पाणीच पाणी दिसत होतं. हिरवळीवर खारी नाचत होत्या. पण त्या खारी आपल्याइकडच्या खारींसारख्या लहान नव्हत्या आपल्याकडच्या तीन खारींची एक खार केली तर जेवढी होईल, तेवढ्या त्या मोठ्या होत्या. पण आपल्याकडच्या खारींची तीच चपळाई, झाडांची पडलेली फळं, पुढच्या दोन हातांत धरून, मागच्या दोन पायांवर बसण्याची तीच ऐट, मधूनच वरून एखादा पक्षी तरळत गेला तर तो ससाणा असावा अशा भीतीनं शेपटीचा गोंडा फुलवून 'चिर्रर्र' करीत हातातलं फळ फेकून देऊन झाडाकडं टणटण उड्या मारीत धावण्याची तीच लकब! बघता बघता त्या हिरवळीवर एकामागून एक असे 'गल' पक्षी आले. 'गल' हा नेहमी समुद्रावर वावरणारा पक्षी, पण नायगाऱ्याला मी असंख्य 'गल' पक्षी बघितले हवे तेव्हा जमिनीवर उतरून किडेमकोडे टिपणारे हे पक्षी, हवे तेव्हा चक्क बदकासारखे तरंगत राहतात. कधीकधी चिरके आवाज काढत

लांबमोदताली घिरट्या घालतात. नेहमी आंघोळ करून आल्यासारखे स्वच्छ ताजेतवाने दिसतात.

काचेच्या खिडकीजवळ मी उभा असताना माई म्हणाल्या, पोहायला जायचं असेल तर लवकर जाऊन या. संध्याकाळी ' चायनीज ' जेवायला जाऊ इकडं येताना मी दोन-चार चायनीज हॉटेल्स वाटेवर बघितली आहेत.'

अहो परवा तर न्यूयॉर्कला चायनीज जेवलो. सारखं सारखं चायनीज कशाला ? आज वेस्टर्न डिनर घेऊ !' मी खोट्या तक्रारीच्या स्वरात म्हणालो इतक्यात उमेश आले आणि म्हणाले, ' साईट–सीईंगला उद्या जायचं आहे. आज संध्याकाळी आपण हवं तर एखादी चक्कर टाकून ' फॉल्स ' पाहू या !'

' काही नको, हा नायगारा धबधबा मोठा आडवळणी आहे एक धबधबा कॅनडाच्या हद्दीत, तर दुसरा अमेरिकेच्या. आपण मघा बघितलं ना येताना, इमिग्रेशन निर्बंध किती कडक आहेत ते ! त्यापेक्षा उद्या बस येईल त्यांच्यासमवेतच जाऊ. आता प्रथम पोहायला जाऊ !'

जेवणाचं ?' सौ. नी विचारलं

' तुम्ही म्हणताच तर चायनीज डिनर घेऊ !'

मलाही मनापासून चायनीज डिनर आवडतं म्हणा ! पण गायकांनी केलेल्या सूचनेला प्रथम थोडा विरोध केला की, जरा बरं असतं. त्यांना शेवटी आपलाच जय झाला असं वाटतं त्यामुळं त्या काहीशा सुखावतात.

त्या संध्याकाळी आम्ही ' रामडा इन ' पासून अर्ध्या मैलावर असलेल्या ' चायना गार्डन ' या हॉटेलकडे जेवायला गेलो चायनीज जेवणाचं आणखीन एक वैशिष्ट्य म्हणजे, ते गरम गरमच खावे लागते चायना गार्डन हॉटेल छोटेसंच होतं हॉटेलच्या मालकिणीनं कमरेत लचकून आमचं स्वागत केलं अन् मेनू-कार्ड टेबलावर आणून ठेवलं. उमेशनी ऑर्डर दिली. वँटोन सूप, चिकन चाऊमेन, प्रॉन्स चाऊमेन अँन्ड फ्राईड राईस ! चिरंजीवाना प्रॉन्सची ॲलर्जी आम्ही दोघे प्रॉन्स, लॉब्स्टर आणि ' सीक्रॅब ' आवडीने खाणारे. त्यामुळे उमेशसाठी वेगळ्या डिशेस मागवाव्या लागत. युरोप सोडल्यापासून माईना झणझणीत असं तिखट खायला मिळालं नव्हतं. ते प्रथमच ' चायना गार्डन ' या नायगाऱ्याच्या हॉटेलात मिळालं अगदी

अस्सल ‘ ग्रीन चिली सॉस. ’ त्यामुळे माई आणि उमेश एकदम खुषीत आले. मी मात्र अगदी केळ्याचं तिखट खाणाऱ्या. अगदी बिनतिखटाचं जेवण असलं तरी मला चालतं. सारं बालपण इंग्रज आणि ऑस्ट्रेलियन जॉकीच्या संगतीत गेल्यानं तिखट न खाण्याची सवय बालपणापासूनचीच !

जेवणानंतर चालत चालत ‘ रामडा इन ’कडे आलो. रात्रीचे नऊ वाजले तरी, पश्चिम क्षितिजावर उजेड तरळत होता. मात्र हवेत गारवा दाटला होता. चोहोबाजूंनी नायगारा नदीनं वेढल्यामुळं रात्रीही बराच गारठा जाणवू लागला.

दुसऱ्या दिवशी सकाळी दहा वाजता साईट–सीईंगला जायचं असं मेहेरनोश पटेलनं सर्वांना सांगितलं मला सकाळी साडेपाचला उठायची सवय ! उठल्या उठल्या कप - दीड कप चहा हवाच आणि इतक्या लवकर चहा हॉटेलात मिळणार नसला तर, तो बनवण्याची सर्व तयारी आमच्या–जवळ होतीच भारतातून येताना चांगली उत्तम प्रतीची दोन किलो चहापत्ती सोबत घेऊन आलो होतो. दुधाच्या पावडरचा डबा जर्मनीत फ्रँकफूर्टला घेतलेला होता, साखर लंडनमध्ये घेतली होती. म्हणजे नायगाऱ्यात त्या दिवशी मी जो चहा प्यालो तो अँग्लो–इंडियन–जर्मन–अमेरिकन असा चहा होता. हा चहा बनवण्याची एक खास रीत होती. काचेच्या भांड्यात छोटा हिटर सोडायचा. पाणी उकळू लागलं की, त्यात चहा पत्ती टाकून बंद करायचं. नंतर दूध पावडर अन् हवी तेवढी साखर कपात घ्यायची. पावडरचा का असेना, पण हवा त्या वेळी चहा मिळतो हे समाधान लाख मोलाचे असते. केवळ चहाप्रिय माणूसच हा आनंद समजू शकतो. सकाळी वेळेला जर चहा नाही मिळाला, तर अख्खा दिवस खराब होतो.

दुसरे दिवशी सकाळी साडे–सहा वाजता फिरायला बाहेर पडलो. तशी पायी फिरायची फार हौस. अन् तेही एकट्यानं. चारचौघांना सोबत घेऊन जे होतं ते फिरणं नव्हे. ते चकाट्या पिटत चालणं. आमच्याकडे काही व्यापारी मंडळी घोळक्यानं सकाळी फिरायला बाहेर पडतात. व्यापाऱ्यांच्या-सोबत फिरणं म्हणजे एक जबर शिक्षाच. त्यात समव्यवसायी व्यापारी असले की, ते नेहमी आपल्या धंद्याबाबतच बोलतात. एखादा राजकीय क्षेत्रातला असेल तर, तो मध्येच ‘ हे सरकार सत्तेवर असेतो तुम्हा व्यापारी

लोकांना चांगले दिवस कसचे येतात !' असा शेरा मारून जातो. एकूण काय, तर ज्याला मनापासून फिरायचे वेड आहे, त्यानं अगदी एकट्यानं भटकावं.

'रामडा इन्' पासून मी निघालो. उजव्या बाजूला रस्त्यालगत एक जळून खाक झालेले घर होते. फक्त भिंती उभ्या होत्या. पण त्या घराच्या कपौंडला एक अगदी ताजा रंगवलेला बोर्ड होता : 'Tresspassers will be prosecuted.'

मी मनाशी म्हटलं, या जळक्या घरात कोण घुसेल ! आणि कशासाठी ? ती पाटी लावणाऱ्याचा उद्देश काय असावा याचा विचार करीत मी रस्ता ओलांडला. सहज विचार आला, काही सोनं-नाणं असेल तर वितळून गेलं असेल. मालकाला ते शोधायचं तरी नसेल ? पण लगेच दुसरा विचार डोकावला. 'क्रेडिट कार्ड' बाळगणारी ती मंडळी घरात एवढ्या मौल्यवान चीजा ठेवतीलच कशी ? भारतात अजूनही जुन्यापुराण्या वाड्यात मोहरा सापडतात. नुकताच मलकापूर इथं तसा प्रकार घडला आहे. त्या प्रकरणात पोलीस तपास जारी आहे ! संपत्ती पुरून ठेवणाऱ्या मंडळींची मला कीव करावीशी वाटते. मरेपर्यंत ज्या संपत्तीचा विनियोग करायची इच्छा नसते, ती संपत्ती होऊच शकत नाही. त्या जळक्या घरानं गावाकडल्या बऱ्याच गोष्टी आठवल्या खरं !

रस्ता ओलांडून मी नायगारा नदीच्या पात्राशी समांतर असलेल्या रस्त्याने निघालो. हवा अत्यंत आल्हाददायक होती. आकाश स्वच्छ होतं. सूर्याची केशरी किरणं झाडांचे शेंडे रंगवीत होती. समुद्रासारखं नायगारा नदीचं निळंभोर विस्तृत पात्र नजरेत मावत नव्हतं. भरमध्ये प्रचंड खडकाळ बेट होतं, त्यावर एक लाखभर गल पक्ष्यांचा कोलाहल सुरू होता. मध्येच जेट विमानासारखी लांब मान असलेलं एखादं जंगली बदक भिरभिरत जायचं आणि 'धबल' करून पाण्यात उतरायचं. मी क्षणभर थांबून पाहिलं. नदीच्या काठी जिथं पाण्याला धार नव्हती तिथं अनेक जंगली बदकं तरंगत होती. मी अनेक वेळा जंगली बदकांची शिकार भारतात केली आहे. उडतं बदक बारा बोअरच्या बंदुकीनं टिपणं हे एक कौशल्य मानलं जातं. बदक ताशी दीडशे ते दोनशे मैल वेगात उडत असतं. पट्टीचा शिकारी असेल तरच उडतं बदक टिपता येतं, नाहीतर केवळ दिवाळीचं ! शिकारीत गोळ्या

चुकणाऱ्यांची 'फटाक्या उडवायला आलास काय ?' असं म्हणून नेहमी टिंगल उडवली जाते.

वाटेत मला एक पेन्स मिळाला. तसे मला अमेरिकेत दहा–वीस तरी पेन्स रस्त्यावर मिळाले. मी निसर्गाचा भोक्ता असलो तरी नेहमी पायात बघून चालत असतो. करवीरी जेव्हा मी फिरून येतो, तेव्हा रस्त्यावर सापडलेले एक दोन नट, बोल्ट खिशात असतात. पण सहसा सापडलेल्या नटाला त्याला फिट्ट बसणारा बोल्ट मिळत नाही. तो योग एकदा जमला. जाताना प्रथम नट सापडला आणि फिरून परत येताना त्याला बरोबर बसणारा बोल्टही मिळाला. मनाशी म्हटलं, आज योग काही विचित्र दिसतो. त्या दिवशी कधीही न लागणारं लॉटरीचं तिकिट घेतलं. पण निकालाच्या दिवशी ते चुरगाळून फेकून द्यावं लागलं. शेवटी पैशाचा विनियोग उत्तम तऱ्हेने करणाऱ्याला लॉटरीत नशिब लागत नाही हेच खरं ! एका मित्राला परवा मी तो प्रसंग सांगितला, तेव्हा तो म्हणाला, 'आणि समजा, त्या दिवशी लाख रुपयाची लॉटरी लागली असती. तर काय करणार होता ?' क्षणाचाही विलंब न लावता मी उद्‌गारलो, 'युरोप अमेरिका झाली. आता इंडोनेशिया, हाँगकाँग, जपान, सिंगापूर, मलाया बघायला लगेच निघालो असतो. पण नाही, तो शासनाचा पैसा आमच्या नशिबी नाही.'

रस्त्यावर सापडलेला तो पेन्स निरखून पाहिला तर तो कॅनेडियन होता. म्हटलं, नायगाऱ्याची आठवण म्हणून हा असाच ठेवून द्यायचा. रस्त्याच्या बाजूने चालत जाणारा मी एकटाच. गाड्यांतून जाणाऱ्या बाया, पोरी, माणसं माझ्याकडं विचित्र नजरेनं पाहात होती. अमेरिकेत आणि कॅनडात माणसांपेक्षा वाहनांचीच संख्या जास्त आहे असं ऐकून होतो. पण तिथं ते प्रत्ययालाच आलं. शिवाय एवढ्या एवढ्याशा पोरी मोठमोठ्याला गाड्या मराईतासारख्या चालवत जायच्या. काहीजणी एका हातात सिगारेट किंवा कोकचा टीन धरून गाड्या चालवायच्या. या पाश्चात्त्य देशांनी जगातलं सार इंधन संपवण्याचा विडाच उचललेला आहे असं वाटलं. मी इंजिनियर केंदळेंना न्यूयॉर्कला जाताना सहज विचारलं, 'इथले लोक पेट्रोलची उधळपट्टी करताहेत असं नाही वाटत तुम्हाला ?'

'त्यावर ते म्हणाले, 'कशावरून म्हणता ?'

' एक माणूस कुठंही जायचा असेल तर एवढी मोठी गाडी घेऊन जातो, ही इंधनाची उधळपट्टी वाटते आम्हाला. हे लोक त्यापेक्षा फियाटमारख्या लहान गाड्या किंवा मोटारसायकल्स किंवा स्कूटर्स का नाही वापरत ?'

' लहान गाड्या, मोटार सायकल्स आणि स्कूटर्स यात सुरक्षितता कमी असते. अमेरिका काय किंवा इतर पाश्चात्त्य राष्ट्रं काय, त्यांना आपल्या नागरिकांच्या जीविताची सुरक्षितता ही सर्वांत मौल्यवान वाटते !'

त्यावर मला मात्र काही बोलता आलं नाही ल्यूसर्नमध्ये (स्वित्झर्लंडला) मी तो देश नागरिकांच्या जीविताला किती जपतो हे प्रत्यक्षच बघितलं होतं

नायगारा नदीच्या काठानं दीड मैल चालत गेलो. वाटेत एक पूल लागला. नदीचं पाणी आत शिरलं होतं. त्या पुलावर उभं राहून खाली पाहिलं. हात दीड हात लांबीचे ट्राऊट मासे दिसले ट्राऊट हा अत्यंत चविष्ट असा मासा आहे. आपल्या काश्मिरला ते विपुल मिळतात. अतिशय थंडीत राहणारी ही माशांची जात आहे.

साडेआठला परत आल्यानंतर स्नानादी कार्यक्रम उरकले. ब्रेकफास्ट घेतला तोवर साईट–सीईंगला जायची तयारी झाली होती.

कॅनडाच्या हद्दीत जिथे नायगारा नदी दरीत कोसळते. तिथं प्रचंड असा अर्ध–गोलाकार धबधबा आहे. त्याला 'हॉर्स शू फॉल्स' म्हणतात. घोड्याच्या नालेसारख्या आकारावरून त्या प्रपाताला हे नामाभिदान मिळालेलं आहे. प्रत्येक मिनिटाला चौतीस लक्ष गॅलन पाणी वरून खाली कोसळत होतं. दुरून त्याची भव्यता जाणवली नाही, पण जेव्हा कड्यावरून लिफ्टने खाली उतरलो आणि ' मेड ऑफ द् मिस्ट ' या बोटीतून अंगावर रेनकोट चढवून धबधब्याच्या अगदी पायथ्याला गेलो तेव्हा मात्र धबधब्याची प्रचंडता जाणवू लागली. हजारो सिंह एकदम गर्जना करू लागल्याचा भास होऊ लागला. जवळ जवळ एकशे ऐंशी फुटांवरून कोसळणाऱ्या त्या फेसाळलेल्या जलौघाचे तुषार आकाशात उंच उडत होते सारा आसमंत धुक्यानं दाटल्यासारखा दिसत होता. ' मेड ऑफ द् मिस्ट ' ही लाँच अगदी धबधब्याच्या तळापर्यंत नेली होती. प्रचंड आवाज, तुषाराचं दाट धुकं आणि वरून कोसळणारा दुधासारखा पांढरा शुभ्र पाणलोट पाहून अवाक् झालो.

यापूर्वी मी फक्त गोकाकचा तो चिमुकला धबधबा बघितला होता.

नायगाऱ्याची विराटता विलक्षण होती. ज्यावेळी मेड ऑफ द् मिस्टने परत लिफ्टच्या स्टँडजवळ आणून सोडले, तेव्हा पुन्हा एकदा वळून धबधब्याकडं बघितलं. इंद्रधनूची सुरेख कमान धबधब्याच्या भोवताली अवतीर्ण झाली होती

लिफ्टने वर चढून आलो. तेव्हा खाली जाण्यासाठी पुन्हा प्रवाशांची दाटी झाली होती. त्यात तरुण जोडपी बरीच होती. नंतर समजलं की, ' दरवर्षी पंचवीस हजार नवविवाहित जोडपी आपला मधुचंद्र साजरा करण्यासाठी नायगाऱ्याला येतात. जाताना त्यांना टूरिस्ट असोशिएशन सर्टिफिकेट देत असते. नेपोलियनच्या धाकट्या भावाने नायगाऱ्याला प्रथम मधुचंद्र साजरा केल्याचा उल्लेख आढळतो.

नायगाऱ्याला ऐतिहासिक परंपराही मोठी आहे. स्वातंत्र्ययुद्धात पंचवीस जुलै १८१४ रोजी नायगाऱ्याच्या परिसरात घनघोर युद्ध जुंपले होते. कॅनडा आणि ब्रिटिश सैनिकांनी एकत्र होऊन करड्या रंगाचा वेष धारण केलेल्या अमेरिकन सैन्याशी हे रणकंदन माजवले होते. त्यात निर्णायक जय असा कुणाचा झालाच नाही. पण दोन्ही बाजूंनी आपलाच विजय झाला असे अट्टाहासाने प्रतिपादन केले.

नायगाऱ्याचे अमेरिकन आणि कॅनेडियन असे दोन वेगवेगळे भूप्रदेश जोडणारा प्रचंड लोखंडी पूल आहे. तो रेनबो ब्रिज म्हणून तो ओळखला जातो. दोन तीरांमधील अंतर काही ठिकाणी तेराशे फूट, तर काही ठिकाणी पंधराशे फूट इतकं आहे.

' ब्लाँडीड ' नावाच्या गृहस्थाने या कडेपासून त्या कडेपर्यंत बांधलेल्या दोरावरून दीडहजार फुटांची ही दरी कित्येक वेळा तोल सांभाळून पार केली होती. त्यानंतर फेसाळलेल्या ' व्हर्लपूल ' ला पार करण्याचा विक्रमही अनेकांनी नोंदवलेला आहे. लोखंडी बॅरलला खाली ऐरण जोडायची आणि त्यात बसून धो धो वाहणारी प्रचंड भोवरे निर्माण करणारी नायगारा नदी ओलांडून पलीकडे जायचे म्हणजे साक्षात मृत्यूलाच सामोरे जायचे ! पण हे साहस केवळ पुरुषांनीच केले असे नव्हे, तर स्त्रियांनीही रुद्रावतार धारण करणाऱ्या नायगारा नदीला अनेक वेळा पार केले आहे. मारिया स्प्लेटेरिना

या तरुणीने दोरावरून ही दरी ओलांडली व परत येताना ती मागे न पाहता उलट चालत आली. ब्लाँडीनच्या स्मरणार्थ दोरीवर तोल सांभाळलेला त्याचा पुतळा ' क्लिफ्टन हील ' नायगारा इथं उभा केलेला आहे.

मेपल व्हिलेज हा नायगाऱ्याचा एक भाग, आलिशान दुकानं आणि अद्ययावत हॉटेल्स यांनी सदैव गजबजलेला असतो. इथं एंजल इन्, हॉलीडे इन्, कासाडोरो रेस्टॉरंट, टर्फ इन सर्फ, ' मामा मियाज ' सारखे विविध प्रकारचे सागरी अन्न तयार करणारी हॉटेल्स आहेत. ' मामा मियाज ' इटालियन जेवणाबद्दलही मशहूर आहे.

या परिसरात जल आणि विद्युल्लता यांच्या विपुलतेमुळे विविध प्रकारच्या फळबागाही सदैव बहरलेल्या असतात. त्यातल्या त्यात काळी द्राक्षं पिकवणारे असंख्य ' वाईन यार्डस् ' या भागात दृष्टीस पडतात.

कॅनेडियन नायगाऱ्यात दुसरं आकर्षक ठिकाण म्हणजे ' नायगारा पार्क ! ' या प्रचंड पार्कमध्ये एक हॉर्टीकल्चर इन्स्टिटयूट आहे. इथला गोल्फ क्लब जगातला एक उत्कृष्ट गोल्फ क्लब मानला जातो गोल्फ या खेळाचा प्रमुख हेतू, खेळणाऱ्याला थोडा फार चालण्याचा व्यायाम व्हावा असा आहे. परंतु मला या परिसरात गोल्फ ग्राऊंडवर स्वयंचलित अशी विजेरीवर चालणारी अनेक वाहनं दिसली. एकदा टोलवलेल्या चेंडू पुन्हा टोलवण्यासाठी जर गाडीतच बसून जायचं, तर गोल्फ हा खेळ खेळायचा तरी कशासाठी ?

नायगारा पार्कजवळ एक भलं मोठं फुलांनी बनवलेलं घडयाळ होतं. इतकं प्रचंड होतं की, त्याचा मिनिट काटा एका मिनिटाला एक फूट पुढे जात होता. याशिवाय नायगाऱ्यात दरवर्षी फ्लॉवर शो, डॉग शो, मिस्टर अँड मिस् नायगारा कॉंपिटीशन अशा प्रकारचे प्रवाशांना तिथं खेचून आणणारे अनेक उत्सव साजरे होतात. ' व्हर्लपूल ' म्हणजे धबधब्यातून पडलेलं पाणी एका ठरावीक वळणावर जेव्हा येतं तेव्हा तिथं प्रचंड भोवरे, निर्माण होतात या दरीवर इकडून तिकडं नेण्यासाठी रोप ट्रेन आहे. माई उमेश व मी, आम्ही तिघे असे काही आकर्षण असले की अगोदर सर्वांत पुढे ! एकाच वेळी वीस–वीस लोकांना तारेच्या प्रचंड दोरखंडाला लोंबकाळणारी गाडी हजारएक फूट घेऊन जाते अन् परत घेऊन येते. वरून फेसाळलेलं पाणी, आणि प्रचंड भोवरे पाहताना भोवळ येते.


ग्रंथ संग्रहालय

नैसर्गिक सौंदर्यस्थळं देशात अनेक असतात. काही ऐतिहासिक वास्तूही आपल्या पूर्वजांनी बांधून ठेवलेल्या आहेत. पण प्रवाशांना त्यांचं आकर्षण वाटेल अशी उपाययोजना जर केली नसेल तर, काय उपयोग ? श्रावणात रेल्वेतून खंडाळ्याचा घाट ओलांडताना पूर्वेला खूप उंचावरून कोसळणारे धबधबे दिसतात. ती दरीही अतिप्रचंड आहे. राजमाची पॉईंटपासून निघालेली एखादी रोपट्रेन झाली, तर किती मजा येईल ती दरी ओलांडताना ? पण नको इतकी पैदास करणाऱ्या या देशात असं काही नजीकच्या काळात घडेल हा आशावाद बाळगणे निरर्थक आहे. परवा दीड वर्षापूर्वी मी हैद्राबादला गेलो होतो. तिथं सहा दिवस होतो. या सहा दिवसांत मी एकट्यानं सारं हैद्राबाद शहर पालथं घातलं. गोवळकोंड्याचा किल्ला, सालारजंग म्युझियम पाहून झाल्यानंतर चार मिनार पाहायला गेलो. इतकी ऐतिहासिक वास्तू, पण कमालीची अस्वच्छ आणि घाणेरडी वाटली. वर जिना चढून जाताना भिंतीला आधारासाठी स्पर्शदेखील करावा असं वाटत नव्हतं. काही ठिकाणी अंधाराचा उपयोग 'टॉयलेट' साठी केला होता आणि त्याची दुर्गंधी असह्य होत होती. भारतात पुराणवस्तूंचं संरक्षण करणारी एक खास शासकीय यंत्रणा असते. ऐतिहासिक वास्तूची नासधूस करणं किंवा कोणत्याही तऱ्हेनं त्यांचा गैरवापर करणं हा गुन्हा आहे, पण हे खातं अस्तित्वात आहे की नाही याची कधी कधी शंका येते. काही ऐतिहासिक ठिकाणं अशी असतात की कितीही वेळा तिथं गेलो तरी पुन्हा जावसं वाटतं. पण मला पुन्हा हैद्राबादला जाण्याचा योग आला तर, मी चुकूनही 'चार मिनार' चढणार नाही.

नायगारा सोडताना पावलं काहीशी जड झाली होती. अमेरिकेत अनेक प्रेक्षणीय स्थळे बघितली. पण नायगाऱ्याचे निसर्गसौंदर्य अफलातून होतं. खरं तर, नायगाऱ्याचा मनसोक्त आस्वाद घ्यायचा असेल तर, कमीतकमी दहा दिवसांचं वास्तव्य तिथं करायला हवंय. पण 'कंडक्टेड टूर' मधून जाणाऱ्यांना तसं राहणं अशक्य आहे.

बस कॅनडाच्या हद्दीतून धावत होती. सहप्रवासी डुलक्या घेत होते, पण मी मात्र मनानं अजून त्या प्रचंड प्रपाताचे तुषार अंगावर घेत, स्वच्छ सूर्यप्रकाशात दिसणारी इंद्रधनुष्याची कमान पाहात, रेनबो ब्रिज ओलांडून

पलीकडे जाऊन नायगारा पार्कच्या लुसलुशीत हिरवळीवर लोळत होतो. धबधब्याचा आवाज कानात घुमत होता. यदाकदाचित अमेरिकेत काही काल वास्तव्य करण्याची संधी मिळालीच तर, मी नायगारा हेच क्षेत्र पसंत करीन.

प्रचंड हायवेवरून वाहनं वायुवेगानं धावत होती. आठ–आठ मोटारींना वाहून नेणाऱ्या ट्रॉलीज, मोटार-बोटी वाहणारे ट्रक्स, आणि असंख्य प्रकारच्या भिगरीसारख्या भिरभिरत जाणाऱ्या मोटारी. आता त्या वाहनांच्या प्रचंड संख्येचं काहीच वाटेनासं झालं होतं. आधुनिक जग हे गतिमान आहे हे कबूल, पण ती गतिमानता कधी कधी निरर्थक वाटे. इथला माणूस एकसारखा धावतो आहे कशासाठी ही धावपळ ? आमच्याकडचा रिकामटेकडेपणा हे दुसरं टोक, की ज्यात आमचा हात कोणी धरू शकणार नाही. कुठल्याही खेड्यात जा, सकाळी उठून पाचपंचवीस लोक पानतंबाखूच्या पिचकाऱ्या मारत पारकट्टयावर बसलेले दिसतील. यांना चर्चेला कोणताही विषय चालतो. यांना एकत्र जमायला कसलंही क्षुल्लक कारण पुरेसं होतं मी दहा वर्षांपूर्वी बार्शीत होतो त्यावेळी तिथले फौजदार आणि मी पोलीस स्टेशनमध्ये एका केसबाबत चर्चा करीत होतो. इतक्यात पांडे चौकात पेट्रोलिंग करणारा पोलीस तिथं धावत आला आणि फौजदारांना सॅल्यूट करून म्हणाला, ‘ साहेब, पांडे चौकात तीनचारशे लोकांचा मॉब जमला आहे. ’

‘ अरे, पण कशासाठी ?’ फौजदारानी विचारलं

‘ काय माहित नाही !’

‘ काय माहीत नाही ? अरे, इतकी माणसं कारणाशिवाय एकत्र जमतीलच कशी ?

‘ जमलीत साहेब !’

मी आणि फौजदार बाहेर आलो. पोलीस स्टेशनसमोरून पश्चिमेला एक फर्लांग अंतरावरच पांडे चौक आहे खरोखरच तिथं गर्दी जमली होती. फौजदारांच्या समवेत मीही चौकाकडं गेलो. सोबत चार-सहा कॉन्स्टेबल्स आले होते. त्यांनी गर्दी हटवली. फौजदारांनी गर्दीचं कारण शोधलं. ते इतकं क्षुल्लक होतं, की कल्पनाच करता येणार नाही.

म्युनिसिपालिटीतर्फे एक महिन्यापूर्वी त्या चौकात तारेला टांगलेला एक मर्क्युरी लँप लावण्यात आला होता. त्या दिव्याखाली एका चिमणीनं काडया गोळा करून घरटं केलं होतं त्या घरटयात तिनं तीन अंडी घातली होती. वारा सुटला आणि तिचं घरटं काहीसं विस्कळीत झालं अन् त्यातलं एक अंडं खाली पडून फुटलं. त्याकडं एका गृहस्थाचं लक्ष गेलं. एकजण तिथं काहीतरी वाकून पाहतो आहे म्हटल्यावर दुसरा तिथं गेला. दुसऱ्यानंतर तिसरा, चौथा, पाचवा, पंधरावा अशी एकच झुंबड उडाली. बघता बघता तीनशे लोक तिथं जमले प्रत्येकजण दुसऱ्याला विचारत होता – काय झालं? कसं झालं? ते अंडं वरून पडलेलं ज्यानं पाह्यलं होतं, त्याच्याशिवाय दुसऱ्या कोणालाच तिथं काय प्रकार घडला आहे याची कल्पना नव्हती. बघ्यांनी शेवटी इतकी गर्दी केली की, त्या चौकात पेट्रोलिंग करणाऱ्या कॉन्स्टेबलला तो जमाव हटवणं अशक्य झालं, म्हणून तो पोलीस ठाण्याकडं धावत आला होता. तर अशी हो आमची जनता!

माणसांना इतकी फुरसद असू नये हे जसं अयोग्य, तसंच त्याला क्षणाचीही फुरसद असू नये हे सुद्धा अयोग्य! तास–दोन तास मन लावून काम केल्यानंतर एखादा कप चहा, त्यावर मस्तपैकी सिगारेट ओढावी, जरा गप्पासप्पा कराव्यात आणि मग पुन्हा कामाला जुप्पी ' करावी पण अमेरिकेत दिवसभरच्या कामात असा खंड बिलकुल मान्य नसतो. तिथं शनिवार आणि रविवार असे दोन दिवस सुट्टीचे असतात या दोन दिवसांत आठवड्यांचं रेशन आणून टाकायचं, खाद्यपदार्थ फ्रीजमध्ये भरायचे आणि रविवारी कुठंतरी पिकनिकला जायचं पण पिकनिकला जाणं हा कार्यक्रम सुद्धा इतका ठरावीक साच्याचा बनला आहे की, त्यातसुद्धा तोच तोपणा आलेला आहे. आमच्याकडं युरोप – अमेरिकेतून ' हिप्पी ' इतक्या प्रचंड संख्येनं का येतात याचं कारण तिथं गेल्यावरच समजलं. इतकी भौतिक विपुलता आहे, पण मानसिक स्वास्थ्य नावाची चीज कोणालाच ठाऊक नाही. अमेरिकेत मनोरुग्णांचे प्रमाण जगातल्या इतर राष्ट्रांपेक्षा अधिक आहे. तिथं मनोरुग्णांच्या व्याधीवर उपचार करणारे एक पुण्याचे डॉक्टर आहेत. ते इतके सधन बनले आहेत की, त्यांनी स्वतःच्या मालकीचं एक

विमानच खरेदी केलं आहे. आपल्याकडे डॉक्टर मोटारीतून व्हिजिटला जातात, तसे ते डॉक्टर विमानानं व्हिजिटला जातात.

निर्धन असणं हे जसं दुःखाचं मूळ असतं, तसच अति संपत्ती किंवा समृद्धी ही सुद्धा दुःखाचं मूळ असू शकते हे तिथं गेल्यावर दिसून आलं.

कॅनडातील विंडसर या शहराजवळ आम्ही पुन्हा अमेरिकेत प्रवेश केला. विंडसर व डेट्रॉईट ही दोन प्रचंड शहरं शेजारी शेजारी आहेत, परंतु विंडसर कॅनडात, तर डेट्रॉईट अमेरिकेत. या दोन्ही शहरांच्या आसपास मोटारगाड्या तयार करण्याचे प्रचंड कारखाने दिसले.

'शिकागो' या शब्दाचा उच्चार अमेरिकन 'चिकॅगो' असाही करतात. शिकागोपासून आठ–दहा मैल अंतरावर असतानाच 'स्कायलाईन' वर तिथल्या उत्तुंग इमारतींचे सुळके आणि मनोरे दिसू लागले. 'शिकागो' म्हटल्यावर मला नेहमी दोन गोष्टी आठवत असत. एक : म्हणजे विवेकानंदांनी इथं गाजवलेली सर्वधर्म परिषद; आणि दुसरं म्हणजे इथला प्रचंड कत्तलखाना जगात शिकागोसारखा प्रचंड कत्तलखाना नाही तोही अत्यंत अत्याधुनिक. केवळ मांसासाठी पोसलेली चतुष्पाद जनावरं तिथं आणली जातात जनावरांना यातना न होता त्यांची कत्तल केली जाते. त्यानंतर त्यांचं कातडं, मांस, हाड, सर्व काही यंत्रानं अलग केलं जातं. इतकंच काय, पण 'पोल्ट्रीबर्ड्स्' कोंबड्या या सुद्धा यंत्रानं कापल्या जातात, साफ केल्या जातात आणि त्यांच्या शरिराचे ठरावीक भाग एकत्र केले जातात. उदा० कोंबडीच्या तंगड्या हव्या असल्या तर त्याचे मशीनमध्ये केलेले पॅकींग बाजारात मिळू शकते. तसेच विंग्ज, ब्रेस्ट, मिन्सड् चिकन्, चिकन लिव्हर, असे निरनिराळे अवयव बाजूला केले जातात ते सुद्धा यंत्राने. अमेरिकेने नागरिकांच्या सुखसोयींसाठी जेवढे यंत्राला कामाला जुंपले आहे, तेवढे दुसऱ्या कुठल्याही राष्ट्राने जुंपलेले नाही. कॅलिफोर्नियात संत्र्यांच्या प्रचंड बागा पाहून मी इंजिनियर केंदळेना विचारलं, 'ही इतकी फळं तोडतात तरी केव्हा ?'

तेव्हा केंदळे म्हणाले, 'बागेतली फळ यंत्रानं तोडली जातात. यंत्राला कॉम्प्युटराईज्ड केलं जातं. त्या यंत्राचा यांत्रिकी हात ठरावीक आकाराच्या फळाकडेच जातो. फळ लहान असले तर ते तोडले जात नाही. अशी झाडाची

त्र फळं तोडून झाली की तें यंत्र त्यावर नियंत्रण करणाऱ्या मालकाला रावीक सिग्नल देते. तोच प्रकार गाईची धार काढणाऱ्या यंत्राचा. ठरावीक ळी हे यंत्र कार्यान्वित होतं. गाईच्या स्तनाजवळ जाताच ते गाईच्या कासेत किती दूध आहे याची माहिती देते. शिवाय त्या गाईला दुसऱ्या दिवशी किती प्रमाणात खाद्य द्यायचे याचीही माहिती ते मशीन त्यावेळेला देते.

ही सर्व माहिती ऐकून मी थक्क होऊन गेलो होतो.

शिकागो हे शहर आठ–दहा मैल अंतरावर असतानाच काळ्या रंगाची एक गगनचुंबी इमारत दिसू लागली. हीच ती जगातली सर्वात उंच अशी इमारत सिअर्स टॉवर !

बघता बघता बसने शहराच्या गजबजलेल्या भागात प्रवेश केला. शिकागोत आम्ही उतरलो ते हॉटेल 'बिस्मार्क' मध्ये. चौदा मजली हॉटेलात सहाशे खोल्या होत्या. आमची बस थांबल्या[illegible] उचलण्यासाठी हॉटेलचा जो कर्मचारी आला होता तो इतका [illegible] की, आम्हाला वाटलं तो मॅनेजरच आहे. [illegible]चं स्वागत केलं आणि आमच्या सूटकेसेस उचलून घेतल्या. लाल फ्लॅनेलचा बंद गळ्याचा कोट आणि करड्या रंगाची उलनची पँट यात तो शोभून दिसत होता.

या हॉटेलात आल्या आल्या कॉम्प्लीमेंटरी ड्रिंक्स होते. आपल्या हॉटेलात उतरण्यासाठी आलेल्या अतिथींचे स्कॉच व्हिस्की देऊन स्वागत करण्याची प्रथा मला फार आवडली.

शिकागोची हवा न्यूयॉर्कपेक्षा बरी होती. शिकागोच्या परिसरातील उद्योगधंदे आणि गावातून धावणाऱ्या असंख्य टॅक्सीज आणि खासगी मोटारी यांमुळे गावावर एक धूसर असं धुराचं वलय निर्माण झालं होतं.

सतत सहा–सात तास बसने प्रवास केला की, इतका शीण यायचा की, तो घालवण्यासाठी एक–दोन पेग घेण्याची जबरदस्त इच्छा निर्माण व्हायची. तत्पूर्वी बाथरूममध्ये थंड पाण्याच्या शॉवरखाली उभं रहायचं किंवा टबात थंड पाणी भरून त्यात डुंबायचं ! थंड पाणी एवढ्यासाठी की गरम पाण्यानं मला सर्दी येते. गेली पस्तीस वर्षे थंड पाण्यानं स्नान करायची सवय लागून राहिली आहे. घरी दिवाळीच्या दिवशी जबरदस्तीनं एक दिवस गरम पाण्याची आंघोळ घालतात, पण त्यामुळं दोन–तीन दिवस सर्दी–पडसानं

बेजार होतो.

विमानतळावरील हॉटेलात थंड पाण्यानं अंघोळ केली. खाली कॉम्प्लीमेंटरी पेग घेतला आणि जेवणासाठी बाहेर पडलो, त्यावेळी आकाश भरून आलं होतं. चार-दोन तासांत हवामानात असा चमत्कारिक बदल झाल्याचं प्रथमच अमेरिकेत पाहात होतो.

इयंही उमेगनी आल्या आल्या एक चायनीज हॉटेल गल्ली हेरून ठेवली होती. तीही फारशी दूर नसल्यानं पायी पायी निघालो. जाताना ढगाळ आकाश गडगडू लागलं. आम्ही त्या चायनीज हॉटेलमध्ये पोहोचलो आणि पावसाला सुरुवातच झाली.

त्या हॉटेलात आमच्यासमोर नुकतीच बाळंत झालेली एक स्त्री बाई आपल्या नवजात अर्भकाला कापडात गुंडाळून घेऊन जेवायला आली होती. आमच्या माईंना राहवेना त्यांनी त्या बाईजवळ जाऊन विचारलं,

' हाऊ ओल्ड इज द् बेबी ?'

' फाव्ह डेज !' नुडल्स खात खात ती उद्गारली.

माईंनी कपाळाला हात लावला. फक्त पाच दिवसांची ही बाळंतीण वारा वादळ, पाऊस कशा कशाची पर्वा न करता बाळासहित बाहेर पडली होती. तिकडे न्यू जर्सीला गेलो होतो, तिथं याहूनही सवाई अशी एक वीरांगना भेटली. तिच्या पतीने मित्रांना जेवायला बोलावले होते ती गरोदर होती. डॉक्टरनी ती पंचवीस तारखेस बाळंत होईल असा अंदाज केला होता. त्यामुळे त्या महिन्याच्या पंधरा तारखेला तिच्या पतीने आपल्या मित्रांना घरी पार्टीला बोलावले होते. शंभर-दीडशे मैलांवरून त्यांचे सहा-सात मित्र जेवायला येणार होते. पण डॉक्टरांचा अंदाज साफ चुकला अन् ती चौदा तारखेलाच संध्याकाळी बाळंत झाली. तिच्या नवऱ्याने मित्रांना फोन करून पार्टी कॅन्सल झाल्याचे कळवण्याचे ठरवले. पण ती म्हणाली, ' पार्टी काही कॅन्सल करू नका माझ्या मदतीला एखादी मैत्रीण बोलावून घेईन !' पण दुर्दैव असं की, मैत्रीण येऊ शकली नाही. या बहाद्दरणीने उठून स्वतः सगळा स्वयंपाक केला. पार्टीला आलेल्या लोकांना आश्चर्य वाटले. त्यांनी तिच्या पतीला पार्टी कॅन्सल न केल्याबद्दल दोषही दिला. तेव्हा ती म्हणाली, ' पार्टीच्या प्रसंगानं आपली जिव्हाळ्याची माणसं एकत्र

येतात, गप्पा-सप्पा होतात, कानावर तेवढचं मराठी पडतं, मनाला समाधान वाटतं, म्हणून मीच त्यांना सांगितलं, पार्टी कॅन्सल करू नका म्हणून !'

आपली मराठी माणसं घरी यावीत, त्यांचे चार शब्द कानावर पडावेत, यासाठी इतके कष्ट घेणाऱ्या त्या गृहिणीचे मला खरोखरच कौतुक वाटले. नाहीतर आमच्याकडेही बाळंतिणी असतात. त्या महिनाभर घराबाहेर पडत नाहीत. खोलीतील खिडक्या बंद, सगळीकडे अंधारच अंधार ! जुनाट वळणाच्या घरात प्रौढ स्त्रिया असतील तर बाळंतिणीचे भलतेच कौतुक होते. कपाळाला घट्ट रुमाल बांधून, डोळ्यांत भरपूर काजळ घालून, अहोरात्र बाज़ल्यावर झोपणे, वावडिंगाच्या धुरी घेणे, जिरग्या तांदळाच्या भाताचा भला मोठा ढीग, त्यावर कढवलेले लोणकड तूप, उडदाचा पापड आणि लिंबाचे लोणचं असा खासा आहार ! शिवाय सांपत्तिक स्थिती उत्तम असेल तर, बदाम, खिसमीस घालून अस्सल तुपात बनवलेले डिंकाचे लाडू. मला हे लाडू लहानपणी फार आवडत. त्या लाडूसाठी बाळ बघायचा बहाणा करून मी जायचो आमच्याकडं बाळंतिणीचे जेवढे लाड होतात तेवढे अमेरिकेत होत नाहीत. तिथं कोणाला कोणाशी बोलायला देखील फुरसत नाही, मग लाड करायला कुठली आलीय फुरसत ?

आमचे जेवण संपले. पण बाहेर धो धो पाऊस कोसळत होता. सोबत छत्री, रेनकोट काहीच नव्हते. बरं, पाऊस थांबेल म्हटलं तर, वर आभाळ गच्च भरून आलेलं. शेवटी भिजत भिजत हॉटेल बिस्मार्क गाठले. आम्ही बिस्मार्क हॉटेलात पोहोचलो आणि पाऊस थांबला.

मला वाटायचं, भारतातच पाऊस तऱ्हेवाईकपणा करतो; पण नाही. वरुणराज जगात कुठही गेलात तरी, असेच लहरीपणा करतात. जेव्हा मियामीच्या कोलंबस हॉटेलात रात्री जवळ जवळ दोन तास विजेचं थैमान सुरू होतं

अमेरिकेत आणि इंग्लंडमध्ये वीज कोसळून आग लागण्याचे प्रकार अनेक घडतात. याचं कारण असं की, युरोप आणि अमेरिकेतील घरांना नव्वद टक्के लाकूड वापरलं जातं. घर लहान असो वा मोठे असो, ते लाकडाचंच बनवतात. न्यूजर्सी या विभागात अजूनही भूकंपाचे धक्के बसतात. अशा वेळी लाकडाचे घर पडल्यास जीवितहानी होण्याची शक्यता कमी असते. शिवाय लाकडी

घर कितीही मोठे असलं तरी, दोन महिन्यात पूर्ण करता येते. घराला लागणारे लाकूडसामान बाजारात तयार मिळते जागेवर आणून फक्त पटपट जोडायचे. इलेक्ट्रिक आणि पाण्याचे कनेक्शन्स जोडले की, घर वापरायला तयार होते. प्रत्येक घराला एक तळघर असते. तिथं कपडे वाळत घालतात. बऱ्याच तळघरांत मला टेबल–टेनिसचे टेबल दिसले. या तळघरातच वॉटर–हिटर बसवलेला असतो.

बिस्मार्क हॉटेलपासून अर्ध्या फर्लांगावर, पश्चिमेला रेल्वेचा फाटा होता. पण तो अधांतरी लोखंडी पुलावरून गेलेला होता. आपली मुंबईची हार्बर लाईन काही ठिकाणी उंचावरून जाते तशी ! पण शिकागोची ती ओव्हर-ब्रिज लाईन संपूर्ण लोखंडी असल्यामुळं धाड धाड असा एकसारखा रात्रभर आवाज होत होता. तसं पाहिलं तर, अमेरिकेत रेल्वेनं प्रवास फारसा कोणी करीत नाहीत. एकतर रेल्वेचा प्रवास अमेरिकेतील विमान प्रवासाइतकाच महाग आहे व रेल्वे प्रवासात वेळेचा अपव्यय करण्याइतकी त्या लोकांना सवडही नसते. पाच–पाचशे मैल मोटारीचा प्रवास सहन करता येतो तो तिथल्या अत्याधुनिक आणि प्रचंड अशा राजरस्त्यांमुळे.

रात्रभर धडधड करीत जाणारी ती गाडी आहे तरी कसली हे उत्सुकतेनं पाहायला सकाळी उमेश व मी गेलो. सतत वाहतूक चालली होती ती मालाची. प्रवासी गाड्या अगदीच तुरळक होत्या. परत येताना समोर मोठे मद्याचे दुकान लागले. इतके मोठे दुकान मी आयुष्यात आजपर्यंत बघितले नाही. हजारो बाटल्या ओळीनं लावलेल्या होत्या. त्यांत देशोदेशींचे मद्य विक्रीस ठेवले होते स्पेन, पोर्तुगाल, हॉलंड, बेल्जियम इथल्या मद्याबरोबर अनेक प्रकारची कॅनेडियन व्हिस्कीही तिथं होती जगप्रसिद्ध स्कॉच व्हिस्कीचे एक स्वतंत्र असे दालनच होते. मद्याचं दुकान न्याहाळण्यातसुद्धा एक आगळा आनंद असतो. हा आनंद कधीतरी मद्य चाखणाऱ्यालाच ठाऊक असतो. त्या दुकानात याहूनही एक निराळं आकर्षण आढळलं. दुकान पाहायला आलेल्यांना उंची प्रकारची वाईन मोफत प्यायला दिली जात होती. त्या दुकानाचा सेल्समन साठ–पासष्ट वर्षांचा होता. त्यानं आम्ही दोघे भारतीय आहोत हे तात्काळ ओळखलं आणि आम्हा दोघांना जवळ बोलावून आमच्याशी हस्तांदोलन केले आणि आम्हाला छोट्या कागदी कुपीतून वाईन

प्यायला दिली. ल्यूसर्नची ( स्वित्झर्लंडची ) आठवण आली.

'पण आम्ही इथं काही खरेदी करणार नाही. सहज दुकान आकर्षक वाटलं म्हणून पाहायला आलो !' इंग्रजीत मी म्हणालो.

त्यावर तो गृहस्थ माझ्या खांद्यावर हात ठेवून विनोदानं म्हणाला, 'इथे मद्य २१ वर्षांच्यावर असलेल्या व्यक्तीलाच विकता येते.'

त्यावर मी हसत हसत म्हणालो, 'हे माझे चिरंजीव पंचवीस वर्षांचे आहेत.'

'ओऽऽऽ! वंड फूऽऽऽऽ!' चिरंजीवांच्याकडे पाहात त्यानं विचारलं, 'वॉट आर यू डुईंग इन इंडिया !'

'आय यम ए लॉयर. माय फादर इज असिस्टंट पब्लिक प्रॉसिक्यूटर.' चिरंजीवांनी स्वत:बद्दल माहिती सांगताना माझ्याबद्दलही माहिती सांगून टाकली.

तो गृहस्थ चिरंजीवांना म्हणाला, 'व्हाय डोंच्यू कम् इन स्टेटस्. यू कॅन अर्न टॅन टाईम्स् मोअर दॅन वॉट यू आर गेटिंग इन इंडिया.'
( तुम्ही अमेरिकेत का नाही येत ? हिंदुस्थानात मिळवता त्यापेक्षा दसपट इथे मिळवाल )

आम्ही दोघांनी त्याच्या सदिच्छेबद्दल आभार मानले. जीवनात पैसे कमवणे हेच ज्याचे ध्येय आहे, अशीच माणसं अमेरिकेत जाऊन स्थायिक होतात पण त्यासाठी सात्विक समाधानाचे जे कायमचे मोल द्यावे लागते त्याला मी कधीही तयार होऊ शकणार नाही. पण त्या सेल्समनचं म्हणणं अक्षरश: सत्य होतं.

अमेरिकेत कायद्यातील तज्ज्ञांना भरमसाठ कमाई करता येणं शक्य आहे. कुठे कुणाला दुसऱ्याच्या चुकीने अपघात झाला तर, ज्याला अपघात झाला तो गृहस्थ अपघाताला जबाबदार असणाऱ्याला वकीलामार्फत नोटीस देतो व नुकसानभरपाईची मागणी करतो. नुकसानभरपाई न मिळाल्यास कोर्टाची पायरी चढावी लागेल असा त्या नोटीशीत उल्लेख असतो. अमेरिकन नागरिक सर्वांत अधिक अमूल्य असं जर काय मानत असेल तर तो वेळ– 'टाईम' कोर्ट–कचेरीत आपला वेळ वाया जाणार अशी ओझरती जरी शंका आली, तरी तो ज्यानं नुकसानभरपाई मागितली असेल त्याला चटकन्

शे–पाचशे डॉलर्सला चेक पाठवून देतो, अन् कोर्टाच्या 'येरझाऱ्या' वाचवतो. आमच्या रत्नागिरी जिल्ह्यात परड्यातल्या वावभर जागेसाठी सुप्रीम कोर्टापर्यंत जाणारे कितीतरी महाभाग आहेत माणसानं आपल्या न्याय्य मागण्यांबद्दल जरूर जागरूक असावं. पण त्यासाठी पिढ्यान्‌पिढ्या, वर्षानुवर्षं कोर्ट–कचेऱ्या करणे हे लक्षण शहाणपणाचे मुळीच नाही. याचा अर्थ एकच, भारतीय नागरिकांना कज्जे–खटले खेळायची जी खुमखुमी येते, त्याचं कारण त्यांचा रिकामटेकडेपणा. वेळेचं आणि काळाचं मोल ज्याला समजतं, तो अशी वेडेपणाची ईर्षा कधीही करणार नाही.

उत्तम अशा वाईनचा पेग पोटात गेल्यामुळे मला जरा तरतरी आली. मी उमेशना म्हणालो, ' वाईनची चव चांगली आहे. एक बाटली घ्या माझ्यासाठी ! '

' छे ऽऽऽ ! बाटली कशाला ? बाटली सोबत असली की, तुम्ही ती केव्हाच संपवून टाकता ! '

परदेश–प्रवासात सगळे डॉलर्स चिरंजीवांच्या ताब्यात होते. त्यांनी ऑडिट काढले म्हणजे संपलेच ! पण ते तसे जरुरीच्या गोष्टीला कधीच हात आखडत नसत. माझा वाईन आणि व्हिस्कीसाठी होणारा खर्च त्यांच्या दृष्टीनं अनाठायी खर्च होता अन् त्यात त्यांचं तरी काय चूक होतं ? कधीकधी माझी खुशालचेंडू वृत्ती तोल सोडते, तेव्हा तो तोल सांभाळण्याचं महत्त्वाचं काम माई व उमेश करत असतात

' आता आपण थोड्याच वेळात साईट-सीईंगला बाहेर पडणार आहोत. नंतर घेऊ तुम्हाला हवी ती वाईनची बाटली. ' चिरंजीवांनी आश्वासन दिले. आम्ही त्या सेल्समनचा निरोप घ्यायला त्याच्याजवळ गेलो, तेव्हा त्यानं मला आणखीन एक कुपी वाईन दिली. चिरंजीवानाही देऊ केली. पण त्यांनी ती आभारपूर्वक नाकारली. सारी उमर अमेरिकेत गेल्यासारखे ते नेहमीच वागतात

सेल्समन म्हणाला ' आय वाँट टू व्हिजिट इंडिया, अँड व्हिश टू सी ' टॅजमॅल ' बिफोर आय डाय ! '
( मला मरण्यापूर्वी एकदा भारताला भेट द्यायची आहे अन् ताजमहाल बघायचा आहे ) आम्ही दोघांनी त्याला ' भारताला आलात तर जरूर

आम्हाला कळवा, आम्ही तुम्हाला राहायला बोलवू, ' असे सांगितले अन आमचा पत्ता त्याला सांगितला. पण कोण येतो अन् काय ?

पुढे 'फ्लोरीडा स्टेट' मध्ये ओरलँडोहून मायामीला जाताना वाटेत 'बोया पॅटन' 'BOEA PATON' या गावी डिपार्टमेंटल स्टोअर्समध्ये खाद्यपेयांची खरेदी करायला गेलो असताना एक उंच, देखणी, मध्यम वयाची बाई आमच्या मागे बाजारानं भरलेली ट्रॉली घेऊन उभी होती. माईनी नेहमीप्रमाणं भरपूर खरेदी केली होती बिल करायला आमचा नंबर आला, पण आमचे कॅशियर उमेशराव दुकानात सॅमेजेम आणण्यासाठी खूप दूर गेलेले मग मागच्यांना किती वेळ ताटकळत उभं करणार ? म्हणून आम्ही आमची ट्रॉली बाजूला केली अन् मागच्या त्या बाईला म्हटलं,

'यू कॅन गो अहेड. माय सन हॅज गॉन समव्हेअर अँड ही हॅज द् कॅश ऑन हिम् !'

'ओ ऽ ऽ ऽ आय् सी ऽऽऽ' असं म्हणत त्या स्त्रीनं आपली ट्रॉली पुढं केली अन् त्या कौंटरवरची पोरगी तिचं बिल करीत असताना ती माझ्याशी बोलू लागली,

आर यू फ्रॉम इंडिया ?'

मी मनात म्हटलं, ' खिशात पैसे नसताना बाजार केलेली आमची ट्रॉली कौंटरपर्यंत आणण्याचा वावळटपणा आम्हा भारतीयांव्यतिरिक्त दुसरं कोण करणार ?' पण बाहेर तसं काहीच न दाखवता मी औपचारिकपणानं त्या बाईशी बोलत होतो. त्या बाईचा नवराही सोबत होता. बाईनं मला विचारलं,

'हाऊ लाँग यू आर इन स्टेटस् ?'

'अबाऊट फिफ्टीन डेज ! वुई हॅव व्हिजिटेट युरोप टू ऽऽऽ !'

'ओ ऽऽऽह डॅटस् फंटॅस्टीक ऑल द् वे. यू केम फ्रॉम इंडिया वुईथ यवर वाईफ अॅन्ड सन् ?'

'या ऽऽऽह'

इतक्यात उमेश तेथे आले. त्यांना पाहताच त्या बाई म्हणाल्या. ओह. युवर सन् इज टॉलर दॅन यू ऽऽऽ !'

'या ऽऽऽ ह !'

त्याही बाईनं भारताबद्दल अत्यंत आपुलकी दाखवली. अन् ती म्हणाली,

'आय वुईश टू व्हिजिट इंडिया. वुईच सीझन इज बेटर?'

'विंटर!'

'विंटर?' तिने आश्चर्योद्गार काढला.

अमेरिकेतला हिंवाळा हा रक्त गोठवणारा असतो. एक लॉस एंजेलीस सोडलं तर, इतर ठिकाणी साडेतीन ते चार महिने हिवाळ्यात बर्फ पडत असते. ऑफिसात आणि घरी हिटर लावून बसावं लागतं. त्यामुळे तिला 'विंटर' म्हटल्यावर आश्चर्य वाटलं असावं, म्हणून मी लगेच खुलासा केला. 'विंटर इज द् बेस्ट सीझन इन् इंडिया, अँड वुई हॅव नो स्नो-फाॅल एक्सेप्ट कॅश्मीर!'

'हॅव यू सीन कॅश्मीर?'

'याऽऽऽऽह, ट्वाईस!'

'डॅटस् मार्व्हलस!'

तिने माझ्या पर्यटन-प्रेमाची मुक्त-कंठानं प्रशंसा केली कुटुंबासमवेत अमेरिकेला भेट दिल्याबद्दल तिनं माझं कौतुक केलं आणि निरोप घेऊन ती आपल्या गाडीकडं ट्रॉली ढकलत निघून गेली. पण तिनं केलेलं ते पाच-दहा मिनिटाचं संभाषण ओतप्रोत जिव्हाळ्याचं वाटलं पुन्हा या जन्मी ती माऊली भेटणार नाही. पण काही क्षण तिनं आमची आस्थेवाईकपणे केलेली चौकशी मी कधीही विसरू शकणार नाही. कुटुंब वत्सल माणसांबद्दल अमेरिकन नागरिकांना मोठं गूढ वाटतं एवढ्या-तेवढ्या कारणांवरून घटस्फोट घेणाऱ्या अमेरिकन नागरिकांना भारतीय कुटुंब-पद्धतीचं खरोखरचं कौतुक वाटतं याचं मुख्य श्रेय भारतीय स्त्रियांनाच द्यायला हवं 'कशी मी त्यजू या पदाला?' या संस्कृतीचं आज जगात कुठं पालन होत असेल तर, ते केवळ भारतातच!

शिकागो शहर हे लेक मिचिगन या प्रचंड सरोवराकाठी वसलेले आहे. प्रथम आम्ही जेव्हा शिकागो बीचवर गेलो तेव्हा मला तो समुद्रच वाटला. तो रविवार होता. हजारो बायकामाणसं उघडेबंब होऊन सरोवराच्या काठी अंगाला ऑलीव्ह ऑईलसारखी तेलं फासून सूर्यस्नान घेत होती. काहीजण गळानं मासे पकडत होते. गळानं मासे पकडणे हा सुद्धा माझा आवडीचा

छंद. त्यामुळं गळाला बेट म्हणून ते लोक काय लावतात, मासे मिळतात ते कोणत्या जातीचे, तऱ्हेचे, किती आकाराचे हे पाहायला अर्थातच मी थोडासा पुढे सरसावलो. मी ज्या ठिकाणी गेलो, तिथं सत्तर वर्षांच्या म्हातारीपासून ते सात वर्षांच्या नातीपर्यंत सर्व कुटुंब सरोवराकाठी आलेलं होतं. कुटुंबातला कर्ता पुरुष गळानं मासे पकडत होता. आपल्या 'बांगड्या'च्या आकाराचे मासे तो पकडत होता पकडलेले मासे जाळीत टाकून ती जाळी परत बंद करून पाण्यात सोडलेली होती म्हणजे घरी जाईपर्यंत मासे जिवंत राहणार होते त्यात त्याच्या गळाला एक अगदीच लहान मासा लागला. त्यानं हळुवारपणे त्याच्या तोंडातून गळ काढला आणि मासा परत सरोवरात टाकला पकडलेला लहान मासा सोडून देण्याचं औदार्य क्वचित् पाहायला मिळतं आपल्याकडं कोळी जाळं टाकतात. त्यातल्या बेडक्या, शंख आणि शिंपले सोडून सर्व मासे वेळूच्या टोपलीत कोंबतात. हा लहान, हा मोठा असा भेद कोणी कोळ्यानं केलेला मला आठवत नाही. त्या गृहस्थाची पत्नी तोकडी निकर आणि ब्रेसिअर्स घालून, डोळ्याला गॉगल लावून चक्क पालथी पडून ट्रान्झिस्टर ऐकत होती, पण त्या ट्रान्झिस्टरचा आवाज पाच फुटांवर दुसऱ्याला ऐकू जात नव्हता अलीकडे आपल्याकडं ट्रान्झिस्टर सार्वजनिक ठिकाणी लावण्याचं फॅड इतकं बोकाळलं आहे की, त्यावर त्वरित कायद्यानं बंधन येणं अत्यावश्यक आहे. एस्. टी. त, रेल्वेत, मोठ्यानं ट्रान्झिस्टर लावणं हा गुन्हा आहे, पण कोणीच लक्ष देत नाही. शिवाय भारतात सणासुदींना तोटा नाही. गणपती, दसरा, दिवाळी. संक्रांत असे एकामागून एक सण येतात आणि लाऊडस्पीकर अहोरात्र कोकलत असतो. कर्कश लाऊडस्पीकर लावून दुसऱ्याचं स्वास्थ्य बिघडवणाऱ्यांना अक्षरशः लाथा हाणायला हव्यात ! पण हे लाऊडस्पीकर कल्चरचे लोक असतात निर्बुद्ध आणि अर्ध्या डोक्याचे यांच्या वाटेला कोणी सज्जन, मालस माणूस जात नाही पण हे असं किती काळ चालणार ? शासनानं सार्वजनिकरीत्या रात्री बेरात्री वाजवल्या जाणाऱ्या लाऊडस्पीकरवर त्वरित बंदी घालावी अशी लोकनियुक्त प्रतिनिधींमार्फत लोकसभेत आणि विधानसभेत मागणी करणे अत्यावश्यक आहे मद्रास प्रांतात लाऊडस्पीकरवर गाणी लावणे हा गुन्हा आहे. भारतातल्या सर्व प्रांतांनी मद्रासचे अनुकरण

करणं जरुरीचं आहे. केवळ महाराष्ट्र टाईम्स्मध्ये पत्र पाठवून ही सामाजिक गरज साध्य होणार नाहीय् ! वकील, डॉक्टर्स, प्रोफेसर्स, शाळांचे हेडमास्तर आणि प्रमुख नागरिक यांनी कायदेशीर तरतुदींची वाट न पाहता जिल्ह्याचा कलेक्टर आणि डी. एस्. पीं.ना निवेदने देऊन त्यावर बंदी घालणे अगत्याचे आहे. आवाजाच्या प्रदूषणाचा नमुना पाहायचा असेल तर एकदा माझ्यासोबत धारावीच्या झोपडपट्टीकडं चला. हिंदी, मराठी, गुजराथी आणि कन्नड अशी विविध भाषांमधली कानठळ्या बसवणारी गाणी लाऊडस्पीकरवर अहोरात्र चालू असतात. मानसिक स्वास्थ्य बिघडवणारी ही समस्या जाणकार नागरिकांनी गंभीर दखल घेऊन धसास लावण्याची नितांत गरज आहे.

या बाबतीत समाजातील सुशिक्षित वर्गानं सामुदाईक असा ' आवाज ' जर वेळीच उठवला नाही, तर एक ना एक दिवस ध्वनिप्रदूषणामुळं वेड लागायची पाळी येईल

शिकागो बीचवर याही पुढचा प्रकार मी बघितला शेजारी बसलेल्या कुटुंबास थोडाही आवाजाचा उपद्रव होऊ नये म्हणून कित्येकांनी इयरफोन लावले होते लेक मिशीगन महासागरासारखे प्रचंड होते. लेकच्या कडेला एका भागी शेकडो लाँचेस, होड्या, हॅचेस, कॅनोज आणि मोटार-बोटस् लाटेवर वरखाली होत होत्या. काहीजण सरोवरात आत खूप दूरपर्यंत जाऊन जलपर्यटनाचा आनंद उपभोगत होते

बीचवरून आम्ही शिकागोचं म्युझियम पाहायला गेलो. जगातलं हे मोठ्यातलं मोठं म्युझियम मानलं जातं. इथं टाचणीपासून ते विमानापर्यंतच्या (Pin to Plane) सर्व वस्तू दिसल्या. हे म्युझियम पाहायला अख्खा दिवस सुद्धा अपुरा पडेल. तिथं आम्हाला दोन तासांत म्युझियम पाहून बाहेर यायला हवं असं मेहेरनोश पटेलनं सांगितलं होतं त्यामुळं आम्ही महत्त्वाची अशी दालनं पाहात गेलो. जेटपासून ते अगदी लिंडबर्गने ज्या मोनोमशिनच्या प्लेनने अटलांटिक महासागर पार केला त्या विमानांचे नमुने म्युझियममध्ये होते विशेष म्हणजे, ही विमानं अधांतरी लोखंडी तारेला टांगलेली होती चंद्रावर गेलेले यान **Appolo 8** हे तिथं पाहायला मिळाले. या म्युझियममध्ये खाद्यपदार्थांच्या अनेक कलाकृती पाहायला मिळाल्या मेणाचे केक्स, बिस्किटं

मटणाचे तुकडे, मासे, प्रॉन्स, लॉबस्टर अशा वस्तू इतक्या हुबेहूब बनवलेल्या होत्या की, त्या कारागिरांच्या हस्तकौशल्याची प्रशंसा मुक्त कंठाने करावीशी वाटली. लंडनच्या मादाम टुसॅडस वॅक्स म्युझियममध्ये जिवंत माणसाच्या हुबेहूब प्रतिकृती पाहायला मिळाल्या होत्या, तर इथे खाद्यपदार्थांच्या असंख्य कलाकृतींनी थक्क करून सोडलं. त्याचबरोबर प्राणीशास्त्र, वैद्यकशास्त्र, भूगर्भशास्त्र ही दालनंसुद्धा अतिशय समृद्ध वाटली. युरोप आणि अमेरिका या देशांनी केवळ भौतिक प्रगती केलेली आहे असं नाही, तर कलेची असंख्य दालनं त्यांनी आपल्या अप्रतिम अशा अभिव्यक्तीनं सतत समृद्ध करून ठेवलेली आहेत.

शिकागोचं हे म्युझियम पाहायला जगातल्या सर्वच देशांतून पर्यटक आले होते, पण त्यांतल्या त्यात जपानमधून आलेल्यांची संख्या जास्त होती

दोन तासांनंतर आम्ही ठरावीक ठिकाणी आलो. बस तेथे येऊन थांबली होती. सर्व सहप्रवासी आले, पण रोमिओ–ज्युलिएट–तुलसी पतीपत्नी–कुठं गायब झाले होते. अर्ध्या–पाऊण तासानंतर त्या दोघांना शोधायला छाबडा–फौंटनपेन कंपनीचा सेल्समन–गेला. त्याला असली स्वयंसेवकाची कामे करायची भलतीच हौस. पण तो गेला एका बाजूने आणि दुसऱ्या बाजूने ते बेजबाबदार युगुल हसत–खिदळत बाहेर आले. आपल्यामुळं इतरांना निष्टत थांबावं लागलं याची यत्किंचितही जाणीव त्यांच्या चेहऱ्यावर नव्हती. ती ' मजनू ' सदैव चुईंगम चघळत नवऱ्याच्या अंगचटी येत असे. आमच्यात इतरही काही सहप्रवासी स्त्रिया होत्याच की ! पण त्यांनासुद्धा त्या तुलसीच्या पत्नीच्या वागण्याची घृणा येत होती. ही दोघं आली आणि त्यांना शोधायला गेलेला छाबडा तब्बल पंधरा मिनिटानं म्युझियममधून तीस नंबर विडीचे झुरके घेत शांतपणानं गाडीजवळ आला त्याला इतर प्रवाशांनी शिव्या घातल्या. टी.सी.आय च्या टूरचे जसे अनेक फायदे आहेत तसे अनेक तोटेही आहेत, आणि त्यातला सर्वांत मोठा तोटा कोणता असेल तर, तो निर्बुद्ध आणि मूर्ख अशा माणसांच्या संगतीत राहावं लागतं हा ! तरी बरं, गर्ग महाशय लंडनपासून जरा नरम होते नाहीतर भारतातून आलेले हे चाळीस प्रवासी अगदीच अजाण असून त्यांना युरोप आणि अमेरिका दाखवून सुखरूप परत भारतात घेऊन जायची नैतिक जबाबदारी

केवळ आपल्या एकट्यावरच आहे अशी त्यांची प्रामाणिक समजूत होती· त्यांच्या पत्नीना तर सारखं वाटत असावं की, भारतात सत्तेवर असणाऱ्या सरकारला आपल्या पतिराजांना इंग्लंड किंवा अमेरिका या देशात परराष्ट्र-मंत्री म्हणून नेमणूक करण्याची सुबुद्धी का होत नसेल ? परराष्ट्रमंत्रीपद सांभाळणं हे अगरबत्त्यांचा कारखाना चालवण्याइतकं सोपं नसतं हे त्या भावड्या बाईला काय ठाऊक ? गर्ग कधीकाळी दिल्लीच्या सेक्रेटेरीएटमध्ये हेडक्लार्क होता. अतिवाचाळ असल्यामुळं त्याला डिच्चू मिळाला असावा. पण तो सद्‌गृहस्थ आम्हा सर्वांना ' सर्वज्ञ ' असल्यासारखा भासवत होता. अक्षरश: तो एक नमुना होता दुपारच्या वेळी बसमधून प्रवास चालला की. प्रवासी लंच झाल्यानंतर डोळे मिटून डुलक्या घ्यायचे. नेमका त्यावेळी गर्ग जोरजोरात बायकोला अमेरिकेची ऐतिहासिक माहिती सांगत असे. तीही ऐकता ऐकता डुलक्या घ्यायची. त्यावेळी तो तिच्या दंडाला चिमटा घेऊन म्हणे. ' अरे भई, मैं बात कर रहा हूँ और तुम सो रही है ?' मग ती नाईलाजानं डोळे उघडत असे. पण पाच-दहा मैल झाले की. पुन्हा डोळे झाकून बसल्या जागी झोकांड्या देत राही.

शिकागोचं खास वैशिष्ट्य अशी ती सिअर्स टॉवर ' ही इमारत पाहायला गेलो. ही जगातली सर्वांत उंच इमारत -एकशे तीस मजली. मुंबईला ' उषाकिरण ' झाली तेव्हा आम्हाला कौतुक वाटलं पण ' उषाकिरण 'ला एक मोठा अॅडव्हांटेज मिळाला आहे तिच्या पायाशी प्रचंड अशी खडकाळ टेकडी आहे. पण सिअर्स टॉवर ही इमारत सपाट जमिनीवर उभी आहे या इमारतीत अनेक ऑफिसेस. दुकानं. हॉटेल्स आहेत. या इमारतीचं बांधकाम सहा वर्षे सुरू होतं आणि शेकडो कुशल तंत्रज्ञ व कामगार अहोरात्र खपत होते

ही इमारत पाहायला येणाऱ्या प्रवाशांना १०३ मजल्यांपर्यंत नेले जाते वरचे सत्तावीस मजले दुरुस्ती चालल्यानं बंद होते या १०३ मजल्यांवर पर्यटकांना घेऊन ज णारे ' लिफ्ट ' हाही एक आश्चर्य करण्यासारखा विषय आहे चाळीस लोकांना एकदम १०३ मजले वर घेऊन जाणाऱ्या लिफ्टची गती मनी गुंग करणारी आहे. हे लिफ्ट चाळीस लोकांना घेऊन पंचेचाळीस सेकंदात १०३ मजल्यावर नेऊन सोडते

वर चोहोभोवती पाहण्यासाठी काचांनी बंद केलेली गॅलरी आहे. इथून उभ्या शिकागो शहराचे दर्शन घडते. लेक मिशिगन, त्यातून जाणाऱ्या प्रचंड बोटी, मोटर लाँचेस, ट्रॉलर्स, जसे वरून दिसत होते, तसेच अफाट पसरलेले शिकागो शहरही दिसत होते. याही शहरावर न्यूयॉर्कप्रमाणे धुराचा एक हलकासा थर आकाशात तरळताना दिसत होता. रस्त्यावरून धावणाऱ्या लक्षावधी मोटारींनी सोडलेला 'कार्बन मोनोऑक्साईड' जाऊन जाऊन जाणार तरी कोठे ?

'सिअर्स टॉवर' खरोखरच थक्क करून सोडणारी वास्तू आहे. टॉवरवर असताना विमानात असल्यासारखे वाटले. वरून शिकागो स्टेशनवरच्या रेल्वे गाड्या काड्याच्या पेटीसारख्या दिसत होत्या. दूर आकाशातून पक्ष्यांसारखी इकडून तिकडे तरळत जाणारी विमानंसुद्धा तेथून दिसत होती. सिअर्स टॉवर म्हणजे अमेरिकन वास्तुशास्त्रज्ञांच्या बुद्धीचे मूर्तिमंत उदाहरणच होते.

पाऊण मिनिटात वर घेऊन जाणारे लिफ्ट तितक्याच वेळेत खाली घेऊन आले. प्रवाशांनी खालून इमारतीचे काही फोटो घेतले. जगातल्या या सर्वोच्च इमारतीपाशी आम्ही अर्धा-पाऊण तास थांबलो. लखनौच्या नंदीजवळ एक बॉक्स कॅमेरा होता. त्याला या बिल्डिंगसमोर आपण उभे आहोत असा एक फोटो काढून घ्यायचा होता. पण जो तो आपल्याच नादात होता. म्हणून मी त्याचे त्या पार्श्वभूमीवर दोन फोटो खेचून दिले.

दुसऱ्या दिवशी सकाळी शिकागो सोडले. दूर जाईपर्यंत धूसर आकाशात घुसलेला सीअर्स टॉवरचा सुळका दिसत होता. जाताना वाटेत शिकागोचा प्रचंड कत्तलखाना दिसला. शिकागो शहर गुन्हेगारीबद्दल प्रसिद्ध होते, पण गुन्हेगारीचा कोणताच उपद्रव न होता शिकागो शहरातली प्रेक्षणीय स्थळं पाहून दोन दिवसांचं वास्तव्य करून आम्ही न्यू ऑर्लीन्सला सुखरूप चाललो होतो. वाटेत एक मुक्काम 'मेमफीस' या शहरात केला. दिवसभर बसमध्ये बसून गुडघे आखडले जायचे, म्हणून संध्याकाळी मुक्कामाला गेल्या गेल्या मी हॉटेलमध्ये स्विमिंग टँक शोधत असे. पण मेमफीसच्या 'रामडा इन्' या हॉटेलात पोहण्याची व्यवस्था नव्हती. पाय मोकळे करण्यासाठी थोडं फिरून यावं म्हटलं, तर सर्वत्र निग्रोंचा संचार दिसत

होता. शिकागोप्रमाणं ' मेमफीस ' इथंही निग्रो गुंडगिरी करतात असं ऐकलं होतं. मग पाय मोकळे करण्याचा विचार सोडून द्यावा लागला. हॉटेलातच थोडे पीटीचे एक्झरसाईज केले, शॉवर बाथ घेतला आणि ' डिनर 'ला गेलो. आमच्यासोबत काही आंबटशौकी प्रवासी होते त्यांची नावं मुद्दामच देत नाही. या लोकांना न्यूड डान्स, कुठे सेक्स शो, कुठे ब्ल्यू फिल्म्स असले प्रकार पाहायचा भारी छंद ! मेमफीसला आल्या आल्या या मंडळींनी हॉटेलच्या कर्मचाऱ्यांकडून असे ' शो ' कोणत्या ठिकाणी आहेत याची माहिती मिळवली. ही मंडळी ब्रेकफास्ट, लंच, डिनर वेळेवर घेण्याच्या फंदात पडत नसत. दिवसभर काही ना काही चरत रहात. चालत्या गाडीत बिअर प्यायला बंदी होती. कारण ' Grey Hound ' या कंपनीने तशी बंदी असल्याबद्दलचा फलक बसमध्ये लावलेला होता. पण असल्या मनाईला बरेचजण जुमानत नव्हते. बिअर आणि व्हिस्की–पान सतत चालू असे. वाटेत कुठे बस थांबली की, तिथे पॉपकॉर्न, वेफर्स, फ्रेंचफ्राईज जे मिळेल ते, ते लोक चघळत असत. त्यामुळे रात्री मुक्कामाला हॉटेलवर आल्यानंतर ' डिनर ' वगैरे प्रकार त्यांना ठाऊकच नसे. आमचे छोटे कुटुंब या बाबतीत अतिशय शिस्तबद्ध सकाळी माफक ब्रेकफास्ट, दुपारी लंच आणि रात्री डिनर, असा क्रम दोन महिन्यांच्या वास्तव्यात कधीही चुकलेला नव्हता.

तर ही आंबटशौकी मंडळी मेमफीसला त्या रात्री ' सेक्स शो ' पाहायला गेली. त्या थिएटरमध्ये निग्रो गुंडांनी हे ' पाव्हणे ' आहेत हे तात्काळ हेरलं आणि त्यांच्यावर पाळत ठेवली रात्री अकराच्या सुमारास शो सुटला आणि निग्रो गुंडांनी त्यांना बोळात गाठलं प्रवासासाठी बाहेर पडलेल्या लोकांजवळ ' डॉलर्स ' असतात हे त्या निग्रो मवाल्यांना ठाऊकच असतं त्या लोकांना गुंडांनी बोळात गाठलं आणि त्यांच्याकडची चीजवस्तू मागायला सुरुवात केली. एकानं मनगटी घड्याळ मागितलं, तर दुसऱ्यानं खिशात हात घातले. त्यावेळी त्यांचे साथीदार मागून येत होते ते आले की, मुकाट्यानं आपल्या चीजवस्तू द्याव्या लागणार हे पाहून प्रवाशांनी पळ काढला तरी बरं ' रामडा इन ' या हॉटेलची वाट त्यांना लागलीच मिळाली. धापावत, घामेघुम झालेली ही मंडळी कशीबशी हॉटेलापाशी येऊन थांबली पण त्यांनी त्या प्रकाराचा एवढा धसका खाल्ला की, त्यानंतर सर्व प्रवासात

कोणीही रात्री हॉटेल सोडून बाहेर गेले नाही.

रात्री वीज गडगडत होती. ती इतक्या जवळ की खिडक्यांची काचेची तावदाने आणि टेबलावरचे काचेचे ग्लास किणकिण वाजत होते. प्रत्येक इमारतीवर 'लायटनिंग कंडक्टर्स' बसवलेले होते. रात्रीच्या वेळी कडाडणारे मेघ प्रचंड आवाज करीत आणि तो आवाज चिचोळ्या रस्त्या–बोळातून घुमत राही.

मेमफिस सकाळी ९ वाजता सोडले. बसमध्ये मी पुढचा बाक बऱ्याच वेळा पकडला होता. पण या बाकावर बसण्यासाठी गर्ग सारखा धडपड करीत असे. तो पुढे बसून आपल्या पत्नीला इतक्या मोठ्याने माहिती सांगे की ती सर्व प्रवाशांना ऐकू जावी अशी त्याची इच्छा असे. तोही आमच्याप्रमाणेच पहिल्यांदाच युरोप–अमेरिकेच्या सहलीला आला होता, पण भासवत होता उभा जन्म युरोप–अमेरिकेत घालवल्यासारखा ! लोखंडाचा व्यापारी, फौंटनपेन सेल्समन छावडा, या दोघांनी बऱ्याच वेळा माझ्यावर स्पर्धा केल्यासारखी पुढची जागा अडवली. मी त्यांच्याशी काही वाद केला नाही. फक्त मनाशी म्हणालो 'मी जे इथं पाहिलं ते नजरेनं टिपून उद्या भारताला परतल्यावर माझ्या बांधवांना शब्दबद्ध करून सांगेन. तुम्ही दोघे पुढे बसून काय करणार आहात?' ते दोघेही बिनडोक होते. त्यांच्याशी वाद घालण्यात काहीच अर्थ नव्हता. म्हणून मी मुकाट्यानं मागच्या सीटवर येऊन बसत असे. गाडी थांबेल त्या ठिकाणी मेहेरनोश पटेलला आणि गाडीच्या ड्रायव्हरला त्या प्रदेशाविषयी माहिती विचारणं, त्यांनी सांगितलेली माहिती तात्काळ डायरीत टिपून ठेवणं हा माझा अखंड उद्योग चाललेलाच असे.

मेमफीस सोडण्यापूर्वी गाडी पोस्ट ऑफिससमोर मेहेरनोशनं थांबवायला सांगितली. पटेल म्हणाला, 'प्रवाशांपैकी कोणाला घरी पत्रं पाठवायची असतील तर, इथं एरोग्राम्स् आणि तिकिटं मिळतात.'

सर्वात प्रथम उतरला तो गर्ग. त्याच्यामागोमाग पाचसहाजण पोस्टात गेले. गर्ग एक प्लॅस्टिकच्या कव्हरमध्ये घातलेला 'एरोग्रॅम' सर्वांना दाखवत आला आणि म्हणाला 'देखो भाई, अपने इंडिया में भी एरोग्राम बेचते हैं, लेकिन ऐसा ब्युटिफुल प्लॅस्टिक कव्हर उधर नही मिलेगा !'

आता भारतात काही काही पोष्टांत चार–चार महिने तिकिटंसुद्धा मिळत नाहीत. तिथं प्रत्येक एरोग्रामला किंवा इनलँडला असलं प्लॅस्टिक कव्हर देणं कसं शक्य आहे ? कुठल्याही बाबतीत पाश्चात्त्यांसारखी स्थिती इथं कशी निर्माण होऊ शकेल ?

मेमफीस सोडल्यानंतर आमची बस काही काळ दलदलीच्या प्रदेशातून पुलावरून मार्गक्रमण करीत होती. उजव्या बाजूला सारी दलदल होती. काही ठिकाणी दलदलीत लाकडाच्या तुळयांवर अधांतरी बांधलेली घरं दिसली. त्या घरांभोवतालची झाडं सफेदासारखी उंच आणि झुपक्या झुपक्यांची होती घरांभोवताली पाळीव बदकांचे तांडे दलदलीत आणि बाजूच्या पाणस्थळ भागात चरत होते. ते दृश्य पाहून मला काश्मिरच्या दलसरोवराच्या काठी दिसलेल्या काश्मिरी घरांची आठवण आली. रस्ता आणि जमीन यांमधून पाणी होतं आणि याच पाण्यातून त्या रहिवाशांना वाहतूक करता येणं शक्य होत होतं.

मी एक प्रचंड पांढऱ्या पक्ष्यांचा थवा बघितला त्यांच्या पंखांच्या हालचालीवरून मी ते पक्षी ' स्पून बील ' आहेत हे तात्काळ ओळखलं आपल्याकडं हिवाळ्यात या ' चमच ' पक्ष्यांचे थवे येतात हा मोठ्या बगळ्यासारखा दिसणारा पक्षी, बदकाच्या जातीतला असून त्याच्या वीतभर लांब चोचीला पुढं चमच्यासारखा आकार असतो, म्हणून त्याला ' चमच ' म्हणतात.

बघता बघता तो थवा उंच आकाशात तरळत दिसेनासा झाला. अधून-मधून जंगली बदकांचे थवे भिरभिरत आमच्या बसवरून उडत गेले. दलदलीचा प्रदेश हा ' ॲक्वियस ' प्राण्यांना अतिशय प्यारा असतो खायला वीडस्, निरनिराळ्या प्रकारच्या गवतांच्या बिया, कीटक असा आहार, शिवाय दलदलीत ' मनुष्य ' प्राण्याचे भय कमी. तेव्हा अंडी उबवण्याला पक्ष्यांना हे स्थान आदर्श असे असते. इथला ' स्नाईप ' ( पाणलावा ) हा पक्षीसुद्धा आपल्याकडं येतो त्या स्नाईपपेक्षा दुप्पट–तिप्पट मोठा असतो. या दलदलीच्या प्रदेशात तुरळक घरे सोडली तर, वस्ती बिलकूल नव्हती

तो प्रदेश ओलांडून बस न्यू आर्लीन्सच्या परिसरात आली तेव्हा पांढऱ्या आणि लाल कणेरीच्या झाडांचे बहरलेले प्रचंड ताटवे दिसू लागले.

रस्त्याच्या दुतर्फा फुललेल्या कणेरीचा गंध जाणवत होता

न्यू ऑर्लीन्स शहरात प्रवेश करताना उंच थडगी असलेली 'सीमेट्री' (दफनभूमी) दिसली. आपल्याकडं खेडोपाडी असतात तशी मारुतीच्या देवळासारखी उंच आणि प्रशस्त अशी थडगी पाहून आश्चर्य वाटलं. युरोपात आणि न्यूयॉर्क, नायगारा, शिकागो या शहरांच्या परिसरात ठिकठिकाणी दफनभूमी दिसल्या होत्या पण अशी खास देवळासारखी ठेवण असलेली दफनभूमी मी प्रथमच पाहात होतो.

बसच्या ड्रायव्हरला आमचे हॉटेल काही केल्या सापडेना. त्यानं एकाच रस्त्यानं तीन वेळा बस नेली आणि परत आणली. शेवटी मेहेरनोश पटेल उतरून चौकशी करून आला आणि मग आमची बस ओळीनं पामची झाडं असलेल्या रस्त्यालगतच्या Vieux CARRE अशी अक्षरं असलेल्या हॉटेलसमोर येऊन थांबली. याच हॉटेलात आमचं रिझर्वेशन करण्यात आलं होतं

आम्हाला माडीवरची खोली मिळाली होती. खोलीत गेल्या गेल्या मी मागच्या बाजूच्या काचेच्या खिडकीचा पडदा बाजूला केला, आणि समोर सुरेख असा स्वीमिंग टँक दिसला. क्षणाचाही विलंब न लावता मी पोहायचे कपडे घातले आणि खाली उतरलो.

'व्हिक्स कॅरे' हे हॉटेल होतं तसं जुनाटच. पण आतली व्यवस्था मात्र सुरेख होती. सुबक फर्निचर, प्रशस्त बेड, स्वच्छ बाथरूम, टॉयलेट. दोन-दोनशे खोल्यांची हॉटेलं युरोपात आणि अमेरिकेत बघितली. कधी कधी हजार खोल्यांची सुद्धा. पण कुठेही घाण. गोंदल-धावपळ आणि आरडा-ओरडा नाही. इकडे आम्हाला – 'अरे बामन्या, आठ नंबरमध्ये इडली डोसा नेऊन दे. बारा नंबरमधली चादर खराब आहे ती बदलून टाक!' अशी ऑर्डर सोडत मलमलीचा बदाम घातलेला ढेरपोट्या 'पासिंजरांच्या' सोयीकडं खास लक्ष देणारा मालक बघण्याची सवय झालेली! खरं म्हणजे हॉटेलमध्ये मुक्कामाला येणाऱ्यांना 'पासिंजर' का म्हणतात तेच समजत नाही. हॉटेलात उतरतो म्हणजे तो 'उतारू' नव्हे. पण हॉटेलात मुक्कामाला राहणाऱ्या 'लॉजर्सना' सर्रास 'पासिंजर' म्हणूनच संबोधलं जातं

शिवाय आपल्याकडं स्वच्छता हा प्रकारच नाही. प्रत्येक खोलीला अटॅच बाथ आणि टॉयलेट असणे आपल्याकडं 'लक्झरी' समजलं जातं. पण काही मोठी हॉटेल्स सोडली तर, सार्वजनिक संडास आणि बाथरूम यांवर जर लिहायचं म्हटलं, तर तो एक स्वतंत्र ग्रंथच होईल.

'व्हिक्स कॅरे' हॉटेल अत्यंत स्वच्छ आणि नेटकं होतं. विशेष म्हणजे या हॉटेलात कर्मचारी एकजात सर्व स्त्रिया होत्या. मॅनेजरपासून ते रूम अटेंडंटपर्यंत. पण या बायका आपसात चर्चा करत नव्हत्या 'मॅगी नांदायला गेली का ? जेनीला आता कितवा महिना आहे ?' आपआपल्या कामात त्या गर्क असत

न्यू ऑर्लीन्स हे शहर अमेरिकेचे अगदी 'टिपिकल' असं शहर आहे. वसाहतीच्या काळात इथं स्पॅनिश आणि फ्रेंच संस्कृती एकत्र आलेली आहे. या संस्कृतीला 'क्रिअल कल्चर' असं संबोधलं जातं या संस्कृतीच्या लोकांना स्पॅनिश आणि फ्रेंच दोन्ही संस्कृतींबद्दल अभिमान वाटतो. फ्रेंच आणि स्पॅनिश संस्कृतीचा ठसा साऱ्या नगरावर उमटलेला दिसतो. छोटी, टुमदार, पांढरी, पिवळी रंगवलेली घरं, घरासमोर बगीचा सगळं कसं स्वच्छ, चित्रातल्यासारखं नीटनेटकं त्या देवळासारख्या थडग्यांचाही भ्रमंती करताना खुलासा झाला. न्यू ऑर्लिन्स हे शहर 'पाँटचार्ट्रेन' सरोवराच्या काठी वसलेलं असून ते तलावातील पाण्याच्या सपाटीपेक्षा सखल भागात वसलेलं आहे त्यामुळं सरोवरात वादळ झालं आणि लाटा उसळल्या की, सारं शहर जलमय होत असे. म्हणून प्रचंड महा पंपिंग स्टेशन्स गावच्या निरनिराळ्या भागांत उभी करण्यात आलेली आहेत. तलावाला घातलेल्या मर्यादा ओलांडून आत येणारं पाणी, प्रथम कालव्यात येतं आणि त्या कालव्याच्या काठीच विविध स्थळी, ही पंपिंग स्टेशन्स उभी करण्यात आली आहेत. उंच थडगी करण्याचं कारण सुद्धा तेच. थडग्यात तीन कप्पे करतात, मृत झालेल्या व्यक्तीला वरच्या कप्प्यात ठेवायचे. कालांतराने फक्त हाडे शिल्लक राहतात. त्याच घरातला दुसरा माणूस जेव्हा जातो, तेव्हा वरच्या कप्प्यातील हाडे काढून मधल्या कप्प्यात ठेवायची अशा तऱ्हेनं मृत व्यक्तीचे शरीर वा हाडे सरोवराच्या पाण्यात बुडू नयेत म्हणून ती थडग्यांची उंची वाढवलेली होती. आताशी अमेरिकेत जागेचा अभाव आणि मृत्यूनंतर

होणारं अस्थिचं स्थलांतर टाळण्यासाठी बरेच जण मृत्युपत्रांत विद्युत्दाहिनीत आपले शरीर दहन करावे असे लिहून ठेवतात. ते ऐकल्यावर वाटले, ' ज्यावेळी भारतात विपुल मोकळी भूमी होती तेव्हा सुद्धा आमचे पूर्वज दहनच करायचे. किती स्वच्छ आणि साधी पद्धत.

न्यू ऑर्लीन्सचं खास वैशिष्टय म्हणजे हे गाव बरंचसं रंगेल आहे. इथं गल्लोगल्ली म्यूझिक आणि डान्सींगचे वर्ग आहेत. गावात मध्यभागी एक वस्ती आहे तिथं कॅब्रे ' सतत चाललेला असतो कॅबेरे करणाऱ्या पोरी अत्यंत देखण्या असतात आणि त्या अत्यंत तोकडं वस्त्र वापरतात. शिवाय ब्ल्यू फिल्म्सचे अड्डे जागोजागी आहेत. या भागात मी एकटाच खिशात वीस पंचवीस डॉलर्स टाकून गेलो बायको आणि मुलगा यांच्यासमवेत ही ' ऐतिहासिक ' स्थळं पाहण्याची सोय नव्हती. कॅब्रे याचा उच्चार काही जण कॅब्रेट असाही करतात. तो पाहायला तीन डॉलर्स तिकीट पडले. आत गेलो एक पेग फुकट व्हिस्की आणून देण्यात आली व्हिस्की आणणाऱ्या पोरीसुद्धा अफलातून होत्या. त्यांच्याही अंगावर नाममात्र वस्त्र होतं परदेशात जायचं तर तिथलं अंतर्बाह्य हे जीवन अवलोकन करायला हवं ! निदान लेखकानं तरी !

त्या डान्सिंग हॉलमध्ये बारीक झुरणारे दिवे होते. बाजूला क्लॅरिओनेट गिटार आणि व्हायोलीनमधून मादक सूर बाहेर पडत होते आणि त्या सुरांच्या तालावर एकोणीस–वीस वर्षांची एक स्लिम् ' पण अतिशय आकर्षक अशी गौरांगना उन्मादक असे हावभाव करीत नाचत होती. सुरुवातीला मुळातच तिच्या अंगावर तोकडी वस्त्रं होती. नाचता नाचता तीही तीनं काढून फेकून दिली. तिची प्रत्येक हालचाल कामोत्तेजक होती. पण तिथं बघायला जमलेल्यांच्या नजरा निर्जीव झाल्यासारख्या भासल्या. कोणीही प्रेक्षक कसलाही प्रतिसाद देत नव्हता वा तोंडाने उल्लू झाल्यासारखे उद्गार काढत नव्हता. खरं तर, युरोप–अमेरिकेत तलाव, सरोवरे, समुद्र–किनारा अशा ठिकाणी हजारो तोकडी वस्त्रं ल्यालेल्या बाया–पोरी बघितल्यामुळे माझीही नजर थोडीशी बोथट अन् बधिर झाली होती.

व्हिस्कीचा दुसरा पेग संपताच मी उठलो आणि चालू लागलो पलीकडच्या मोहल्ल्यात ' ब्ल्यू फिल्म ' पाहायची होती. एका मोठ्या

हॉलमध्ये लहान–लहान स्टॉल्स् होते. त्यामध्ये जाऊन उभं रहायचं आणि हातातलं पन्नास सेंटचं नाणं समोरच्या यंत्रात टाकलं की, तीन बाय दोन फूड पड्यावर चलत्‌चित्र सुरू व्हायचे. ते पाहायला केवळ पुरुषच येत होते असे नाही, तर पंधरा–सोळा वर्षांच्या पोरींच्यापासून ते साठ वर्षांच्या म्हाताऱ्या बायकासुद्धा आलेल्या होत्या मी यापूर्वी ब्ल्यू फिल्मबद्दल ऐकले होते. पण प्रत्यक्ष तो प्रकार काय असतो हे बघितलेलं नव्हतं. पॅरिसमध्येही मी सेक्स–शो बघायला गेलो नव्हतो. इथं न्यू ऑर्लीन्समध्येही सेक्स शो होता, पण तो पाहावा असं वाटलं नाही 'ब्ल्यू फिल्म, पोर्नोग्राफीक लिटरेचर' यावर जितकी बंदी घालावी तितकं ते जास्त बोकाळतं यापेक्षा कोणाला काय पाहायचं अन् वाचायचं आहे, ते खुश्शाल पाहू द्या आणि वाचू द्या असं स्वातंत्र्य दिलं की, कोणी फारसं त्या वाटेला जात नसतो. अन् समजा, गेलेच तर, त्यामुळे अगदी हाहाकार झाला आहे अशी हाकाटी करण्याचेही कारण नाही. भारतीय चित्रपटांत चुंबनास घातलेली बंदी ही सुद्धा वारंवार माझ्या मनाला खटकणारी गोष्ट आहे. हिंदी चित्रपटात प्रियकर अन् प्रेयसी यांनी साऱ्या चित्रपटभर एकसारखं अंगचटीला येऊन धुमाकूळ घालायचा, बिभत्स हावभाव करायचे त्यापेक्षा कथानकातल्या प्रसंगाला योग्य अशा ठिकाणी एखादे हिरोने हिरॉईनचे चुंबन घेतले, तर अधिक शोभून दिसेल. शिवाय यामुळं उदयोन्मुख नटचा परदेशी पाहुण्यांचं अचानक चुंबन घेण्याचं साहसही करणार नाहीत.

याच भागात एक आर्टिस्ट, समोर बसलेल्या माणसाचं पोर्ट्रेट काढत होता क्रेऑनच्या काड्यांनी केलेलं ते पोर्ट्रेट खरोखर अतिशय सुरेख होतं साठ वर्षांचा, पांढऱ्या दाढीमिशांचा, मेक्सिकन हॅट घातलेला गृहस्थ समोर बसला होता, त्याचं हुबेहूब चित्र त्या कलावंतानं साकार केलं होतं तशीच त्यानं काढलेली दहा–बारा चित्रं ओळीनं मांडून ठेवलेली होती. त्याला पाहताच पॅरिसमधल्या त्या आर्टिस्ट लेनची आठवण झाली. पुढची आळी होती न्यू ऑर्लीन्सचा 'फोरास रोड.' तिकडं मात्र फिरकायचं धाडस झालं नाही

न्यू ऑर्लीन्स शहरात मोठ-मोठी डिपार्टमेंटल स्टोअर्स होती. मेक्सिकन्, चायनीज आणि युरोपिअन पद्धतीचं जेवण बनवणारी हॉटेल्सही होती

दुसऱ्या दिवशी सकाळी आम्ही मिसीसीपी हार्बर पाहायला गेलो न्यू ऑर्लीन्सच्या दक्षिणेला मिसीसीपी नदीचं विशाल असं पात्र आहे. त्या नदीचं केवळ पात्रच विशाल आहे असं नाही, तर नदीची खोलीही प्रचंड आहे. मोठमोठ्या बोटी आणि ट्रॉलर्स यांची नदीतून एकसारखी ये–जा सुरू होती. दूर पश्चिमेला या कडेपासून त्या कडेला जाणारा प्रचंड लोखंडी पूल दिसत होता. लहानपणी भूगोलाचा अभ्यास करताना मिसुरी, मिसीसीपी आणि अमेझॉन या अमेरिकेतल्या नद्यांची फक्त तोंडओळख झाली होती. त्यांपैकी मिसीसीपी आज प्रत्यक्षात पाहायला मिळाली होती

न्यू ऑर्लीन्सला फळांची प्रचंड अशी बाजारपेठ आहे. त्या ठिकाणी सकाळी बाजार भरतो तिथली लक्षात राहिली ती 'वॉटर मेलन्स' – कलींगड एक एक कलिंगडं सोलापुरी घागरीएवढं प्रचंड टरबूजं आणि कलींगडं अमेरिकेत फार आवडीनं खाल्ली जातात.

न्यू ऑर्लीन्सचा 'गम्बो' सूप मात्र चाखायला मिळाला नाही. तिथल्या 'क्रिअल कल्चर'चं ते खास वैशिष्ट्य असं मानलं जातं. खरं म्हणजे, प्रत्येक गावची जवळून ओळख व्हायला निदान आठ-आठ दिवस तरी तिथं राहायला हवं, पण दोन महिन्यांच्या अवधीत युरोप आणि अमेरिका पाहायची म्हटल्यावर इतका वेळ एकेका शहरात राहणं कसं शक्य आहे ?

न्यू ऑर्लीन्स सोडल्यानंतर जगातला सर्वांत मोठा खाडीवर उभा राहिलेला पूल पाहायला मिळाला चोवीस मैलांचा हा प्रचंड पूल म्हणजे आधुनिक स्थापत्यशास्त्राचा सर्वोत्कृष्ट असा नमुना म्हणावा लागेल. जायचा पूल स्वतंत्र आणि यायचाही स्वतंत्र. चोवीस मैलांच्या या पुलापूर्वी न्यू ऑर्लीन्सला देशातील इतर भागांशी दळणवळण ठेवणे कठीण जात होते. पण या पुलाच्या उभारणीने ती समस्या दूर झाली. न्यू ऑर्लीन्सला येतानासुद्धा दलदलीच्या प्रदेशावर पूल होताच. पण तो इतका मोठा नव्हता. तो फक्त सहा–सात मैलांचा होता या खाडीच्या पुलाचं दुसरं वैशिष्ट्य म्हणजे, इथं ठाण्याच्या खाडीवर गाड्यांना अडवून जकात गोळा केली जाते, तशी केली जात नव्हती. मात्र अमेरिकेत एका स्टेटमधून दुसऱ्या स्टेटमध्ये प्रवेश करताना नाममात्र जकात घेतली जाते. या जकातीचं वैशिष्ट्य म्हणजे तुमच्याजवळ बरोबर मोड (Exact Change) असेल तर, ती

तुम्ही नाक्यावरच्या जाळीत टाकायची. ती नाणी ते यंत्र स्वीकारते अन् तात्काळ बरोबर आहे की नाही हे मोजते व समोरचा आडवा अडसर तात्काळ वर जातो. त्यात एक सेंट जरी खोटा असला तरी अडसर वर जात नाही. मी एकदा आमच्या ड्रायव्हरला म्हणालो,

'समजा, त्या मशीनमध्ये काही बिघाड झालाच तर आणि पैसे मोजायला गल्लत झाली तर, एखाद्या वाहनाला निष्कारण अडकून पडावे लागेल.'

त्यावर तो क्षणाचाही विलंब न लावता उद्गारला. ' Man may commit mistake but the machine never. '

वाटेत काही ठिकाणी दहा-वीस डॉलर्सच्या नोटांची मोड मिळणारी यंत्रंही बघितली. या यंत्रात नोट सरकवली आणि तीत काही दोष असेल तर, ते यंत्र ती नोट फटकन् तुमच्याकडे बाहेर फेकून देते पण नोट बरोबर असली तर, खालच्या कप्प्यात खळकन् नेमकी मोड पडते. यंत्राच्या आश्चर्यकारक अशा कितीतरी किमया मला अनुभवायला मिळाल्या. वॉशिंग्टनइथल्या रेल्वे स्टेशनवर उमेश पोष्टातून तिकिटे घेण्यासाठी क्यू मध्ये उभा होते. मी सहज बाजूच्या वजन करतात तसल्या यंत्राजवळ आलो.

त्या यंत्रात एकसारखे शब्द उमटत होते : ' तुम्हाला इतिहासाची आवड आहे का ? असल्यास कोणत्या कालावधीची ? त्या कालावधीत निर्माण झालेल्या व्यक्तीपैकी आपल्याला कोणाच्या जीवनाबद्दल आस्था आहे ?'

मग आपण आपल्याला हवा असलेला कालावधी त्या यंत्राची ठरावीक बटनं प्रेस करुन व्यक्त करायचा. आजपर्यंत अमेरिकेत जन्मलेल्या मुत्सद्द्यांची, योध्यांची आणि राजकारणी पुरुषांची नामावली तात्काळ उमटत असे मग आपण खरोखरच इतिहासाचे अभ्यासक असलो तर, जॉर्ज वॉशिंग्टन, अब्राहम लिंकन किंवा वुड्रो विल्सन, यांपैकी एखाद्याची माहिती विचारावी म्हणून बटन दाबले अन् तो मुत्सद्दी किंवा नेता त्या कालावधीत निर्माण झालेला नसेल, तर ते यंत्र तात्काळ तुम्हाला सूचना देतं की, ' आपलं काहीतरी चुकतं आहे. आपण म्हणता तो नेता या कालावधीत जन्मलेला नाही. आठवून पाहा. '

आपलं इतिहासाचं ज्ञान जर अर्धवट असेल आणि या यंत्रानं अशी सूचना

केली, तर ताडकन् थोबाडात मारल्यासारखे होते. खरोखरच ते यंत्र आहे का आत एक बुद्धिमान माणूस बसला आहे अशी एखाद्यानं शंका घ्यावी, असा चमत्कार मला वॉशिंग्टन रेल्वे स्टेशनवर पाहायला मिळाला

न्यू ऑर्लीन्स सोडल्यानंतर दुपारी चारच्या सुमारास 'तलहासी' या गावी पोहोचलो. मला 'तलहासी' या गावावरून आमच्या राधानगरी तालुक्यातले 'तळाशी' गाव आठवले. शिवाय तळाशीकर नावाचे एक स्वभावानं अतिशय कडक असे जज्ज न्याय खात्यात होते, तेही आठवले. 'तलहासी' या गावी प्रेक्षणीय असं काहीच नव्हतं न्यू ऑर्लीन्सवरून आम्हाला 'ओरलँडो' या दोन गावांतलं अंतर एका टप्प्यात तोडता येणं शक्य नव्हतं. म्हणून वाटेत एक मुक्काम करणं भाग पडलं होतं.

तलहासीला आम्ही चारच्या सुमारास पोहोचलो तेव्हा हॉटेलचा मॅनेजर आमच्या स्वागताला पुढे आला. मेहेरनोश पटेलला त्यानं प्रवास कसा काय झाला, काही त्रासबिस झाला नाही ना, असे औपचारिक प्रश्न विचारले. नंतर आम्ही आमच्या बॅगा घेऊन रिसेप्शन हॉलमध्ये आलो तेव्हा तिथं जांभळ्या रंगाचं कोकमसारखं आंबट-गोड असं सरबत करून एका मोठ्या काचेच्या बरणीत भरून ठेवलं होतं. त्या बरणीला तोटी होती अन् बाजूला चाळीस ग्लास मोजून ठेवले होते. तिथंही छावडा, आणि लोखंडी मालाचा दुकानदार दोघे पुढं सरसावले त्या दोघांनी चार-चार ग्लास सरबत ढोसलं. ते सर्वांच्यासाठी बनवलेलं आहे याचा त्या मूर्खांनी विचारसुद्धा केला नाही. आपल्या देशाची प्रतिमा खाली जाईल असं कोणतंही वर्तन तुमच्या हातून घडू नये असं टी. सी आय. च्या अधिकाऱ्यानं कुलाब्याला हॉटेल 'फरियाझ' इथं सांगितलं होतं, पण या लोकांना त्याचं प्रवासात अनेक ठिकाणी विस्मरण झालं होतं. विकतचं काही घेताना ही दुक्कल नेहमीच हात आखडता घेई, पण फुकटचं काही खायला मिळालं की देहभान विसरून त्या खाद्यपदार्थांवर तुटून पडत. त्यात आणखीन एक प्रवासी इतका कद्रू होता की, तो विकत घेऊन खायची वेळ आली की, बटाटे वेफर्स आणि एक सफरचंद यावर आपली लंच भागवत असे. पण युरोपात जिथं ब्रेकफास्ट मोफत होता, तिथं तो सकाळी अक्षरशः उंटासारखा चरायचा. दिवसभरात सहप्रवाशांनी आणलेले शेंगदाणे, फुटाणे चरायचा. काही नाहीच मिळालं तर एखादा

कोकाकोला पिऊन दिवस काढायचा ! तो इतका कंजूष होता की, त्याने स्टेट बँकेनं प्रत्येक प्रवाशाला दोनशे डॉलर्स खर्चासाठी दिले होते, त्यांतले शंभर डॉलर्स दुसऱ्या प्रवाशाला विकले. म्हणजे फ्रान्स, जर्मनी, स्वित्झर्लंड, हॉलंड, बेल्जियम आणि इंग्लंड हा पाच युरोपीय देशांचा दौरा आणि अमेरिकेचा पूर्वकिनारा पाहून तिथं एक महिना राहून या गृहस्थानं शंभर डॉलर्स वाचवले आणि ते रुपयाच्या किंमतीत बाजारभावापेक्षा अधिक पैसे घेऊन विकले. शेवटी व्यापारी वृत्तीचा माणूस परदेश प्रवासाला जरी बाहेर पडला, तरी त्याचा कद्रूपणा तो विसरू शकत नाही हेच खरे !

तलहासीला आम्ही हॉटेलात आमचे सामान लावले आणि पोहायला खाली गेलो. त्यावेळी आमचे सोलापूरचे मित्र डॉ. चव्हाण, पुण्याचे कॉंट्रॅक्टर श्री. मेढी हेही सोबत आले आम्ही पाण्यात उतरलो पण डॉक्टर चव्हाण एका मध्यमवयीन बाईला विचारते झाले, ' इज इट नेसेसरी टू टेक बाथ बिफोर स्विमिंग. इन धिस टँक ?'

( या स्विमिंग टँकमध्ये पोहण्याअगोदर या बाहेरच्या नळावर आंघोळ करणं जरुरीचं आहे काय ?' )

मी पाण्यातूनच ओरडलो, ' डॉक्टर, उगाच खाजवून खरूज कशाला काढता ? सरळ पोहायचे, दोन हात मारायचे आणि बाहेर निघायचं !'

' अहो पण, नियमभंग व्हायला नको !'

डॉक्टर पाण्याच्या काठावर येऊन बसत म्हणाले, तेव्हा मी खवचटपणानं म्हणालो, ' नियमबियम तुम्ही काही मानत नाही. काहीतरी कारण काढून तुम्हाला त्या बाईशी बोलायचे होते झालं. आता मी सोलापुरी आलो की, वहिनींना सर्व काही सांगणार आहे. तुम्ही या प्रवासात काय काय पाहायला जात होता अन् काय काय खात-पित होता ते !'

डॉक्टर हसत हसत पाण्यात उतरले पण लगेच वरून कोणीतरी सांगत आले की, हॉटेलमध्ये टी व्ही. वर 'विम्बल्डन टेनिसची' मॅच लागली आहे डॉक्टर चव्हाण टेनिसचे शौकिन. त्यामुळं त्यांनी पोहणं अर्ध्यात सोडलं आणि घाईघाईनं अंग कोरडे केले, कपडे चढवले आणि मॅच पाहायला निघून गेले.

ते नंतर भेटल्यावर मी पुन्हा टारगटपणा केला. म्हणालो, ' मघाशी तुम्ही ज्या बाईशी बोललात ती पुन्हा तुम्हाला शोधायला आली होती. मला

त्या ' हॅण्डसम इंडियन ' माणसाशी जरा खासगी बोलायचंय म्हणत होती ! '

डॉक्टरनी हसत हसत कपाळाला हात लावला. या प्रवासात डॉ. होशिंग पती–पत्नीही होते त्या दोघांचीही मी अधूनमधून फिरकी घेत होतो. लीला वहिनींच्यासमोर मी डॉक्टरना म्हणत असे, ' काय डॉक्टर, न्यू ऑर्लीन्समध्ये त्या गल्लीत काय काय चाळे केले ते सांगू का वहिनींना ?'

पण एव्हाना लीला वहिनींनासुद्धा मी कसा आहे याची कल्पना आली होती वहिनीही तयारीच्या होत्या. त्या म्हणत, ' हे कसे आहेत ते मला पूर्ण ठाऊक आहे. ते इथे रमतील म्हणूनच मी सोबत आले आहे. '

या प्रवासात डॉ. होशिंग पती–पत्नी, डॉ. चव्हाण, मेढी अशी महाराष्ट्रीयन मंडळी होती म्हणून जरा बरं वाटत असे. गप्पासप्पा होत होत्या. आमच्या माई व होशिंग वहिनी या दोघींची प्रवासात चांगलीच गट्टी जमली.

तल्हासीला पोहून वर आलो आणि मस्तपैकी एक स्कॉचचा पेग ग्लासात ओतला उमेशना खालून स्नॅक्स् आणायला पाठवलं. मला अमेरिकेत ड्रिंक्स घेताना. माझी आवडीची ' भडंग ' हवी होती असं सारखं वाटायचं. तिथं मक्याचे ' पॉपकॉर्न ' मिळायचे, पण ते अगदीच अळणी. लाल तिखट घातलेली, जिरे–मोहरीची फोडणी दिलेली आणि सरबरीत भाजलेले शेंगदाणे असलेली भडंग ' ड्रिंक सोबत ज्यांनी खाल्ली नसेल, ते एका फार मोठ्या सुखाला मुकले आहेत असं मला वाटतं.

मी जेमतेम अर्धा ग्लास संपवला असेल नसेल तोच, हॉटेलात बसवलेला धोक्याचा भोंगा वाजू लागला. आग लागल्यानंतर वाजणारा हा भोंगा ऐकताच माई गडबडीनं उठून बाहेर आल्या. मीही त्यांच्या पाठोपाठ बाहेर गेलो. प्रवाशांची धावपळ सुरू होती. जो तो आपलं मौल्यवान सामान घेऊन जिन्यावरून खाली धावत होता. धोक्याच्यावेळी लिफ्ट वापरू नये अशा सूचना प्रत्येक हॉटेलमध्ये लिहिलेल्या होत्या. माईंनी ती धावपळ बघितली आणि त्या मला म्हणाल्या, ' अहो, मूखस्तंभासारखे बघता आहात काय ? चला खाली अगोदर ! '

' हा आलोच, तुम्ही व्हा पुढे ! ' असं म्हणून मी आत गेलो. टेबलावरचा अर्धा व्हिस्कीचा ग्लास एका दमात संपवला. अॅश-ट्रेवर ठेवलेली सिगारेट

तोंडात धरली. आणि शांत चित्ताने बाहेर कॉरीडॉरमध्ये आलो. अजूनही बाहेर धांदल अन् धावपळ सुरू होतीच.

जिना उतरून खाली आलो अन् काय ? भोंगा वाजायचा बंद झाला होता. मॅनेजर दिलगिरीच्या स्वरात म्हणाला, 'आय एम व्हेरी सॉरी. देअर वॉज नो फायर. आवर एंप्लॉयी हॅड पुट ऑन ए राँग बटन.'

तेव्हा कुठं सर्वांचा जीव भांड्यात पडला. हॉटेलातल्या नोकरानं चुकून धोक्याचा इशारा देणारं बटन दाबलं होतं अन् त्यामुळं सारा घोटाळा झाला होता. आम्ही खोलीत परतलो तेव्हा, माई आश्चर्यानं म्हणाल्या, 'अग बाई, मघाशी तुमचा ग्लास अर्धा भरलेला होता तो कसा मोकळा झाला ?'

मी शांत चित्ताने म्हणालो, 'मीच तो रिता करून बाहेर पडलो होतो. म्हटलं, आगीचा डोंब उसळला असला आणि खाली उतरायची संधीच मिळाली नाही, तर पृथ्वीतलावर अर्धा ग्लास ठेवून परलोकवासी झालो असं व्हायला नको !

'असं काय अभद्र बोलता हे ?'

'यात अभद्र काय झालं ? समजा, मघाशी खरोखरच आगीचा डोंब उसळला असता आणि मला खाली उतरता आलंच नसतं तर पृथ्वीतलावर काही करायचं अर्धवट सोडून माणूस गेला असं होऊ नये !'

मी काही पट्टीचा मद्यपी नव्हे, पण जेव्हा घेतो तेव्हा, कै पु. भा. भाव्यांच्या शब्दात सांगायचेच झाले तर, 'आनंद' करायच्या हेतूनं घेतो, ते सुद्धा अगदी माफक. एक किंवा दोन ड्रिंक्स् अन् ते सुद्धा सिलेक्टेड ब्रँडचे ! सिगारेटस्‌ही ओढतो, पण त्यासुद्धा दिवसातून दोन किंवा तीन ! पण मी सिगारेट ओढतो हे अद्याप कित्येकांना ठाऊक नाही. सार्वजनिक ठिकाणी मी सिगारेट कधीच ओढत नाही. खरं तर मला धुम्रपानात कसली गोडी असते हे कधीच समजलेलं नाही. पण पृथ्वीतलावर माणसानं ज्याला सुख मानलं आहे अशी एकही गोष्ट मृत्यूपूर्वी करायची बाकी राहू नये अशी आपली माझी प्रामाणिक समजूत आहे.

वर आल्यानंतर दुसरा पेग भरला. उमेश खालच्या हॉटेलातून स्नॅक्स् घेऊन आले, पण त्याचबरोबर आपल्या मातोश्रींना आवडणारा आणखीन्

एक पदार्थ घेऊन आले. पिझ्झा ! आमच्या माई गेल्या जन्मी बहुधा युरोप किंवा अमेरिकेतच जन्मलेल्या असाव्यात. त्यांना हॅम्बर्गर, हॉट डॉग्ज, पिझ्झा हे सारे पदार्थ भारी आवडतात. फक्त त्यांना एकच खंत वाटे, 'त्या पदार्थावर पसरण्यासाठी लाल मिरच्यांची चटणी आणायची विसरली.'

तलहासीचा निरोप घेऊन दुसऱ्या दिवशी सकाळी निघालो. हवा अतिशय सुरेख होती. निळंभोर आकाश, हवेत किंचित् सुखद गारवा, रस्त्याच्या दुतर्फा फुटपट्टीनं मरळ मोजावीत अशी पाईनची उंचच्या उंच झाडं, अधून मधून चकाकणारे शुभ्र पाण्याचे जलाशय. मध्येच दुतर्फा गवताळ कुरण लागायचं. त्या कुरणात चरणाऱ्या पुष्ठ अशा होस्टन आणि जर्सी गाई–बैलांचे कळप. पण ही जनावरं कधीही आपली हद्द सोडून रस्त्यावर येत नसत. कधी कधी त्यांनी आपली मर्यादा सोडू नये यासाठी एखादी रंगीत रिबन लाकडी डांबाला बांधलेली असे, पण एकाही प्राण्यानं घालून दिलेली मर्यादा ओलांडल्याचं दिसलं नाही. इकडे पूणा-बेंगलोर रोडवर तुम्ही मुंबईहून बेंगलोरला निघालात तर, कमीत कमी आठ ते दहा म्हैशी तुम्हाला आडव्या गेल्या नाहीत तर मी शंभर रुपये बक्षीस देईन रस्त्यावर आडव्या जाणाऱ्या म्हैशींना मी गमतीनं आर. टी. ओ म्हणतो

तलहासीवरून ऑरलँडोला येऊन पोहोचलो तेव्हा दुपारचे दोन वाजले होते. ऑरलँडो हे फ्लोरिडा स्टेटमधलं प्रख्यात गाव. या गावाची दोन वैशिष्ट्ये जगप्रसिद्ध आहेत. पहिलं म्हणजे मरीन लँड आणि दुसरं डिस्ने लँड !

ऑरलँडोच्या 'क्वालिटी इन्' या अलिशान हॉटेलात तळमजल्यावर खोली मिळाली होती. हवा थोडी गरम होती, पण हॉटेल सभोवताली दाट अशी हिरवळ होती अमेरिकन लोकांचा एक मोठा गुण मला या प्रवासात दिसला आणि तो म्हणजे, हे लोक निसर्गावर जिवापाड प्रेम करतात. रस्त्याने जाताना मैलच्या मैल पाईन आणि ओकची झाडे दिसत होती. कित्येक झाडं वाळून जशीच्या तशीच उभी होती, पण कोणी त्यावर कुऱ्हाड चालवत असल्याचा एकही प्रसंग दिसला नव्हता.

मी आंबा घाटात कधी कधी खांद्यावर बंदूक टाकून एकटाच हिंडतो

त्यावेळी जंगलात चोर–तोड करणारे कितीतरी लोक मी पिटाळून लावले आहेत. माझ्या एकट्याच्या प्रयत्नानं ही जंगलतोड थांबणार आहे थोडीच ? आंबा गेस्ट हाऊसच्या मागे सकाळीच एकजण भली मोठी हिवराची फांदी तोडत होता. नेमका त्यावेळी फॉरेस्ट डिपार्टमेंटचा एक बीट गार्ड काही कामासाठी माझ्याकडं आला होता. तेव्हा मी त्याला म्हणालो,

‘ हे काय चाललंय मागे ऐकलंस का ?’

‘ हो, ऐकलं की साहेब !’ निर्विकारपणे तो उद्गारला,

‘ मग ही चोरतोड थांबवता नाही येणार ?’

‘ त्याचं काय आहे साहेब, समजा, आता मी जाऊन त्याची कुऱ्हाड काढून घेतली तर तो थांबेल. पण लगेच उद्या दुसरी कुऱ्हाड पैदा करून दुसरीकडं जाऊन तोडायला सुरुवात करील !’

‘ अरे पण, त्यांच्यावर खटला का नाही भरत ?’

तो बीट गार्ड हात चोळत म्हणाला, ‘ साहेब, या लोकांचं पोटाचं दुसरं काहीच साधन नाही. जंगलचा लाकुडफाटा तोडून विकला तरच संध्याकाळी यांची चूल पेटते आम्ही केसेस घालून बघितल्या मलकापुरात. मोळ्या घेऊन येणाऱ्या बायका पकडल्या होत्या पण कोर्टानी त्यांना दोन–दोन रुपये दंड करून सोडून दिलं ’

‘ म्हणजे जंगलांची अशी सर्रास तोड होत असूनही तुम्ही लोक डोळ्यावर कातडं ओढून गप्प बसणार ?’

‘ साहेब, माणसंच जास्त पैदा झालीत ! काय करायचं ? खातील काय ?

शेवटी तो बीट गार्डसुद्धा माणसांच्या पैदासीचं कारण सांगून थांबला. पण त्याचं काय खोटं होतं ? वाढलेली जनता मोकळ्या जागेवर आक्रमण करणार, जंगलावर करणार, आणि शेवटी सगळे जिवंत राहण्याचे मार्ग संपले की, दिवसाढवळ्या शहरी माणसांवर हल्ला करून त्यांच्या मालकीचं जे काय असेल नसेल ते हिरावून घेणार या वाढत्या लोकसंख्येला पोसण्यासाठी कितीही धनधान्य निर्माण केलं तरी, अपुरंच पडणार आहे, म्हणून मी नेहमी म्हणतो ‘ दोन मुलं झाली की, सर्वांचं कुटुंबनियोजन हवंय–जात–पात आणि धर्म यांचा विचार न करता ! हे जर वेळीच घडलं नाही,

तर देशाचं काय होईल याचा अंदाजच करता येत नाही. आज मुंबईतला एकसुद्धा फुटपाथ स्वच्छ राहिलेला नाही. पुलाखाली आणि बाराबीत राहणारी ही व वळ करणारी माणसं निर्माण झालीच कशासाठी ? त्यांची या देशाला गरज होतीच का ? गलिच्छपणा सोबत अनाठाई लोकसंख्या आणखीन एक राक्षस निर्माण करून ठेवते– गुन्हेगारीचा ! आज मुंबईत, रात्री–अपरात्री स्त्रियांना फिरणं तरी धोक्याचं झालेलंच आहे पण एकट्या दुकट्या पुरुषालासुद्धा फिरणं कठीण झालंय ! तेव्हा ' युवर अटेन्शन प्लीज ! वुई आर हेडीग टुवर्डस् सेल्फ डिस्ट्रक्शन ' असं म्हणल्याखेरीज मला राहवत नाही.

त्याच दिवशी चारच्या सुमारास बसने मरीन लँडला गेलो. मरीन लँड ऑरलँडोपासून अर्ध्या तासाच्या वाटेवर आहे. या मरीन लँडमध्ये डॉल्फीन आणि सील माशांच्या कसरती पाहायला आम्ही गेलो. एका वेळी तीन ते चार हजार माणसं सहज मावतील असे मरीन स्टेडियम होते. खाली प्रचंड जलाशय. या जलाशयात सात आठ टन वजनाचा एक डॉल्फीन मासा होता. या माशाला केवळ माणसाळलेलंच नव्हतं, तर निरनिराळ्या कसरती आणि कवायती करायला शिकवलं होतं. लाल रंगाचा ड्रेस घातलेल्या मत्स्यशिक्षकानं बोलावल्या बोलावल्या तो प्रचंड डॉल्फीन काठावर आला. ' Shamu, now you will carry my friend on your back ' ( शामू, माझ्या मित्राला तुझ्या पाठीवरून फिरवून आण ! ) असा त्यानं शामूला म्हणजे त्या डॉल्फीनला आदेश दिला. त्या मत्स्यशिक्षकाचा सहकारी पोहण्याचे कपडे घालून उभा होता, तो काठावर आलेल्या डॉल्फीनच्या डोक्यावर पाय देऊन उभा राहिला शामूनं त्याला त्या प्रचंड जलाशयात या कडेपासून त्या कडेपर्यंत ( ३०० फूट ) फिरवून आणलं. त्यानंतर मत्स्यशिक्षकानं शामूला रॉकेटसारखं उड्डाण करून दाखव असा आदेश दिला मत्स्यशिक्षकाचा सहकारी पुन्हा पाण्यात उतरला. त्यानं शामूच्या पुढच्या कल्ल्यांना घट्ट पकडलं. शामू प्रथम खोल पाण्यात शिरला आणि नंतर एकदम प्रचंड वेगानं त्यानं पाण्यातून बाहेर सरळ उभी हवेत रॉकेटसारखी उडी घेतली, त्यावेळी मत्स्यशिक्षकाचा सहकारी शामूच्या कल्ल्यावर उभा होता पाण्यापासून वीस फूट उंचावर त्या प्रचंड माशानं

घेतलेली झेप पाहून आम्ही थक्क झालो. त्यानंतर शामू–डॉल्फीननं टांगलेल्या चेंडूला पाण्यातून वर उसळी घेऊन तोंड लावलं हा खेळ पाहायला बहुसंख्य मुलं येत. मुलांना नेहमीच भिजायला आवडतं असं म्हणून मत्स्य–शिक्षकानं शामूला आदेश दिला, ' शामू, तुला पाहायला बरेचशे बालमित्र जमले आहेत. त्यांची जरा गम्मत कर पाहू. ' असं त्या मत्स्यशिक्षकानं म्हणायचाच अवकाश, शामू मुलं बसली होती त्या कठड्याकडं गेला आणि इतक्या जोरात तो हवेत उसळून पाण्यात आदळला की सर्वत्र पाणी उडालं अन् कडेची पाच--पन्नास पोरं भिजून चिंब झाली. मग त्यांचे ते पोट धर–धरून हसणे सुरू झाले. शामूनं विविध प्रकारच्या सहासात कवायती केल्यानंतर तो दुसऱ्या जलकक्षात निघून गेला. त्यानंतर त्या जलाशयात सील माशांची जोडी सोडण्यात आली. या सील माशांनी तरी कहरच केला एका सील माशाने एक ते दहा इंग्रजी अंक तोंडानं म्हणून दाखवले. मत्स्यशिक्षकाचं चुंबन घेतलं. माणसं बॉलडॉन्स कसा करतात याचं विडंबन केलं, आणि नंतर तोंडाच्या टोकावर पांढरा फुटबॉल धरून तो दोरीच्या पलीकडं फेकला; पण तो पाण्यात पडण्याअगोदर दोरीच्या खालून पाण्यातून पलीकडं जाऊन पुन्हा तोंडाच्या टोकावर अलगद झेलला. तो खेळ बघायला जमलेल्या शेकडो लोकांनी टाळ्यांचा गजर केला. सर्कशीत विदूषक ज्याप्रमाणं चक्रमपणा करतात तसा तो सील मासा करत होता. एकदा त्यानं मत्स्यशिक्षकाची नजर दुसरीकडं आहे असं पाहून त्याच्या डाव्या हातातील बास्केटमधला मासा तोंडाने उचलला. मत्स्यशिक्षकाला तो स्पर्श जाणवला आणि तो ओरडला, ' या बास्केटमधला मासा कोणी उचलला ? तेव्हा त्या सील माशाने अप्रतिम असा अभिनय केला. तो जणू म्हणत होता, ' आपल्याला काही ठाऊक नाही बुवा ! '

आजपर्यंत सर्कशीत वाघ, सिंह, हत्ती, घोडे, माकडं यांच्या कसरती बघितल्या होत्या. पण जलचर प्राण्यांची ही कसरत आयुष्यात प्रथमच पाहत होतो. मासे खाल्ल्यावर मेंदू तल्लख होतो असं मी आजपर्यंत मत्स्यभक्षकांच्या तोंडून ऐकत होतो पण प्रत्यक्षात मत्स्यांचाच मेंदू इतका तल्लख असू शकतो याची प्रचीती तिथं आली. सील माशांनीसुद्धा अतिशय सुरेख अशा कसरती करून दाखवल्या. ' सील ' माशांना

सी-लायन असंही म्हणतात. सर्कशीत शिकवलेले सिंह कसरतीपेक्षा डरकाळ्याच अधिक फोडतात. रिंगमास्तर हातातल्या चावकानं त्याला फाडकन् मारल्याचा आविर्भाव करतो, तेव्हा तो कुठं एखाद्या स्टूलावर गुरगुरत चढून बसतो. वाघ, सिंह आणि त्यांच्यासमवेत एखादी शेळी. इकडून तिकडं फिरणारी ...बस्स ! या व्यतिरिक्त वाघ-सिंहांच्या कसरतीत त्यांनी माणसाला थक्क करून सोडणाऱ्या फारशा कवायती होत नसतात पण पाण्यातल्या या सिंहानं मात्र अफलातून अशा कसरती आणि कवायती करून दाखवल्या, आणि त्यासुद्धा कसल्याही प्रकारचे आढेवेढे न घेता ! डॉल्फीन आणि सील माशांचे खेळ पाहिल्यानंतर ' शार्क ' माशांची माहिती सांगणाऱ्या कक्षाकडं गेलो. एक सोळा-सतरा वर्षांची, सोनेरी केसांची पोरगी अगदी सुरेख अशा भाषेत ' शार्क ' माशांची माहिती सांगत होती. माहिती सांगता सांगता ती तळघरात घेऊन गेली तिथं काचेच्या प्रचंड हौदात तीस-पस्तीस किलोचे शार्क मासे संथपणे पोहत असलेले दिसले नंतर ती एका बोगद्यात घेऊन गेली. हा बारा फूट उंचीचा बोगदा संपूर्ण जाड अशा पारदर्शक काचेचा होता. बोगदा पाण्यातून गेलेला होता आणि काचेतून बाहेर संथपणे फिरणारे प्रचंड शार्क दिसले. एकएक शार्क चार ते सहा टन वजनाचा ! शार्क मासा हा डॉल्फीन किंवा सील यांच्यासारखा माणसाळला जात नाही. तो जात्याच हिंस्त्र असतो परवा इकडं आल्यानंतर ' The Jaws ' हा शार्क माशाच्या क्रूरतेवर आधारलेला चित्रपट बघितला पण तो चित्रपट ज्या युनिव्हर्सल स्टुडिओत हॉलीवूडला निर्माण झाला, त्या स्टुडिओला जेव्हा भेट दिली, तेव्हा त्या शार्क माशाचे काही ट्रिक सीन्स कसे घेतले गेले याची प्रात्यक्षिकासह माहिती आम्हाला सांगण्यात आली होती

मरीन लँडचे दुसरे वैशिष्ट्य म्हणजे, सागरसंपत्तीपासून बनविलेल्या आकर्षक भेटवस्तूंचे दुकान. माशांच्या खवल्यापासून आकर्षक अशी तोरणं बनविलेली होती, शंख आणि शिंपले एकत्र जोडून वाघसिंहांच्या प्रतिकृतीही निर्माण केलेल्या होत्या अनेक तऱ्हेच्या कोवेन्स फ्लॉवरपॉट्स्. आणि विविध प्रकारच्या शोभेच्या वस्तूंचे हे भांडार प्रचंड आहे ' संगीताच्या तालावर नाचणारं रंगीत कारंजे ' हा एक आल्हाददायक कार्यक्रम तेथे पाहायला मिळाला शिवाय या ठिकाणी ' सी ड्रीम्स ' नावाचा समुद्राच्या तळातले

वातावरण दाखविणारा छोटा चित्रपटही दाखवण्यात आला. इथंच एक मरीन इन्स्टिटयूट आहे, आणि तिथं सागरी संपत्तीचं संवर्धन करण्याचं शास्त्रोक्त शिक्षण दिलं जातं गेल्या चार वर्षांपूर्वी रत्नागिरीच्या नगर वाचनालयाच्या समारंभास प्रमुख पाहुणा म्हणून मी गेलो होतो. त्यावेळी डॉ. रानडे यांचा मी अतिथी होतो डॉक्टर रानडे मला पन्नास मैल खोल समुद्रात मासे कसे पकडतात हे दाखवायला घेऊन गेले होते. सोबत माई व उमेश होते डॉ. रानडेंनी ट्रॉलरवर पकडलेले ताजे मासे तिथल्यातिथं फ्राय करून देण्याचीही व्यवस्था ठेवली होती. डॉक्टर रानड्यांच्या सहवासात चार तास होतो. त्या कालावधीत डॉक्टरनी मला अतिशय मौलिक अशी माहिती दिली होती. ' व्हाईट प्रॉन ' म्हणजे पांढरा कोळंबी याची पैदास करण्याची त्यांची खास योजना होती. पाव एकर खाऱ्या पाण्यात अशा व्हाईट प्रॉनची जर शास्त्रोक्त जोपासना केली, तर वार्षिक पन्नास हजार रुपयांचं उत्पन्न मिळू शकतं हे डॉक्टर रानड्यांनी मला नंतर लॅबोरेटरीत नेऊन उदाहरणा-सहित पटवून दिलं होतं मरीन लँडच्या इन्स्टिटयूटबद्दल ऐकताना मला आपल्या डॉक्टर रानड्यांची खूप आठवण आली पण या देशात बुद्धिमान अन् निःस्वार्थी माणसं दीर्घकाल राहूच नयेत अशी नियतीची दुष्ट इच्छा दिसते डॉ. रानडे अकालीच कालवश झाले. मरीन लँडमध्ये जगातल्या विविध प्रकारच्या माशांचं एक मत्स्यालय होतं. पण तिथले बहुतेक मासे आपल्या ' तारापोरवाला अक्वेरियम ' मध्ये अगोदर बघितलेले होते.

मरिन लँडच्या मध्यावर निरनिराळे पाणस्थळ पक्षी (Aquarius Birds) होते. त्यांत अनेक जातींची जंगली बदकं मुक्तपणे तरंगत होती. शिवाय तिथं ' फ्लेमिंगो ' पक्ष्यांचा प्रचंड समूह होता. एकदा बार्शीच्या जवळच्या पाथरीच्या तलावाकाठी मी एक फ्लेमिंगो बघितला होता. मोठ्या बगळयाच्या आकाराचा, पंखांवर गुलाबी छटा असलेल्या या पक्ष्याची चोच छत्रीच्या मुठीसारखी आत वळलेली आणि किंचित जाड अशी असते तलावावर त्या दिवशी माझ्याजवळ दुर्बिण नव्हती. म्हणून फार जवळून मला त्याला न्याहाळता आलं नव्हतं. माझी चाहूल लागताच तो उडाला. पण एकदम उंच आकाशात झेप न घेता तो पाण्याच्या पातळीशी समांतर असा तलावाच्या दुसऱ्या टोकाकडे संथपणे उडत गेला मरिनलँडला खूप जवळून

त्याला न्याहाळता आला. मरिन लँडचा परिसर एकाच वेळा न्याहाळता यावा म्हणून तिथं एक प्रचंड स्तंभ उभारण्यात आला आहे. या स्तंभाच्या टोकावर जाणारं लिफ्ट स्क्रू फिरल्यासारखे स्तंभाभोवती गोल गोल फिरत वर जाते.

स्तंभाच्या बाजूला छोटासा तलाव होता. या तलावात मोटारबोटीला धरून पाण्यावरून स्केटींग करणाऱ्या पोरींच्या कवायती सुरू होत्या रंगीत स्विमिंग सूटस् घातलेल्या या पोरी एकमेकींच्या खांद्यावर बसून पाण्यावर तरंगत जाताना विविध प्रकारच्या कसरती करीत होत्या. त्यावेळी विदुषकासारखा एक पोऱ्या मध्येच विनोद करीत उलट्या-सुलट्या गोलांट्या घेत स्केटींग करत होता. मरिन लँड पाहून परत जाताना डोळ्यासमोर उभे राहिले ते दोन मासे-डॉल्फिन आणि सील ! मरिन लँडमधल्या त्या दोन माशांच्या कसरती बघितल्यावर जलचर प्राण्यांना शिकवण्यात अमेरिकन लोकांनी केलेली प्रगती पाहून खरोखरच कौतुक करावसं वाटलं. परतताना मेहेरनोश पटेल म्हणाला, 'हाँगकाँग' इथं याहीपेक्षा डॉल्फीन आणि सील उत्तम कसरती करून दाखवितात.' ती संधी केव्हा मिळायची तेव्हा मिळो, पण निदान आजतरी अमेरिकेतल्या डॉल्फीन आणि सीलनं अक्षरश: डोळ्यांचं पारणं फेडलं होतं.

बाहेर पडायच्या वेळेला मघापासून आकाशात गर्दी केलेले ढग गडगडू लागले. पाऊस सुरू व्हायच्या आत हॉटेलवर पोहोचणे जरुरीचे होते. बघता बघता टपटप थेंब पडायला लागले पण संपूर्ण भिजायच्या आतच आमची बस येऊन थांबली म्हणून बरं !

दुसऱ्या दिवशी जगातलं सर्वोत्कृष्ट असं करमणुकीचं केंद्र पहायला गेलो-वॉल्ट डिस्ने लँड ! जगात काही आश्चर्य मानली जातात, त्यात डिस्ने लँडची गणना होते की नाही हे मला ठाऊक नाही. पण ती आजपर्यंत केली गेली नसेल तर, निदान यापुढं तात्काळ करायला हवी, असं डिस्ने लँड पाहून परत येताना मला वाटलं.

हजारो गाड्या पार्क करता येतील एवढं प्रचंड पार्किंग ग्राऊंड बघितल्यावर या ठिकाणी रोज किती प्रवासी येत असतील याची कल्पना आली. तसं पाहिलं तर, अमेरिकेत माणसी दीड मोटार असं प्रमाण आहे. म्हणजे घरात

चार चार माणसं असली, तर निदान त्यांच्या सहा मोटारी आहेत असं खुशाल समजावं. पण डिस्ने लँड पाहायला येतात ते प्रवासी फक्त अमेरिकन नसतात. ते उभ्या जगातून येतात. बहुसंख्य प्रवासी बसनेच येतात. आमची बस पार्किंग केली होती ती, सहाशे सदतीस नंबरच्या चौकोनात. हा नंबर अगोदर लक्षात ठेवावा लागतो.

प्रथम प्रवेशद्वाराजवळ तिकिटांचं पुस्तक घ्यायचं प्रत्येक आकर्षणासाठी त्यातलं एक तिकीट फाडून द्यावं लागतं. अशी डिस्नेलँडमध्ये कित्येक आकर्षणं आहेत. ती सर्व एक दिवसात पाहणं अशक्य असतं म्हणून आपण त्यात निवड करून ती आकर्षणं पाहायची असतात. आम्ही त्यातली फक्त दहाच आकर्षणं बघितली. सकाळी नऊपासून ते संध्याकाळी सहापर्यंत आम्ही त्या यक्षनगरीत आकर्षणं पाहात भटकत होतो. नऊ तास कसे गेले हे समजलेसुद्धा नाही.

डिस्ने लँड प्रदेशात प्रथम प्रवास करावा लागला तो मोनोरेलनं. एकाच रुळावरून धावणारी ही छोटीशी, विजेवर चालणारी गाडी अतिशय देखणी होती. छोटे स्टेशन, छोटेच प्लॅटफॉर्म. एका ओळीत फक्त चार माणसं बसतील एवढे चिमुकले डबे. गाडी फलाटावर येऊन थांबली की, आपोआप दरवाजे उघडत. ठरावीक वेळेनंतर आपोआप बंद होत. मुख्य प्रवेशद्वारापासून ते विविध आकर्षणांच्या स्थळांपर्यंत पोहोचायला याच मोनोरेलनं प्रवास करावा लागला. दुसऱ्या टोकाला उतरलो तेव्हाच त्या स्वप्ननगरीच्या सौंदर्याची झलक दिसली. हिरवळ दाटलेल्या उंच अशा जागी छोटी किल्ल्यासारखी इमारत होती. किल्ल्याभोवताली निळ्याभोर पाण्याचा तट होता. त्यात राजहंस आणि पोवळ्याच्या रंगाच्या चोची असलेली बदकं पोहत होती. डिस्ने लँडच्या मध्यावर असलेली ही वास्तू नवख्याला चर्चसारखी भासेल; पण हा आहे तिथल्या काल्पनिक राजाचा राजवाडा. याभोवताली जत्रा भरल्यासारखी चिक्कार गर्दी झालेली होती

आम्ही विविध आकर्षणातलं प्रथम आकर्षण पाहिलं ते फँटसी लँड. एक प्रचंड अशी गवताची झोपडी त्या झोपडीच्या प्रवेशद्वाराजवळ दोन–तीनशे माणसं थांबलेली होती. आत पक्ष्यांचा खेळ सुरू होता. तो संपल्यानंतर ही जमलेली माणसं आत सोडली जाणार होती. आम्ही तिघे त्या थांबलेल्या

गर्दीत सामील झालो. दहा मिनिटांनी प्रवेशद्वार उघडलं गेलं. आत गेलो तो जिकडंतिकडं उंच वाळलेल्या झाडांच्या शेंड्यांवर शेकडो अनेक रंगांचे पक्षी बसलेले. पोपट, काकाकुवा, हॉर्नबील, बुलबुल यांच्या जातींचे पेंढा भरून ठेवलेले ते निर्जीव पक्षी पाहून मला वाटलं, या चैतन्यहीन पक्ष्यांना काय पाहायचं ? ती दोनतीनशे माणसं आत येऊन खुर्च्यांवर स्थिरावली. आत जितक्या खुर्च्या, तितकीच माणसं सोडली गेली. अन् प्रवेशद्वार बंद झाले. पक्ष्यांवर विविध रंगांचे प्रकाशझोत टाकले गेले आणि त्या पक्ष्यांचं सांघिक गीत सुरू झालं गाणं सुरू झाल्यानंतर प्रत्येक पक्षी हालचाल करू लागला. मान डोलावू लागला. गाण्याच्या शब्दागणिक त्यांच्या चोचींची अन् पंखांचीही हालचाल सुरू झाली त्या पक्ष्यांच्या हालचालीत अन् गाण्यात इतकी एकवाक्यता होती की, आपण एखाद्या स्वर्गीय उपवनात येऊन त्या शेकडो विहंगांचं सुरेल असं कूजन ऐकतो आहोत असा भास होत होता. मति गुग करणारा तो Enchanted Tiki Birds चा कार्यक्रम पंधरा मिनिटांचा होता विद्युत उपकरणांच्या साहाय्याने शेकडो पक्ष्यांच्या हालचाली नियंत्रित केल्या गेल्या होत्या. ते पाहून झाल्यावर मी चिरंजीवांना म्हणालो, ‘ It is a marvellous combination of Science and Art. ’ शालेय जीवनात ' कला श्रेष्ठ की, शास्त्र श्रेष्ठ ' या विषयावर निबंध लिहायला सांगत. त्यावेळी दोहोंपैकी एकाचं समर्थन करावं लागे. पण Fantacy Land जर आपल्या एखाद्या शाळकरी मुलानं बघितला, तर तो खात्रीनं म्हणेल ' केवळ कला किंवा केवळ शास्त्र हे श्रेष्ठ होऊ शकत नाही. या दोहोंचा जिथं मिलाफ होतो, तीच कृती सर्वश्रेष्ठ होऊ शकेल '

तेथून आम्ही लाँचमध्ये बसून ' ट्रॉपिकल रिव्हर ' मधले भयानक प्राणी बघितले. नदीच्या काठावर अंगावर ऊन घेत बसलेल्या शेकडो मगरी, जवळ येताच अक्राळविक्राळ जबडा पसरणारे पाणगेंडे, जंगली हत्ती, दाट अरण्यात गुहेच्या तोंडाशी आयाळ पिंजारून डरकाळ्या फोडणारा सिंह, त्याच्या भोवतालचं त्याचं चार छाव्यांचं कुटुंब, पुढे नीलगाईचा थवा, जिराफ, झेब्रे असे लाँचमधून आम्ही जाताना आमच्याकडं टवकारून पाहात कानांची हालचाल करणारे ते सर्व प्राणी खोटे होते हे समजल्यावर खरोखरच आश्चर्य वाटलं. त्या प्राण्यांची उभं राहण्याची लकब, जंगलात धोक्याची चाहूल

होताच स्थिर राहून कानांची केलेली ती हालचाल इतकी हुबेहूब होती की, ते प्राणी बनवणाऱ्या हातांना शेकडो सलाम !

बाजूला झाडावर बांधलेलं ' स्वीस फॅमिली ट्री हाऊस ' होतं . टारझनचं झाडावर घर असतं तसलं घर पाहायला मोठी माणसं मुलं होऊन गेली होती जुनं कोळशाचं इंजिन असलेल्या रेल्वेतून फेरफटका करून ' बिग थंडर माऊंटन रेलरोड ' या डोंगरकपारीतून ताशी दीडशे मैल वेगानं जाणाऱ्या छोटद्या आगगाडीत बसलो.' ही छोटी गाडी इतक्या झटपट वळणं घेते की, आता पाठीचा मणका काही शिल्लक राहात नाही असं वाटू लागतं. त्यानंतर भुताटकीची गुहा The Haunted Mansion पाहिली छोटद्या गाडीत बसून अंधाऱ्या गुहेतून जाताना नाचणारे मानवी हाडांचे सापळे, कुबड आलेल्या टोकदार नाकांच्या हडळी आणि भयानक चेहऱ्यांची भुतं पाहताना मोठ्यांचीसुद्धा भीतीनं गाळण उडत होती अमेरिकेचे आजपर्यंत होऊन गेल्लेले अध्यक्ष जिवंत उभे असल्याचे दृश्य पाहायला मिळाले ते ' The Hall of Presidents ' या दालनामध्ये वाटेत ' फ्रंटीयर लँड शूटींग ' म्हणजे २२ नं ने दहा गोळद्या उडवून समोरच्या हलत जाणाऱ्या बाहुल्या टिपायचं दालन लागलं

यांत सर्वात आकर्षण वाटलं अन् ते म्हणजे स्पेस शटलचं रॉकेटमध्ये बसून अवकाशात जाणाऱ्या अंतराळवीरांना काय वाटते याची थोडीशी झलक त्या ' टूमॉरो लँड 'मध्ये थोडीशी अनुभवायला मिळाली. रॉकेटमध्ये बसताच पोटाला घट्ट पट्टा आवळून बांधला गेला. हळूहळू रॉकेट गती घेऊ लागले. अंधारातून वायुवेगानं जाणाऱ्या आपल्या यानाला अंतराळातले शनी, बुध. मंगळ हे ग्रह दिसू लागले. जीवघेण्या गतीनं जाणाऱ्या या यानात बसलेल्या बायका आणि मुलं भीतीनं किंकाळद्या फोडू लागल्या. पण एकदा सुरू झालेले हे यान आपला सात–आठ मिनिटांचा प्रवास संपल्याशिवाय थांबत नसते. अतिवृद्ध व हाय ब्लडप्रेशर असणाऱ्यांनी यात बसण्याचे धाडस करू नये अशी ठळक अक्षरांत प्रवेशद्वारापाशी सूचना होती तरीही उत्सुकतेपोटी काहीजण त्यात बसले आणि नंतर पस्तावले. आमच्या माई ते यान सुरू झाल्यानंतर हसत होत्या की ओरडत होत्या हे समजत नव्हते. ती जीवघेणी यात्रा संपल्यावर मी चिडवण्याच्या हेतूनं म्हणालो, ' काही

माहिती नसताना कशातही उगाच बसता ? पुन्हा बसाल का यात ?'

त्या हसत हसत म्हणाल्या, भीती वाटली, पण पुन्हा बसावंसं वाटतंय !' उमेश म्हणाले, ' माईसाहेब, चला आता, पुरं झालं ते यानातलं उड्डाण ! असला भयानक अनुभव पुन्हा नको रे बाबा !'

' If you had wings ' हा सुद्धा कार्यक्रम अतिशय मनोरंजक वाटला. दालनात आपण गेल्यानंतर तो कार्यक्रम सुरू होतो. आपल्याला पंख असते अन् आपण पृथ्वीतलावरच्या सौंदर्यस्थलांवरून उड्डाण करत निघालो आहोत तर कसं वाटेल याचा आभास निर्माण करण्यात आला होता. त्यात न्यू ऑर्लीन्स, मेक्सिको या देशांतील ऐतिहासिक स्थळांवरून विमानांतून घेतलेली फिलम दाखवली जाते. अन् ती पाहताना आपणच आकाशातून त्या भागांवरून भरारी मारत आहोत असा भास निर्माण होतो.त्याचप्रमाणं Around the World on Magic Carpet हा कार्यक्रमही अतिशय मनोवेधक वाटला. या कार्यक्रमात प्रेक्षकांच्या भोवती गोल पडदा असतो व त्यावर जगातल्या सुप्रसिद्ध स्थळांची फिल्म दाखवली जाते आपण एका गालीच्यावर उभे राहून पुढे पुढे जात आहोत असा आभास निर्माण होतो. मॅकडोनल्ड डग्लस यांनी सादर केलेला ' मिशन टू मार्स ' (मंगळावर स्वारी) हा कार्यक्रम सुद्धा थरारक होता.

रोप ट्रेन, टुमारो लँड, विद्युत् वाहनानून शास्त्रीय प्रगतीचे दालन दर्शविणारी दृश्यं अशी आणखीही आकर्षणं पाहिली. उमेशनी या डिस्ने लँडच्या आठवणी रंगीत फिल्म्सनी टिपून घेतल्या.

डिस्ने लँड पूर्व–अमेरिकेत जसे आहे तसेच पश्चिम अमेरिकेत कॅलिफोर्नियातही आहे. दोन्ही ठिकाणांतल्या आकर्षणात फारसा फरकही नाही. ' डिस्ने जगत् ' ज्या वॉल्ट डिस्नेने निर्माण केले त्याच्या कल्पकतेचे कौतुक करावे तितके थोडे. या ठिकाणी आबालवृद्धांची मती गुंग होऊन जाते. करमणुकीबरोबर आज अमेरिकेनं वैज्ञानिक प्रगतीत घेतलेली झेप पाहायला मिळते. लहान मुलांसाठी या डिस्ने लँडमध्ये अनेक आकर्षणं आहेत. प्रचंड मेरी गो राऊंड, फिरती विमानं, रिमोट कंट्रोलनं चालणाऱ्या छोट्या मोटारीतून फेरफटका अशी खास लहान मुलांसाठी करमणुकीची खूप आकर्षणं होती. हॉटेल्स, आइस्क्रीम स्टॉल्स, पॉपकॉर्न आणि वेफर्स

विकणारी दुकानं फुगे, प्लॅस्टिकची वाऱ्यावर फिरणारी चक्रं वगैरेही विकत मिळे

डिस्नेलँडमधली प्रमुख अशी आकर्षणं पाहून झाल्यानंतर आम्ही पुन्हा मोनो रेलस्टेशनकडं आलो अन् नेमके त्यावेळी मेघ गर्जू लागले काल संध्याकाळी मरिन लँडलासुद्धा याच वेळी ढग गडगडून शितोडे पडायला सुरुवात झाली होती. आजही नेमके त्याच वेळेस मेघ गर्जना करू लागल्याचे पाहून मी उमेशना म्हणालो, ' बघा, इथं अमेरिकेत निसर्गसुद्धा टाईम टेबल पाळत असतो ! '

मी असं म्हणतो न म्हणतो तोच सोसाट्याचा वारा सुटला. बाजूला गडगडणारे ढग सरळ डिस्नेलँडवर तरळू लागले. इतका वेळ शुभ्र भट्टीचे कपडे घातल्यासारखे दिसणारे ढग, काळेकरडे दिसू लागले. त्यातून विजेचा लखलखाट सुरू झाला. डिस्नेलँडचं एखादं आकर्षण ही ' बया ' उद्ध्वस्त करते की काय अशी शंका येऊ लागली. विजेचे प्रचंड सात–आठ लोळ उठले. असंख्य तोफा डागल्यासारखा ध्वनी आसमंतात उठत होता.

डिस्नेलँडमध्ये मानवनिर्मित अनेक चमत्कार बघितले म्हणून त्यावेळी निसर्गालाही आपला एक चमत्कार दाखविण्याची लहर आली की काय न जाणे ! डिस्नेलँडवर धो धो पाऊस कोसळत असताना पश्चिमेला झुकलेल्या सूर्याने प्रचंड असा एक सोनेरी झोत त्या विभागावर टाकला. एकीकडं जोरदार पाऊस, आणि त्याचवेळी दुसरीकडं सूर्यकिरणं. मला लहानपणी अशा प्रसंगी म्हणायचं गाणं आठवलं . ' ऊन–पाऊस गुंज, गुंज, म्हाताऱ्याची मुंज मुंज ! ' खरं म्हणजे या ओळींचा तसा अद्यापही मला समाधानकारक अर्थ लावता आलेला नाही. पण म्हाताऱ्याची मुंज म्हणजे अशक्यप्राय गोष्ट असा असावा पाऊस आणि सूर्यप्रकाश या दोन्ही परस्परविरोधी घटना पण कधीकधी त्या अशाच एकत्रित पाहायला मिळतात. डिस्नेलँडवर इंद्रधनुष्याची सुरेख अशी कमान उभी राहिली. एक टोक जमिनीवर अन् दुसरं उंच आकाशात. उमेशनी रंगीत फिल्मवर तो क्षण अचूक असा टिपलेला आहे.

जसा अचानक पाऊस आला तसाच तो अचानक थांबला. पण सारा आसमंत गारेगार होऊन गेला. बसकडे आलो तेव्हा नेहमीचीच रड.

खांद्याला सदैव टी. सी. आय. ची पिवळी थैली वाळगणारा नंदी कुठं गायब होता, शिवाय रोमिओ-ज्युलिएट-तुलसी पतिपत्नींचा पत्ता नव्हता. फौंटनपेन विक्रेता छावडा आणि लोखंडी दुकानदार गाडीजवळ उभे होते. छावडा म्हणाला, ' देखो, हमारे छे तिकीट बाकी हैं । हमने कुछ देखा भी नहीं । ' खरं म्हणजे डिस्नेलँडमध्ये तिकिटं अपुरी पडतात इतकी एकाहून एक अशी सरस आकर्षणं तिथं असताना या कर्मदरिद्री माणसांनी त्यांना दिलेल्या दहा तिकिटांपैकी फक्त चारच खर्च केली. आणि सहा तिकीटं परत आणली होती. डिस्नेलँडसारख्या ठिकाणी एक एक आकर्षण दहा वेळा बघितलं तरी समाधान होत नाही. तिथं छावडासारख्या अरसिक माणसानं यावं तरी कशाला ? अहमदाबादची हिंदुजा कुटुंबातली तीन जोडपी आमच्यासोबत होती. पण त्यांपैकी कोणालाच इंग्रजी समजत नव्हतं डिस्नेलँडचा नकाशा उरळी करून खिशात घालून बाहेरच्या स्टॉलवरचे खाद्यपदार्थ खात ही मंडळी फक्त भटकतच होती. त्यांना तिथं काही बघण्यासारखी आकर्षणं आहेत याची जाणीवच नव्हती. पैशानं अक्कल विकत घेता येत नाही हेच खरं ! एक लाख वीस हजार रुपये खर्चून आलेल्या त्या तीन जोडप्यांना आपण फक्त परदेश-दौरा करून आलो एवढंच शिक्कामोर्तब करून घ्यायचं होतं झालं. त्या हिंदुजा कुटुंबात एकजण सहा फूट उंच होता. न्यू ऑर्लीन्सला आम्ही लंचसाठी एका हॉटेलात गेलो होतो. तिथं सेल्फ सर्व्हीस होती. पण त्या गृहस्थाला कोणते पदार्थ घ्यावेत अन् कोणते नको याचा निर्णयच घेता येत नव्हता. आशाळभूतपणे तो काचेच्या कपाटातल्या खाद्यपदार्थांकडे पाहात इकडून तिकडे दहा वेळा गेला. आम्ही तिघे बाजूच्या टेबलावर बसून खाता खाता त्याची ती गोंधळलेली अवस्था बघून हसून हसून बेजार झालो. त्या गृहस्थाची बायको साऱ्या प्रवासात मोजून दहा शब्द बोलली असेल. पण तिच्या अबोल वृत्तीचं कारण जेव्हा समजलं, तेव्हा मला खरोखरच तिची दया आली. त्यांचं अहमदाबादेत वर्कशॉप होतं. त्यानं शहराबाहेर जागा घेऊन घर बांधायचं ठरवलं. त्यावेळी पत्नी म्हणाली, ' इतक्या दूर निर्मनुष्य जागी आपण घर बांधायला नको ! ' पण त्या रेम्या डोक्याच्या नवऱ्याने पत्नीची सूचना जुमानली नाही. जागा स्वस्तात मिळते म्हणून त्याने लोकवस्तीपासून दूरच्या जागी घर बांधलं. वास्तुशांती करून दोघे

नवरा–बायको राहायला गेले. मूळची गर्भश्रीमंती, बायकोच्या अंगावर दागदागिने, घरात भरपूर पैसा–अडका. दिवसभर गृहस्थ वर्कशॉपला जायचा आणि रात्री परत यायचा. एके दिवशी दुपारी दार ठोठावलं गेलं. आवाज ओळखीचा वाटला म्हणून बाईनं दार उघडलं. तीन दांडगट हातात जंबिये घेऊन घरात घुसले बाईला अंगावरचं सारं सोनं उतरायला लावलं. तिजोरीत होते ते सर्व पैसे आणि ठेवणीतले दागिने घेऊन गेले. त्या बाईनं तोंडातून आवाज काढू नये म्हणून एका लुटारूने तिच्या छातीवर जंबिया रोखून धरला होता. आपलं घर लुटलं जातं आहे हे पाहूनही ती पुतळ्यासारखी निश्चल बसून होती. घर लुटून ते तिघे निघून गेले तरीही ती पुतळ्यासारखीच बसून होती. तिची जबान बंद झाली होती नवरा कामावरून परत आला तरीही ती तशीच बसून होती. नंतर सारा प्रकार नवऱ्याच्या लक्षात आला. प्रकरण पोलिसांत नोंदवण्यात आले. पोलीस बाईचा जबाब घेण्यासाठी आले. पण बाईच्या तोंडून शब्दच उमटत नव्हता. चोरीचा तपास तर लागलाच नाही. पण या बाईला बोलतं करण्यासाठी त्या गृहस्थाला पुन्हा हजारो रुपये खर्च करावे लागले. ती हळूहळू बोलू लागली. पण म्हणे अजूनही रात्री–अपरात्री तिला ते जंबियेधारी लुटारू स्वप्नात दिसतात आणि ती किंचाळून ओरडत जागी होते. स्वतःच्या मालकीचं घरकुल असावं असं प्रत्येक गृहस्थी माणसाला वाटतं. केवळ जागा स्वस्त मिळते म्हणून निर्मनुष्य जागी घर बांधणाऱ्या माणसाची व्यवहारज्ञानाशी फारकत झालीय असंच म्हणावं लागेल. ती बाई युरोप आणि अमेरिकेतसुद्धा निर्विकार चेहऱ्यानं वावरत होती. अहमदाबाद–पासून हजारो मैल दूर येऊनही तिच्या मनावर झालेला तो प्रचंड आघात ती विसरली नव्हती. म्हणूनच ती सदैव शून्यात बघत असायची

ऑरलँडोची ही दोन प्रमुख ठिकाणं पाहून आमचा पुढचा प्रवास सुरू झाला तो मियामीच्या दिशेनं, ‘ मियामीला ’ काहीजण ‘ मायामी ’ असंही म्हणतात.

मायामीला जाताना वाटेत आणखीन एका अविस्मरणीय अशा स्थळाला भेट देण्याची संधी प्राप्त झाली. ते स्थळ म्हणजे ‘केनेडी स्पेस सेंटर.’ रशियाने दुसऱ्या महायुद्धानंतर आपलं लक्ष अंतराळ–संशोधनात घातलं. त्यात इतकी

आश्चर्यकारक प्रगती केली की, युरी गागरीन, व्हॅलेंटिना तेरेस्कोवा यांना यानातून अंतराळात पाठवून परत पृथ्वीवर सुखरूप आणलं. चंद्राच्या प्रवासाला जितका कालावधी लागेल तितका वेळ मानव अवकाशात जिवंत राहून भ्रमण करू शकतो हे रशियानं अजमावून पाहिलं त्यानंतर रशियाची दुसरी योजना होती ती मानवाला सरळ चंद्रावर धाडायची. त्यावेळी अमेरिकेची अंतराळ संशोधनातील प्रगती अगदीच नगण्य होती. त्यावेळचे अमेरिकेचे अध्यक्ष केनेडी यांना आपला देश अंतराळ–संशोधनात रशियापेक्षा मागे आहे ही खंत लागून राहिली त्यांनी आपल्या देशातील शास्त्रज्ञांचा मेळावा बोलावला. त्यांना त्यांनी कळकळीचे आवाहन केले, आपण स्वत:ला प्रगत समजतो पण आज रशियाची या क्षेत्रातील घौडदौड पाहून माझे मन विपण्ण झाले आहे. आपण सर्वांनी तनमनधन एकवटून या क्षेत्रात आघाडी मारायला हवीय्. रशियाशी स्पर्धा करायची तर, ती केवळ शस्त्रस्पर्धाच करून उपयोगाची नाही, तर त्यांच्याशी शास्त्रस्पर्धाही करणं अगत्याचं आहे.'

केनेडींच्या आवाहनाचा शास्त्रज्ञांच्या मनावर विलक्षण परिणाम झाला. उभ्या अमेरिकेतून अंतराळविद्येत पारंगत असे शास्त्रज्ञ एकत्र आले. स्पेस सेंटरच्या उभारणीस केनेडी शासनाने कोटयवधी डॉलर्सची मदत दिली आणि खरोखरच आश्चर्य घडले ! रशियाच्या अगोदर अमेरिकेने आपला नागरिक चंद्रावर धाडला धन्य तो देश आणि धन्य ते अध्यक्ष ! राष्ट्राध्यक्षाच्या आवाहनाला प्रतिसाद देऊन अहोरात्र झटणाऱ्या त्या शास्त्रज्ञांची देखील थोरवी गावी तितकी थोडीच ! आमच्या देशांत गेल्या चौतीस वर्षांत कोणा नेत्याने असे बुद्धिवंतांना आवाहन केल्याचे आढळत नाही उलट ' एका गालावर थोबाडात मारली तर, दुसरा गाल पुढं करा, ' अशी शिकवणूक आमच्या माथी अजूनही लादण्यात येते नेते तत्त्ववेत्ते असू नयेत ते एवढ्यासाठीच !'

केनेडी स्पेस सेंटरचे आवार अवाढव्य आहे. दोनशे वीस मैल क्षेत्रफळाच्या या जागेवर जागोजागी आजपर्यंत पृथ्वीवरून आकाशात सोडण्यात आलेल्या यानांचे ' लाँचिंग पॅडस् ' आहेत. इथूनच 'अपोलो ८' हे अंतराळयान चंद्राच्या दिशेने अवकाशात झेपावले होते. तसेच अलीकडचे अंतराळात

जाऊन परत आलेले 'कोलंबिया' येथूनच सोडले गेले होते. आम्हाला माहिती देणारा तिथला गाईड म्हणाला, ' It is a world terminus for Moon. It is a historical monument of the world.' चंद्रावर सोडण्यात आलेले अमेरिकन अंतराळयान ज्या स्टँडवरून सोडण्यात आले ते स्टँड ऐतिहासिक महत्त्वाचे असे गणले जाते.

ज्या भागातून यानांचे अवकाशात प्रक्षेपण होते, त्या ठिकाणी वार्ताहरांच्यासाठी खास सुरक्षित असे प्रचंड काचघर बांधण्यात आले आहे. त्याच काचघरातून अंतराळात झेपावणाऱ्या यानांचे फोटो व फिल्म घेण्याचीही व्यवस्था असते. साऱ्या देशभर नागरिकांना प्रक्षेपण दिसावे यासाठी अत्यंत प्रभावशाली असे टी व्ही. चे कॅमेरेही तेथे उभे केले जातात यानाच्या उड्डाणापूर्वी अध्यक्ष अंतराळवीरांना आणि शास्त्रज्ञांना शुभेच्छा संदेश वॉशिंग्टनवरून देतात

अमेरिकन नागरिकांची राष्ट्रीय वृत्ती जगात इतरत्र कुठेही पाहायला मिळणार नाही. राष्ट्र प्रगतिपथावर यायचे असेल तर, केवळ निष्ठावंत नेते मंडळी असून भागत नाही. एकजात नागरिक सुजाण आणि देशावर नितांत प्रेम करणारे हवेत.

केनेडी स्पेस सेंटरचे लाँचिंग पॅडस् पाहिल्यानंतर यानाची उभारणी किंवा बांधणी केली जाते ते ठिकाण बाहेरून दाखविण्यात आले बहुधा त्यावेळी एखाद्या यानाची बांधणी किंवा चाचणी त्या ठिकाणी सुरू असावी. अशा प्रसंगी त्या ठिकाणी कोणासही आत प्रवेश दिला जात नाही सुरक्षा व्यवस्था अत्यंत काटेकोररीतीने पालन केली जाते. या केनेडी स्पेस सेंटरच्या लॅबॉरेटरीत प्रथम आम्हाला अवकाश संशोधन कशासाठी करावयाचे, त्यापासून मानवजातीला कोणकोणते फायदे मिळू शकतील ही माहिती देण्यात आली होती. आम्ही काचेने बंद केलेल्या गॅलरीत उभे होतो. समोरच्या दारातून पन्नास – पंचावन्न वर्षांचा, डोक्याचे केस पांढरे – करडे झालेला, अत्यंत प्रसन्न अशा व्यक्तिमत्त्वाचा एक शास्त्रज्ञ हळूहळू चालत आला होता. त्यानं प्रथम आम्हा सर्वांचं स्वागत केलं अन् सर्वसामान्य लोकांना समजेल अशा भाषेत अंतराळ–संशोधनाचे उद्दिष्ट विशद केले. हे करत असताना तो बाजूच्या यंत्रांच्या कळा फिरवून छोट्या यानांची

प्रात्यक्षिकं दाखवत होता. ही प्रात्यक्षिकं दाखवताना फोटो घ्यायलाही त्या शास्त्रज्ञाने परवानगी देऊन टाकली होती. फिलमच्या साहाय्याने त्याने ही माहिती दिल्यावर तो म्हणाला होता, ' यानंतर तुम्ही अंतराळ यानं प्रत्यक्षात जेथून सोडली जातात, ते ठिकाण पाहायला जाणार आहात, ' असं म्हणून त्यानं आमचा निरोप घेतला अन् तो आलेल्या ठिकाणी परत जायला निघाला तेंव्हा समजलं की, आम्हांला ही सर्व प्राथमिक माहिती देणारा शास्त्रज्ञ माणूस नव्हता, तो होता यांत्रिक मानव ! आम्ही अक्षरशः तोंडात बोटे घातली. लंडनला मादाम टुसॅडस् वॅक्स म्युझियममध्ये ऐतिहासिक आणि विद्यमान नेत्यांच्या हुबेहूब अशा प्रतिकृती बघितल्या होत्या. पण या ठिकाणी अमेरिकनांनी इंग्लिश लोकांवरही कडी केली होती. त्यांनी हुबेहूब असा मानव तरी बनवलाच होता, पण त्याला हावभाव करायला लावले अन् बोलायला सुद्धा ! धन्य धन्य त्या शास्त्रज्ञांची !

यानांची बांधणी केलेल्या ठिकाणावरून प्रत्यक्ष अवकाशात उड्डाण करणाऱ्या ठिकाणापर्यंत ते यान वाहून नेण्यासाठी एक प्रचंड रणगाड्यासारखे वाहन बनवण्यात आले आहे – हजारो टनांचं ते क्लिष्ट आणि नाजुक अशा भागाचं बनवलेलं यान उड्डाणासाठी लाँचिंग पॅडकडं नेताना सुद्धा भयंकर काळजी घ्यावी लागते. आमच्याकडे गुऱ्हाळाच्या चुलवणावर तयार झालेली काहील गुरुदेव दत्त म्हणून वाफ्यापर्यंत आणताना कित्येक वेळा कडीतून निमटल्याचे आणि गुळवे भाजल्याचे अनेक प्रसंग ओढवलेले आहेत. त्या पद्धतीत आजतागायत बदल नाही, पुढील शंभर – दीडशे वर्षांत बदल घडण्याची शक्यता नाही.

केनेडी स्पेस सेंटरच्या शेजारी एक प्रचंड कॉस्मोड्रोम बांधण्यात आलेला आहे. यापुढे जी अंतराळ यानं आकाशात धाडली जाणार आहेत, ती परत पृथ्वीतलावर विमानासारखी उतरवली जाणार आहेत. यापूर्वी जी यानं अवकाशात सोडली जात होती, ती तशीच्या तशी पृथ्वीवर आणणं शक्य होत नसे. पृथ्वीवर यान परत येताना त्याला विलक्षण गती देणं जरुरीचं असे आणि अशा वेळी हवेच्या घर्षणामुळं यानाचा पृष्ठभाग जळून किंवा वितळून जाई. त्यामुळे आता यापुढे अंतराळांत पाठवले जाणारे यान हे विमानाच्या आकाराचे असणार आहे आणि ते ज्या स्वरूपात अंतराळ

परिभ्रमण करेल त्याच स्वरूपात ते पृथ्वीवर परत येईल. अर्थात पृथ्वीवर उतरताना त्याची जी अतोनात गती असेल ती विचारात घेऊनच केनेडी स्पेस सेंटरजवळचा विमानतळ विस्तृत करण्यात आलेला आहे. त्याला यापुढं खरं म्हणजे विमानतळ म्हणण्यापेक्षा 'यानतळ' म्हणणंच अधिक उचित ठरेल.

अंतराळ विद्येत प्रगती करण्याच्या हेतूनं स्पेस सेंटरचा परिसर निर्मनुष्य ठेवलेला असला तरी त्याचा दुसरा एक फार मोठा विनियोग करून घेतला जात आहे. 'वाईल्ड लाईफ रिफ्यूज' म्हणजे वन्य पशुपक्षी यांचे संवर्धन आणि आश्रयस्थान म्हणूनही या जागेचा वापर केला जात आहे. अनेक नामशेष होण्याच्या मार्गावर असलेल्या पक्ष्यांचे आणि सस्तन प्राण्यांचे चौदा हजार एकर जागेत पुनर्वसन करण्यात आले आहे. अंतराळ–संशोधनात प्रगतीचा एवढा नेत्रदीपक टप्पा गाठूनही पृथ्वीतलावरच्या नामशेष होऊ घातलेल्या पशूपक्ष्यांचं संवर्धन करण्याचा अमेरिकन सरकारचा हा प्रयत्न अत्यंत स्तुत्य आहे यात शंका नाही.

युरोप आणि अमेरिकेत फार मोठी जंगलं आहेत. सांबर, भेकर, ससे यांच्या जातीचे अनेक प्राणी त्या जंगलात वास्तव्य करून आहेत. ठरावीक सीझनला बंदुकीनं शिकार करायला परवानगी देण्यात येते पण भारतातल्या बऱ्याच लोकांना कल्पना नसेल की, अमेरिकेत आजही धनुष्यबाणानं शिकार खेळली जाते अमेरिकेच्या पन्नास राज्यांपैकी पंचेचाळीस राज्यांत धनुष्यबाणानं वर्षभर शिकार खेळायला परवानगी असते याचं कारण असं की, धनुष्यबाणानं जी शिकार खेळली जाते, तीत पशुपक्ष्यांचा मोठ्या प्रमाणावर संहार होण्याचा संभव फारच कमी असतो न्यूजर्सीवरून केनेडी एअरपोर्टला निघण्यापूर्वी मीही एक धनुष्यबाण खरेदी केला. पण तो आणताना काय काय 'रामायण' घडलं ते नंतर सांगेन. तिथं धनुष्यबाणदेखील अत्याधुनिक बनवले जातात. काही धनुष्यबाणांना बंदुकीसारखे खटके असून त्यावर दुर्बिणसुद्धा बसवलेली असते.

धनुष्यबाण चालवण्याचं शिक्षण देणाऱ्या अमेरिकेत अनेक 'आर्चरी स्कूल्स' आहेत. आमच्या देशात आतागी धनुष्य दिसतो तो फक्त कोदंडधारी प्रभू श्रीरामचंद्राच्या तसबिरीत. धनुर्विद्या शास्त्रशुद्धरीत्या

जोपासली जात्री असं वाटणारा एकही महाभाग या देशात शिल्लक नाही याचा खेद होतो.

केनेडी स्पेस सेंटर पाहण्याच्या शेवटच्या टप्प्यात आम्ही ' स्पेस म्युझियम ' पाहायला गेलो या स्पेस म्युझियममध्ये मानवाने अंतराळ संशोधनात हळूहळू कशी प्रगती केली हे दर्शवणाऱ्या अनेक लहानमोठ्या प्रतिकृती ठेवलेल्या होत्या. याशिवाय इथल्या म्युझियममध्ये अंतराळवीरांनी पृथ्वीपासून शेकडो मैल दूर गेल्यानंतर पृथ्वीची आणि इतर ग्रहांची घेतलेली अनेक छायाचित्रे पाहायला मिळाली. अपोलो ११ ( अकरा ) या यानातील अंतराळवीरांनी चंद्रावर नेलेली आणि सौरशक्तीवर चालवलेली मोटारही पाहायला मिळाली एका दालनामध्ये चंद्रावर गेलेल्या अंतराळवीरांनी घेतलेली रंगीत फिल्म दाखवली गेली. पण या सर्वांत अधिक आकर्षण मला वाटलं ते चंद्रावरचे अंतराळवीरांनी आणलेले दगड पाहताना. पौर्णिमेच्या रात्री स्वच्छ अशा आकाशात तरंगणारा चंद्र पाहताना नेहमीच माझी वृत्ती प्रफुल्लित होते. अशा पूर्ण चंद्रबिंबाकडं पाहात राहिलं की, मानवी जीवनातले दु:खाचे, मन:स्तापाचे अनुभव विरघळून जातात. पण चंद्राकडं असं एकटक पाहणं म्हणे धोक्याचं असतं माणसाला वेड लागण्याची शक्यता असते असं व्यवहारी लोक म्हणतात. बरोबर आहे, कारण व्यवहारी लोकांना काव्य समजतच कुठं ? काव्य करणे आणि ते अनुभवणे हे व्यवहारी लोकांचं क्षेत्र नव्हेच. ते आहे थोड्याफार वेड्यांचे क्षेत्र पण त्या वेडातला स्वर्गीय आनंद अतिव्यवहारी मुर्खांना कधीच अनुभवता येणार नाही. दिवसभरात किती आर्थिक कमाई झाली याचा जमाखर्च करण्यात मग्न होणाऱ्याला पौर्णिमेचा चंद्र काय सुख देणार आहे ? आजकाल माणसाचं मोठेपण त्याच्या कमाईवर मोजलं जाते त्याच्या गाड्या, बंगले, बँकबॅलन्स ही ऐश्वर्याची लक्षणं मानली जातात. अशा अनेकजणांना मी अगदी जवळून पाहतो हे भौतिक ऐश्वर्य मिळवण्यासाठी त्यांनी आपली नैतिक आहुती दिलेली असते. जाऊ दे मी उगाच कुठतरी वाट चुकलो, या स्पेस म्युझियममध्ये फिरताना !

तर चंद्रावरचे दगड पाहताना माझ्या सर्वांगावर रोमांच फुलले त्यांना स्पर्श करण्याचा अनोनात मोह झाला पण ते सुरक्षित असे जाड काचेच्या

पेटीत बंद करून ठेवले होते. मी भक्तिभावाने हात जोडले

निरनिराळ्या ठिकाणचे दगड जमवणे हा माझा फार पुराणा छंद आहे हे मी मागे तुम्हाला सांगितलेलंच आहे. तेव्हा चंद्रावरचे दगड पाहून मी माईना म्हणालो, ' मी ठिकठिकाणचे दगड जमा करतो, या माझ्या छंदाला तुम्ही कित्येकवेळा हसता मग आता हे चंद्रावरचे दगड पाहून का भारावल्यासारख्या दिसता ?'

तेव्हा ओलावलेल्या डोळ्यांच्या कडा पुसत त्या म्हणाल्या, ' अहो, हे चंद्रावरचे खडक, दगड अन् गोटे पृथ्वीतलावरच्या असंख्य हिऱ्यामोत्यांपेक्षाही अधिक मौल्यवान आहेत !'

' दॅटस् इट ! आता कसं अगदी बरोबर बोललात ! ' काचेमधुनी दिसते जनाला अन् दगडांमधुनी दिसते कवीला. ' समजलं ?'

तेथून जाताना मी माईना म्हणालो, ' आपल्याकडं काही बायका संकष्टी करतात. दिवसभर उपवास करतात आणि संकष्टीचा चंद्र उगवलेला पाहून नैवेद्य दाखवून उपवास सोडतात. पावसाळ्यात संकष्टीच्या चंद्राचं दर्शन घडत नाही. मग पाटावर पिठाचा चंद्र काढून त्याला नैवेद्य दाखवतात. मी लहानपणी अशा काही बायकांची टिंगल करीत असे एकदा शेजारच्या घरी गेलो. संकष्टी होती. मी म्हणालो, ' अहो काकू, आज पंचांगात चंद्रोदय दहा वाजून पाच मिनिटांनी आहे. तुम्ही तर साडेनवालाच घंटी वाजवली !' त्यावर त्या काकू नाक उडवून म्हणत, ' तुला श्रद्धा म्हणून काही नाहीच !

' माझ्यासारखा सश्रद्ध तुम्हाला शोधून सापडणार नाही. फक्त अंधश्रद्ध लोकांची मला कीव करावीशी वाटते तुम्ही पंचांग पाहून पाटावरच्या चंद्राला नैवेद्य दाखवला असता तर बरं झालं असतं ! पण तुम्हालाच भूक लागली म्हणून तुम्ही चंद्रोदय थोडा लवकर केलात. त्यात तुमची काहीच चूक नाही !'

काकू कृतककोपानं मला मारायला धावल्या अन् मी धूम पळालो

केनेडी स्पेस सेंटरच्या परिसरात प्रवाशांना हवे तेवढे फोटो काढायची परवानगी होती. त्या लोकांना वाटतं आमच्यासारखे लाखो प्रवासी जरी तिथं येऊन गेले तरी त्यांच्या ज्ञानाबरोबर कोणी बरोबरी करू शकणार नाही पण अंतराळ संशोधनात आम्हीही मुंगीच्या पावलांनं का होईना पण



ग्रंथालय ठाणे ६८० १०६८

प्रगती करू लागली आहोत. आमचा ' भास्कर २ ' हा रशियाच्या मदतीने अवकाशात सोडलेला उपग्रह मौलिक अशी माहिती पृथ्वीवर धाडतो आहे. भारताचा अंतराळवीर जेव्हा चंद्रावर पोहचेल तो दिन आमच्या इतिहासात सुवर्णाक्षरांनी लिहून ठेवला जाईल. तो दिवस उगवायचा असेल तर, देशाचं आर्थिक सामर्थ्य वाढायला हवंय आणि जोपर्यंत किड्यामुंग्यासारखी वाढणारी ही लोकसंख्या मर्यादित ठेवली जात नाही, तोपर्यंत भारतीय नागरिक चंद्रावर पोहोचण्याची कल्पनाच करू नका.

विस्तृत अशा सिमेंट रोडवरून आमची बस चालली होती. अमेरिकेच्या अंतराळक्षेत्रातील नेत्रदीपक अशा यशाने मी भारावलेलो होतो. अन् गाडीतले इतर प्रवासी डुलक्या घेत होते. छावडा, लोखंडी मालाचा दुकानदार, गर्ग इत्यादी मंडळी आपआपसांत बोलत होती. ' आमरिका अभी अभी आस्मानमें यान छोड रही है, लेकीन हमारे भारतमें बरसों पहले यह प्रयोग किया गया है !'

बापजाद्यांच्या कर्तृत्वाच्या वढाया मारून आपणच कसे श्रेष्ठ आहोत हे भासवणारे किती नामर्द, मूर्ख व दुबळे असतात, याची प्रचीती येत होती.

तीन-चार तास कसे गेले समजले नव्हते. बस मायामीच्या दिशेनं चालली होती. पण मायामीला पोहोचायला संध्याकाळ होणार असल्यानं वाटेत ' कोको बीच ' इथं लंचसाठी थांबायचं ठरलं.

तो सुट्टीचा दिवस होता. केशरी पुळणीवर हजारो गौरांगना अंगाला ऑलीव्ह ऑईलसारखी तेलं फासून ऊन खात पडल्या होत्या. मी आजवर ऐकत होतो की, सूर्यस्नान हे कोवळया किरणातच घेतात पण अमेरिकेत सकाळपासून संध्याकाळपर्यंत उन्हात, वाळूत उघडं पडणाऱ्या त्या बायका, पोरं, माणसं बघून आश्चर्य वाटे. कातडी काळी करून घेण्यासाठी त्यांची ती चाललेली सामूहिक धडपड पाहताना मला आपल्याकडे पोरी अन् बायका गौरवर्ण प्राप्त व्हावा म्हणून किती आटापिटा करतात हे आठवलं. शेवटी माणूसजात ही इथून-तिथून सारखीच. स्वत:जवळ जे नाही ते प्राप्त करून घेण्याचा हा अट्टाहास जगभर पाहायला मिळतो.

कोको बीच ' नाव त्या सागरकिनाऱ्याला का देण्यात आलं हे ठाऊक नाही. तिथं कोकोचं उत्पादन होत नाही किंवा कोकोपासून चॉकलेटस्,

कॉर्नव्हिटा असे पदार्थ बनवण्याचे कारखानेही नव्हतें. पण मला तो किनारा फारच आवडला. कदाचित् ‘ कोको ’ या पेयाविषयी माझी बालपणापासूनची आवड हे सुद्धा त्या आवडीमागचे एक कारण असू शकेल. लहानपणी घरी वडील इंपोर्टेड कोकोचे डबे आणत. त्यावेळी ते खूप स्वस्तही असत. पण हळूहळू जसजसा मी मोठा होत गेलो, तसा कोको दुर्मीळ होत गेला. पुण्याला अगर मुंबईला गेल्यानंतर शोधून शोधून मी आजही तो पैदा करून आणतो. परवा माझे एक सहकारी घरी आले, मी त्यांना म्हणालो,

‘ काय घेणार ? चहा, कॉफी का कोको ?’

‘ कोको ? हा काय प्रकार आहे ?’

‘ अहो, कोको हे पेय तुम्ही कधी प्याला नाहीत ?’

‘ नाही. मी हे नाव आजच ऐकतो आहे !’

आमच्या देशाचं भयानक दारिद्र्य चव्हाटयावर आणावं अशी माझी मनापासून इच्छा नाही. पण आजच्या पिढीला ‘ कोको ’ ठाऊक नसावा हा कसला कर्मदरिद्रीपणा ?

त्या गृहस्थांना मी एक कप गरम गरम कोको करून दिला. तो प्याल्यावर ते म्हणाले, ‘ पातळ चॉकलेट प्याल्यासारखे वाटले ’

‘ होऽऽऽ चॉकलेटस् कोकोपासून बनवतात !’

चॉकलेटवरून आठवलं, अमेरिकेत असंख्य प्रकारचे चॉकलेटस् खाऊन घेतले. माई माझ्याकडं ‘ काय चायल्डीशपणा हा ’ अशा नजरेनं पाहात. तेव्हा त्यांच्या नजरेतला तो अर्थ उमगून मी म्हणत असे, ‘ माझं नाव अद्यापही बाबा आहे ! तसा मी अजून लहानच आहे. मग मी चॉकलेटस्‌चा हट्ट धरला तर त्यात वावगं काय आहे ?’

माझ्याशी वितंडवाद घालणे त्या नेहमी टाळत. न्यू जर्सीला मी चक्क बॅटरीवर चालणारी अन् टाळी वाजताच चालू व बंद होणारी व दिशा बदलणारी छोटी मोटार घेण्याचा हट्टच घेतला. माई माझी कीव करीत म्हणाल्या,

‘ अहो, तुम्ही चालवलंय काय हे? आठवणीसाठी भारताला एखादी चांगली वस्तू घेऊन चला. मोटार, विमान, हेलिकॉप्टर अशी खेळणी घेण्याचे तुमचं वय आहे का आता ? तुमच्या मुलाचं एव्हाना लग्न झालं असतं तर,

तुम्हाला नातू झाला असता.'

मी शांत चित्ताने म्हणालो, 'बालपणाची जाणीव मी मरेपर्यंत विसरणार नाही. मी शेवटपर्यंत खऱ्या अर्थानं 'बाबा'च रहाणार आहे. माझ्या आवडी-निवडी बदलण्याचा उगाच अट्टाहास धरू नका. ते कधीही तुम्हाला शक्य व्हायचं नाही.' असं म्हणत मी ती इलेक्ट्रॉनिक्सची मोटार खरेदी केली. 'लहानपण देगा देवा, तोचि मुंगीसाखरेचा रवा.' माझी आणि लहानमुलांची गट्टी एकदम जमते. मोठ्यांना मला ओळखायला बराच अवधी लागतो. लहान मुल हे ईश्वरासमान असते. राग, द्वेष, लोभ, मत्सर असे कलंक त्य ला लागलेले नसतात. आणि अशा निष्पाप बालकाशी ज्याचं नातं लवकर जडतं त्यालाच जीवनाचा अर्थ सापडण्याची शक्यता असते

कोको बीचवर गेलो तेव्हा दोन वाजले होते. फार भूक लागली होती. बीचकडे वळताना कोपऱ्यावर एक चायनीज हॉटेल दिसले होते फटा-कड्यांच्या पाकिटावर असतात तशा वेडीवाकडी अक्षरे दिसली की चायनीज हॉटेल हे ओळखायचं. हॉटेल शांत होतं. कोपऱ्यात एक गोरं जोडपं गप्पांत मश्गुल झालेलं होतं. हॉटेलातल्या वेटर पोरीनं मेनू-कार्ड टेबलावर आणून ठेवलं आणि ती अदबीनं कमरेत वाकली. 'स्वीट कॉर्न सूप, चिकन चाऊमेन, फ्राईड पॉम्फ्रेट ॲन्ड वन लार्ज फ्राईड राईस' उमेशनी ऑर्डर सोडली. त्यांना प्रॉन्सची ॲलर्जी तर माईंना प्रॉन्स प्राणप्रिय! त्यांनी आपल्यासाठी प्रॉन्स वुईथ नुडल्सची एक डीश मागवली. त्या दोघांच्या आवडी-निवडीत भिन्नता असल्यामुळे माझी चंगळ असते. मला सर्व जलचर प्राणी चालतात आणि कुक्कुटवंशाचे पक्षीही त्याज्य नाहीत. त्यामुळे दोघांच्यातले थोडे थोडे घेता येतं. तसा मी फारसा खाऊखादाड नाही. मोजकंच खातो, पण ते चवी-रवीचं लागतं एवढचं!

त्या चायनीज हॉटेलमध्येही माईंना ग्रीन चिली सॉस मिळाला. एकदा नायगाऱ्याला मिळाला आणि दुसऱ्यांदा इथं त्यामुळं त्या खूष होत्या. टीनच्या बिअरचे घुटके घेत मी जेवत होतो. भारत सोडल्यापासून वजन वाढत होतं

बिअर पिऊन ढेरी सुटल्यासारखी झाली होती. प्रवासात बसून बसून गुडघे दुखत होते. व्यायाम मुळीच होत नव्हता. कुठे स्विमिंग टँक असेल तिथं ननमोक्त पोहोत होतो तेवढंच.

जेवण उरकून बसकडे आलो. सर्व सहप्रवासी बसमध्ये आपापल्या जागेवर स्थानापन्न झाले होते. पण म्हातारा नंदी पुन्हा कुठं गायब झाला होता. एकदा हिंदुजा कुटुंबातला तो भला मोठा माणूस चुकला होता, तर कधी तुलसी पति-पत्नी, रोमिओ-ज्युलिएट कुठं बेपत्ता होत. आज खांद्याला T. C. I ची पिवळी बॅग अडकावून तिरकस चालणाऱ्या नंदीचाचाचा पत्ता नव्हता. 'नंदी कुठे गेला असेल बुवा ?' डॉ. होशिंग वैतागानं म्हणाले.

मी खट्याळपणे उद्गारलो, 'म्हैसूरला, हीलसवर.' तोवर कोणीतरी म्हणालं, 'मघा बाजूच्या पबवर पीत उभा होता. तेथून कुठं गेला समजत नाही.'

चार पायांचा नंदी त्या बीचवरून चालत चालत कुठे गेला हे पावलठां– करून ओळखता आलं असतं. पण हा दोन पायांचा नंदी कुठं गेला हे समजायचं कसं ? सगळ्यांच्याच पावलांचे ठसे एकसारखे. गाडीत दोघेजण कानडी होते. ते वैतागून म्हणाले, 'या थेडर्याला काही समजतं की नाही ? इतक्या सगळ्या लोकांना तिष्ठत ठेवायला याला काहीच कसं वाटत नाही ?'

इतक्यात तो दुरून येताना दिसला. तेव्हा कुठं सर्वांना हायसे वाटले. तो गाडीत आल्यावर सगळेजण त्याच्यावर उखडले. तोही भडकला. अगोदरच त्यानं पोटात थोडी टाकली होती. अन् सगळे कावकाव करायला लागले. तेव्हा तो वैतागून म्हणाला, 'तुम लोग हमेशा देर करते । मैं एक दीन देरसे आया तो क्या तुम्हारा बाप मर जाता है ?' घ्या ! त्यानं एकदम लोकांचा बापच उद्धारला. शब्दाशब्दीचं रूपांतर हातघाईत होतं की काय अशी शंका येऊ लागली. पण मेहेरनोश पटेलनं त्या दोघांनाही शांत केलं.

बसने पुढचा प्रवास सुरू केला होता. वाटेत एक अतिशय सुंदर शहर लागले. बाहेरून पांढरे रंगवलेले, मंगलोरी कौलांसारखी कौलं असलेले बंगले, बंगल्याभोवताली लॉन, फुलझाडं आणि कंपौंडभोवताली चक्क नारळीची झाडं. भारताच्याच एखाद्या शहरातून चालल्याचा भास होऊ लागला. सारं वातावरण भारतीय होतं. माणसंसुद्धा इतर अमेरिकननांच्या

सारखी लालबुंद नव्हती. मायामीला आमची गाडी उशीरा पोहोचणार होती म्हणून एका मोठ्या डिपार्टमेंटल स्टोअर्सपुढे बस उभी करून मेहेरनोश पटेल म्हणाला, ' आपण मायामीत उशीरा पोहोचणार आहोत. तेव्हा तिथं जेवण मिळणार नाही. तुम्ही लोकांनी इथंच काहीतरी खाऊन घेतलेलं बरं. पण ती काही जेवणवेळ नव्हती. माई म्हणाल्या, ' इथं जेवण्यापेक्षा सोबतच काहीतरी घेऊ. मायामीला पोहोचल्यानंतरच जेवण करू. '

आम्ही तिघेही त्या प्रचंड डिपार्टमेंटल स्टोअर्समध्ये गेलो. रोस्टेड चिकन्, बॉईल्ड बीन्स, ब्रेड, बटर, चीज अशा न सांडणाऱ्या खाद्यवस्तू खरेदी केल्या. मला त्या गावाबद्दल भलतंच आकर्षण वाटल्यानं मी आमच्या बसच्या ड्रायव्हरला त्या गावाचं नाव विचारलं. तो ' बोया रॅटाँ ' असं काहीतरी म्हणाला. मला त्याचा तो उच्चार काही केल्या आकलन होईना, म्हणून मी सरळ माझ्या खिशातली डायरी काढली, पेनचं टोपण उघडलं आणि दोन्ही त्याच्यासमोर धरून म्हटलं, ' Will you please kindly spell it ? '

' O ' kay ' . ' असं म्हणत त्यानं माझ्या हातून पेन व डायरी घेतली अन् त्या गावाचं नाव लिहिलं ' **BOEA RATON.** ' मी त्याला लगेच विचारलं, ' हे बंगले सारे मोकळे का दिसतात ?'

' त्यावर तो किंचित् स्मित करून म्हणाला, ' अमेरिकेतल्या अत्यंत श्रीमंत लोकांचं हे हवापालट करण्याचं गाव आहे. हिवाळ्यामध्ये पूर्व आणि मध्य अमेरिकेत अतोनात वर्फवृष्टी होते त्यावेळी या गावची हवा अतिशय सुखद असते.'

' म्हणजे या भागात वर्फ पडत नाही ?'

' पडते, पण अगदी क्वचित ! जवळ जवळ नाहीच म्हणा. आवडलं तुम्हाला हे गाव ?'

' होय, मला आमच्या बेंगलोरसारखं वाटलं. '

' यू आर फ्रॉम बँगलोऽऽऽर ?'

' नो, आय एम् फ्रॉम बॉम्बे !'

' ओह, डॅटस् ए ग्रेट इंडियन सिटी !'

मी मनाशी म्हणालो, ' ग्रेट इंडियन सिटी ' एकेकाळी होती. मुंबई या शहराचं वैभव केव्हाच लोप पावलं आहे. रस्त्यावरचा एक फुटपाथ

चालण्यासारखा राहिलेला नाही अंडरग्राऊंड ड्रेनेजचे पाईप जागोजागी फुटलेले आहेत जागा दिसेल त्या ठिकाणी झोपडपट्टी उभी राहिली आहे. जगातलं सर्वात घाणेरडं शहर बनलंय 'बॉम्बे! पण मी काही एक न बोलता उगाच मान हलवून म्हणालो, 'यस्, इट इज ए ग्रेट इंडियन सिटी!'

अधून–मधून मी मुंबईतल्या वरच्या दुनियेत काय चाललंय हे पाहण्यासाठी सन् अॅन्ड सॅन्ड,' ओबेरॉय शेरेटेन, ताजमहाल अशा आलिशान हॉटेलांत जातो. तिथल्या बारमध्ये स्कॉच पिणारी आणि डनहील सिगारेट ओढत हास्यविनोद करणारी मंडळी बघतो अन् त्याचवेळी धारावीजवळचा हातभट्टीचा गुत्ता डोळ्यासमोर येतो. या पंचतारांकित हॉटेलच्या बारमध्ये माझ्यासमोरच्या चांदीच्या वाटीत वेफर्स आणि तळलेले काजू असतात. पण माझ्या डोळ्यासमोर गुत्त्यातून हातभट्टी झोकून आलेला, लालभडक तिखट लावलेले गुलाबी वाटाणे तोंडात टाकत उभा असलेला गिरणी मजूर दिसतो, अन् वाटते, ही दरी कधीच सांधली जाणार नाही का? या देशातल्या असंख्य गोरगरिबांचं दुःख, दारिद्र्य आणि दैन्य दिसू नये म्हणून आपण डोळ्यावर किती दिवस कातडं ओढून घेणार? मला कुठला 'इझम' फारसा समजत नाही.

पण अतोनात संपत्ती कमावणाऱ्यांच्याबद्दल माझ्या मनात तिरस्कार आहे. प्रायव्हेट सेक्टर, पब्लिक सेक्टर, यातला वाद मला थोडाफार समजतो. देशामध्ये उद्योगधंदे वाढायचे असतील अन् देशाची उत्पादनक्षमता सुधारायची असेल तर, खासगी उद्योगधंद्यांना प्रोत्साहन देण्याची गरज आहे हेही कबूल. पण म्हणून देशाच्या सर्वसामान्य जनतेनं इतक्या हलाखीचं, पशुतुल्य जीवन कंठावं हे बिलकुल मान्य नाही. नागरिकांना हवा तो उद्योगधंदा करण्याचं स्वातंत्र्य जरूर असावं; पण संपत्ती जमवण्यावर नियंत्रण हे हवेच! तसं सामोपचारानं जर नाही घडलं, तर एक ना एक दिवस असंतोषाचा प्रचंड भडका उडेल!

मायामीला पोहोचलो तेव्हा रात्रीचे आठ वाजले होते. आकाश भरून आलं होतं. हवेत किंचित गारवा जाणवत होता. दूरवर कुठेतरी मेघगर्जना होत होती. हॉटेल कोलंबस या मियामीच्या प्रख्यात हॉटेलात ११ व्या मजल्यावर खोली मिळाली होती. आंघोळ करून जेवण उरकलं. अन्

अंथरुणावर अंग टाकतो न टाकतो तोच विजेचा प्रचंड लोळ उठलेला खिडकीतून दिसला आणि त्यापाठोपाठ मेघांचा गडगडाट झाला. तो इतका तीव्र होता की, खिडक्यांची तावदाने कंप पावू लागली. अमेरिकेच्या प्रवासात वादळी वारे, विद्युल्लतेचे तांडवनृत्य, ढगांचा गडगडाट आणि अफाट पाऊस बऱ्याच वेळा अनुभवले. जून आणि जुलै हे दोन पावसाचे महिने भारताबाहेर घालवायचे असे ठरवून बाहेर पडलो होतो, पण जिथं तिथं पाऊस मागे मागे येत होता. मध्यरात्रीपर्यंत ढगांचा कडकडाट होत होता.

सकाळ मात्र प्रसन्न होती. आकाश निरभ्र होते. रात्रीच्या पावसानं सारी मायामी भिजून निघाली होती. सकाळी ब्रेकफास्ट उरकून आम्ही मायामी शहरातले प्रमुख असे जे आकर्षण ' मायामी बीच ' बघायला बाहेर पडलो. पण त्या दिवशी लोकांना सुट्टी नव्हती. ' वर्कींग डे ' असल्यानं सागर-किनारा ओस पडल्यासारखा दिसत होता. युरोप आणि अमेरिकेत सागर–किनाऱ्यावर ऊन खात पडलेल्या ललना बघायची नजरेला सवय झाली होती. त्यामुळं एखाद्या बीचवर जर ' सनबाथ ' घेणाऱ्या स्त्रिया नसल्याच तर, तो किनारा अक्षरश: ओस पडल्यासारखा भासे. अमेरिकेला जाण्यापूर्वी मायामी बीचचं एक दृश्य मी व्ह्यू मास्टरवर घरी वारंवार बघत असे. स्वच्छ सूर्यप्रकाश, पिवळी जर्द रेशमी पुळण, निळाभोर दर्या या पार्श्वभूमीवर शेकडो तरुण–तरुणी मनसोक्तपणे वाळूत लोळताहेत असं ते दृश्य मोठे मोहक आहे. पण प्रत्यक्षात मायामीचा तो निर्मनुष्य बीच पाहून मन काहीसे खट्टू झाले. त्या निर्मनुष्य बीचवर मी थोडावेळ फिरलो. आधल्या दिवशी, म्हणजे रविवारी शेकडो लोकांनी त्या किनाऱ्यावर सूर्यस्नान घेतले असेल. सोबत नेलेल्या खाद्यपदार्थांचा आस्वाद घेतला असेल. पण तिथं एकही कागदाचं चिठोरं, सिगारेटचं थोटूक किंवा बीअरच्या मोकळ्या बाटल्या किंवा टीन दिसले नाहीत. तिथं मला आठवला तो जुहूचा किनारा. दिवसा तिथं जाऊन पहा. फोडून टाकलेल्या शहाळी, भेळपुरीचे चुरगाळलेले कागद, बिअरच्या फोडून टाकलेल्या बाटल्या, अन् जाऊ दे तिथं आणखीन काय काय वस्तू दिसतात हे सारं लिहावसं मला वाटत नाही. आमच्या पन्हाळ्यावर काही आंबटशौकीन येतात, बिअर पितात आणि रस्त्यावर त्या बिअरच्या बाटल्या फोडून निघून जातात. पण

याच रस्त्यावरून अनवाणी जाणाऱ्यांच्या पायात काच घुसेल याचा साधा विचारसुद्धा यांना कसा येत नसेल ?

मायामी या शहरात तसं फारसं काही पाहण्यासारखं नव्हतं. म्हणून ' बीच ' पाहून झाल्यानंतर लगेचच आम्ही मायामीचा निरोप घेतला. आता पूर्व अमेरिकेच्या प्रवासात महत्त्वाचं असं शहर पाहायचं होतं, ते म्हणजे वॉशिंग्टन डी. सी. – अमेरिकेच्या राजधानीचे शहर. पण वॉशिंग्टनला पोहोचण्यापूर्वी वाटेत दोन ठिकाणी मुक्काम करावा लागणार होता. एक ' जॅकसन् व्हील ' इथं आणि दुसरा ' रॅले 'ला.

खरं म्हणजे आता प्रवासाचा कंटाळा येऊ लागला होता. त्यात रोज समोर नवीन नवीन चेहरे असले की, बरं वाटतं. आमच्यासोबत आलेल्यांपैकी आपुलकी वाटावी, प्रवासात मैत्री जडावी अशी फारशी माणसं नव्हती. त्यांचे ते ठरावीक जोक्स् ऐकून कंटाळा आला होता. कधी कधी लहानसहान प्रवासातसुद्धा चांगली माणसं भेटतात. त्यांच्याशी दृढ असे मैत्रीचे संबंध निर्माण होतात आणि ते आयुष्यभर टिकतात. पण युरोप आणि अमेरिकेचा पूर्वकिनारा एवढी प्रचंड सफर करूनही कुणाशी मैत्रीचे धागे जमत नव्हते. बसमध्ये नंतर नंतर पत्त्याचे डाव मांडले जात होते. अधून मधून कुणाकुणाला कंठ फुटत होता. पण त्यामुळंसुद्धा प्रवास सुसह्य व्हावा असं फारसं काही घडत नव्हतं.

न्यूयॉर्कला आम्ही प्रथम जेव्हा आलो, तेव्हा न्यूजर्सीजवळ सक्कासन्ना या ठिकाणी गेली आठ वर्षे वास्तव्य करून असलेल्या श्री. सुरेश खानविलकर यांना फोन केला होता. टी. सी. आय. ची टूर संपताच आम्ही पुन्हा स्वतंत्ररीत्या पश्चिम अमेरिकेला जाणार होतो. पश्चिम अमेरिकेत माझे दुसरे परिचित उदय पाटील हे लॉस एंजेलेसला राहतात. त्यांच्याकडं चार–दोन दिवस रहायचं होतं आणि सर्वांत मोठं आकर्षण होतं ते सॅनडिएगोचं !

गेल्या तीन वर्षांपूर्वी माझी ' कांचन ' ही बिहारच्या पार्श्वभूमीवरची कादंबरी प्रकाशित झाली होती. ती कुणा मराठी माणसानं सॅनडिएगोला पश्चिम अमेरिकेत नेली. ती कादंबरी सौ. शालिनी सराफ या महाराष्ट्रीयन बाईच्या वाचनात आली. या शालिनी सराफनी सॅनडिएगोवरून पत्र पाठवून माझ्या कादंबरीचं मनसोक्त कौतुक केलं आणि त्याच पत्रात त्यांनी मला

अमेरिका भेटीचे निमंत्रण दिले. आता मुंबई, पुणे, कल्याण, ठाणे, कर्जत, लोणावळा, डोंबिवली, नाशिक, श्रीरामपूर, अहमदनगर, सांगली, सातारा, सोलापूर अशा महाराष्ट्रातल्या अनेक शहरांतून आणि मराठवाडा, विदर्भ याही भागातून मला माझ्या वाचकांनी आपल्या घरी येण्याची निमंत्रणं वारंवार दिली आहेत. पण त्या सर्वांच्याकडं साधं उभ्या उभ्या जावं म्हटलं तरी, शक्य होत नाही. तेव्हा तीन वर्षांपूर्वी जेव्हा सराफ बाईंचं अमेरिका भेटीचं निमंत्रण आलं तेव्हा ते पत्र वाचून घडी करून ठेवत मी माईंना म्हणालो, ' हे कसं शक्य आहे ?'

त्या म्हणाल्या, ' का ? शक्य का नाही होणार ? प्रयत्न केल्यानंतर कोणती गोष्ट जगात अशक्य आहे ?' मी त्यांच्या त्या सुभाषितवजा उत्तराने स्मित करून म्हणालो, ' माणसानं प्रयत्नवादी जरूर असावं, हवेत किल्ला बांधण्याचा प्रयत्न केला तर तो कधीतरी यशस्वी होईल का ? माझी ही नोकरी अशी. हेडक्वार्टर सोडायला सुद्धा वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांची परवानगी घ्यावी लागते; आणि समजा, तशी परवानगी मिळालीच, तर परदेश प्रवासाला लागणारा खर्च कोठून उभा करायचा ? शिवाय आपण दोघे जाणार म्हटल्यावर उमेशना काय वाटेल ?'

पण योगायोग कसा विलक्षण असतो बघा. उमेशनी हेग इथं भरणाऱ्या आंतरराष्ट्रीय चर्चा-सत्रात व ट्रेनिंग प्रोग्राममध्ये सहभागी होण्यासाठी हेग इथल्या इंटरनॅशनल लॉ अकॅडमीत अर्ज केला होता त्याना तिकडून परवानगी मिळाली. त्यांचे ते चर्चा-सत्र सुरू होण्यापूर्वी सुमारे दोन महिने आम्ही युरोप आणि अमेरिका या देशांचा दौरा करू शकू अशी एक योजना त्यांनी समोर ठेवली. प्रथम ट्रॅव्हल कॉर्पोरेशन ऑफ इंडियाची टूर घ्यायची अन् त्यानंतर ती टूर संपताच आपण स्वतंत्ररीत्या पूर्व अमेरिकेचा काही भाग आणि पश्चिम अमेरिकेचा काही भाग फिरून पाहायची अशी ती योजना होती. मग भराभर चक्रं फिरू लागली. पासपोर्ट मिळवण्यासाठी मी अर्ज केला. त्यात अनेक अडचणी आल्या. शेवटी पासपोर्ट मिळाला, पण अमेरिकन कोन्सुलेटनं हरकत घेतली ' तुम्ही नवरा-बायको आणि मुलगा तिघेही अमेरिकेला जाऊ इच्छिता, तेव्हा तुमचा तिथंच स्थाईक होण्याचा इरादा तर नाही ?'

मग त्याला सारं पटवून दिलं आणि अमेरिकेचा व्हिसा मिळाला. सर्वांत

महत्त्वाची बाब होती ती पैशाची. तिघांनीही जायचं म्हटल्यावर बराच पैसा खर्च होणार होता. पण अर्थखाते हे सर्वस्वी माई आणि उमेश पाहात असल्याने माझ्या डोक्याला तो ताप झाला नाही.

कुठल्याही शुभ कार्याला सुरुवात करताना दुस-यांचा सल्ला कधीही घेऊ नये. पण एक दूरचे नातेवाईक घरी आले असता मी माझ्या सरळ स्वभावानुसार बोलून गेलो. 'आम्ही तिघेही युरोप अमेरिकेला चाललो आहोत !' ते गृहस्थ क्षणाचाही विलंब न लावता उद्‌गारले.

'मुळीच जाऊ नका, बोअर व्हाल !'

'असं. का बरं?'

'अहो तिथं आहे काय? उंच इमारती, लाखो मोटारी आणि एकसारखी धांदल आणि धावपळ !

'मग तिथं जायला आणि स्थाईक व्हायला माणसं का धडपडतात?'

'मूर्ख म्हणून !

मला या नातेवाईकांशी जास्त चर्चा करण्याची इच्छा उरली नाही. दुसऱ्यांच्या उत्साहावर पाणी टाकण्याची वृत्ती मी अनेकांच्या जवळ बघितली होती. माझ्यासमोर येणारा प्रत्येक माणूस हा माझा अभ्यासाचा विषय असतो. काहीजण माझ्यासमोर लंब्याचवड्या थापा ठोकतात. मी त्या चेहऱ्यावर भाबडेपणा आणून ऐकत असतो. एखाद्याला धादांत खोटं बोलण्यात जर सुख लाभत असेल, तर त्याला त्या सुखापासून वंचित करा कशाला?

शेवटी एकदाची विमानानं मुंबई सोडली, तेव्हा कुठं जीव भांड्यात पडला. एक महाराष्ट्रीयन माणूस. सद्‌मार्गानं मिळवलेल्या पैशातून आपली पत्नी अन् मुलगा यांना घेऊन परदेश-पर्यटनास निघाला होता. माझ्या परिचयाचे अनेक महाराष्ट्रीयन परदेश-पर्यटन करून आले होते, पण कोणी एखादा फर्मच्या पैशावर तर कोणी सनदशीर मार्गानं कमवलेल्या पैशावर ! माणसाला एखादे सुख मनसोक्त अनुभवायचं असेल तर, त्या साठी खर्च होणारं धन हे सुद्धा निष्कलंक असायला हवं !

जॅक्सनव्हील आणि रॅले या वॉशिंग्टनच्या वाटेवरच्या दोन गावांमधे प्रत्येकी एक मुक्काम घडला. जॅक्सनव्हील इथल्या हॉटेलात गेल्या गेल्या आम्हाला 'ड्रिंक्स'चे पास देण्यात आले. त्या पासवर 'शिवाज रिगल'चे

दोन पेग घेतले. सकाळी उठलो आणि चहा बनवण्यासाठी घेतलेला ग्लास हिटर शोधू लागलो. तो मिळालाच नाही. मियामीच्या हॉटेल कोर्ट्वस इथं तो विसरला होता. दुसऱ्या दिवशी त्यासारखा नवीन हिटर महत्प्रयासानं उमेशनी पैदा करून आणला. सर्वसाधारणपणे अमेरिकेतल्या डिपार्टमेंटल स्टोअर्समध्ये तुम्हाला हवी ती गोष्ट कधी मिळत नाही असं होत नाही. पण जॅक्सनव्हीलची ती चार डिपार्टमेंटल स्टोअर्स धुंडाळली तरी चहा बनवण्याचा हिटर काही भेटला नाही. बार्शी आणि सोलापूर इथं असताना ' भाजी भेटली नाही, ' ' दुकानात सुपारी भेटली नाही ' असे गमतीचे वाक्प्रचार लक्षात राहिले होते. पण जॅक्सनव्हीलमध्ये चिरंजावांना तो हिटर कुठेतरी ' भेटला. '

रॅलेवरून वॉशिंग्टनला जाताना प्रचंड शेतं दिसली काही ठिकाणी स्प्रिंकलर्सनी शेताला पाणी घालण्याचं काम सुरू होतं. अशा प्रकारे पिकांना पाणी घालण्यानं पाण्याची फार मोठ्या प्रमाणावर बचत होते. आपल्याकडे शेतांना पाटानं जे पाणी पाजवलं जातं त्यात तीन चतुर्थांश पाणी जमिनीत मुरून वाया जातं. तिथल्या शेतातली टुमदार घरं, प्रत्येक घरावर टी.व्ही.ची ( अँटेना ) एरियल, फोन, दारात एक-दोन स्टेशन वॅगन्स उभ्या. कुठेही चारदोन गोरे शेतकरी मिळून सिगारेट, चिरूट फुंकत चकाट्या पिटत उभे राहिल्याचं दृश्य दिसलं नव्हतं. मी नेहमी आपल्याकडे खेड्यावर मुक्कामाला जातो. बार्शीला असताना आगळगाव या गावी मी अनेकवेळा मुक्कामाला गेलो आहे. त्या गावाचा एक रिवाज, रोज सकाळी उठायचं, घरी चहापाणी उरकायचं अन् अंगाभोवती पासोडी गुंडाळून गावच्या चौकात यऊन उभं रहायचं, बाजूला दर्गा आहे त्या दर्ग्यावर पाठ उन्हाला करून तासन् तास् पान–तंबाखू चघळत बसायचं. चर्चेला कोणताही विषय चाले. एकदा असाच विषय चालला. ' आयला, फाटकीतल्या उनाळी भुईमुगाचा हारनांनी काटाच काडला की ! ' तोवर चुंब या गावचे प्रगतीशील शेतकरी भिमराव मुंडे आपला ट्रॅक्टर आणि ट्रॉली घेऊन बार्शीहून गावाकडे निघाले होते ते आगळगावच्या चौकात पाच मिनिटं थांबले. तेव्हा त्यांच्या ट्रॅक्टर–भोवताली पन्नास माणसांचा गराडा पडला. मग तिथं स्थानिक राजकारणा-वर चर्चा रंगली. चहा, पान–तंबाखूची देवाणघेवाण झाली. असे प्रकार

वर्षानुवर्षं चालू असतात ! आणि असे प्रकार पाहायची सवय असलेल्या माझ्या डोळ्यांना सतत आपल्या कामात मग्न असलेला अमेरिकन शेतकरी पाहून आपण काहीतरी विचित्र पाहात आहोत असं सारखं वाटत होतं ! पण हाच अमेरिकन शेतकरी शनिवार आणि रविवार कामाकडं ढुंकून पाहात नाही. तो गाडीत बायकापोरं घालून कुठं तरी जंगलात शिकारीला जाईल, नाहीतर एखाद्या सुरूच्या झाडांनी वेढलेल्या तलावाकाठी आपला कॅंपर सोडून बिअरचे घुटके घेत, मासे पकडत बसेल. त्यावेळी त्याची बायको दोन झाडांना झुलता पाळणा बांधून एखादी आवडीची कादंबरी वाचत पहुडलेली असेल अन् मुलं धनुष्यबाणाचं निशाण कोण अचूक उडवतो याची पैज लावून खेळत असतील. अमेरिकन लोकांची कुटुंब–व्यवस्था उद्ध्वस्त झाली आहे असं म्हटलं जातं. अमेरिकेचा धावता दौरा केल्यामुळं पांढरपेशा अमेरिकन जीवनाचा अभ्यास करायची संधी मला मिळाली नाही हे जरी खरं असलं, तरी जे कष्टकरी अन् कामगार लोकांचं जीवन मी जवळून पाहिलं, त्यात मला कुटुंबवत्सलताच अधिक दिसून आली.

वॉशिंग्टन डी. सी. ! अमेरिकेत दोन वॉशिंग्टनस् आहेत. पण त्यांपैकी वॉशिंग्टन, डिस्ट्रिक्ट ऑफ कोलंबिया हेच ते राजधानीचे शहर. पोटोमॅक नदीच्या काठावर वसलेलं हे शहर अत्यंत देखणं आहे. ' कॅपिटॉल ' बिल्डिंग अत्यंत भव्य आहे. आतली कलाकुसर आणि भिंतीवरची ऐतिहासिक पोर्ट्रेटस् अप्रतिम आहेत. माहिती देणारा गाईड हळू आवाजात त्या वास्तूची पार्श्वभूमी आणि ऐतिहासिक महत्त्व विशद करून सांगत होता. या कॅपिटॉल बिल्डिंगशेजारीच लायब्ररी ऑफ काँग्रेस आणि सुप्रीम कोर्ट या दोन भव्य इमारती आहेत. लायब्ररीत हस्तलिखितापासून ते अद्ययावत् प्रकाशनापर्यंत सर्व प्रकारचे ग्रंथ आहेत. आम्ही गेलो तेव्हा शे-दोनशे माणसं लठ्ठ अशा ग्रंथात डोकं खुपसून बसली होती. टाचणी पडली तरी आवाज यावा इतकी शांतता आजूबाजूला नागरिकांनी राखली होती. आमच्याकडे नगर वाचनालय हे गावच्या मध्यभागी असते. तेथून जवळच कोणाचेतरी बारसे किंवा लग्न गाजत असते अन् मोठमोठ्यानं लाऊडस्पीकर कोकलत असतो. पण लायब्ररी-शेजारचं हे आवाजाचं प्रदूषण बंद करायची कोणाची प्राज्ञा नसते. अमेरिकेत कोणी असा शांतताभंग केला तर, त्याला न्यायालयात खेचलं जाईल. आमची

सहनशीलता ही सहनशीलता नव्हेच, तो भ्याडपणा आहे–गुंडगिरीला आणि आडदांडपणाला मान तुकवणारा !

सुप्रीम कोर्टाच्या बिल्डिंगकडं पाहून मी हात जोडले. लोकशाहीतील न्यायव्यवस्था निर्भय असावी लागते. ती तिथं आहे. लोकशाहीतील लोकमतापुढे शासनकर्त्यांना मान तुकवावी लागते. ज्या वॉटरगेट स्कॅंडलने प्रेसिडेंट निक्सनला खुर्ची सोडावी लागली, ती वॉटरगेटची इमारतही बघितली. वॉशिंग्टनमध्ये मी भारावून गेलो ती जागा म्हणजे, अध्यक्ष जॉन फिट्जेराल्ड केनेडी यांचे दफन केलेली जागा पाहून ! तिथं सदैव एक ज्योत प्रज्वलित झालेली असते. केनेडी आणि नेहरू हे दोन आंतरराष्ट्रीय कीर्तीचे नेते जेव्हा गेले, तेव्हा अनेकांना दु:ख झाले. या दोघांच्या मानवतावादी दृष्टिकोणामुळे त्यांना अखिल जगतात मानमान्यता मिळाली होती. नेहरू गेले तेव्हा त्यांनी पंचाहत्तरी गाठली होती, पण केनेडींचा खून हा अनपेक्षित आणि धक्कादाई होता. अब्राहम लिंकननंतर अमेरिकेच्या इतिहासात अत्यंत लोकप्रिय झालेले प्रेसिडेंट केनेडी यांनी अंतराळ–संशोधनाच्या प्रगतीला दिलेली प्रेरणा, कला, संस्कृती यांच्या अभिवृद्धीसाठी केलेले प्रयत्न आणि याहीपेक्षा आंतरराष्ट्रीय सामजस्य निर्माण करण्यासाठी केलेले अविरत प्रयत्न यांमुळेच त्यांना जागतिक कीर्ती लाभली होती. त्यांच्या निर्घृण हत्येमुळे एक मानवतावादी नेता अकाली हरपला.

केनेडींच्या स्मरणार्थ अमेरिकेने स्पेस सेंटरला त्यांचे नाव दिले, जॉन. एफ्. केनेडी सेंटर फॉर द परफॉर्मिंग आर्टस्. ही अतिशय भव्य आणि देखणी वास्तु त्यांच्याच स्मरणार्थ बांधण्यात आली. या इमारतीच्या उभारणीसाठी जगातल्या सर्व राष्ट्रांनी उत्तमोत्तम अशी साहित्यसामग्री पुरवली आहे. या इमारतीत नवीन पद्धतीनं बनवलेला जॉन केनेडींचा एक प्रोफाईल आहे. याशिवाय या आपल्या दिवंगत लाडक्या नेत्याचं नाव न्यूयॉर्कच्या आंतरराष्ट्रीय विमानतळाला देण्यात आलं आहे. नेत्यांच्या आणि पुढाऱ्यांच्या नावानं अशा संस्था जरूर सुरू कराव्यात. लाखो रुपये किमतीचे त्यांचे धातूचे पुतळे उभा करून त्यांची स्मृती चिरंतन ठेवली जाते ही कल्पनाच भ्रामक !

वॉशिग्टन शहरात याशिवाय आणखीन कितीतरी प्रेक्षणीय स्थळं आहेत.

आर्लिंग्टन दफनभूमीत दुसऱ्या महायुद्धात कामी आलेल्या जवानांच्या स्मृती जागृत ठेवण्यासाठी त्यांच्या नावाचे फलक ओळीने लावलेले आहेत. पण मला सर्वांत आश्चर्य वाटलं ते सेनेटर रॉबर्ट केनेडी यांचे थडगे पाहून. त्या महाभागाने आपल्या हयातीत लिहून ठेवले होते : 'माझ्या थडग्यासाठी कसलाही खर्च करण्याचा नाही. फक्त एक लाकडी क्रॉस आणि त्यावर माझे नाव, बस्स!'

माझ्या पाहण्यात दोन वृद्ध पुढारी आहेत. एकाचा पुतळा उभा करण्याची योजना कोणाच्यातरी डोक्यातून निघाली. ती त्या वृद्ध पुढाऱ्यांना समजली आणि त्या गृहस्थांनी चक्क रिक्षा करून अनेक कार्यकर्त्यांना भेटून हात जोडून कळकळीची विनंती केली : 'माझ्या हयातीत एवढा माझा पुतळा उभा केल्याचं मला डोळे भरून पाहू द्या ! दुसरे एक महाशय असेच. सार्वजनिक समारंभाला यांना बोलावणे यावे अशी व्यवस्था करणारी यंत्रणाच त्यांनी आपल्याभोवती निर्माण करून ठेवलेली आहे. समारंभात त्यांचे ते रटाळ आणि कंटाळवाणे भाषण होते, त्या समारंभाचे फोटो घेतले जातात आणि रात्रीच्या रात्री ते स्थानिक वृत्तपत्रांकडे पाठवले जातात – दुसऱ्या दिवशीच्या आवृत्तीत पहिल्या पानावर छापून येण्यासाठी ! कुठं तो सेनेटर रॉबर्ट केनेडी, आणि कुठं आमच्याकडचे हे उत्सवप्रिय 'फुढारी'!

वॉशिंग्टन इथं लिंकन मेमोरियलसुद्धा अविस्मरणीय असे ठिकाण आहे. अब्राहम लिंकन यांचा भव्य संगमरवरी पुतळा अतिशय सुरेख असा बनवलेला आहे. त्याशिवाय इतरही ठिकाणं बघण्यासारखी आहेत. त्यात जेफरसन मेमोरियल, स्मिथसन् म्युझियम ऑफ नॅचरल हिस्टरी, अध्यक्षांचे निवासस्थान – व्हाईट हौस, वॉशिंग्टन मॉन्यूमेंट, इत्यादी ठिकाणं प्रेक्षणीय वाटली. पण या भेटीत माझ्या लक्षात राहिली ती आर्लिंग्टन दफनभूमी. ज्यांनी राष्ट्रासाठी आपल्या प्राणांची आहुती दिली, त्यांची स्मृती जतन करून ठेवण्याची अमेरिकनांची वृत्ती त्यातून दिसून आली. सैनिक हेच राष्ट्राचे खरे आधारस्तंभ असतात. त्या राष्ट्राच्या रक्षणकर्त्यांची पुरेपूर बूज ठेवणं, त्यांच्या पश्चात त्यांच्या बालबच्चांची चिंता वाहणं हे राजकर्त्यांचं आद्य कर्तव्य असतं. माझ्या ओळखीच्या एका तरुण मेजरने दोन वेळा भारत-पाक

युद्धात भाग घेतला होता. दोन्ही वेळेस त्याला जबर दुखापत झाली आणि युद्धकैदी म्हणून तो पकडला गेला होता. तो सुटल्यानंतर त्याला सरकारने डिसॅबिलिटी पेन्शन सुरू केली. त्याला राहायला जागा नव्हती म्हणून त्याने सरकारी मालकीची जागा घर बांधण्यासाठी मागितली; पण कित्येक वर्षे त्याची दाद कोणी घेतली नाही. सोल्जर बोर्ड नावाची एक संस्था प्रत्येक जिल्ह्याला असते, पण निवृत्त किंवा जखमी सैनिकांची गाऱ्हाणी वेशीवर टांगायला ही यंत्रणा फारशी उपयुक्त ठरत नाही असा अनेकांचा अनुभव आहे.

वॉशिंग्टन शहर दोन दिवस फिरून पाहिलं. तिसऱ्या दिवशी पुन्हा न्यूयॉर्कच्या दिशेनं जायला निघणार होतो. रात्री ज्या हॉटेलात उतरलो होतो, तिथं जेवणाची व्यवस्था अगोदर रिझर्वेशन करून करावी लागते. ती कल्पना मेहेरनोशनं दिलेली नव्हती. मग जेवण आणण्यासाठी मी आणि चिरंजीव निघालो. याही वेळेस पावसाळी ढग आमची पाठ सोडायला तयार नव्हते. गावात बसमधून फिरताना चिनी हॉटेल्स बघून ठेवली होती. तेव्हा तेथूनच जेवण आणण्यासाठी म्हणून आम्ही दोघे त्या दिशेने निघालो. रात्री आठ वाजायला आले होते तरी, पश्चिम क्षितिजावर उजेड होता. मात्र पावसाळी ढगांचे थवे पूर्वेकडून हळूहळू पश्चिमेकडे सरकत होते. आम्ही त्या चिनी हॉटेलांच्या जवळ एक फर्लांग अंतरावर येऊन ठेपतो न ठेपतो तोच धों धों पावसाला सुरुवात झाली. म्हटलं, वाटेत कुठंतरी थांबण्यापेक्षा सरळ हॉटेलात जाऊन थांबावं आणि जे जेवण बांधून न्यायचं आहे त्याची ऑर्डर द्यावी. मग सरळ भिजत त्या हॉटेलमध्ये गेलो. हॉटेल लहानसंच होतं. दोघे बहीण-भाऊ ते हॉटेल चालवत होते. बहीण होती पावणेपाच फूट उंच आणि भाऊही जवळ जवळ तेवढाच किंवा थोडासा उंच. आम्ही दोघे भिजलो होतो. तेव्हा अगोदर खिशातल्या रुमालानं डोकी पुसली. उमेश म्हणाले, 'आबा, भयंकर भिजलो आहोत, तेव्हा इथंच थोडे थोडे गरम सूप घेऊ !'

सूपची व बांधून न्यायच्या जेवणाची ऑर्डरही एकदमच दिली. आमच्या-समोर एक साठ-पासष्ठ वर्षांचा चिनी बसला होता. तो बांबूच्या काड्यानं चाऊमेन खात होता. अगदी सहजशैलीया तो जेवत होता. त्याच्या बाजूच्या

डिशमध्ये एक अखखा गार्लीक सॉसमध्ये बनवलेला पापलेट होता. त्या काड्यांनी तो पापलेटचा तुकडा उचलून मध्येच तोंडात टाकत होता. गिड्डी, पिवळ्या रंगाची, चपट्या नाकाची हॉटेलची मालकीण त्याच्याजवळ येऊन ' चिंग चिंग च्यांग चूंग ' असं पुटपुटली. त्यावर तो म्हातारा पापलेटकडं काडी दाखवून म्हणाला, ' च्यांग सियांग सियोग चींक. ' बहुदा तिनं विचारलं असेल, 'आजोबा, पापलेट कसा काय बनला आहे ? ' आजोबा उत्तरले असावेत, ' फार अफलातून बनवला आहेस बेटी ! '

कारण त्या उत्तरावर ती डोळे मिचमिचे करून हसली आणि कमरेत किंचित् वाकून तिथून निघून गेली.

इतक्यांत बाहेरचं काचेचं दार उघडून एक साठ–पासष्ठ वर्षांचा निग्रो आत प्रवेश करता झाला. त्यानं बरीच झोकली होती. त्याला सरळ चालताही येत नव्हते. हातातल्या वेताच्या काठीचा आधार घेत घेत तो मध्यभागी असलेल्या टेबलाजवळची खुर्ची ओढून बसला आणि त्यानं आर्डर दिली. पण ऑर्डर दिल्यानंतर तो इतक्या मोठ्यानं हातवारे करून बरळू लागला की, हॉटेलात जेवायला आलेली गिऱ्हाईकं भयभीत होऊन गेली. त्या पोरीच्या भावानं त्याला शांत बसण्याची विनंती केली, तेव्हा त्यानं हातातली काठी जोराने समोरच्या टेबलावर आपटून म्हटलं, ' यू बास्टर्ड, हूम यू आर टेलींग ? ' मालक म्हणाला, ' आय वुईल कॉल द् पुलीस ! ' त्यावर क्षणाचाही विलंब न लावता तो निग्रो थेरडा ओरडला, ' आय फक द् पोलीस ' असं म्हणून त्यानं लागोपाठ तीन–चार वेळा काठी टेबलावर आपटली. जणू काही आपल्याला येथून घालवून द्यायला आलेल्या पोलिसालाच तो काठीनं झोडपत होता.

हॉटेल–मालकानं त्याला द्यायचे जेवण पॅकींग केले आणि त्याच्यासमोर नेऊन ठेवले, आणि तो अदबीनं म्हणाला, ' प्लीज, गो अवे जंटलमन ! '

त्यावर तो निग्रो ओरडला, ' बास्टर्ड, आय वॉन्टेड टू डाईन हिअर ! आय डिडन्ट आस्क फॉर पार्सल !

शेवटी मालक जरासा ' टफ ' झाला, तेव्हा तो निग्रो डोक्याची फेल्ट सावरीत पार्सल हातात घेऊन भेलकांडत निघून गेला. बाहेर पाऊस पडतच होता. पण प्यालेल्या माणसाला पाऊस काय, अन् ऊन काय ? मी मात्र त्या

प्रसंगावर विचार करत होतो, की, ' हे निग्रो लोक अमेरिकनांनी आपली सेवा–चाकरी करण्यासाठी आफ्रिकेतून इथं आणले होते. आता त्यांची इतकी वाढ झालेली आहे की, त्यांना आवरणं कठीण झालंय. खून, मारामाऱ्या, मादक पदार्थांचा व्यापार अशा प्रकारचे गुन्हे करणाऱ्यांचे ' स्टॅटिस्टिक्स ' काढले तर, त्यांत निग्रोचांच भरणा अधिक असल्याचं आढळून येईल. '

आम्ही जेवणाचं पार्सल घेऊन हॉटेलातून बाहेर पडलो तेव्हा पावसाचा जोर थोडा कमी झाला होता, पण आम्ही जेमतेम दोन फर्लांग चालून जातो न जातो तोच, पुन्हा जोराचा पाऊस सुरू झाला. कुठं तरी थोडा वेळ थांबणं जरुरीचं होतं म्हणून दोन इमारतींमधल्या लहानशा फटीमध्ये आम्ही दोघे आसरा घेण्यासाठी रस्त्याकडे तोंड करून उभे राहिलो. उमेशचे लक्ष मागे गेले. त्या बोळकांडात तीन निग्रो मादक पदार्थांचं सेवन करून अस्ताव्यस्त पडले होते. उमेश माझ्या कानाशी येऊन म्हणाले, ' Its a dangerous place. Let us leave this place at once ! '

पुन्हा पावसात भिजत जाण्याशिवाय गत्यंतरच उरलं नव्हतं. आमच्या हातातलं चायनीज जेवणाचं पार्सल भिजत होतं. ते सांभाळत हॉटेल गाठायचं म्हणजे एक दिव्यच होतं. असा धो धो कोसळणारा पाऊस उभ्या जन्मात बघितलेला नव्हता. दहा फुटांवरचा रस्तासुद्धा दिसत नव्हता. वाटेवर एक लहानसा पब दिसला. त्यासमोर लहानसं छप्पर होतं. मी उमेशना म्हणालो, ' आता या पावसात पुढे जाणं अशक्य आहे. या छपरात थोडा वेळ थांबू ! '

त्या पबमध्ये थोडे गोरे होते, तसेच थोडे काळेही होते त्यांतले दोघे काळे बाहेर आले. आम्हाला वाटलं, आमच्या हातातलं ते जेवणाचं पार्सल हिसकावून घेतात की काय ! पण त्यांनी तसं काही केलं नाही. बाजूच्या इमारतीतून एक तरुणी भिजत भिजत मोटारीकडं चालली होती, तिला पाहून ते दोघे मोठमोठ्याने ओरडत राहिले. त्यांचीही ती अवस्था थोडी धोकादायक वाटल्यानं, आम्ही दोघांनी आता वाटेत कुठंही न थांबता हॉटेल गाठायचा निर्णय घेतला. रप्रप् अशा वरून कोसळणाऱ्या पावसात हॉटेल गाठलं. जेवण थंडगार झालं होतं. आम्ही दोघे नखशिखान्त भिजून चिंब

झालो होतो. माई म्हणाल्या,

'इतक्या दूर गेलातच कशाला ?'

टावेलनं डोकं पुसता पुसता मी म्हणालो, 'जेवण आणणार कोठून ? ऐनवेळी इथं काय मिळणार होतं ?'

'आम्ही सहीसलामत पोहोचतो की नाही याची शंका आली होती.' उमेश उद्गारले,

'का ?' माईंनी विचारलं.

'या वॉशिंग्टन शहरात रात्रीच्यावेळी निग्रो काय धुमाकूळ घालतात ते आज प्रत्यक्ष डोळयांनी बघितलं. !'

मी म्हणालो, 'दिल्लीत गुंडगिरी वाढल्याच्या बातम्या आजपर्यन्त पेपरमध्ये वाचल्यावर आपण म्हणायचो – राजधानीच्या शहरात गुंडगिरी हे लोकशाहीला लांछनास्पद आहे !'

आज जगातली अत्यंत प्रगत अशी लोकशाही म्हणून मिरवणाऱ्या अमेरिकेच्या राजधानीतली गुंडगिरी पाहून अवाक् झालो होतो. एखाद्या शहराची खरीखुरी ओळख व्हायची असेल तर पायानं फिरत शहर पाहावं. आमच्याकडं मुंबईला परदेशी पर्यटक येतात. मरिन लाईन्स, चर्च गेट, फोर्ट, कुलाबा या भागातल्या उंच इमारती, तिथली पंचतारांकित हॉटेल्स पाहतात आणि भारताची आर्थिक स्थिती वेगाने सुधारते आहे, असं वार्ताहरांना सांगतात. त्या लोकांनी माहीम, वांद्रा आणि वडाळा या भागातली झोपडपट्टी बघितलेली नसते. आम्ही जर त्या रात्री जेवण आणण्यासाठी त्या चायनीज हॉटेलकडं गेलो नसतो, तर वॉशिंग्टनसारखे सुसंस्कृत आणि सुंदर शहर नाही असेच 'इंप्रेशन' झाले असते. त्या रात्री नीग्रोंचा तो गोंधळं बघितला अन् वाटलं, 'जगात कुठंही जा, गुंड आणि गुन्हेगार जमात ही असणारच ! उलट राष्ट्र जितकं प्रगत, तितके गुन्हेगार आणि त्यांच्या गुन्हे करण्याच्या प्रथाही प्रगतच !

या पृथ्वीतलावरून दोन गोष्टींचं उच्चाटन कधीही होणार नाही. त्यांपैकी एक आहे प्रेम आणि दुसरी गुन्हेगारी ! 'रामराज' कधीकाळी भारतात नांदलं असेल, पण यापुढं रामराज्याची अपेक्षा बाळगणं हे मूर्ख– पणाचे ठरेल. अफाट वाढणारी लोकसंख्या हीच गुन्हेगारांच्या उत्पत्तीला

कारणीभूत ठरते. या देशांच्या सर्व समस्या सुटायच्या असतील तर, लोकसंख्या वाढीला तात्काळ आळा घालायला हवा. लोकमत आपल्याविरुद्ध जाईल, आपण सत्तेवरून खाली खेचले जाऊ या भयापोटी राज्यकर्त्यांनी कुटुंबनियोजनाकडं जर दुर्लक्ष केलं तर उभं राष्ट्र अधोगतीच्या दरीत कोसळेल. म्हणून मला वारंवार म्हणावंसं वाटतं, ' युवर अटेन्शन प्लीज ! वुई मस्ट चेक आवर पॉप्युलेशन. एल्स, वुई आर गोईंग टू फेस अँन अनसर्मौंटेबल कलॅमिटी. '

वॉशिंग्टनमधून बाहेर पडताना भारतीय नागरिकांच्या बेजबाबदारपणाचा एक नमुनेदार प्रकार पाहायला मिळाला.

इंग्लंडला वासंतीबेन पटेल हिचा पासपोर्ट हरवला होता. तो नंतर मिळाला. पण पासपोर्ट हरवल्यानंतर दुसरा पासपोर्ट तिला देण्यात आला होता त्यावेळी मेहेरनोशला पासपोर्ट देणाऱ्या भारतीय अधिकाऱ्यानं सांगितलं होतं की, आम्ही डुप्लिकेट पासपोर्ट देतो आहोत. पण यदाकदाचित् तुमचा हरवलेला पासपोर्ट परत मिळाला तर हा डुप्लिकेट पासपोर्ट तुम्ही वॉशिंग्टनला गेल्यानंतर इंडियन एंबसीत परत करा. त्यांच्या त्या सूचनेनुसार वॉशिंग्टन सोडताना मेहेरनोशनं वासंतीबेन पटेल या बाईचा डुप्लिकेट पासपोर्ट परत करण्यासाठी बस भारतीय वकिलातीच्या ऑफिसकडं आणली. तो पासपोर्ट परत करून आम्ही सर्व प्रवासी तसेच न्यूयॉर्कच्या रस्त्याला लागणार होतो. बरं, पासपोर्ट परत करायला फारसा वेळ लागण्याचं कारण नव्हतं.

आमची चाळीस प्रवासी असलेली बस वाऱ्यावर तिरंगा ध्वज फडकत असलेल्या इमारतीसमोर थांबली. अमेरिकेच्या अस्मानात डौलानं फडकणारा तो भारतीय ध्वज पाहून मनाला प्रसन्न वाटलं. वासंतीबेन पटेलला घेऊन पासपोर्ट परत करायला त्या इमारतीत गेलेला मेहेरनोश पटेल पाऊण तास झाला तरी परत आला नाही, तेव्हा आम्ही सचिंत झालो. म्हटलं, हा त्या इमारतीत चुकला की काय ? अंदाजे तासानंतर तो तणतणत परत आला आणि म्हणाला,

' साले एकजात हरामखोर ! तिथं भारतात असोत, नाहीतर इथं अमेरिकेत, आपली जातकुळी कधी सोडणार नाहीत. मी पासपोर्ट परत

करायला गेलो तर इथला अधिकारी म्हणतो, दुपारी दोन वाजता परत या.' मी त्याला सांगितलं की, आम्ही आमचा दौरा संपवून न्यूयॉर्कला परत चाललो आहोत. आमच्यापैकी बरेचसे रात्री साडे आठच्या फ्लाइटने न्यूयॉर्कहून मुंबईला जाणार आहेत. खाली बसमध्ये हे चाळीस प्रवासी बसून आहेत. दुपारी दोन वाजेपर्यंत मला थांबणं शक्य नाही. तर त्यावर तो म्हणतो, 'साहेब कामात आहेत.' मग माझं डोकं भडकलं मी म्हणाली, 'हा पासपोर्ट फक्त परत करायचा आहे. त्यासाठी साहेबांची गरज नाही. तुम्ही हा पासपोर्ट घ्या आणि मला पोच द्या. नाहीतर खाली बसमध्ये बसलेल्या सर्वच सर्व चाळीस उतारूंना वर घेऊन येतो तुम्हाला घेरावो करायला. मग मात्र तो हबकला आणि निमूटपणानं पासपोर्ट परत घेतला.

सर्व प्रवाशांनी मेहरनोशची प्रशंसा केली. मी मात्र अंतर्मुख होऊन विचार करत होतो. या कौन्सुलेटमधल्या भारतीय कर्मचाऱ्यांना आपल्या देशवासियांबद्दल यत्किंचितही जिव्हाळा वाटत नसेल? तिथं भारतात कुठल्याही ऑफिसात जा, पट्टेवाल्यापासून ते थेट अगदी त्याच्या साहेबापर्यंत, सर्वजण आभाळातून पडल्यासारखे ताठ वागतात. 'सौजन्य' नावाची चीज त्यांना ठाऊकच नाही. आमचा इंटरव्ह्यू घेणारा मुंबईतला अमेरिकन कौन्सुलेटमधला अधिकारी मला त्यावेळी आठवला. स्वत:च लोकांची नावे पुकारून तो त्यांना आत बोलवत होता व त्यांचे इंटरव्ह्यू घेत होता. त्याचं वागणं-बोलणं किती विनम्र होतं! आणि इथं हा अमेरिकेत आलेला भारतीय कर्मचारी उर्मटपणे इतक्या दूर आलेल्या आपल्या देशबांधवांना तिष्ठत ठेवण्याची भाषा करीत होता. याच संदर्भात मला हॉलंडच्या कौन्सुलेट-जनरलच्या ऑफिसात आम्हांला मिळालेल्या सौजन्यपूर्ण वागणुकीचा उल्लेख केल्याविना राहवत नाही. त्याचं काय झालं, भारत सोडताना फ्रान्स, जर्मनी, स्वित्झर्लंड, हॉलंड, बेल्जियम, इंग्लंड आणि अमेरिका या देशांचे 'व्हिसा' (ज्या राष्ट्राला आपण भेट देणार आहोत त्या राष्ट्राच्या अधिकृत अधिकाऱ्याने भारतात दिलेली परवानगी) आम्ही घेतले होते. पण आमच्या या दौऱ्याचा आणखीन एक फायदा आम्हाला करून घ्यायचा होता आणि तो म्हणजे उमेशना हॉलंड

येथे एक महिन्याकरता भरणाऱ्या इंटरनॅशनल सेमिनारसाठी अॅडमिशन मिळाली होती. म्हणजे एकदा हॉलंडला भेट दिल्यानंतर परत हॉलंडला भेट देण्यासाठी उमेशना 'मल्टिपल व्हिसा' हवा होता. तो त्यांच्याजवळ नव्हता. लॉस एंजेलेसला आम्ही हॉलंडच्या कॉन्सुल जनरलच्या ऑफिसमध्ये जाऊन उमेशनी पुन्हा एकदा हॉलंडला जाण्यासाठी व्हिसा मिळवण्याचा प्रयत्न करण्याचे ठरवले. आम्ही तिघेही टॅक्सी करून निघालो. लॉस एंजेलेस हे शहर जगातल्या मोठ्या शहरांत मोडतं. त्याची दक्षिण-उत्तर लांबी सत्तर मैलांची आहे. आम्हाला उतरलेल्या ठिकाणावरून हॉलंडच्या कॉन्सुलेट जनरलच्या ऑफिसात पोहचायला जवळ जवळ तास लागला. पण त्या इमारतीपुढं आमची टॅक्सी उभी राहताच मी म्हणालो, 'आपलं काम नक्की होणार!'

'कशावरून?' सौ. नी. विचारलं.

'इमारतीचा नंबर पहा!' मी म्हणालो.

त्या इमारतीचा नंबर होता ३४६०! या नंबरबद्दल आत्मीयता वाटायचं कारण म्हणजे, कोल्हापुरातल्या माझ्या फोनचाही नंबर आहे ३४६०. केवळ तो योगायोग होता. पण तोच नंबर पाहून विश्वास वाटला झालं! लिफ्टने आठवा मजला गाठला. The Counsul General, Netherlands' या ऑफिसात गेलो. पश्चिम युरोपीय तीन राष्ट्रांचे मिळून एकत्र कॉन्सुलेट आहे. हॉलंड, बेल्जियम व लक्झेमबर्ग ही ती तीन राष्ट्रे. तेथे मुख्य अधिकारी बाई होती, साठी उलटलेली. चिरंजीवानी हेग 'अॅकॅडेमी ऑफ इंटरनॅशनल लॉ' या संस्थेचे त्यांना प्रवेश देण्यात आलेले पत्र त्या बाईला दाखवले आणि पंधरा मिनिटात त्या बाईनं कसलीही चौकशी न करता चिरंजीवांच्या पासपोर्टवर हॉलंडला जाण्याचा व्हिसा देऊन टाकला. विचार करा, आम्ही भारतीय, भटकंती करीत पश्चिम अमेरिकेत गेलो होतो. एकदा हॉलंडला भेट देऊन आलो होतो. परत चिरंजीवाना तिथं जाण्याचा व्हिसा हवा होता. त्या बाईला एवढ्या पार्श्वभूमीवर हवे तितके फाटे फोडता आले असते. पण तिने अॅडमिशनचे ते पत्र वाचले आणि क्षणाचाही विलंब न लावता सांगून टाकले, 'प्लीज वेट फॉर टेन मिनिटस्. आय वुईल गेट द् व्हिसा फॉर यू!'

कुठं ती नेदर्लंडसच्या कॉन्सुल-जनरल ऑफिसमधील साक्षात सौजन्यमूर्ती, आणि कुठं आमचा तो वॉशिंग्टनमधला उर्मट भारतीय कर्मचारी ! तुम्हाला कदाचित वाटेल की, मी अनाठाई आपल्या देशबांधवांचे दोष टिपत असतो. पण जे घडलेलं आहे ते लिहिल्याविना राहवत नाही त्याला मी तरी काय करू ?

वॉशिंग्टन शहराची हद्द सोडेपर्यंत मी एकसारखा मागे वळून पाहात होतो. आधल्या रात्रीचा नीग्रोंचा तो नंगानाच सोडला तर, मला त्या शहरानं भुरळ घातली होती. वॉशिंग्टन मॉन्यूमेंटचा तो गगनचुंबी स्तूप निळ्याभोर आकाशात घुसला होता. आर्लींग्टन सिमेट्रीच्या पलीकडे असलेल्या विमान-तळावरून प्रत्येक अर्ध्या मिनिटाला एक विमान हवेत झेप घेत होते. न्यूयॉर्कचा जॉन. एफ्. केनडी एअरपोर्ट हा जगातला अत्यंत गजबजलेला असा एक विमानतळ आहे. तिथंही एकसारखी विमानं येत-जात असतात; पण वॉशिंग्टन एअरपोर्टवरून प्रत्येक अर्ध्या मिनिटाला एक विमान आकाशात जात होतं.

वॉशिंग्टन ते न्यूयॉर्क हे अंतर सुमारे दोनशे मैलाचं. न्यूयॉर्कला सायंकाळी चार वाजेपर्यंत बस पोहोचणार होती. आम्ही तिथे वाटेत उतरणार होतो. इतर मंडळी रात्रीच्या विमानाने भारताला परत जायला निघणार होती. वॉशिंग्टन सोडल्यानंतर आम्ही चालत्या गाडीतच सर्वांचा निरोप घ्यायला सुरवात केली. अन् काय गम्मत असते पहा, छाबडा, गर्ग, लोखंडी दुकानाचा मालक, लखनौचा नंदी, अहमदाबादचं ते हिंदूजा कुटुंब या सर्वांचा निरोप घेताना आम्ही काहीसे भावनाविवश झालो. मतभेद असे नव्हतेच; पण त्या लोकांची बौद्धिक कुवतच अल्पशी होती त्याला ते तरी काय करणार ! त्यामुळं ते प्रवासात उगाच फालतू बडबड करतात असं वारंवार वाटत असे. पण आता त्यांचा निरोप घेताना उगाचच भारावल्यासारखं वाटलं.

प्रवासात ज्या भारतीयांच्या गाठी-भेटी झाल्या त्यांची पुन्हा भेट होईल की नाही हे सांगता येत नाही. पण प्रत्येकानं आम्हाला आपल्याकडं येण्याची विनंती केली. हिंदूजा कुटुंबातली ती फॅशन करणारी बाई सौ. ना. म्हणाली, 'बहेनजी, अहमदाबादको जरूर आना !' कोण जातो अन् कोण येतो, पण शेवटी कितीजरी रांगडा असला तरी, भारतीय तो भारतीयच् ?

त्याच्या खडबडीत आणि ओबडधोबड व्यक्तिमत्त्वाखाली प्रेमाचा अन् जिव्हाळ्याचा झरा दडलेला असतो हेच खरं !

सुरेश खानविलकर हे आम्हाला ज्या ठिकाणी न्यायला येणार होते, त्या ठिकाणी आमची बस थांबवण्यात आली. सर्वांनी माझ्याशी हस्तांदोलन करून निरोप दिला. मेहेरनोश पटेलनं मला अगदी खास करून सांगितलं, ' मुंबईला आलात तर नक्की माझ्याकडे या !' मी त्याचा हात हातात घेत म्हणालो, ' हो, नक्कीच !'

त्या नंतर मी चार वेळा मुंबईला गेलो, पण एकदाही त्याची भेट घेण्याचा प्रयत्न केला नाही. किंबहुना मला वेळच मिळाला नाही पण ज्यावेळी माझं हे प्रवासवर्णनाचं पुस्तक तयार होईल तेव्हा एक प्रत मी त्याला भेट म्हणून नक्कीच घेऊन जाईन. आणि हो, दुसरी एक प्रत जॉन ' कॉस्कॉ '–एअर इंडियाचे फ्लाईट सुपरव्हायजर यांना द्यायची आहे. जाताना समुद्रगुप्त विमानाच्या महाराजा लाऊंजमध्ये मी त्यांना तसं वचनही दिलेलं आहे ते विसरता कामा नये.

न्यूयॉर्क पुढे नव्वद मैल असताना आम्ही रेस्ट एरियामध्ये उतरलो आणि उतरल्यानंतर पुन्हा सुरेश खानविलकरना फोन केला. ते म्हणाले, ' तासाभरात आम्ही तिथं पोहचत आहोत. '

या तासाभरात मी जरा पाय मोकळे करण्यासाठी इकडे–तिकडे भटकलो. कॅफेटेरियात जाऊन वॉश घेतला. त्या रेस्ट एरिया शेजारी एक उंचच्या-उंच असा मिनार होता आणि त्यावर प्रचंड अशी फुटबॉलच्या आकाराची पाण्याची टाकी होती. कसलंसं वर्कशॉप पलीकडं होतं त्यातून फरशांना पॉलीश करण्याचे यंत्र चालवल्यासारखा आवाज येत होता. आकाश निरभ्र होते. जवळपास कुठंतरी ग्लायडिंग क्लब असावा. कारण उंच आकाशात घारीसारखी ल.ल–पिवळया रंगाची ग्लायडर्स तरळत होती. दुरून एखादं डी. सी. एट जातीचं विमान वेगानं न्यूयॉर्कच्या दिशेनं जाताना दिसत होतं.

आम्ही ज्या सुरेश खानविलकरांच्याकडे जाणार होतो, त्यांचा अन् माझा तसा दाट परिचय नव्हता. फक्त एकदाच ते चहाला माझ्याकडे कोल्हापुरी येऊन गेले होते. एवढ्या अल्पशा ओळखीवर आम्ही त्यांच्याकडे दहा–पंधरा दिवस मुक्काम ठोकणार होतो मन थोडेसे संकोचले होते पण अजून पूर्व–अमेरिकेचा काही भाग, अन् पश्चिम अमेरिका पाहायची तर, खानविलकरांच्याकडे जाण्याशिवाय गत्यंतरच नव्हते.

खानविलकर गेली आठ–दहा वर्षे अमेरिकेत वास्तव्य करून आहेत. त्यांनी तिथं 'सक्कासन्ना' या न्यूजर्सी प्रांतातल्या गावी ट्रॅव्हल एजन्सी सुरू केलेली आहे. त्यांची पत्नी सौ. ज्योती त्यांना त्यांच्या व्यवसायात खूपच मदत करीत असते. आजूबाजूला जे उद्योगसमूह आहेत, त्यांतले अधिकारी प्रवासाला निघण्यापूर्वी ट्रॅव्हल एजन्सीमार्फत आपली विमानाची तिकिटं रिझर्व्ह करतात. जाण्याची अन् परतीची सुद्धा तेव्हा अशा गिऱ्हाईकांना निरनिराळ्या ठिकाणची तिकिटं रिझर्व्ह करून देणं, त्यांना विमानतळावर पोहचवणं, ते परत येतील तेव्हा विमानतळावरून त्यांच्या घरी पोहचवणं ही सर्व कामे ट्रॅव्हल एजंटस्ना करावी लागतात. तीस–पस्तीस वर्षांच्या या तरुणाने अमेरिकेसारख्या दूरच्या ठिकाणी, आपल्या पत्नीच्या साहाय्याने चांगलाच जम बसविलेला आहे. त्यांनी सक्कासन्नाला छोटंसं ऑफिस थाटलं आहे अन् त्या ऑफिसात पाच अमेरिकन नोकरीला ठेवले आहेत. स्वतःच्या मालकीचा प्रशस्त बंगला, अन् पाच मोटारी बाळगणाऱ्या या महाराष्ट्रीय तरुणाचं कौतुक करावं तितकं थोडं आहे. तसं पाहिलं तर व्यापार–धंदा करणारी माणसं अतिशय 'हिशेबी' असतात. प्रत्येक 'छदाम' खर्च करताना हजार वेळा विचार करतील पण सुरेशराव हे त्याही नियमाला अपवाद आहेत. खूप कमवतात आणि अफाट खर्च करतात. बहुदा ही अमेरिकन वृत्ती प्रदीर्घ अशा वास्तव्यानं त्यांच्यातही निर्माण झालेली दिसते.

त्यांना दोन गोंडस मुली आहेत. त्यांची नावं टोनू आणि ढमू ! अर्थात ही लाडाची टोपण नावं टोनू आहे चार वर्षांची अणि ढमू तिच्यापेक्षा वर्षानं लहान. हे छोटं कुटुंब तासाच्या आतच आम्हाला आपल्या घरी घेऊन जाण्यासाठी त्या रेस्ट एरियावर येऊन पोहोचलं. सौ. ज्योतीने तर चक्क

वाकून आम्हा मराठा पद्धतीने नमस्कार केला. तसं पाहिलं तर, आमच्यापेक्षा कितीतरी पटीने ते पतिपत्नी सधन बनले आहेत. पण रक्तातलं खानदान हे पैशानं कधी बदलत नसते. आमच्या आजपर्यंतच्या प्रवासाबद्दल आस्थेवाईकपणानं त्या दोघांनी आल्या आल्या आमची चौकशी केली

सक्कासन्नाचा परिसर अतिशय सुरेख वाटला. पाईन आणि ओकच्या सरळसोट अशा झाडांच्या जंगलामधून वाट गेलेली होती. वाटेत काही ठिकाणी सपाट अशा जागी टुमदार घरं, घरांसमोर बगीचे दिसत होते. वैशिष्ट्य असं की, उन्हाळ्याचे दिवस असून सर्वत्र कोवळी लुसलुसीत हिरवळ पसरली होती. मला तो भाग काहीसा महाबळेश्वरसारखा वाटला.

सुमारे तासाभरात गाडी चॉकलेटी रंगाच्या एका बंगल्यासमोर येऊन उभी राहिली. ढमू म्हणाली, ' आलं आपलं घर ! '

सूर्यास्ताचा समय झाला होता. घरासमोरची हिरवळ पिवळी–सोनेरी दिसत होती. बाजूच्या एका घरासमोर सिमेंटचं हरण उभं केलं होतं. पलीकडे एक सिमेंटचा जिप्सी आणि त्याचं गाढव उभं होतं. समोरच्या रस्त्यावरून मोटारींची अव्याहत ये–जा सुरू होती.

घरात आलिशान असं फर्निचर होतं. काचेचं भलंमोठं डायनिंग टेबल, त्याला योग्य अशा खुर्च्या होत्या. घरात अत्यंत स्वच्छता आणि टापटीप होती. किचनरूम अद्यावत होतं. किचनच्या मागे एक ग्लासरूम बांधण्याचं काम सुरू होतं. त्यामागे मोकळी जागा होती. मुलींचा छोटा प्लॅस्टिकचा टँक होता. त्या पलीकडे दाट झाडी होती. घर दुमजली होतं. माडीवर मास्टर बेडरूम, मुलींची बेडरूम आणि गेस्टरूम होती. सर्व घरभर उंची कार्पेट होता. घरातलं वातावरण अत्यंत प्रसन्न असं होतं. घराची प्रसन्नता ही यजमानांच्या आणि इतर मंडळींच्या स्वभावावर अवलंबून असते. घरातली माणसं मनमोकळ्या स्वभावाची, प्रेमळ अन् उमद्या स्वभावाची असली की, ते घर प्रसन्न वाटतं. सुरेश आणि ज्योती ही दोघे हसतमुख वृत्तीची असल्यामुळं ते घरही आनंदी वाटलं

अल्पावधीतच आम्ही तिघेही त्या घराशी एकरूप झालो. अमेरिकेत क्वचितच घरी कामासाठी नोकर असतात, त्यामुळं स्वावलंबनाचा मार्ग स्वीकारावा लागतो. युरोपला गेल्यापासून आम्हा तिघांनाही स्वावलंबाची

थोडी थोडी भव्य आलेली होतीच. अमेरिकेत ती थोडीशी वाढलेली जाणवली.

दुसऱ्या दिवशी सुरेश आणि ज्योती आम्हाला मार्केटिंगसाठी डिपार्टमेंटल स्टोअर्समध्ये घेऊन गेले. युरोपातल्या डिपार्टमेंटल स्टोअर्सपेक्षा अमेरिकेतली डिपार्टमेंटल स्टोअर्स अतिशय भव्य आहेत. त्यांतल्या त्यात ' सिअर्स ' डिपार्टमेंटल स्टोअर्स अवाढव्य आहेत. ' सिअर्स ' स्टोअर्समध्ये गेल्यावर मला आठवली ती शिकागोमधली उत्तुंग इमारत ' सिअर्स टॉवर '. कदाचित् त्या कंपनीचीच ती डिपार्टमेंटल स्टोअर्स असावीत. या स्टोअर्समध्ये काही मिळत नाही असे कधीच होत नाही. भाजीपाल्यापासून ते घड्याळापर्यंत हरत-हेच्या वस्तू, शिवाय कपड्यांचा विभाग इतका प्रचंड कीं, त्यात माणसाला हरवायला होतं. रेडिमेड शर्टस्, पँटस् असे शेकड्यानं हँगर्सना टांगलेले. अगदी दहा दिवसांच्या चिमुकल्या बाळापासून ते तीनशे पौंड वजनाच्या ' रेसलर ' पर्यंत, अंगाला फिट्ट बसतील असे कपडे तिथं होते. आता तिथं आणखीन काय होतं याचं लिस्ट द्यायचं म्हटलं तर ते अशक्य आहे. माझ्यासारख्या विलक्षण आवडी निवडी–असलेल्या स्वभावाच्या माणसाला तिथं जे हवं होतं ते मिळालं. मी पेंटींगच्या रंगीत पेन्सिली तिथं खरीदल्या, तिथंच माझ्या पॉईंट टू टू या रायफलला बसणारी दुर्बिण खरीदली, धनुष्य–बाण घेतला, चॉकलेटस् घेतली आणि माईना बरेच दिवस तोंडी लावायला मिळाली नव्हती ती हिरवी मिरची सुद्धा तिथं मिळाली. ती दुकानं बघितल्यावर माझ्या तोंडून सहजच उद्‌गार निघाला, ' जो जे वांछील तो ते लाहो ! असे हे सिअर्सचे डिपार्टमेंटल स्टोअर्स आहेत. या दुकानात एवढा माल कोठून येतो, या दुकानाचे मालक किती, याचं व्यवस्थापन कसं केलं जातं याचा विचारच करता येत नव्हता.

ज्योतीने जाळीची ढकलगाडी घेऊन त्यात वस्तू भरल्या. पाहुण्यांना अगदी आदरातिथ्यानं मारून टाकायचं असा त्या पतिपत्नींनी निर्णयच घेतला होता. विविध फळांच्या रसांचे टीन्स, क्राफ्ट चीज, प्रॉन्स, चॉकलेटस्, बिस्किटं, तयार आईस्क्रीमचे डबे, चिकन् लेग्ज ! छे ! छे ! काही विचारूच नका. अनेकांनी अनेक तऱ्हेने आजपर्यंत माझे आदरातिथ्य केले आहे, पण सुरेश आणि ज्योती यांच्या आदरातिथ्याची यापुढेही कोणी बरोबरी करू शकेल की नाही, याची शंका आहे.

ट्रॉली फुल् भरल्यानंतर सुरेश काहीतरी आठवल्यासारखं करीत मला म्हणाले, ' आबा, ' ( ' बाबा ' ऐवजी मला सुरेश आबा म्हणत. कारण माझे चिरंजीव मला त्याच नावाने संबोधत. ) ' तर आबा, महत्त्वाच्या वस्तू खरेदी करायच्या राहून गेल्या. '

' कोणत्या ?' मी विचारलं.

' ड्रिंक्स् !'

' जाऊ द्या हो. अमेरिकेतलं हे जीवन पाहून अगोदरच नशा चढल्या-सारखी झालीय. डोंट वॉदर फॉर ड्रिंक्स !'

' छे ! छे ! असं कधी झालंय का ?' असं म्हणत ते मला ' मद्यालय ' विभागाकडं घेऊन गेले. शिकागोला हॉटेलसमोर बघितलं तेवढं मोठं नव्हतं ते दुकान, पण जगातल्या उत्तमोत्तम प्रकारच्या मद्याच्या बाटल्या तिथं होत्या. त्यांतही शिवाज रिगल, व्होडका, जीन्, ब्रँडी आणि रम अशा विविध प्रकारच्या पाच मोठ्या बाटल्या सुरेशनी खरेदी केल्या.

टोनू आणि ढमू या पहिल्या दिवशी काहीशा अबोल दिसल्या. पण दुसऱ्या दिवसापासून त्या दोघींची अन् माझी गट्टी जमली. त्यात त्या दोघींना चित्रकलेचा नाद. दिवसभर त्या क्रेऑनच्या कांड्यांनी चित्रं काढत असत. त्यात त्या दोघींना टी. व्ही.वर कार्टून्स बघण्याचा अतोनात नाद. दोघी हनुवटी हातावर रेलून, अंगावर पांघरूण घेऊन तासन् तास टी. व्ही. चे कार्यक्रम पाहात राहायच्या. चित्रं काढताना त्या इतक्या तल्लीन होऊन कार्टून्स काढीत की, खरोखरच कौतुक वाटे. त्यांत अस्वलं, वाघ, सिंह, कोल्हे यांची त्या चित्रं रेखाटीत; अन् त्याचबरोबर माणसांचीही चित्रं काढीत. घराच्या तळमजल्यावर सुरेशरावांनी कागद आणून ठेवलेले होते. त्यातले रोज दहा-वीस कागद या बहिणी-बहिणी चित्रांनी भरून टाकीत. टी. व्ही ठेवलेल्या खोलीत कारपेटवर क्रेऑनच्या कांड्या खोलीभर पसरलेल्या असायच्या. एकामागून एक कागद संपायचे. कधी कधी दोघींना एकाच रंगाची कांडी एकाच वेळी हवी असे. मग त्या कांडीसाठी दोघींची झोंबाझोंबी सुरू होई. आतून स्वयंपाक करता करता ज्योतीला धावत येऊन ते भांडण सोडवावे लागे. हे भांडण सोडविण्याचे ज्योतीचे तंत्र फारच सोपे आणि सरळ होते. ती त्या रंगीत कांडीचे दोन तुकडे करून प्रत्येकीला

एक एक देई अन् त्या पुन्हा आपल्या चित्रकलेत एकरूप होऊन जात. टोनू ढमूपेक्षा एक वर्षानं मोठी, पण फारच चाणाक्ष.

मी लंडनला घेतलेल्या माझ्या वॉटरकलरच्या ट्यूब्ज् आणि पेंटींग्चे पॅड घेऊन सुरेशच्या घराचे पेंटींग करायला समोरच्या झाडाखाली जाऊन बसलो टोनू आणि ढमू माझ्या मदतीला आल्या. मी पेन्सिलीनं कागदावर स्केच करू लागलो तेव्हा ढमू इकडून तिकडे जाताना माझ्या पायाला अडखळली. तिचा तोल गेला. पण लगेच तिनं स्वतःला सावरलं अन् गंभीर चेहरा करून मला म्हणाली,

' अंकल, आयम व्हेरी सॉरी. तुझं चित्र मी थडकल्यामुळं बिघडलं नाही ना ?'

एवढ्याशा चिमुरड्या पोरीला इतकी जाण ! मी तिला माझ्याजवळ बसवून तिच्या पाठीवरून हात फिरवीत म्हणालो, ' ढमू, एवढ्यानं चित्र बिघडत नाही.'

टोनू आणि ढमू मी रंगवत असलेलं त्यांच्या घराचं लँडस्केप लक्ष देऊन बघत होत्या. चित्र पूर्ण झाल्यावर मी ते झाडाच्या खोडाला टेकवून दूर जाऊन पाहू लागलो. तोच ढमू म्हणाली, ' अंकल, यू पेंट व्हेरी वेल. '

मी रंगांच्या सामानाची आवराआवर केली. बाटलीतल्या पाण्यानं ब्रश धुतले. चित्र काढलेलं पॅड घेतलं. तेव्हा ढमू म्हणाली, ' अंकल, तू हे सगळे कसं घेऊन जाणार ? वुई वुईल हेल्प यू. टोनू, तू अंकलची रंगाची पेटी घे, मी पाण्याची बाटली घेते.' मी पेंटींग पॅड घेऊन पुढे आणि त्या दोघी माझ्या मागोमाग येऊ लागल्या. इतक्यात ' खळ्ळ ' असा मागून आवाज आला. मी मागे वळून पाहिलं. ढमूच्या हातातली काचेची बाटली फरशीवर पडून तिचे तुकडे तुकडे झाले होते. तो आवाज ऐकून ज्योती बाहेर आली.

' काय केलंस हे ?' ढमूला तिनं विचारलं. त्यावर ढमू अपराधी चेहरा करून डोळ्यांत पाणी आणून म्हणाली, ' मम्मी, आय एम् व्हेरी सॉरी. द बॉटल स्लिप्ड फ्रॉम माय हँडस् ! '

त्या दोन गोड पोरींच्या सहवासात माई एकरूप होऊन गेल्या. सकाळी त्यांना माई ऑन्टीनंच आंघोळ घालावी, केस विंचरावे असे हट्ट सुरू झाले. आमचे चिरंजीव एल्. एल्. एम् परीक्षेत विद्यापीठात सर्वप्रथम आलेले.

पण ढमू रागावली की म्हणे, ' टॉल अंकल, तुला काही अक्कल नाही. '

टोनू–ढमूनं मला स्मॉल अंकल आणि माझ्या चिरंजीवाना टॉल अंकल असे नामाभिदान देऊन टाकले होते.

घराच्या मागे ग्लासरुम बांधण्याचे काम सुरू होते. लाकडाच्या फळ्या, खिळे, काचा तिकडं पडलेल्या होत्या म्हणून ज्योतीने त्या दोघींना मागे जायला बंदी केली होती. पण मागच्या हिरवळीवर गुलाबाच्या कळीसारखी दिसणारी, शेजारच्या जेलरची मुलगी ' रोझी ' येऊन त्या दोघींना खेळायला बोलवे. दुपारच्या वेळी जेवणानंतर टी. व्ही. पहात असताना एकदम ढमू ओरडल्याचा आवाज आला. आम्ही धावत मागे गेलो. ढमूच्या पायांच्या अंगठ्यात लाकडाचं कूस घुसलं अन् ते आत मोडून बसलं. त्या वेदनेने ढमू कासावीस झाली होती. मुलांच्या पायातले काटे काढणे यात मी एक्सपर्ट. सुई, चिमटा घेऊन मी ढमूच्या पायातलं कूस काढायचा प्रयत्न केला, पण जमलं नाही रडून रडून ढमूचे डोळे लालेलाल झाले होते. मला मात्र चैन पडेना. तिला जरा झोप लागल्यावर हळूच तिचा पाय हातात धरून मी ते कूस काढण्याचा प्रयत्न केला. पण तेवढ्यात ती जागी झाली. अन् पुन्हा पाय दुखवल्याबद्दल मला म्हणाली, ' स्मॉल अंकल, यू आर टू बॅड ! मी तुझी गट्टी फू केलीय् ! '

रात्री माईंनी तिच्या पायाला पोटीस करून बांधलं. दुसऱ्या दिवशी सकाळी ज्योतीनं तिला मांडीवर घेतलं. उमेशनी आणि माईंनी तिचे हातपाय धरले. ती एकसारखी ओरडत होती. मी एखाद्या डॉक्टरच्या आवेशात ते कूस बाहेर काढलं. ढमूला यातना होत होत्या, त्यामुळे ती ओरडत होती अन् त्याचवेळी तिच्या यातना पाहून ज्योतीच्या डोळ्यातून घळघळ अश्रू ओघळत होते.

दुपारी ढमू बँडेज बांधलेल्या पायानं चक्क चालत माझ्याजवळ आली आणि म्हणाली, ' स्मॉल अंकल, मागे जंगली ससा आलाय बघ ! ' मी उठून काचघरात गेलो. खरंच मागच्या झाडीतून बाहेर पडलेला एक ससा मागच्या दोन पायांवर बसून पुढच्या पायानं मिशा साफ करत बसला होता. डाव्या बाजूच्या बंगल्यात तीन–चार थोराड कुत्री होती. ती अधून मधून जोरजोरान भुंकत. पण त्यांना जाड आणि उंच अशा तारेच्या कुंपणातून बाहेर पडता

येत नसे. त्या इवल्यांशा सशाला कदाचित ते ठाऊक असावं. म्हणून कुत्री भुंकू लागली तरी तो कान पाडून त्यांच्याकडं पाहायचा, अन् हळूहळू पुढच्या दोन दातांनी लॉनवरचे कोवळे कोंब कुरतडायचा. सक्कासन्नाच्या मुक्कामात दिवसातून दोन–तीन वेळा तो ससा मला दिसत असे. पण मी पट्टीचा शिकारी असूनही त्याला कधी मारावा असं मला वाटलं नाही. आपण होऊन समोर आपल्या अंगणात आलेल्या प्राण्याची हत्या करावी असं जातिवंत शिकाऱ्याला कधीच वाटत नाही. उलट जंगलातल्या प्राण्याला धावायची संधी देऊन त्याला टिपायचं यातच खरं कौशल्य अन् समाधान असतं.

सक्कासन्ना इथल्या वास्तव्यात मनाला खूपच समाधान वाटत होतं. सतत दीड महिन्याची युरोप आणि पूर्व अमेरिकेची भ्रमंती घडली होती. बसमध्ये बसून बसून गुडघे आखडल्यासारखे झाले होते. म्हणून सकाळी उठून मी फिरायला जाणे सुरू केले. एखाद्या हिलस्टेशनसारखं वातावरण असलेल्या त्या छोट्या गावात मी फुटपाथवरून फिरायला बाहेर पडलो. टुमदार, निरनिराळ्या आकारांची अन् रंगांची घरं, प्रत्येक घराभोवतालची हिरवळ, फुलझाडं, घराभोवताली कंपौंडचं काम करणारी उंच सरळसोट अशी पाईनची किंवा ख्रिसमसची झाडं अन् त्यापलीकडं स्वच्छ निळंभोर आकाश या वातावरणातून प्रातःसमयी फिरायला जाताना सहज विचार यायचा, ‘इथं खूप समृद्धी आहे, पण माणसं सुखी दिसत नाहीत.’ कारण रस्त्यावरून जाणारी माणसं जवळ जवळ दिसायचीच नाहीत. गाड्यांतून जाणारी माणसं गंभीर चेहऱ्यानं इकडं–तिकडं न पाहता जात असत. या सर्व माणसांना कोणीतरी अदृश्य अशा दोरखंडानं जखडून टाकलेलं आहे अन् ती त्या बंधनातून बाहेर पडता येत नाही म्हणून अशी निराश अन् गंभीर बनलेली असावीत. मला फिरायला जाताना एखाद दुसरा माणूस ‘जॉगींग’ करत चाललेला दिसे. तो पळत पळत माझ्या जवळून जाताना किंचित स्मित मुद्रा करून निघून जाई.

घरापासून सुमारे पाऊण मैल अंतर चालून आलो अन् समोर एका मोठ्या कंपौंडमध्ये एक घोडी अन् तिचं शिंगरू शेपट्या हलवीत चरत होती. ब्राऊन रंगाची ती घोडी धष्टपुष्ट होती. सकाळच्या कोवळ्या उन्हात तिचे ‘मसल्स’ मोठे आकर्षक दिसत होते. ती रेसची घोडी होती हे मी तात्काळ

ओळखलं. रेसच्या घोडीच्या अंगावर एक आगळंच तेज असतं. कोल्हापूरच्या छत्रपतींच्याकडे माझे वडील रेस ऑफिसर होते, त्यामुळं अश्व या जातीबद्दल बालपणापासूनच एक आकर्षण होतं. चरता चरता त्या घोडीने मान वर करून माझ्याकडं बघितलं आणि तोडानं 'फर्ररर' केलं रस्त्यावर बोलणारा कोणीच सजातीय प्राणी याला भेटला नाही. कुठल्यातरी दूर देशीचा रहिवासी दिसतो अ हे म्हणून तो 'फर्ररर' असा आवाज काढून त्या घोडीनं मला 'गुड मॉर्निंग' म्हटलं असावं !

तेथून आणखीन थोडा पुढं होतो न होतो तोच, एक तेवीस–चोवीस वर्षांची गोरी तरुणी साखळीनं बांधलेल्या भल्या मोठ्या अल्सेशियन कुत्र्याला घेऊन समोरून माझ्याच दिशेनं येत होती. तो भरला–पोसलेला श्वान पाहून मी थोडासा बाजूला झालो घट्ट काळा टी शर्ट आणि निळ्या रंगाची जीन घातलेली ती सोनेरी रंगाच्या केसांची तरुणी माझ्याजवळ येताच हसून 'हाय' म्हणाली मीही 'हाय' म्हणालो. पण त्याक्षणी मला वाटलं की, थोडासा आगाऊपणा करून तिची ओळख काढायला हवी होती. तिच्या कुत्र्याचं कौतुक केलं असतं तरी, ती थांबली असती. चार–दोन शब्द बोलली असती. पण तिलाही कुठंतरी कामाला जायचं असेल. तत्पूर्वी कुत्र्याला फिरवून आणण्यासाठी ती बाहेर पडली असावी. अमेरिकन माणूस मुळातच अबोल; शिवाय त्याची समाजरचनाच अशी काही विचित्र झाली आहे की, त्यांना कामाशिवाय जादा एक शब्द बोलायला सवड नाही. भारतात माणसांना रिकामटेकडेपणा करायला भरपूर वेळ आहे; अन इथं माणसांना केवळ विरंगुळा म्हणूनसुद्धा दुसऱ्याशी एक शब्द बोलायला सवड नाही. भारतीय आणि अमेरिकन या दोन संस्कृती परस्पर भिन्न अशा वातावरणात वावरतात. यातून सुवर्णमध्य निघायला हवाय्. पण तो कसा निर्माण करायचा हे कोणालाच समजत नाही. अमेरिकेतल्या भौतिक प्रगतीनं गुदमरलेले तरुण–तरुणी हिप्पी बनून भारतात येतात एखाद्या बुवाच्या किंवा बाबाच्या नादी लागून गळ्यात माळा, अंगात भगवी कफनी घालून गांजा ओढत बिभत्स चाळे करीत रस्तोरस्ती भटकतात. अन् आमच्याकडचे भौतिक सुखासाठी हपापलेले तरुण पाश्चात्त्यांचे अंधानुकरण करण्यात समाधान मानतात. पण दोघेही शेवटी अतृप्तच !

ती तरुणी परत येताना भेटली तर, आपण नक्कीच तिच्या कुत्र्याचं कौतुक करून ओळख काढायची असं ठरवून टाकलं. पण परत येताना ती भेटलीच नाही परत येताना दुसरी एक तीस–बत्तीस वर्षांची पांढरा शुभ्र टी शर्ट आणि काळी तंग पँट घातलेली तरुणी हातात होस पाईप धरून दारासमोरची हिरवळ भिजवत उभी होती. अमेरिकेत दारासमोरची हिरवळ बाराही महिने तशी राहावी म्हणून 'स्प्रिंकलर्स' (जमिनीत बसविलेले फिरते फवारे) जमिनीखालून जाणाऱ्या पाईपला जोडलेले असतात. हातानं सहसा कोणी पाणी घालत नाहीत. पण ती तरुणी हातात होस पाईप धरून पाण्याचा फवारा उडवत होती. मी ज्या फुटपाथवरून पुढे जाणार होतो त्यावरही पाण्याचे तुषार उडत होते म्हणून मी चालता चालता थोडा थबकलो. तेव्हा ती माझ्याकडे पाहून हसत हसत म्हणाली, 'आ ओं बॅ यू ऽऽऽ' मी फक्त हसलो. कारण मला त्या 'आ ओं बॅ यू'चा अर्थ काही केल्या समजला नव्हता. मी थोडीशी धिटाई करून पुढं झालो आणि म्हटले, 'एक्सक्यूज मी, आय् डिडन्ट अंडरस्टँड वॉट यू सेड !'

मग ती काय बोलते ते नीट कान देऊन ऐकले. ती म्हणाली, 'आय ओंट बॅथ यू.' (मी काही तुला आंघोळ घालणार नाही.) मला वाटलं ती तरी माझी चौकशी करेल 'तू कुठला, इकडं कुठं भटकायला लागलास?' पण तीन होस पाईप दुसरीकडे फिरवली आणि पुन्हा ती आपल्या कामात मग्न झाली. पण यावेळी तिनं उडवलेल्या फवाऱ्यातून एक चिमुकले इंद्रधनुष्य आकारला होते. खाली हिरवळीवर पडलेले पाण्याचे थेंब हिऱ्यासारखे चमकत होते हातात पाण्याची पाईप घेतलेली ती देखणी तरुणी पुन्हा तिनंच उडवलेल्या तुषारात दिसेनाशी झाली. काही क्षणांचेच ते दृश्य, पण दीर्घकाळ स्मरणात राहिले.

दुपारी लंच घेतली की, डोळ्यावर झापड यायची. थोडा वेळ टी. व्ही. पाहात पडून रहायचे. मग टोनू, ढमूला सोबत घेऊन एखादे लँडस्केप रंगवायचे, संध्याकाळी सुरेश ऑफिसातून परत आले की, तळघरात टेबलटेनिसच्या दोन-तीन गेम्स खेळायच्या, कधी गाडीतून दहावीस मैल भटकायला जायचे. त्यावेळी माई व ज्योती यांची निरनिराळ्या रेसिपीजवर चर्चा चाललेली असे कोल्हापुरी पांढरा 'रस्सा' हा माझ्या कादंबऱ्यांतून

अनेकवेळा डोकावतो. माझ्या बऱ्याच वाचकांना त्याच्याबद्दल कमालीचे कुतूहल आहे. तसेच ते ज्योतीला आणि सुरेशरावांनाही होते. शेवटी माई म्हणाल्या, ' रेसिपीज सांगून पदार्थ बनवता येतात, नाही असं नाही; पण प्रत्यक्षातच तो पदार्थ बनवताना पाहणं आवश्य असतं. थिअरी कितीही उत्तम तऱ्हेनं समजली, तरी प्रॅक्टिकल हेच शेवटी महत्त्वाचं ! त्या दोघींच्या अशा एकसारख्या चर्चा चालत. ज्योतीला तिच्या कामातून फारच थोडा वेळ मिळत असे. त्यामुळे तिची हौस असूनही असे पदार्थ बनवता येणं शक्य होत नव्हतं. पण माईंनी तिथल्या वास्तव्यात तिला पाकशास्त्रातले बरेच धडे दिले. एकदा सुरेशरावांनी आपल्या मित्रांना जेवायला बोलावले आणि त्या दिवशी पांढऱ्या रश्श्याचा बेत केला. चिखलीकर नावाचे सुरेशरावांचे मित्र सहकुटुंब आले होतेच पण त्यांच्यासोबत त्यांची मेव्हणी, तिचा नवरा, आई अशी मंडळी होती. दुसरा मित्र अशोक संकपाळ, सुरेशचा मेव्हणा काशीनाथ हीही मंडळी त्या पार्टीला उपस्थित होती. शिवाज रिगलचे दोन पेग पोटात गेल्यावर, ती मंडळी बोलू लागली. मला मात्र त्या लोकांच्या बोलण्यातून एक जाणवलं की, भारतातून इथं येऊन स्थाईक झालेली ही माणसं, अतोनात पैसा कमावतात, पण तीही कुठल्यातरी अनामिक अशा दडपणाखाली वावरत असतात. त्या दडपणामुळं उत्तमातल्या उत्तम अशा स्कॉच व्हिस्कीचासुद्धा त्यांना आस्वाद घेता येत नव्हता. पार्टीनंतर कोणाला पन्नास मैलांचं अंतर गाठायचं होतं, तर कोणाला दुसऱ्या दिवशी सकाळी सहा वाजता ड्यूटीवर हजर राहायचं होतं. मला खरोखरच त्या लोकांची दया आली. ते वरवर हसत होते, विनोद करीत होते, एकमेकांची चेष्टामस्करी करीत होते, पण ते सर्व कुठल्यातरी अनामिक अशा दडपणाखाली चेंगरले गेले आहेत असा मला भास होत होता. मानवी जीवन हे अनेक वेळा लाभतं की नाही, याबद्दल छातीठोकपणे जोपर्यंत सांगणं कठीण आहे, तोवर आपणाला जे जीवन प्राप्त झालेलं आहे ते सुखासमाधानात कंठलं पाहिजे. धांदल, धावपळ आणि दडपण यांचा त्रिशूल मानेवर असताना लाखो डॉलर्सची जरी कमाई होत असली, तरी माझ्या दृष्टीनं ती कवडीमोल आहे !

सक्कासन्ना येथून आम्ही तिघे पश्चिम अमेरिकेला निघण्याचा दिवस

उजाडला. तिकडचा प्रदेश आणि प्रेक्षणीय स्थळं पाहून आम्ही परत सक्कासन्नाला येणार होतो. पण तरीही, ज्योतीला वाटत होतं की, आम्ही आणखीन् थोडे दिवस तिच्याकडेच राहायला हवंय ! सुरेशरावांनी आम्हा तिघांसाठी ' नॉर्थ वेस्ट ओरिएंट ' या प्रख्यात विमान कंपनीची तिकिटं रिझर्व्ह केली होती. आमचे लॉस एंजेलीसवरून परत येण्याचे तिकीट देखील सुरेशरावांनी रिझर्व्ह करून ठेवले होते.

न्यूयॉर्कपासून तीस मैलांवर ' नेवर्क ' नावाचा विमानतळ आहे. न्यूयॉर्कच्या आंतरराष्ट्रीय विमानतळावरच्या वाहतुकीचा ताण थोडासा कमी करण्यासाठी हा ' नेवर्क ' चा विमानतळ बांधण्यात आल्याचं मला सांगण्यात आलं, त्यावेळी मला आठवलं, व्ही. टी. वरून सुटणाऱ्या गाड्यांचा ताण कमी करण्यासाठी दादरवरून जशा दादर–मद्रास एक्सप्रेस गाड्या सोडण्यात येतात, तसा तो प्रकार ! एखादं शहर असं अवाढव्य आणि अनिर्बंध वाढू लागलं की, अशा काही पर्यायी योजना कराव्याच लागतात.

नेवर्कच्या विमानतळावर आम्हाला निरोप देण्यासाठी सुरेश, ज्योती, टोनू आणि ढमू आले होते. आम्हाला लॉस एंजेलेसला उतरून घ्यायला ज्योतीचे मेव्हणे उदय पाटील येणार होते. आम्ही निघण्यापूर्वीच त्यांना फोनने कळवले होते. हं, बरं आठवलं. अमेरिकेसारखी फोन व्यवस्था जगात इतरत्र कुठंही पाहायला मिळणार नाही. सक्कासन्ना ते लॉंज एंजेलेस हे अंतर सुमारे तीन हजार मैलांचे. पण एका मिनिटात डायरेक्ट डायल सिस्टीमने फोन लागतो आणि आवाज इतका स्पष्ट येतो की, जणू काही पलीकडचा माणूस शेजारच्या खोलीतूनच बोलतो आहे. या प्रदीर्घ अशा फोनचा चार्ज हा देखील अतिशय थोडा ! या अत्यंत प्रगत अशा दूरध्वनी व्यवस्थेमुळे अमेरिकेसारख्या प्रचंड देशाचे पूर्व–पश्चिम आणि दक्षिण–उत्तर हे हजारो मैलांचे अंतर नगण्य झाल्यासारखे वाटते. प्रत्येकवेळी अमेरिकेशी भारताची तुलना करून आपल्या देशाची अवहेलना करावी असा हेतू नाही; पण तरीही म्हणावेसे वाटते, सर्वच बाबतीत आपण त्यांच्यापेक्षा दोनशे वर्षे मागे आहोत !

नेवर्कचा एअरपोर्ट अतिशय शांत वाटला. तेथून देशांतर्गत विमानं सुटत होती, येत होती. पण न्यूयॉर्कच्या विमानतळावर उतरल्यावर बॉम्बे सेंट्रल

स्टेशनवर उतरल्यासारखे वाटले होते. पण नेवर्कच्या विमानतळावर मात्र 'नेरळ' स्टेशनवर आल्यासारखे वाटले.

बहुसंख्य कर्मचारी महिलाच होत्या. महिला म्हणजे वीस–पंचवीस वर्षांच्या ब्राऊन रंगाचे स्कर्टस् आणि पांढरे ब्लाऊज घातलेल्या पोरी. त्यांनी आमचे 'चेक इन' केले, आणि आम्हाला प्रतिक्षालयात जाऊ देण्यात आले. सुरेश व ज्योती आम्हाला निरोप देऊन परतले.

प्रतीक्षालयाच्या काचेतून बाहेर उभं असलेलं 'डी. सी. एट' या जातीचं देखणं विमान दिसत होतं. नेवर्क टू लॉस एंजेलेस हा आमचा प्रदीर्घ हवाई प्रवास दोन टप्प्यांनी होणार होता. मिनिओपॉलीस या मध्य अमेरिकेतल्या विमानतळावर आम्हाला उतरून विमान बदलावं लागणार होतं. पण नेवर्कला तिकीट देताना सरळ लॉस एंजेलीसचंच देण्यात आलं होतं. 'फ्लेक्झिबल कॉरीडॉरने' आम्ही विमानात प्रवेश केला. एअर इंडियाच्या 'समुद्रगुप्त' किंवा 'हर्षवर्धन' या विमानांपेक्षा ते बरेच लहान होते.

'युवर अटेन्शन् प्लीज !' ब्राऊन रंगाचा स्कर्ट आणि पांढरा ब्लाऊजवाली, सोनेरी केसांची एअर होस्टेस बोलू लागली, 'वुई आर नाऊ टेकिंग ऑफ फॉर मिनिओपोलीस. प्लीज फासन युवर सीट बेल्टस् ॲन्ड एक्सटिंग्विश युवर सिगारेटस् !' आंतरराष्ट्रीय विमान वाहतूक नियमानुसार त्याही विमानात बसल्यानंतर संकटकाळात कोणकोणत्या खबरदाऱ्या घ्यायच्या याचे प्रात्यक्षिक करून दाखवण्यात आले. धावपट्टीच्या दुसऱ्या टोकावर जाऊन थांबलेल्या विमानानं मशिनची गती वाढवली आणि ते धावपट्टीवर गतिमान होऊन धावू लागलं पाहता पाहता जमिनीशी असलेला संपर्क तुटला आणि विमानानं हवेत झेप घेतली. विमान-प्रवासाची भीती केव्हाच नाहीशी झाली होती. आम्ही तिघे कोल्हापूर–सातारा जाणाऱ्या बसमध्ये जेवढ्या सहजतेने जाऊन बसत होतो, तितक्याच सहजतेने नेवर्कला विमानात चढलो होतो.

विमानात उमेशरावांनी एका स्टुअर्टची ओळख केली. तो होता पाकिस्तानी पण पोऱ्या मोठा गोड स्वभावाचा होता. मी त्याला विचारलं,

'तू इथं कसा ?'

'मी या नॉर्थ वेस्ट ओरिएंट विमान कंपनीत गेली तीन वर्षे नोकरी

करतो आहे. पूर्वी पाकिस्तान इंटरनॅशनल एअरलाईन्समध्ये होतो !'

'घर कुठे ?'

'लाहोरला ! वर्षातून एकदा रजा घेऊन जातो. आई-वडलांना भेटायला !'

'नेवर्कला कुठं असतोस ?'

'लहान जागा अ हे. तिथं एकटाच असतो. अजून लग्न झालेलं नाही.' हे सांगताना तो काहीसा लाजला. भारत आणि पाकिस्तान इथल्या नागरिकांच्या सुखदु:खात फारसा मूलभूत असा फरक नाहीच. या दोन देशांत जी उगाच एक तेढ निर्माण झालेली आहे, ती नाहीशी करण्याचा उभय राष्ट्रांतल्या नेत्यांनी अंत:करणापासून प्रयत्न करायला हवाय. पण पाकिस्तानला आजपर्यंत असा एकही नेता लाभलेला नाही की, ज्याला भारताशी मनापासून मैत्री करावी असं वाटलं. उलट भारताचं अवाढव्य सैन्य, विमानदल, नौसेना यांच्याबद्दल पाकिस्तानी जनतेत घबराट निर्माण करून आपली खुर्ची बळकट करायची हाच तिथल्या राज्यकर्त्यांचा एकमेव हेतू. त्यामुळं या देशांत सामंजस्य निर्माण व्हायला कोणीही मदत केली नाही. यापुढे तशी परिस्थिती निर्माण होईल की नाही, हेही सांगता येत नाही. अमेरिकेनं पाकिस्तानला एफ १६ ही अतिवेगवान व प्रगत अशी युद्धविमानं देऊन भारत-पाकिस्तान यांच्या मैत्रीची कवाडेच बंद करून टाकली आहेत. रिगन युद्धपिपासू नसतील. पण त्यांना आशिया खंडात सत्तेचा समतोल राखण्याची ही जी तळमळ लागून राहिली आहे, ती अनाठाई आहे यात शंका नाही. इंग्रजांनी आमच्या अखंड देशाची शकलं केली, आणि अमेरिका, त्यांचेच जातभाई हा दुभंगलेला भारत सतत अस्वस्थ राहावा याबद्दल प्रयत्नशील आहे.

महंमदअल्ली या स्टुअर्टनं मला एक जीन लेमोनेडचा पेग आणून दिला. प्रवासात थोडं का होईना, पण मद्य चाखायचं हा नियम मी तिथंही मोडला नाही. नेवर्क ते मिनिओपोलीस हे हवाई अंतर तोडायला सुमारे अडीच-तीन तास लागले. पिटस्बर्ग, क्लिव्हलँड, डेट्रॉईट, लेक मिचिगन, अशा मार्गाने आम्ही मिनिओपोलीसला पोहोचलो. त्यावेळी पुन्हा घड्याळ बदलावं लागलं. हवाई प्रवास जेव्हा पूर्व-पश्चिम, किंवा पश्चिम-पूर्व असा

घडतो तेव्हा वेळ पुढे–मागे करावी लागते. मिनिओपॉलीसच्या विमानतळावर सुमारे दोन तास थांबावं लागलं. नेवर्कपेक्षा हा विमानतळ प्रचंड होता. पूर्व–पश्चिम अशी अमेरिकन हवाई वाहतूक मिनिओपॉलिसला थांबत असे. इथं दोन तास थांबायचं असल्यानं मी विमानतळातल्या प्रतीक्षागृहाजवळच्या कॉरीडॉरमध्ये पाऊणएक तास पायी चालून घेतलं इकडून तिकडं फेऱ्या मारताना काही जणांनी माझ्याकडं विचित्र नजरेनं बघितलं वाटेत बार होता. बारमध्ये स्त्रिया–पुरुष गप्पा मारत मद्यपान करीत होते. तेथून पुढे इमिग्रेशन अधिकारी प्रवाशांचं लगेज मेटल डिटेक्टरने तपासत होते. एका प्रवाशाच्या बॅगेत किल्ल्यांचा जुडगा होता लगेच ते मशिन 'कुईकुई' करू लागले. अधिकाऱ्यांनी त्या प्रवाशाला बॅग खोलायला लावली. त्यानं किल्ल्यांचा जुडगा बाहेर काढला आणि तो दिलगिरीच्या स्वरात म्हणाला, 'प्रॉबेब्ली माय वाइफ हॅज केप्ट धिस् !' मी मनात म्हणालो, आपल्या चुकीचं खापर बायकोवर फोडण्याची रीत केवळ भारतातच आहे असं नाही !'

मिनिओपॉलीसच्या विमानतळावर प्रचंड असे सोव्हनीर स्टॉल्स होते. एका बाजूला सौरशक्तीवर चालणाऱ्या लहान–सहान खेळण्यांचे प्रात्यक्षिक करून ठेवले होते. शंभर कँडल पॉवरच्या बल्बवर एक छोटी मोटार, एक सायकल, एक लहानसे मशीन आपोआप फिरत होते. भूगर्भातलं इंधन संपुष्टात येण्यापूर्वी शास्त्रज्ञांना दुसरी पर्यायी शक्ती शोधावीच लागणार आहे. पृथ्वीतलावर मानवानं मांडलेला हा डाव पुढे चालू ठेवायलाच हवा !

मिनिओपॉलीसच्या विमानतळावर त्या शहराची थोडक्यात माहिती दिली होती. अन् शेवटी त्यात म्हटलं होतं . When you visit the Big Apple, forget not to visit the Minniapple, for its inherent beauty, exuberant hotels.' न्यूयॉर्क सिटीला अमेरिकन बिग ॲपल म्हणतात.

सूर्यास्ताच्या समयाला आम्ही लॉसएंजेलेसला जाणाऱ्या विमानात चढलो. पश्चिम लाल गुलाबी झाली होती. सूर्याचा आरक्त गोळा क्षितिजाकडं हळूहळू सरकत होता विमानानं आकाशात उड्डाण करताना वाटलं की, आता लवकरच सूर्यास्त होईल अन् आपला पुढचा प्रवास हा अंधारमय

आकाशातून होईल. पण त्यावेळी आयुष्यात कधीही न अनुभवलेला असा प्रसंग पाहायला मिळाला. आजन्म याद रहावी असा तो विलक्षण प्रसंग !

लाल सूर्यबिंब क्षितिजाला जाऊन भिडलं तेव्हा विमान आकाशात झेपावलं होतं. विमान जसंजसं पश्चिमेकडं निघालं तसं क्षितिजाला जाऊन भिडलेलं ते सूर्यबिंब हळूहळू वर येऊ लागलं. सूर्यास्ताचा समय सूर्योदयासारखा भासू लागला. बघता बघता सूर्यबिंब क्षितिजापासून बरेच वर चढले. इतके की, त्याकडे टक लावून बघणेही अशक्य झाले. आम्ही तिघेही खिडकीतून ते दृश्य पाहून आश्चर्यचकित झालो. उमेश म्हणाले, ' आबा, सूर्याच्या रोखानं आपण जातो आहोत, आणि पृथ्वी गोल आहे या दोन कारणांमुळे आपल्याला हा निसर्गाचा चमत्कारिक खेळ पाहायला मिळतो आहे '

काही क्षणांनंतर वर चढलेलं सूर्यबिंब एकाच ठिकाणी स्थिर झालं. जवळ जवळ अर्धा–पाऊण तास ते तसंच अधांतरी लोंबकळत असल्यासारखं दिसत होतं. पण आमच्या विमानाची गती मंदावली तसे, ते पुन्हा झरझर खाली येऊ लागले. पुन्हा एकदा त्याची प्रखरता मावळली अन् सफरचंदा–सारखे दिसणारे ते लालबिंब जांभळ्या क्षितिजाच्या उदरात शिरले. आमचे विमान सुरुवातीच्याच गतीने जर सूर्याच्या रोखाने उडत राहिले असते, तर कदाचित् सूर्यास्त झाल्याचे दिसलेच नसते; पण आम्ही जाणार होतो लॉसएंजेलेसला, सूर्यबिंबाचा पाठलाग करण्याच्या मोहिमेवर नव्हतो. पण तरीही निसर्गाचा तो आगळा चमत्कार पाहून विस्मयचकित झालो होतो. या परदेश–दौऱ्यात अनेक प्रकारची माणसं बघितली, झाडं–झुडपं पाहिली, माणसानं निसर्गावर मात करणारी केनेडी स्पेस सेंटरसारखी ठिकाणं बघितली, तशीच निसर्गाचीही विविध रूपं पाहायला मिळाली. स्वच्छ, निळ्याभोर आकाशातून पक्ष्याप्रमाणे भ्रमण करणाऱ्या आमच्या विमानाला कित्येकवेळा ढगांचा समूह पार करावा लागला. त्यावेळी आपण कुठल्यातरी अनोख्या ग्रहावर चाललो आहोत की काय, असा भास होत राही. कधी विमानातून दूरवर लखलखणारी वीज दृष्टीस पडे. कधी वरून जोराने वाहणारा वाऱ्याचा झोत विमानाला झोकांड्या खायला लावी. कधी थंडीताप भरलेल्या माणसासारखे विमानाचे सर्वांग थरथर कापू

लागे. पण आता या सर्व प्रकारांची सवयच जडून गेली होती.

एअर होस्टेसने डिनर आणले. सूप, कटलेटस्, मटन चॉप्स आणि पुडींग. वर काळी कॉफी. पण आम्ही तोंड कडू करणारी ती कॉफी कधीच घेत नव्हतो त्या दिवशीही घेतली नाही. नॉर्थ-वेस्ट ओरिएंट कंपनीत डिनरपूर्वी ड्रिंक्स् मोफत देतील असे वाटले होते, पण ते दिले गेले नाही. नंतर समजले की इंटर्नल फ्लाईटस्ना ड्रिंक्स दिली जात नाहीत. इंटरनॅशनल फ्लाईटस्ना मात्र ड्रिंक्स मोफत दिली जातात. पण आताशी ड्रिंक्सचे आकर्षणच उरले नव्हते. येताना महंमदअलीने जीन लेमोनेड दिले होतेच. पण जीनचा प्रभाव असा किती वेळ टिकणार ? मुळातच ते लेडीज ड्रिंक. जरा कुठं मुंगी चावल्यासारखे होते न होते तोवर त्याचा अंमल उतरतो.

डिनर आवरले. सोबत मसाल्याच्या सुपारीच्या दोन भल्यामोठ्या पुड्या मसजीद बंदरवर खरेदी केल्या होत्या. त्यांतली सुपारीची चिमूट तोंडात टाकून लॉस एंजेलेस केव्हा येते याची प्रतीक्षा करू लागलो. विमान किंचित खाली उतरून चालले होते. समोर आकाशात भला मोठा प्रकाशाचा ' ग्लोव्ह ' दिसला. आणि तेवढ्यात एअर होस्टेस बोलली, ' युवर अटेन्शन प्लीज ! वुई आर नाऊ ओन्ली टेन मिनिटस् अवे फ्रॉम लॉस एंजेलीस. प्लीज फासन् युवर बेल्टस् अँड एक्स्टिंग्विश युवर सिगारेटस् !'

विमान बहिरी ससाण्यासारखे एकदम खाली झेपावले, अन् त्याच क्षणी समोर पुन्हा एकदा विश्वास ठेवावा की न ठेवावा, असा संभ्रम निर्माण करणारं दृश्य उभं होतं. खाली उजेडाचा समुद्र पसरल्यासारखा दिसत होता. लॉस एंजेलीस शहरावर विमान येऊन पोहोचलं होतं खाली जिकडे पाहावे तिकडे विजेच्या दिव्यांचा लखलखाट. सहार विमानतळावरून उड्डाण केल्यावेळी मध्यरात्रीची मुंबापुरी बघितली होती, पण ती सुद्धा तोकडी वाटावी असा इथं उजेडाचा महासागर पसरला होता. माझ्यासोबत एखादा ' मोरू ' असता तर, तो तोंडावर हात ठेवत उद्गारला असता, ' अबब, काय ही प्रचंड विजेची रोषणाई, अन् केवढे हे नगर !'

लॉस एंजेलीस शहर सत्तर मैल लांब आणि जवळ जवळ तितकेच रुंद आहे. ओळीनं दिमणाऱ्या हिरव्या दिव्यांची रांग अचूक हेरून पायलटने

विमान आणखीन खाली झुकवले. लॉस एंजेलीसच्या विमानतळावर विमानानं एक फेरी मारली, आणि कंट्रोल टॉवरकडून ग्रीन सिग्नल मिळताच विमान धावपट्टीवर उतरवले.

तिथं रात्रीचे दहा वाजले होते. आमची घड्याळं मागं रेंगाळत होती. नेवर्क सोडल्यानंतर एकदा मिनिओपॉलीसला घड्याळं तिथल्या स्थानिक वेळेनुसार लावावी लागली होती. आणि लॉस एंजेलीसला पोहोचल्यावर ती पुन्हा एकदा लावावी लागली.

इमिग्रेशन अधिकाऱ्यांनी फारसं सतावलं नाही; कारण आम्ही आलो होतो नेवर्कवरून. तपासायचे सारे सोपस्कार नेवर्क आणि मिनिओपॉलीस इथं झालेलेच होते. एअरपोर्टवरून बाहेर येण्यापूर्वी सामानाच्या बॅगा घेतल्या आणि बाहेर आलो तर, तिथं आम्हाला न्यायला कोणीच आलेलं नव्हतं. सकाळी सक्कासन्नावरून उदय पाटलांना फोन केला होता. ते विमानतळावर येतो म्हणाले होते. त्यांचा फोन नंबर आमच्याकडे होताच. त्यांना फोन करावा की काय, अशी आमची चर्चा चालू असतानाच समोरून येणारे उदय पाटील दिसले.

' सॉरी, आयम् रादर लेट, फार उशीर नाही ना झाला ?' त्यांनी जवळ येऊन विचारलं.

' मुळीच नाही. आम्ही एवढ्यातच बाहेर आलो. तुम्हाला फोन करावा की काय याचा विचार करत होतो तोच तुम्ही दिसलात. '

' चला. ' माईच्या हातातील बॅग आपल्याकडे घेत ते पुढे झाले.

उदय पाटील हे मुळचे पुण्याचे. ' अॅटॉमिक एनर्जी ' या विषयातले ते तज्ज्ञ. त्यांच्या लग्नाला मी कोल्हापुरात हजर होतो. त्यांची पत्नी संध्या लॉस एंजेलीसला एका प्रख्यात फिल्म कंपनीत काम करते. एक अत्यंत बुद्धिमान विद्यार्थिनी म्हणून तिनं शालेय अन् महाविद्यालयीन जीवनात नाव कमावलं होतं. रोटरी क्लबच्या साहाय्याने ती मास कम्युनिकेशनचा कोर्स अमेरिकेतच करून आली होती. त्यामुळे तिला अमेरिकन जीवनाचा पूर्वपरिचय होताच. उदय पाटलांना अशीच सहचारिणी हवी होती. आपल्या बहिणीप्रमाणे संध्याही अभ्यागतांच्या आदरातिथ्यात कणभर चढच होती ती आमच्यासाठी जेवायची थांबली होती. पण आम्ही तर विमानातच डिनर घेतलेले,

मग तिला वाईट वाटू नये म्हणून थोडं थोडं खाल्लं. त्यावेळी तिथं तिची एक मैत्रिण आणि तिचे पती दोघे हजर होते लॉस एंजेलीसमध्ये त्या दोघांनी नवीन घर घेतले होते पण गृहप्रवेश करण्याला शुभ वेळ त्या रात्री बारानंतर असल्यामुळे हे दांपत्य बारा वाजेपर्यंत संध्याकडं थांबणार होतं देशांतर केल्यामुळं बालपणापासून घडलेले संस्कार आणि रूढी या सहजासहजी नाहीशा होत नाहीत !

बारा वाजेपर्यंत गप्पा रंगल्या. अमेरिकेतल्या प्रवासात वेळेचा नेहमीच घोटाळा होत होता. तेव्हा कधी डोळयांत भयंकर झोप असताना सकाळचे आठ वाजलेले असत तर कधी, आपण एकदम तरतरीत आणि उत्साही असू त्यावेळी मध्यरात्र झालेली असे. भारत आणि लॉस एंजेलीस यांच्यात जवळजवळ बारा तासांचा फरक पडतो.

उदय पाटलांनी ते घर नुकतंच घेतलं होतं आणि आपल्याला हव्या त्या सुधारणा ते स्वतःच्या हातांनी करीत होते. त्यांच्या एका खोलीत बांधकामाचं सारं साहित्य होतं– करवत, स्क्रू ड्रायव्हर, पक्कड, पाने...... उदयरावांनी आपल्याला हवी तशी बेडरूम स्वतःच बनवलेली पाहिली आणि थक्क झालो.

'हे सर्व तुम्ही केलंत ? मी विचारलं.

'हो. इकडे लेबर अतिशय महाग. शिवाय त्या कामगारांची अन् माझी वेळ जमणे अशक्य. मग रोज कामावरून घरी परतल्यानंतर थोडा थोडा वेळ हे करीत होतो. आता जवळ जवळ पूर्ण होत आलं आहे !'

'पण हे अॅटॅच बाथसुद्धा तुम्ही जोडलंत ?'

'हो. फक्त अंडरग्राऊंड ड्रेन पाईप ही प्लंबर बोलावून करून घ्यावी लागली. माझ्याकडं ती हत्यारे नाहीत; शिवाय ते थोडं 'स्किल्ड वर्क' आहे.'

'तुमच्या चिकाटीचं कौतुक करावं तितकं थोडं आहे. फर्स्टक्लास बेडरूम तयार केलीत की !'

'अजून फिनिशिंग व्हायचं आहे. तुम्ही पुन्हा जेव्हा अमेरिकेला याल, तेव्हा ही बेडरूम पूर्ण झालेली असेल !'

'माय गॉड !' कपाळाला हात लावून मी उद्‌गारलो, 'अहो उदयराव,

हे तुमचं गाव भारताच्या बरोबर विरुद्ध टोकाला. इथपर्यंत पोहोचताना काय काय दिव्यं करावी लागली ते ऐकवीन केव्हातरी !

स्वावलंबन म्हणजे केवळ स्वतःची चड्डी आणि बनियन धुणे एवढाच अर्थ आजपर्यंत मला अभिप्रेत होता, पण उदयरावांचं स्वावलंबन हे अविस्मरणीय होतं तिकडं सक्कासन्नाला सुरेशराव ज्योतीला घर साफ करण्यापासून ते जेवण बनवण्यापर्यंत सर्व कामात मदत करीत. पण त्यांचा व्यवसाय आणि घर दोन्ही सांभाळताना त्या दोघांची भलतीच तारांबळ उडत होती.

संध्याला वाटलं, इतक्या दूर आल्यासारखं आम्ही लोक तिच्याकडं चांगले चार–आठ दिवस तरी राहू. पण आमचा प्रोग्रॅम अमेरिकेत पाऊल ठेवलेल्या क्षणीच उमेशनी ' फिक्स ' करून ठेवला होता. कारण कोणत्याही परिस्थितीत त्यांना इंटरनॅशनल लॉच्या सेमिनारसाठी हॉलंडमध्ये हेगला पंचवीस जुलै रोजी पोहोचणं आवश्यक होतं. त्या अनुरोधानेच त्यांनी आमच्या प्रवासाचं टाईम–टेबल ठरवून टाकलं होतं. त्यामुळं दुसऱ्या दिवशी सकाळी सात वाजता सॅनडिएगोवरून शालिनी सराफ यांचा फोन आला, ' भाई तुम्हाला इकडे आणण्यासाठी निघाले आहेत. आपण तयार राहावे. '

'आम्ही लगेच तेथून सॅनडिएगोला जाणार या वार्तेने संध्या नाराज झाली. ' इतका थोडा वेळ आमच्याकडं थांबायचं होतं, तर मग आलात तरी कशाला ?'

उदयरावांनाही आमचं लागलीच पुढे सॅनडिएगोला जाणं पसंत पडलं नाही.

' परत सक्कासन्नाला जाण्यापूर्वी एक–दोन दिवस पुन्हा तुमच्याकडं राहणार आहोत, ' असं जेव्हा आम्ही त्यांना सांगितलं तेव्हा कुठं त्यांना जरा बरं वाटलं,

लॉस एंजेलीसची हवा उत्तम होती. उदयरावांचं घर ज्या भागात होतं तो भाग बॅरी अॅव्हेन्यू अतिशय शांत होता. प्रत्येक घरासमोर लॉन आणि फुलझाडं होती. आंघोळ उरकून मी जरा बाहेर आलो तर, पेपरचं हे एवढं भलं मोठं प्लॅस्टिकच्या कागदात गुंडाळलेलं भेंडोळं प्रत्येकाच्या दारात

पडलेलं. उदयरावांच्याकडं ते देत मी म्हणालो, ' प्रत्येकाच्या दारासमोर ही असली कशाची भेंडोळी पडली आहेत ?'

त्यावर उदयराव किंचित् हसून म्हणाले. ' अहो, हा ' लॉस एंजेलीस टाईम्स ' आहे. '

' पण एवढा मोठा ?'

प्लॉस्टिकच्या कागदातून तो पेपर बाहेर काढला. चारशे पानांचा तो लॉस एंजेलीस टाईम्स होता.

' रोज एवढ्या आकाराचा पेपर प्रत्येकाला वाचणं कसं शक्य आहे ?' मी उदयरावाना विचारलं,

' सगळा पेपर कोणीच वाचू शकत नाही. या चारशे पानांच्या पेपरमध्ये निरनिराळे विभाग आहेत. राजकारण, व्यापार, क्रीडा, आंतरराष्ट्रीय वार्ता, हवामान वृत्त, शास्त्रीय संशोधन, शेतीविषयक माहिती इत्यादी, आणि त्याचबरोबर जाहिरातीही खूप असतात. कोणाला घर घेणे असते, कोणाला घर विकायचे असते, तर कुठल्या इंटस्ट्रीला लॉ ग्रॅज्यूएटस् लेबर ऑफिसर म्हणून नेमायचे असतात. वृत्तपत्रांतल्या या जाहिरातींचा गरजू लोकांना फारच उपयोग होतो. '

मी कारपेटवर बसून ती चारशे पानं भराभरा चाळली आणि उदयरावांना म्हणालो,

' तुमच्या या लॉस एंजेलीस टाईम्समध्ये मला प्रकर्षानं एक उणीव भासते !'

' ती कोणती ?' त्यांनी विचारलं.

' यात आपल्या दिवंगत काके, मामे, आजी, आत्या, आई–वडील यांना आदरांजल्या कशा नाहीत ? आमच्याकडे अलीकडे महाराष्ट्रातल्या सर्व वृत्तपत्रांनी थेट स्वर्गाशी टेलेकम्युनिकेशन करून पृथ्वीतलावरील हयात व्यक्तीकडून त्यांच्या मृत नातलगांना श्रद्धांजल्या पोहचत्या करण्याची मोठ्या प्रमाणावर कंत्राटं घेतलेली आहेत.

' तात्या, तुम्हाला जाऊन आज सहा वर्षं झाली. पण तुमची आठवण झाली नाही असा एकही क्षण गेला नाही. '

' प्रिय नाना, तुम्ही आपल्या महत्प्रयासाने आणि चिकाटीने सुरू केलेल्या

उद्योगाचे रोपटे आता प्रचंड 'वृक्ष' बनला आहे, हे पाहायलां तुम्ही आमच्यामध्ये नाही, याची आम्हाला पदोपदी खंत वाटते. ईश्वर तुमच्या आत्म्याला चिरशांती देवो!' X X X परिवार

हॉटेलचा पत्ता : क्षुधा शांती भवन ३० X X X

हे लोक आमच्या मृत नातेवाईकांना श्रद्धांजली वाहतात, की दुकानांची आणि धंद्याची जाहिरात करतात हेचं कळत नाही. काही वेळा मृतांच्या नावाचा उल्लेख करून एखादे 'गावठी कवन' केलेले आढळते. आमच्या कोल्हापूरला हे फॅड खेड्यापाड्यापर्यंत पोहोचले आहे : 'कै. प्रिय आकुबाई दौलू सुतार, रा. सुळकूड, ता. कागल, तुम्ही जाऊन आज दोन वर्ष झाली. घर कसे सुने सुने वाटते आहे. तुमच्या आशीर्वादानं यंदा तानी आणि गंप्या यांची लग्नं ठरवली आहेत. त्या मंगलकार्याला तुमचा आशीर्वाद द्यावा.

तुमचा आज्ञाधारक, दत्तु दौलु सुतार (मेस्त्री).

अशी एक नाही, हजार उदाहरणं देता येतील. मृत व्यक्तींविषयी आदर असणे हे अपरिहार्य आहे. पण प्रेम, आदर, भक्ती यांचे सार्वजनिक प्रदर्शन हे थोतांड आहे. तुमच्या घरातल्या मृताबद्दल जगाला आदर का वाटावा? त्या दिवंगतांची स्मृती चिरंतन राहावी असे वाटत असेल तर, त्यांचे नावे गरीब अन् होतकरू विद्यार्थ्यांना स्कॉलरशिप सुरू करा, एखाद्या दवाखान्याला किंवा शैक्षणिक संस्थेला उपयुक्त अशी साधनसामग्री घेऊन द्या. ज्या वर्तमानपत्रात तुम्ही तुमच्या प्रियजनांचे फोटो छापता, ते वर्तमानपत्र दुसऱ्या दिवसांची रद्दी असते. आणि रद्दीचा वापर निरनिराळ्या ठिकाणी निरनिराळ्या तऱ्हेनं केला जातो. लेकुरवाळ्यांच्या घरांमध्ये तर...... छे, नकोच तो उल्लेख! तेव्हा तुमच्या प्रियजनांचा फोटो असलेला वृत्तपत्राचा कागद 'अशा' तऱ्हेनं वापरला जात असतो याची निदान सूज्ञ जनांनी तरी दखल घ्यावी. अडाणी आणि अज्ञानी लोकांनी अशा श्रद्धांजल्यांच्या जाहिराती देणे हे निराळं अन् स्वतःला सुशिक्षित म्हणवणाऱ्यांनी या अनिष्ट प्रथांना बळी पडणं निराळं!

परवा एका खेड्यातला गृहस्थ माझ्याकडे काही कामासाठी आला होता. योगायोगानं त्याच्याच गावच्या एका मरण पावलेल्या म्हातारीला तिच्या 'परिवारानं' त्या दिवशीच्या स्थानिक पेपरमध्ये श्रद्धांजली वाहिलेली

होती. मी सहज त्याला विचारले, ' गिरजाबाई ज्ञानू पाटील या बाईंना श्रद्धांजली वाहिली आहे. त्यांना तुम्ही ओळखत होता का ?' पेपरमधला फोटो त्याला दाखवत मी विचारले.

तो गृहस्थ किंचित घसा साफ करून म्हणाला, ' आवो सायेब, त्या गिरजाचं लई लई हाल केलं तिच्या पोरांनी. रांडच्यांनी म्हातारीच्या पोटाला दिकून घाटलं नाही. कदा तिच्या अंगावर बिनठिगळाचं लुगडं दिसलं न्हाई, अन्नान दशाहून मेली बापडी, आनि आता हे बाईलभाडे तिचा फोटू छापल्यात. रांडच्यास्नी पा-पायतानानं हानायला पायजे !'

जिवंतपणी दुर्लक्ष करायचं आणि तीच व्यक्ती मृत झाली की, स्थानिक वृत्तपत्रांत श्रद्धांजली वाहायची हा प्रकार अत्यंत किळसवाणा आहे. केवळ आपलं आणि आपल्या परिवाराचं नाव वृत्तपत्रांत छापून यावं यासाठी केलेला हा खटाटोप आहे. घरगुती कार्यक्रमाला ढणाणा लाऊडस्पीकर लावणाऱ्यांची अन् मृतांना श्रद्धांजल्या वाहणाऱ्यांची जातकुळी अन् गोत्र एकच असावं ! स्वत:ला दर्जेदार अाणि प्रमुख समजणाऱ्या वृत्तपत्रांनी अशा श्रद्धांजल्या स्वीकारता कामा नयेत. लोक तुमचा पेपर घेतात ते तो वाचनीय असतो म्हणून. श्रद्धांजल्या वाचण्यासाठी नव्हे !'

उदयराव माझ्या विचाराशी सहमत झाले होते. मी उदयरावांच्या घरी स्वामी विवेकानंदांची पुस्तकं पाहून विचारलं,

' विवेकानंदांची बरीच पुस्तकं दिसतात !'

' हो ! मला त्यांचे विचार अतिशय आवडतात. इथल्या मेकॅनिकल जीवनाची जेव्हा जेव्हा उबग येते, तेव्हा विवेकानंद वाचतो. मन प्रसन्न होते. विवेकानंदांच्यासारखा विचारवंत पुन्हा भारतात जन्मलेला नाही. '

' खरंय् तुम्ही म्हणता ते. देशाला ज्ञानी अन् प्रबळ करण्याची त्यांची ती विचारधारा कुठं अन् देशाला आजही नामस्मरणाचा महिमा सांगणारं अन दुबळं बनवणारं तत्त्वज्ञान कुठं ?'

आम्ही बोलत होतो तोच, दारात गाडी येऊन थांबली. मी थोडासा पुढं झालो. या जन्मी कधीही ज्यांना बघितलेलं नव्हत असे श्री. भाई सराफ आम्हाला आपल्याकडं सॅनडिएगोला नेण्यासाठी आले होते. त्यांच्याशी हस्तांदोलन करून त्यांना आत आणलं. उदयरावांशी त्यांची ओळख करून

दिली.

'घर शोधायला फार वेळ नाही ना लागला?' उदयरावांनी भाईंनं विचारलं.

'छेऽऽऽ! एल. ए. मला पाठ आहे. सॅनडिएगोला जाण्यापूर्वी मी एल. ए. लाच राहात होतो. शिवाय तुम्ही अ‍ॅड्रेस अगदी बरोबर दिलेला होता.

अमेरिकेत मला एक प्रकर्षानं जाणवलं ते असं की, जी गोष्ट थोडक्यात सांगता येणं शक्य आहे त्यासाठी उगाच अनाठाई शब्द खर्च करू नयेत. आता भाईंनी लॉज एंजेलीसला आपण पूर्वी रहात होतो हे कसं चटकन् सांगून टाकलं. 'एल. ए. मला पाठ आहे' म्हणजे लॉस एंजेलिस हे शहर माझ्या पूर्वपरिचयाचं आहे. त्याचप्रमाणं CA म्हणजे कॅलिफोर्निया, NJ म्हणजे न्यू जर्सी! त्या लोकांचे पोस्टल अ‍ॅड्रेसेस सुद्धा अतिशय सुटसुटीत असतात. नाहीतर आम्हीही पत्ता लिहिताना लिहितोच, मुक्काम पोस्ट, तालुका, जिल्हा, गल्ली आळी–आणि इतकंही करून ते पत्र ज्याला पाठवलं त्याच्या हाती पडेल की नाही, याची शाश्वती नसते. कधी कधी वर्ष, दोन वर्ष प्रवास करणाऱ्या पत्राच्या वार्ता आपण पेपरमध्ये वाचतोच की!

उदय आणि संध्या यांचा निरोप घेऊन आम्ही भाईच्याबरोबर सॅनडिएगोला निघालो. जाताना भाई आपण अमेरिकेत का व केव्हा आलो हे सांगत होते भाई मूळचे औरंगाबादचे गुजराथी कुटुंबातले. पुण्याच्या शालिनीबाई देशपांडे यांच्याशी आंतरजातीय विवाह झाला. माणसामाणसांत फरक जाणणाऱ्या समाजाला अर्थात तो विवाह पसंत नव्हता. त्यातून अनेक प्रापंचिक कटकटी निर्माण झाल्या. मुलगा शिरीष भारतातच जन्मला. पुढे त्याच्या शिक्षणातही काही अडचणी आल्या, तेव्हा भाईंनी सरळ या देशालाच रामराम ठोकला. एक मुलगी असून सध्या तीही अमेरिकेत आहे. अन् शिरीष इंजिनियर झालेला आहे. भाईंनी श्रम हाच परमेश्वर समजून अनेक व्यवसाय केले. सध्या ते ब्रेड डिस्ट्रीब्युशनचा स्वतंत्र व्यवसाय करतात. यासाठी त्यांना मध्यरात्रीच घर सोडावं लागतं. पन्नाशीला येऊन ठेपलेले भाई मला भयंकर जिद्दी वाटले.

भाईची ही प्राथमिक ओळख होणं माझ्या दृष्टीनं अत्यावश्यक होतं, कारण त्यांच्या घरी आठ-दहा दिवस राहावं लागणार होतं.

पश्चिम अमेरिकेला जाण्याचा आमचा प्रमुख हेतू होता, दोन स्थळांना भेट देण्याचा. त्यापैकी एक ' लास वेगास, ' याचा उच्चार ' ला वेगास, ' केला जातो. अन् दुसरं ठिकाण होतं ग्रँड कॅनियन ! सॅनडिएगो लॉस एंजेलीसपासून सव्वाशे मैल दूर होतं आणि इतक्या दुरून आम्हाला न्यायला भाई आले होते. तेव्हा मी त्यांना म्हणालो,

' आपण खूप त्रास घेतलात ! '

' अहो, यात कसला आला आहे त्रास ? आम्ही मुलीला भेटायला जातो तेव्हा सहाशे मैल ड्राईव्ह करावं लागतं. हे तर काहीच नाही. '

रुंद रस्ते, वाहतुकीचे नियम काटेकोर रीतीनं पाळणारे अमेरिकन नागरिक. त्यामुळं ' बाय रोड ' प्रवास हा नेहमीच सुखाचा होतो.

' बरं, आम्ही ला वेगास आणि ग्रँड कॅनियन पाहायला जाणार होतो याबद्दल काय काय निश्चित केलं ? '

' त्याचं असं आहे बाबासाहेब, ' ड्रायव्हिंग करता करता भाई बोलत होते, ' आम्ही तुमच्यासाठी' ग्रेहाऊंड आणि ग्रे लाईन' या प्रवासी कंपनीकडे चौकशी केली, पण असं सांगण्यांत आलं की, ला वेगास आणि ग्रँड कॅनियन इथं त्यांच्या टूर्स जातात, पण तुम्हाला जितक्या वेळेत ही दोन ठिकाणं पाहायची आहेत, तितक्या वेळेत ती पाहून होणार नाहीत. ला वेगासला हॉटेलींग भलतंच महाग आहे. म्हणून शालिनीनं एक मार्ग काढला आहे !'

' कोणता ? '

'ती ठिकाणं पाहण्यासाठी आम्ही कँपर घ्यायचा ठरवला आहे. शालिनीनं अद्याप ग्रँड कॅनियन बघितलेलं नाही. तीही तुमच्यासमवेत येईल, शिरीष कँपर चालवेल. तुम्हाला तुमच्या नियोजित वेळेत ही दोन्ही ठिकाणं पाहता येतील, शिवाय, हॉटेलमध्ये राहण्याचा खर्चही वाचेल. कँपरमध्ये सर्व काही सुविधा असतात. '

ती भाईंची कल्पना आम्ही तिघांनी एकमताने मान्य केली. अमेरिकन चित्रपटांत आजपर्यंत असे कँपर्स बघितले होते. आता प्रत्यक्षच त्यातून प्रवास करण्याची अन् त्यात राहण्याची संधी चालून आली होती.

भाईंना आम्ही या परदेश दौऱ्यावर निघण्याचे वेळी ज्या अडचणींना तोंड द्यावे लागले ते सांगितले, तेव्हा ते म्हणाले, ' भारतीयांच्या मनोवृत्तीचा मी

पुरेपूर अनुभव घेतलेला आहे. म्हणून तर मी इतक्या दूर येऊन स्थाईक झालो.'

वाटेत भाईनी एका टेकडीवरील गावाकडे बोट दाखवून म्हटलं, 'हे निक्सनचं गाव सत्तेवरून दूर झाल्यापासून ते याच ठिकाणी राहतात.' जाताना कॅलिफोर्नियातल्या जगप्रसिद्ध अशा मोसंबी अन् संत्र्यांच्या बागा दिसल्या. मैलच्या मैल बाग पसरलेली. फळांच्या ओझ्यानं अक्षरश: जमिनीला टेकलेल्या बागा पाहून आश्चर्य वाटलं. वाटेत एके ठिकाणी टोमॅटोचं शेत लागलं. स्वच्छ अशा सूर्यप्रकाशात पाचूचा सडा पडल्याचा भास झाला. टोमॅटो शेतात हाताने तोडणे शक्यच नव्हते. शेत मैलच्या मैल पसरलेलं. मुळातूनच यंत्राने झाडे उपटली जातात आणि तिकडे शीतगृहांत गेल्यानंतर तोडून तात्काळ मार्केटकडे किंवा केचअप् बनवायच्या फॅक्टरीकडं रवाना होतात.

रेल्वे मार्ग आणि रस्ता काही ठिकाणी समांतर गेलेला होता. रेल्वे मार्गाच्या पलीकडे वाळवंट दिसत होतं आणि त्यापलीकडे समुद्र व सॅनडिएगोचा किनारा दिसत होता. दूर कुठंतरी एअरफोर्सचा विमानतळ होता. सरावासाठी विमानं आकाशात संचार करीत होती. युद्ध चालू असो वा नसो, नेव्ही आणि एअरफोर्स यांच्या सरावाच्या कवायती सुरूच असतात. पण अलीकडे अमेरिकन नागरिकांची मुलं सैन्यात दाखल व्हायला फारशी उत्सुक नसतात. युद्ध सुरू असले की, त्यांना विचार करायला वेळ नसतो, पण शांततेच्या काळात सैन्यात दाखल होणे हे त्यांना 'बोअर' वाटते. पण अमेरिकन राजनीती त्यांना 'बोअर' होऊ नये अशी स्थिती येऊन देतेच कुठे? इंडोचायना, व्हिएटनाम, अफगाणिस्तान अशा दूर पूर्वेकडच्या देशांत शांतता आणि सत्तेचा समतोल या गोंडस नावाखाली आपले सैन्य घुसवणे चालूच असते. याचं कारण एकच, विपुल समृद्धी! आपण कल्पना करा आपल्याकडे एखाद्या खेड्यात एखादा शेतकरी अमाप पैसा मिळवून गबरगंड झाला की, तो गावात कोणाला सुखानं जगू देत नाही. लावालाव्या तरी करील, किंवा स्वत:चे सामर्थ्य दुसऱ्याला समजावे यासाठी काहीतरी उचापती तरी करीत राहील! अंकल सॅम ही सुद्धा गबरगंड असामीच! अखिल जगतात लोकशाही नांदावी ही म्हणे अमेरिकेची

धारणा आहे. पाकिस्तानला एफ् १६ ही विमानं देण्यामागेसुद्धा हाच हेतू असेल का ?

बोलत बोलत आम्ही सॅनडिएगोच्या परिसरात आलो. सॅनडिएगो हे सुद्धा सॅनफ्रॅन्सिस्कोसारखे डोंगर अन् टेकडयांवर वसलेले गाव आहे. तुरळक अशी वस्ती चौफेर पसरली आहे. या भागात पूर्वी स्पॅनिश वस्ती होती. पॅसिऑ कार्डीयल या विभागात गाडी एका टुमदार बंगल्यापुढे येऊन थांबली. भाई म्हणाले, 'हे आपलं घर.' जिना चढून वर आलो तो शालिनी सराफ आमच्या स्वागताला पुढे आल्या.

गेली तीन वर्षे आमची पत्रमैत्री सुरू होती. पत्रातून थोडेफार त्यांचे व्यक्तिमत्त्व प्रतिबिंबित झाले होते. पण प्रत्यक्षात भेट झाल्यानंतर जिव्हाळा द्विगुणित झाला. शिरीष हा आमच्या उमेशरावांच्या वर्गिचाच. त्या दोघांचे अर्ध्या तासातच अरे तुरे सुरू झाले. जणूकाही त्या दोघांची कित्येक वर्षांची जुनी दोस्तीच ! शालिनीताईंना घरी सर्वजण 'भाभी' म्हणत, म्हणून आम्हीही त्यांना त्याच नावानं संबोधायला सुरुवात केली. माईची अन् भाभींची गट्टी जमली. येऊन जाऊन माझीच कुचंबणा होती. कारण भाई पहाटे उठून जायचे ते दुपारी बऱ्याच उशीरा परत यायचे.

पहिल्या दिवशी मात्र त्यांनी आमच्यासाठी संपूर्ण दिवस राखून ठेवला होता. आम्ही आल्याच्या आनंदाप्रित्यर्थ 'शँपेन' उघडण्यात आली. पण खरं सांगू, मला शँपेन हे पेय फारसं आवडलंच नाही. इंग्रजी चित्रपट पाहताना मात्र बारीक दांडयाच्या ग्लासमधून हिरो–हिरॉईन शँपेन प्यायचे तेव्हा वाटायचं, यदाकदाचित् परदेशाला गेलो तर शँपेनशिवाय दुसरं काही प्यायचंच नाही. पण प्रत्यक्षात मात्र 'शँपेन' मला फारशी आवडली नाही. पण यजमानांना वाईट वाटू नये, त्यांच्या आनंदावर विरजण पडू नये म्हणून, शँपेन प्यालोच; पण हळूच शिरीषला बाजूला घेऊन जाऊन म्हणालो, 'मला व्हिस्कीचा एक पेग असला तर दे !'

त्यानं 'रेड लेबलची' अख्खी बाटलीच समोर आणून ठेवली. 'चिकन् करी आणि राईस' असा साधा मेनू होता पहिल्या दिवशी. पण अमेरिकेत भारतीय पद्धतीचं भोजन मिळणं हेही एक भाग्यच. कारण तिथं स्थाईक झालेली बरीचशी कुटुंबसुद्धा डिपार्टमेंटल स्टोअर्समधून तयार जेवणच घेऊन

येतात.

सराफ कुटुंबात अगदी अल्पावधीतच आम्ही समरस होऊन गेलो. दुसऱ्या दिवशी सकाळी तासभर पायी फिरून आलो. आता अमेरिका मला चांगलीच मानवायला लागली होती. पँट कमरेला घट्ट होऊ लागली. एक–दोन बुशशर्टची पोटावरची बटणं तुटली. नियमित कोणत्या ना कोणत्या तऱ्हेचा व्यायाम करण्याची सवय असलेला मी, पण दौऱ्यात फारसं फिरायलासुद्धा मिळत नसे. तिकडे सक्कासन्नाला थोडं फिरलो, अन् सँनडिएगोला थोडे. पण पायी फिरल्याशिवाय एखाद्या गावाची ओळख कधीच होत नसते.

दुसऱ्या दिवशी संध्याकाळी मला चहासाठी निमंत्रण आलं! मी म्हणालो, या सॅनडिएगोत सराफांच्याशिवाय कोणीच परिचयाचं नसताना चहाला निमंत्रण कोणी दिलं? पण तेही लोक अगदीच जवळचे निघाले. कोल्हापूरचे प्रख्यात पब्लिक प्रॉसिक्यूटर कै. दादासो इंदूलकर यांच्या कन्या आणि जामात श्री. शामराव जाधव हे सँनडिएगोतच राहात होते. पण त्यांचं घर दहा मैलांवर होतं. शिरीष त्यांच्याकडे आम्हाला घेऊन जाणार होता; पण तत्पूर्वी तो आम्हाला ' लेक मीरामार ' या पिकनिक स्पॉटकडे घेऊन गेला. लेक मीरामार हा छोटासाच तलाव होता. पण त्याभोवताली बरेच लोक पिकनिकसाठी आले होते. कोणी नावेतून फिरत होते, तर कोणी गळानं मासे पकडत होते, तर कोणी काठावर विस्तव करून बार्बेक्यू करीत होते.

शिरीषनं ते ठिकाण पेंटिंगला फार उत्तम आहे असं सांगितल्यानं मी माझी रंगपेटी आणि कागद सोबत घेतले होते. तलावाकाठी एक उत्तम बोट बघून मी खांद्याची पिशवी काढली. पेन्सिलीने कागदावर भराभर स्केच केले आणि हाय! मी रंगवायचे ब्रश आणायचेच विसरलो होतो. समोर गडद निळा तलाव, बाजूला झुडपं, त्यापलीकडे सोनेरी गवत, गवताच्या पलीकडं निलगिरीसारखी झिपरी झाडं. हे असं दृश्य रंगवायला पुन्हा कधी मिळणार? पण मी हताश झालो नाही. त्या तलावाकाठी रानटी बदकांची गळून पडलेली पाच–सहा पिसं गोळा केली. किनाऱ्यावर पडलेल्या गळाच्या तुटक्या दोऱ्यांनी ती पिसं एका काडीला एकत्र बांधून त्याचा झक्कपैकी ब्रश तयार केला. त्या ब्रशनं मी लेक मीरामारचं चित्र रंगवलं त्यावेळी माझ्याजवळ कोणीच नव्हतं. उमेश आणि शिरीष कॅमेरा

घेऊन भटकायला गेले होते, माईच्या आणि भाभींच्या गप्पा झाडाखाली रंगल्या होत्या.

मी त्यांना माझं पेंटिंग दाखवलं अन् ते कसं रंगवलं तेही सांगितलं. तो बदकांचा पंखांचा ब्रश दाखवताच भाभी आश्चर्यानं थक्क झाल्या. कचऱ्यातून अनेक कलाकृती मी यापूर्वीही तयार केलेल्या आहेत. मोडक्या फौंटनपेनची विमानं, ब्रियांची बदकं अन् बगळे, लाखेचे अन् लाकडाचे छोटे छोटे पक्षी, वेळूच्या सालपटाची जहाजं, एक ना हजार! पण त्या दिवशी बदकांच्या पिसाच्या ब्रशानं लेक मीरामारचं ते लँडस्केप तयार केल्याचा आनंद काय आगळाच होता.

संध्याकाळच्या सुमारास आम्ही जाधवांच्याकडं गेलो. शीलाताईनी कांद्याची भजी, वेफर्स असे पदार्थ बनवलेले होते. शामराव आणि त्यांचे मेव्हणे 'हॉलीडे मूडमध्ये' होते. मी संध्याकाळी चहा – कॉफी घेत नाही म्हटल्यावर अर्थातच त्यांनी मला ड्रिंक्सबद्दल विचारले. मी होकारार्थी मान डोलावली.

जाधवांना त्या महिला मंडळातून उठायची मी खूण केली अन् आम्ही माडीवर आलो. बायका खाली गप्पा मारण्यात दंग झाल्या, अन् आमची 'शिवाज रिगल'ची मैफल माडीवर रंगली. बोलता बोलता शिकारीच्या गप्पा निघाल्या. शिकारीत घडलेल्या विनोदी किश्श्यांचे भांडार माझ्यापाशी तयारच होते. ते ऐकताना त्या दोघांना हसून हसून बेजार झाल्यासारखे झाले. जाधवांनी तर रात्री जेवण करून जाण्याचाच आग्रह धरला पण भाभींनी आणि माईनी रात्री घरीच जेवण बनवण्याचं ठरवून ठेवलं होतं.

दीड-दोन तास कसे निघून गेले समजले नाही. ला वेगास आणि ग्रँड कॅनियन इथून परतल्यावर एक संध्याकाळ शामरावांकडं घालवायची असं आश्वासन देऊन आम्ही त्यांचा निरोप घेतला.

डोक्यात मस्तपैकी शिवाज रिगलची मादक धुंदी घेऊन भाभींच्या घरी परतलो. सॅनडिएगोची ती संध्याकाळ अत्यंत प्रसन्न होती. सूर्य पश्चिमेला झुकला होता. मंद हवा सुटली होती. विस्तीर्ण अशा रस्त्यावरून आमची गाडी धावत होती. तेव्हा शिरीष म्हणाला, 'आपण एकदा सॅनडिएगोचा हॅच क्लब पाहायला जाऊ इथला झूही पाहण्यासारखा आहे.'

त्यावर मी म्हणालो, ' शिरीष, जंगलातले असंख्य प्राणी मी आजपर्यंत बघितले आहेत. मला प्राणिसंग्रहालयाचे फारसे आकर्षण उरलेले नाही. वाघ, गवू रेडे, हत्ती मी जंगलातसुद्धा बघितले आहेत. त्यात वेळ घालवण्यापेक्षा इथली दुसरी प्रेक्षणीय स्थळं पाहू ! '

आम्ही ग्रँड कॅनियन आणि ला वेगास पाहून आल्यानंतर, शिरीषनं सॅनडिएगोचा बीच आणि ' याच क्लब ' दाखवला. अतिशय सुरेख असा तो भाग वाटला.

तिसऱ्या दिवशी भाभींनी आणि माईनी प्रवासाची सारी जय्यत तयारी करून घेतली. मीठ–मोहरीपासून सर्व आवश्यक असं जेवणाचं साहित्य सोबत घेतलं.

कँपरचे मालक होते महाराष्ट्रीयन श्री. आचरेकर ! सॅनडिएगोपासून दोन तास प्रवास केल्यानंतर आम्ही ॲनहॅमला आचरेकरांच्याकडे पोहोचलो. मिसेस् आचरेकर ' बेबी सिटिंग ' करतात. अमेरिकेत बहुतेक पतिपत्नी दोघेही नोकरीधंदा करतात. अशा वेळी त्यांच्या लहान मुलांना दिवसभर सांभाळणाऱ्या स्त्रियांना ' बेबी सीटर ' म्हणतात. घराबाहेर कुठेही न जाता मुलं सांभाळण्याचा हा व्यवसायसुद्धा बरेच डॉलर्स मिळवून देतो.

सौ. आचरेकर बोलायला अतिशय गोड होत्या. त्याही मुंबईच्या. त्यांची वहीण नुकतीच अमेरिकेला आली होती. ती निघाली माझी वाचक ! मग आदरातिथ्याला पुन्हा जोर चढला. सौ. आचरेकरांनी आम्हाला घरी जेवायला येण्याचा फार फार आग्रह केला. त्यांनाही ग्रँड कॅनियन आणि ला वेगासवरून परत आल्यावर येऊ असे आश्वासन दिले. काही माणसांना दुसऱ्यांना खायला घालण्यात अतोनात सुख मिळतं, तर काहींना उष्ट्या हातानं कावळा हुसकायचंसुद्धा जिवावर येतं. आपल्या घरी चार माणसांनी यावं, आपल्यासमवेत चार घास खावेत असं वाटणारी माणसं पैशानं तोकडी असली तरी, मनानं लाखोपती असतात. सौ. आचरेकरांच्याकडेही पुन्हा जाता आले नाही याची रुखरुख लागून राहिली आहे.

शिरीषनं आपली गाडी आचरेकरांच्याकडं सोडली आणि कँपरने आमचा प्रवास सुरू झाला या कँपरमध्ये ड्रायव्हरच्या डोक्यावर दोन माणसं, मागच्या फोल्डींग सीटचा बेड बनवल्यावर दोन आणि डायनिंग

टेबलचा कॉट केल्यावर दोन अशी सहा माणसं आरामात झोपण्याची व्यवस्था होती. त्याचबरोबर गॅस, एअर-कंडीशनर, फ्रीज आणि छोटे टॉयलेटसुद्धा ! अमेरिकेत आणि युरोपमध्ये प्रवासी लोकांच्यासाठी कॅंपर पार्किंग ग्राऊंडस् असतात. त्याला दहा डॉलर भाडं द्यावं लागतं. पाण्याचा नळ, वीज आणि ड्रेनेज पाईप यांचे कनेक्शन जोडून एखाद्या निसर्गरम्य अशा ठिकाणी हवे तितके दिवस हे आलिशान छोटे फिरते घर उभे करता येते.

ॲनहॅम सोडल्यानंतर फार तर दहा-पंधरा मैल गेलो असेन. कॅंपर आचके द्यायला लागला. शिरीषनं कॅंपर रस्त्याच्या बाजूला उभा केला. गाडीत ' गॅस ' म्हणजे पेट्रोल भरपूर असल्याचे काटा दर्शवीत होता. बॅटरी चार्जींगही चांगले होते. मग आता या वाहनाच्या अंगात का यावे समजेना

उमेश म्हणाले, ' शिरीष, गाडीत पेट्रोल भरपूर असल्याचे हा काटा दाखवतो आहे खरा, पण मागे टाकीचं टोपण उघडून काडी घालून बघ, कधी कधी ही पेट्रोल दाखवणारी यंत्रं बिघडलेली असतात. '

' छे ऽ ! तसं कधीच होणार नाही. ज्यावेळी आपल्याला कॅंपर देण्यात येतो तेव्हा टाकी फुल्ल करून द्यायची प्रथा आहे. आपण जेव्हा कॅंपर परत करतो तेव्हासुद्धा टाकी ' फुल्ल ' करून मालकाला परत करायची असते ! '

' तू म्हणतोस ते खरं, पण एकदा मी म्हणतो तशी खात्री करून घ्यायला काय बिघडलं ?' उमेशनी त्याला आग्रहानं सुचवलं.

' ठीक आहे. ' शिरीषनं बाजूच्या झुडपाची एक सरळ काठी तोडून टाकीत बुडवली. टाकी मोकळीच होती. कॅंपर सकाळीच ओव्हरहॉल करून आचरेकरांनी आणला होता. अन् आम्ही गेल्यानंतर त्यांनी तसाच तो आमच्या ताब्यात दिला होता. गडबडीत ते ' टाकी फुल्ल ' करायला विसरलेच होते. तशात पेट्रोल दाखवणारे यंत्र ' तिर्रशिंगी ' होते.

' शिरीष कॅंम घे ! आपण गॅसस्टेशनवर चालत जाऊ आणि गॅस घेऊन येऊ. ' उमेश म्हणाले.

शिरीष आणि उमेश गॅस आणायला गेले. भाभी आणि माई यांचं अखंड चर्चासत्र सुरू होतं. मला त्या चर्चेत फारसं गम्य नव्हतं, म्हणून मी गाडीतून

बाहेर आलो. सारा वाळवंटी प्रदेश पुढे दिसत होता. ॲनहॅम सोडल्यानंतर आठ–दहा मैल आजूबाजूला मोठमोठे डेअरी फार्मस्, आणि स्टड दिसले होते. घोड्यांना घालतात तो 'लसूनघास' याचं मूळ नाव कदाचित 'लसर्नग्रास' असावं. पण अपभ्रंशामुळं 'लसूनघास' झालेलं असावं. मेथीच्या पानासारखी पानं असलेल्या या वनस्पतीला लहान लहान पांढरी अन् गुलाबी रंगाची फुलं येतात. रेसच्या घोड्यांना बारीक तोडलेला 'लसूनघास' चारला जातो. तर या लसूनघासाची मैलच्या मैल शेतं ॲनहॅमच्या परिसरात दिसली; पण हळूहळू वाळवंटी प्रदेश सुरू झाला होता. बोडक्या टेकड्या अन् पर्णहीन झुडपं असा प्रदेश पूर्वी गॅरी कूपरच्या सिनेमात पाहायला मिळे. डोक्यावर मेक्सिकन हॅट, अंगात चौकड्याचा शर्ट, खाली तंग जीन, गुडघ्याइतके बूट आणि घोड्याच्या खोगीराजवळ भरलेली रायफल, कमरेला पिस्तूल अशा वेषात तो 'काऊ बॉय' निघालेला असे. अचानक 'ठो ऽऽऽ' असा बंदुकीचा बार उडताच काऊबॉय त्या घोड्याला टाच मारून दौडत निघे. ते तसलं शूटींग बहुधा याच वाळवंटी प्रदेशासारख्या भागात घेत असावेत. या वाळवंटाला मोहाव्ही वाळवंट म्हणतात असं शिरीषनं नंतर सांगितलं.

शिरीष आणि उमेश पेट्रोल घेऊन आले आणि परत गाडी चालू करून त्याच पेट्रोल पंपाकडे गाडी घेऊन टाकी फूल्ल केली. त्या पंपावर भेटवस्तूंचं दुकान होतं. दुकानात मोहाव्ही वाळवंटाची निरनिराळी रूपं दाखवणारी असंख्य चित्रं होती. समुद्रातल्या लाटांसारख्या अगणित लाटा निर्माण झालेला प्रचंड वालुकामय प्रदेश, कॅक्टस्चे उंचच्या उंच कोरीव काम केल्यासारखे भासणारे स्तंभ, अशी कितीतरी सुरेख चित्रं तिथं पाहायला मिळाली. लंडन, स्वित्झर्लंड, जर्मनी इथून बरीच चित्रं खरेदी केली होती. बॅगेत आता आणखीन चित्रं ठेवायला जागा शिल्लक नव्हती. अन् शेवटी घेऊन घेऊन घेणार तरी किती ? या जगात आपल्याला संग्रही ठेवाव्यात असं वाटणाऱ्या असंख्य वस्तू आहेत. पण त्या सर्व संग्रही ठेवणं अशक्य असतं. काही क्षण त्या न्याहाळायच्या. त्यातच समाधान मानायचं अन् पुढे चालू लागायचं ! लहानपणी ही जाणीव नसते, म्हणून मुलं हट्ट धरतात. पण जीवनात जसजशी ती अधिक वाटचाल करू लागतात तशी ती सुज्ञ बनत जातात.

संग्रहाचा हव्यास हा तसा वाईटच. त्यातल्या त्यात धनसंग्रह करणारा माणूस कधीच सुखी होत नसतो. नीती–अनीती, सद्मार्ग–कुमार्ग असलं काही त्याच्या डोक्यात शिरत नसतं.

आता मात्र कँपर वेगानं निघाला. वाटेत तासभर खोटी झाल्यामुळं जितका वेळ वाया गेला होता तो भरून काढायचा असा जणू शिरीषनं निर्धारच केला होता. वाळवंटाचा प्रदेश अचानक संपला अन् मधेच काळे–कुळकुळीत प्रचंड पत्थर पसरलेला प्रदेश लागला. आपल्या हैद्राबादला दिसतात तसे प्रचंड गोलाकार खडक दिसले. पण तिथंही वनस्पतींचा अभावच होता. पुन्हा वाळवंट सुरू झाले. कँपरमधला ए. सी. सुरू होता म्हणून बरं, नाहीतर त्या बाहेरच्या उष्ण झळांनी अंगाची लाही लाही झाली असती.

कँपरमधल्या फ्रीजमध्ये शिरीषनं बिअर, कोक, ऑरेंज–ज्यूस यांचे टीन्स भरून ठेवले होते. गाडी चालवता चालवता तो एका हातात कोकचा कॅन घेऊन घोट घोट घेत होता. कँपर सरळ पूर्वेच्या रोखानं निघाला होता. कारण मागच्या काचेतून अस्ताला निघालेलं, आरक्त सूर्यबिंब स्पष्ट दिसत होतं.

दिवस बुडाला तरी हवेतला उष्मा काही कमी होत नव्हता. गाडीचा. ए. सी. एकसारखा वापरणं फायद्याचं नव्हतं. कारण ए. सी. चं ते मशीन पेट्रोलवर चालत होतं. वाटेत ठिकठिकाणी पेट्रोलचे पंप होते. पण शिरीष आणि उमेश ही दोघेही मुलं अत्यंत काटकसरी होती. बाहेरची हवा किंचित थंड झाली आहे असं वाटताच त्यांनी ए. सी. बंद करून गाडीच्या काचा उघडल्या.

हळूहळू अंधार पडू लागला. विशाल अशा रस्त्यावरून आमचा कँपर धावत होता. डाव्या बाजूच्या मोठ्या रस्त्यावरून येणाऱ्या वाहनांची रीघ लागली होती. दिवस असो वा रात्र असो, उभ्या अमेरिकेत अव्याहत वाहतूक चालू असते. इतकी माणसं कुठं जातात–येतात ' क्राइस्ट 'च जाणे!

ॲनहॅम सोडून पाच तास झाले तरी, आम्ही नियोजित जागी पोहोचलो नव्हतो. एकजागी बसून बसून कंटाळा येई. आमच्यापुढे जाणारा रस्ता उंचवटयाचा असला की, गाड्यांच्या मागच्या डेंजर लँपचा लालभडक असा

एक लालरंगाचा प्रचंड दोर पुढे पुढे जात असल्यासारखा भासे. अमेरिकन नागरिक वाहतुकीचे नियम कटाक्षाने पालन करीत असल्याने रस्त्यावर वाहनांनी अपघात घडल्याचे प्रमाण त्यामानाने अत्यल्पच आहे.

रात्रीचे साडे दहा वाजले आणि समोर आकाशात उजेडाचा प्रचंड असा ' ग्लोव्ह ' दिसला. ड्रायव्हिंग करणारा शिरीष म्हणाला,

' आलो, आपण ला वेगासच्या अगदी जवळ आलो. दहा मिनिटांत आपण डाऊन टाऊनला पोहोचू !'

त्याने सांगितल्याप्रमाणे दहा मिनिटांतच कॅंपर ला वेगासमध्ये येऊन पोहोचला. सारा गाव प्रकाशमय झालेला होता. रंगीबेरंगी दिव्यांची रोषणाई केलेल्या त्या इमारती म्हणजे ला वेगासमधले ' कॅसिनो 'ज होते.

ला वेगास हे शहर अमेरिकेच्या ज्या प्रांतात आहे, त्या प्रांताचं नाव आहे नेवाडा. नेवाडा प्रांत म्हणजे निम्म्याहून अधिक असे वाळवंट. तिथं कोणतीही पिकं येत नव्हती. पाण्याचं दुर्भिक्ष, आणि जीवघेणा उन्हाळा यामुळं बाहेरचे कोणी लोक ला वेगासला जायला मागत नव्हते. नेवाड्याचं उत्पन्नही नगण्यच होतं. तेव्हा या प्रांतानं फेडरल सरकारला एकसारखी मदत मागायला सुरुवात केली. पण दरवर्षी असे फेडरल सरकार या नेवाडा प्रांताला मदत देणार तरी किती ? त्यांनी नेवाड्याचं उत्पन्न वाढविण्यासाठी एक क्लृप्ती केली. नेवाड्यात दारुबंदी अशी कधी नव्हतीचं. पण जुगार आणि वेशाव्यवसाय यांवर मात्र बंदी होती. ती बंदी उठवली जुगार आणि वेश्याव्यवसायावरची बंदी उठल्यामुळे तिथं शेकडो कॅसिनोज उभे राहिले. स्लॉट मशीन, विजेवर चालणारी छोट्या घोड्यांची शर्यत, रोलेट व्हील, आणि जुगाराचे असंख्य प्रकार असलेले प्रचंड अड्डे निर्माण झाले. वेश्याव्यवसायाला शासनाची मान्यता मिळाल्यामुळे जगातल्या अनेक देशांतल्या रूपवान वारांगना तिथं स्थाईक होण्यासाठी आल्या.

वेश्याव्यवसाय हा पृथ्वीतलावरून कधीही नाहीसा न होणारा व्यवसाय आहे. मानवी संस्कृतीच्या सुरुवातीलाच निर्माण झालेला हा व्यवसाय पृथ्वीच्या अंतापर्यंत चालणार आहे. ला वेगासला या व्यवसायाला शासनाची मान्यता मिळाल्यामुळे त्या धंद्याला तिथं काही प्रमाणात प्रतिष्ठा अन् स्थैर्यही प्राप्त झालेलं आहे. त्यांच्याजवळ सरकारमान्य डॉक्टरांचं

फिटनेस् सर्टिफिकेट असतं त्याची नावे असलेली स्पेशल फोन डिरेक्टरी असते. ला वेगासला जिवाची चैन करायला येणाऱ्या सधन माणसांना या वारांगनांना शोधायला जावं लागत नाही. फोन केला की काही क्षणातच स्वत:ची गाडी घेऊन ती त्यांच्या हॉटेलमधल्या खोलीवर पोहोचते एकमेकांची ओळख होते. तीन-चार दिवस मैत्रिणीप्रमाणे ती गिऱ्हाईकाच्या सहवासात राहते. त्याला ला वेगासच्या कॅसिनोत जुगार खेळायला मदत करते. अन् गिऱ्हाईकाचा परत जाण्याचा दिवस आला की, त्याला विमानतळावर निरोप द्यायलासुद्धा जाते. चार दिवस ज्याच्या सहवासात घालवले तो अनोखा मित्र परत निघाला की, क्षणभर डोळ्याला रुमालही लावते. कारण आयुष्यात पुन्हा तो भेटणार नसतो.

कुठे ला वेगासचा हा वेश्याव्यवसाय अन् कुठे मुंबईचा फोरास रोड ! रस्त्यावर उभं राहून किळसवाणे अंगविक्षेप करणाऱ्या वेश्या अनेक दुर्धर रोगाचं माहेरघर असतात. त्यांच्याबद्दल कणव वाटते ती त्यांच्या प्रारब्धी आलेल्या जीवनाबद्दल ! या वेश्यांचं जीवनमान सुधारणंच शक्य नाही. कारण त्यांना आश्रय देणारे ड्रायव्हर्स, क्लिनर्स, गिरणबाबू आणि हमाल यांचं ' स्टँडर्ड ' जोपर्यंत आहे तसंच राहणार आहे, तोपर्यंत त्यांचंही जीवन तसेच राहणार आहे.

ला वेगासची नेत्रदीपक विजेची रोषणाई पाहून मी तर अवाक् झालो होतो. ' फ्लॅमिंगो कॅसिनो ' या जगातल्या प्रचंड अशा जुगार अड्ड्यावर गुलाबी रंगाचे काचेचे असंख्य फ्लॅमिंगो पक्षी दिसत होते. तर पलीकडं ' हॅसिंडा ' ची आलिशान इमारत विजेच्या रोषणाईनं उजळून निघाली होती. बाजूच्या एका हॉटेलासमोर एक प्रचंड काचेचा गोलाकार होता अन् त्यावर कॅलिडिओस्कोपसारखे डिझाईन्स एकसारखे उमटत होते द इंपिरियल, द् स्पेन्सर्स, एम्. जी. एम् अशी प्रचंड हॉटेलसुद्धा विजेच्या रोषणाईत झगमगत होती. या शहराचा दिवस उजाडतो तो सूर्यास्तानंतर आणि मावळतो तो दिवस उगवल्यावर !

जेवणासाठी आम्ही कॅंपर पार्क करून निघालो, तेव्हा बाहेर भयाण उष्ण असे वारे वाहात होते. हॉटेलात गेलो अन् एकदम यक्षनगरीत प्रवेश केल्याचा भास झाला. सारं हॉटेल ए. सी. मुळे शीतल वाटत होतं. ओळीनं शेकडो

स्लॉट मशिन्स होती. त्या मशिनसमोर बसून नशिबाची परीक्षा पाहणारी माणसं बाहेरचं जग संपूर्णतः विसरून गेली होती. त्या लोकांच्यामागून आम्ही हॉटेल विभागात आलो. टर्की सँडविचेस्, पिझ्झा, प्रॉन्स आणि चिकनच्या डिश मागवल्या. बऱ्याच उशीरा जेवण आले; कारण हॉटेलात गर्दी होती. त्या ठिकाणी हातातून शँपेनचे ग्लास घेऊन जाणाऱ्या पोरीनं कानात चक्क विजेरीवर पेटणाऱ्या छोट्या बल्बचे इअरिंग्ज घातले होते. केसांत कुठेतरी ती विजेरी तिनं झाकून टाकली होती. सारंच काही विलक्षण होतं. स्लॉट मशिनची आतली यंत्रणा अतिशय गुंतागुंतीची असते. मशिनमध्ये पाच, दहा, पंचवीस, पन्नास सेंट आणि एक डॉलर अशी नाणी टाकून हा जुगार खेळता येतो. यंत्रात नाणं टाकताच ' Coin accepted ' अशी अक्षरं समोर उमटतात. जर नाणं खोटं असेल तर, ते यंत्र खळकन् ते नाणं बाहेर फेकून देतं. नाणं स्वीकारल्यानंतर यंत्राच्या उजव्या बाजूला असलेला गिअरचा दांडा ओढायचा. दांडा ओढताच समोरच्या चित्रांच्या पट्ट्या गरगर फिरू लागतात, अन् त्या हळूहळू स्थिरावतात. या पट्ट्यावर टोमॅटो, ॲपल, बेल अशी चित्रं असतात किंवा BAR असे शब्द असतात. ओळीनं तीन टोमॅटो समोरच्या तीन निरनिराळ्या पट्ट्यांवर येऊन स्थिरावले तर, खेळणाऱ्याचे पैसे पाचपट, दहापट किंवा जॅकपॉट म्हणजे शंभरपट देखील होतात अन् गम्मत वाटते ती केव्हा, तर यंत्राशी संलग्न अशा स्टेनलेसच्या कटोऱ्यामध्ये जिंकलेल्या पैशाची नाणी खण् खण् अशी एकापाठोपाठ एक पडू लागतात तेव्हा.

जेवण आटोपलं तेव्हा रात्रीचे साडे अकरा वाजले होते एकीकडे डोळयांत झोप आलेली, अन् त्याचवेळी त्या जुगाराच्या दुनियेत स्वतःला हरवून ' कॅसिनो ' मध्ये जाऊन जुगार खेळत बसावं असं वाटत होतं.

पार्किंग ग्राऊंडवर जिथं आमचा कँपर लावला होता तिथं चालत आलो, तेव्हा भयाण वारा सुटला होता. मध्यरात्र होत आली होती तरी, हवेत उष्णता जाणवत होती. ला वेगासच्या वैराण वाळवंटात जर हे कॅसिनोज उभारले नसते, तर कुत्रं सुद्धा तिकडं फिरकलं नसतं.

कँपरला लाईटचं कनेक्शन जोडल्यामुळे रात्रभर गाडीचा ए. सी. चालू होता. सकाळी आठ वाजता जाग आली तेव्हा, बाहेर आलो. सूर्य बराच

वर आला होता. रात्री बघितलेली विजेच्या रोषणाईनं धगधगणारी ला वेगासची नगरी शांत दिसत होती. त्या नगरीची रात्र सुरू झाली होती. कॅंपिंग करणाऱ्या प्रवासी लोकांसाठी जागोजागी टॉयलेटस् आणि बाथरूम्स होत्या स्प्रिंकलर्स कॅंपिंग ग्राऊंडजवळच्या उद्यानात पाणी शिंपडत होते अन स्वच्छ सूर्यप्रकाशामुळं जागोजागी इंद्रधनूच्या कमानी उभ्या झाल्या होत्या. भारतात भिन्न भिन्न स्थळी जाणवणारा उष्मा मी अनेकवेळा अनुभवलेला होता. पण ला वेगासचा उष्मा भीषण होता. सकाळी आठ वाजले होते, पण गुलबर्ग्याला ऐन मे महिन्यात दुपारी दोन वाजता जाणवलेली उष्णता मला तिथं आठवली.

चहा झाल्यानंतर आम्ही कॅंपिंग ग्राऊंडवरच्या स्विमिंग टॅंककडं गेलो. प्रवाशांची दहावीस लहान पोरं पोहायचा वेष घालून स्विमिंग टॅंकच्या फाटकाजवळ थांबून होती. स्विमिंग टॅंक बरोबर नऊ वाजता उघडणार होता.

नऊ वाजून पाच मिनिटं झाली तरी, हे फाटक उघडलं नाही असं पाहून ती पोरं दंगा करू लागली. ते फाटक उघडणारी तरुणी उशीर झाला म्हणून जवळ जवळ धावतच आली. फाटक उघडलं आणि अपराधी मुद्रेनं आमच्याकडं पाहात उद्‌गारली, ' आ यम् सो सॉरी ! '

मी मनातल्या मनात तिला म्हणालो, ' आम्ही ज्या देशातून आलो आहोत, त्या देशातली मान्यवर नेते मंडळी सुध्दा जिथं वेळेचं मोल मानत नाहीत, तिथं कर्मचाऱ्यांची बातच कशाला ? प्रत्येक ठिकाणी रखडत बसण्याची सवय अंगवळणी पडली आहे. बये, तू फक्त पाचच मिनिटं विलंब केलास, त्याबद्दल इतकं कशाला मनाला लावून घेतेस ? '

स्विमिंग टॅंक निळ्या ग्लेझ टाईल्सनं बांधलेला होता. एका बाजूनं टॅंकमध्ये ताजं पाणी येत होतं, आणि दुसऱ्या बाजूनं तितकंच बाहेर जात होतं. पण ते पाणी फारच जड होतं तोंडाला त्याची चव काहीशी खारट अशी वाटली. गोरी गोरी पिट्ट, पोरं पोरी धमाल दंगा करत पोहत होती. सूर मारत होती. पाण्यात पाठशिवणीचा खेळ खेळत होती. एरव्ही मी तीस मिनिटं नॉन–स्टॉप पोहू शकतो, पण त्या पाण्यात दहा मिनिटंसुद्धा मला पोहता येईना. मग ते पाणी जड होतं म्हणून, की युरोप आणि अमेरिकेत

हॉट डॉग्ज अन् हॅबर्गर्स खाऊन शरिराला मांद्य चढल्यामुळं, हे समजायला मार्ग नव्हता.

शिरीषनं उमेश आणि मी पोहताना काही फोटो टिपले. कॅंपरमध्ये ब्रेकफास्ट उरकून आम्ही ' हॅसिडात ' जुगार खेळायला गेलो. ला वेगास पाहायला गेला अन् जुगार न खेळता परत आला, तर त्याच्याइतका अरसिक आणि मूर्ख तोच !

उमेशनी मला आणि माईना प्रत्येकी दहा डॉलर्स खेळायला दिले. आपणही दहा डॉलर्स घेतले. भाभी आणि शिरीषही खेळायला आले.

एकापेक्षा एक असे सुरेख रोषणाई केलेली स्लॉट मशिन्स ओळीनं उभी होती. ज्यांना रात्रीचं जागरण मानवत नाही अशी काही वृद्ध मंडळी सकाळीच खेळायला येत. डॉलर्सची मोड देणाऱ्या बायका गळयात कंडक्टर-सारख्या चामडी बॅगा लोंबकळत इकडून तिकडं फिरत होत्या. स्लॉट मशिनमध्ये काही बिघाड झाल्यास ते तात्काळ दुरुस्त करणारे कर्मचारीही इकडून तिकडं फिरत होते. बाजूला कॅसेटवर संगीताचे मृदु असे स्वर वाजत होते. सर्वांत महत्त्वाचं म्हणजे, हॅसिडात जुगार खेळायला येणाऱ्यांना 'शॅंपेन' फुकट होती बाकी मद्य हे काही माणसांना अनाठाई दिलदार बनवते हे मी काही दारुड्यांच्या सहवासात अनुभवले आहे. एरव्ही कपर्दीकही न खर्च करणारा दारुड्या ही बया पोटात गेली रे गेली की, कर्णाचा अवतार धारण करतो.

याला अपवाद असा एक प्रकाशक मला भेटलेला आहे एरव्ही तो माझ्यासाठी खर्च करताना मागेपुढे पाहात नाही. पण प्याला की, खिशातलं पाकीटच बाहेर काढत नाही. कित्येक वेळा वसुलीसाठी त्याच्याकडं गेलो, तर तो झोकून असल्यामुळं टॅक्सीच भाडंही मलाच भरावं लागलं.

हॅसिडा कॅसिनोत ' शॅंपेन ' घेऊन मी एक स्लॉट मशिन धरून बसलो. दहा डॉलर्सची पाच पाच सेंटची नाणी मोड करून घेऊन खेळायला सुरुवात केली. कधी पाच सेंटचे पंधरा झाले तर कधी घातले ते हरलो. जुगार हा करमणूक म्हणून खेळणाऱ्याच्या पदरी निराशा कधीच येत नाही. पण जो जुगारामुळं आपलं दैव उजळेल, आपण लक्षाधीश बनू अशा अपेक्षेनं खेळतो, तो कालत्रयीही सुखी होणार नाही.

वेश्याव्यवसायाप्रमाणे जुगार आणि मद्य याही दोन गोष्टी मानवाला टाळता येणार नाहीत. भले तत्ववेत्ते आजपर्यंत या गोष्टी वाईट आहेत, मनुष्यमात्रांचा ऱ्हास करणाऱ्या आहेत असा टाहो फोडून सांगून गेले. पण त्याचा काही उपयोग झालेला नाही, भविष्यात होणार नाही. या जगातून वेश्याव्यवसाय, मद्य आणि जुगार यांचं संपूर्ण उच्चाटनं होणे अशक्य आहे. एवढंच की, या गोष्टींचा अतिरेक होणं मात्र समाजाला विघातक असतं. काही प्रमाणात या तीन्ही गोष्टींकडं डोळेझाक करणंच इष्ट ठरतं.

ला वेगासला जुगार आणि मद्य यांवर बंदी नसूनही मला कोणी अतोनात दारू झोकून कॅसिनोत लोळत पडल्याचं दृश्य दिसलं नाही. वेश्याव्यवसायावर बंधन नसूनही रस्तोरस्ती बिभत्स चाळे करीत फिरणाऱ्या वेश्या दिसल्या नाहीत. पाच दिवस अंग मोडून काम करणारा एखादा अमेरिकन माणूस, दोन दिवस अनिर्बंध अशा वातावरणात स्वतःला झोकून देतो. माणसाला असं थोडंसं स्वातंत्र्य दिल्यामुळं समाज अनिष्ट प्रवृत्तींकडं झुकतो आहे अशी बेंबीच्या देठापासून ओरड करण्याची गरज नाही. उलट ज्या गोष्टींवर बंधनं लादली जातात, ती गोष्ट करण्याकडेच लोकांची प्रवृत्ती असते. तेव्हा या तिन्हींवर संपूर्ण बंदी घालण्याची भाषा करणाऱ्या लोकांना मानवी स्वभावाचं आकलन झालेलं नाही असं बेशक समजावं.

शंभर टक्के समाज सुशिक्षित करणं हाच त्यावर नियंत्रण ठेवण्याचा एकमेव उपाय आहे. समाज सुशिक्षित झाल्यानं माणसाला संमोह निर्माण करणाऱ्या जुगार, मद्यपान आणि वेश्याव्यवसाय या तिन्हींकडं पाहण्याची दृष्टी बदलून जाईल. जीवनात केवळ काही क्षणांचा विरंगुळा म्हणून त्याकडं पाहावं. त्यात अधिक गुरफटून जाणं हे विनाशाप्रत नेणारं आहे ही जाणीव ज्या समाजात शंभर टक्के लोक सुशिक्षित आहेत त्यांनाच येईल.

मला त्या स्लॉट मशीनवर पैसे येत होते, जात होते. इतक्यात माझ्यामागे डॉलर खेळत असलेल्या एका गृहस्थाला ' जॅकपॉट लागला. त्याला एका डॉलरला तीनशे डॉलर लागले होते. स्टेनलेसच्या कटोऱ्यात खणाखण नाणी पडत होती. तो गृहस्थ अत्यानंदाने नाचू लागला. तो आणि त्याची म्हातारी आई वेगासला सुट्टीवर आले होते. म्हातारी दूरच्या स्लॉट मशिनवर पाच पाच सेंटस् टाकून खेळत होती. यानं आईला तेथूनच हाक

मारली, ' ओ मॉम, आय वोन ए जॅकपॉट. '

आजूबाजूचे सारे लोक त्यांच्याकडे कौतुकाने पाहू लागले. एका डॉलरला तीनशे डॉलर मिळणे दुर्मिळ असते.

हे जुगार अड्डे शासनाच्या नियंत्रणाखाली चालतात. स्लॉट मशिनमध्ये काही दोष आढळून आल्यास ते तात्काळ बंद करण्याचा आदेश दिला जातो. जुगार हा केवळ नशिबाचा खेळ ( Mere game of chance ) राहावं ही शासनाची भूमिका असते. ' कॅसिनोज ' चालवण्यासाठी सरकारला भरमसाठ टॅक्स द्यावा लागतो. या टॅक्सची रक्कम कल्याणासाठी खर्च केली जाते ज्यांच्याकडं अमाप संपत्ती आहे, ती अप्रत्यक्षरीत्या काढून घेण्याचा हा अमेरिकन सरकारचा प्रयत्न धूर्तपणाचा आहे यात वाद नाही.

माझे सेंटस् संपत आले. जिंकण्याची चिन्हे दिसेनात म्हणून मी स्टुलावरून उठू लागलो, तोच उमेश माझ्याजवळ आले आणि म्हणाले,

' का उठता ?'

' या मशिनवर लक् नाही. माझ्या मागे एकाने आत्ता तीनशे डॉलर जिंकले. मला दोन डॉलरसुद्धा मिळाले नाहीत !'

' थांबा, इतका वेळ तुम्ही खेळलात तसेच आणखीन थोडा वेळ खेळा. कदाचित जिंकाल !'

' सॉरी, आय हॅव नो होप्स !'

' तुम्ही यावर नका खेळू, मी खेळतो !' असं म्हणून उमेशनी आपल्या खिशातून पाच सेंटचं नाणं काढून त्या स्लॉट मशिनमध्ये टाकलं अन् रॉड ओढला, अन् काय आश्चर्य. BAR BAR, BAR अशा तीन अक्षरांवर मशीन स्थिरावलं आणि खालून सेंटची अक्षरशः धार लागली. उमेशच्या पाच सेंटने तीस डॉलर्स जिंकले होते. मी त्यांचे अभिनंदन केले ते एकसारखे हसतच राहिले. त्या स्लॉट मशिनवर जॅकपॉट लागेल असं मला कधीच वाटलं नव्हतं. पण मी निघून जाण्याच्या क्षणीच उमेशरावांनी तिथं येणं आणि त्याच मशिनवर खेळणं अन् त्यांना जॅकपॉट लागणं याला काय म्हणायचं ? – यालाच जुगार म्हणायचं !

जिंकलेल्यातले माईंना दहा व मला दहा डॉलर्स पुन्हा उमेशनी खेळायला दिले. एव्हाना आम्ही दोघेही आमच्याजवळचे दहा डॉलर्स घालवून

रिकामे झालो होतो. 'हॅसिडा कॅसिनोत' जुगार खेळण्यात आणि जुगारी जगताचं निरीक्षण करण्यात तो दिवस घालवला.

त्या रात्री आम्ही इंपीरियल हॉटेलमध्ये नाईट शो पाहायला गेलो. पॅरिसमध्ये असताना 'नाईट शो' पाहायचं राहून गेलं होतं.

या नाईट शोची तिकिटं शिरीष आणि उमेश दोघं रिझर्व्ह करून आले होते. प्रत्येकी पंधरा डॉलर्स तिकीट असलेला इंपीरिअल हॉटेलमधला हा शो सायंकाळी साडेसातला सुरू झाला.

एकावेळी तीन हजार माणसं बसू शकतील असं हे एअरकंडिशन्ड थिएटर होतं. जगातल्या भिन्न भिन्न देशांतून आलेले प्रवासी तो नृत्याचा कार्यक्रम पाहायला उपस्थित होते. त्यांत आबालवृद्ध होते. स्त्रियांचं प्रमाण जास्त होतं.

प्रथम काळा स्लीव्हलेस ब्लाऊज आणि मिनिस्कर्ट घातलेली गोरी पोरगी येऊन आम्हाला ड्रिंक कोणतं घेणार हे विचारून गेली. त्या पंधरा डॉलर्समध्ये एक शॅपेनची अख्खी बाटली किंवा दोन स्ट्रॉंग ड्रिंक्सचे पेग यांचा समावेश होता. त्यारात्री मला ते नृत्य पाहायचं होतं, म्हणून शॅपेनच घेण्याचं ठरवलं.

दहा मिनिटांत त्या पोरीनं बर्फ घातलेल्या प्लॅस्टिकच्या बादलीतून शॅपेन आणलं. बारीक देठांचे ग्लास भरले गेले. शिरीषनं मला अन् उमेशना चिअर्स केले. आम्ही प्याले ओठाला लावले तोच, समोरचा वेलव्हेटचा पडदा हळूहळू वर सरकला. रंगमंचावर भव्य सेटींग उभं होतं, पण तिथं एकही व्यक्ती नव्हती समोर रंगमंचाजवळ वाद्यवृंदाचा ताफा बसलेला होता. त्यांनी एकदम वाद्यं वाजवायला सुरुवात केली. निळे–जांभळे प्रकाशझोत रंगमंचावर उमटले. त्याच क्षणी रंगमंचाच्या डाव्या अन् उजव्या बाजूने अर्धनग्न अशा वीस पोरी अत्यंत आकर्षक अशा हालचाली करीत अवतरल्या. त्यांची प्रत्येक हालचाल संगीताच्या तालाशी मिळती–जुळती होती. अत्यंत देखण्या अन् कमनीय अवयवांच्या त्या पोरींच्या कमरेला केवळ लज्जारक्षणापुरतं तोकडं वस्त्र होतं. पण त्यांचं नृत्यकौशल्य अवलोकन करताना त्या अर्धनग्न आहेत याची जाणीवसुद्धा होत नव्हती. पाहता पाहता त्या रंगमंचावर वीस तरुण अवतरले. चाळीस व्यक्ती संगीताच्या तालावर देहभान हरपल्यासारख्या नाचत होत्या. वरून त्यांच्यावर स्थिर झालेले

प्रकाशकिरण एकसारखे रंग बदलत होते. मध्येच त्यातल्या एका मुलीला दोघांनी उचलून धरले. त्या दोघांच्या हातावर ती ताठ आडवी झाली होती. अन् इतक्यात रंगमंचाच्या डाव्या बाजूने शुभ्र वेषातला एक तरुण धावत आला आणि त्याने हवेत आठ फूट उंच झेप घेतली अन् त्या तरुणीवरून पलीकडे उडी घेतली, तीही हवेत गिरक्या घेत. हवेत शरीर झोकून देण्याची त्यांची ती कृती सर्कसमधला निष्णात अशा खेळाडूसारखी वाटली. इतकंच काय पण, ते सारं नृत्यच सर्कसमधल्या लवचिक पोरींनी केल्यासारखं विलक्षण मनोहर होतं. आजपर्यंत अनेक नृत्य–प्रकार बघितले होते. हिंदी चित्रपटांत कमरेला तोकडे वस्त्र गुंडाळून 'कॅबेरे' ही दाखवतात. पण ते नृत्य प्रेक्षकांच्या भावना चाळवण्यासाठीच घालतात. त्यात कला आणि कौशल्य शून्य असते.

पण हा नाईट शो पाहताना देहभान हरपल्यासारखे झाले होते. स्वर्ग आणि अप्सरा यांची अनेक वर्णने लहानपणी कथापुराणांतून वाचली होती. प्रत्यक्षात स्वर्ग आहे की नाही ही खात्री नाही. पण तो असलाच तर पृथ्वीतलावर बघितल्याचं समाधान मात्र त्या दिवशी लाभलं. खरं तर त्या प्रसंगाचं वर्णन शब्दांनी करता येणंच शक्य नाही. काही वेळा मी पेंटिंग करण्यासाठी एखाद्या संध्याकाळी तलावाच्या काठी जातो. अचानक सूर्यास्ताच्या समयी क्षितिजावर ढग जमतात, क्षणाक्षणाला रंग बदलले जातात, त्या मेघांच्या समूहातून चाललेल्या सूर्यनारायणाचं रूपही मोठं चंचल असतं. तलावाचा पृष्ठभागही मेघांच्या प्रतिबिंबानं रंगलेला असतो. अशा वेळी ते निसर्गाचं विलोभनीय दृश्य निर्जीव अशा कागदावर उतरवणं केवळ कठीणच नव्हे, तर अशक्य असतं. अशा वेळी मी अवाक् होऊन पेंटिंग पॅड बॅगेत घालून गप्प समोरच्या दृश्याकडं पाहात बसून राहतो. चित्र न काढताच घरी परततो. पण चित्र न काढल्याबद्दल मनाला खेद मात्र होत नाही जे भव्य अन् दिव्य आहे त्याची नक्कल मानवाला करता येणंच शक्य नाही त्या दिवशीचा तो इंपीरिअलमधला नृत्याचा कार्यक्रम शब्दबद्ध करायला माझी लेखणी असमर्थ आहे कोणाला आयुष्यात परदेश–प्रवासाची संधी लाभली अन त्यानं मला काय काय पाहू असं विचारलं, तर मी सर्वप्रथम म्हणेन, 'ला वेगासला जा आणि इंपीरिअल पॅलेसमधला

तो नाईट शो बघ !'

त्या कार्यक्रमाचं नाव होतं ब्रेव्हो वेगास ! राल्फ एंगलस्टाड हा त्या नाईट शोचा निर्माता होता. नाटकात जसे अंक असतात तसे त्या नाईट शोमध्ये निरनिराळे चार अंक होते. पहिल्याचे नाव होते 'एनचान्टमेंटस् ऑफ द् ईस्ट मीट द् वंडर्स ऑफ द् वेस्ट, दुसरा अंक होता 'द क्लाऊन प्रिन्स ऑफ वेल्स,' तिसरा 'लेट् द् गेम्स बिगिन,' चौथा 'द् ताहिशिअन एक्सपिरिअन्स, पाचवा अन् शेवटचा होता 'ब्रेव्हो वेगास !'

या एका कार्यक्रमासाठी शेकडो लोकांचं साहाय्य लागतं. सेटस् डिझायनर्सपासून ते प्रकाशव्यवस्थेपर्यंत सारं कौशल्यानं सांभाळलं जातं. कॉस्टयूम डिझायनर आणि ऑर्केस्ट्रा विभाग तज्ज्ञांनी सांभाळला जातो. अनेक हिंदी चित्रपटांत अशा नृत्यांची बदसूर नक्कल करण्याचा प्रयत्न केला जातो. पण नक्कल ही अस्सलची कधी बरोबरी करू शकेल ?

शँपेनची मादक धुंदी केव्हाच उतरली होती. मस्तकात तरळत होती ती त्या नृत्याची नशा ! केव्हा इतक्या सुंदर पोरी शिकवून तयार केल्या असतील ? कसे हे निरनिराळे अंक बसवले असतील ? स्वप्नात बघितल्या-सारखे ते नृत्य पाहून विचार करीत बाहेर पडलो. वाळवंटावरून वाहणाऱ्या वाऱ्याच्या झळा जाणवल्या. त्या कार्यक्रमाबाबतच आपसांत चर्चा करीत कॅंपरकडे परतलो. भाभींनी आणि माईंनी कॅंपरमध्ये जाण्यापूर्वीच जेवण करून ठेवले होते. बायकांचा हा एक गुण अगदी सूक्ष्म अवलोकन करण्यासारखा असतो. त्यांना तुम्ही एखाद्या नाटक सिनेमाला सोबत घेऊन जाणार असाल तर, एरव्ही तास दोन तास जेवण बनवायला लागत असतील तर, अशा वेळी अगदी अर्ध्या तासात बनवून मोकळ्या होतील, अन् तेही अगदी उत्साहाने !

त्या कार्यक्रमाचं कौतुक करत जेवण उरकलं. ला वेगासमधला तो दुसरा दिवस होता. तिसऱ्या दिवशी सकाळी ब्रेकफास्ट उरकून कूच करायचं होतं ते ग्रँड कॅनियनकडे. हा प्रवास दोन टप्प्यात करावा लागणार होता.

ला वेगासला एअर-कंडिशनरशिवाय जगणंच अशक्य आहे. कॅंपरला विजेचं कनेक्शन जोडल्यामुळे विजेवर चालणारा ए. सी. रात्रभर सुरू होता.

सकाळी लवकरच उठलो. आकाश निरभ्र होतं. विमानांची ये-जा भल्या

सकाळीच सुरू व्हायची. त्यांत पांढऱ्या अन् लाल रंगांचे साईट-सीईंगचे एक विमान अगदी कॅंपिंग ग्राऊंड जवळून पूर्वेला जायचं. काही प्रवासी ग्रॅंड कॅनियन पाहायला मोटारने न जाता ला वेगासवरून हवाई सफर करून परत येतात. साईट-सीईंगची विमानं मोठ्या खिडक्यांची अन् छोट्या विमानतळावर उतरू शकणारी अशी असतात.

हॅसिंडा कॅसिनोच्या पलीकडेच विमानतळ असल्यामुळं ला वेगासला येणारी अन् जाणारी विमानं एकसारखी घोंघावत निघालेली दिसत होती

ब्रेकफास्ट उरकून शिरीपनं कॅंपरची कनेक्शन्स काढली. आपल्याकडे सकाळची वेळ ही नेहमी प्रसन्न वाटते, पण ला वेगासची सकाळ मात्र भयाण भासली. रस्त्यावर माणसं नसतात. कॅसिनोज बंद असतात. ला वेगासकरांची खरी तर रात्र सुरू झालेली असते. बाराही महिने रोज रात्री असा जल्लोष करणाऱ्या या नगरीचा निरोप घेताना वाटलं– ' आपण फारच थोडा वेळ इथं राहिलो ' अन् अधिक राहिलो असतो तर कफल्लक बनलो असतो, याची जाणीव होती. पण तरीही आयुष्यात पुन्हा शक्य झालं तर, खूप डॉलर्स खिशात टाकून हात दुखेपर्यंत स्लॉट मशिनचा दांडा ओढायचा असं स्वप्न मनाशी बाळगून ला वेगास सोडलं.

ला वेगासपासून ग्रॅंड कॅनियनकडे जाणारा रस्ताही इतर रस्त्यांप्रमाणेच विस्तृत होता. वाळवंटातून जाणारा हा राजमार्ग वाटेत काही ठिकाणी नादुरुस्त झालेला होता, पण दुरुस्तीचे काम मोठ्या प्रमाणावर सुरू होते. भगवे कपडे घातलेले शासकीय कर्मचारी तसल्या रणरणत्या उन्हात राबत होते. जागोजागी वाहनांची वेगमर्यादा कमी करणारे फलक लावलेले होते. वासुदेवाच्या टोपीच्या आकाराचे कोन काम चाललेल्या ठिकाणी उभे करण्यात आले होते. उत्तम रस्ता ही राष्ट्राची फार मोठी संपत्ती असते याचं प्रत्यंतर अमेरिकेत वारंवार घडत होतं मुंबईतसुद्धा रस्ता-दुरुस्तीची कामं नेहमीच सुरू असतात. परळजवळचा क्रॉफर्ड मार्केटला जाणारा रस्ता गेले वर्षभर बंद आहे. दुरुस्ती सुरू आहे. आणखीन किती वर्षे वाहनं टाटा मेमोरियलकडून जाणार आहेत हे मुंबई महानगरपालिकाच जाणे ! डायव्हर्शनमुळे वाहनांचं किती इंधन वाया जातं याची कोणालाच फिकीर नसते. हे झालं मुंबई शहराचं. बाहेरच्या रस्त्यांवरून मी सतत प्रवास करीत

असतो, तिथलो उत्साह काही विचारू नका. मिरज-पंढरपूर रस्त्यावर अजूनही आडवे नाले आहेत. परवा परवा नागज गावाजवळचा पूल तयार झाला. सदुसष्ठसाली सोलपूरवरून कोल्हापूरला येत होतो. नागजच्या ओढ्याला पाणी आलं होतं. आठ तास पावसात एस्.टी. उभी होती. गाडीत काही लहान मुलं होती. त्यांना दूध मिळालं नाही. रात्रभर टाहो फोडत होती. त्या रस्त्यावरून अनेक वेळा लोकनियुक्त पुढारी आले-गेले. पण कोणा मायेच्या पुताला तो रस्ता व्यवस्थित व्हावा, सर्व नाल्यांवर पूल बांधले जावेत असं वाटलं नाही. अशा नाल्यांजवळची माणसं याहूनही इरसाल. लहान वाहनं वाळूत रुतून बसावीत म्हणून नाल्यांत खड्डे काढून ठेवतात. लहान वाहन वाळूत फसले की, शे-दोनशे रुपयांची मागणी करतात अन् मगच वाहन ओढून काढायला सरसावतात. हा तर सरळ सरळ अपक्रियेचा गुन्हा; पण तोही अजून राजरोसपणे चालतो स्वातंत्र्य मिळून चौतीस वर्षे झाली, पण आपण आहो तिथंच आहोत. कणभर मागेच निघालो आहोत. सुशिक्षित तरुण अमेरिकेत येऊन स्थाईक का होतात याचं कारण अशा वेळी समजलं.

वाटेत नागमोडी रस्ता लागला. शिरीषनं गाडीची गती कमी केली अन् तो म्हणाला, ' आपण हूवर डॅमजवळ आलो आहोत. जगातला सर्वांत उंच असा हा डॅम आहे. '

खरोखरच ते धरण अतिशय उंच होतं. धरणाखाली एक प्रचंड हायड्रो-इलेक्ट्रिक प्रोजेक्ट होतं. ला वेगास भोवतालच्या वाळवंटी प्रदेशात अडवलेला तो विस्तीर्ण निळाभोर जलाशय पाहून डोळ्याला फार बरं वाटलं थोडा वेळ तिथं थांबलो, अन् लगेच पुढचा प्रवास सुरू झाला.

हळूहळू वाळवंटाचा प्रदेश संपुष्टात येऊ लागला. पर्णहीन खुरटी झुडपं हळूहळू उंच दिसू लागली. सोलापूर जिल्ह्यात सर्रास दिसते तसल्या रामकाटी बाभळीच्या आकाराची झाडं लागली. आणखीन थोडे अंतर काटून गेल्यानंतर चक्क पाईनचं जंगलच लागलं. मधेच अंधारून आलं. हलकासा पाऊस पडू लागला. हवेत गारवा दाटला होता.

विल्यम्स हे गाव जवळ येत होतं. विल्यमस्च्या भोवताली प्रचंड जंगल होतं सीझनला 'स्टॅग' हंटिंगसाठी शिकारी येत असावेत. कारण विल्यम्सला

कॅंपर पार्क करून पाण्याचं कनेक्शन जोडताना मला एक थर्टी स्प्रिंगफिल्ड रायफलचं जिवंत काडतूस सापडलं, खरं तर ते मला भारतात आणायची खूप इच्छा झाली. कारण माझ्या तीन बंदुकींपैकी एक थर्टी स्प्रिंगफिल्ड ही एक रायफल आहे. पण मला तो मोह टाळावा लागला. विमानातून परवान्या-शिवाय दारूगोळा नेता येत नाही. बरं, एका काडतुसासाठी परवाना घेणं हास्यास्पद ठरलं असतं.

विल्यम्सला कॅंपर पार्क केला तेव्हा, संध्याकाळ झाली होती. रात्री चांगलीच थंडी पडली. त्या रात्री साडेतीन वाजताच पुढचा प्रवास सुरू करायचा होता. ग्रॅंड कॅनियनला सूर्योदयाला पोहोचणं अत्यावश्यक होतं.

आम्ही सारे झोपत असतानाच शिरीषनं विजेचे पाण्याचे आणि सॅनिटरी कनेक्शन्स् सोडले आणि त्याने गाडी ग्रॅंड कॅनियनच्या रोखानं न्यायला सुरुवात केली. शिरीष सूर्योदयालाच ग्रॅंड कॅनियनला पोहोचायला हवे असा अट्टाहास का धरतो आहे याचं कोडं मला तेव्हा उलगडलं नव्हतं. पण ग्रॅंड कॅनियनला गेल्यावर मात्र उलगडलं.

शिरीषनं गाडी उभी केली तेव्हा पूर्व आरक्त झाली होती. डाव्या बाजूला ओक, सेडर आणि पाईनची गर्द झाडी होती. गाडीतून उतरून उजव्या बाजूला आलो आणि क्षणभर आपण काय पाहतो आहोत हेच समजेना. पृथ्वीतलावर निसर्गाचं विराट असं दर्शन घडत होतं. आम्ही उभे होतो तो कडा खाली शेकडो फूट खोल होता. समोर जागोजागी मंदिरांच्या कळसाप्रमाणं आकार धारण केलेली पर्वतांची शिखरं होती. त्याही पलीकडे प्रचंड दरी होती. कोलोरॅडो नदीचं खोरं, खोऱ्यातून वाहणारी व्हर्जिन नदी, अन् पुढे पुन्हा मंदिराच्या आकारांची डोंगरांची रांग अन् त्या पलीकडे पुन्हा आम्ही उभे होतो तसला महाप्रचंड कडा ! जसजसा सूर्य वर येऊ लागला, तसतसे त्या निसर्गनिर्मित मंदिरांचे कळस प्रकाशमय होऊ लागले. सुरुवातीला जांभळी किरमिजी दिसणारी ती गिरीशिखरं अक्षरशः तप्त सुवर्णासारखी दिसू लागली.

महाबळेश्वर, माथेरान आणि माऊंट अबू यांच्या पश्चिम टोकावरून मी अनेक वेळा सूर्यास्त बघितलेला आहे. उंच कडेकपारीवर जाऊन उगवत्या सूर्याचं दर्शनही घेतलेलं आहे पण असा सृष्टीचा रंगीबेरंगी चमत्कार

आयुष्यात प्रथमच पाहात होतो. प्रातःसमयीचं वातावरण, त्यांत बघायला आलेले सुज्ञ अमेरिकन, युरोपियन आणि जॅपनीज प्रवासी शांतपणानं सूर्योदय पाहात होते. काहीतरी अतर्क्य, विराट असं निसर्गाचं रूप पाहिलं की, माणसाला आपल्या क्षुद्रत्वाची जाणीव होते. क्षितिजावर किंचित गोलाई झालेला समुद्रकिनारा बघितला की, मला मानवी अस्तित्वाची जाणीवच उरत नाही. गगनबावडा किंवा आंबेघाटातल्या एखाद्या उंचवट्यावर मी एकटाच जाऊन पश्चिमेला पसरलेली सह्याद्रीची निळीजांभळी शिखरं न्याहाळतो, तेव्हाही मी स्वतःला हरवून जातो. आज ग्रँड कॅनियनच्या ज्या कड्यावर मी उभा होतो, तो गगनबावडा किंवा आंबेघाट यांच्या चौपट उंच होता.

सूर्यबिंब आणखीन वर आलं. हळूहळू त्याला प्रकाशाची सोनेरी झालर फुटली, अन् त्याचबरोबर दरीतले मंदिरांचे कळस तांबडे, केशरी, गुलाबी बनू लागले.

'काय वाटलं हे पाहून ?' माईंनी मला विचारलं.

मी हवेत हात उडवून उद्गारलो, 'फँटॅस्टिक ! मला काय बोलावं हेच समजत नाही. ज्ञानदेवांनी म्हटल्याप्रमाणं काही गोष्टी शब्दाविना अनुभवायच्या असतात. अशा वेळी येणारी विलक्षण अनुभूती शब्दातीतच असते.'

'हं ऽऽऽ आबा, हा एकच पॉईंट नाही इथं, असे अनेक पॉइंटस् आहेत.' शिरीष माझ्याजवळ येऊन म्हणाला. सूर्य जसा आणखीन वर चढेल तसा पश्चिम बाजूचा व्ह्यू बघण्यासारखा असतो.'

'शिरीष, आपण तुला मानलं बुवा ! विल्यम्स भल्या पहाटे सोडायचं असं तू सारखं का म्हणत होतास, त्याचं कोडं आता उलगडलं.' ग्रँड कॅनियनच्या दरीवर असे अनेक प्रेक्षणीय पॉईंटस् आहेत. काही ठिकाणी उंचच्या उंच कुतुबमिनारसारखे निसर्गानं निर्माण केलेले मनोरे आकाशात घुसले आहेत, तर काही ठिकाणी डोंगराची प्रचंड कमान बनलेली आहे, तर काही ठिकाणी, उंच खडकावर दुसरा प्रचंड गोलाकार असा खडक मुद्दाम आणून ठेवल्यासारखा दिसतो.

प्रवाशांना सुरक्षितपणे पाहाता येतील असे हे पॉईंटस् जागोजागी लोखंडी रेलींग्ज आणि सिमेंट-काँक्रीट यांनी बंदिस्त केलेले आहेत. हरमीटस् रेस्ट,

पिमा पॉईंट, होपी पॉईंट, पॉवेल मेमोरियल, हेड ऑफ कवीब ट्रेल, डक ऑन द् रॉक, ब्राईट एंजल पॉईंट, ग्रँड व्ह्यू पॉईंट असे अनेक पॉईंटस् बघून आम्ही ग्रँड कॅनियन व्हिलेजजवळ कॅपर पार्क केला. ब्रेकफास्ट आणि चहा घेतला अन् तिथं प्रवाशांना आणखीन पॉईंटस् दाखवणाऱ्या रोड ट्रॅममध्ये बसलो. जाताना वाटेत हरणं आडवी आली. उमेशनी त्यांचे फोटो खेचले.

त्या साखळीमोटारीतून आणखीन चारपाच पॉइंटस बघितले. काल ला वेगासवरून जाणारं विमान ते इथं ग्रँड कॅनियनच्या खोऱ्यावरूनच जात होतं. आम्ही तिथं असताना तीन-चार विमानं त्या दरीवर चक्कर मारून परत ला वेगासच्या दिशेनं गेली. ग्रँड कॅनियनच्या दरीतून फिरवणारी हेलिकॉप्टर सर्व्हिसही सुरू होती. माई म्हणाल्या, ' आपणही हेलिकॉप्टर राईड घेऊ !' त्यावर भाभी म्हणाल्या, ' मी तुम्हा लोकांना मुळीच बसू देणार नाही !' कारण विचारल्यावर त्यांनी जी हकीगत सांगितली ती खरोखरच विदारक होती.

दोन वर्षांपूर्वी परब नावाचे महाराष्ट्रीय गृहस्थ सपत्नीक अमेरिका पाहायला आले होते. भाभींनी त्यांना आपल्याकडे भोजनासाठी येण्याचं निमंत्रण दिलं. ते त्यांनी स्वीकारलंही. पण ते म्हणाले, ' सकाळी आम्ही ग्रँड कॅनियनला विमानानं जाऊन परत संध्याकाळी सॅनडिएगोला तुमच्याकडं भोजनासाठी येऊ. ' त्याप्रमाणे भाभी त्या संध्याकाळी परब पतिपत्नींची वाट पाहात थांबल्या. पण ते आलेच नाहीत. भाभींना त्या रात्री उशिरा ती विदारक बातमी समजली. मित्राच्या विमानातून ग्रँड कॅनियनचा फेरफटका मारत असताना त्या विमानाला अपघात होऊन परब पतिपत्नी दोघेही त्यात ठार झाले. भाभींच्या भावनाविवश मनावर त्या दुर्घटनेने इतका प्रचंड आघात केला होता की, ' त्यांना कोणी विमान किंवा हेलिकॉप्टरने ग्रँड कॅनियन पाहण्याची कल्पनाच सहन होत नाही. भाभींच्या हरकतीमुळे आम्हाला ग्रँड कॅनियन हेलिकॉप्टर राईडची कल्पना सोडून द्यावी लागली.

ग्रँड कॅनियन व्हिजिटर्स सेंटरची इमारत अद्ययावत आहे. तिथं पूर्वी वास्तव्य करणाऱ्या ' रेड इंडियन ' संस्कृतीची माहिती देणारे पॅंपलेटस् आणि मार्गदर्शक पुस्तिका विनामूल्य देतात. दुपारी लंच एका पॉईंटजवळ घ्यायचं

ठरवलं. विल्यम्सवरून येताना सोबत खाद्यपदार्थ आणलेच होते. तिथंही थोडे घेतले. कँपर पॉवेल मेमोरियलजवळ लावून शिरीष थोडावेळ कँपरमध्ये झोपला. कारण रात्री साडेतीन वाजल्यापासून तो एकसारखा ड्रायव्हिंग करत होता. त्याला विश्रांतीची नितांत गरज होती. भाभी आणि माई दोघी गप्पा मारता मारता झोपी गेल्या. उमेशरावही बसल्या बसल्या कँटरमध्ये डुलकी घेत होते. पण मला मात्र बिलकुल झोप येत नव्हती. ग्रँड कॅनियनचे मनोरे, शिलाखंडाचे कळस पोट भरून बघून घ्यायचे होते. सकाळी दरीच्या पलीकडं दिसलेला शुभ्र मेघांचा समूह हळूहळू सावळा दिसू लागला. पूर्वेला तर चक्क मेघगर्जनाच सुरू झाली. मेघांचा गडगडाटाचा प्रतिध्वनी कोलोरॅडोच्या त्या प्रचंड दरीत कितीतरी वेळ घुमत रहायचा.

तिकडे दूर पाऊस पडत असताना पेंटिंग करायला एक प्रवासी चित्रकार-बाई आली. तिनं भराभर ब्रशनं रंग कालवले आणि ती समोरच्या एका शिखराचं चित्र रंगवू लागली. माझ्यातला चित्रकार लगेच जागा झाला. मी तिच्याजवळ जाऊन बसलो. तिची वॉटरकलर लँडस्केप काढण्याची पद्धत कशी आहे ती अवलोकन करू लागलो. बाईला ढगाळलेल्या आकाशाच्या ' इफेक्ट ' चांगला साधला होता, पण डोंगर काढताना एकात एक रंग शिरून घोटाळा झाला. ते तिला समजत होतं, पण तसेच नेटानं ती रंगवत होती. ओघळलेले रंग ब्रश कोरडा करून टिपून घेत होती; पण जलतरंगातलं चित्र एकदा बिघडलं की, हातचं गेलंच ! पुनः पुन्हा रंगाचे लेप पडले की, रंगांची ' ट्रान्सपरन्सी ' निघून जाते.

साडेतीन वाजता मेघगर्जना जवळ जवळ येत चालली, तेव्हा शिरीषला उठवलं. आता आम्ही दुसऱ्या वाटेनं तडक सॅनडिएगोला परतणार होतो. पण ते अंतर होतं जवळजवळ चारशे मैल ! वाटेत कुठेतरी मुक्काम करून सकाळी पुन्हा प्रवास सुरू करावा असं मी शिरीषला सुचवलं. तेव्हा शिरीष म्हणाला, ' नो ऽ ऽ ऽ आय वुईल ड्राईव्ह नॉन स्टॉप टू सॅनडिएगो !'

शिरीष भलताच जिद्दी मुलगा आहे. वाटेत रात्री दहाच्या सुमारास एकेठिकाणी थांबलो त्यावेळी हवेत उष्णता होती १०७ सेंटीग्रेड ! सूर्य अस्ताला गेल्यावर इतकी उष्णता, मग दिवसा तिथं काय कहर असेल याची कल्पनाच करवत नव्हती. शिरीष म्हणाला, ' आपण इथं थांबायला नको.

जेवण उरकून घेऊ आणि निघू. ' उमेश आणि शिरीष बाजूच्या हॉटेलमधून खाद्यपदार्थ आणायला गेले. मी गाडीतून उतरून बाजूच्या फुटपाथवर जरा पाय मोकळे करण्यासाठी उतरलो.

अमेरिका म्हटल्यावर मला नेहमी वाटे, तिकडं भयंकर थंड हवा असेल. सूर्य प्रकाश अभावानंच पाहायला मिळत असेल. जगातला तेलसाठा संपला की, सौरशक्तीवर चालणाऱ्या विजेऱ्या तयार करण्यात येतील अन् पाश्चिमात्य देशांना त्यांच्या बॅटऱ्या चार्ज करण्यासाठी भारताकडेच धाव घ्यावी लागेल. पण माझा भ्रमनिरास झाला अमेरिकेत वर्फही पडतं आणि नेवाडासारख्या प्रांतात प्राण कासावीस करणारा उन्हाळाही असतो. आज ना उद्या पृथ्वीच्या गर्भातला तेलाचा साठा संपुष्टात येईल, तेव्हा पर्यायी इंधन व्यवस्था निर्माण व्हायला हवी असे आपणाला वाटते. पण अमेरिकेने त्याही बाबतीत प्रगतीचा प्रचंड टप्पा गाठलेला आहे. शिकागो–नायगारा इथल्या हॉटेलसमध्ये गच्चीवर सोलर प्लँटस केव्हाच उभे केले आहेत. हॉटेलातून कनेक्शनच्या विजेचा वापर फक्त रात्रीच केला जातो. दिवसा सूर्यप्रकाशाचा कण शोषून घेतला जातो अन् त्यावर विजेची लहानमोठी उपकरणं कार्यान्वित केली जातात मिनिओपॉलीस इथं सूर्यप्रकाशावर चालणारी अनेक खेळणी बघितली. आज ना उद्या रस्त्यावरच्या मोटारीसुद्धा सौरशक्तीवर धावतील. हजारो टनांचं ओझं घेऊन जाणारी नौका देखील याच शक्तीवर चालेल. देशांतर्गत होणारी रेल्वेची वाहतूक देखील याच शक्तीवर चालते. शास्त्रज्ञ सौरशक्तीबरोबरच दुसऱ्याही पर्यायी इंधनाच्या शोधात आहेत. छोट्या प्रमाणावर सौरशक्तीला पाश्चात्त्य शास्त्रज्ञांनी कामाला जुंपलेच आहे. पण मोठ्या प्रमाणावर तिचा वापर करण्याचे शास्त्र अद्याप बाल्यावस्थेतच आहे. मानवाने आपलं जीवनक्षेत्र इतकं विशाल अन् गुंतागुतीचं करून ठेवलेलं आहे की, त्याला जगण्यासाठी भू–गर्भातील इंधन संपण्यापूर्वी दुसरी पर्यायी व्यवस्था शोधावी लागणार आहे.

शिरीषनं रात्रभर एकट्याने गाडी चालवण्याचा केलेला निर्धार मला पसंत नव्हता रात्रीच्यावेळी ड्रायव्हिंग करणाऱ्याचा एक क्षणभर जरी डोळा लागला, तरी वाहनास अपघात होण्याची शक्यता असते. म्हणून मी

शिरीषशेजारी बसून होतो. गाडीचा एसी सुरू होता. त्याची गार झुळूक सरळ माझ्या अंगावर येत होती. रात्रीचे अडीच वाजले होते. आकाशात ग्रह आणि तारका चमकत होत्या. बाजूच्या रस्त्यावरून, समोरून येणारी वाहनं मागे जात होती. कँपर एकाच गतीत चालला होता. शिरीष अत्यंत जागरूकतेनं ड्रायव्हिंग करत होता. तो झोपू नये म्हणून मी अधून मधून त्याच्याशी बोलत होतो. मागे भाभी अन् माई गाढ झोपी गेल्या होत्या. केबिनवरच्या फोमच्या गादीवर उमेशही गाढ झोपले होते. मी मात्र महत्प्रयासाने झोप आवरून शिरीष शेजारी बसून होतो. पण एसीच्या थंड झुळुकीने बसल्याजागी मीही डोळे मिटले.

सकाळी शिरीष मला हलवून जागा करीत होता, 'आबा, उठा. आपण सॅनडिएगोला येऊन पोहोचलो.'

मी डोळे उघडून पाहिलं. तो कँपर घरासमोर उभा होता. मी मनगटातल्या घड्याळात बघितले पहाटेचे साडेचार वाजले होते. पासिओ कार्डीयलच्या वसाहतीतल्या घरांसमोरचे दिवे लागले होते. थंड हवा सुटली होती. भाभींच्या घरात अल्पकाळ जरी आमचं वास्तव्य घडलं होतं, तरीही त्या वास्तूबद्दल जिव्हाळा अन् ओढ निर्माण झाली होती. अमेरिकेतल्या वास्तव्यात दोन ठिकाणी दीर्घ असं वास्तव्य घडलं होतं. सक्कासन्नाला ज्योतीकडे आणि दुसरा इथं सॅनडिएगोला भाभींच्याकडे. त्यामुळं या दोन्ही घरांविषयी एकप्रकारचा जिव्हाळा निर्माण झालेला होता. बाकी सगळी अमेरिका परकीच वाटली होती.

भाई नुकतेच ड्यूटीवर गेले होते. पण भाभींच्याकडं दुसरी किल्ली होती. दार उघडलं. अंथरुणं तेवढी घेतली आणि घरात जाऊन पुन्हा झोपण्याचा प्रयत्न केला. डोळ्यासमोर ला वेगासची ती रंगीली रात्र दिसत होती. अन् ग्रँड कॅनियनची सूर्यप्रकाशात रंग पालटणारी गिरीशिखरं डोळ्यापुढून हालत नव्हती.

भाभींच्या घरी वेलव्हेटचं आवरण असलेली मोटारीच्या ट्रकच्या टायरच्या आकाराची गिरदी होती. त्यांत थर्मोकोलसारखे गुळगुळीत कण होते. त्या गिरदीवर बसायला, आराम करायला फार बरं वाटे. मी स्वत:ला त्या गिरदीवर झोकून दिले.

पण ती झोपी जाण्याची वेळ नव्हती. लवकरच चांगलं पांढरं फटफटीत झालं. ब्रशनं दात घासत मी गच्चीत येऊन उभा राहिलो.

रस्त्याच्या पलीकडे असलेलं घर सूर्यकिरणांत अतिशय देखणं दिसत होतं. घराच्या मागेपुढे हिरवळ होती आणि कपौंडजवळ असलेलं, ' विपिंग ट्री ' नावाचं झिपरं झाड मागच्या निळ्या आकाशाच्या पार्श्वभूमीवर अत्यंत आकर्षक दिसत होते. तसा सॅनडिएगोचा सर्वच परिसर नयनरम्य होता. मागे टेकडीवर नव्याने बांधलेली घरं, त्या घरापर्यंत जाणारी नागमोडी वाट, वाटेच्या दोन्ही बाजूला स्प्रिंकलर्सनी तयार केलेली हिरवळ पाहून मला लँडस्केप काढायचा मोह झाला. त्या दिवशी मी दोन लँडस्केप्स् काढली.

संध्याकाळी शिरीषनं मेक्सिकन हॉटेलमध्ये जेवायला जायचं असं ठरवलं. भाई आणि भाभीही आमच्यासमवेत येणार होते. त्यापूर्वी शिरीषनं आम्हाला सॅनडिएगो हॅच क्लब पाहायला नेले. सॅनडिएगो बंदराजवळच हा शिडांच्या जहाजाचा क्लब आहे. तांबडा अन् पांढरा पट्टा असलेली शेकडो जहाजं लाटांवर डुलत होती. बाजूच्या ओपन हॉटेलमधे तरुण–तरुणी बिअर आणि सँडविचेसचा आस्वाद घेत होती. जवळच एक मनोरा होता. त्या मनोऱ्यावरून सॅनडिएगोचा उभा समुद्रकिनारा दृष्टीच्या टप्प्यात येत होता. हॅच क्लबच्या परिसरात एक प्रचंड उद्यान होतं. त्यात विविध रंगांची फुलं फुलली होती. उद्यानात मधेच प्रचंड जलाशय होता. त्यात अनेक रंगांचे मासेही होते. औद्योगिक प्रगतीकडं सारी शक्ती एकवटलेल्या अमेरिकन नागरिकांची सौंदर्यदृष्टी बघून कधी कधी अचंबा वाटे. तो साराच परिसर अतिशय नयनरम्य असा होता.

तेथून आम्ही परतलो तेव्हा, भाई आणि भाभी तयार होऊन बसले होते. त्यांच्यासमवेत प्रथम आम्ही एका डिपार्टमेंटल स्टोअर्समध्ये ' सेल ' होता तिकडे गेलो.

नुसती जत्रा फुलली होती. कपड्यांचा सेल ज्या भागात होता त्या भागात बायापोरांची एकच गर्दी दाटली होती. पँटस्, बुशशर्टस, जीन्स, टोप्या, स्वेटर्स हरतऱ्हेचा माल स्वस्त होता. किती म्हणून पाहायचं ? आणि किती म्हणून घ्यायचं ?

मला एक बऱ्यापैकी स्वेटर घ्यायचं होतं, म्हणून स्वेटर विभागात गेलो. तिथलं एक मला आवडलेलं स्वेटर घेऊन गिऱ्हाईकांना मदत करणाऱ्या पोरीजवळ गेलो अन् तिला म्हणालो, ' मला हे घालून पाहायचं आहे ! '

' बेशक ! ' ती म्हणाली अन् त्या स्वेटरची झीप काढून तिनं ते स्वेटर माझ्या अंगावर चढवायला चक्क मदत केली. स्वेटर अंगात चढवताना माझ्या शर्टाची कॉलर दुमडली गेली होती. माझ्यासमोर असलेल्या त्या पोरीनं शर्टाची कॉलरसुद्धा सरळ केली. मला तिनं आरसा दाखवला, अन् माझ्या मागोमाग येऊन म्हणाली, ' इट फिटस् यू मार्व्हलसली ! '

त्या स्वेटरची मूळ किंमत होती बावीस डॉलर्स पण सेलमध्ये ती फक्त बारा डॉलर्स करण्यात आली होती. मी ते खरेदी केलं, अन् तिला म्हणालो, ' आय वॉन्ट टू वेअर इट. प्लीज कट ऑफ द प्राईस टॅग, इट पिंचेस मी इन द नेक ! '

त्या स्वेटरची किंमत असलेले लेबल प्लॅस्टिकच्या दोरानं बांधलेले होते. ते मानेजवळ टोचत होते. त्या पोरीने कात्री घेतली अन् माझ्या पाठमोरं होत ती म्हणाली, ' डोंट बी स्केअर्ड, आय वोंट कट् युवर नेक ! '

' बाई ग ', मी मनाशी म्हणालो, तुझ्याकडून गळा कापून घेण्यासाठी इतक्या दूर नाही आलो मी ! '

तिने अलगद ते लेबल उडवले.

पुण्या–मुंबईला अलीकडे ' सेल ' चा बोर्ड लावून बाराही महिने गिऱ्हाईकांना आडवं–तिडवं कापायचा धंदा चालू असतो. ' सेल ' हा प्रकार दुकानदार केव्हा करतात ? जेव्हा एखादा माल बरेच दिवस दुकानात पडून असतो आणि त्याचा उठाव होत नाही, अशा वेळी किंवा एखादी वस्तू ' आऊट ऑफ फॅशन ' होते तेव्हा. पण आमच्याकडं चक्क जादा किंमतींची लेबलं साड्यांवर लावली जातात. त्यावर लाल शाईनं फुली मारली जाते अन् दुकानदाराचा तोटा होणार नाही अशी किफायतशीर दुसरी किंमत बाजूला चिटकविली जाते. विशेषत: ' सेल 'ची पाटी साड्यांच्या दुकानांवर झळकली की, बायकांची चिक्कार गर्दी उसळते. हिच्या तोंडून तिच्या तोंडी त्या तथाकथित सेलची जाहिरात होते अन् नेहमीच्या दुकानांत जी साडी योग्य किंमतीला मिळेल ती चार–दोन रुपये अधिक देऊन बायका खरेदी

करतात. साड्या हा बायकांचा ' ग्रेटेस्ट वीक पॉईंट ' आहे. एक बाई दुसऱ्या बाईच्या चेहऱ्याकडं बघण्याऐवजी प्रथम तिच्या साडीकडं पाहते. त्या साडीवरून त्या बाईच्या आवडी-निवडी आणि सामाजिक दर्जाबद्दल अंदाज करते. साड्या खरेदीसाठी शहाणे नवरे बायको सोबत कधीही जात नाहीत. एकदोन वेळा मी तो मूर्खपणा केलेला आहे म्हणून सांगतो.

नंतर आम्ही सर्वजण ज्या मेक्सिकन हॉटेलात गेलो, त्या हॉटेलचे नाव होते कार्लोज मर्फी (Carlos Murphy). या हॉटेलात जुन्या घोडागाडीच्या चाकापासून ते साखळीच्या घड्याळापर्यंतच्या सर्व जुन्यापुराण्या वस्तू भिंतीवर टांगलेल्या होत्या. हॉटेलमध्ये प्रथम गेलो तेव्हा, एकही टेबल मोकळे नव्हते टेबल मोकळे होईपर्यंत बारमध्ये थांबलो. बारही चिक्कार भरला होता. पण त्यातली एक फॅमिली जेवणाचे टेबल मिळाले म्हणून उठली अन् आम्ही पटापट त्यांच्या मोकळ्या खुर्च्या पटकावल्या. शिरीषनं मला विचारलं.

' आबा तुम्ही ड्रिंक काय घेणार ?'

' ड्रिंक घ्यायलाच हवं का ? आपण तिकडे जेवणाचं टेबल मोकळं नाही म्हणून इकडं बारमध्ये थांबलो ना ?'

' छे ! छे ! तसं काही नाही. तिकडंही हे लोक ड्रिंक सर्व्ह करतात ! आज इथं आपण मेक्सिकन् ड्रिंक घ्यायचं, अन् ते सुद्धा सर्वांनी !'

शिरीषनं कोणत्या ड्रिंकची ऑर्डर दिली हे त्यावेळी मला आजूबाजूच्या गलक्यात नीटस ऐकू आलं नाही. पण त्या पोरीनं आमच्यासमोर जेव्हा ग्लास आणून ठेवले, तेव्हा मी आश्चर्याने उद्गारलो,

' अरे बापरे, हे कसं काय प्यायचं ? अन् संपायचं केव्हा ?'

तांब्याएवढाले मोठे काचेचे बारीक देठांचे बाऊल्स, त्यांत किंचित् हिरवा–पिवळा द्रव, त्यात खिसलेला बर्फ घातलेला. ते मद्य पिण्यासाठी प्लॅस्टिकच्या स्ट्रॉज त्या बर्फात घुसवलेल्या होत्या. भाई सांगू लागले,

' बाबासाहेब, हे मेक्सिकन लोकांचं अत्यंत आवडतं ड्रिंक आहे. याला म्हणतात ' मार्गारिटा.'

' पण हे बनवतात कशापासून ?'

हे कॉकटेल आहे. मेक्सिकन् वाईन्, जीन, व्होडका अन् ताजा

मोसंबीचा रस यापासून हे बनवलं जातं !'

कॉकटेल्स बनवणं हा एक माझा आवडीचा छंद होता. भारतात अनेकवेळा हा उपद्व्याप मी केला आहे. सफरचंदाचा रस, जीन, व्होडका यांचं मिश्रण करून मी मित्रांना पाजलं होतं. 'ब्लडी मेरी' मुंबईत एका मैत्रिणीनं मला दिली होती. त्यावेळी 'छे : या टोमॅटोच्या ज्युईसनं कसली कीक् येणार' म्हणून मी तिला चिडवलं होतं. पण नंतर तीन–चार तास ब्लडी मेरी मला गाढवासारख्या लाथा मारत असल्याचा भास झाला होता. त्यामुळं कॉकटेल या प्रकाराची मी धास्ती खाल्ली होती. त्यामुळं मार्गारिटा समोर आल्यावर मी भाईंना विचारलं, 'ही बया किक् देत नाही ना ?'

'छे ! हो ! तसं असतं तर या लेडीजनासुद्धा कशी मागवली असती ? इट इज ए माईल्ड लेडीज ड्रिंक ! फक्त मुंगी चावल्यासारखं वाटेल इतकंच !'

'मग काही हरकत नाही !' मी म्हणालो.

मी ती अनोखी मार्गारिटा चाखली अन् खरंच काय सांगू ती चव !

ती शब्दांनी सांगताच येणार नाही. काही अनुभूती शब्दांत व्यक्तच करता येत नाहीत. त्या जाणूनच घ्याव्या लागतात.

भाई म्हणाले, 'इट् इज ए माईल्ड लेडीज ड्रिंक.' पण ती मुंगी नव्हती, मुंगळा होता. स्पीकरवर मेक्सिकन म्यूझिक लागलं होतं. मेक्सिकन् मद्य मस्तकात भिनलं होतं अन् इतक्यात जेवणाच्या टेबलाला आमचा नंबर लागल्याचं सांगण्यात आलं. हास्यविनोदांत दंग झालेल्या त्या गर्दीतून वाट काढीत आम्ही पलीकडच्या दालनात प्रवेश केला. एका बाजूचं टेबल मिळाल्यानं मला तिथलं वातावरण निरीक्षण करण्याची संधी मिळाली.

आमच्या डोक्यावर गाडीचं एक जुनाट चाक लोंबकळत होतं. भिंतीवर जागोजागी जुने रॉकेलचे कंदील टांगले होते. पण त्यांत विजेचे दिवे सोडले होते. मेणवत्त्यांचे आकर्षक असे स्टँडस् होते. एका कोपऱ्यात चक्क लाकडाचा नांगर अडकावून ठेवला होता. शिवाय ठिकठिकाणी जुन्या पद्धतीच्या गवताच्या विणलेल्या हॅटस् होत्या.

शिरीषनं जेवणाची ऑर्डर दिली. त्यानं फक्त तीन प्लेटस्ची ऑर्डर दिल्यानं मी काहीसा चुळबूळ करीत म्हणालो, 'तीन प्लेटस् आपणा

सहाजणांना कशा काय पुरतील ?'

त्यावर तो हसून म्हणाला, ' थोडं थांबा. जेवण येऊ द्या, मग हा प्रश्न विचारा !'

अन् खरंच तो तसं का म्हणाला हे मला जेवण आल्यावरच समजलं.

त्या पदार्थाचं नाव होतं ' इंचिलाडा. ' बोनलेस मटण, चीज, अंडी आणि काही व्हिजिटेबल्स यांनी बनवलेल्या त्या ' इंचिलाडा 'ची एक प्लेट दोघांनासुद्धा संपणार नव्हती. जाड असा केकसारखा तो पदार्थ शिरीषनं चाकूनं कापून आमच्या प्लेटमध्ये थोडा थोडा घातला, त्याला अप्रतिम अशी चव होती.

याशिवाय मेक्सिकन पद्धतीचं चिकन मागवण्यात आलं. काकडीसारख्या पदार्थांत बनवलेलं ते चिकनही चव नवीन असल्यामुळं मला आवडलं. त्या जेवणासोबत सॅलडस् दिले होते. शिवाय सोबत उकडलेली मक्याची कणसंही दिली होती. कोवळी मिठाच्या पाण्यात उकडलेली मक्याची कणसं न आवडणारा माणूस अद्याप मला भेटलेला नाही. कृष्णेकाठी उन्हाळ्यात जेव्हा मी बंदुकीनं मरळ माशाची शिकार करण्यासाठी जात असे, तेव्हा त्या भागातले शेतकरी माझ्यासाठी मक्याची हूर्डा पार्टी करीत, वरच्या पाल्यासकट मक्याची कणसं उभी रचून ठेवायची आणि बाजूनं जाळ लावायचा. पानांच्या ओलसरपणानं ते कणीस आतल्या आत उकडल्यासारखं व्हायचं. किंचित् असा खमंग धुरकट वास असलेली ती कणसं कृष्णेच्या रम्य परिसरात बसून चाखल्याचे प्रसंग आजही आठवतात तिथं अमेरिकेत ' कार्लोज मर्फी ' या हॉटेलात देखील मला त्याच प्रसंगाची आठवण झाली. इटालियनं ' पिझ्झा ' सारखा तो इंचिलाडा आम्हाला पुरून उरला.' पण एवढा चविष्ट प्रकार टाकून उठणे हेही काही मनाला पटेना. तेव्हा मी शिरीषला म्हणालो,

' तुला ठाऊक होत तर दोनच ' इंचिलाडा ' मागवायचे होतेस, आता हे इतकं चांगलं असून टाकायची पाळी तरी आली नसती !'

' छे ! छेऽऽ ! हा आपण उरलेला ' इंचिलाडा ' सोबत घेऊन जायचा घरी !'

' काहीतरीच काय ?' माई म्हणाल्या.

‘ अहो माई, इकडं अशीच पद्धत आहे. ’

वेटरला शिरीषनं सांगितलं, ‘ प्लीज़, मेक इट ए डॉगी बॅग. ’

म्हणजे घरच्या कुत्र्यासाठी म्हणून आपण ऑर्डर दिलेलं अन्न घरी घेऊन जाणं यात वावगं काहीच नाही. मला तर ती प्रथा फारच आवडली. पण भारतात असं कुठं जर मी म्हणालो, तर लोक म्हणतील ‘ घरात काय कमी पडलं म्हणून सोबत घेऊन निघालेत ?’

ती डॉगी बॅग रात्री भाभींनी फ्रीजमध्ये ठेवली. अन् दुसऱ्या दिवशी न विसरता लंचच्या वेळी मी ती भाभींच्याकडून गरम करून घेतली. ते खाताना उगाचच मला ‘ भो भो ’ करावंसं वाटलं. ज्याचं नाव सांगून ते आणलं, त्याला आठवण्यात गैर काय होतं ?

सॅनडिएगोला भाभींच्याकडं येण्याचा उद्देश सफल झाला होता. ला वेगास आणि ग्रॅंड कॅनियन पाहून झाले होते. आता परत निघायला हरकत नव्हती. पण भाभी अन् भाईच्या आग्रहास्तव आणखीन एक दिवस मुक्काम लांबवला.

अमेरिकेतले मराठी बांधव ‘एकता’ नावाचं एक मराठी मासिक चालवतात. भाभी त्या मासिकात अधून-मधून लिहितात. त्या संध्याकाळी भाभींनी मला विचारले, तुम्ही ‘ एकता ’साठी मुलाखत द्याल ?’

‘ माझी, अन् मुलाखत ? अहो भाभी, मुलाखत घेण्याइतका मी मोठा लेखक नाही ’

‘ मुद्दा तो नाही. आज मराठीतल्या अत्यंत लोकप्रिय लेखकांत तुमची गणना होते. म्हणूनच मला मुलाखत हवी आहे. ’

‘ पण तुम्ही हे लिहिणार कधी ?’

‘ मी काही प्रश्न विचारीन, तुम्ही उत्तरं द्यायची. मी ते सर्व टेप करून घेईन आणि नंतर लिहून काढेन !’

‘ ठीक आहे !’

त्या रात्री आम्हाला सराफांची सेंड–ऑफ पार्टी होती. पौर्णिमा फक्त दोन दिवसांवर आलेली होती. आकाशात जवळ जवळ पूर्णाकृती असं चंद्रबिंब तरंगत होतं. घराच्या मागे सिमेंट कॉंक्रीटचा कट्टा होता. त्या ठिकाणी ‘ बार्बेक्यू ’ करणार होते. शिरीषनं ‘ ब्लॅक लेबल ’ स्कॉच आणली होती. शेगडीवर मसाला लावून भाजलेल्या गरम गरम चिकन लेग्ज, आणि अधून–

मधून ' ब्लॅक लेबलचा घोट घेत, गप्पा चालल्या होत्या. त्या रात्री दुसरं काही खायचंच नाही असं ठरलं होतं. पण तरीही भाभींनी काहीतरी गोडधोड असं पुडींग बनवलं होतं.

सकाळी सॅनडिएगो सोडायची वेळ आली. भाई मुद्दाम रजा काढून घरी राहिले होते. शिरीष आम्हाला लॉस एंजेलीसला संध्याच्या घरी पोहोचवणार होता. आमच्या बॅग्ज गाडीमध्ये ठेवण्यात आल्या. भाईंचे डोळे ओलावले. भाभी अन् माई एकमेकींच्या गळ्यात पडून ओक्साबोक्सी रडल्या.

तीन वर्षांपूर्वी पत्ररूपानं ओळख झालेल्या भाभींनी आम्हाला अमेरिकेला यायचं निमंत्रण दिलं. योग असा विलक्षण होता की, आम्ही खरोखरच त्या निमंत्रणाचा स्वीकार केला होता. प्रत्यक्ष भेटीत भाभींच्या अन् भाईंच्या प्रेमळ स्वभावाची ओळख पटली होती. रक्ताच्या नात्यापेक्षा जोडलेली नातीच अधिक दृढ असतात याची पुन्हा एकदा प्रचीती आली होती

माझेही डोळे भरून आले. गाडीतून जाताना माई बराच वेळ भाभींच्या आठवणीने डोळे पुसत होत्या.

लॉस एंजेलीस्ला संध्याकडे जाण्यापूर्वी आम्ही हॉलीवुडला जायचे ठरवले. कारण सॅनडिएगोवरून लॉस एंजेलीसला जाताना हॉलीवुड वाटेवरच होते. मुख्य रस्ता जेथून हॉलीवुडकडे फुटला होता त्या रस्त्यावर हॉलीवुडला जाणाऱ्या वाहनांची प्रचंड रांग लागली होती. मुंगीच्या पावलांनी वाहनांची ती रांग हळूहळू पुढे सरकत होती. अर्ध्या–पाऊण तासानंतर वाहनांची गती थोडी वाढली. एक प्रचंड टेकडी चढून गेल्यानंतर जगप्रख्यात युनिव्हर्सल स्टुडिओचा परिसर लागला.

भारतात इंग्रजी सिनेमा पाहताना ती फिल्म ' हॉलीवूड'ला तयार झाली आहे एवढं आम्ही समजत असू. पण हॉलीवूड हा प्रकार काय आहे ते प्रत्यक्ष पाहण्याचा क्षण समीप आला होता.

एका प्रचंड प्रवेशद्वारातून आमची गाडी पार्किंग लॉटकडे आणून पार्क केली. हॉलीवूडला अनेक लहान मोठे स्टुडिओज होते. चारशे वीस एकरांचा हा परिसर कुठल्याही प्रकारचे चित्रीकरण करण्यास अत्याधुनिक साधनांनिशी सुसज्ज होता. प्रसिद्ध ' युनिव्हर्सल ' फिल्म कंपनीही तिथंच होती. त्या कंपनीच्या विद्यमाने प्रवाशांना करमणुकीसाठी निरनिराळे मनोरंजनाचे

प्रकार दाखविण्यात येतात.

'ग्लॅमर ट्रॅम टूर' मधून आम्ही एक–दीड तास फिरलो. यात स्टुडिओच्या परिसरातील चित्रीकरणाची विविध स्थळं पाहिली. या ट्रॅममधून जाताना स्टुडिओचा एअरपोर्ट ' पाहिला. केवळ चित्रीकरणासाठी तयार केलेली घरं पाहिली. नदी, पूल सर्व काही स्टुडिओच्या आवारात निर्माण करण्यात आलेलं आहे. औट डोअर शूटिंगसाठी इतकी सुसज्ज यंत्रणा जगात इतरत्र कुठेही नाही. या ग्लॅमर ट्रॅम टूरनं पाण्यातून जाताना अख्खी ट्रॅम पाण्यात बुडत असल्याचा आभास निर्माण करण्यात आला, तर काही वेळानं ट्रॅम बोगद्यातून पार होताना धरणीकंप झाल्याचा भास निर्माण करून दाखवला, तर आणखीन एका मोडक्या पुलावरून ती ट्रॅम जाताना फाडकन् पूल मोडल्याचा प्रचंड आवाज झाला. अन् ट्रॅम हळूहळू वरून खाली कोसळते आहे असा भास निर्माण करण्यात आला. वरील तिन्ही ठिकाणी प्रवाशांचा भीतीनं थरकाप उडाला. लहान मुलंच काय, प्रौढ बायका अन् पुरुषदेखील जोरजोरात किंचाळले.

ग्लॅमर ट्रॅममधून जाताना चित्रीकरणासाठी वादळ आणि जलप्रलय कसा निर्माण करता येतो याचं प्रात्यक्षिक दाखवलं गेलं. युनिव्हर्सल स्टुडिओतला तो ट्रॅममधून मारलेला फेरफटका अविस्मरणीय असा झाला.

सिनेमाचं चित्रीकरण करताना ते अत्यंत वास्तववादी व्हावं यासाठी हॉलीवूड सदैव प्रयत्नशील असतं. वास्तववादी चित्रीकरणाचा प्रेक्षकांच्या मनावर कसा परिणाम होतो हे युनिव्हर्सल स्टुडिओमधल्या ' स्क्रीन टेस्ट थिएटर ' इथं प्रात्यक्षिकासह दाखवण्यात आले. 'एअरपोर्ट सेवंटी सेव्हन' या चित्रपटाचं शूटींग हॉलीवूडमध्येच झालेलं होतं, पण ते प्रत्यक्षात कसं घेतलं अन् त्याचं संकलन ( Editing ) किती सहज केलं गेलं याचं एक प्रात्यक्षिक त्यावेळी दाखवण्यात आलं. सिनेमात विमान नादुरुस्त होऊन समुद्रात उतरतं त्यावेळी वैमानिकानं प्रवाशांना लाईफ जॅकेटस घालून कोणत्या दारानं बाहेर जायचं हे सांगितलेलं असतं. पण विमान समुद्रात उतरणार म्हटल्यावर प्रवाशांची कशी दैना उडते, घाबरून ते एकमेकांना कशा मिठ्या मारतात, आता आपली मरणघटिका जवळ आली या जाणिवेनं त्यांचा उडणारा हलकल्लोळ हा भाग उपस्थित प्रेक्षकांकडूनसुद्धा आपण कसा साकार करू

शकतो हे त्या चित्रपट-निर्मात्यांनी दाखवून दिलं. ' स्क्रिन टेस्ट थिएटर ' हा शो पाहायला आलेल्या काही प्रेक्षकांना त्या प्रात्यक्षिकात भाग घेण्यासाठी बोलावण्यात आलं. त्यांना काही पूर्वसूचना देण्यात आल्या. विमानाचं मशीन बंद पडल्याचं पायलटनं सांगताच त्यांच्यावर झालेला मानसिक आघात अन् त्या प्रसंगी कसं ॲक्टिंग करायचं यासंबंधी सूचना देण्यात आल्या. नंतर त्यांच्यावर कॅमेरा स्थिर करण्यात आला. सूचनेप्रमाणं 'सिलेक्टेड' प्रेक्षकांनी हावभाव केले अन् ते तात्काळ चित्रित करण्यात आले. त्या प्रेक्षकांतलं एक नवविवाहित जोडपं या प्रात्यक्षिकासाठी पुढं झालं होतं. त्या जोडप्यानं विमान समुद्रात बुडलेल्या वेळचा अभिनय अतिशय उत्कृष्ट केला. तरुणीने ' ओ जिजस, सेव्ह अस् ' असं म्हणून प्रियकराच्या गळ्याला मिठी मारून समुद्रात उडी मारल्याचा अभिनय करताना पाण्याच्या हौदात उडी मारली होती. ते सर्व कौशल्यानं चलतचित्र कॅमेराने टिपण्यात आले होते. मूळ सिनेमातले काही ' शॉटस ' तसेच ठेवण्यात आले होते. पण आमच्यासमोर घेतलेले शॉटस् तात्काळ एक्स्पोज करून मुळ चित्रपटाला जोडण्यात आले आणि तो भाग आम्हा प्रेक्षकांना लागलीच दाखवण्यात आला. आणि आश्चर्य असं की, आमच्यासमोर जे चित्रीकरण करण्यात आलेलं होतं, ते मूळ चित्रपटाशी बेमालूमपणे संकलित करण्यात आलं. संकलन (**Editing**) हे चित्रपटातलं किती महत्त्वाचं माध्यम आहे याची प्रचीती त्यावेळी आली.

त्यानंतर ' कॅसल ऑफ ड्रॅक्यूला ' हा शो बघितला आजपर्यंत अमेरिकन चित्रपटांतून अनेक भयानक ' कॅरॅक्टर्स ' बघण्यात आलेल्या होत्या. त्यांत ' द् फॉक्समन् ', ' फँटोमस ', ' ड्रॅक्यूला ' इत्यादी भयानक व्यक्ती होत्या. अशा सर्व भयानक व्यक्ती भुताटकीनं पछाडलेल्या एका किल्ल्यात एकत्र दाखवण्याचा ' शो ' हॉलिवुडला बघितला. पण चित्रपटांत आपणावर जो परिणाम होतो तो तिथं होत नाही. कारण उघड आहे. आपण पाहतो आहोत ते सर्व खोटं आहे याची आपल्याला जाणीव असते. नाटक आणि चित्रपट यातला फरक कोणता ? असा प्रश्न नेहमी माझ्यासमोर उभा राहतो. चित्रपट या माध्यमाला संगीत, निरनिराळ्या प्रदेशाचं चित्रीकरण, स्थल-कालाची बंधनं शिथिल करण्याची साधनं लाभल्यामुळे चित्रपटाचा 'इफेक्ट'

हा नाटकापेक्षा अधिक प्रभावी असतो. नाटकाचं तसं नसतं. दोन–अडीच तासात समोरच्या रंगमंचावर सारं कथानक सांगावं लागतं. स्थलकालाचं बंधन असल्यामुळं पात्रांच्या तोंडून कथानकाला गती द्यावी लागते. अन् शेवटी आपण नाटक पाहतो आहोत, त्यात काम करणाऱ्या व्यक्ती आपल्या पूर्वपरिचयाच्या असतील तर नाटकाचा 'परिणाम' हा व्हावा तसा कधीच होत नाही. आपण नाटक सुटल्यानंतर 'कोणाचं काम कसं झालं ?' याचीच चर्चा करीत बाहेर पडतो. पण आजकाल महाराष्ट्रात भल्याबुऱ्या नाटकांचं उदंड पीक आलंय. नाटकाची जाण असणाराही लिहितो, अन् नसणाराही लिहितो. रंगभूमीवर नाटकं पेश करण्यासाठी कोणते लेखक पुढे येतात अन् ते कसे 'कसदार' लेखन करतात याचा अनुभव गेले वर्षभर महाराष्ट्र सरकारच्या नाट्यपरीनिरीक्षण मंडळाचा सदस्य या नात्यानं मी घेत आलो आहे. त्याबद्दल मी एवढंच म्हणेन, 'रंगदेवते, सांभाळ हो. तुला कठीण दिवस आले आहेत !'

हॉलीवुडला 'कॅसल ऑफ ड्रॅक्यूला'चा शो बघितल्यानंतर 'स्नो सेट' पाहिला. 'स्नो सेट' म्हणजे थंडीच्या दिवसांत होणाऱ्या हिमवर्षावाचा देखावा. आपल्याकडं गणपतीला करतात तसा. पण आपण देखाव्याच्या नावाखाली जितकं देवदेवतांचं विडंबन करतो तसला मूर्खपणा तिकडची मंडळी करीत नाहीत. संदीप पाटलाच्या वेषातला गणपती, हातांत क्रिकेटची बॅट घेऊन मैदानात अवतीर्ण झालेला, तर कधी चक्क गांधीटोपीधारी मंत्री–वेषातला गणपती ! परवा आमच्या करवीरी एक प्रचंड गणपती करून त्याचं विसर्जन केलं पुलावरून, क्रेन लावून, खाली सोंड वर पाय अशा अवस्थेत तो 'विघ्नहर्ता' जलमय झाला. धार्मिक भावना जोपासणाऱ्यांनी वृत्तपत्रांतून थोडी ओरड केली अन् प्रकरण तिथंच थांबलं ! पण मला म्हणायचं की, सार्वजनिक गणपतीचं 'फॅड' आता अतिकिळसवाणं झालंय्. लोकांकडून पैसे उकळणं, रात्रंदिवस लाऊडस्पीकरचं ते कोकलणं, एखादा फालतू देखावा, रात्री मेळा किंवा गावठी नाटकाचा प्रयोग, या सर्व गोष्टींचा सुशिक्षित मंडळींना वीट आला आहे. पण तोंड उघडायचं कोणी आणि कसं ? 'श्रीं'ची प्रतिष्ठापना करणारी ही मंडळी मुख्यत: बुद्धीशी फारकत झालेली असतात. नि:संगाशी वाद करण्याची हिम्मत

आजकाल आहे कुणात ? लो. टिळक जर आज ह्यात असते, तर सार्वजनिक गणपतीची कल्पना समाजात रुजवण्यात आपण केवढी चूक केली असं ते निश्चितच म्हणाले असते. ज्या ब्रिटिश सरकारला 'स्वराज्य हा माझा जन्मसिद्ध हक्क आहे' असं त्यांनी ठणकावून सांगितलं, त्याच लोकमान्यांनी 'जनहो माफ करा, सार्वजनिक गणेशोत्सवामुळे असा हाहाकार उडणार आहे याची मला य:त्किंचितही जाणीव असती तर मी सार्वजनिक गणेशोत्सव साजरे करण्याची प्रेरणा दिलीच नसती. चूक झालीय् माझी '

'स्नो सेट' पाहात असतानाच मागे फ्रेंच फ्राईज तळल्याचा खमंग वास आला., त्या दिशेला बघितले तर तिथ युनिव्हर्सल स्टुडिओनं चालवलेलं प्रचंड रेस्टॉरंट होतं हातातल्या घड्याळात पाहिलं. दुपारच्या जेवणाची वेळ झालेलीच होती. माई व उमेश यांच्याकडं मी पाहात म्हणालो,

'इथंच थोडं थोडं खाऊन घेऊ या !

'हो, मीही तेच सांगणार होतो. लंच टाईम झालेलीच आहे' शिरीष आम्हाला रेस्टॉरंटच्या दिशेने घेऊन जात म्हणाला.

उघड्यावरच टेबल-खुर्च्या मांडल्या होत्या. वर कापडी छप्पर होतं. जागो-जागी हॉलीवूड पाहायला आलेली गौरवर्णीय मंडळी हसत–खिदळत बसली होती. अमेरिकेत बऱ्याचशा रेस्टॉरंटस्‌मध्ये तुमचे खाद्यपदार्थ तुम्हालाच कौंटरवरून घेऊन यावे लागतात. इतकंच काय पण, मीठ, मीरपूड किंवा टोमॅटो केचअप हवे असेल तर ते स्वत:च घेऊन यावे लागते. काही ठिकाणी टॉमॅटो केचअप किंवा मीठ–मिरीच्या पुड्या खाद्यपदार्थांसोबतच देतात. पण या हॉलिवुडच्या रेस्टॉरंटमध्ये टॉमॅटो केचअप् एका काचेच्या बंबांत भरून ठेवले होते. त्या बंबाला बोअरिंगचं पाणी हापसायला बसवतात तसला दांडा बसवलेला होता. आपण प्लेट कॉकजवळ धरायची अन किंचित तो दांडा खेचायचा की, नळातून घट्ट असा टॉमेटो केचअप पडायचा. पण एवढ्या मोठ्या प्रमाणावर गिऱ्हाईकांना देण्यात येणारा तो टोमॅटो केचअप अतिशय दर्जेदार होता. भारतात काही कंपन्या जो टॉमेटो केचअप बनवतात, त्यात टॉमॅटो फक्त वरच्या लालभडक चित्रावरच असतो. उकडलेला दुध्या भोपळ्याचा गर, सायट्रिक ॲसिड आणि रंग यांच्या मिश्रणापासून बनवलेला हा टोमॅटो केचअप असतो. माझ्या विधानाची खात्री करून घेण्यासाठी

अन्न आणि औषध निरीक्षण खात्याच्या लोकांनी केमिकल अॅनालायझरकडून तो तपासून घ्यावा. गरम गरम हॅम्बर्गर, हॉट डॉग्ज बऱ्याच दिवसानंतर खात होतो. मध्यंतरी सॅनिडिएगोला आणि कँपरमध्ये भाभी अन् माईंनी चक्क भारतीय जेवणच दिलं होतं. हॅम्बर्गरमध्ये कसलं मटण वापरलं जातं याची चर्चा करायची नाही असं उमेशनी अन मी ठरवून टाकलं होतं. कारण जे मटण अमेरिकेत खाद्यपदार्थात वापरलं जातं ते कोणत्याही प्राण्याचं असो, त्याचा दर्जा उच्च असतो याची आम्हाला शंका उरली नव्हती. अन् खाद्य–पदार्थांबद्दल जास्त चिकित्सा अन् चर्चा केली तर, माई त्या खात नव्हत्या इतक्या वर्षांचे मनावरचे संस्कार त्या सोडायला तयार नव्हत्या.

लंच झाल्यावर आम्ही हॉलीवुडची उरलेली आकर्षणं पाहायला रवाना झालो. त्यांत लहान लहान वस्तू तयार करून त्यांचं चित्रीकरण करताना त्या प्रचंड आहेत असा आभास निर्माण करणारं चित्रीकरण कसं करतात याचं प्रात्यक्षिक दाखवण्यात आलं.

'एक्स्पेडिशन टू मून' या चित्रपटासाठी जे अंतराळयान बनवलं होतं ते जेमतेम दीड फूट लांब अन एक फूट उंच होतं. अदृश्य अशा दोराला लोंबकळणारं ते यान अंतराळात परिभ्रमण करताना प्रचंड आवाजाच्या साहाय्याने ते यानही प्रचंड असल्याचा आभास निर्माण केला गेला होता. माहिती सांगणारी पोरगी फारच स्मार्ट होती. ती म्हणाली, 'हॉलीवुडच्या हाणामारीच्या चित्रपटांत तुम्ही कड्यावरून खाली दरीत कोसळलेल्या मोटारी पाहता, उद्ध्वस्त झालेल्या पुलावरून खाली नदीत कोसळणारी आगगाडी पाहता किंवा तोफेच्या गोळ्यानं आकाशात पेटलेले, अन् वरून खाली कोसळणारे विमान पाहता. ही चित्रीकरणं लहान लहान खेळण्यांच्या साहाय्याने केली जातात. प्रत्येक वेळी खरोखरच्या मोटारी, रेलगाड्या किंवा विमानं नष्ट करायची म्हटलं, तर चित्रपट कंपन्यांचं दिवाळं वाजेल.'

गेल्या काही वर्षांत चित्रपटकथालेखक म्हणून माझा अन् चित्रपटसृष्टीचा काहीसा संबंध आला. भारतीय चित्रपटसृष्टी अन् त्यातल्या त्यात मराठी चित्रपट व्यवसाय यांचा दर्जा इतका खालावलेला आहे की, आपण कधीही दर्जेदार चित्रपट निर्माण करू शकणार नाही असा निराशामय विचार

डोक्यात येतो. या चित्रपटांची कथा, त्यांतली गाणी, कशाचा कशाशी संबंध नसतो. चित्रपटात गाणं असणं हेच मी मुळात अनैसर्गिक समजतो. वास्तवात किती प्रियकर अन् प्रेयसी उद्यानात जाऊन पाठशिवणीचा खेळ खेळतात ? कितीजण गवताच्या किंवा पिंजराच्या ढिगावर बसून एकमेकांशी प्रणयाचे चाळे करतात ? अन् कितीजण भावपूर्ण अशी प्रेमगीतं गातात ? पण सिनेमात हा सर्व मालमसाला हवाच ! आताशी त्यांत हिंदीची उष्टी नक्कल-मारामारीचीही–असायला हवी, सस्पेन्स हवा ! पण हिंदी चित्रपट हीच मुळात इंग्रजी चित्रपटांची भ्रष्ट नक्कल असते, तर नकलेची ही मराठी नक्कल किती तकलादू अन् फालतू होते हे आपण पाहतोच. आजकाल सिल्व्हर ज्युबिली, गोल्डन ज्युबिली झालेले चित्रपट उत्कृष्ट मानले जातात. मला अगदी राहवत नाही, ' या मेंढरांच्या देशात एक खड्ड्यात पडला की, सगळेच पडणार !' चित्रपटगृहासमोर लांब रांग असली की, तो चित्रपट चांगला असं समजून खेडुतासारखेच शहरीही त्या रांगेत तिकिटासाठी उभे राहतात. देशात उच्च अभिरुचीसंपन्न चित्रपट निर्माण होण्याची अपेक्षा बाळगणं हे वेडेपणाचं ठरतं आहे. अजूनही धार्मिक, पौराणिक चित्रपटांना तुफान गर्दी लोटते, हाऊस फुल्लचे बोर्ड लागतात. लोकांच्या अंधश्रद्धेला आव्हान करणारे गल्लाभरू चित्रपट निर्माण करणाऱ्यांना वास्तववादी चित्रपट निर्माण करावेसे कसं वाटेल ? अन् ' पथेर पांचाली , ' मंथन ', ' आक्रोश ' असे वास्तववादी चित्रपट निर्माण करणाऱ्यांना निर्मितीसाठी खर्च केलेले पैसेही वसूल करता येत नाहीत म्हणून ' आक्रोश ' करण्याची पाळी येते.

चित्रपट कलेच्या या प्रभावी माध्यमातून देश प्रगत व्हावा, विचारवंत व्हावा असं वाटणारा नाव घेण्यासारखा एकही निर्माता अन् दिग्दर्शक या देशात अद्याप जन्मलेला नाही अन् आमच्या हयातीत जन्मण्याची शक्यता नाही.

हॉलीवुडला आणखीन दोन अविस्मरणीय असे प्रकार पाहिले. त्यांतला एक होता –' ॲनिमल ॲक्टर्स स्टेज. ' चित्रपटांत काम करणाऱ्या प्राण्यांची प्रात्यक्षिकं दाखवली. त्यात कुत्र्याने पोष्टाच्या पेटीत पत्र टाकणे, बेल वाजताच दाराची कडी काढणे इत्यादी प्रकार होते. पण आश्चर्य वाटलं ते,

उंदराचा अभिनय पाहून. एक मांजर ' मँव मँव ' करीत स्टेजवरून उंदराचा पाठलाग करीत येते. उंदीर माळ्यावर जातो. मांजरही त्या माळ्यावर धावते आत काय चालते ते दिसत नाही. फक्त लाऊडस्पीकरवर मांजरांचे ओरडणे ऐकू येते. थोड्या वेळाने उंदीर दोरीला बांधलेल्या चाकाच्या साहाय्याने रोप–ट्रेन करून माळ्यावरून निघून गेला अन् त्याच माळ्यावरून नंतर डोक्याला, पायाला पट्ट्या बांधलेले मांजर लंगडत लंगडत जिन्यावरून खाली उतरते तेव्हा जमलेले, हजारो प्रेक्षक खूश होऊन टाळ्यांचा कडकडाट करतात. उंदराने मांजराला जखमी करून परत पाठवणे ही कल्पनाच मनोरंजक ! त्यानंतर पोपटाने प्रेक्षकांच्या हातून डॉलर्स घेतले अन् आपल्या शिक्षकाच्या खिशात नेऊन घातले. नंतर तेच डॉलर्स बरोबर त्याच प्रेक्षकांना परत देऊन त्या पक्ष्याने प्रेक्षकांची प्रशंसा मिळवली अमेरिकेत ' सी-वर्ल्ड ' मध्ये शिकवलेले सील आणि डॉल्फीन मासे बघितल्यावर जे आश्चर्य अन् अचंबा वाटला होता, तोच हा पशुपक्ष्यांचा खेळ पाहताना वाटला.

त्यानंतर पाहिला तो, द् स्टंट शो ! मी अजूनही हाणामारीचे इंग्रजी चित्रपट आवडीने पाहातो. एकतर त्यात वास्तवाचा भास असतो, दृष्टीसुख देणारे सीन्स असतात अन् छोट्या घटनेवर दीड–दोन तास प्रेक्षकाला स्वत:ला विसरून जायला लावण्याची किमया असते पूर्वी आमच्या करवीरात ' व्हीनस टॉकीजला ' एक आण्यात इंग्रजी सिनेमा पाहायला मिळे तेव्हा मी मराठी चौथीतून इंग्रजी पहिलीत गेलो होतो. चार पैशात सिनेमा होता; पण वेळीप्रसंगी हे चार पैसेही मिळणं दुर्लभ असे. तेव्हा माझ्या मावसभावाला मी गाठत असे. तो व्हीनस टॉकीजमध्ये ऑपरेटर होता. सिनेमा चालवणाऱ्या माझ्या मावस भावाबद्दल मला अतिशय आदर वाटे. पण तो मात्र सिनेमाबद्दल कधी चागलं बोलत नसे. कधी कधी तो मला परत पाठवत असे. त्यावेळी बघितलेले टार्झन, मार्व्हल मॅन, किंगकाँग हे चित्रपट अद्यापही आठवतात. पण गेल्या वीस–तीस वर्षांत बघितलेले अनेक चित्रपट दुसऱ्या दिवशीसुद्धा आठवत नाहीत.

तर हा ' स्टंट शो ' म्हणजे हॉलीवुडला जे हाणामारीचे चित्रपट निर्माण होतात, त्यांचं चित्रीकरण कसं केलं जातं याचं प्रात्यक्षिक तिथं दाखवलं.

दोन–तीन हजार प्रेक्षक अर्धवर्तुळाकार अशा गॅलरीत बसले होते. समोर एक घर, बाजूला एक 'सलून' (हेअर कटिंग सलून नव्हे), त्यासमोर एक कठडा, कठड्याला घोडा बांधून आलेला स्वार (हीरो) कमरेचे रिव्हॉल्वर घेऊन आपल्या प्रतिस्पर्ध्याला (व्हिलनला) शोधण्यासाठी सलूनमध्ये प्रवेश करतो. पण प्रतिस्पर्धी त्याचे रिव्हॉल्वर हिसकावून घेतो. अन् दोघांची ठोसाठोसी होते ते दोघे बाहेर येतात. प्रेक्षकांसमोर उघड्यावर त्यांचं मुष्ठीयुद्ध सुरू होतं. त्या मारामारीला साजेल असं म्युझिक स्पीकरवर लागतं शेवटी व्हिलन धावत माडीवर जातो अन् वरून आपल्या प्रतिस्पर्ध्याला गोळी घालायचे ठरवतो. पण हीरो सवाई असतो. तो सलूनमधून दुसरी बंदूक घेऊन येतो अन् घराच्या छपराजवळ लपून बसलेल्या व्हिलनला 'ठों ऽऽ' करून गोळी घालतो. व्हिलनच्या तोंडातून रक्ताची गुळणी येते अन् तो वरून खाली कोसळतो.

आपल्याला वाटतं की, खरोखरच तो मरूनच खाली पडला की काय! पण नाही, तो ज्या ठिकाणी पडतो त्या ठिकाणी जमिनीत सहा फूट उंच अशी फोमची गादी असते. पडल्या पडल्या तो उठतो आणि प्रेक्षकांना अभिवादन करतो खाली गादी आहे हे ठाऊक असूनसुद्धा मला नाही वाटत कोणी भारतीय नट इतक्या उंचावरून स्वतःला झोकून द्यायला तयार होईल. एका मराठी चित्रपटात हीरो बुडणाऱ्या नायिकेला वाचविण्यासाठी विहिरीत उडी मारतो असे दृश्य चित्रित करायचे होते. विहिरीत उडी मारणे तर दूरच राहिलं, कडेला कमरेइतक्या पाण्यात पायरीवर उभं राहायलासुद्धा तो हीरो तयार होईना. घोड्यावर बसायचे सीन असले म्हणजे, 'हिंदवी स्वराज्यासाठी माझ्या शरिरातला रक्ताचा शेवटचा थेंब संपेपर्यंत मी ही तलवार खाली ठेवणार नाही' असे एरव्ही ओजस्वी डॉयलॉग म्हणणारा नट, अक्षरशः 'शेपूट' घालतो. मारामारीचे सीन्स घ्यायचे असले की, त्यांच्या 'डमीज्' वापराव्या लागतात. हॉलीवुडचा तो स्टंटसीन पाहताना मला आपल्याकडचे 'शौर्य' आठवले.

हॉलीवुडला चित्रीकरणासाठी येणाऱ्या नटनट्यांची राहण्याची आलिशान अशी व्यवस्था केली जाते. मी मुद्दाम चौकशी केली की, 'चित्रीकरणासाठी येणाऱ्या नटचा आपल्या आयावहिणी, काक्या, माम्या, आत्या, वडील

यांच्यासमवेत येतात की एकट्याच ?' तर समजले त्या एकट्याच येतात. आपल्याकडे निर्मात्यांना याबाबतीत विचारा! माझे ना माझ्या बापाचे म्हणून नातेवाईकांना चित्रीकरणासाठी घेऊन येणाऱ्या नट्यांची–महाराष्ट्रीय आणि हिंदी नट्यांची – परंपरा फार मोठी आहे. म्हणे, त्यांना 'आधार' म्हणून घरचं वडिलधारं माणूस शूटिंगच्यावेळी त्यांच्यासोबत असतं. हा चक्क बक्वास आहे. उलट घरची जास्त माणसं घेऊन वावरणारी नटीच अधिक लफडेबाज असते. असो.

हॉलीवूड पाहताना वाटलं, इथं साक्षात आनंदयात्राच फुलली आहे. लहानांप्रमाणेच मोठेही त्या आनंदयात्रेत सहभागी झाले होते. चित्रीकरणातले वारकात्रे अगदी उघडपणे प्रवाशांना दाखवण्याचा युनिव्हर्सल स्टुडिओचा उपक्रम अत्यंत स्तुत्य असा होता. शिवाय चित्रपट–निर्मिती ही जास्तीत जास्त वास्तववादी करण्याची त्यांची पराकाष्ठा कौतुकास्पद वाटली.

हॉलीवूडच्या प्रवेशद्वाराजवळ भलंमोठं चायनीज हॉटेल लवकरच सुरू होणार होतं पिवळ्या छपरांची ती प्रचंड वास्तु अतिशय देखणी दिसत होती. चीन आणि अमेरिका, पृथ्वीच्या पाठीवर दोन भिन्न टोकांना असलेल्या या देशांत अलीकडे भलतंच सामंजस्य निर्माण होऊ पाहात आहे, याचं कारण आहे रशिया! रशिया आणि चीन यांच्या संबंधात बिघाड निर्माण झाल्यामुळे यांकीज्‌ना पेकींगविषयी भलताच जिव्हाळा वाटू लागला आहे. चिनी लोकांना अमेरिकेत येऊन स्थाईक होण्यासाठी फारसे निर्बंध लादले जात नाहीत, ते याच कारणामुळे.

हॉलीवुडवरून लॉस एंजेलीसला पाऊण तासातच पोहोचलो. रविवारचा दिवस होता. संध्या व उदय घरीच होते. या खेपेला मात्र आम्ही त्यांच्याकडे दोन दिवस राहणार होतो. ला वेगास आणि ग्रँड कॅनियनबद्दल खूप वेळ बोलत बसलो. आठ दिवसांत उदयरावांनी स्वावलंबनानं बांधलेल्या बेडरूममध्ये बरीच प्रगती केली होती.

चर्चा करताना उमेश संध्याला म्हणाले, 'ताई, मला हेग इथल्या इंटरनॅशनल अकॅडेमीत सेमिनारसाठी हजर राहण्याचं निमंत्रण आलं आहे. पण माझ्याजवळ नेदर्लंडस्‌चा मल्टीपल व्हिसा नाही. त्यामुळं न्यूजर्सीला लवकरात लवकर जाऊन तेथून न्यूयॉर्कच्या नेदर्लंडस्‌च्या कॉन्सुलेट

जनरलच्या ऑफिसातून मला हवा तो नेदर्लंडस्चा व्हिसा मिळवायला हवा.'

'मग त्यासाठी न्यूयॉर्कला कशाला जायला हवं? येथे नेदरलँडस् कॉन्सुलेटची ब्रँच आहेच, त्यांच्याकडूनही तुम्हाला व्हिसा मिळू शकेल!'

'ओ. के. तुम्ही म्हणता त्याप्रमाणं मी येथेच प्रयत्न करून पाहतो.'

संध्यानं लागलीच नेदरलँडस्च्या कॉन्सुलेट जनरलचा फोन डिरेक्टरीतून शोधून काढला अन् ती उमेशना म्हणाली, 'आज रविवार असल्यानं तिथं कोणी असणार नाही. तुम्ही उद्या सकाळी साडेनऊला फोन करा अन् तुमची अडचण सांगा!'

'ओ केऽऽऽ!'

सॅनडिएगोला जाताना आम्हाला संध्याकडं फारवेळ थांबता आलेलं नव्हतं. म्हणून त्या रात्री संध्या अन् उदयरावांनी आम्हाला पार्टी द्यायचं ठरवून ठेवलं होतं. आत संध्या आणि माई कोंबडीचा रस्सा बनवण्यात आणि अखंड चर्चासत्रात गुंतल्या होत्या. उदयराव मला काहीसे हळुवार आवाजात म्हणाले.

'बाबासाहेब, आपल्याला ड्रिंक्स चालतं ना?'

मी हसून म्हणालो, 'सर्व काही चालतं. पण हवंच असं काही नाही!'

'मग मी तुमच्यासाठी एक ड्रिंक बनवून देतो. आपण ट्राय करा. हे मेक्सिकन ड्रिंक आहे. याला म्हणतात तकीला'

'ओ केऽऽऽ!'

'ओ केऽऽऽ' हा शब्द अमेरिकेत पदोपदी उच्चारला जातो. अमेरिकेत दिवसातून शे-दोनशेवेळा प्रत्येक नागरिक हा शब्द उच्चारीत असतो. ज्योती फोनवर बोलताना 'ओ केऽऽऽ' हा शब्द क्षणाक्षणाला उच्चारते. सुरेश काही सांगायचं झाले तर, 'ओ केऽऽ' शिवाय बोलूच शकत नाहीत. मी सहज सकाळी फिरायला जायला रस्ता चांगला कुठला आहे असं जेव्हा सुरेशरावांना विचारलं तेव्हा ते म्हणाले होते, 'यू गो स्ट्रेट, ओ केऽऽ. देन यू टर्न लेफ्ट. ओ केऽऽ. देन गो हाफ अ फर्लांग स्ट्रेट, ओ केऽऽ. देन यू टर्न राईट, ओकेऽऽ. देन यू कम ॲक्रॉस ए स्मॉल लेक, ओकेऽऽऽ.'

मीही शेवटी गमतीनं म्हणालो, 'ओकेऽऽऽ ओकेऽऽ ओकेऽऽ'

उदयरावांनी बनवलेले ते ड्रिंक तकीला अतिशय सुरेख होते. मागच्या हिरवळीवर सतरंजी टाकून मी त्या मद्याचे घुटके घेत आकाशाकडे पाहात पडून होतो. लॉस एंजेलीस विमानतळाकडं जाणाऱ्या विमानांचा हवाई मार्ग उदयरावांच्या घरावरून गेलेला होता. त्यामुळं लाल दिव्यांची उघडझाप करणारी विमानं डोक्यावरून जाताना दिसायची.

' उदयराव, हे गाव इतकं अफाट कशानं वाढलंय् ?' मी विचारलं.

' इथं हवा अमेरिकेतल्या इतर भागापेक्षा समशीतोष्ण असते. म्हणून बरेच लोक इथं येऊन स्थाईक होतात !'

' पण न्यूयॉर्क अन् शिकागोसारख्या इथं उंच इमारती कशा काय नाहीत ?'

' कारण इथं अधून–मधून ' अर्थ ट्रेमर्स ' होतात !'

' काय म्हणता ? इथंही धरणीकंप होतात ?'

' हो. म्हणून हे शहर आडवं पसरलंय्, आणि ही घरंसुद्धा प्लायवूडचाच वापर करून बांधली जातात हे पाहिलं असेल तुम्ही !'

' हो, अमेरिकेच्या बहुसंख्य घरांना लाकूडच का वापरलं जातं, याचं कारण समजलं. तशी दगड अन् विटांची काही घरं न्यूजर्सीला बघितलीत मी !'

' हां. तो न्यूयॉर्कच्या आसपासचा भाग तसा ' स्टेबल ' आहे. '

' पण काय हो उदयराव, तुम्हाला करमतं या देशात ?'

' कधी कधी फारच विषण्ण वाटतं. इथं खूप पैसे मिळतात. जीवनावश्यक वस्तू स्वस्त आणि उत्तम प्रतीच्या असतात; पण ही सर्व सुखं पायाशी लोळण घेत असली तरी, मन निराश होतं कधीकधी ! तिकडची माणसं आली की, बरं वाटतं !'

' तुम्ही कायम अमेरिकेत स्थाईक होणार नाही तर ?'

' निश्चितच नाही ! हा लाभलेला मानवजन्म केवळ पैसा कमवण्यात घालवणं याला काय अर्थ आहे ?'

उदयरावांच्या घरात विवेकानंदांची पुस्तकं बघितल्याबरोबरच मला ही शंका आली होती. आता चर्चेच्यावेळी त्यांनी स्पष्टच सांगून टाकलं.

प्रत्येक सुजाण व्यक्तीला आपलं जीवनमान सुधारावं, आर्थिक स्थैर्य

प्राप्त व्हावं असं जरूर वाटतं, पण उच्च जीवनमान आणि आर्थिक स्थैर्य या गोष्टी सुखी जीवन प्रदान करू शकत नाहीत.

बराच वेळ उदयराव माझ्याशी बोलत राहिले. त्यांच्या बोलण्यातून मला जाणवला तो त्यांचा अध्यात्मिक पिंड. गेली आठ वर्षे अमेरिकेत वास्तव्य करूनही उदयरावांना मातृभूमीची ओढ कधीकधी अनावर होते.

दुसऱ्या दिवशी सकाळी उमेशरावांनी नेदरलँडस्च्या कॉन्सुलेट-जनरलला फोन केला. ती बाई होती. ती म्हणाली, ' प्लीज कमडाऊन वुईथ युवर अ‍ॅडमिशन लेटर ! '

साठ मैल लांब-रुंद पसरलेल्या या अवाढव्य शहरात बस वाहतूक होती. पण कोणकोणत्या मार्गानं तिथं पोहोचायचं हे ठाऊक नसल्यानं आम्ही टॅक्सी मागवली. टॅक्सीला फोन करताच दहा मिनिटांतच टॅक्सी दाराशी आली. उमेशनी नेदर्लंडसच्या कॉन्सुलेटचा पत्ता लिहून टॅक्सी ड्रायव्हरच्या हाती दिला. त्यानं गाडीतल्या वायरलेसवरून त्याच्या हेड ऑफिसला तो पत्ता वाचून दाखवला. हेड ऑफिसनं पटापट त्याला तिथं पोहोचण्याचा मार्ग सांगितला. ' टेक सिक्स्टी टू फर्स्ट. देन जॉईन थर्टी वन् फ्रॉम थर्टीवन् यू टेक नाईन्टीनाईन...... '

हेड ऑफिसमधला माणूस सांगत होता अन टॅक्सीवाला पटापट रस्त्यांचे नंबर टिपून घेत होता. अर्ध्या-पाऊण तासात त्यानं आम्हाला एका इमारतीसमोर आणून उभं केलं. इमारतीवर नंबर होता 3460. हा कोल्हापुरातील आमचा फोनचा नंबर. तो पाहून मी उमेशना म्हणालो, ' बहुदा तुमचं काम होणार. हा आपला लकी नंबर आहे. ' अन नेमकं तेच झालं. नेदर्लंडसच्या असिस्टंट कान्सुलेट-जनरल बाईंनी उमेशना हॉलंडला जाण्याचा व्हिसा तात्काळ देऊन टाकला. तेथून खाली आलो. उमेश म्हणाले, ' आबा, एक फार मोठं काम झालं. मला हेगला जायला मिळतं की नाही याबद्दल मी साशंक होतो. '

' इतकी धडपड केल्याचं सार्थक झालं ! ' मी म्हणालो.

' आता आपण लॉस एंजेलीसच्या बीचकडं जाऊ. ' माईंनी सूचना केली.

बसने लॉस एंजेलीसच्या समुद्रकिनाऱ्यावर पोहोचायला दीड तास लागला.

सोमवार असूनही बीचवर गर्दी होती. बीचजवळ पोहोचलो तेव्हा ऊन रणरणत होतं. लाल रंगाचं एक हेलिकॉप्टर अगदी खालून उडत गेलं. बहुदा लॉस एंजेलीस शहराचं दर्शन घडवणारं ते हेलिकॉप्टर असावं.

लंचची वेळ झाली होती. बीचवर एक सी–फूडचं अगदी नावीन्यपूर्ण असं हॉटेल होतं. लॉब्स्टर्स, प्रॉन्स, भिन्न प्रकारचे जिवंत मासे पाण्यात, काचेत होते–अॅक्वेरियममध्ये ठेवतात तसे. गिऱ्हाईकानं त्यातला कोणता लॉबस्टर किंवा मासा आपल्याला हवा ते दाखवायचं. लगेच दुकानदार त्यातला तो जिवंत मासा किंवा लॉब्स्टर काढून कुककडे देतो आणि आपण ऑर्डर दिल्याप्रमाणे दहा मिनिटांतच तो मासा बनवून आपल्यापुढं आणून ठेवतात. पण हा प्रकार आमच्यापैकी कोणालाही पसंत पडण्यासारखा नव्हता. आम्ही मासे आवडीने खात असलो तरी, पाण्यांत जिवंत असलेला मासा उचलून घेताना होणारी त्याची ती तडफड पाहवत नाही. मला काही मित्र म्हणतात, ‘You are a bundle of contradiction.’ काही अंशी ते सत्य आहे. मी शिकार करतो. शिकारीचं मटण अतिशय आवडीने खातो. पण माझ्यासमोर एखाद्यानं कोंबडा कापला तर मला ते कोंबडयाचं मटण खावंसं वाटत नाही ! एकदा वार्शीत असताना मित्राने माझ्यासाठी जिवंत तितर पाठवले. तितराइतका चविष्ट पक्षी शोधून सापडणार नाही. पण मी ते चार तितर गावाबाहेर झुडपात सोडून आलो. कित्येक वेळा जंगलातला एक तितर मारण्यासाठी चार-चार तास भटकलो आहे. मृगया आणि कत्तल यात कितीतरी फरक आहे.

आम्ही दुसऱ्याच एका कॅफेमध्ये जाऊन खाद्यपदार्थ घेतले शिकागोप्रमाणे इथेही लॉस एंजेलीसला निग्रो गुन्हेगारांचं प्रमाण जास्त आहे. बीचवरून परत जाताना पोलिसांनी तीन निग्रो पोरांना पकडून ठेवलं होतं. त्यांनी लहान मुलांची एक सायकल चोरून आणली होती. पोलीस त्यांना त्यांच्या साथीदारांची नावे विचारीत होते अन् ती १५–१६ वर्षांची अट्टल गुन्हेगार पोरं चक्क कानावर हात ठेवत होती. या लॉस एंजेलीसच्या बीचवर हशीश, मॅरीज्युआना, एल. एस्. डी. अशा मादक पदार्थांचा व्यापार मोठ्या प्रमाणावर चालतो. बीचवरून रस्त्यावर यायला एक पूल होता. त्या पुलावरून येत असताना निग्रो पोरं बिअरचे मोकळे टीन वरून खाली फेकत.

मोठ्याने गाणी म्हणत, उर्मटपणानं वडबडत चालली होती. जिथं जिथं अमेरिकेत निग्रो भेटले, तिथं तिथं मला त्यांच्या स्वभावातला असभ्यपणाच जाणवला.

रस्त्यावर आलो तेव्हा, भयंकर तहान लागली होती. रस्त्यालगत एक नळ होता. चक्क हातांची ओंजळ धरून पाणी प्यालो. उमेश जवळच्या दुकानात जाऊन टॅक्सीसाठी फोन करून आले. पाच मिनिटात टॅक्सी आली. ती टॅक्सी चालवणारी बाई होती. हसून तिनं आमचं स्वागत केलं अन् म्हणाली,

‘ यू आर फ्रॉम इंडिया ?’

‘ या ऽ ऽ ऽ ’

‘ ओ के ऽ ऽ ऽ व्हेअर टू गो ?

उमेशनी पत्ता सांगितला. बाईने लगेच तिच्या हेडऑफिसशी वायरलेसनं संपर्क साधून मार्ग विचारला. जाता जाता ती भारताबद्दल माहिती विचारत होती. अमेरिकन लोक भारतातल्या दोनच व्यक्तींचा उल्लेख करतात. जवाहरलाल नेहरू आणि इंदिरा गांधी. कोणीही मोरारजी देसाई, जगजीवन राम बाबू, बाजपेयी इत्यादी भारतीय नेत्यांना ओळखत नाहीत. भारतातलं एकच शहर त्यांना ठाऊक असतं आणि ते म्हणजे ‘ बॉम्बे. ’ भारतातलं एकच ऐतिहासिक ठिकाण त्यांना माहीत आहे आणि ते म्हणजे ‘ ताजमहाल. ’ बस्सं ! संपलं. याव्यतिरिक्त त्यांना भारताबद्दल काहीही माहिती नाही. अधिक माहिती करून घेण्याची जिज्ञासाही दिसून आली नाही. मी त्या बाईला ‘ Proposed Tax Bill in United States ’ हा काय प्रकार आहे हे विचारलं. कारण **L. A. Times** आणि टेलीव्हिजनवर रोज त्या टॅक्सबिलाबाबत उल्लेख असे. त्या बाईने सांगितले की, ‘ रिगन सरकार म्हणते की, व्यापाऱ्यांना टॅक्समध्ये २५ टक्के सवलत द्यायची. त्यामुळे उत्पादन वाढेल; तर रिगनचे विरोधक म्हणतात की, व्यापाऱ्यांना फक्त १५ टक्के टॅक्समध्ये सूट द्यावी अन् तो प्रयोग फक्त तीन वर्षेच करून पाहावा. रोनाल्ड रिगन हा अतिशय हेडस्ट्राँग माणूस आहे, असंही तिच्या बोलण्यात आलं. बहुदा ती विरोधी पक्षाची असावी. तिनं असंही सांगितलं की, ‘ रिगन हा भांडवलवाल्यांना संरक्षण देणारा आहे. त्याला वाटतं उत्पादन वाढलं की

कामगारांचं उत्पन्नही वाढेल अन् अशा तऱ्हेनं सर्वसामान्य नागरिकाचं जीवनमान सुखावह होईल.'

टॅक्सी चालवणारी बाई देशातल्या राजकारणावर अधिकारवाणीनं बोलते आहे हे पाहूत मला आश्चर्य वाटत होतं. आपल्याकडं स्वत:ला सुशिक्षित म्हणवून घेणारे अनेक महाभाग असे आहेत की, त्यांना देशात चालू घडीला काय चालल आहे याची यत्किंचितही जाणीव नसते. मी परवा एका गृहस्थाला विचारलं, 'आसाममध्ये आंदोलन चाललं आहे ते कशासाठी?' त्यावर हे सद्‌गृहस्थ हवेत हात उडवून म्हणाले, 'काय बोंबाबोंब चाललीय समजत नाही बुवा!'

देशातल्या सद्य:स्थितीबद्दल सर्रास अनास्था! ज्यावेळी आपल्या गळ्याशी काय येईल, त्याच वेळी त्याचा विचार!

घरी आलो तेव्हा चार वाजले होते. घरासमोर एक सुरेख पालवी फुटलेलं झाड होतं. झाडांमधलं हिरवेपण अन् त्याचं आकर्षक होतं म्हणूनी आणि ब्रश घेऊन मी पेंटिंग करायला सुरुवात केली. चित्रकाराला केव्हा चित्र काढायची लहर येईल याचा नेम नाही. कवी आणि लेखकांचासुद्धा लहरीपणा मी अनेकवेळा अनुभवला आहे. कलावंत हा लहरी असतो हे फार वर्षांपूर्वी मला पटलेलं आहे. महंमद नावाचा एक सतारिया होता. मी हायस्कुलात असताना त्याच्याकडून सतार शिकत होतो एखाद्या दिवशी लहर आली की, तो तास–दीडतास एखादा राग वाजवून दाखवत असे. अन् माझ्याकडे कोणी मित्र किंवा पाहुणे आले अन् मी त्याला जरा सतार वाजवायची विनंती केली की, तो हट्टाला पेटल्यासारखा करी. बिलकूल वाजवत नसे. कधीकधी तो रणजीत देसायांच्याकडे कोवाडला जाऊन रहायचा. कधी माझ्याकडे वेळी–अवेळी येऊन 'भूक लागलीय, जेवायला काहीतरी द्या' असं म्हणायचा. कधी रुपया–दोन रुपयांची मागणी करायचा. मी त्याला एकदा म्हणालो, 'महंमदसाहेब, तुम्ही वक्तशीरपणे शिकवण्या केल्या, तर महिना हजार रुपये मिळवाल. असं अनियमित वागण्यानं तुमच्या कलेचं चीज नाही होत.'

'साहेब, मला कोणीही बदलू शकणार नाही. मी कोणाची बांधिलकी स्वीकारणार नाही!'

‘ तुमच्या हितासाठी म्हणून सांगतोय् !’

‘ हित–अहित करणारा अल्ला आहे.’

असा हा लहरी महंमद बरेच दिवस माझ्याकडं आला नाही म्हणून मी त्याची चौकशी केली तेव्हा कळलं, चिकोडीच्या स्टँडवर केव्हा मरून पडला होता कोणाला माहीत नव्हतं. बेवारस म्हणून प्रेताचा पंचनामा झाला अन् [illegible] मी माझी सतार बाहेर काढतो. बोटांवर नखी चढवून तारा छेडतो तेव्हा, तो लहरी महंमद डोळ्यांपुढं उभा राहतो.

त्या दिवशी मी भराभर दोन पेंटिंग्ज केली अन् ती उदयरावांच्या खोलीत लावली. संध्याकाळी संध्या ऑफिसवरून परतल्यावर तिने ते पेंटिंग बघितले अन् ‘ ओ ऽ ऽ ऽ बॉय ’ असं म्हणून त्या चित्राचं कौतुक केलं. आपल्या कलेचं कौतुक झाल्याचं समाधान काही और असतं. ते कलावंताशिवाय अन्य कोणाला समजायचं नाही. एखादं चांगलं पेंटिंग काढलं की, तो सारा दिवस आनंदात जातो. लाख रुपयांची प्राप्तीदेखील त्या आनंदाची बरोबरी करू शकणार नाही.

लॉस एंजेलीस एअरपोर्टवर आम्हाला निरोप देण्यासाठी संध्या व उदय आले होते. आम्ही लॉस एंजेलीसला पोहोचलो तेव्हाही रात्रीचे दहा वाजले होते अन् लॉस एंजेलीसचा निरोप घेत होतो तेव्हाही रात्रीचे दहा वाजायला आले होते.

संध्या अन् उदय दोघांनीही पुन्हा आपल्याकडे खूप दिवस रहायला या असे मागून आमचा निरोप घेतला. ज्या प्रकाशाच्या महासागरात आम्ही आकाशातून उतरलो होतो, त्याच प्रकाशाच्या महासागरातून अंधाराच्या अंतराळात विमानानं झेप घेतली.

येताना पुन्हा मिनिओपॉलीस विमानतळावर काही तास थांबलो. घड्याळं पुढेमागे करावी लागली. मिनिओपॉलीस सोडायच्या वेळेला पहाट झाली होती. नॉर्थ वेस्ट ओरिएंट कंपनी अमेरिकेतली प्रख्यात विमान कंपनी गणली जाते. प्रवाशांशी अत्यंत सौजन्यपूर्ण वागणूक करणारा त्यांचा तो हवाई कर्मचारी वर्ग कधीही विसरता येणार नाही.

मिनिओपॉलीसवरून ‘ नेवर्क ’ विमानतळावर उतरलो तेव्हा, अकरा वाजले होते. सुरेशरावांनी आम्हाला विमानतळावरून आणण्यासाठी आपला

अमेरिकन ड्रायव्हर गिलॉक याला पाठवले होते. हा गिलॉक म्हणजे एक घातच होतं. त्याची एकदा बडबड सुरू झाली की, थांबता थांबत नसे. पण अशा बडबड करणाऱ्या लोकांना योग्य तऱ्हेने हाताळले की, त्यांचे बोलणे 'बोअर' होत नाही मी विचारलं,

'अमेरिकन लोकांना शिकारीचां षोक असतो की नाही ?'

'वा ऽऽ मला स्वत:ला सुद्धा आहे तर! मी खूपच शिकार खेळलो आहे.'

'असं ? या भागात कोणते कोणते प्राणी मिळतात ?'

'त्याचं काय आहे, निरनिराळ्या सीझनला निरनिराळी शिकार खेळण्याचे लायसेन्स घ्यावे लागते. पण धनुष्यबाणानं शिकार खेळण्यावर तशा फार मर्यादा नाहीत !'

'ते कसं काय ?'

'धनुष्य–बाणाच्या शिकारीत प्राण्यांना संरक्षण फार असतं. एकतर बंदुकीप्रमाणे त्यांना खूप अंतरावरून टिपता येत नाही. दुसरं म्हणजे, बंदुकीइतकी अचूक निशाणबाजी बाणानं करता येत नाही. इथं काही प्रदेशात बाराही महिने धनुष्यबाणांनी शिकार खेळता येते. पण ठरावीकच प्राणी मारता येतात. या भागात सांबरांची देखील शिकार करता येते, पण 'फिमेल' ची शिकार करण्यावर बंदी आहे शिवाय प्राण्यांच्या ब्रीडिंग सीझनमध्ये शिकारीवर बंदी असते '

'इकडं फेजंटस् जास्त कुठे मिळतात ?'

'फेजंटस् ना ! नॉर्थ आणि साऊथ डकोटा स्टेटस्‌मध्ये लाखो फेजंटस् आहेत. अमेरिकेतले स्मॉल गेम्स् करणारे बहुतेक शिकारी सीझनला तिकडं जातात.'

'मला एकदा फेजंटस्‌ची शिकार पाहावी अशी खूप इच्छा होती.'

'मग थांबा, येत्या सीझनपर्यंत !'

'छे ऽऽऽ ! ते कसं काय शक्य आहे ? आता आठ दिवसांनी आम्ही अमेरिका सोडणार !'

'बस्स् ! इतक्यात कंटाळलात अमेरिकेला ?'

'नाही. नाही. मला कंटाळा मुळीच आलेला नाही. आमच्या चिरंजीवाना

हॉलंडला जायचं आहे सत्तावीस जुलैला. ते वाटेत लंडनला उतरतील. आम्ही भारताला परत जाऊ ! मि. गिलॉक्, तुम्ही दुसरी काही शिकार केली असेल ना ?'

बाकीच्या चर्चेत मला फारसा रस नव्हता म्हणून पुन्हा त्यांना शिकार या विषयात खेचण्याच्या हेतूनं मी विचारलं

' याऽऽऽ ! मी खूप स्टार्लिंग्ज मारले आहेत. मला स्टार्लिंग्ज फारच आवडतात. विशेषत: मिसेस् गिलॉकला स्टार्लिंग सूप फार आवडतं. ट्वेल्व्ह बोअर बंदुकीनं एका बारात जास्तीत जास्त म्हणजे एकोणचाळीस स्टार्लिंग्ज् मी पाडले आहेत. तुमच्या देशात येतात का स्टार्लिंग्ज ?'

' होऽऽऽ !'

' स्टार्लिंग्ज म्हणजे काय हो ?' माईंनी मध्येच मला विचारलं.

' अहो स्टार्लिंग्ज म्हणजे भोरड्या. हुरड्याच्या दिवसात आपल्याकडं येतात. तुम्हाला नाही आठवत ? जयसिंगपूरला असताना मी नवीन एअरगन् घेऊन आलो होतो अन् तेवीस भोरड्या मारून आणल्या. तुम्ही त्याचा पुलावा बनवलात त्या दिवशी !'

' होऽऽऽ आठवलं. पण आपल्याकडं असतात, तसल्याच भोरड्या असतात इकडं ?'

' का नाही असणार ? इकडंही धान्यं पिकतात, जंगली फळंही आहेत, शिवाय इथले लोक ठराविक सीझनलाच त्यांची शिकार करतात !'

बोलता बोलता मला बार्शीजवळच्या कोरेगाव तलावाजवळ भेटलेल्या म्हाताऱ्या गृहस्थाची आठवण आली. अडुसष्ठ साल, जानेवारीची पहिली तारीख होती. माई, उमेश अन् मी कोरेगावच्या तलावावर मुक्कामाला गेलो होतो. कोरेगावचा तलाव म्हणजे वैराण अशा बार्शी तालुक्यातले ' ओऍसिस्. ' जवळ जवळ प्रत्येक वीकएंडला माझा मुक्काम त्या तलावाकाठच्या बंगल्यात असे दिवसभर डोंगरघळीत फिरून थोडीफार शिकार करायची. तीन दगडांची चूल मांडून माई ती शिजवीत. तलावाकाठी बसून गप्पा मारत जेवायचं, अन् दुसऱ्या दिवशी कोरेगाव–बार्शी जाणाऱ्या एस. टी.ला परत जायचं, हा माझा तिथं असताना जवळ जवळ प्रत्येक आठवड्याचा कार्यक्रम होता. अडुसष्ठ सालची जानेवारीची

एक तारीख लक्षात राहण्याचं आणखीन एक कारण होतं. त्या दिवशी माईंनी बॅटरीच्या उजेडात दूरचा एक ससा पॉईंट टूटू नं अचूक टिपला होता. त्याच्या दुसऱ्या दिवशी जंगली बदक मारण्यासाठी मी बंदूक घेऊन फिरत होतो, त्यावेळी एक सत्तर वर्षांचा म्हातारा मला रामराम घालून म्हणाला,

'वकीलसायेब, गोरं लोक गेल्यापस्नं तुमी आनि भूमचं राजं तेवडं दोगंच येतासा बगा. न्हायतर ह्या तालुक्यातली सगळी मानसं दळिद्रीच म्हननासा !'

'अहो, त्यांना दरिद्री कशाला म्हणता ? त्यांना आवड नसते. बरं, तुम्ही गोऱ्या लोकांची शिकार बघितलीय् ?'

'तर काय वो ! तवा बगा तेंचंच राज हुतं. सोलापूरचं कलेकटर आन् डी. एस. पी. बी. तवा गोरंच असायचं. आपल्या मडमा आन् पोरं घिऊन ह्या बंगल्यावर इऊन राह्यचं, तळ्यातली उडती बदकं टिपायचं, सोताच जाऊन पान्यातनं काडायचं अन् भाईर आल्यावर बरांडी प्यायचं. मला बी कवा कवा घोटभर मिळायची ! वकील सायेब, खावं-प्यावं, मज्या करावी बगा गोऱ्या लोकांनीच् !'

या देशावर दीडशे वर्षं इंग्रजांनी राज्य केलं. शासनयंत्रणा कशी चालवावी याचंही त्यांनी आम्हाला शिक्षण दिलं. आमच्या देशात शाळा-कॉलेजं व दवाखाने बांधले. रेल्वे सुरू केल्या. अनेक सुधारणा केल्या. हा आमचा परकी राज्यकर्ता एक दिवस आमच्या हाती स्वातंत्र्य देऊन निघून गेला. आम्ही त्याचं आजही अनुकरण करतो, ते फक्त त्यांच्या वेशभूषेचं. सूट, बूट, टाय यांचंच ! गोऱ्या माणसासारखं अंग मोडून पाच दिवस कष्ट करावेत अन् दोन दिवस बायका-मुलांना सोबत घेऊन 'वीकएंडला' बाहेर पडावं हे किती लोकांना माहीत आहे ?

बोलता बोलता सक्कासन्नाच्या परिसरात गाडी केव्हा आली हे समजलं देखील नाही. ज्योतींनं आमचं स्वागत करून विचारलं, 'कसा काय झाला दौरा ?'

'उत्तम, संध्याकडं आणखीन थोडं राहायला हवं होतं. पण वेळच अपुरा पडला.'

खरंच !' बोलत बोलत आम्ही घरी आलो, तेव्हा ज्योती म्हणाली.

'माई, या दोघांना पुढं जाऊ द्या. तुम्ही आणखीन चार महिने आमच्याजवळ रहा !

टोनू आणि ढमू या दोघी माईच्याजवळ येत म्हणाल्या, 'आन्टी, आम्ही तुला नाही जाऊ देणार !'

ज्योतीच्या आदरातिथ्यावद्दल लिहावे तिवके थोडेच. असा सकाळचा चहा झाला की, लगेच येऊन विचारी, 'थोडा केक आणू ? ज्यूस घेता ? जेवायला वेळ होईल, तोवर थोडी बिस्किटं अन् कॉफी घेता ?' जेवण दुपारी झालं की, तीन वाजता परत कॉफी किंवा ज्यूस घेण्याचा ती आग्रह करी. संध्याकाळी गाडीतून फिरायला वाहेर पडलं की, माईच्यासाठी पिझ्झा घ्या किंवा हॅम बर्गर घ्या अशा तिच्या एकसारख्या सुरेशरावांना सूचना असत. आम्ही गंमतीनं तिला म्हणत असू, 'आम्हाला खायला घालून घालून आजारी पाडायचा विचार दिसतो !'

'कुठे काय खाता हो तुम्ही ? तुम्ही लोक काहीच खात नाही इथलं काही तुम्हाला आवडत नाही असं मला वाटतं.'

'पुरे का ? माईना जास्त कॅलरीज झाल्या आहेत. माझी एकही पँट पोटाला बसेना. उमेशच्या बुशशर्टाची वटनं बसेनाशी झाली आहेत, आणि म्हणे आम्ही काही खात नाही !'

जमजसे आम्ही निघायचे दिवस जवळ येऊ लागले, तशी आम्ही खरेदीला सुरुवात केली. अमेरिकेतल्या डिपार्टमेंटल स्टोअर्समध्ये गेल्यावर हे घेऊ, की ते घेऊ असं व्हायचं. हजारो प्रकारचे कपडे, बूट, खाद्यपदार्थ, वंदुका, फिशिंग रॉडस्. त्या दुकानात काय मिळालं नाही असं कधी होत नसे. 'सिअर्स'ची दुकानं अतिप्रचंड अशी आहेत.

दोन दिवसांनंतर रजनी केंदळेकडे 'वेस्ट नॅक' ला राहायला जायचे ठरले. रजनी ही माझ्या भाचीची मैत्रीण लग्न झाल्यापासून ती 'वेस्ट नॅक' ला राहते. तिचे मिस्टर श्री. केंदळे हे इंजिनियर आहेत. ते स्वतः आम्हाला न्यायला आले. पण ते येण्यापूर्वी सुरेशरावांनी आम्हाला घेऊन बोस्टनला जायचा कार्यक्रम निश्चित केला होता. आम्ही वेस्ट नॅकला केंदळेंच्याकडे दोनच दिवस मुक्काम करणार होतो तिसऱ्या दिवशी

संध्याकाळी चारच्या सुमारास सुरेश आणि ज्योती आम्हाला तिथं येऊन ' पिक अप् ' करणार होते अन् आम्ही सरळ बोस्टनला जाणार होतो.

बोस्टन हे अमेरिकेतलं ऐतिहासिक बंदर. याच बोस्टन बंदरात इथल्या स्थानिक लोकांनी इंग्रजांची चहाची खोकी असलेलं जहाज लुटलं अन् चहा समुद्रात फेकून दिला. जेन्किन्सन्च्या कानाचं युद्धही याच सुमारास झालं. ज्या ' मे फ्लॉवर ' नामक जहाजातून प्रथम इंग्रज अमेरिकेला आले ते १६२० साली. ते जहाज ऐतिहासिक वास्तू म्हणून त्याच स्थितीत ठेवण्यात आल्याचं समजलं होतं. शिवाय वॉशिंग्टनला गेलेल्या वेळी जॉन फिट्जेराल्ड केनेडी यांचीं दफनभूमी बघितली होती. त्याच जॉन केनेडींचा जन्म बोस्टनला झाला होता. त्याचं जन्मस्थानही बघायचं होतं. अमेरिकेत आजपर्यंत जे अध्यक्ष होऊन गेले, त्यांत अब्राहम लिंकन यांच्यानंतर तितकेच लोकप्रिय झालेले अध्यक्ष केनेडी. यांच्याबद्दल भारतियांच्या अंत:करणात नितांत आदरभाव आहे. केनेडी अन् नेहरू हे आणखीन काही काल राहिले असते तर, भारत अन् अमेरिका यांच्या संबंधात कदाचित दीर्घकालीन दृढ स्नेहभाव निर्माण झाला असता असे जाणकार मुत्सद्दीही मानतात.

श्री. केंदळे आम्हाला न्यायला आले. त्यांना प्रथमच भेटत होतो. ते बरेच बोलके होते. जाताना त्यांनी अमेरिकेची सामाजिक आणि आर्थिक स्थिती, विज्ञानातील प्रगती याबद्दल बरीच उपयुक्त अशी माहिती मला पुरवली.

मी त्यांना विचारलं, ' शेवटपर्यंत अमेरिकेतच वास्तव्य करावं असं वाटतं, की ' रिटायर्ड लाईफ ' इंडियात घालवावं असं वाटतं ?'

त्यावर ते स्मित करून म्हणाले, ' फार पुढचा विचार आज कशासाठी करायचा बाबासाहेब ? पुढचं पुढं पाहता येईल !'

' बरोबर आहे आपण म्हणता ते ! आम्हा भारतीयांना आजपेक्षा उद्याचीच चिंता अधिक; त्याहूनही या जन्मापेक्षा पुढील जन्माचीच चिंता अधिक ! आमच्या सर्व साधुसंतांनी हीच विवंचना आम्हाला लावून सोडली आहे. मातेच्या गर्भात अनन्वित यातना सोसाव्या लागतात म्हणून जन्ममृत्यूच्या फेऱ्यातून वाचण्यासाठी पुन्हा मानवजन्म न लाभावा यासाठी, या जन्मी सतत खटाटोप करण्याचा सल्ला साधुसंत देत आले आहेत. पुनर्जन्म असतो की नसतो, कुणास ठाऊक ! पण तो न लाभावा किंवा लाभला तर तो

सुखाचा असावा यासाठी या आयुष्याचा बहुमोल असा वेळ भजनपूजनांत घालवण्याचा सल्ला आम्हाला साधुसंतांनीच दिला. अगदी अलीकडच्या काळात आमच्यावर सहिष्णुतेचे तत्त्वज्ञान लादले गेले आणि आमचे राष्ट्र दुर्बल बनवले. युरोप आणि अमेरिकेची सुबुद्ध जनता, तिथला सुदृढ आणि प्रगतीशील नागरिक पाहून आम्हाला आमचीच कीव येते.

केंदळे माझ्या विचारांशी सहमत होते. मी त्यांना अमेरिकेने वेळोवेळी भारताबद्दल स्वीकारलेल्या परराष्ट्रीय धोरणाचा उल्लेख करून म्हणालो, ' निक्सन, फोर्ड आणि आताचे रिगन या पैकी कोणीही अध्यक्षानं भारताबद्दल आस्था दाखवली नाही. उलट भारताला उपद्रव देणाऱ्या राष्ट्रांनाच यांची सहानुभूती असते, असं का ?'

' कारण उघड आहे. तुम्ही उघडपणे रशियाची भलावण करता, आणि गरज भासली की, अमेरिकेकडे हात पसरता, हे असं किती काळ चालणार ? तुम्हाला हे ' नॉन अलाईनमेंट 'चं धोरण दीर्घकाल उराशी बाळगून नाही भागणार !'

' अहो, पण या दोन तुल्यबळ अशा राष्ट्रांच्या झगड्यात आमचं अद्यापही अप्रगत असलेलं राष्ट्र उगाच होरपळून निघेल ना ?'

' तुम्ही तटस्थ राहिलात अन् समजा तिसरं महायुद्ध झालं, तर तुम्हाला झळ ही पोहचणारच !'

' पण तिसरं महायुद्ध होणार नाही अशी माझी खात्री आहे. अन् जर झालंच, तर पृथ्वीतलावरचं एकही राष्ट्र झळ पोहोचल्याविना राहणार नाही !

चीन आणि रशिया यांच संबंध बिघडले आहेत. चीनशी अमेरिकेचे ' गुफ्तगू ' सुरू आहे. तिकडे व्हिएतनाममध्ये झगडा तात्पुरता थांबला आहे. युद्धाची ठिणगी पडताच तिथंही पेट घेईल. अरब–इस्रायल तंटा मिटण्याची लक्षणं नाहीत, तोवर पोलंड धुमसू लागला आहे. ही आंतरराष्ट्रीय परिस्थिती विचारात घेतली तर, तिसऱ्या महायुद्धाची जर ठिणगी पडली, तर जगातल्या इतर राष्ट्रांत गेली कित्येक वर्षे धुमसणारा हा मतभेदांचा क्षोभ पेट घेतल्याविना राहणार नाही.'

' यू आर राईट ! पण म्युच्युअल डिस्ट्रक्शनला घाबरून रशिया आणि

अमेरिका आपल्या भूमीत कधीच युद्ध खेळणार नाहीत हेही तितकंच खरं आहे.'

वेस्ट नॅकला फोर्थ ब्रुकडेल कोर्ट इथं गाडी आली अन् टोलेजंग अशा घरासमोर वाट पहात असलेली रजनी आमच्या स्वागताला पुढं आली. तिचा छोटा मुलगा अमर आपल्या छोटया अमेरिकन् मित्रांसमवेत खेळण्यात दंग होता.

माझ्या भाचीची – सुमाची – ही लाजरी-बुजरी मैत्रीण रजनी. हिच्यात आमूलाग्र बदल झाला होता. आपली माणसं पाहून तिचे डोळे भरून आले होते.

केंदळे हे सुद्धा इतर अमेरिकन् नागरिकांच्याप्रमाणं आपल्या घरच्या कामात पत्नीला सदैव मदत करीत होते. घरी नोकर–चाकर असणे हे अमेरिकेत अभावानेच आढळते. केवळ 'मल्टिमिलिओनर' लोकच घरात नोकर ठेवू शकतात. मध्यमवर्गात घरी नोकर असणे हा प्रकार दुर्मिळ !

अमर हा त्यांचा छोटा मुलगा. मराठीत बोल असा अट्टाहास केला तरी बोलत नाही. चार–दोन शब्द मराठीत बोलतो आणि एकदम अमेरिकन् मुलासारखा बोलू लागतो. त्याच्या आईबापांचा एकसारखं त्यानं मराठीत बोलावं असा आग्रह असतो.

रात्री ड्रिंक्स घेता घेता केंदळेनी आम्हाला त्यांनी घेतलेल्या ट्रान्स्परन्सीज पडद्यावर दाखवल्या. वीकएंडला निरनिराळ्या ठिकाणी त्यांनी रजनीचे घेतलेले फोटो आकर्षक होते. लग्नानंतर ते हनिमूनला गेले होते. त्यानंतर एके ठिकाणी रजनीचा स्विमिंगसूटमधला फोटो पाहून छोटया अमरनं आपल्या डॅडींना विचारलं,

'ममी, व्हाय आयम् नॉट इन् द फोटोग्राफ ?'

त्यावर रजनी हसून म्हणाली, 'यू वेअर नॉट बॉर्न !'

'देन, व्हेअर वॉज मीऽऽऽ ?'

त्यावर श्री. केंदळे म्हणाले, 'यू वेअर इन युवर ममीज् टमी ! अमर, प्लीज कीप क्वाएट !'

पण अमरची बडबड चालूच होती. त्याचे प्रश्न ऐकून हसू येत होतं. पुढं त्यांच्या लग्नाचा एक फोटो स्लाईडवर पाहताना तो जाम चिडला अन् म्हणाला, 'आयम् नॉट गोईंग टू टॉक ! व्हाय आयम् नॉट इन् धिस्

फोटोग्राफ टू ऽऽ ममी ऽऽ ?'

लग्नाच्या फोटोत अमर कसा असू शकेल ? पण त्या बालकाचे समाधान करणारे उत्तर द्यायचे कसे ? एवढे मोठे बुद्धिमान इंजिनियर केंदळे, पण तेसुद्धा त्या जिज्ञासू बालकासमोर अवाक् झाले. ते अधून-मधून विषयांतर करीत होते.

'वेस्ट नॅक' रमणीय अशा झाडीत वसलेलं आहे. केंदळेंच्या घरामागे दाट जंगल होतं पुढून छोटा ओढा वहात होता. बाजूला रस्त्यावर एक उंच झाड होतं झाडाच्या शेंड्यावर कसलासा पक्षी जोरजोरात शीळ घालत होता. बंदुकीला बसवण्यासाठी घेतलेल्या टेलेस्कोपनं मी तो पाहात होतो. छातीवर लाल पिसं आणि पंख गडद निळ्या रंगाचे असा तो इवलासा पक्षी अतिशय मोहक दिसत होता. इथंही आकाशात एक विमान एकसारखं घिरट्या घालत होतं.

दुसऱ्या दिवशी ठरल्याप्रमाणं सुरेश आणि ज्योती बोस्टनला जाण्यासाठी आम्हाला न्यायला आले. आम्ही फक्त दोनच दिवस राहिलो म्हणून रजनी नाराज झाली होती. आम्हाला मोटारीपर्यंत निरोप द्यायला आली तेव्हा, तिचे डोळे पाण्याने डबडबले होते. माईंना तिची समजूत करता करता पुरेवाट झाली. अमेरिकेत ज्या ज्या ठिकाणी गेलो, तेथून निघताना हाच प्रकार घडला होता. सॅनडिएगोला तेच घडले, लॉस एंजेलिसलासुद्धा त्याच प्रसंगाची पुनरावृत्ती झाली अन् शेवटी आम्ही अमेरिकेचा निरोप घेतेवेळी न्यूयॉर्कला ज्योतीसुद्धा अतिभावनाविवश झाली होती.

रजनीचा निरोप घेऊन आम्ही बोस्टनच्या रोखानं निघालो तेव्हा, दिवस मावळला होता. बोस्टनला एका टप्प्यात जाणं शक्य नव्हतं, म्हणून वाटेत हॉटेलात एक मुक्काम करायचा असं आम्ही ठरवलं होतं.

सुरेशरावांनी स्टेशनवॅगन आणली होती. मुक्कामाचं सारं 'कीट' सोबत होतं. मागच्या हौद्यात टोनू आणि ढमू त्यांच्या बाहुल्यांसहित बसल्या होत्या. या दोन चिमुकल्या पोरी बाहेर मार्केटिंगला जरी जायचं झालं, तरी आपल्या बाहुल्या, खेळातील कुत्री, मांजरं सारं काही आपल्या सोबत घ्यायच्या. आपल्या अपरोक्ष त्यांची घरी देखभाल कोण करणार याची त्यांना सदैव विवंचना असायची. पण त्या दोघी आपसांत भांडल्या नाहीत

अशी पाच–दहा मिनिटंसुद्धा जायची नाहीत, अन् भांडण झालं होतं हे दुसऱ्याच क्षणी विसरूनही जायच्या. मागच्या हौद्यातून आमच्या अंगावरून पुढे ड्रायव्हिंग करणाऱ्या वडिलांच्याजवळ जाणे आणि लगेच तसाच मागे उलट प्रवास असा प्रकार एकसारखा घडत होता

दिव्याच्या उजेडात रस्त्यावरचे बोर्ड स्पष्ट दिसत होते. फ्लोरोसेंटसारखी ती अक्षरं दिव्याच्या प्रकाशात चमकत.

साऱ्या अमेरिकेत दिवस अन् रात्र अशी एकसारखी वाहतूक सुरू असते. दिवसा वाहनं ज्या गतीनं धावतात तीच गती रात्रीही !

बोस्टनला सधन लोकांचा बराच भरणा आहे. हे लोक 'स्टॉक एक्स्चेंज' चा व्यवसाय करतात तो न्यूयॉर्कला, राहतात मात्र बोस्टनला. बोस्टनवरून रोज सकाळी विमानानं न्यूयॉर्कला जायचं अन् संध्याकाळी बोस्टनला परत यायचं न्यूयॉर्क ते बोस्टन हे हवाई अंतर बरोबर दोनशे मैलांचं आहे. अशी स्वत:ची विमानं असणारी बोस्टनला शे–पाचशे माणसं आहेत. वर्षानुवर्षे त्यांचा हा हवाई प्रवास सुरू असतो हिवाळ्यात जेव्हा अतिहिमवृष्टी होते, तेव्हा न्यूयॉर्कला मुक्काम टाकतात. रोज स्वत:च्या विमानानं चारशे मैल प्रवास करणाऱ्या व्यापाऱ्यांचं रोजचं उत्पन्न किती हजार डॉलर्स असेल याची आपण सर्वसामान्य माणस कल्पनाच करू शकत नाही.

मोटारीच्या दिव्यांच्या प्रकाशझोतात बोस्टन अद्याप नव्वद मैल दूर असल्याची पाटी वाचली अन् सुरेशराव म्हणाले, 'साडेदहा वाजायला आले. आता आपण डिनर घेऊ आणि मिळेल त्या लॉजवर मुक्काम करू !' पण जेवणासाठी रस्त्यावर योग्य असं हॉटेल काही आढळेना, म्हणून एका रेस्ट एरियाजवळ थांबलेल्या एका वाहनचालकाला सुरेशरावांनी गाडी थांबवून विचारलं,

'इथं जवळपास जेवणासाठी एखादं चांगलं हॉटेल आहे का ?'

'होऽऽऽ ! इथून पुढे एक मैल–दीड मैल सरळ जा, तेथून उजव्या हाताने फुटणाऱ्या रस्त्याने गेलात की समुद्रकिनाऱ्यावर प्रचंड हॉटेल आहे. त्याचं नाव आहे 'हंड्रेड एकर्स.' पण तिथं फक्त सी-फूड मिळतं.'

सुरेशराव मूळचे देवगडचे. त्यांना मासे आवडणारच. पण आमच्या माईचा अन् कोकणचा काहीएक संबंध नसतानासुद्धा, त्यांना माश्याइतकं काहीच

प्रिय नाही. माशाचे एकाहून एक असे सरस पदार्थ बनवण्यात त्यांचा हात धरणारी आमच्या नात्यागोत्यांत, मित्रमंडळींच्या घरी एकही गृहिणी मला आढळलेली नाही प्रॉन्स करी, प्रॉन्स पुलावा, चाऊमेन वुईथ प्रॉन्सपासून ते अगदी वांगड्यांचं कोकणी पद्धतीचं कालवण करण्यापर्यंत सारे प्रकार अधून-मधून आमच्या घरी बनतात.

तेव्हा 'हंड्रेड एकर्स' मध्ये फक्त 'सी-फूड' मिळतं म्हटल्यावर, सुरेशरावांच्याप्रमाणं माईही खूश झाल्या. गाडी दोन-तीन वळणं घेऊन 'हंड्रेड एकर्स' समोर येऊन उभी राहिली, पण गाडी पार्क करायला एकही जागा शिल्लक नव्हती. इतक्यात पावसाची बारीक बुरबूर सुरू झाली. रात्रीची वेळ असल्याकारणानं आकाश केव्हा भरून आलं होतं याचा पत्ताच लागला नव्हता. हॉटेलसमोर पार्क केलेल्या गाड्यांपैकी एखादी गाडी निघून गेल्याशिवाय आमची गाडी पार्क करणं शक्यच नव्हतं. समोरच्या काचेतून पावसाचे तुषार दाट धुक्यासारखे दिसू लागले. हवेतही किंचित गारवा होता.

इतक्यात एक सद्गृहस्थ पार्क केलेली गाडी घेऊन गेला अन् लागलीच सुरेशरावांनी आमची स्टेशनवॅगन त्याच्या मोकळ्या झालेल्या जागेवर नेऊन पार्क केली.

त्या प्रचंड हॉटेलच्या प्रवेशद्वाराशी खलाशासारखी दाढी वाढवलेला गलेलठ्ठ असा आंधळा ऑर्गन वाजवत जोरजोरानं एक दर्यावर्दी गीत गात होता त्या गीताच्या सुरांनी हॉटेलचे आवार भरून गेले होते वेट्रेसनं आम्हाला मोकळ्या झालेल्या टेबलाजवळ आणून सोडलं. टोनू आणि ढमू या दोघींना खुर्चीवर बसून जेवता येणं अशक्य होतं म्हणून वेट्रेसनं न सांगता त्यांच्यासाठी दोन छोट्या खुर्च्या आणल्या अन् त्या टेबलाजवळच्या खुर्चीवर बसत्या केल्या. हॉटेलात येणाऱ्या लहान मुलांसाठी अमेरिकेतल्या बहुतेक सर्वच हॉटेलसमध्ये अशी व्यवस्था असते. तिथं लहान मुलांची देखभाल काटेकोर रीतीनं केली जाते त्यासाठी स्कूलबसचं उदाहरण पाहण्यासारखं आहे. जर रस्त्याकडेला स्कूलबस उभी राहिली, तर इतर वाहनांना ती स्कूलबस चालू लागल्याशिवाय पुढं जायची मनाई आहे. असा कोणी जर थांबलेल्या स्कूलबसला ओव्हरटेक करून जाण्याचा प्रयत्न करील, तर त्याला कोर्टात खेचले जाते. त्याला जबर दंड ठोठावला जातो अन् वर

त्याचं लायसेन्स काही काळासाठी रद्द केले जाते. स्कूलबस थांबल्यानंतर लहान मुलं आडवी–तिडवी पळतात म्हणून कायद्यानं हा अतिशय कडक असा दंडक घालून ठेवलेला आहे. युरोपमध्ये ल्यूसर्नला त्या लहान मुलाचा अपघात झाला त्यावेळची पोलीस आणि मेडिकल खात्यातले लोक किती तत्परतेनं कामं करतात हे पाहिलं होतं. स्टेटस्‌मध्येसुद्धा लहान मुलांच्या बाबतीत कोणताही हलगर्जीपणा केला जात नाही याचं कौतुक वाटलं.

सुरेशरावांनी प्रथम वाईनची ऑर्डर दिली मी माईच्या हातातलं मेनूकार्ड न्याहाळून ते पाहात म्हणालो,

‘ बाहेर लॉब्स्टरचं भलंमोठं चित्र काढलेलं आहे. मी लॉब्स्टर घेणार. तुम्हा लोकांना काय घ्यायचं ते घ्या. ’

माई आणि ज्योतीनं प्रॉन्स मागवले. उमेशरावांनी फिश मागवला. मी मात्र फ्राईड, लॉब्स्टर मागवला. एका चिनीमातीच्या, अरुंद गळ्याच्या बरणीतून वेट्रेसने वाईन आणली अन् नाजूक देठांचे ग्लास आमच्यासमोर आणून ठेवले. सुरेशरावांनी सर्वांच्यासाठी ग्लासात वाईन ओतली.

त्या हॉटेलमध्ये सगळ्या पोरीच होत्या अन् त्या झटपट कामं करीत होत्या. एकावर एक रचलेल्या प्लेटस् डान्स करीत असल्यासारख्या त्या गिऱ्हाईकांच्या टेबलावर आणून ठेवत होत्या. पण सॅलडस्, बीन्स करी, मीठ, मिरी, टोमॅटो केचअप् इत्यादी पदार्थ जागोजाग ठेवलेले होते ते ज्यांना हवं ते, त्यांनी तिथं जाऊन घ्यायचे. उत्तर प्रदेश आणि दिल्ली इथं बनवतात तसली ( बीन्स ) ‘ मोठी ’ ची उसळ फारच छान बनवलेली होती.

‘ हंड्रेड एकर्स ’ मधलं सी–फूड उत्तम होतं, पण माईंचा घसा त्या जेवणानं धरला गेला. पुढे दोन–तीन दिवस त्यांना बोलतासुद्धा येणं कठीण झालं.

आमचं जेवण चालू असताना तो खलाश्याच्या वेषातला गायक पहाडी आवाजात गातच होता. पण जेवणात गर्क असलेल्या कोणा प्रवाशाचं त्याच्या गाण्याकडं लक्ष नव्हतं. सर्वजण प्यालेले होते अन् आपल्या मित्र मैत्रिणीसमवेत मोठमोठ्यानं गप्पा मारण्यात दंग होते.

हंड्रेड एकर्स या हॉटेलचं आणखीन एक वैशिष्ट्य म्हणजे, या हॉटेलात प्रचंड अशी समुद्राची तैलरंगातली पेंटिंग्ज लटकावलेली होती. त्यांत चांदण्या

रात्रीतला शांत सागर, वादळातल्या लाटा अन् फेस उसळलेला दर्या, शिडांची गलबतं नांगरलेला एक बंदराचा विभाग, अशी निरनिराळी पेंटिंग्ज मी हातात वाईनचा ग्लास घेऊन न्याहाळू लागलो.

जेवण येताच टेबलाकडे परतलो. मी लॉब्स्टर मागवला होता. तिथल्या लॉब्स्टरला खेकड्यासारख्या भल्यामोठ्या नांग्या होत्या, अन् त्यातला गर न तोडता तो अख्खा तळलेला लॉब्स्टर माझ्यासमोर आणून ठेवण्यात आला. टोनू आणि ढमू यांचं खाणं थोडं, पण हे पाहिजे ते पाहिजे जास्त. त्यामुळं बिचाऱ्या ज्योतीला शांत चित्तानं जेवता येणंही अशक्य होई. ती अधून–मधून त्यांच्यावर रागवे, तेव्हा सुरेशराव समजावणीच्या स्वरात म्हणत, ‘ जाऊ दे ग SSS, रागावतेस कशाला ? त्यांना काय समजतं ?’

‘ या तुमच्या बोलण्यामुळंच त्या अशा वागतात !’

मराठी माणूस महाराष्ट्रात असो, नाहीतर अमेरिकेत, त्यांच्यातले ‘ डायलॉग्ज ’ सगळीकडे सारखेच. आजूबाजूला जगातल्या विभिन्न प्रदेशांतून आलेले प्रवासी मनसोक्त मद्यप्राशन करून मत्स्यांचे निरनिराळे पदार्थ खात होते. मधूनच समुद्रावरून येणारी खाऱ्या वाऱ्याची लाट एका खिडकीतून येऊन दुसऱ्या खिडकीतून बाहेर पडत होती. त्याशिवाय हॉटेलच्या प्रत्येक कोपऱ्यात मोठमोठाले स्टँडचे पंखे होते, ते एकसारखे माना फिरवीत वाऱ्याचा झोत टाकीत होते

जेवण आटोपल्यावर बाहेर आलो तेव्हा पावसाची बुरबूर थांबली होती. पण पार्किंग ग्राऊंडवर बरचसं पाणी साचलं होतं. ‘ हंड्रेड एकर्स ’ च्या भोवतालच्या दिव्यांचं प्रतिबिंब त्या साचलेल्या पाण्यात उमटलेलं होतं. ‘ हंड्रेड एकर्स ’ च्या दाराशी जो एक प्रचंड दिव्यांचा लॉब्स्टर होता, त्याचा गुलाबी रंगसुद्धा पाण्यात उमटला होता.

वाईनची मादक धुंदी अन् तळलेल्या लॉब्स्टरची चव जिभेवर घेऊन हंड्रेड एकर्सचा निरोप घेतला. पाऊस थांबला होता. हवा थंड होती.

आमची गाडी पुन्हा मुख्य रस्त्यावर आली अन् बोस्टनच्या दिशेनं धावू लागली. गाड्यांच्या प्रवाहात पुन्हा एकदा बुडालो.

त्या रात्रीच्या जेवणानंतर सुरेशरावांनी दीर्घकाळ ड्रायव्हिंग करावे असे काही आम्हाला वाटेना. तेही सतत ड्रायव्हिंग करून काहीसे थकले होतेच.

त्यांनी वाटेत एका हॉटेलसमोर गाडी उभी केली अन् जागेची चौकशी केली. एकही जागा शिल्लक नव्हती. त्या हॉटेलातून सुरेशरावांनी फोन करून पुढच्या वॉरविक गावी हॉटेलात रिझर्व्हेशन केले. वॉरविक या गावात आम्ही जेव्हा पोहोचलो तेव्हा मध्यरात्र उलटून गेली होती. या हॉटेलचे नाव होते ' एअरपोर्ट शेरेटन हॉटेल. ' एअरपोर्ट शेरेटन हे नाव एवढ्याचसाठी की, हॉटेल विमानतळाच्या अगदीच जवळ होतं.

युरोप आणि अमेरिका या दौऱ्यात इतका विमान-प्रवास करूनही विमान या वाहनाबद्दल मला अतोनात आकर्षण आहे. शेकडो प्रवाशांना घेऊन हवेतून हजारो मैलांचा प्रवास करणाऱ्या या वाहनाचा शोध ज्या शास्त्रज्ञांनी लावला त्या राईट बंधूंच्याबद्दल माझ्या मनात नितांत आदर आहे.

आकाशात तरळणारी घार बघितली की, मला अजूनही वाटतं, परमेश्वरानं मानवाला थोडी कमी अक्कल दिली असती तरी चाललं असतं, पण अंतराळात भरारी मारण्यासाठी पंख द्यायला हवे होते. आजच्या इंधन-टंचाईच्या दिवसांत त्याचा किती बरं उपयोग झाला असता ? मला अजूनही काही वेळा पंख फुटल्याची स्वप्नं पडतात, या स्वप्नांत सारं जग रस्त्यावर असतं अन् मी एकटा आकाशात पक्ष्यासारखी भरारी मारत असतो उत्तुंग इमारती, नद्या, डोंगर यावरून माझी भरारी सुरू असते, अन् ते स्वप्न जेव्हा भंग पावते अन् मी जागा होतो, तेव्हा मला खूपच हळहळ वाटते.

एअरपोर्ट शेरेटनमधे सकाळी साडेसातला जाग आली. मागचा काचेच्या खिडकीचा पडदा मागे सारून बघितले अन् ओळीनं उभी राहिलेली विमानतळावरची विमानं दिसली. वॉरविक हा काही गजबजलेले विमानतळ नव्हे; पण तरीही अधून-मधून एखादे विमान हवेत झेप घेताना अन् एखादे चाक बाहेर काढून धावपट्टीवर उतरताना दिसत होते.

ब्रेकफास्ट घेऊन सकाळी नऊ वाजता तयार झालो. पाच-सहा तासांची शांत झोप झाल्यामुळं सुरेशरावही तरतरीत झाले होते. एरव्ही ते नेहमीच तरतरीत दिसतात. पण शांत झोप लागल्यामुळं ते अधिकच ' स्मार्ट ' दिसत होते.

दहाच्या सुमारास आम्ही बोस्टनला पोहोचलो. बोस्टन हे सुद्धा सुरेख

शहर आहे. आम्हाला प्रथम जॉन केनेडींचं जन्मस्थान पाहायला जायचं होतं. सुरेशराव अन् ज्योती यापूर्वीही बोस्टनला केव्हातरी आले होते. पण आज त्यांना नेमका रस्ता सापडेना. वाटेत त्यांनी एका गाडीत थांबलेल्या गृहस्थाला पत्ता विचारला. तो गृहस्थ म्हणाला, 'थोडे बाजूला या, रहदारीला अडथळा होईल मी इथं थांबलो तर !'

गृहस्थानं आपली गाडी बाजूला घेतली, अन् सुरेशरावांना केनेडींच्या जन्मस्थानाकडे जाणाऱ्या रस्त्यांचे नंबर सांगितले. त्या गृहस्थाचे आभार मानून आम्ही पुढे निघालो, पण वाटेतल्या रस्त्यांच्या नंबरांचा काहीतरी घोटाळा झाला आणि पुन्हा रस्ता विचारण्यासाठी थांबावं लागलं. यावेळी अंगावर फक्त एक लांडी चड्डी घातलेला उघडा गृहस्थ पुढे आला आणि आम्हाला केनेडींच्या जन्मस्थानाची वाट सांगू लागला,

' You go straight, then you turn to left in first block and then you see a big ad of cocacola. You turn to right and that lane leads you to Kennedy's birth place. '

' थँक यू व्हेरी मच सर !' सुरेशराव.

' You are welcome '

केनेडींचं जन्मस्थान हे अमेरिकन सरकारनं 'नॅशनल मॉन्युमेंट' असं जाहीर केलेलं आहे. दोनशे वर्षांपूर्वी बांधलेलं हे घर पाच–दहा वर्षांपूर्वी बांधलं गेलं असावं असं वाटण्याइतपत सुस्थितीत आहे. आत येताच रिसेप्शनिस्टनं आमचं स्वागत केलं. तिथल्या खोल्यांना फलक लावलेले होते. प्रत्येक खोलीच्या दाराजवळ स्वीच होते. स्वीच ऑन केला की, त्या दालनाबद्दलची माहिती सांगितली जायची अन् ती जॉन केनेडी यांच्या वृद्ध मातोश्रींच्या स्वरांत. पहिल्यांदा आम्ही बटन दाबले. कंप पावणाऱ्या स्वरांत ती टेप सुरू झाली :

' Your President John Fitzerald Kennedy was born in this room, on this cot. As there was scarcity of light in those days my bed was prepared just near that window. '

अमेरिकेत बाळंतीणीची खोली म्हणजे आपल्यासारखी अंधारकोठडी नसते. शिकागोला नुकतंच जन्मलेलं मूल घेऊन एक निग्रो बाई मुलासहित जेवायला आली होती. त्याही प्रसंगाची आठवण आली.

त्यानंतर केनेडी लहानपणी ज्या पाळण्यात झोपत होते तो पाळणा बघितला. केनेडींची बालपणीची खेळणी पाहिली. रॉबर्ट आणि जॉन ही दोन्ही अपत्यं अकाली गमावलेल्या त्या वृद्ध मातेचे शब्द ऐकताना माझं हृदय हेलावलं. माईंच्या डोळयांत देखील अश्रू तरळले. जॉन केनेडींच्या अकाली निधनामुळे केवळ अमेरिकन जनतेलाच हळहळ वाटली होती असे नाही, तर लोकशाहीप्रेमी अशा जगातील इतर राष्ट्रांनासुद्धा त्यांच्या हत्येच्या वार्तेनं अतोनात दु:ख झालं. केनेडींनी आपल्या राष्ट्रावर प्रेम केलंच, पण त्याचबरोबर त्यांनी अखिल जगतात शांतता अन् स्थैर्य प्रस्थापित व्हावं यासाठीही प्रयत्न केले होते. पण जोपर्यंत माणूस हा माणूसच राहणार आहे, तोपर्यंत अशी शांतता अन् स्थैर्य लाभावं असे प्रयत्न करणाऱ्यांच्या नशिबी घातपाताचंच मरण लिहून ठेवलेलं असतं. जीजस क्राइस्ट, महात्मा गांधी, मार्टिन ल्यूथर किंग यांचेही मृत्यू या प्रकारचेच होते ना ?

केनेडींना अमेरिकन जनतेनं चिरंतन करून ठेवलेलं आहे. ती त्यांची अंतराळ संशोधनाची स्वप्नं पूर्ण करून, केनेडी आर्ट रिसर्च सेंटर्ससारख्या संस्था निर्माण करून. केवळ ब्रॉन्झचे पुतळे उभे करून नेते अजरामर होत नसतात, हे आमच्या लक्षात यायला किती शतकं लोटणार आहेत कुणास ठाऊक !

बोस्टन सोडल्यानंतर आम्ही जवळच्या प्लिमाऊथला आलो. या प्लिमाऊथ बंदरातच ' मे फ्लॉवर ' हे जहाज अमेरिकन लोकांनी ऐतिहासिक वस्तू म्हणून जतन करून ठेवलेलं आहे. या जहाजावर ते त्यावेळी प्रथम अमेरिकेला आले त्यावेळचे वातावरण जसेच्या तसे ठेवले आहे. दाढ्या वाढवलेले खलाशी, अंगभर वस्त्रं वापरणाऱ्या त्यांच्या सहचारिणी, विस्तवावर उकळणारं मटणचं सूप, कोंबडीचा खुराडा, थंडीत वापरण्यासाठी लागणाऱ्या गोधड्या, असे किती म्हणून बारकावे सांगावे ?

जवळच ' प्लिमाऊथ प्लँटेशन ' म्हणून वसाहत आहे. या वसाहतीत प्रथम अमेरिकेला आलेल्या इंग्रजांनी जी वसाहत केली ती तशीच्या तशी आजही या लोकांनी राखून ठेवली आहे. त्यांचे खाणे-पिणे, कपडे-लत्ते, त्यांची जुनी हत्यारं, शेतीची अवजारं सर्व काही त्यांच्या बापजाद्यांची आठवण करून देतात. या लोकांची जमातच आज तिथं वावरते आहे. तिला ' वॅनपॅनोग

फॅमिली ' म्हणतात. हे लोक अजूनही जुन्या आयुधांनी शिकार करतात व शिकार केलेल्या प्राण्याची कातडी कमवून ती गरजेच्या इतर वस्तूंच्या मोबदल्यात देतात. दगडाची चूल मांडून त्यावर त्यांचा स्वयंपाक चालतो. थंडीत जेव्हा बर्फ पडतं, तेव्हा खाण्यासाठी खारवलेले व धुरावलेले ( Smoked Mutton) राखून ठेवतात.

प्लिमाऊथ प्लँटेशन बघितल्यानंतर वाटते की, खरंच ते जीवन किती सुखावह होते. आपले अन्न आपण पिकवायचे, गरजेपुरती शिकार करायची, आपली वस्त्रे आपणच विणायची; अन् आज ? बटन दाबले की, यंत्रातून गरम गरम हॅम्बुर्गर किंवा हॉट डॉग पडतो, हॉटेलमध्ये ऑर्डर दिली की, वाईल्ड टर्कीपासून ते फेजंट, डक्, क्वेल्सपर्यंत कुठल्याही पक्ष्याचे शिजवलेले मटण मिळते. डिपार्टमेंटल स्टोअरमध्ये गेल्यावर आपल्याला हवे तसले, आपल्या अंगाला बसणारे कपडे, बूट, चपला सर्व काही मिळतं. पण प्लिमाऊथला रानटी जीवन जगणाऱ्यांच्या चेहऱ्यांवर दिसणारं चैतन्य आज हजारो डॉलर्स कमवणाऱ्या अमेरिकन नागरिकांच्या चेहऱ्यावर यत्किंचितही दिसत नाही. आज अमेरिकेने चंद्रावर झेप घेतली, निसर्गाला आपल्या बुद्धिवैभवाने मान झुकवायला लावली, पण हे राष्ट्र मानसिक स्वास्थ्य मात्र गमावून बसले आहे.

प्लिमाऊथला एक सागरी संपत्तीचं दर्शन घडवणारं बारमाही प्रदर्शन आहे. माशांचे खवले, काटे, शंख, शिंपले यांच्यापासून बनवलेल्या विविध प्रकारच्या आकर्षक वस्तू तिथं दिसल्या. मे फ्लॉवर, तीवरचे खलाशी, प्लिमाऊथ प्लँटेशनच्या रहिवाशांची दैनंदिनी दर्शवणारे अनेक रंगीत फोटोही पाहायला मिळाले.

प्लिमाऊथला दुपारी भयंकर तहान लागली म्हणून मी टीन बिअर खोलली अन् समुद्र किनाऱ्यालगतच्या लाकडी कठड्यावर रेलून बसलो, तेव्हा उमेश माझा फोटो टिपण्यासाठी पुढे सरसावले

' आबा, अहो तुम्ही किती जाड दिसायला लागलात !' कॅमेरा माझ्यावर जमवत त्यांनी विचारले.

मी हसून म्हणालो, ' भारतात परत गेल्यावर मी पंधरा दिवस उपवाशी राहणार आहे. '

मी सोबत नेलेली एकही पँट पोटाला बसेनाशी झाली होती. बुश्शर्टाची वटणं तटातट तुटू लागली आरशात माझे प्रतिबिंब मलाच ओळखू येईनासे झाले होते. उत्तम खाणे–पिणे, आणि त्यात व्यायाम नाही ! सवड मिळेल तेव्हा तासभर पायी रपेट करून येत होतो, पण शरिरात कॅलरीज इतक्या मोठ्या प्रमाणावर जात होत्या की, मैल–दोन मैल पायी चालण्याने कसलाही फरक पडत नव्हता. माझ्याप्रमाणं माई आणि उमेश यांच्याही तब्येती भलत्याच सुधारल्या होत्या.

सुरेश, ज्योती, टोनू आणि ढमू समोर हिरवळीवर आमची वाट पाहात थांबले होते. मी तिथं आल्यावर ज्योतीला म्हणालो, ' आम्हा तिघांना महिन्याभरात अमेरिका एवढी मानवली, मग तुम्हीच का अशा हडकुळ्या राहिलात ?'

ज्योती हसून म्हणाली, ' पूर्वीपासून मी अशीच आहे. '

खरं म्हणजे ज्योतीला घरी एक क्षणाचीही उसंत मिळत नव्हती. घरचं जेवण, साफसफाई, मुलींना शाळेत पोहोचवणं, आणि हे करीत असताना सुरेशरावांना ट्रॅव्हल एजन्सीच्या कामात ती मदत करायची. वेळप्रसंगी गाडी घेऊन तीस–चाळीस मैलांवर जाऊन प्रवाशांची तिकिटं नेऊन घरपोच करायची कामे ती एकटी करीत होती. या सर्व व्यापामुळं खाल्लेलं अन्न तिच्या अंगाशी लागत नव्हतं हेच खरं कारण होतं.

प्लिमाऊथवरून परत येताना ज्योती ड्रायव्हिंगला बसली. काल मध्यरात्रीपर्यंत सुरेशरावांनी ड्रायव्हिंग केले होते. त्यानंतर सकाळपासून तेच ड्रायव्हिंग करीत होते. त्यांना थोडी विश्रांती देण्याच्या उद्देशाने ज्योती ड्रायव्हिंगला बसली. जेमतेम अर्धा तास तिनं ड्रायव्हिंग केले असेल, इतक्यात समोरचा रस्ता ' जाम ' झाला. हजारो मोटारी अडकून पडल्या. पुढे काय प्रकार झालेला आहे हे समजायला मार्ग नव्हता बसल्या जागी बसून राहण्याशिवाय दुसरा काही मार्गच नव्हता. आणखी पंधराएक मिनिटांनी वाहतूक सुरू झाली, पण ती मुंगीच्या पावलांनी.

प्रमाणापेक्षा कोणतीही गोष्ट जास्त झाल्यावर हेच होणार. मुंबईत संध्याकाळी ऑफिसेस सुटल्यावर कितीतरी वेळा वाहतूक अडकून पडल्याचं मी पाहिलं आहे जो तो उठतो सुटतो मुंबईला येतो. कबुतराच्या खुराड्यांत

ठासून कबुतरे भरावीत, तसा माणूस मुंबईच्या चाळीचाळीतून ठासून भरलेला आहे. जी गोष्ट ठासून भरली जाते, तिचा एक ना एक दिवस स्फोट उडत असतो. Population Exploision म्हणजे तरी काय ? लोकसंख्येचा स्फोट. तो आज ना उद्या होणारच ! निम्मी मुंबापुरी संपलेलीच आहे. पाणी पुरवठा, ड्रेनेज या व्यवस्था कधी कधी ढासळतात, लोकल काही मिनिटं लेट झाली की, तिच्यावर संतप्त प्रवासी दगडफेक करतात, वेळीप्रसंगी जाळपोळ करतात, हे काय शहराच्या समृद्धीचं लक्षण आहे ? पण या गोष्टीकडं कोणीच लक्ष द्यायला तयार नाही.

या देशाची भरमसाट वाढलेली लोकसंख्या जोपर्यंत मर्यादित करण्याची कोणाला गरज वाटत नाही, तोपर्यंत या देशाचं दैन्य, दारिद्र्य हे वाढतच जाणार आहे. मुंबई, कलकत्ता, मद्रास ही शहरं बकाल होत जाणार आहेत, अन् शेवटी एक दिवस माल्थस्च्या तत्त्वानुसार लोकसंख्येचा विस्फोट होणार आहे. मग तो भयानक तुफानानं होवो, एखाद्या असाध्य अशा रोगराईनं होवो, किंवा भूकंपानं होवो, पण तो झाल्याशिवाय बेसुमार वाढलेली ही लोकसंख्या कमी होणार नाही.

ज्योती गाडी सुरेख चालवत होती. तसे सक्कासन्नाला असताना ती आम्हाला मार्केटिंगसाठी डिपार्टमेंटल स्टोअर्सकडे घेऊन गेली होतीच; पण आज मात्र तिने सतत चार-पाच तास ड्रायव्हिंग केले.

दिवस मावळायच्या सुमाराला सक्कासन्नाला येऊन पोहोचलो. दोन दिवस एके ठिकाणी बसून बसून गुडघे धरले होते. रात्री थंड पाण्यानं स्नान करून व्हिस्कीचा एक पेग भरून टोनू आणि ढमूबरोबर टीव्ही बघत बसलो.

अमेरिकेतील वास्तव्याचा शेवटचा दिवस उजाडला ढमू आम्ही न सांगता निघून जाऊ म्हणून रात्रभर माईच्याजवळ झोपली. ' मी तुमच्या-सोबत इंडियाला येणार !' असा तिनं हट्टच धरला होता.

ज्योती अन् सुरेश दुपारी गाडी घेऊन बाहेर गेले अन् आमच्यासाठी काटेचमच्यांचा एक सेट प्रेझेंट म्हणून घेऊन आले.

' हे कशाला हो ?'

' तुम्ही प्लेटस् आणि सॉसर्सचा सेट घेतला आहे ना ? मग तुम्हाला त्याच्यासोबत हा काटेचमच्यांचा सेट उपयोगी पडेल !'

‘ अहो पण, हे सर्व सामान सोबत न्यायचं कसं ?’ माईनी विचारलं.

‘ त्याची चिंता नको. आमची एक मोठी बॅग तुम्हाला रिकामी करून देऊ !’

सुरेशरावांनी असं म्हणायचाच अवकाश की, लगेच ज्योतीनं आपली कपड्यांची एक बॅग मोकळी करून आमच्यासमोर आणून ठेवली अन् म्हणाली, ‘हं ! ही घ्या बॅग. हिच्यात आणखीन कितीतरी सामान मावेल !’

दिवसभर सामान भरण्याचे काम चालले होते. रात्री नऊला न्यूयॉर्कवरून आमचे विमान सुटणार होते. साडेसातच्या सुमाराला आम्ही घर सोडले.

सुरेशराव येताना म्हणाले, ‘ आबा, तुम्ही काही करा, पण इकडे आमच्या कुटुंबात राहण्यासाठी एक चांगल्या बाई पाठवा. आणखी तीन वर्षांनी टोनू–ढमूची शाळा दुपारी सुरू होईल, तेव्हा काही चिंता नाही. पण आता त्यांची सकाळची शाळा असल्यानं सगळीच पंचाईत होते. ’

‘ ठीक आहे ! पण इतक्या दूर यायला तयार असलेल्या बाई मिळायला हव्यात ना ?’

‘ हे काम झालं तर तुमच्याच हातून होईल. आमचे खूप नातेवाईक आहेत, पण कोणी या बाबतीत घ्यावा तसा इंटरेस्ट घेत नाहीत. माझी अगदी कळकळीची विनंती आहे !’

मी सुरेशरावांना सांगितलं, ‘ Dont worry I will try my level best ’

‘ माई, तुम्ही फार लवकर निघालात. आणखीन चार महिने राहिला असता, तर बरं झालं असतं !’ ज्योती माईंचा हात हातात घेत म्हणाली.

‘ चार महिन्यांनंतर मी जायला निघाले तर तेव्हाही हेच म्हणाल. ’

‘ नाही ! नाही ! पण तुमच्यासारखे आमच्याशी एकरूप होणारे कुटुंब पुन्हा भेटणार नाही तुम्ही मला अगदी घरच्यासारख्या वाटता !’

त्या दोघी काही क्षण बोलायच्या थांबल्या. दोघींचीही अंत:करणं भरून आली होती. मी अन् उमेश, सुरेशरावांशी गप्पा मारत होतो. मी सुरेशरावांना विचारलं,

‘ तुम्ही जन्मभर अशीच धावपळ करीत अमेरिकेत राहणार ?’

‘ आणखीन फक्त पाच वर्षे ! पाच वर्षांनंतर हे सर्व सोडून भारतात

येणार. आत्ताच मला या जीवनाची उबग आलीय् !'

अमेरिकेला गेलेल्या अनेक लोकांची हीच इच्छा आहे. हातपाय धडधाकट आहेत तोपर्यंत खूप कमवायचं अन् नंतर उर्वरित आयुष्य भारतात घालवायचं. शेवटी सोन्याचा पिंजरा आणि मोत्याचा चारा यांचीही उबग येतेच ! मला विचाराल तर, मी म्हणेन, 'ज्याला शक्य असेल त्याने युरोप–अमेरिका पाहावी. तिथलं जीवन अवलोकन करावं. खावं, प्यावं, खूप खरेदी ( डॉलर्स शिल्लक असले तर ) करावी अन् सरळ भारताचा रस्ता सुधारावा. अमेरिकेत मरेपर्यंत राहणं म्हणजे जिवंत राहून मरणं, याशिवाय मला दुसरा अर्थच लावता येत नाही. भौतिक सुख अन् समृद्धी ही सुखाची साधनं आहेत. ती साध्य होऊ शकत नाहीत !'

पुन्हा एकदा केनेडी एअरपोर्ट ! चेक् इन् व्हायच्या वेळेला ढमूला माईंच्याजवळून ज्योतीने घेतले तेव्हा तिने, 'मी इंडियाला जाणार' म्हणून टाहो फोडला. 'आपण नंतर जायचं' असं तिचे मम्मी व डॅडी समजाऊन सांगत होते. पण ती ऐकत नव्हती. ज्योती अन् सुरेश दोघेही वाकून आमच्या पाया पडले. आमचे सर्वांचेच अंत:करण भरून आले होते.

ओळीनं आम्ही तिघे आत निघालो तेव्हा माझ्या हातातला धनुष्यबाण पाहून तिथला सिक्युरिटीचा अधिकारी म्हणाला, 'यू कॅननॉट टेक धिस इन द् एअरक्राफ्ट !'

'व्हाय नॉट ?'

'इट इज ए वेपन !'

'नो ऽऽ इट इज ए टॉय !' मी म्हणालो.

शेवटी त्या सेक्युरिटीच्या वरिष्ठ अधिकाऱ्याला मी भेटलो अन् म्हणालो, 'तुम्हाला हा धनुष्यबाण जर आक्षेपार्ह वाटत असेल, तर तो विमानात फ्लाईट सुपरवायझरच्या कस्टडीत घ्या. मला तो मुंबईत उतरल्यावर परत द्या !'

त्या अधिकाऱ्याने ते धनुष्य बघितले अन् मला ते विमानात सोबत घ्यायला परवानगी दिली. ज्या प्रवाशांची बारकाईनं तपासणी करायला हवी त्यांच्याकडं दुर्लक्ष, अन् माझ्यासारखा हौसेनं एखादी वस्तू नेणारा त्यांना दिसतो काय ?

सुरेश आणि ज्योती आमचं हे धनुष्य प्रकरण निकालात निघेपर्यंत गेटजवळ थांबले होते. मला ते धनुष्य न्यायला प्रतिबंध केला असता, तर मी ते पॅकिंग सुरेशरावाकडंच ठेवणार होतो; पण सुदैवानं तसं काही घडलं नाही.

अमेरिकन मातीशी अल्पकाळ जडलेलं नातं विमानात अंतराळात उड्डाण करताच तुटलं. आता वेध लागले होते भारताचे ! मित्र, नातेवाईक यांना कधी भेटतो असं होऊन गेलं होतं. तशात उमेशना लंडनला सोडायचे होते. ते तेथून हॉलंडला जाणार होते. आम्ही दोघेच पुढे भारताला जाणार होतो.

अमेरिकेत रात्रीचे दहा वाजले तरी, संधिप्रकाश असतो. झेपावलेल्या विमानाच्या खिडकीतून पाहिले. हात उंचावलेल्या स्वातंत्र्यदेवतेचे शेवटचे दर्शन घडले. वर्ल्ड ट्रेड सेंटरची आकाशाचे चुंबन घेणारी इमारत दिसली. अफाट पसरलेली न्यूयॉर्क नगरी झरझर मागे पडू लागली. काही क्षणात गडद अंधारात विमान विलीन झाले.

ज्योती, सुरेश या प्रेमळ दांपत्याची एकसारखी आठवण येत होती. चिमुकल्या टीनू अन् हमूची निष्पाप बडबड अजूनही आठवत होती. लॉस एंजेलीसवरून निघताना संध्या अन् उदय यांचा निरोप घेताना हेच जाणवलं होतं.

विमान लंडनला उतरले तेव्हा पुन्हा तो वेळेचा घोळ ! घड्याळं पुढं-मागं करावी लागली.

इथं एका विलक्षण प्रसंगाला सामोरे जाण्याची पाळी आम्हा दोघांवर आली होती. एकुलत्या एक मुलाला लंडनला सोडून आम्ही दोघे पुढे जाणार होतो. या अगोदर उमेश दिल्ली, आग्रा, नैनिताल, म्हैसूर, बेंगलोर अशा ठिकाणी आम्हाला सोडून जाऊन आले होते. पण ती सर्व ठिकाणं भारतातल्या भारतातच होती. आज मात्र त्यांना इतक्या दूरच्या देशात सोडून जायचे या जाणिवेनं माईचं अंतःकरण हेलावलं. मी मात्र अशा वेळी थोडा गंभीर असतो

उमेशनी आमच्या दोघांच्या पायांना स्पर्श करून नमस्कार केला. मी त्यांना छातीला लावून घेतलं. माईंनी अश्रूंनी डबडबलेल्या नेत्रांनी त्यांना जवळ घेतले अन् जपून राहण्याची सूचना केली.

हातात सूटकेस घेऊन ते हिथ्रो विमानतळावरच्या गर्दीत दिसेनासे झाले तसे आम्ही दोघे आमच्या विमानात परतलो

सकाळी दहा वाजता आम्ही लंडन सोडले. लंडन विमानतळावर ड्यूटी-फ्री शॉप होते. तेथून स्कॉचची बाटली घ्यायची होती; पण वेळच मिळाला नाही. खरं सांगायचं म्हणजे स्कॉच व्हिस्कीचं आकर्षणच खलास झालं होतं.

जवळ जवळ दोन महिने एकसारखी युरोप आणि अमेरिकेत भ्रमंती घडली होती. स्तिमित करणारी वैज्ञानिक प्रगती, अंतराळ संशोधनातली आश्चर्यकारक प्रगती, डिस्नेलँड, हॉलीवूड, मरीन लँड अशी तहानभूक हरवणारी ठिकाणं बघितली, ला वेगाससारखी जगातली प्रख्यात जुगार-नगरी बघितली, ग्रँड कॅनियनसारखे निसर्गाचे विराट असे दर्शन घडवणारे ठिकाण बघितले. न्यूयॉर्क. शिकागो, वॉशिंग्टन अशी गगनचुंबी इमारतींची शहरं पाहिली, अमेरिकन लोकांची उद्योगप्रियता पाहिली, त्यांचा असामान्य असा सिव्हिक सेन्स बघितला, कॅलिफोर्नियातील मैलच्या मैल फळांच्या बागा पाहिल्या, हिरवीगार अशी समुद्रासारखी अफाट पसरलेली गव्हाची शेतं पाहिली, नजर लागण्यासारखी दुभती जनावरं पाहिली, एका दिवसात सहा-सातशे मैल जरी मोटारीनं प्रवास केला तरी शीण येणार नाही असे आरशासारखे विस्तीर्ण रस्ते बघितले, घनदाट अशी सील्व्हर ओक, पाईन यांची जंगलं पाहिली, अवाढव्य अशा डिपार्टमेंटल स्टोअर्समध्ये स्वतःला अनेक वेळा हरवून घेतलं, अमेरिकेतल्या मराठी माणसांचं प्रेम अनुभवलं आणि हे सर्व आठवत आम्ही परतीचा प्रवास करीत होतो.

आता मायभूमीची ओढ अनावर झाली होती जूनच्या सुरुवातीला मुंबई सोडली होती. अन् जुलैच्या अखेरीस पुन्हा मुंबईकडे निघालो होतो.

या दोन महिन्यांच्या कालावधीत भारतात कोणकोणत्या राजकीय अन् सामाजिक उलथापालथी घडल्या होत्या याबाबत काहीही समजले नव्हते लंडनला हिथ्रो विमानतळावर एका गृहस्थाने ' टाईम्स ऑफ इंडिया'चा एक

अंक आणला होता. तो मी आधाशासारखा वाचून काढला. त्यात वाचलं की, यशवंतरावांनी आय कॉंग्रेसमध्ये प्रवेश मिळण्याबाबत केलेल्या अर्जावर कॉंग्रेस कार्यकारिणीने अद्याप कोणताच निर्णय घेतलेला नव्हता.

चार तासांतच अंधार पडला.

नकाळी लंडन सोडल्यानंतर विमानात ब्रेकफास्ट देण्यात आले होते. आणि जेमतेम चार–पाच तास होतात न होतात तोच एअर होस्टेसने डिनर आणल्याचे पाहून मी म्हणालो, 'मघा तर ब्रेकफास्ट घेतले, अन् इतक्या लवकर डिनर कसे काय ?'

ती हसत हसत म्हणाली, 'घड्याळाप्रमाणं आता डिनरचीच वेळ झाली आहे.'

मला आता काही नको !

माईनीही डिनर घेतले नाही.

पालमचे दिवे दिसले तेव्हा रात्रीचे अकरा वाजले होते. हजारो मैलांचा हवाई प्रवास करून मायभूमीला सुखरूप परत आलो होतो. मी अंधश्रद्ध मुळीच नाही. पण या पृथ्वीतलावर एखादी सर्वशक्तिमान देवता आहे आणि तिच्या आज्ञेनेच सर्व भल्याबुऱ्या घटना घडत असतात यावर मात्र माझा नितांत विश्वास आहे. मी ही दैवी शक्ती तुळजाभवानीच्या ठायी एकवटलेली आहे असे मानतो. म्हणून ज्यावेळी विमान पालमवर उतरले, तेव्हा मी तुळजाभवानीचे मनातल्या मनात स्मरण केले.

रात्री पावणे दोनच्या सुमारास सहार विमानतळावर उतरलो तेव्हा पावसाची रिमझिम चालू होती. आमच्याजवळ आक्षेपार्ह अशा कोणत्याच वस्तू नव्हत्या. तेव्हा Nothing to Declare अशी पाटी लावलेल्या प्रवेशद्वारातून बाहेर पडलो. पावसाने चांगलाच जोम धरला होता. बाहेर जागोजागी पाणी साचलं होतं. सहार विमानतळावर अवेळी उतरणाऱ्या प्रवाशांना टॅक्सीवाले कसे लुबाडतात याची पूर्वकल्पना असल्याने, टॅक्सीतून जायचे नाही असे अगदी ठरवून ठेवले होते. ताजमहाल हॉटेलपर्यंत जाणारी

वेस्ट कंपनीची बस
ती पहाटे  साडेती
मुंबापुरीला जाग अ
सुद्धा न बघितलेली
नि:संकोचपणे आपल
यापुढं मला पुन्हा एव
पानाच्या पिचकाऱ्यांन
थांबावं लागणार आहे
मागणाऱ्या बायका ग्र ारस्ती ५।
समारंभ सगळ्या जगाला कळावा म्हणून
स्पीकरवरं सिनेमाची तीच तीच गाणी ऐकावी
भेसळीची सवय दोन महिन्यांपुरती मोडली होती. ५
भेसळीच्या अन्नाची शरिराला सवय करावी लागणार आह

युरोप–अमेरिकेतली माणसं स्वत: सुखी नसली तरी, दु
होईल असे काहीही करीत नाहीत; परंतु भारतीय
कृतीचा दुसऱ्यावर कोणता अनिष्ट परिणाम होईल याच
करीत नाही. विचारांती असं वाटतं, या देशाची ल
मर्यादित केल्याशिवाय इथं कोणाला सुख लाभणार नाह

शेवटी मला म्हणायचंय – युवर अटेंशन प्लीज ! ज
वेळीच पायबंद घातला नाही तर देश दैन्य अन् द
जायला फारसा वेळ लागणार नाही.